टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. (मराठी) पदवीसाठी

सादर करण्यात आलेला प्रबंध

# विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास


: अभ्यासक :

कु. चित्रा सुरेश कायंदे

: मार्गदर्शक:

डॉ.न.म. जोशी

साहित्य आणि ललितकला अभ्यास मंडळ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे.



२०१४

## : प्रमाणपत्र :

मी न.म.जोशी प्रमाणित करतो की, कु.चित्रा सुरेश कायंदे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली ‘‘विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास’’ हा शोधप्रबंध २०१० ते २०१४ या कालावधीत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. (मराठी) या पदवीसाठी सादर केला आहे.

यांनी हा शोधप्रबंध स्वतंत्ररित्या लिहिलेला असून इतरत्र कोणत्याही विद्यापीठात पदवी किंवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही. याची मला खात्री आहे. करीता हे प्रमाणपत्र दिले आहे.

मार्गदर्शक

डॉ. न.म. जोशी

## : ऋणनिर्देश :

महाविद्यालयात असल्यापासून मी पीएच.डी. चे स्वप्न पाहिले होते. या स्वप्नाच्या दिशेने मी वाटचाल करीत होते. माझे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत केली आहे. सर्वांच्या मदतीशिवाय,प्रोत्साहनाशिवाय,पांठीब्याशिवाय, मार्गदर्शनाशिवाय मला हे स्वप्न पूर्ण करताच आले नसते.

सर्वप्रथम माझे मार्गदर्शक गुरु डॉ.न.म.जोशी सर यांच्या योग्य व दीर्घ मार्गदर्शनामुळेच मी प्रबंध पूर्ण करू शकले. ग्रामीण भागातून आलेल्या माझ्यासारख्या विद्यार्थीनीचा आत्मविश्वास सरांनी वाढवला. पीएच.डी. करू शकते असा विश्वास निर्माण केला. माझ्या सांसारिक जबाबदारीतून मला जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे सरांनी मला वेळ दिला. औपचारिकतेपेक्षा वडिलकीच्या भावनेतून त्यांनी मला वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले. सर आजारी असतांनाही प्रबंध वाचून सूचना केल्या. मार्गदर्शक,शिक्षक,गुरु कसा असावा याच उत्तम उदाहरण म्हणजे साधी राहणी उच्च विचारसरणी असणारे डॉ.न.म.जोशी सर आहेत. सरांमुळेच माझे स्वप्न मी पूर्ण करू शकले. त्यामुळे मी सरांची आजन्म ऋणी राहील.

टिळक विद्यापीठाचे डॉ.भटसर यांनीही वेळोवेळी सकारात्मक प्रोत्साहन दिले. अडचण आली तिथे मार्ग दाखवला. काम करण्याचे सतत प्रोत्साहन दिले त्याबद्दल डॉ. भट सरांचे मी शतश: आभार मानते.

शिक्षणाची सुरवात घरापासूनच होते. त्यामुळे माझ्या माहेरच्या आणि सासरच्या दोन्ही परिवाराचा माझ्या यशात फार मोठा वाटा आहे. माझ्या आई वडिलांनी सौ. मंगला ,श्री.सुरेशराव कायंदे मला शिकवले, प्रोत्साहन दिले. माझे बाबा माझ्या गावात (गुंधा – जिल्हा बुलढाणा) वाचनालय

चालवतात. त्यामुळे पुस्तकांची  ओळख (सौ.मंगल श्री. सुरेशराव). कळायला लागण्याआधी झाली होती. माझे आजोबा कै. उत्तमराव कायंदे पट्टीचे वाचन करणारे होते. त्यामुळे त्यांच्याकडे ज्ञानही फार होते. वाचनाचा वारसा मला त्यांच्याकडूनच मिळाला. माझी आजी म्हणजे कै. आक्का साधी होती, पण मी काहीतरी करते याचा तिला कायम अभिमान होता. यांच्या शुभाशिर्वादामुळे मी आज यशस्वी होऊ शकले.

माझे मोठे भाऊजी आणि दिर श्री. अविनाश देशपांडे यांनाही वाचनाची खूप आवड आहे. त्यांच्याजवळच्या विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचेच वाचन करून मी अभ्यास केला. म्हणजे खरी विषयाकडे वाटचाल करण्याची सुरवात त्यांच्या मुळेच झाली. त्यामुळे मी त्यांचीही ऋणी आहे. माझे दुसरे भाऊजी श्री. विवेकराव चौधरी यांनीही मला नेहमी प्रोत्साहन दिले. नियमित चार–पाच तास अभ्यास करायला सांगितला. सतत माझ्या अभ्यासाची चौकशी केली त्यामुळे मी त्यांचीही ऋणी आहे.

माझा भाऊ सुनील याने प्रकाशनासाठी पाठविण्याचा संशोधनपर लेख तत्काळ टंकलिखित करून पाठवला. माझ्या बहिणी सौ. जयश्री व सौ. संगीता यांनीही मला वेळोवेळी प्रोत्साहन दिल. त्यामुळे मी त्यांचीही ऋणी आहेच. माझा  मानलेला भाऊ डॉ. नितीन व्यवहारे याने मी पीएच.डी. ची प्रवेश परीक्षा पास झाल्यापासून ते प्रबंध  पूर्ण होईपर्यंत मला सतत अभ्यासाची,लिहिण्याची सकारात्मक प्रेरणा दिली. तो त्याच्या कामाच्या व्यापातूनही नियमित माझ्या अभ्यासाची चौकशी करत होता.

माझा मुलगा चि. सर्वेश यानेही मला अभ्यास करू दिला. कधीतरी गोड व्यत्यय आणला पण अभ्यास करू दिला. आपली आई मराठी विषयात पीएच.डी. करते आहे हे त्याला कळले. विश्वास पाटील लेखक आहेत हे त्याला कळले. यातच मला आनंद आहे. आणि ज्यांच्या सहकार्याशिवाय मी हे स्वप्न कदापिही  पूर्ण करूच शकले नसते असे माझे सहसंवेदक पती डॉ. संतोष देशपांडे यांचा माझ्या यशात सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या आशादायी प्रोत्साहनामुळे भक्कम,आश्वासक पाठींब्यामुळे मला अभ्यास करणे शक्य झाले.मला त्यांच्या ऋणातच रहायला आवडेल.

याशिवाय माझे हितचिंतक,मैत्रिणी, शहापुरचे पाटील, वाचनालयातील कर्मचारी यांचाही माझ्या यशात वाटा आहेच. त्यामुळे यांचेही धन्यवाद !

मंदिर उभारताना अनेक विटा एकमेकांवर रचून ते कळसापर्यंत जाते, तसेच माझे पीएच.डी.चे मंदिर अनेकांच्या सहकार्याच्या,आशिर्वादाच्या ,प्रोत्साहनाच्या पाठींब्याच्या विटांवर उभे आहे. या सर्वांविषयी मी मनातून कृतज्ञता व्यक्त करते. माझे यश सर्वांमुळेच आहे.

कु. चित्रा सुरेश कायंदे

**प्रबंधाची प्रकरणश: मांडणी**

# प्रकरण पहिले उपोद्घात

**अनुक्रमणिका**

१.१. प्रस्तावना

१.२. अभ्यास विषय निवडी मागील भूमिका

१.३. संशोध विधान

  १.३.१ विश्वास पाटील

  १.३.२ कादंबरी

  १.३.३ सामाजिक अभ्यास

१.४. अभ्यास विषयाची व्याप्ती आणि मर्यादा

१.५. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे

१.६. अभ्यास पद्धती

  १.६.१ सामाजिक अभ्यास पद्धती

  १.६.२ चारित्रात्मक अभ्यास पद्धती

१.७. पूर्व संशोधनाचा थोडक्यात आढावा

१.८. वापरण्यात आलेली संशोधन साधने

१.९. संदर्भ

## १.१ प्रस्तावनाः

पहिल्या उपोद्‌घात प्रकरणात अभ्यास विषय कसा निवडला हे स्पष्ट केले आहे. संशोधनाच्या विधानातील शब्दांचा अर्थ स्पष्ट केला आहे. अभ्यास विषयाची व्याप्ती आणि मर्यादा स्पष्ट केलेली आहे. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत. संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या अभ्यास पद्धतीची माहिती दिलेली आहे.  या आधीच्या संशोधनाचा अगदी थोडक्यात आढावा घेतलेला आहे. संशोधनासाठी वापरण्यासाठी आलेल्या साधनांची यादी दिलेली आहे. आणि शेवटी संदर्भ दिलेले आहे. अशा प्रकारे ह्या प्रकरणाची मांडणी केलेली आहे.

## १.२ अभ्यास विषय निवडी मागील भूमिकाः

विश्वास पाटील यांची ‘पानिपत’ ही कादंबरी वाचली. मला ती फार आवडली. त्यांच्या लेखनपद्धतीने मी भारावले. त्यानंतर ‘पांगिरा’ ही कादंबरी वाचण्यात आली. ती वाचतांना त्यात माझे गाव, त्यातील व्यक्ती, परिसर, निसर्ग, शेतकी जीवन, समस्या, कष्टमय जीवन, राजकारण, पाणी प्रश्न, व्यसनाधिनता असे जवळपास सगळेच माझ्या गावातले मला त्यात दिसले. माझे छोटसे गाव गुंधा, बुलढाणा जिल्ह्यातील, लोणार तालुक्यातील आहे. तिथेही ‘पागिंरा’फ़ारखी एसटी धुरळा उडवत येते आणि जाते. माझ्या गावातील शेतकरी, त्यांचे अहोरात्र कष्ट, निसर्गाच अनियमित चक्र, अशिक्षितता, दारिद्रय, शेतीची कामे, गावातील-राजकारण इत्यादी सर्व गोष्टी ‘पांगिरा’ तील गोष्टीशी साधर्म्य साधणाऱ्या आहे. माझ्या गावात पाण्याचा सुकाळ होता; पण आता पाण्यासाठी घाम गाळावा लागतो. रात्री-बेरात्री विहिरीच पाणी भरावे लागते. आधी माझे गाव एक ‘आदर्शगाव’ होते. आता गावात आदर्शासारखे काहीही राहिलेले नाही. माझ्या गावात कित्येक वर्षे निवडणुका बिनविरोध होत होत्या. आता मात्र वार्डा-वार्डातून इर्षेने निवडणूक होते. आत्तापर्यंत माझ्या गावात दारूचे दुकान नव्हेते; पण आता ते सुरू झाले आणि तिथे अहोरात्र गिऱ्हाईकांची गर्दी असते. पाच भाऊ, त्यांची मुले, सुना, नातवंडे अशा मोठ्या कुटुंबाचे छोटे-छोटे कुटुंब झालेले  माझ्या गावात आहे. असे सगळेकाही मला ‘पांगिरा’ त माझ्या गावातले दिसले. आणि ‘पांगिरा’ मला माझ्या मातीची वाटायला लागली.

त्यानंतर 'झाडाझडती' वाचली. धरणग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर नोकरी मिळते. अशा मर्यादित अर्थाने मला हा शब्द माहिती होता. मात्र 'झाडाझडती' वाचल्यावर खरा धरणग्रस्त कोण, कसा होतो, त्याचे जगणे, समस्या, हाल-अपेष्टा, संकटे काय असतात. हे खऱ्या अर्थाने कळले. धरणग्रस्तांचे दुःख मला जाणवले. धरणग्रस्त ह्या शब्दाचा खरा अर्थ 'झाडाझडती' मुळे कळला. मी पण एका शेतकऱ्याची मुलगी असल्यामुळे 'झाडाझडती' तील शेतकरी जीवनाशी पुन्हा माझी नाळ जोडल्या गेली. त्यातील शेतकऱ्यांचे दुःख मला आपले वाटले.

यानंतर 'संभाजी' वाचली. खरतर तिचा गवगवा ऐकूणच ती वाचली. तिचा एवढा गवगवा का? हे ती कादंबरी वाचल्यावर कळले. शंभूराजांच्या चरित्राकडे, खऱ्या इतिहासाकडे, शंभूराजांच्या अंतर्मनाकडे घेऊन जाणारी 'संभाजी' ही खरेपणाच्या जास्तीत-जास्त जवळ जाणारी वाट आहे. त्यामुळे ही कादंबरी अधिक विश्वासार्ह वाटते . शंभूराजांच्या आतल्या माणसाचा उलगडा होतो.

या सर्व कादंबऱ्या वाचतांना एकच लेखक एवढया वैविध्यपूर्ण कसे लिहू शकतात? या गोष्टीचे कुतूहल आणि आश्चर्य वाटले. एकाच लेखकाच्या ग्रामीण, सामाजिक, ऐतिहासिक, चरित्रात्मक अशा वेगळया विषयाच्या कादंबऱ्या आणि त्याही यशस्वी, कशा काय असू शकतात? विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांतील समाजवास्तव, समाजजीवन मला आकर्षित करू लागले म्हणून मी या विषयाकडे वळले. विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांतील सच्चेपणा, खरेपणा मला जाणवला. कादंबऱ्यांतील समाजजीवनातील समस्या, प्रश्न, वातावरण, विविध व्यक्ती, स्त्री-जीवन, आर्थिक-धार्मिक, राजकीय-शैक्षणिक स्थिती, संस्कृती अशा समाजातील आजूबाजूच्या गोष्टी मला कादंबरीच्या समाजजीवनात वाचायला मिळाल्या. ऐतिहासिक कादंबरीतील समाज कसा असेल? याचे उत्तर 'पानिपत' आणि 'संभाजी' तून मिळाले. समाजाचे चित्रण इतके वास्तव कसे काय साहित्यात येते? असा प्रश्न मला पडला आणि विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास करावा असे मला वाटले. म्हणून मी हा विषय निवडला सामाजिक अभ्यास या विषयातील संशोधन फारसे नाही. त्यामुळे या संशोधनाचा नक्कीच फायदा होईल असे मला वाटले.

''विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा', 'पानिपत', 'झाडाझडती', 'महानायक', 'संभाजी' या कादंबऱ्यांनी मराठी साहित्यात आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटवली आहे. मराठी कादंबरीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. त्यांनी सकस आणि दर्जेदार कादंबरी लेखनाद्वारे स्वतःची एक वेगळी ओळख मराठी कादंबरीमध्ये निर्माण केली आहे.'' (१)

म्हणूनच अशा प्रयोगशील, वास्तव, मोठया आवाक्याचे विषय हाताळणारे, विषय वैविध्य जपणारे, अभ्यासपूर्ण लेखन करणारे, स्वानुभवातून लिहिणारे असे विश्वास पाटील हे मराठी कादंबरी साहित्यात महत्त्वाचे लेखक आहेत. यांच्या कादंबऱ्यांचा वेगळ्या दृष्टीकोणातून म्हणजे 'सामाजिक अभ्यास करणे निश्चितच महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त आहे.

''विश्वास पाटील यांना आपल्या लेखणीद्वारे अनुभवाच अविष्करण कराव ही मनापासूनची आवड. त्यांच व्यक्तिमत्व अस अनुभवसंपन्न, चौफेर त्यांनी चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या, ऐतिहासिक व साामजिक कादंबऱ्यांची निर्मितीही केली. भाषेवर जबरदस्त हुकूमत, खूप मोठा काळाचा व परिसराचा पट आणि रंगतदार वर्णन व नाटयात्मकता यामुळे त्यांच्या कादंबऱ्या आकाराने प्रचंड असूनही वाचनीय ठरल्या त्याचबरोबर किंबहुना त्यापेक्षाही महत्त्वाच अस की त्या अधिक प्रभावी ठरल्या.'' (२)

विश्वास पाटील यांनी दर्जेदार कादंबऱ्या निर्माण केल्या. एकाच कादंबरी प्रकारात न अडकता उपेक्षित, वादग्रस्त, समस्याप्रधान, वास्तव, विषयाच्या मूळापर्यंत जाणारे, त्यासाठी अपार कष्ट घेणारे विश्वास पाटील हे लेखक विरळाच आहेत. मराठी कादंबरीत अस्सलपणा आपल्या अनुभवाच्या आधारे देऊन, ती अधिकाधिक जीवनाभिमुख आणि वास्तव करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. आणि हा प्रयत्न संशोधन करण्यास पात्र आहे. विश्वास पाटील यांच्या वैविध्यपूर्ण, अभ्यासपूर्ण, वास्तववादी, कादंबऱ्यांचा सामाजिक अंगाने अभ्यास करण्याच्या हेतूने मी हा विषय निवडलेला आहे.

विश्वास पाटील यांच्या साहित्याचा आत्तापर्यंत वाङ्मयीन दृष्टीकोनातूनच विचार झालेला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये समाजजीवन चित्रित झालेले आहे. लेखकांना स्वतःला साामजिक भान

असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांत ते उतरलेले आहे. या साामजिक अंगाचा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे मी विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.३ संशोधनाचे विधानः

**विधानः–** ''विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास''

### १.३.१ विश्वास पाटीलः–

विश्वास पाटील हे १९७५ पासून मराठी साहित्यात कथा कादंबऱ्या लिहिणारे लेखक आहेत. साधारणतः चाळीस वर्षे ते लिहित आहेत. सुरवातीला त्यांनी काही कथा लिहिल्या नंतर त्यांनी कादंबऱ्या लिहिल्या. आंबी (१९८०), क्रांतिसूर्य (१९८२), पानिपत (१९८८), पांगिरा (१९९०), झाडाझडती (१९९१), महानायक (१९९८), चंद्रमुखी (२००४), संभाजी (२००५) अशा एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'झाडाझडती' या त्यांच्या कादंबरीला १९९२ चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. अजूनही विश्वास पाटील लेखन करत आहेत.

### १.३.२ कादंबरीः–

**व्याख्याः–** ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्यकृती असते. एखादया पोटसमूहाचे, पोट संस्कृतीचे तपशीलांसह दर्शन घडवलेले असते. नवी कादंबरी हा कादंबरीचा वर्ग आहे. मराठी कादंबरीच्या आजपर्यंतच्या विकासातली ही शेवटची शाखा आहे. वास्तवाशी अतूट जगण्याचा नवा मूल्यविचार व्यक्त करणे, नवी नैतिकता मांडणे ही या नव्या कादंबरीची वैशिष्टये.'' (३)

### १.३.३ सामाजिक अभ्यासः–

''साहित्य ही कला इतर कला, म्हणजे संगीत, नृत्य, चित्र, वगैरेपासून वेगळी आहे. कारण साहित्याच माध्यम आहे ते भाषा. आणि ती समाजाच्या मालकीची आहे. भाषा या माध्यमाचा ज्या वेळेला उपयोग केला जातो, त्या वेळेला आपण माणसाबद्दल बोलत असतो. समजा एखादा माणूस झाडाबद्दल, डोंगराबद्दल बोलत असला, तरी बोलणाऱ्या माणसाबद्दल आपल्याला काही एक कळत असतेच. समाजशास्त्राच्या अभ्यासाचे जे उद्दिष्ट असते, ते म्हणजे एखादया समाजाची विशिष्ट काळात कशा प्रकारची रचना असते आणि या रचनेचा त्या समाजामधील माणसांवरती, त्यांच्या वागण्यावरती, परस्परांवरती कोणत्या प्रकारचा परिणाम होत असतो याचा अभ्यास करणे.

साहित्याचा परिपूर्ण अभ्यास होण्याच्या दृष्टीनं साहित्याचा या सामाजिक अंगानंही अभ्यास करणं आवश्यक ठरतं. कारण, साहित्य हे समाजातच निर्माण होत असत. ते निर्माण करणारा साहित्यिक हा समाजातच वाढलेला, जगणारा व वावरणारा असतो. स्वाभाविकपणे त्याचा लेखनपिंड समाजात घडलेला असतो.'' (४)

''विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास'' म्हणजे कादंबरीतील समाजजीवनाचा, त्यातील स्त्री-जीवनाचा, प्रथा-परंपरांचा, आर्थिक-धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, स्थितीचा, न्याय व्यवस्थेचा, कुटुंब व्यवस्थेचा, श्रद्धा-अंधश्रद्धेचा, पोषाखांचा, भाषेचा, व्यवसाय, इत्यादी समाजातील घटकांचा अभ्यास करायचा आहे.

### १.४ अभ्यासाविषयाची व्याप्ती आणि मर्यादाः

१) कादंबरी वाङ्मय प्रकाराचा उदय, व्याख्या आणि घटक यांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न करायचा आहे.

२) विश्वास पाटील यांच्या 'पानिपत', 'पांगिरा', 'झाडाझती', 'संभाजी' या चारच कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास करायचा आहे.

३) विश्वास पाटील यांच्या इतर साहित्याचा इथे अभ्यास करायचा नसला, तरी त्याचा परिचय करून घ्यायचा आहे. आवश्यक तेथे त्यांच्या समग्र लेखनाचा संदर्भ लक्षात घ्यायचा आहे.

४) कादंबरीतील अनुभवाचे नाते, चरित्रात्मक अभ्यास पद्धतीने शोधायचे आहे. लेखकाच्या लौकिक व्यक्तिमत्वाचा परिचय करून घ्यायचा आहे.

५) विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अंगाने तपशीलवार अभ्यास करायचा आहे. त्यासाठी सामाजिक अभ्यास म्हणजे काय? कादंबऱ्यांतील सामाजिकता कशा स्वरूपात प्रकट झाली आहे? साहित्य-समाज-साहित्यिक असा परस्परसंबंध या सर्वांचा थोडक्यात आढावा घ्यायचा आहे.

**१.५ प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टेः**

''विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास'' या विषयाच्या संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केलेली आहेत.

१) कादंबरीची व्याख्या, उदय, घटक समजून घेणे.

२) विश्वास पाटील यांचे चरित्र व साहित्य यांचा अभ्यास करणे.

३) 'सामाजिक अभ्यास' ही संकल्पना स्पष्ट करणे.

४) विश्वास पाटील यांच्या 'पानिपत', 'पांगिरा', 'झाडाझडती', 'संभाजी', या कादंबऱ्यांचा सामाजिक अंगाने तपशीलवार अभ्यास करणे. उदा. समाजजीवनातील रूढी, परंपरा, स्त्री-जीवन, सण-समारंभ, धार्मिक-आर्थिक, राजकीय-शैक्षणिक स्थिती, कुटुंब संस्था, पोषाख, भाषा इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

५) विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांतील सामाजिकता किती आणि कशी प्रकट झाली याचा निष्कर्ष मांडणे.

**१.६ अभ्यास पद्धतीः**

''विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास'' या विषयावर संशोधन करण्यासाठी १) सामाजिक अभ्यास पद्धती २) चरित्रात्मक अभ्यास पद्धती या दोन अभ्यासपद्धतींचा वापर करणार आहे.

**१.६.१ सामाजिक अभ्यास पद्धतीः-**

''लेखकांचा ते ज्या काळात लेखन करतात त्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांचा, तसचे साहित्यकृती आणि ती ज्या सामाजिक वर्गाचे चित्रण करते त्या वर्गाची काही एक संबंध असतो. लेखकाचा वर्ग, लिंग, वैयक्तिक आवडनावड, विशिष्ट युगाचे त्याचे आकलन, लेखकांची आर्थिक स्थिती, पुस्तकांचे प्रकाशन आणि वितरण, वाचकांचा सामाजिक वर्ग, समजूती, मूल्यविचार यांनी लेखकांची निर्मिती प्रभावित झालेली असते. असे मानणाऱ्या समीक्षात्मक लेखनाला 'सामाजिक समीक्षा' म्हणतात.'' (५)

साहित्य हे समाजाचे अपत्य असते. साहित्यात समाजाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रतिबिंब पडत असते. साहित्यातील समाजजीवनातील विविध संस्था (कुटुंब, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, न्याय) स्त्रियांचे जीवन, व्यवसाय, भाषा इत्यादी गोष्टींचा तपशीलाने अभ्यास करण्यासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे.

**१.६.२ चरित्रात्मक अभ्यास पद्धतीः-**

''ग्रंथकाराच्या वाङ्मयाचा विचार करतांना अपरिहार्यपणे त्याच्या चरित्राकडे वळावे. त्याआधी चरित्र विषयाचे निरीक्षण करून, लेखकाचे व्यावहारिक चारित्र, त्याचे नाव, गाव, जन्मकाळ, जन्मस्थान, शिक्षण व्यवसाय, प्रापंचिक जीवन, आवडीनिवडी, मित्रपरिवार हे लक्षात घेणे हा चरित्राच्या अवलोकनातील एक घटक आणि दुसरा लेखकाचे वाङ्मयीन चरित्र. कलानिर्मितीचा आरंभकाळ. कालक्रमानुसार लेखनकृतीची मांडणी, वाङ्मयप्रकारांचे अनेकत्व, त्यांचे परस्परांशी असलेले संबंध इत्यादी विषय वाङ्मयीन चरित्राशी संबंधित असतात.

ग्रंथकाराचे चरित्र व त्याचे वाङ्मय याचा विचार करता ग्रंथकाराचे वा३्मय वाचतांना अभ्यासकाच्या मनात जे प्रश्न उत्पन्न होतात, त्यांची उत्तरे शोधावीत या हेतूने अनेकदा ग्रंथकाराच्या

चरित्राचा मागोवा घेतला जातो. कलावंताच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब कलाकृतीत अपरिहार्यपणे पडते असे मानून कलावंताच्या चरित्राचा शोध केला जातो.'' (६)

चरित्रात्मक अभ्यास पद्धतीमुळे लेखकाचे चरित्र समजते आणि त्यामुळे त्यांच्या साहित्यातील अनुभवाचे नाते उलगडण्यास मदत होते. साहित्यकृती वाचून पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे लेखकाच्या चरित्रात शोधावी लागतात. लेखकाचे चरित्र आणि त्याचे साहित्य यांचा परस्पर संबंध, शोधण्यासाठी 'चरित्रात्मक अभ्यास पद्धतीचा' वापर करणार आहे.

## १.७ पूर्व संशोधनाचा थोडक्यात आढावाः

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास झालेला आहे. एका प्रबंधात त्यांच्या सर्व कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. इतर प्रबंधात प्रबंधाच्या गरजेनुसार विषयानुसार विश्वास पाटील यांच्या एक-दोन कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. त्याचा या प्रकरणात थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. हे सर्व प्रबंध पुणे विद्यापीठातील आहे.

(१) प्रबंध शिर्षकः- विश्वास पाटील यांच्या कादंबरी वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास.

संशोधक :- प्रा. भाऊसाहेब विठ्ठलराव गमे

मार्गदर्शकः- डॉ. तानाजी राऊ पाटील

सादर वर्षः- नोव्हेंबर २००८

या प्रबंधात विश्वास पाटील यांच्या चरित्रात्मक व वाङ्मयीन असा अभ्यास केलेला आहे. प्रत्येक कादंबरीचा समीक्षणात्मक आढावा घेतलेला आहे. या प्रबंधात शेवटी निष्कर्ष काढला आहे.

''विश्वास पाटील यांनी मराठी कादंबरी विश्वात पांगिरा, झाडाझडती यांच्या रूपाने वास्तवादी प्रवाह सक्षम केला. आजच्या वर्तमान वास्तवाचे प्रश्न त्यांनी कादंबरीमध्ये मांडले. 'क्रांतिसूय', 'महानायक', अशा चरित्रात्मक कादंबऱ्या लिहून भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा धगधगता इतिहास जीवंत केला. 'पानिपत', 'संभाजी', या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून इतिहासाला जीवंत केले. यात दुर्लक्षित

व्यक्ति रेखांना त्यांनी नव्या अंगांनी मांडले. मराठी कादंबरी क्षेत्रात भरीव योगदान दिले. सातत्याने दर्जेदार कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरी क्षेत्रात भर घातली. नवा विषय, नव्या अंगाने कादंबरी लेखन केले. सकस, दर्जेदार कादंबऱ्यांची परंपरा निर्माण करून स्वतःची वेगळी वाट त्यांनी निर्माण केली. आजच्या आघाडीच्या कादंबरीकारांमध्ये विषयाच्या तळाशी जाऊन त्या विषयाचा सांगोपांग अभ्यास करण्याची क्षमता विश्वास पाटील यांच्यात किती मोठी आहे हे समजते. शिवाय विश्वास पाटील यांच्याजवळ असलेली कलात्मकता व जाणीव यांचाही आढावा या अभ्यासाच्या निमित्ताने घेतला गेलेला आहे.

(२) प्रबंधः– निवडक ग्रामीण कादंबऱ्यातील कुटुंब चित्रण

संशोधकः– सुनीता दामोदर देशमुख

मार्गदर्शकः– डॉ. मृणालीनी शहा.

वर्षः– ऑक्टोबर २००६

या प्रबंधात कुटुंब चित्रणाचे अनुषंगिक वर्णन असणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. या प्रबंधात विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा', 'चलो दिल्ली', 'क्रांतिसूर्य', 'पानिपत', 'आंबी', 'झाडाझडती', 'महानायक' या कादंबऱ्यांतील कुटुंबचित्रणाचा अभ्यास केलेला आहे. त्याच्या समारोप प्रकरणात असे म्हटले आहे की,

''अशा प्रकारे विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यात कुटुंबचित्रण आलेले आहे. परंतु मुख्य विषय मात्र वेगवेगळे आहेत. राजकारणी, देशभक्ती, धरणग्रस्तांचे जीवन, ह्याबरोबरच पानिपत युद्धाचे वर्णन, पांगिरा तील दोन गावातील राजकारण, आंबी चे चरित्र, सुभाषचंद्र बोस यांचे चरित्र असे विषय पाटील यांनी हाताळले आहेत. कुटुंबचित्रणाला फारसा वाव मिळालेला नाही. त्यामुळे या कादंबऱ्यांचा थोडक्यात अभ्यास केलेला आहे. विस्ताराने अभ्यास करण्यासारखे कुटुंबचित्रण त्यांच्या कादंबरीत आलेले दिसत नाही.''

(३) प्रबंध शिर्षकः– पानिपत विषयक कादंबरी वाङ्मय: ऐतिहासिकता आणि वाङ्मयीन गुणवत्ता.

संशोधकः– गंगाधर शिवाजी नामगवळी

मार्गदर्शकः– डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

वर्षः– २००२

या प्रबंधात पानिपत विषयातील कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. कादंबऱ्यांचा तौलनिक अध्ययनही केलेले आहे. या प्रबंधात 'पानिपत' विषयी लिहिले आहे,

''पानिपतचे घटीत नजरे समोर ठेवून घटना जशा घडल्या त्या पद्धतीने म्हणजे अनुलोम पद्धतीने कलात्मक पातळीवरून मांडणाच्या प्रयत्न विश्वास पाटील यांनी केला आहे. त्यामुळे पानिपत या घटीताला खऱ्या अर्थाने न्याय देणारी कादंबरी म्हणून 'पानिपत' कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. विश्वास पाटील यांनी पानिपतच्या इतिहासात ज्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत ती उत्तरे देखिल तार्कीक संगतीतून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबरीला एक वेगळेच मूल्य प्राप्त झालेले आहे. प्रस्तुत कादंबरीकाराची लेखन प्रेरणा पूर्वकालीन ऐतिहासिक कादंबरीकारांप्रमाणे रंजनप्रधान वा प्रतिकृतिप्रधान नव्हती. तर त्यांची दृष्टी आधुनिक मूल्यसारणीतून तयार झालेली असल्याने ऐतिहासिक घटना प्रसंगाइतकेच त्या भोवतीचे समकालीन सामाजिक वास्तव टिपले आहे. विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' ची मांडणी आधुनिक मूल्य दृष्टीतून झालेली आहे. त्यामुळे घटनाप्रधानतेपेक्षा मनोविश्लेषणाकडे, कटकारस्थानांच्या वर्णनापेक्षा राजकीय विश्लेषणाकडे आणि वस्त्रप्रावरणे आणि शस्त्रास्त्रे यांच्या अलंकारीक वर्णनापेक्षा त्या पाठीमागील सांस्कृतिक सत्याकडे कादंबरीकार अधिक लक्ष पुरवितो. म्हणूनच 'पानिपत' या विषयावरील यापूर्वीच्या कादंबरीकारांपेक्षा विश्वास पाटील यांना मिळालेले यश अधिक वाङ्मयीन व अभिरूची संपन्न प्रतिसादाचे आहे. त्यामुळे पानिपत विषयक कादंबऱ्यांत विश्वास पाटील यांची 'पानिपत कादंबरी उठून दिसणारी आहे.''

(४) प्रबंध निर्षकः– साठोत्तरी मराठी कादंबरीः एक चिकित्सक अभ्यास (१९६० ते २०००)

संशोधकः– भास्कर विनायकराव निफाडे

मार्गदर्शकः– प्रा.डॉ. तानाजी राऊ पाटील

वर्षः– २००५

या प्रबंधात १९६० ते २००० पर्यंतच्या कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. या प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणात विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' आणि 'झाडाझडती' या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. या प्रबंधात म्हटले आहे,

''ऐतिहासिक, सामाजिक, ग्रामीण, राजकीय अशा विविध प्रकारच्या विषयांची आव्हाने स्वीकारणारी निर्मितीची उर्जा कादंबरी लेखनाला आवश्यक असणारी व्यापक कक्षेतील कल्पकता, साधनांची जुळवाजुळव करण्यास लागणारे परिश्रम घेण्याची तयारी, लेखनातील झपाटा या साऱ्यांमुळे विश्वास पाटील हे ८० व्या दशकानंतरचे वैशिष्टपूर्ण लेखन करणारे कादंबरीकार ठरतात.''

(५) प्रबंध शिर्षकः– परिवर्तन व मराठी ग्रामीण कादंबरी (१९६० ते १९९०)

संशोधकः– प्रा. रमाकांत विठ्ठल कराड

मार्गदर्शकः– डॉ. बाळासाहेब गुंजाळ

वर्षः– २००६

या प्रबंधात परिवर्तनाचे दर्शन घडणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. या प्रबंधात 'पांगिरा' कादंबरीचा परिवर्तनाच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने 'पांगिरा' चा अभ्यास केलेला आहे. शैक्षणिक परिवर्तन, कृषि परिवर्तन, सामाजिक परिवर्तन, राजकीय परिवर्तन, आर्थिक परिवर्तन इ. बाबतीत 'पांगिरा' कादंबरीचाही अभ्यास केलेला आहे. निष्कर्षात म्हटले आहे,

''या काळातील कादंबरीचे स्वरूप ग्रामीण जीवन परिवर्तनाच्या प्रक्रियेने प्रभावित झालेले दिसून येते. या काळातील ग्रामीण लेखक नवीन उदयाला आलेला आहे. हा वर्ग ग्रामीण समाजातून पुढे आलेला आहे. सामाजिक दृष्टिकोणातून साहित्याचा अभ्यास होणे हे उपयुक्तच ठरणारे आहे''

## १.८ वापरण्यात आलेली संशोधन साधनेः

'विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास' या विषयाचे संशोधन करण्यासाठी कोश, वृत्तपत्रे, नियतकालिके, समीक्षणात्मक ग्रंथ, संशोधनात्मक ग्रंथ, विश्वास पाटील यांचे साहित्य,

मदत करणारे इतर ग्रंथ, पीएच.डी. चे प्रबंध आणि विश्वास पाटील यांची मुलाखत अशा प्रकारची संशोधन साधने वापरलेली आहेत.

१) विश्वास पाटील यांचे साहित्य

२) कोशः- १) वाङ्मयीन सज्ञा संकल्पना कोश २) भारतीय समाज विज्ञान कोश खंड-१,२,३,४ ३) मराठी शब्द रत्नाकर

३) नियतकालिके (म.स. पत्रिका, ललित, लोकप्रभा, लोकमत, अनुष्टुभ.)

४) वृत्तपत्रे (दै. सकाळ)

५) समीक्षणात्मक ग्रंथ

६) संशोधनात्मक ग्रंथ

७) इतर ग्रंथ

८) प्रबंध (पुणे विद्यापीठ)

९) विश्वास पाटील यांची मुलाखत.

## १.९ **संदर्भ ग्रंथ**

१. तानाजी राऊ पाटील,'' मराठी कादंबरी समीक्षा'', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृ.क्र. ८४.

२. लोकमत दिवाळी अंक, २००१,पृ क्र.२४,२५.

३. संपा. प्रभागणोरकर आणि इतर, '' वाड्.मयीन सज्ञा संकल्पना कोश,'' भटकळ फाऊंडेशन मुंबई, २००१, पृ क्र. ४८.

४. नागनाथ कोत्तापल्ले, '' साहित्य आणि समाज'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, पृ.क्र. २९१.

५. संपा. प्रभा गणोरकर आणि इतर, उनि., पृ.क्र. ४०६.

६. वसंत स. जोशी, '' भाषा व साहित्य संशोधन, '' म.सा.प. पुणे, १९९३, पृ.क्र. ३७०,३७१.

प्रबंध (पुणे विद्यापीठ)

१. प्रा. भाऊसाहेब गमे, '' विश्वास पाटील यांच्या कादंबरी वाड्.मयाचा सर्वांगीण विकास,'' २००८.

२. सुनीता दामोदर देशमुख, '' निवडक ग्रामीण कादंबऱ्यांतील कुटुंब चित्रण,'' २००२.

३. गंगाधर शिवाजी नामगवळी, '' पानिपत विषयक कादंबरी : वाड्.मयीन गुणवत्ता,'' २००२.

४. भास्कर विनायकराव निफाडे, '' साठोत्तरी मराठी कादंबरी : चिकित्सक अभ्यास,''२००५.

५. प्रा. रमाकांत विठ्ठल कराड, '' परिवर्तन व मराठी कादंबरी, ''.

## प्रकरण दुसरे

# विश्वास पाटील यांचे चरित्र व वाङ्मयीन कामगिरी

अनुक्रमणिका

२.१ प्रस्तावना

२.२ जन्म व शिक्षण

२.३ वाङ्मयीन कामगिरी

२.४ विश्वास पाटील यांच्या प्रबंधासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांची मध्यवर्ती कल्पना

२.५ वाङ्मयीन संस्कार

२.६ संदर्भ

## २.१ प्रास्ताविक/प्रस्तावनाः

''साहित्यिक हा समाजातच असतो. त्याच्याभोवती सारा समाज वेढून राहिलेला असतो. किंबहुना लेखकाच्या बऱ्या-वाईट घडणीसाठी भोवतीचा समाज, समाजव्यवस्था, राज्य व्यवस्था, अर्थ व्यवस्था, राजकारण इ. अनेक बाबी जबाबदार असतात. लेखन हे आत्मानिष्ठ असते असे किहीही म्हटले किंवा लेखकाचा तो वैयक्तिक अविष्कार असतो असे म्हटले, तरी त्याच्या जडणघडणी उपरिनिर्दिष्ट साऱ्याच बाबी महत्त्वाच्या असतात. भोवतीच्या समाजातून तो घडत असतो आणि तो व्यक्त करतो ते अनुभवही त्याच समाजातले असतात.'' (१)

साहित्यिकाच्या लौकिक जीवनाचा, जडण-घडणीचा, संस्कारांचा प्रभाव निश्चितच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे, कमी-जास्त स्वरूपात त्यांच्या साहित्यावर पडत असतो. साहित्यिकाच्या साहित्याचा अभ्यास करतांना त्या साहित्यिकाच्या चरित्राचा अभ्यास केल्यास कलाकृतीचे आकलन अधिक चांगल्या प्रकारे होते. साहित्यिकाचा जन्म, जन्मस्थळ, वातावरण, शैक्षणिकता, आर्थिक परिस्थिती, धार्मिक वातावरण, आई-वडील, व्यवसाय, भाषा इ. गोष्टींचा अभ्यास केल्यास, साहित्यातील अनुभवविश्व वाचक अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेऊ शकतो.

## २.२ जन्म व शिक्षणः

विश्वास पाटील यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९५९ नर्ले गावी, कोल्हापूर जिल्हा इथे झाला. नर्ले हे लहान खेडे आहे. त्यांचे वडील शेतकरी. ग्रामीण परिसर, ग्रामीण भाषा, याचे संस्कार त्यांच्यावर बालपणी झाले. वाचनाचे संस्कारही त्यांच्यावर बालपणापासूनच झाले. घरात, गावात, शिक्षणाचे वातावरण नव्हते. त्यांचे वडील महिपती आई हंसाबाई अशिक्षित. मात्र दोघांनाही आपल्या मुलाने खूप शिकाव ही इच्छा होती. वडील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते होते. शिवाय शेतकरी कामगार पक्षाचेही कार्यकर्ते होते. त्यांच्या या कार्यात ते छोटया विश्वास पाटील यांना घेऊन जात होते. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांच्यावर चळवळींचे संस्कार झाले.

विश्वास पाटील यांचे बालपन नर्ले गावातच गेल्यामुळे तेथील संस्कार त्यांच्या मनात आतपर्यंत रूजले आहेत. त्यांच्या घरात धार्मिक, लोककलेला प्रोत्साहन देण्याचे वातावरण होते. त्यांचे वडील रसिक. वडीलांना आपला मुलगा साहित्यिक आहे याचा आनंद आहे.

‘‘त्यांचे वडील व्यवसायाने शेतकरी असले, तरी लोककला कीर्तन, राजकारण या सगळयाच कलांची त्यांना तितकीच आवड होती. त्यांच्या नेहमीच्या वापरातल्या म्हणी, वाक्प्रचार, यातूनच खरतर छोटया विश्वासची भाषा विकसित होत गेली. खरी जानपद भाषा, ढंगदार, ग्रामीण भाषा आपल्याला घरीच अनुभवायला मिळाली. याच त्यांना निश्चितच समाधान वाटत. लहानपणचे दिवस आठवताना, आजही त्यांच्या डोळयासमोर चित्र येतं- आई जात्यावर दळतेय, एका बाजूला गाणी म्हणते आणि मांडीवर डोक ठेवून छोटा विश्वास ती गाणी ऐकतोय. एवढच नाही तर शेतावर मळणीच्या वेळी किंवा लग्नांमधून दिवस न दिवस गाणीच चालायची. ही गाणी कुठे तरी त्यांच्या बालमनात झिरपत गेली म्हणून तर ती त्यांच्या साहित्यात दिसतात.’’ (२)

अशाप्रकारे अस्सल ग्रामीण भाषेचे संस्कार त्यांच्यावर बालपणी झाले. ते संस्कार इतके मूळापर्यंत रूजले होते की आजही त्या भाषेचा गोडवा त्यांच्या साहित्यात जाणवतो.

**शिक्षणः**

विश्वास पाटील यांनी इंग्रजी वाङ्मयातून एम.ए. केले. त्यांनी एल.एल.बी केले. आणि स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन आज ते आय.पी.एस. अधिकारी आहेत. असे विश्वास पाटील उच्च विद्या विभुषित आहेत. ग्रामीण भागात शिक्षणाच्या विशेष सोयी नसूनही त्यांनी मेहनतीने शिक्षण घेतले. आपल्या शिक्षणाविषयी संस्कारांविषयी विश्वास पाटील मुलाखतीत सांगतात,

''माझा जन्म कोल्हापूरजवळील नेर्ले या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. गाव अगदी छोट खेडं. वस्ती असेल हजार-बाराशेची पण त्या गावात सातवीपर्यंत शाळा होती. तिथेच माझं शिक्षण झाल. वयाच्या सातव्या वर्षापासून मी गुरे राखायला जाई. घरातली शेतीची कामही हौसेने करीत असे या आमच्या खेडयात देखील राजकारणाची जाण होती. माझे वडील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते त्यामुळे त्या मंडळींची घरात उठबस असे. राजकारणावर चर्चा चालत. लहानपणापासून मला त्या ऐंकायला आवडत. त्यात रस वाटे. खर म्हणजे माझ्या सगळया बालपणानं, माझ्या गावानं, माझ्या घरानं मला जी पार्श्वभूमी दिली ती माझ्या सगळया लेखनाची शिदोरी ठरली.

गावात शिकलेली माणसं फारशी कुणी नाहीत. आमच्या शाळेत माझ्या वर्गात माझ्यासकट पाच मुल होती. त्यामुळे मी पाचवीत असल्यापासून मला रामायण, महाभारत वाचून दाखवाव लागायचं. त्यामुळे एखादया साहित्यकृतीचा पट किती गुंतागुंतीचा अवाढव्य असतो याच भान मला तेव्हाच आल होत. त्या वाचनाची सुरवात जरी जबरदस्तीने म्हणजे मी ह्या माणसांनी सांगितलेल ऐकायच म्हणून झाली असली तरी मी हळूहळू त्यात रंगून जाऊ लागलो. त्यातूनच मला वाटत माझ्या मनात कुठेतरी कादंबरीच्या रचनेच बीजारोपण होत असाव. साहित्याचा लळा मला गावान लावला. त्यामुळे मायबोलीचा लळा अधिक रुजत गेला.'' (३)

लहानपणी त्यांच्या शेजारच्या गावातील नाटक बघून त्यांनीही वर्गातील मित्रांसोबत पु.लं. चे पुढारी पाहिजे हे नाटक बसवले. त्यात प्रमुख भूमिका त्यांनी केली. लावण्या भरपूर ठेवल्या. तिसरीत असतांना विठाबाईचा तमाशा पाहिला होता. त्यांच्या गुरुजींनी त्यांना खूप काही शिकवले. त्यांनी विश्वास पाटील यांना अनेक पुस्तक वाचायला दिली. वाचनाची गोडी आणि सवय दोन्ही गुरुजींनीच

लावली. विश्वास पाटील यांनी शिकार, मासेमारी केली आहे. अनेक गड-किल्ल्यांना भेटी दिल्या आहेत. भटकंतीची आवड त्यांना मनापासून आहे. त्यांच्या परिसरात पोवाडे ऐकले व गायले जात होते. त्यांनी व मित्रांनी उमाजी नाईकांचा पोवाडा बसवला होता. तो विश्वास पाटील गात असते.

## २.३ विश्वास पाटील यांची वाङ्मयीन कामगिरी (संपदा)

विश्वास पाटील हे ८० च्या दशकातील लेखक आहेत.

''विश्वास पाटील यांना 'पानिपत' कादंबरीने प्रचंड यश मिळाले. 'झाडाझडती' या कादंबरीत धरणग्रस्तांचे प्रश्न, त्यांच्या समस्या मांडून त्यांच्या दुःखाला त्यांनी वाचा फोडली. त्यांचे खडतर जगणे त्यांनी अधोरेखित केले. या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. या कादंबरीने विश्वास पाटील यांचे कादंबरीकार म्हणून स्थान अधिक बळकट झाले. 'महानायक' या कादंबरीत सुभाषचंद्र बोस यांचे जीवनचरित्र आणि स्वातंत्र्य सेनानी म्हणून त्यांचे कार्य मांडले आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्य चळवळीचा इतिहासही जिवंत केला आहे. 'संभाजी' कादंबरीत छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे नव्याने मूल्यमापन केले आहे. विश्वास पाटील यांनी या प्रत्येक कादंबरीमध्ये व्यापक जीवनपट मांडले आहेत. मराठी जनमाणसात त्यांची कादंबरी पोहचली आहे. तसेच त्यांचे लेखनही अव्वल दर्जाचे आहे. आजचे आघाडीचे कादंबरीकार म्हणून त्यांनी आपले स्थान निश्चित केले आहे. 'पांगिरा' मधे त्यांनी बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. बदलत्या भ्रष्ट व्यवस्थेचे चित्रण 'पांगिरा' कादंबरीत विश्वास पाटील यांनी अचूकपणे केले आहे.'' (४)

विश्वास पाटील यांनी सुरवातीच्या काळात कथा लेखन केले. यानंतर ते कादंबरीकडे वळले. 'पानिपत' कादंबरीमुळे विश्वास पाटील लेखक म्हणून सर्वांना माहिती झाले. त्यांची लेखनाची सुर वात शाळेत असल्यापासून झाली. पाचव्या-सहाव्या इयत्तेत असतांना जादूच्या गोष्टी लिहिल्या 'कायदा' ही कथा १० वी मधे असतांना लिहिली. या कथेला वासंतिक कथा स्पर्धेत महाराष्ट्रात ३ रा क्रमांक मिळाला. त्या कथेला १०० रु. पारितोषिक मिळाले. ९ वीत असतांना त्यांनी पहिली १४० पानांची

कादंबरी लिहिली. त्यानंतर 'मराठा' मधून व इतर नियतकालिकांमधून त्यांच्या कथा प्रसिद्ध होत होत्या. कथा स्पर्धांमधे बक्षीस मिळवत होते. त्यानंतर त्यांचा 'कलाल चौक' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यावेळी त्यांचे वय २०-२२ वर्षे होते. नवलेखकांना अनुदान देण्याच्या सरकारी योजने अंतर्गत त्यांचा हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानतर ते बी.ए. च्या पहिल्या वर्गात असतांना 'अंबी' कादंबरी प्रसिद्ध झाली. यात दुर्दैवी मुलीच्या जीवनाची कहाणी आहे. यानंतर 'क्रांतिसूर्य' ह्ी क्रांतिसिह नाना पाटील यांच्या जीवनावरील कादंबरी प्रसिद्ध झाली. आपल्या या सुरवातीच्या लेखनाविषयी विश्वास पाटील म्हणतात,

''महाविद्यालयीन आयुष्यात प्रकाशित झालेला माझा 'कलाल चौक'हा कथा संग्रह आहे. 'आंबी' ही माझी पहिली कादंबरी, 'क्रांतिसूर्य' ही दुसरी कादंबरी हे साहित्य मी माझ प्रौढ साहित्य मानतच नाही. महाविद्यालयीन जीवनात जे नव्हाळपण असत त्या काळातील नवथर लेखन आहे. विद्यार्थी दशेतील ती एक लकेर आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने माझ्या लेखनाला सुरवात 'पांगिरा', 'पानिपत' या कादंबऱ्यांपासूनच झाली आहे असे म्हणावे लागेल.''(५)

विश्वास पाटील यांना खरी ओळख 'पानिपत' प्रसिद्ध झाल्यावर मिळाली. त्यानंतर 'पांगिरा' ही ग्रामीण बदलाचे चित्रण करणारी कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर धरणग्रस्तांच्या जीवनावरील 'झाडाझडती' प्रसिद्ध झाली आणि या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. यामुळे विश्वास पाटील हे दर्जेदार लेखक आहेत हे सिद्ध झाल. यानंतर अथक परिश्रम घेऊन भरपूर अभ्यास करून 'महानायक' ही नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी प्रसिद्ध झाली. यानंतर 'चंद्रमुखी' ही तमाशा कलावंतीणीचे जीवन आणि राजकारण यावरील कादंबरी प्रसिद्ध झाली. यानंतर पुन्हा अभ्यास करून परिश्रम घेऊन इतिहासाचा पुन्हा अभ्यास करून, पुराव्यानिशी 'संभाजी' ही संभाजींच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबरी लिहिली.

अशा प्रकारे विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा चढता आलेख आहे. प्रसिद्ध, लोकप्रिय, वास्तवदर्शी कादंबरीकार म्हणून आज ते यशाच्या शिखरावर आहेत. त्यांनी 'पानिपत' या कादंबरीवर

'रणांगण' हे नाटकही लिहिले. जागतिक नावाजलेल्या चित्रपटांचा आढावा त्यांनी 'नॉट गॉन विथ द विंड' या पुस्तकातून घेतलेला आहे. 'चलो दिल्ली' हे नेतांजींच्या भाषणाचे पुस्तकही त्यांनी प्रसिद्ध केले आहे. शिवाय वृत्तपत्र नियतकालिके यातून ते लेखन करत आहेत.

**विश्वास पाटील यांचे साहित्यः**

१. कलाल चौक - कथासंग्रह (१९८२), शेटये प्रकाशन, कोल्हापूर.

२. चलो दिल्ली - अनुवादित संग्रह (१९८६) राजहंस प्रकाशन, पुणे.

३. आंबी - कादंबरी (१९८०) शेट्ये प्रकाशन कोल्हापूर.

४. क्रांतिसूर्य-कादंबरी (१९८४) सन्मित्र प्रकाशन कोल्हापूर .

५. पानिपत -कादंबरी (१९८८), राजहंस प्रकाशन.

६. पांगिरा- कादंबरी (१९९०), ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

७. झाडाझडती- कादंबरी (१९९२), राजहंस प्रकाशन, पुणे.

८. महानायक- कादंबरी (१९९८), राजहंस प्रकाशन, पुणे.

९. चंद्रमुखी-कादंबरी (२००४) राजहंस प्रकाशन पुणे.

१०. संभाजी- कादंबरी (००५) मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे.

११. रणांगन-नाटक (१९९९) चंद्रलेखा निर्मित.

१२. नॉट गौन विथ द विंड (२०१०) मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे .

## २.४. विश्वास पाटील यांच्या प्रबंधासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांची मध्यवर्ती कल्पना.

१) **पांगिरा (१९९०)** :- ''विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' नावाची एका वेगळया प्रकृतीची, समकालीन वास्तवाचा नेमकेपणाने वेध घेणारी कादंबरी लिहिली आहे.'' (६)

'पांगिरा'ही एका गावाची कहाणी आहे. एक खेडे गाव काळाच्या ओघात कसकसे बदलते. त्या गावाचे रूप, सत्व, तेथील लोक इतकच नव्हे तर निसर्गही बदलतो. या बदलाचे त्याच्या पडसादाचे सूक्ष्म व परिणामकारक वर्णन 'पांगिरा' त वाचायला मिळते.

'पांगिरा'. हे पाण्याच्या बाबतीत संधन गाव. ऊसाचे नगदी पीक या गावात भरघोस असते. पाण्याचे पाट शेतात कायम वाहत असतात. जमिनीत पाणी मोठया प्रमाणात असते. मात्र एक तरुण त्यांना पाण्याच महत्त्व सांगतो. पाणी जपून वापरायला सांगतो. 'माजोरी होऊ नका' असा सल्ला देतो. शेतालाच काय पण प्यायलासुद्धा पाणी मिळणार नाही. दशा दशा होईल आणि खरच काही वर्षांनी पाण्यासाठी लोक वाटेल ते करायला निघाले. भाऊ भावाचा राहीला नाही. विहिरी आटल्या, पाऊस नाही. बोअरलाही पाणी लागत नव्हत. अशी  दयनिय परिस्थिती होते.

त्यातच गावात अनेक योजना येतात व जातात. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आल्या. राजकारण आले. रस्ते, वीज, नळ, डेअरी या नवनवीन योजनांमुळे गावाचे रूप बदलते. जुन्या लोककला, जत्रा यांचा वावर कमी झाला त्याऐवजी व्हिडीओ आले. बेरोजगारी, लोकसंख्या वाढ यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीला तडे. राजकारण गावाच्या कणाकणात घुसल्यामुळे ऐपतीचा विचार न करता प्रत्येकजण त्यात पडू लागला. कर्जबाजारी, व्यसनी, अनैतिक, अप्पलपोटी बनू लागला. जुनी जाचक जातिव्यवस्था कोसळली. बलुतेदारी नाहीशी झाली. नवनवे उद्योग, व्यवसाय गावात येऊ लागले. कोर्ट-कचेऱ्या च्या वाऱ्या वाढल्या. लोक सहज एकमेकांवर दावे ठोकू लागले व पाण्यासारखा पैसा त्यात घालवू लागले. तालुक्याच्या, जिल्ह्याच्या वाऱ्या वाढल्या, तलाठी, ग्रामसेवक असा नवीन वर्ग उदयाला आला.

राजकारणाबरोबरच रानातली व आजूबाजूच्या डोंगरावरच्या झाडांची प्रचंड प्रमाणात तोड होऊ लागली. पिकासाठी पाण्याचा गैरवापर, यामुळे निसर्गाच संतुलन बिघडले. संपन्नतेकडून अनेक गाव दुष्काळाच्या फेऱ्यात अडकली. शेतातील (पाण्याअभावी) पीक बदलली. कष्टकरी शेतात राबून पीक

काढत पण त्याला योग्य बाजारभाव मिळत नाही. कितीही योजना, सुधारणा, सवलती आल्या तरी ग्रामीण शेतकऱ्याचं जीनं सुसह्य होत नाही.

गाव पंढरीची एका तपाची झपाटयाची वाटचाल हाच या कादंबरीचा विषय आहे. रूढार्थाने कादंबरीला नायक नाही, नायिका नाही, की खलनायकही नाही. जनसामान्यांच जिणं हेच खर.

**२) पानिपत (१९८८) :**

''१९८८ तील मराठी कादंबरीच्या जमेच्या बाजूचा विचार करतांना या थोडया कादंबऱ्यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. त्या पैकीची महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणजे विश्वास पाटील यांची 'पानिपत' ही कादंबरी होय.'' (७)

'' 'पानिपत' महाकाव्याच्या तोलामोलाची कादंबरी. तिशीच्या आतील एका तरुणाच्या हातून सिद्ध झालेली. मराठीतील ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या अग्रभागी मानाने मिरवावी अशी. किंबहुना खऱ्या अर्थाने पहिलीच मराठी ऐतिहासिक कादंबरी म्हणावी अशी बावनकशी कृती.'' (८)

**मध्यवर्ती कल्पनाः**

'पानिपत' या कादंबरीत पानिपतच्या युद्धाची कहाणी आहे. 'पानिपत' ची मोहीम ही महत्त्वपूर्ण घटना व त्या अनुषंगाने येणारे पात्र, घटना, प्रसंग, संघर्ष, कलह, या सर्वाच वर्णन 'पानिपत' ऐतिहासिक कादंबरीत आहे.

या कादंबरीचा विषयही आणि आवाकाही, पृष्ठसंख्याही (५२९) मोठी आहे. कंदहारचा अब्दाली नजीबच्या बोलविण्यामुळे मराठयांचा निःपात करण्यासाठी भारतात येतो. त्याचा बिमोड करण्यासाठी भाऊसाहेब निघतात. बाजारबुणगे व सैन्य मिळून लाख दिड लाख लोक निघतात. अब्दाली हा प्रचंड मोठा, लढवय्या होता. त्याचे बारमाही खडे लष्कर होते. मराठे मात्र पावसाळयात शेतकरी आणि नंतर सैनिक. मराठयांच्या अंगावर साधे कपडे. अफगाणांच्या अंगावर चामडी कोट. अशा अनेक प्रकारच्या विसंगती असूनही मराठे प्राणपणाने लढले.

यात भाऊसाहेबांचे व्यक्तित्व विशेष जाणवते. त्यांच्या अंर्तमनातील आंदोलने बारकाईने टिपलेले आहेत. सदाशिवराव भाऊ प्रचंड सेना, लवाजमा, घेऊन पानिपतच्या मोहिमेसाठी निघतात. लव्याजम्यामुळे प्रवास संथ गतीने होतो. देवधर्म-कर्मकांड करत-करत प्रवास पुढे सरकतो. उत्तरेत मराठी सरदारांविषयी 'गुंड' अशी भावना निर्मिण झालेली असते. त्यामुळे हवी तशी मदत मिळत नाही. निसर्गाच रौद्र रूप (पाऊस)/थंडी) मराठी सरदारांना मानवत नाही. मराठी सरदारांमधील फुटीरतावाद, असहकार्य, उपासमार आणि अब्दालीची कुशल राजनीती या सर्वांमुळे मराठे अगदी मेटाकुटीला आले. मात्र १४ जानेवारी १८६१ ला शेवटी युद्धाला तोंड फुटले. घणघोर युद्ध झाले. लाख दिड लाख माणसे मेली. युद्धानंतर कत्तली झाल्या, गुलाम बनवून नेले. स्त्रियांवर अत्याचार केले. अशा प्रकारे पानिपत च्या युद्धात मराठयांचा दारूण पराभव होतो. कादंबरीत या पुढील घटनेचीही नोंद घेतलेली आहे. या युद्धामुळे अब्दालीचाही फायदा झाला नाही. तो आपल्या कंदहारकडे निघून गेला आणि परत कधी भारतावर आक्रमण केले नाही. इकडे नानासाहेब भाऊ-भाऊ करून आपले प्राण सोडतात. माघारी पळून आलेल्या सरदारांना पश्चाताप होतो. असा घटनाक्रम या कादंबरीत वाचावयास मिळतो.

**३) झाडाझडती (१९९१) :**

''विश्वास पाटील यांची 'झाडाझडती'.ही एक लक्षणीय सामाजिक कादंबरी आहे. सामान्य वाचक, सुजाण वाचक आणि चोखंदळ वाचक अशा सर्वांचेच लक्ष ह्या कादंबरीने वेधून घेतले आहे. एकामागून एक पुरस्कार प्राप्त होत असतांनाच ह्या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला.'' (९)

'झाडाझडती' ही वास्तवदर्शी कादंबरी आहे. यात धरणग्रस्तांच जीवन, किती समस्यापूर्ण, अवहेलनापूर्ण,अधांतरी अशाश्वत आहे हे दाखविलेले आहे. धरण होण ही एक घटना आहे. मात्र त्या मागे त्या धरणामुळे अनंत घटना, अडचणी, समस्या निर्माण होतात. त्या या कादंबरीत चित्रित केलेल्या आहेत. एखादया मुंग्यांच्या वारूळातून भराभरा, असंख्य मुंग्या जशा एकदम बाहेर येतात; तसेच धरणग्रस्तांचे प्रश्न, समस्या, एकदम मोठया संख्येने बाहेर आलेले आहेत. जांभळी गावात धरण होणार

असते; मात्र गावकऱ्यांचा विरोध असतो, आधी पुनर्वसन आणि मग धरण अशी त्यांची भूमिका असते. या गावाच प्रतिनिधीत्व मास्तर खैरमोडे करत असतात. खासदाराला साखर कारखाना काढण्यासाठी ऊसाचे क्षेत्र दाखवायचे असते. व ते दाखविण्यासाठी धरण होणे आवश्यक असते आणि म्हणून तो उपोषणाला बसून धरणाची परवानगी मिळवतो. गावकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता धरणाच बांधकाम सुरू होते आणि त्याचबरोबर गावकऱ्यांच्या झाडाझडती लाही सुरवात होते.

पुनर्वसन कायदयाचा अपूरेपणा, राजकारण, दलाल लोकांचा सुळसुळाट, दांडग्यांची मुजोरी, शासकीय (बेजबाबदार) कर्मचारी, भ्रष्टाचार अशा अनेक कारणांनी जागेचे नीट वाटप होत नाही, परिणामी राजाचा रंक व रंकाचा राजा होतो. धनदांडग्यांची धीटाई वाढते. गरीबांवरचा अत्याचार वाढतो. जांभळी गावात गुण्यागोविंदाने राहणारे अनेक संसार देशोधडीला लागतात. सरकारच्या दरबारात खेटे घेऊनही त्यांना न्याय मिळत नाही. म्हणून ते जसे आहे त्यात समाधानी राहण्याचा प्रयत्न करतात; पण तिथेही मुजोर सत्ताधारी त्यांना सुखाने जगू देत नाहीत. धरणग्रस्तांसमोर समस्यांचे डोंगर उभे असतात. धरणापूर्वीची आश्वासने आणि नंतरची कृती यात जमीन आसमानचा फरक असतो. धरण सुरू होण्यापासून तर पुढे १०-१५ वर्षाच्या कालावधीतही धरणग्रस्तांचे प्रश्न सुटलेले नसतात आणि आजही सुटलेले नाहीत ही वस्तुस्थिती विश्वास पाटील यांनी झाडाझडतीत चित्रित केलेली आहे.

**४) संभाजी (२००८)**

‘‘ ‘पानिपत’ नंतर विश्वास पाटील पुन्हा ऐतिहासिक कादंबरीकडे वळले आणि त्यांच्या तळपत्या लेखणीने ‘संभाजी’ चे तेजस्वी, धगधगते संघर्ष-पराक्रमपर्व अस्सल कागदपत्रांच्या आणि संदर्भग्रंथांचा काटेकोर धांडोळा घेऊन साडेआठशे पृष्ठांच्या महाकादंबरीद्वारे मराठी वाचकांपुढे उभे केले आहे.’’ (१०)

'संभाजी' ही विश्वास पाटील यांची संभाजी राजांच्या जीवनावरील एक ऐतिहासिक कादंबरी आहे. ही कादंबरी कल्पनेत न रमता ऐतिहासिक सत्य काय आहे ते आपल्यापुढे मांडते. 'संभाजी' ही कादंबरी वास्तवतेच्या अधिकाधिक जवळ गेलेली आहे.

संभाजी राजांच्या जन्मानंतर काही दिवसांतच ते पोरके होतात. आईचा मृत्यू होतो. जिजाऊच संभाजींचा सांभाळ करतात. शिवाजी महाराजांचा उमेदीचा काळ असल्यामुळे संभाजीसाठी त्यांना मनात असूनही वेळ देता येत नाही. राजारामाचा जन्म झाल्यापासून सोयराबाई संभाजीला सावत्रपणाने वागवतात. संभाजींना दरबारातील कामकाजाची जबाबदारी दिल्या जाते. संभाजी राजांना हिशेबात अजिबात कसूर चालत नव्हता. ज्याची चूक असेल त्याला ते जाब विचारत,मग त्यात वडिलधारी मंडळी असेल तरी त्यांचा ते मुलाहिजा बाळगीत नसत. त्यामुळे आण्णाजी व मोरोपंत अशा बडया असामीचा भ्रष्टाचार संभाजी सहन करत नसत. त्यामुळे अनेक जण त्यांच्यावर नाराज होते. अशानीच संभाजीविरूद्ध अद्वातद्वा बोलायला -पसरवाला सुर वात केली. यांच्या साथीला सोयराबाई होत्याच. या गोष्टीचा संभाजींना व शिवाजी महाराजांना प्रचंड मनस्थाप होत असे. संभाजी बदफैली, व्यसनी, रागीट, कपटी, असमंजस आहेत अशा अफवा पसरविल्या गेल्या. त्यामुळे शिवाजी महाराजांनी संभाजी महाराजांना त्यांच्या पत्नीसमवेत शृंगारगडावर पाठविले. या गोष्टीचा खोल परिणाम संभाजींच्या मनावर झाला आणि अशाच खचलेल्या मनस्थितीत ते दिलेरखानाला जाऊन मिळतात. पण तिथेही त्यांची घुसमट होते. स्वराज्यासाठी काहीतरी करण्याच्या उद्देशाने तिथे जातात; पण हाती निराशा लागते. आपल्या निर्णयाचा त्यांना पश्चाताप होतो. त्यांच्या सोबत त्यांच्या दुसऱ्या पत्नी दूर्गाबाई व बहिण असतात. त्या दोघीजणी संभाजींना स्वराज्यात परत जायला सांगतात. संभाजी मोठया धाडसाने त्या दोघींना तिथेच सोडून स्वराज्यात परत येतात. महाराजही मोठया दिलाने त्यांना माफ करतात. मात्र विरोधकांचे कार्य (संभाजींची बदनामी करण्याचे) सुरूच असते. महाराजांचे निधन होते. आणि संभाजी राजांच्या विरोधी कट-कारस्थानाला उधान येते. मात्र संभाजी सेनापती हंबीर मामांच्या व इतर साथीदारांच्या मदतीने कारस्थानांवर मात करून राजे होतात. आणि स्वराज्याच्या कल्यानासाठी अहोरात्र

कष्ट करतात. नवनवीन योजना राबवतात. विरोधकांना क्षमा करून पुन्हा राज्यकारभारात घेतात. या सर्वांत येसूबाईची त्यांना मोलाची साथ असते. कवी कलश त्यांचा उजवा हात असतो. औरंगजेब मोठया सेनासागरासह स्वराज्यावर चालून येतो. संभाजी न डगमगता याला तोंड देण्यासाठी सज्ज होतात. गडागडावंर चोख बंदोबस्त ठेवतात. स्वराज्यातील एकही किल्ला शत्रूला मिळू देत नाहीत. ७ वर्षे त्यांनी औरंगजेबासारख्या बलाढय शत्रूला झुलवत ठेवले. मात्र फंदफितुरीमुळे, पैशाच्या, दौलतीच्या, संस्थानिक होण्याच्या लालसेला बळी पडलेल्या आपल्या मेहुण्याकडूनच (गणोजी शिर्के) दगाबाजी होते आणि संभाजी व कवी कलश पकडले जातात व औरंगजेब अत्यंत क्रुरपणे त्यांना मारतात. शेवटपर्यंत संभाजीला आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करतो. मात्र संभाजी कोणत्याही प्रलोभनेला बळी न पडता आपल्या प्राणाची स्वराज्यासाठी आहुती देतात. अशा प्रकारचा तपशील 'संभाजी' या कादंबरीत आहे. एक यशस्वी अशी ही कादंबरी आहे.

### २.५. **वाङ्मयीन संस्कारः**

विश्वास पाटील यांना बालपणापासून वाचनाची आवड होती. त्यांनी अनेक उत्तम दर्जेदार पुस्तक बालपणी वाचली होती. त्या वाचण्याचा त्यांच्यावर नकळतपणे संस्कार झालेला आहे. ते एका मुलाखतीत म्हणतात,

''आमच्या गावान मला जस निसर्गाच देण दिल, तसच मला साहित्यकृतीच्या आकृतीबंधाच, रचनेच भानही नकळतपणे आणून दिले. तेव्हा अर्थातच तो संस्कार माझ्या मनावर होत होता याची जाणीव किंवा भान असण शक्य नव्हते. पण दृष्टी मात्र वेगळया रीतीने घडत गेली.'' (११)

विश्वास पाटील लिहितात, ''अलिकडे जगातील काही श्रेष्ठ कादंबऱ्यांचे वाचन मी केले. पण स्टाईनबेक, पर्लनक, डॉस्टोव्हस्की, टॉलस्टॉय, अर्डीपासूनते अगदी पास्तरनाक पर्यंत धांडोळा घेऊनही माझे मन पुन्हा 'महाभारताच्या' अजिंक्य दुर्गाजवळ येऊन थांबते.'' (१२)

आपल्या आवडी विषयी विश्वास पाटील लिहितात, ''इतिहास हा माझा अभ्यासाचा विषय नसला तरी इतिहासाची मला लहानपनापासूनच आवड होती. वीरधवल ही लहानपणी मला फार आवडलेली कादंबरी आहे. तसेच ग्रामीणतेच्या दृष्टीनं बोलायचं झालं तर र.वा. दिघे हे माझे आवडते कादंबरीकार आहेत. दिघ्यांनी अतिशय सूक्ष्मपणे निसर्गाच जे चित्रण केलंय ते खरोखरच अपूर्व आहे. वज्रघात ही मला आवडलेली कादंबरी आहे. त्यातील प्रभावी व्यक्तिचित्रण व प्रसंगरेखाटन यामुळे ती आवडली.'' (१३)

''इच्छा असनूही फारसे वाचन होत नाही ही रूखरूख. जीपमध्ये दिवसा होईल तेवढेच वाचन. व्यंकटेश माडगुळकर, आचार्य अत्रे, अरूण साधू, आनंद यादव, भालचंद्र नेमाडे, र.वा. दिघे आणि वसंत कानेटकर हे मराठी लेखक आवडतात. 'बनगरवाडी ची तर पारायण केली आहेत.'' (१४)

विश्वास पाटील पाचवीत असतांना विठ्ठल आपटे गुरुजी त्यांना भरपूर पुस्तक वाचायला देत. साने गुरुजींची पुस्तक विश्वास पाटील यांनी बालपणीच वाचली होती. ना.पा. कांबळे गुरुजींच्या वक्तृत्त्वाने विश्वास पाटील यांच्या मनावर मोहिनी घातली होती. यातूनच भाषेबद्दलची गोडी, आकर्षण, निर्माण झाल. विश्वास पाटील शिकत असल्यामुळे त्यांना लहाणपणी पोथी, रामायण-महाभारत वाचायला आवर्जून बोलावले जात होते. गावातील कीर्तन, भजन, तमाशा, पोवाडे अशा लोककलेच्या वातावरणाचा प्रभाव लेखकावर पडला. लेखक स्वतः शाळेत असतांना नाटक बसवत होते, पोवाडा गात होते, वक्तृत्व स्पर्धेत भाग घेत होते. वाचनाची प्रचंड आवड त्यांना होती. नववीत असतांना पाचगणीला मामाकडे होते. तेव्हा दिवाळी आणि उन्हाळा अशा सुट्टांमध्ये २७० पुस्तक वाचून काढली. याच दरम्यान त्यांनी एक कादंबरी लिहिण्याचा प्रयत्नही केला होता.

विश्वास पाटील म्हणतात,

''आठवीत असतांना वाचलेली परिणामकारक पुस्तक म्हणजे नाथमाधवांच वीरधवल, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, अण्णाभाऊ साठे, चंद्रकुमार नलगे, शंकर पाटील, शंकरराव खरात, द.मा. मिशसदार, ग.दि. माडगुळकर, व्यंकटेश माडगुळकर, आनंद यादव इत्यादी लेखकांची पुस्तक वाचली.

मला मराठीत भारावून टाकणारा अग्रभागीचा कादंबरीकार म्हणून र.वा. दिघे वाटतात. इतर कादंबऱ्या म्हणजे फकीरा, लिलीचे फूल, माणूस, धग, रात्र काळी घागर काळी, एम.टी आयवा मारू अशा काही मोजक्या कादंबऱ्या मला आवडल्या आहेत. परदेशी लेखक म्हणजे सेक्सपिअर, थॉमस हार्डी, दोस्तायवास्की, पर्लबक, स्टाईनबेक, व्हिक्टर ह्युगो हे आवडतात. तर शरचंद्रजी चटर्जी, सुनील गंगोपाध्याय, प्रेमचंद, फणीश्वरनाथ, रेणु या लेखकांमुळे जीवनदृष्टी अधिक व्यापक झाली.'' (१५)

## २.६ संदर्भः

१. नागनाथ कोत्तापल्ले, ‘‘साहित्याचा अन्वयार्थ’’, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, १९९६ पृ.क्र.४.

२. ‘‘सनद लेखकाची’ कृतार्थ पृ.क्र. २५.

३. मीना वंशंपायन, ‘‘विश्वास पाटील यांची मुलाखत,’’ लोकमत दिवाळी अंक, २००१, पृ.क्र.२५.

४. तानाजी राऊ पाटील, ‘‘मराठी कादंबरी’’, समीक्षा, डायमंड पब्लिकेशन पुणे. २००९, पृ.क्र.९६ .

५. डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर, ‘‘शोध झाडाझडतीचा,’’ पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००३, पृ.क्र.१२५, १२६.

६. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २५६, जाने–मार्च १९९१, पृ.क्र.१३.

७. मुरलीधर सायनेकर, ‘‘१९८८ मधील कादंबरी,’’ ललित, मे १९८९, पृ.क्र.२१.

८. शंकर सारडा, ‘‘ग्रंथाविशेष’’, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, जाने १९९१, पृ.क्र.१७.

९. स.दा. कऱ्हाडे ‘‘मानाचे पान , झाडाझडती’’ ललित, मार्च १९९३, पृ.क्र.२५.

१०. शंकर सारडा, ‘‘विश्वास पाटील यांची महाकादंबरीः संभाजी’’, मेहता मराठी ग्रंथजगत, जानेवारी २००६, पृ.क्र.३२.

११. लोकमत दिवाळी अंक, २००१, पृ.क्र. २५.

१२. विश्वास पाटील, ‘‘भाषण ६ वे समरसता साहित्य संमेलन,’’ डिसेंबर १२ ते १४, २००३.

१३. ललित, फेब्रूवारी १९९२, पृ.क्र.३३.

१४. ललित, ऑक्टोबर १९८९, पृ.क्र.३०.

15. डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर, ‘‘शोध झाडाझडतीचा,’’ पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००३, पृ.क्र.१२१, १५६, १५८.

प्रकरण तिसरे

# कादंबरीचे स्वरूप

अनुक्रमणिका


३.१ प्रस्तावना

३.२ कादंबरीचा उदय

३.३ कादंबरीची व्याख्या

३.४ कादंबरीचे घटक

३.४.१ कथानक

३.४.२ व्यक्तिचित्रण

३.४.३ वातावरणनिर्मिती

३.४.४ घटना–प्रसंग

३.४.५ भाषाशैली

३.५ संदर्भ

## ३.१ प्रस्तावना

" कांदबरी का साहित्य प्रकार आधुनिक असला तरी त्याचे बीज फार पुरातन आहे. गोष्टी वेल्हाळपणा हा मानवाच्या स्वभावाचा एक स्वाभाविक विशेष आहे. त्याला जे आश्चर्यकारक निसर्गविषयक अनुभव आले ते त्यांने वेदातील कथांमध्ये व अद्‌भुत कथांत ग्रंथित केले. आपले जीवनविषयक आदर्श त्याने रामायण,महाभारत यांसारख्या महाकाव्यात चित्रित केले. कादंबरी वाङ्मयाला लागणारी जीवनविषयक निरीक्षणाची सामग्री, एक विशिष्ट वृत्ती व दृष्टिकोन हा इंग्रजीच्या आक्रमणामुळे आले. पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शिकत्वाचा किंवा अद्‌भुताचा मार्ग धरून मुलत: मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्या द्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती. " (१)

कादंबरी ही एक दीर्घ कथा असते. त्या कथेमध्ये बऱ्याच उपकथाही असतात. वेगवेगळ्या वयाची, वृत्तीची, स्वभावाची स्तराची माणसे त्यात असतात. व्यामिश्र अनुभव ,घटना प्रसंगाच्या माध्यमातून व्यक्त केलेले असतात. निसर्गाचे परिसराचे, प्रदेशाचे वर्णनही असते. लेखकाच्या विशिष्ट लेखनशैलीद्वारे हे सर्व चित्रित केलेले असते. कादंबरी हा लोकप्रिय साहित्य प्रकार आहे. कादंबरीचे ऐतिहासिक,सामाजिक,ग्रामीण,चरित्रात्मक,राजकीय इत्यादी प्रकार आहेत. कादंबरीचे कथानक व्यक्तिचित्रण,घटना-प्रसंग,निवेदन उपकथानक इत्यादी घटक असतात.याआधारे लेखक एक काल्पनिक सृष्टी आपल्या अनुभवांच्या आधारे निर्माण करून वाचकाला त्यात रममाण करतो. कादंबरीचे विषय वेगवेगळे असतात. कादंबरीमध्ये समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. समाजातील वास्तवतेच्या पायावर लेखक कादंबरीची कधी वास्तव तर कधी काल्पनिक इमारत उभारत असतो. आज मराठी साहित्यात कादंबरी साहित्यप्रकार लोकप्रिय आहे. त्यामुळे त्याची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत आहे.

## ३.२ कादंबरीचा उदय

"कादंबरी हा वाडमयप्रकार इंग्रजी राजवटीतच जन्माला आला. तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि ऐकणे ही मानवाची प्रवृत्ती पुरातन आहे. पुराणे,आख्याने, बखरी इ. ग्रंथातून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात हे खरे आहे. १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या "महाराष्ट्र भाषेचा कोष" या ग्रंथात कादंबरी या शब्दांचे अर्थ देताना एक कल्पित कथा असा एक अर्थ दिला आहे.'' (२)

इंग्रजांच्या काळात समाजातील शिक्षित वर्ग इंग्रजी साहित्य वाचत होता. इंग्रजी साहित्यात कादंबरी रूळली होती. त्याचे आकर्षण भारतीय लेखकांना वाटले आणि त्यांनी मराठीत कादंबरी आणली. सुरवातीला कादंबरीचे स्वरूप बाळबोध अनुवादीत अनुकरणीय असले तरी त्यानंतरच्या काळात कादंबरी हा मराठी साहित्यात एक महत्त्वाचा साहित्य प्रकार म्हणून गणला गेला. इतर साहित्य प्रकारांच्या तुलनेत कादंबरी हा साहित्य प्रकार जास्त लिहिला जातो आणि वाचलाही जातो.

"कांदबरीच्या मूळ स्वरूपाचा आणि उगमांचा प्रश्न आपणास देशोदेशींच्या प्राचीन कथन परंपरांकडे घेऊन जातो. हा भालचंद्र नेमाडेंचा विचार चिंतनीय आहे. कादंबरीत समाविष्ट असलेल्या घटकांची बिजे प्राचीन काळातील देशोदेशींच्या लेखनात सापडत असली तरी एक वाड्मयप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रूपबंध ही बाब अर्वाचीन आहे. एकूणच अर्वाचीन कादंबरी युरोपात उगम पावली हे नाकारता येणार नाही. " (३)

"कादंबरी या वाड्मयप्रकारासाठी वापरल्या जाणाऱ्या NOVEL या शब्दाची व्युत्पत्ती Novella या इटालियन शब्दात असून, तत्पूर्वी तो बोकॅशिओच्या डिकॅमेरॉमधील कथांसाठी (शतक १४ वे )वापरला जात असे. या शब्दाला अशी पूर्व पीठिका असली तरीही एक वाड्मयप्रकार म्हणून कादंबरीचा उदय अठराव्या शतकात युरोपात झाला. त्या दृष्टीने पाहिले तर डॅनियल डिफो, सॅम्युअल रिचर्डसन, हेन्री फिल्डिंग हे युरोपातील आदय कादंबरीकार ठरतात. "(४)

युरोपात लिहिल्या जाणाऱ्या कथांमध्ये कादंबरीचा मूळस्रोत सापडण्यास मदत होते. युरोपातील वीरकथा, साहसकथा, योद्ध्यांच्या गोष्टी यामध्ये समाजात प्रचलित असलेल्या बोधकथाही मिसळल्या जात होत्या. अशाच वीरकथांचा संग्रह बोकॅशिओच्या डिकॅमेरॉनमध्ये झालेला आहे. यात सर्व सामान्य माणसाचेही वर्णन आहे. डिकॅमेरॉनमधील कथांना इटलीत नॉव्हेल म्हटले जात होते. याचे वैशिष्ट्य हे की जीवनातील सत्य आणि सौंदर्य यांचे वर्णन करणे. अशा वीरकथा युरोपातील स्पेन,इटली, फ्रान्स इ. देशात लिहिल्या जात होत्या. यातूनच पुढे कादंबरीचा जन्म झाला.

''अर्वाचीन भारतीय कादंबरीनेही युरोपीय कादंबरीचा वारसा स्वीकारला आहे. इंग्रजी आमदानीत नव्या बदलांमुळे महाराष्ट्र जागा झाला. शिक्षणप्रसार वाढला समाजातील शिक्षित वर्गाला इंग्रजी साहित्याची ओढ होती. इंग्रजीच्या संपर्कामुळे शिक्षित वर्गाची विशिष्ट प्रकारची वाङ्मयाभिरुची निर्माण होत गेली. समाजात सुधारणा होत होत्या. १९ व्या शतकातील मराठी कादंबरी इंग्रजी फार्सीच्या संसर्गाप्रभावातून आणि संस्कृतच्या संस्कारातून आकारास आली आहे.” (५)

अशाप्रकारे इंग्रजी शिक्षणामुळे, इंग्रजी भाषेमुळे इंग्रजी साहित्यामुळे मराठी कादंबरीचा उदय झाला. इंग्रजी साहित्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून मराठी साहित्य त्यातल्या त्यात कादंबरीची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील लेखकांनी इंग्रजी कादंबरीचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून कादंबरीची निर्मिती केली. तरी त्या लेखकांवर संस्कृतचेही संस्कार होते.

## ३.३ कादंबरीची व्याख्या

कादंबरी हा एक ललित साहित्यप्रकार आहे. अधुनिक काळात लोकप्रिय असा हा साहित्य प्रकार आहे. कादंबरीत विस्तृतपणे जीवनाचे दर्शन घडविलेले असते. समाजदर्शन,व्यक्तिदर्शन,समस्या दर्शन अशा अनेक गोष्टींना विस्तृतपणे कादंबरीत मांडलेले असते.

१) **व्याख्या :** ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पद असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे,प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते.'' (६)

२) **''कॅथरीन बीव्हर :** कादंबरी म्हणजे कथात्म लिखित गदयाचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकांना गुंगवून टाकणारा रचनाबंध होय.'' (७)

३) **''रा.ग.जाधव :** कथानक,व्यक्तिचित्रण,लेखकाचा दृष्टीकोन व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने वातावरण निर्मिती, शैली इ. घटकांनी गदयात विस्तृतपणे केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.'' (८)

४) ''१८७२ मध्ये नावल व नाटक ह्याविषयी निबंध लिहिताना का.बा. मराठे लिहितात. नावल म्हणजे चमत्कारीक गोष्ट. ज्यांत आश्चर्यकारक गोष्टी फार व जो वाचला असता अव्वलपासून अखेरपर्यंत वाचनारांस नवल वाटावे अशा प्रकारचा जो ग्रंथ, त्यास नावल अशी संज्ञा आहे. ही त्या काळात करण्यात आलेली कादंबरीची व्याख्या. '' (९)

५) ''सामाजिक वास्तवाचा सर्जनशील दस्तऐवज म्हणजे कादंबरी.'' (१०)

सुरवातीच्या काळात कादंबरीला कल्पित कथा मानले जात होते. मात्र हळूहळू काळानुसार कादंबरीचे कल्पित कथा हे स्वरूप जाऊन तिला वास्तवाची जोड मिळू लागली. कादंबरीचा पट विस्तृत असा जीवनपट असतो. यात समाज जीवनातील घटना प्रसंग निवडून त्याला काल्पनिकतेची जोड देऊन पात्रनिर्मिती करून, वातावरणाची भर घालून एक कथानक विस्तृतपणे मांडलेले असते. कादंबरीत पात्रांच्या स्वभावातील कंगोरे, त्यांच्या जीवनातील घटना-प्रसंगाचे चढ उतार , भावंनाचे आंदोलने, समाजाचे चित्रण, समाजातील स्तर, समाजातील घटकांचे पडलेले साद-पडसाद अशा सगळ्या गोष्टींचा बारकाईने विचार करून त्याचा कादंबरीत वेध घेतलेला असतो. कादंबरीतील जीवनदर्शन हे पूर्णत: कल्पित नसते किंवा पूर्णत: वास्तवही नसते. या दोन्ही गोष्टींचा योग्य मेळ कादंबरीत घातलेला असतो. लेखक आपल्याला आवडलेली घटना, मनावर आघात करणारी घटना अशा त्याच्या आजूबाजूच्या जीवनातील असंख्य घडामोडी तो पाहतो. मात्र त्याच्या

संवेदनशील मनाला यातील जे जाणवत त्यावर तो लिहितो. त्याच्या मनातील भाव-भावना तो साहित्यात उतरवतो. व हे उतरवत असतांना तो काल्पनिकतेचाही आधार घेतो.

कादंबरी म्हणजे मानवी जीवनातील, समाजातील घटना प्रसंगाचे सखोलपणे, विस्तृतपणे कल्पनेच्या सहाय्याने केलेले चित्रण मानवाचे जीवन चित्रण. त्याच्या जीवनातील समस्या,प्रश्न त्याच्या जीवनातील चढ-उतार,त्याच्या जीवनातील संघर्ष,त्याच्या भावनांचे आंदोलने,त्याची स्वप्ने,इच्छा,आकांक्षा, त्याची आर्थिक-सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक स्थिती त्याचे व्यावहारिक आणि वैयक्तिक जीवन इत्यादी किंवा इत्यादींपैकी एक याचे कादंबरीत विस्तृत व सखोल वर्णन केलेले असते.

## ३.४ कादंबरीचे घटक

कादंबरी या साहित्यप्रकारात काही घटक अनिवार्य असतात. त्याशिवाय कादंबरीला कादंबरीत्व प्राप्त होत नाही. या घटकांना अनुसरून कादंबरीची रचना असावी असा संकेत आहे.

**३.४.१ कथानक :** हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे या शिवाय कादंबरी अस्तित्वात येऊच शकत नाही. ''कथानक हा कथेचा आत्मा असून कथानकाच्या तीन अवस्था म्हणजे प्रारंभ,मध्य व शेवट. प्रारंभ म्हणजे पुढील घडामोडीची भूमिका तयार करणे. ही भूमिका तयार झाली म्हणजे कथानकाचा पुढील विकास हा तर्कसंगत असावा. मुळापासून क्रमशः वृक्षाची वाढ जशी होते तशाच प्रकारे प्रारंभापासून क्रमशः कथानकाचा विकास असावा. शेवटही स्वाभाविक असावयास पाहिजे. कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी संभाव्यता कार्यकारणमीमांसा, व कुतुहलनिर्मिती हे गुण आवश्यक आहेत. चांगल्या कथानकात एका प्रसंगातून दुसरा प्रसंग स्वाभाविकपणे तर उद्‌भवतोच, पण कथानकाला पुढे कशी गती मिळणार याविषयी वाचकाच्या मनात कुतूहल निर्माण होते. ही उत्कंठा सतत टिकविणे यातच कथालेखकाचे कौशल्य दिसून येते.'' (११)

कादंबरीच्या घटकांमध्ये कथानक फार महत्त्वाचे असते. कथानकामुळे कादंबरीत सुसुत्रता येते. कादंबरीचे कथानक जेवढे चांगले जेवढे सुसंगत तेवढी ती कादंबरी प्रसिद्ध यशस्वी होते. वाचकांना ती आवडते.

### ३.४.२ स्वभाव चित्रण /व्यक्तिचित्रण

कथानकानंतर हा महत्त्वाचा घटक मानला जातो. मानवी स्वभाव फार विविधांगी आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती असे म्हणतात त्याप्रमाणे मानवी स्वभावाचे विविध रंग,ढंग,पटल जाणवतात किंबहुना ते आहेत. आणि अशाच अनाकालनिय, अप्रूप मनुष्य स्वभावाचे चित्रण कादंबरीकार आपल्या कादंबरीत पात्रांच्या माध्यमातून करत असतो.

''श्रेष्ठ दर्जाचे कांदबरीकार आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने आपल्या पात्रांच अंत:करण उघडे करून दाखवितात. बाह्य सृष्टीतील विविध वस्तूंच्या दर्शनापेक्षा मानवी अंत:करणात ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात त्यांचे दर्शन वाचक प्रेक्षकांस अधिक आल्हाददायक असते. म्हणूनच कित्येक टीकाकारांच्या मते. उच्च कलेच्या दृष्टीने कथानकातील चातुर्यापेक्षा कुशल व्यक्तिदर्शनाच्या शोभेने सजलेल्या कादंबरीसच श्रेष्ठ स्थान मिळेल.'' (१२)

स्वभावचित्रणाला कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. योग्य -वास्तव स्वभावचित्रणामुळे कादंबरी यशस्वी होऊ शकते. समाजात निरनराळ्या स्वभावांच्या व्यक्ती असतात. त्या व्यक्तींच्या स्वभावावरूनच लेखक आपल्या साहित्यात पात्र निर्माण करतो. प्रसंगाप्रमाणे व्यक्तींचे स्वभाव कसे रंग-रूप धारण करतात हे लेखक साहित्यात मांडत असतो. कादंबरीतील पात्रे वाचकांच्या एवढी परिचयाची, आपली वाटतात की, ते त्यांची नावे, स्वभाव कायम लक्षात ठेवतात.

### ३.४.३ वातावरणनिर्मिती–

वातावरणनिर्मितीमुळे कथानकाला, पात्रांना उठाव येतो. कथानकाचा प्रभाव यामुळे वाचकांवर चांगल्या प्रकारे पडतो.

"चित्रकलेमध्ये पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे आहे. चित्रातील पार्श्वभूमीने त्या चित्रातील देखाव्यास जसा एक प्रकारचा उठाव मिळतो, इतकेच नव्हे तर त्या चित्रातील विशिष्ट प्रसंगाचे खरे मर्म कळण्यास जशी तिची मदत होते, तसेच कादंबरीतले वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते. सृष्टीतील एखाद्या सुंदर देखाव्याचे चित्र काढीत असता त्या देखाव्याची निसर्गातील पृष्ठभूमी ही त्या चित्राचाच विषय होऊन चित्रामध्ये पृष्ठभूमीच्या ठिकाणी यावी त्याप्रमाणे ऐतिहासिक किंवा कित्येकदा सामाजिक कादंबऱ्यांत अशा वातावरणास सहजिकच कथानका इतकेच महत्त्व प्राप्त होऊन ते निव्वळ पूरक घटक न राहता, कथानक, व्यक्तिदर्शन याप्रमाणे कादंबरीत योग्य ते वातावरण निर्माण करण्यात जर ग्रंथकारास यश लाभले, तर कथानकातील विविध प्रसंग आणि घटना यामधील कार्यकारणभावाची संगती सहज प्रकट होऊन व्यक्तिदर्शनाचे खरे मर्मही वाचकांस सुलभ रीतीने प्रतीत होते. स्थलकाल–वैशिष्टयांचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजेच हे वातावरण होय . " (१३)

कादंबरीतील ठिकाणे , परिसर, कादंबरीतील व्यक्तींचा वावरण्याचा परिसर,घटना प्रसंगाचे ठिकाण इत्यादींचे वर्णन म्हणजे वातावरण होय. वातावरण म्हणजे आजूबाजूचा परिसर.वातावरणनिर्मितीमुळे मुख्य कथा,पात्रे अधिक उठावदारपणे वाचकांसमोर येतात. वातावरणामुळे कादंबरी समजण्यास मोलाची मदत होते.

### ३.४.४ घटना प्रसंग

“कादंबरी ही महाकाव्याच्या परंपरेतील आहे. महाकाव्याप्रमाणेच कादंबरीत मानवी जीवनाचे व सामाजिक परिस्थितीचे चित्रण जितके व्यापक असेल तितके श्रेयकर आहे. कथानकाचा विकास करीत असता प्रसंग व घटनांची निवड करण्यात लेखकाने तारतम्य दाखविणे जरूर आहे. कथेचा विकास होत असता प्रारंभिक भूमिका नीट तयार करणे, विषयाची मांडणी व्यवस्थीत करणे, निरनिराळ्या घटनांचा जोड नीट सांधणे, एका प्रसंगातून दुसरा प्रसंग सहजरित्या निर्माण करणे, महत्त्वाच्या गोष्टींना केंद्रस्थान देऊन त्यावर वाचकांचे लक्ष केंद्रित करणे व इतर प्रसंग किंवा गोष्टी केवळ पूरक म्हणून उपयोगात आणणे इत्यादी गोष्टींची काळजी कथालेखकाने घेणे जरूर आहे. ” (१४)

कादंबरीचा घाट मोठा असतो. त्याचा यथायोग्य विस्तार करण्यासाठी घटना, प्रसंगांची पेरणी करावी लागते. त्यामुळे कादंबरीला एक प्रकारची गती प्राप्त होते. कथानकाच्या विकासासाठी घटना-प्रसंगांची निर्मिती आवश्यक असते. मात्र त्याची निवड करताना लेखकाला अत्यंत सावधगिरी बाळगावी लागते. आवश्यक समर्पक असेच घटनाप्रसंग निवडले तरच कादंबरीचा दर्जा आणि घाट कायम राहतो.

### ३.४.५ भाषाशैली :

“विचार व भावना शब्दांच्या द्वारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे काम. पण शैली या शब्दाने भाषेला मिळालेले विशिष्ट वळण असा अर्थ सूचित होतो. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर देशकाल परिस्थितीचा जसा प्रभाव पडतो. तद्वतच प्रत्येकाच्या शैलीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचा प्रभावही पडतो. म्हणूनच शैलीवरून लेखकाच्या व्यक्तित्वाची कल्पना येते.

कादंबरीत नाटकाप्रमाणे चटकदार संवाद तर असतातच पण शिवाय अनुकूल वातावरणनिर्मिती, अनुरूप शब्दांच्या द्वारे करावयाची असते. तसेच पात्र परिचय व घटनांचे निवेदन रेखीव व समर्पक शब्दांनी अशा प्रकारे

करावयाचे असते की, ती पात्रे व घटनाप्रसंग वाचकांच्या डोळ्यासमोर उभी राहावीत सहजसुंदरता व स्वाभाविकता हे दोन चांगल्या कादंबऱ्यांच्या भाषाशैलीचे गुण मानण्यात येतात. "(१५)

वाचक कादंबरीला भाषेच्या माध्यमातून आपलेसे करतो. कादंबरीतील भाषा त्याला त्यांच्यासारखी वाटली, तर त्याला ती कादंबरी अधिक आवडते. सरळ साधी भाषा, साधे शब्द, रोजच्या वापरातील म्हणी, वाक्प्रचार इ. कादंबरीत असेल तर वाचक त्या कादंबरीशी लवकर आणि दीर्घकाळ जोडला जातो. प्रत्येक लेखकाची भाषाशैली वेगवेगळी असते. लेखक लहानाचा मोठा ज्या वातावरणात होतो. त्या वातावरणातील भाषेचा प्रभाव त्याच्या व्यक्तिमत्वावर, लेखनावर जाणवतो. कादंबरीत जे वातावरण आहे. जो काळ आहे, जो प्रदेश आहे त्यानुसार लेखक आपल्या भाषाशैलीत बदल करत असतो. भाषेशिवाय कादंबरी किंवा कोणतेही साहित्य अस्तित्वात येऊच शकत नाही. म्हणून भाषा हा अत्यावश्यक घटक आहे आणि प्रत्येक लेखकाची एक वेगळी लेखनशैली असते. ती शैली तयार होण्यास त्या लेखकाचे बालपण, व्यवसाय,सामाजिक दर्जा, प्रदेश, शिक्षण अशा सगळ्या गोष्टींचा प्रभाव पडत असतो. म्हणूनच प्रत्येक कादंबरीकाराची भाषाशैली ही वेगवेगळी जाणवते. भाषाशैलीमुळे कादंबरीचा प्रभाव  वाचकांच्या मनावर खोलवर व दीर्घकाळ होतो.

## ३.५ संदर्भ


१. कुसुमावती देशपांडे, मराठी कांदबरीचे पहिले शतक. पृ.१२,१६.

२. सं.पा.अनिरूद्ध कुलकर्णी , " प्रदक्षिणा खंड १" , कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे २००७, पृ.क्र.२०२.

३. डॉ. रवींद्र ठाकूर, मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन पुणे २००७, पृ.क्र. ४१.

४. तत्रैव, पृ.क्र.४२.

५. तत्रैव, पृ.क्र. ४६,४७,५१.

६. सं पा. प्रभा गणोरकर व इतर, वाडमयीन संज्ञा संकल्पना कोश, भटकळ प्रकाशन मुंबई, २००१, पृ. ४८.

७. तत्रैव , पृ.क्र. १७०.

८. डॉ. रविंद्र ठाकूर , उनि. ,पृ.क्र. ५८.

९. डॉ. रविंद्र ठाकूर, उनि. ,पृ.क्र. ५२

१०. नागनाथ कोतापल्ले, "साहित्य आणि समाज," प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७, पृ.क्र. २००१.

११. बापट आणि गोडबोले, "मराठी कादंबरी तंत्र आणि विकास", व्हिनस प्रकाशन पुणे, १९७३ , पृ.क्र. ८३,८४.

१२. तत्रैव ,पृ.क्र.१११,११२.

१३. तत्रैव ,पृ.क्र.१२९.

१४. तत्रैव ,पृ.क्र.९४,९५.

तत्रैव,पृ.क्र.१३७.

१.

## प्रकरण चौथे

# सामाजिक अभ्यास

अनुक्रमणिका


**४.१** सामाजिक अभ्यास म्हणजे काय?

**४.२** समाज म्हणजे काय?

**४.३** समाज व्यवस्था.

**४.४** समाज – साहित्यिक–साहित्य परस्परसंबंध.

**४.५** कादंबरीतील सामाजिकता .

**४.६** मराठी कादंबऱ्यांमधील सामाजिकता.

**४.७** विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांच्या सामाजिक अभ्यासाचे मुद्दे.

**४.८** संदर्भ.

## ४.१. सामाजिक अभ्यास म्हणजे काय?

साहित्याचा अभ्यास वेगवेगळया पद्धतींनी केला जातो. साहित्याचा सामाजिक अंगाने अभ्यास ही पण एक अभ्यास पद्धती आहे. साहित्यात पडलेले/उमटलेले समाज जीवन कसे आहे याचा अभ्यास या पद्धतीत केला जातो.

''समाजाच्या संदर्भात साहित्याचा अभ्यास करणे हे समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे कार्य आहे. व्यक्तीचे खाजगी जीवन आणि सामाजिक जीवन यात परस्परान्वय असतो हे समाजशास्त्राचे गृहीततत्व आहे. साहित्याची भाषा ही समाजनिर्मित असते. सामाजिक वास्तव हेच साहित्याचे आशयद्रव्य असते आणि साहित्य निर्मिती हीही एक सामाजिक व्यवहाराचाच भाग आहे. हे सामाजिक समीक्षापद्धतीचे गृहीतक आहे. फ्रेंच तत्वज्ञ हिपोलिट तेन याने 'साहित्याकृती ही, काळ, समाज आणि परिवेश यांची निर्मिती असते. असा सिद्धांत मांडला. (History of English Literature, १८६३) वाङ्मयीन संहिता ज्या काळात लिहिली जाते त्या काळाचा युगधर्म त्या संहितेत शिलीभूत झालेला असतो. तसेच निर्माता ज्या वंशात जन्मतो, वाढतो त्या वंशाच्या विशिष्ट जाणिवेतून, सौदर्याविषयक कल्पनाबंधांच्या लिहितो. आणि आजूबाजूचे समकालीन रीतिरिवाज, सामाजिक पर्यावरण यांतून जो मनुष्यस्वभाव घडतो त्याची अभिव्यक्ती साहित्यातून होते.

भाषा, तत्वज्ञान, धर्म, नीती, ज्ञान-विज्ञान, अर्थकरण, राजकरण, कला आणि मनोजरंन, विधी-संस्कार, खाणें-पिणे, पोषाख आणि लोकाचार या समग्र सांस्कृतिक व्यवहाराच्या सलगतेत साहित्याचा आणि वाङ्मय व्यवहाराचा विचार या समीक्षेत करतात. साहित्यकृतीत देशकालपरिस्थितीचे पडणारे प्रतिबिंब सम्यकपणे ओळखून ते विशद करणे हे सामाजिक समीक्षेचे कार्य.'' (१)

साहित्य हे समाजाच्या भाषेत लिहिले जाते. समाजात प्रकाशित केले जाते, समाजातील लेखकांनीच लिहिलेले असते, समाजातील लोकांकडून वाचले जाते. त्यामुळे साहित्य हे सर्व बाबतीत सामाजिक असते. समाजात घडणाऱ्या घटना, समाजातील व्यक्ती, समाजातील भाषा, समाजात वावरतांना आलेले व्यामिश्र अनुभव, समाजातील राजकीय, आर्थिक, सामाजिक घडामोडी इ. मधून

साहीत्यिक जात असतो व या समाजातील घडामोडींचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणाम साहित्यिकावर पडत असतो. व यातूनच तो साहित्य निर्मिती करत असतो. म्हणूनच साहित्यात या ना त्या प्रकारे, कधी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सामाजिकता असते.

''साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास म्हणजे साहित्यातून अविष्कृत होणारा समाज कोणता आहे, त्याचे स्वरूप काय आहे, साहित्यात जीवनाची कोण कोणती अंगे प्रकट झाली आहेत, लेखकाच्या काळाने आणि त्याच्या काळातील सामाजिकतेने त्याचे मनोविश्व नियंत्रित केले का? त्या नियंत्रणाचे स्वरूप काय होते? तो जी भाषा वापरतो, तिचा आणि त्याच्या भोवतीच्या समाजाचा कोणता संबंध आहे? एखादा साहित्य प्रकारच एखादया लेखकाला का जवळचा वाटतो? तो नेमका कोणासाठी लिहितो? तो ज्या प्रकाशन संस्थांकडे जातो, त्यांची नेमकी भूमिका आणि समाजातील स्थान कोणते आहे? तो ज्या समाजात वावरतो, त्या समाजाचा एकूणच कलाजीवनाकडे साहित्याकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोन आहे? शासन व्यवस्था साहित्याकडे कशा प्रकारे पाहते? शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप काय आहे? कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था कार्यरत आहे? धर्मव्यवस्थेचे नेमके कोणते संस्कार लेखकावर झालेले आहेत? आणि धर्मव्यवस्था कशी आहे? संस्कृतीसंबंधीच्या समाजाच्या कोणत्या कल्पना आहेत? बालपणी लेखकावर कोणत्या प्रकारचे संस्कार झालेले आहेत? संस्कारासंबंधीच्या समाजाच्या काय संकल्पना आहेत? अशा प्रश्नांमधूनच साहित्याकडे आणि साहीत्य व्यवहाराकडे पाहिले जाते, तेव्हाच साहित्य आणि समाज यांचा अनुबंध स्पष्ट होत जातो. तसेच खऱ्या अर्थाने साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास होऊ शकतो.'' (२)

साहित्याचा सामाजिक अभ्यास म्हणजे साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या समाजाचा, समाज जीवनाचा अभ्यास होय. त्या साहित्यात पडलेल्या समाजाचे, काळाचे, त्या समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थिती. या परिस्थितीचा समाजावर, समाजाच्या प्रगतीवर वैचारिकतेवर परिणाम झाला की नाही? कोणत्या स्वरूपात झाला? चे विश्लेषण करणे या सामाजिक अभ्यासात आवश्यक आहे.

समाजातील व्यक्ती, कुटुंबे, संस्था, भाषा, संस्कृती, व्यवसाय, दैनंदिन व्यवहार, पोषाख, दागदागिने, रूढी-परंपरा, सण-उत्सव-समारंभ, निसर्ग, समजूती, श्रद्धा-अंधश्रद्धा इ. गोष्टीचे स्वरूप साहित्यात कसे पडलेले आहे याचा अभ्यास सामाजिक अभ्यासात करतात.

''समाजशास्त्रीय समीक्षा साहित्य व्यवहाराशी संबंधित असलेले अनेक विषय सामावून घेते. प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, समाजशास्त्रीय समीक्षा साहित्यकृतीचे मूल्यमापन करण्याचा दावा करीत नाही. ही समीक्षा मुख्यतः वर्णनाचे, स्पष्टीकरणाचे कार्य करते. उदा. एखादी विशिष्ट साहित्यकृती किंवा एखादा विशिष्ट साहित्यप्रकार विशिष्ट काळातच का जन्मला, फोफावला, त्याने ठराविक असे स्वरूप का धारण केले याचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न ही समीक्षा करते. एकंदरीत साहित्य व्यवहार आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध शोधण्याचा, त्यांचे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न समाजशास्त्रीय समीक्षा करते. यात समाजाचा साहित्यावर होणारा परिणाम आणि साहित्याचा समाजावर होणारा परिणाम अशा दोन बाजू असल्या तरी पहिल्या बाजूवर अधिक भर दिला जातो आणि तसा तो देण्यात आला आहे असे या समीक्षेच्या इतिहासावरून दिसून येते. समाजशास्त्रीय समीक्षेचे प्रयोजन स्पष्ट करताना गो.म. कुलकर्णी लिहितात, ''समाजरचनेचे घटक आणि साहित्य संरचनेचे घटक यांचे अन्योन्यसंबंध स्पष्ट करणे, हे समाजशास्त्रीय साहित्य समीक्षेचे प्रमुख प्रयोजन आहे. साहीत्यिकाची मूळ प्रकृती, त्याची कलाप्रेरणा, त्याच्या युगाने त्याच्यापुढे उभ्या केलेल्या सांस्कृतिक समस्या, विशिष्ट युगात विशिष्ट आशयाला किंवा अविष्कार पद्धतीला आलेले महत्व, निर्मित साहित्याचा समाज मनावर होणारा परिणाम, साहित्याकडे पाहण्याचा तत्कालीनांचा दृष्टिकोन, त्यांची समीक्षामूल्ये, वाचकांची व एकंदर वाङ्मय व्यवहाराची स्थितीगती, तत्कालीन जीवनदृष्टी, परंपरा, आचार-विचार, पद्धती या सर्वांचाच विचार समाजशास्त्रीय समीक्षेत अभिप्रेत असतो. समाजशास्त्रीय समीक्षेचे प्रथम आणि महत्त्वाचे काम म्हणजे एकंदर कला व्यवहार विशिष्ट समाजाच्या संरचनेशी, विविध सांस्कृतिक घटकांशी कसा आणि कोणकोणत्या प्रकारे संबंधित आहे हे स्पष्ट करणे हे असतं.'' (३)

## ४.२. समाज म्हणजे कायः

''व्यक्ती-व्यक्तींनी समाज बनत असतो तरी समाजाला स्वतःचे असे एक स्वतंत्र अस्तित्व आणि महत्त्व प्राप्त होते. समाज तयार होण्याच्या प्रक्रियेमध्ये किंवा समाज नावाची गोष्ट अस्तित्वात येण्यासाठी काही सामाजिक संस्थांची निर्मिती होत असते. उदा. विवाह संस्था, कुटुंब संस्था, धर्म संस्था, शासन संस्था इ. या आणि अशांसारख्या सामाजिक संस्थांमधून समाज नावाची गोष्ट स्थिर पायावर उभी राहू शकते. त्याचे व्यवस्थापन होते. या संस्थांच्या उदयामध्ये आणि विकासामध्ये त्या त्या समाजाच्या भौतिक बाबींचा फार मोठा वाटा असतो. याचा अर्थ असा की भौतिक किंवा इहवादी दृष्टी हीच सामाजिक संस्थांच्या उभारणीसाठी कारण झालेली असते. अर्थ व्यवस्था हा फार महत्त्वाचा घटक या संदर्भात असतो. उदा. आधुनिक काळात कालबाह्य झालेली जातिसंस्था मध्ययुगात मात्र अर्थ व्यवस्थेशी निगडित होती. एकंदरीत काय, की सामाजिक संस्थांचा पाया भौतिक असतो, ऐहिक असतो. आणि त्यामुळेच व्यक्ती आणि समाज यांच्यामध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. येथेच प्रतिभावंतांच्या अस्तित्वासाठी अवकाश असतो.'' (४)

समाज हा व्यक्तींच्या समूहाने तयार होतो. समाजात विविध संस्था असतात व या संस्थांमुळेच समाज टिकून आहे. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था ह्या समाजाचा पाया आहेत. या संस्थांवरच समाजाची इमारत उभी राहते व या समाजरूपी इमारतीला मदत करण्यासाठी सुंदर, सुदृढ करण्यासाठी, मजबूत, टिकावू करण्यासाठी शासनसंस्था, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक संस्था अशा प्रकारे हे सर्व मिळून समाज तयार होतो.

समाजात विभिन्न प्रकारच्या व्यक्ती एकत्र राहत असतात. समाजात विविध प्रकारच्या घटना घडत असतात. त्याचा व्यक्तींवर बरा-वाईट प्रभाव पडतो. समाजात राहतांना व्यक्तींना सामाजिक नियमांचे पालन करावे लागते. समाजाच्या विरोधात सहसा कोणी जाण्याचा प्रयत्न करत नाही. परंपरागत समाजात ज्या चालीरिती, परंपरा असतात त्याचा आदर व्यक्ती करतात. त्या प्रमाणे आचरण करतात. समाजात जातिसंस्था ही मोठी संस्था आहे. भारतीय समाजात जातिसंस्थेचा पगडा मोठया प्रमाणावर

आहे. विविध जातीनुसार वेगवेगळया प्रथा, परंपरा, भाषा पहायला मिळते. जातिप्रमाणेच वेगवेगळया भूप्रदेशातील राहणीमान, भाषा, परंपरा वेगवेगळया पहायला मिळतात.

असा हा समाज विभिन्नतेने नटलेला आहे. वेगवेगळया जाती, धर्माच्या, प्रांताच्या, भाषेच्या व्यक्ती एकत्र एकाच समाजात राहतात.

**समाजाची व्याख्याः**

१) ''मॅक आयव्हरः– सामाजिक संबंधाने जाळे म्हणजे समाज.

२) राईटः– समाज म्हणजे समूहात राहणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक संबंधांची व्यवस्था होय.

३) विशिष्ट सामाजिक संबंध व वर्तनाचे प्रकार त्यांनी एकत्रित बांधल्या गेलेल्या व्यक्तीचा समूह किंवा जन समूह म्हणजेच समाज होय.'' (५)

४) व्याख्याः– ''ज्या मानवी गटाला दीर्घकालीन सातत्य असलेली श्रद्धा, मूल्ये, आचार व नियम असतात अशा गटाला समाज म्हणतात. अशा गटाचे काही सांस्कृतिक व आचारविषयक वैशिष्टय असते.


अशा समाजाच्या धर्मश्रद्धा पूजा व उपासनांचे प्रकार, शैक्षणिक पातळी, सामूहिक जीवनाची मूल्ये, कुटुंब संस्था, विवाह कल्पना व व्यवहार, क्रीडेचे व कलांचे प्रकार, भाषा व साहित्य इत्यादींचा विचार करून त्या समाजाच्या समग्र जीवनाचे जे चित्र निर्माण होते त्याला संस्कृती म्हणतो.'' (६)

## ४.३. समाज व्यवस्थाः

समाज अनेक संस्थांनी बनलेला असतो. समाजात वेगवेगळया संस्था आपआपली कार्ये पार पाडतात. त्यामुळेच समाजात सुव्यवस्था असते. समाजात विशिष्ट प्रकारची व्यवस्था अस्तित्वात असते. या व्यवस्थेमुळेच समाजातील व्यवहार सुरळीतपणे पार पाडले जातात. समाजात शांतता–सुव्यवस्था नांदते.

''अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था अशा अनेक व्यवस्थांनी पूरक अशी संस्कृतिव्यवस्थाही नांदत असते. या संस्कृतिव्यवस्थेचे प्रायः भौतिक आणि अभौतिक असे दोन दोन स्तर मानले जातात. स्थापत्य, दळणवळण, शाळा, विद्यापीठे, सामाजिक संस्था, साहित्य संस्था इत्यादी

अनेक दृश्य घटकांचा भौतिक संस्कृतीत समावेश केला जातो. चित्र, शिल्प, संगीत, नृत्य (नाटय) आणि साहित्य इत्यादी–कलांना अभौतिक संस्कृती मानले जाते. संस्कृति व्यवस्था हे समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे.


समाजव्यवस्था
अर्थव्यवस्था
धर्मव्यवस्था
राज्यव्यवस्था
संस्कृतिव्यवस्था
भौतिक संस्कृती
अभौतिक संस्कृती
शाळा
विद्यापीठे
साहित्यसंस्था
स्थापत्य
नगररचना
सामाजिक संस्था
दळवळण इ.
जीवनमूल्ये
परंपरा
नीतीधारणा
सांस्कृतिक संचित
विविध ज्ञानशाखा इ.
कला
चित्र
शिल्प
संगीत
नृत्य
साहित्य
कथा
कविता
कादंबरी
नाटक
इतर
साहित्य प्रकार

म्हणजे प्रत्येक साहित्यप्रकार हा एकूण साहित्य व्यवस्थेचा भाग असून, एकूण साहित्यव्यवस्था ही एकूण कलाव्यवस्थेचा भाग आहे आणि भौतिक आणि अभौतिक घटकांनी मिळून तयार होणारी संस्कृतिव्यवस्था ही एकूण समाजव्यवस्थेचा भाग आहे म्हणजे समाजात घडणाऱ्या कलाव्यवहाराचा विचार येथे समाजव्यवस्थेच्या संदर्भात एक सामाजिक घटित म्हणून करावा लागतो. साहित्याची निर्मिती आकलन–आस्वाद आणि मूल्यमापन या सगळया गोष्टी समाजातच घडत असतात. संस्कृती ही ज्या अर्थाने एक जीवनमार्ग आहे, त्याच अर्थाने साहित्य हाही जीवनामार्गच आहे. साहित्य हे संस्कृतीचेच अविभाज्य अंग आहे. साहित्यात व्यक्तीच्या माध्यमातून समाजाचेच दर्शान घडवले जाते. म्हणूनच साहित्यकला हा त्या  कालखंडातील समाजजीवनाचा सांस्कृतिक दस्तऐवज ठरतो.'' (७)

समाजात अनेक लहान मोठया संस्था असतात. प्रत्येक संस्थेचे कार्य ठरलेले असते. काही संस्था एकमेकांना पुरक असतात. या विविध संस्थांच्या संयोगातून समाजव्यवस्था तयार होते. व यामुळेच समाजाची प्रगती होते. या समाजातील एक व्यवस्था म्हणजे साहित्य–व्यवस्था. आणि ही व्यवस्था निर्माण करणारा साहित्यिक हा पण समाजाचाच घटक असतो. तो समाजातच जन्मतो, वाढतो. त्यामुळे साहित्य व त्याची निर्मिती ही सामाजिक घटना आहे.

## ४.४. समाज–साहित्यिक –साहित्य परस्पर संबंध

''साहित्यकृतीचा सारा डोलारा उभा असतो तो समाज वास्तवावरच. शब्द, भाषा, निवेदनशैली, विविध प्रसंग, मानवी मनाची भावांदोलने, नाद, लय इ. असंख्य घटक कलाकृतीमध्ये एकजीव होत असले तरी, हे सारेच घटक एकाच केंद्रस्थानाभोवती फिरत असतात. आणि हे केंद्रस्थान म्हणजे त्या लेखकाला आकळलेले समाजवास्तव. समाजवास्तव ही साहित्यकृतीमधील अतिशय महत्त्वाची बाब असते. समाजवास्तवाच्या सखोल, नेमक्या आणि अर्थपूर्ण आकलनामधूनच कलाकृतीचा सारा डोलारा उभा असतो. समाजवास्तवाच्या संदर्भात अनेक बाबी नोंदविता येतील. एक तर साहित्यिक हा समजातच असतो. त्याच्याभोवती सारा समाज वेढून राहिलेला असतो किंबहुना लेखकाच्या बऱ्या–वाईट

घडणीसाठी भोवतीचा समाज, समाजव्यवस्था, राज्य व्यवस्था, अर्थव्यवस्था, राजकारण इ. अनेक बाबी जबाबदार असतात. लेखन हे आत्मानिपठ असते असे कितीही म्हटले किंवा लेखकाचा तो वैयक्तिक अविष्कार असतो असे म्हटले तरी त्याच्या जडणघडणीत उपरिनिर्दिष्ट साऱ्याच बाबी महत्त्वाच्या असतात. अर्थात कुठल्याही लेखकाची जडणघडण कशी झाली हे समजावून घेणे अवघड असते. म्हणून त्याच्या जडणघडणीतील अशा बाबींचे स्थान आपल्याला नाकारता यावयाचे नाही. म्हणजे भोवतीच्या समाजातून तो घडत असतो आणि तो व्यक्त करतो ते अनुभवही त्याच समाजातले असतात. त्यातून त्याला आपली भाषिक कृती सिद्ध करावयाची असते.'' (८)

लेखक हा समाजातच जन्माला येतो, लहानाचा मोठा समाजातच होतो. त्याचा पिंड समजातच घडतो. त्याच्या व्यक्तिमत्वावर, भाषेवर, विचारांवर, संस्कारांवर, शिक्षणावर या सगळयांवर समाजाचा प्रभाव असतोच. लेखक समाजातच वाढत असल्यामुळे समाजातील संस्कार, परंपरा, रूढी लोकोपचार, लोकसंस्कृती, लोककला इ. गोष्टी लेखकामध्ये कळत नकळत रूजत असतात. त्याच्या मनात साठत असतात आणि लेखन करतांना मनात झिरपलेल्या, साठलेल्या गोष्टी त्याच्या लेखनातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रकट होत असतात.

समाज-साहित्यिक-साहित्य यांचा संबंध परस्परपूरक, परस्पर सहकार्याचा व परस्परालंबी आहे. एकमेकांवर ह्या गोष्टी अवलंबून आहेत. तरीही त्या स्वतंत्रपणे जाणवतात. त्यांच स्वतंत्र अस्तित्व आहे. ज्याप्रमाणे दूध, दही, लोणी हे घटक परस्परालंबी आहेत, एकामधून दुसऱ्यांची निर्मिती होते आणि तरीही त्यांच स्वतंत्र अस अस्तित्व आहे. त्याच प्रमाणे समाज-साहित्यिक - साहित्य यांचा संबंध आहे.

लेखकाला आलेल्या अनुभवातून, त्याच्यावरील संस्कारातून, त्याच्या अवती-भोवतीच्या जगण्यातून त्याला जे जाणवते जे मनाला भिडते, प्रतिभेला आव्हान देते ते तो आपल्या लेखणीतून उतरवतो. ते उतरवत असतांना समाजातील भाषाा तो वापरतो, समाजातील अनुभव तो मांडतो, समाजातील घटना-प्रसंग तो चिचित्र करतो, समाजातील व्यक्तींचे चित्रण तो करतो, समाजवास्तव तो

मांडतो आणि हे सगळ तो समाजासाठीच करतो. म्हणून लेखक समाजात जन्मतो, समाजात साहित्यनिर्मिती करतो व ती समाजासाठीच करतो. समाजाशिवाय साहित्यिक आणि साहित्य अस्तित्वातच येत नाही. म्हणून व्यक्ती ही सामाजिक असते. समाजाशिवाय तिच अस्तित्व नाही. लेखकावर समाजाचे संस्कार असतात. त्याच्या जडण–घडणीत समाजाचा मोठा वाटा असतो व या अनुभवातूनच तो साहित्यनिर्मिती करत असतो. म्हणूनच समाजाचे पडसात साहित्यात अपरिहार्यपणे पडलेले असते. कधी ते प्रत्यक्ष तर कधी ते अप्रत्यक्ष स्वरूपात असते.

## ४.५. कादंबरीतील सामाजिकताः

कादंबरीत भोवतीच्या जीवनातील काही प्रसंग–घटना चित्रित केलेल्या असतात. जीवन–चित्रण करण्याचे काम कादंबरी करते.

''कादंबरी हे लेखकाने निर्मिलेले कल्पित रूप असते. या ठिकाणी कादंबरीतील कल्पित म्हणजे काय आणि कोणत्या अर्थाने कादंबरी हे कल्पित रूप असते हे स्पष्ट करणे उचित ठरेल. त्या आधी एक बाब लक्षात घेतली पाहिजे, ती अशी की, कादंबरीतून चित्रित होते ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन. प्रत्यक्ष जीवनातील अनेकविध घटकांच्या पसाऱ्यातून लेखक काही निवड करीत असतो. कादंबरीत चित्रित होणारे जीवन हे प्रत्यक्षातील जीवन नसते हे खरेच. परंतु ते प्रत्यक्षातील जीवनासारखे असते. जीवनाशी संवादीत असते. म्हणूनच चांगल्या कादंबरीतून आपणास जीवनवास्तवाचा प्रत्यय येत असतो कादंबरी ही लेखकाच्या मनाने काही घटना व पात्रांच्या साहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा घेतलेला एक शोध ठरतो. कोणतीही कादंबरी जीवनविन्मुख असू शकत नाही ती या अर्थाने कादंबरी हे तिच्या निर्मात्याला जीवनाचे एक भावलेले रूप असते. कादंबरीत व्यक्ती आणि व्यक्तिसंबद्ध घटनांनी युक्त अशा कथात्मतेस रूप लाभते हे खरे, परंतु व्यक्ती केवळ व्यक्ती म्हणून स्वतंत्र नसते तर ती भोवतालच्या समाजजीवनात एक घटक असते. या समाज जीवनाचा अनुबंध तोडून तिचा विचार करता येत नाही. समाज हे व्यक्तीचे अधिष्ठान असते आणि समाजाला एक इतिहास असतो. अशा रीतीने इतिहासातून प्रकटणारी सामाजिक संदर्भ अनुस्यूत असलेली व्यक्ती ही सर्व कलांची अधिष्ठायी असते.

कोणतीही व्यक्ती समाजात पूर्णांशाने विलीन होऊ शकत नाही, तशीच ती समाजेतिहासाच्या प्रवाहाशी किंवा व्यावाहारिक संदर्भाशी पूर्णांशाने फटकून राहू शकत नाही. म्हणून कादंबरीलाही आपोआपच सामाजिक परिमाण लाभते. कादंबरीत काही विशिष्ट व्यक्तीच फक्त चित्रित होत असल्या तरी त्या व्यक्ती व तत्ससंबंधी घटनांच्या माध्यमातून लेखक जीवनाविषयीच्या काही सामान्य सत्यांची प्रचिती घडवू शकतो. म्हणजे त्याचा प्रवास विशिष्ठाकडून सामान्याकडे असा असतो. या प्रवासात कादंबरीकाराचा स्वतःचा असा एक विशिष्ट दृष्टिकोन कादंबरीतील कल्पित विश्वाच्या माध्यमातून व्यक्त होत जातो. जीवनसत्यांचा त्याला जो एक भावनिक प्रत्यय आलेला असतो त्याचाच कादंबरी हा एक अविष्कार असतो.'' (९)

कादंबरी हे कल्पित रूप असले तरी या कल्पितेची निर्मिती वास्तवाच्या आधारेच वास्तवाच्या पायावर होते. बी ज्याप्रमाणे मातीत रूजते, हळूहळू मोठे होते, ते वाढत जाते. पान, फांदी, फुल, फळ अशी क्रमाक्रमाने त्याची वाढ होते. त्याचे झाडामध्ये रूपांतर होते. झाड होत असतांना जमिनीतील पोषक द्रव्ये, आवश्यक घटक, ऊन, वारा, पाऊस यांच्या आधारे झाड वाढते. फुलते, मोठे होते. रोपाचे झाडात रूपांतर होण्यात या सर्वांचा सहभाग असतो. अशीच प्रक्रिया साहित्यनिर्मितीची असते. लेखक या समाजात बीजरूपी रूजतो, वृक्षरूपी लहानाचा-मोठा होतो. समाजातील संस्कार, संस्कृती अशी पोषक द्रव्ये घेतो. आणि साहित्यरूपी फळे-फुले तो समाजाला देतो. जेवढ झाड सुदृढ-निरोगी तेवढी त्याची फळे-फुले सुंदर. त्याचप्रमाणे जेवढा लेखक सामाजातील पोषकता अंगिकारतो तेवढी पोषक त्याची कलाकृती होते.

लेखक हा समाजातील इतर व्यक्तिंपेक्षा अधिक संवेदनशील असतो. समाजात घटना घडल्यावर इतरांपेक्षा त्याच्यावर घटनेचा अधिक प्रभाव पडतो. घटनांकडे बघण्याची त्याच्याकडे वेगळी दृष्टी असते. जी सर्वसामान्य व्यक्तिंकडे नसते. या वेगळया दृष्टीमुळे, संवेदनशील वृत्तीमुळे समाजातील घटनांचे पडसाद त्याच्या मःपटलावर उमटत असतात. या घटनांमुळे त्याच्या मनात प्रश्नांचा कल्लोळ माजतो. अनेक विचार त्याच्या मनात येतात. तो अस्वस्थ होतो. आणि ही अस्वस्थता तो आपल्या

साहित्यातून प्रकट करतो. हा अनुभव प्रकट करतांनी मात्र तो तसाच्या तसा न करता त्याल कल्पनेची जोड देतो. हेच सत्य तो कल्पिताच्या माध्यमातून व्यक्त करतो.

म्हणूनच साहित्यिक आपल्या साहित्यात कोणताही विषय मांडत असला तरी, कोणत्याही प्रकारातील साहित्य असले तरी कोणत्याही प्रांतातील–भाषेतील साहित्य असले तरी त्यात समाजजीवनाचा–सामाजिकतेचा अंतर्भाव प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे असतोच. जीवनदर्शन हा कादंबरीचा हेतू असतो. त्या जीवनदर्शनात समाज, समाजातील व्यक्ती, परंपरा, संस्कृती, भाषा, राहणीमान, व्यवसाय शिक्षण, धार्मिकता, आर्थिकता, राज्यव्यवस्था, संस्था, वैचारिकता, निसर्ग इ. अनेक बाबींचा प्रत्यय कादंबरीतून येतो. म्हणूनच समाजाचे प्रतिबिंब साहित्यात पडते असे म्हणतात. याविषयी रवींद्र ठाकूर हणतात,

‘‘कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते, असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरूपाने येणे अपरिहार्य ठरते. कादंबरीत सामाजिक आशय आल्याने कादंबरीची कलात्मकता उणावते असे समजण्याचे कारण नाही. उलट सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. सामाजिक वास्तव आणि व्यक्तिगत वास्तव असा भेद करणे युक्त आणि शक्य नसते. समाजात राहूनच व्यक्ती आपल्या दर्शनबिंदूतून सामाजिक वास्तवाचा वेध घेत असते. व्यक्ती विशिष्ट सामाजिक वास्तवात जगत असते. व्यक्ती व्यक्तींचे परस्परांशी जे संबंध येतात त्यातच सामाजिकता अनुस्यूत असते. कारण व्यक्ती ही व्यक्ती म्हणून वेगळी नसून ती विशिष्ट सामाजिक वास्तवाचा भाग असते. सामाजिकतेशिवाय व्यक्तीच्या जीवनाला अर्थपूर्णता लाभत नसते. कादंबरीत व्यक्ती–कुटुंब समाज असे संबंध चित्रित होत असले तरी अंतिमतः त्यातून मानवी स्वभाव चित्रित झालेले असतात. अशा रीतीने तो मानवी मनाचा शोध ठरतो. विशिंष्टाकडून सामान्याकडे असा कादंबरीचा प्रवास असतो. तो या अर्थाने सामाजिक वास्तवापासून व्यक्तीचा वेगळा विचार करता येत नाही. म्हणून कादंबरीतील व्यक्तीच्या अनुभवांना सामाजिक अंग लाभतेच. याच अर्थाने कादंबरी समाजजीवनाचे चित्र ठरते. तसेच

कादंबरीत चित्रित झालेल्या व्यक्तीचे भावानुभव मानवजातीस मानवतेच्या पातळीवरून समान असतात. म्हणूनच कादंबरीतील व्यक्ति विशिष्ट अनुभव विश्वात्म पातळीवर जातात.'' (१०)

कादंबरीत त्या-त्या काळातील जीवनचित्रण केले जाते. कादंबरीत जरी कथानक पात्रे काल्पनिक असली, तरी वास्तवाच्या आधारेच ती निर्माण केली जातात. वास्तव जीवनातून घटना-प्रसंग, पात्र यांची निवड करून लेखक त्याला कल्पनेच्या सहाय्याने रंगवत असतो. म्हणूनच कादंबरी ही सामाजिक असते. सामाजिकता कादंबरीत कुठे ना कुठे, या ना त्या स्वरूपात पहायला मिळतेच. आणि ज्या कांदबऱ्यांमध्ये समाजातील वास्वता वर्णन केलेली असते त्या कादंबऱ्यांना उच्च दर्जा प्राप्त होतो. लेखक आजूबाजूच्या अनुभवांमधूनच पात्रनिर्मिती कथानक, घटनाप्रसंग, स्वभावातील कंगोरे, व्यक्तींचे परस्परसंबध, मनोव्यापाराच्या घडामोडी इ. गोष्टींचा कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष अनुभव घेऊन त्याला कल्पनिकतेची जोड देऊन तो लेखन करीत असतो. म्हणजे समाजातील समाजिकतेचा प्रभाव साहित्यात पडतो. या विषयी डॉ. अंजली सोमण म्हणतात,

''कलावंताचे स्वातंत्र्य, कलाकृतीची स्वायत्तता इत्यादी प्रश्नांची चर्चा वाङ्मयीन वर्तुळात वेळोवेळी होत असली तरी अस्सल आणि श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय हस्तीदंती मनोऱ्यात किंवा समाजव्यवहारापासून दूर असलेल्या निर्वात पोकळीमध्ये निर्माण होत नाही. वाङ्मयीन व्यवहाराची पाळेमुळे नेहमीच सामाजिक व्यवहारात रूजलेली असतात. साहित्यकार सर्वसामान्य माणसापेक्षा अधिक संवेदनशील आणि चिंतनशील असतो. याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. पण तरीही साहित्यकाराचा संवदेनस्वभाव घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या भाषेतील वाङ्मयीन परंपरा मोठया प्रमाणात कारणीभूत असतात हे विसरून चालणार नाही. व्यक्तिविशिष्टता आणि सामाजिक परिस्थिती यांच्या संयोगातून साहित्यकाराची जीवनजाणीव घडत असते आणि त्याच्या लेखनाला ती विशिष्ट रूप देत असते.'' (११)

## ४.६. मराठी कादंबऱ्यांमधील सामाजिकताः

प्रत्येक कादंबरीमध्ये प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे, कधी मोठया प्रमाणात, तर कधी कमी प्रमाणात सामाजिकता असतेच. काही कादंबऱ्या ह्या केवळ सामाजिक समस्या प्रश्न, समाजातील स्थिती मांडत असतात. त्यामध्ये समाजातील वास्तवता असते. त्यात समाज सामावलेला असतो. मराठीतील पहिली सामाजिक कांदबरी म्हणजे 'यमुनापर्यटन' यात विधवा स्त्रियांच्या जीवनाची शोकांतिका मांडलेली आहे. त्या काळातील समाजात विधवांची स्थिती दयनिय होती, विधवा रूढी, परंपरांच्या कचाटयात होत्या. समाजातील व्यक्तींकडून त्यांचे शोषण होत होते. त्यांच्यावरील अन्यायाचे, त्यांच्या दुःखमय जीवनाचे वास्तव चित्रण 'यमुनापर्यटन' मध्ये बाबा पद्मनजी यांनी केलेले आहे.

काही लेखक समाजाचाच घटक असल्यामुळे समाज त्याच्या लेखनात कुठेना कुठे येतोच. समाजाचा त्याच्या मनावर, व्यक्तिमत्त्वावर, संस्कारांवर, भाषेवर प्रभाव पडलेला असतो. आणि हा प्रभाव त्याच्या लेखनात उतरत असतो. म्हणून केवळ सामाजिक विषयांवरील, समस्या-प्रश्नांवरील कादंबरीतच सामाजिकता आढळते असे नाही, तर प्रत्येक कादंबरीत एक समाज असतो, त्या समाजातील व्यक्ती, संस्था, परंपरा असतात .

समाजातील घटना-प्रसंगाचे पडसाद साहित्यात पडत असतात. हरिभाऊ आपटे यांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये सामाजिक प्रश्न पोटतिडकीने मांडले. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांमध्ये सामाजिकता अधिक जाणवते. 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीत यमूचे दुःख हरिभाऊंनी मांडले. यानंतर वा.म. जोशी व श्री. व्यं. केतकर यांच्या कादंबऱ्यांतही सामाजिक भान व्यक्त होते. स्त्रियांचे प्रश्न त्यांनी वास्तवतापूर्ण मांडलेले आहेत.

र.वा. दिघे आणि ग.ल ठोकळ यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण वास्तव मांडले. ग्रामीण जीवन, तेथील निसर्ग, घटना त्यांनी मांडल्या. वि.स. खंडिकरांनी मध्यमवर्गीय जीवनातील समस्या, प्रश्न, आपल्या कादंबऱ्यांतून मांडले.

१९५० नंतर कादंबरी अधिक सामाजिक होत गेली. अस्सल सामाजिकता तिच्यात उतरत होती. कल्पनेला फाटा देऊन समाजातील सर्वसामान्य वास्तव नायक त्यात दिसू लागला. विभावरी शिरूरवारांची 'बळी' या कादंबरीत तळागळातील माणसाचे जीवन मांडलेले आहे. 'बनगरवाडी' मधून व्यंकटेश माडगुळकरांनी धनगरांचे वास्तवतापूर्ण जीवन व्यक्त केले आहे. राजाराम सौंदणीकर मास्तर गावात येतात. शाळा सुरू करतात. गावातील लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न करतात. हमीद दलवाई यांच्या 'इंधन' या कादंबरीतून हिंदू-मुस्लिम दंगलीमुळे सर्वसामान्यांचे जनजीवन कसे विस्कळीत होते, समाजात कसे ताण-तणव निर्माण होतात याचे चित्रण आहे.

१९६० नंतर कादंबरी अधिक समाजभिमुख होत होती. 'धग' या कादंबरीत उद्धव शेळके यांनी ग्रामीण समाज जीवन मांडले. शिंपी असणारा हतबल महादेव आणि हिम्मतबाज त्याची बायको कौतिक अशा दोघांच्या जीवनाची गोष्ट यात आहे. कौतिक काबाडकष्ट करणारी, धीराची, नवऱ्यावर प्रेम करणारी, मुलांवर माया करणारी अशी ती खंबीर असते. मात्र महादेव हा धडाडीचा नसतो. त्यामुळे त्यांच्या संसारावर अनेक संकट येतात. यात कौतिकाची होरपळ होते. ही कादंबरी सामाजिक वास्तव मांडणारी आहे.

भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी सर्वसामान्य माणसाचे वास्तव चित्रण करते. यात पांडुरंग सांगवीकराच्या भकास जीवनाचे चित्रण आहे. भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या इतर 'झूल', 'बिढार', इ. कादंबऱ्यांतून समाजचित्रण केलेले आहे.

फकिरा (अण्णाभाऊ साठे) टारफुला (शंकर पाटील) या कादंबऱ्यांमध्ये नव्या काळाचे संदर्भ आहेत. यात ग्रामीण जीवनातील संघर्ष, दुःख आहे. नां.धो. महानोरांच्या 'गांधारी' या कादंबरीत स्वातंत्र्य संग्रामाचे संदर्भ आहेत. रणजित देसाई यांच्या 'बारी' आणि 'माझा गाव' या कादंबऱ्यात अनुक्रमे एका विशिष्ट समाजाचे चित्रण केले आहे. आणि 'माझा गाव' मधे ग्रामीण गावाची रचना कशी काळानुसार कोलमडते याचे वर्णन आहे.

दलित कादंबऱ्यांमधून दलितांचे उपेक्षित जीवन वास्तवपणे आणि स्वानुभवातून मांडलेले आहे. 'सूड' (बाबुराव बागुल), 'हाडकी हाडवळ' (नामदेव ढसाळ), 'हकिगत आणि जटायू' (केशव मेश्राम), 'अजून उजाडायचे आहे' (माधव कोडविलकर), 'शूद्र' (सुधाकर गायकवाड), इ. कादंबऱ्यामधून स्त्रीच्या दास्याचे वर्णन, बौद्धकालीन समाज, दलित जगणे अवहेलना, घुसमट, तिरस्कार इ. दतिलांच्या समस्या व्यक्त केलेल्या आहे.

आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीत ग्रामीण जीवनात यांत्रिकीकरणामुळे होणारे परिणाम नाराबा या व्यक्तीरेखेमार्फत वर्णन केले आहे.रा.रं. बोराडे यांच्या 'पाचोळा कादंबरीत शिंप्याच्या जीवनातील चढउतार चित्रित केलेले आहे. 'चारापाणी', 'सावट' या त्यांच्या कादंबऱ्यांत दुष्काळी परिस्थितीचे वर्णन केलेले आहे. 'आमदार सौभाग्यवती' या त्यांच्या कादंबरीत राजकीय सत्तेच्या हव्यासापोटी, लालसेपोटी माणसे नातेसंबंध विसरतात. असे राजकारणातील वास्तव चित्रण केलेले आहे.

अरूण साधू यांनी आपल्या 'मुंबई दिनांक' , 'सिंहासन', 'मुखवटा', या कादंबऱ्यांतून राजकारणातील डावपेच, कुरघोडी, स्वार्थ, भ्रष्टाचार इ. गोष्टी वास्तवपणे मांडल्या.

स्त्रीजीवनाचे दुःख, समस्या, कोंडी, घुसमट, स्त्रियांचे विचार, इ. गोष्टी स्त्री कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत अनुभवातून व्यक्त केल्या. आशा बगे, गौरी देशपांडे, सानिया मेघना पेठे, कविता महाजन, प्रतिमा इंगोले इ. लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये स्त्री जीवनाचे दाहक अनुभव व्यक्त केले आहे.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'गांधारीचे डोळे', 'मध्यरात्र', 'उलट चालिलो प्रवाह' इ. कादंबऱ्यांमधून समाजात वावरतांना समस्यांना तोंड देतांना सर्वसामान्य माणूस दैनंदिन झगडतो याचे वास्तव चित्रण केले आहे.

ग्रामीण बदलाचे वर्णन अतिशय वास्तवतेने विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' या कादंबरीत केलेले आहे. विकासासाठी प्रकल्प उभे राहतात, येतात मात्र यात गावेच्या गावे विस्थापित होतात. उध्वस्त

होतात याचे अतिशय वास्तव चित्रण विश्वास पाटील यांच्या ‘झाडाझडती या कादंबरीत केलेले आहे. असाच विषय त्र्यंबक असरडोहकर यांच्या ‘काळी आई’ या कादंबरीतही आलेला आहे.

रंगनाथ पठारे यांनी आपल्या ‘हारण’, ‘दुःखाचे श्वापद’ या कादंबऱ्यांत राजकारणातील स्वार्थी, भ्रष्टाचारी व्यवस्थेचे वर्णन केलेले आहे. वासुदेव मुलाटे यांच्या ‘विषवृक्षाच्या मुळया’ या कादंबरीत सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे चित्रण केलेले आहे. राजन गवस यांच्या ‘चौंडक’, ‘भंडारभोग’ या कादंबऱ्यात देवदासी स्त्रीच्या जीवनातील दुःख, प्रश्न यांचे चित्रण केलेले आहे.

बाबाराव मुसळे यांच्या ‘हल्या हल्या दुध दे’, ‘पखाल’, या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रण केलेले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील रोजचे प्रश्न, मालाला भाव नाही, अगणित काबाडकष्ट, कुटुंबातील प्रश्न, कर्जबाजारीपणा इ. समस्यांमुळे शेतकरी आत्महत्येकडे वळतो. शेतकरी जीवनातील अनंत दुःख मुसळे यांनी चित्रित केलेले आहे.

सदानंद देशमुख यांनी ‘तहान’, ‘बरोमास’ या कादंबऱ्यांमधून ग्रामीण शेतकरी जीवनातील समस्या मांडलेल्या आहेत. ‘तहान’ मध्ये ग्रामीण भागातील पाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे चित्रण आहे. तर ‘बारोमासमध्ये’ बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, भ्रष्टाचार इ. रोजच्या जगण्यातील संघर्ष वास्तवपूर्ण वर्णन केलेला आहे.

अशा प्रकारे मराठी कादंबरीत समाजचित्रण होत आहे. मध्यमवर्गीयांचे चित्रण, स्त्रीयांच्या समस्यांचे चित्रण, दलितांचे उपेक्षित जीवन, समाजातील घडामोडींचे पडसाद, ग्रामीण वास्तव, राजकारणातील वास्तव, समाजातील रूढी-परंपरा, विस्थापिताचे चित्रण इत्यादी समाजातील सर्वांगिण सामाजिकता मराठी कादंबऱ्यांतून चित्रित झालेली आहे.

कादंबरीतील (१९६० नंतर) समाजिकता याविषयी नागनाथ कोत्तापल्ले लिहितात,

‘‘१९६० नंतरच्या कालखंडात ऐतिहासिक, राजकीय या दोन्ही अनुभव क्षेत्राच्या दृष्टीने मराठी कादंबरीत विविध प्रयोग झाले. एका नव्या जोमाने आणि नव्या जाणिवेने कादंबरीचे क्षेत्र बहरून आले. या कालखंडातील सामाजिक कादंबरीही विविध रूपे घेऊन अवतरली. अगर असे म्हणता येईल की

सामाजिक वास्तवाचे भान या कालखंडातील कादंबरीने फार चांगल्या रितीने प्रकट कले. सामाजिक वास्तवाची विविध रूपे या कालखंडातील कादंबरीने आकळिली....

सामाजिक वास्तव आकाराला येते ते अनेकविध घटकांमधून. त्यामुळे शिक्षण, संस्कृती, सामाजिक प्रश्न, त्यासाठीच्या चळवळी, राजकारण आणि अर्थव्यवस्था या साऱ्यांच्याच रेटयामधून आणि ताण्याबाण्यातून सामाजिक, वास्तव आकाराला येत असते. अर्थकारणाचा आणि राजकारणाचा हे सामाजिक वास्तव घडविण्यास फार मोठा वाटा असतो.'' (१२)

समाजातील वास्तव कादंबरीकार आपल्या कादंबऱ्यांमधून चित्रित करत असतो. कादंबऱ्यातील सामाजिकता याविषयी तानाजी राऊ पाटील म्हणतात,

''मराठी कादंबरी अधिकाधिक समाजाभिमुख होत आहे. महाराष्ट्रातील खेडयापाडयातील माणसांचे जीवन तिच्यातून व्यक्त होत आहे. महाराष्ट्राचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचे सम्यक चित्रण आज मराठी कादंबरीतून घडत आहे.'' (१३)

## ४.७. विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांच्या सामाजिक अभ्यासाचे मुद्देः

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास म्हणजे विश्वास पाटील यांच्या कांदबऱ्यांमध्ये चित्रित झालेल्या समाजजीवनाचा अभ्यास करायचा आहे. कादंबरीत आलेले समाजजीवन साधारणतः कोणत्या काळातील आहे, त्या काळातील समाजजीवन कसे होते? त्या समाजातील स्त्रियांची स्थिती, राजकीय स्थिती, आर्थिक स्थिती, रूढी-परंपरा, धार्मिक स्थिती, पोषाख-दागदागिने, शैक्षणिक स्थिती, सण-समारंभ, भ्रष्टाचार, कुटुंब संस्था, भाषा, व्यवसाय, न्याय व्यवस्था, अंधश्रद्धा समाजातील समस्या इत्यादी समाजजीवनातील गोष्टींचा अभ्यास करणे. (जातिव्यवस्था, श्रद्धा, अंधश्रद्ध, दंतकथा)

### १) स्त्रियांची स्थितीः

कादंबऱ्यांमध्ये चित्रित केलेल्या समाजजीवनातील स्त्रियांची स्थिती कशी होती? याचा अभ्यास या मुद्दयात करायचा आहे. स्त्रियांचे शिक्षण, त्यांचे विचार, त्यांच्या कृती, राहणीमान, त्यांची आर्थिक स्थिती, त्यांचे समाजातील स्थान, त्यांची भाषा, त्यांनी प्रस्थापित केलेले विविध नातेसंबंध, त्यांची वृत्ती, त्यांच्या विविध भावना, त्यांचे स्वातंत्र्य, प्रसंगाला तोंड देण्याची त्यांची पद्धत इत्यादी बाबींचा अभ्यास या मुद्दयात करायचा आहे.

२) **राजकीय स्थिती**ः

कादंबरीतील समाजजीवनातील राजकीय स्थिती कशी होती? याचा अभ्यास या मुद्दयात करायचा आहे. समाजजीवनात राजकीय कारभार कसा होता, राज्यकारभाराचे स्वरूप कसे होते, कोणकोणत्या संस्था, यंत्रणा राज्यकारभारात सहभागी होत होत्या, त्या कसा कारभार करत होत्या. त्यांचे कामकाजाचे स्वरूप कसे होते. राज्यकारभारात कोणते पद होते, ते पदाधिकारी कसे कामकाज करत होते. समाजातील शासनयंत्रणा कशी होती, राजकारणाचे स्वरूप कसे होते. अशा राजकीय स्थितीशी संबंधित गोष्टींचा अभ्यास या मुद्दयात येतो.

**३) आर्थिक स्थितीः**

या मुद्दयात समाजातील शासनाची आणि व्यक्तीची आर्थिक स्थिती कशी होती याचा अभ्यास करायचा आहे. आर्थिक व्यवहार करण्याचे स्वरूप, उत्पन्नाचे साधन, आर्थिक नियोजन, पैशांची आवक आणि जावक होणाऱ्या गोष्टी, आर्थिक परिस्थितीमुळे समाजात होणारी वर्गवारी, पैशाअभावी समाजातील दारिद्र्य, पैशाअभावी व पैशामुळे समाजात निर्माण होणाऱ्या समस्या, पैसा मिळविण्याचे नैतिक, अनैतिक मार्ग इत्यादी आर्थिक गोष्टीशी संबंधित असणाऱ्या गोष्टींचा अभ्यास या मुद्दयात करायचा आहे. समाजजीवनातील व्यवसाय कोणते होते. याचाही अभ्यास यात करायचा आहे.

''अर्थव्यवस्थाः- समाजातील सर्व आर्थिक व्यवहार संघटित करणाऱ्या संस्था, संघटना आणि परंपरा यांच्या समुच्चयाला अर्थव्यवस्था म्हणतात.''(१४)

**४) रूढी-परंपरा-प्रथाः**

''प्रत्येक समाजातील जीवन पद्धतीची उपयुक्त व इष्ट ठरलेले आणि संमत होत गेलेल्या आचार-विचारांची अलिखित प्रथा म्हणजे परंपरा. समाजाच्या धारणेनुसार परंपरा बदलत असते. या परंपरेत अनेक आचार-विचार असतात. परंपरेतील संकेतानुसार समाज बांधला गेलेला असतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने परंपरेनुसार वर्तन करावे असा अलिखित संकेत असतो. अशी ही परंपरा एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वाङ्मयीन रीत्या किंवा मौखिक रीत्या संक्रमित होत जाते. कालौघात काही नवीन परंपरा त्यात मिसळतात.''(१५)

समाजात रूढ असणाऱ्या, समाज पालन करत असलेल्या रूढी-परंपरा-प्रथांचा अभ्यास या मुद्दयात करायचा आहे.

''रूढीः परंपरागत अनुकरण होत गेलेल्या आणि समाजातील विविध गटांमध्ये दृढमूल झालेल्या प्रथा अगर वर्तनप्रकार म्हणजे रूढी. आचरणात आणले जाणारे विविध संकेत, आचार-विचार, ज्ञान, हस्तकौशल्य आणि जीवनात उपयुक्त ठरणारी विविध साधने यातील बदलानुसार रूढींचा स्वरूपात ही बदल होत जातात.'' (१६)

**५) धार्मिक स्थितीः**

शब्दकोशात धर्म म्हणजे शास्त्रविहित कर्म असा अर्थ दिलेला आहे. आणि धर्मकार्य म्हणजे- पुण्य जोडणारे किंवा परोपकाराचे काम. असा अर्थ दिलेला आहे.

समाजजीवनात कोणकोणते धर्म होते, त्या धर्माचे स्वरूप कसे होते. समाजात-धर्माचे स्थान कसे होते? धर्माचे आचरण कोण व कसे करत होता, धार्मिक विधी कोणते व ते कसे पार पाडते जात होते, धार्मिक श्रद्धा कोणत्या या सर्वांचा अभ्यास या मुद्दयात करायचा आहे.

**६) पोषाख व दागदागिने -**

दागदागिनेः समाजजीवनातील व्यक्ती कोणकोणते दागिने-अलंकार, पोषाक-पेहराव परिधान करतात. प्रत्येक काळाचा, भौगोलिक भिन्न प्रदेशाच्या पेहरावात फरक असतो. व्यक्तिंच्या पेहरावावरून

त्याची आर्थिक, सामाजिक स्थिती-लक्षात येऊ शकते. पेहरावावरून व्यक्तीचा धर्मही लक्षात येऊ शकतो.

७) **शैक्षणिक स्थितीः**

समाजजीवनात शिक्षणाची स्थिती कशी आहे, शिक्षणाच्या पद्धती कोणत्या, शिक्षणाचा दर्जा, शिक्षक वर्ग, विद्यार्थी, अभ्यासक्रम इत्यादी गोष्टींचा अभ्यास या मुद्द्यात येतो. समाजात साक्षरतेचे, निरक्षरतेचे प्रमाण कसे आहे, समाजात शिक्षणाचे महत्त्व आहे का? शिक्षणसंस्था कशा काम करतात, शिक्षणामुळे समाजात बदल होतात का? ते कोणते? अशिक्षितपणाचे तोटे कोणते असतात याचा आढावा या समाजजीवनातील शैक्षणिक स्थिती यात घेतला गेला आहे.

८) **सण-समारंभ-उत्सवः**

समाजजीवनात सण-समारंभ-उत्सव हे साजरे केले जातात. प्रत्येक धर्मात वेगवेगळे सण-समारंभ असतात व ते साजरे करण्याची पद्धती ही वेगवेगळी असते. अशा सण-उत्सव-समारंभाला प्रथा-परंपरेचे अधिष्ठाण लाभलेले असते. समाजजीवनात सण-समारंभ उत्साहाने आणि हौसेने साजरे केले जातात. सण-उत्सवामुळे समाजात चैतन्य निर्माण होते.

९) **कुटुंब संस्थाः**

सामजजीवनात कुटुंब संस्था ही महत्त्वाची संस्था आहे.

''कुटुंबसंस्था ही मानवी समाजातील अत्यंत महत्त्वाची व मूलभूत स्वरूपाची संस्था आहे. अगदी मर्यादित अर्थाने पती-पत्नी व त्यांची मुले यांचा एकनिवासी गट म्हणजे कुटुंब. मालमत्ता, मिळकत खर्च आणि सभासदांच्या एकमेकांबद्दलच्या जबाबदाऱ्या सामाईक असतात.

भूक, तहान, निवारा, कामवासना, प्रजोत्पत्ती या मानवाच्या मूलभूत प्रेरणा असून त्यामधून निर्माण झालेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी माणसांची अत्यंतिक धडपड चालू असते. स्त्री पुरूषांनी सहकार्य केल्याशिवाय या गरजांची पूर्तता होऊ शकत नाही. अशा सहकार्यामुळेच स्त्री-पुरुषांमधील परस्परालंबित्व सतत चालत आलेले आहे व त्यातूनच समाजात कुटुंबव्यवस्था विकास पावलेली आहे.

कुटुंबाची कार्ये–प्रजोत्पादन, अपत्यसंगोपन, व्यक्तीचा दर्जा निश्चित करणे, समाजाची संस्कृती, कौटुंबिक परंपरा दुसऱ्या पिढीला देणे, भावनिक व मानसिक आधार देणे सदस्याला, श्रमविभागणी, शेजाऱ्यांची सौख्याने वागणे, आर्थिक जबाबदारी पार पाडणे, वृद्ध–अपंगांचा सांभाळ धार्मिक कार्य, कुटुंबियांचे आपत्काळात संरक्षण करणे.''(१७)

समाजातील कुटुंबसंस्था कशी आहे, त्यातील नातेसंबंध कोणकोणते आणि कसे आहेत याचा अभ्यास या मुद्द्यात केलेला आहे.

१०) **भ्रष्टाचारः**

''सार्वजनिक क्षेत्रात सोपविलेल्या अधिकाराचा दुरूपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी व फायदयासाठी करणे याला स्थूल मानाने 'भ्रष्टाचार' म्हणता येईल. अधिकरावरील व्यक्ती कडून आपल्या खाजगी हितासाठी बेकायदेशीर गोष्टी केल्या जातात. यालाही भ्रष्टाचार म्हणतात.'' (१८)

समाजजीवनात विविध संस्थातील, यंत्रणेतील अधिकारी व्यक्तींकडून भ्रष्टाचार केला जातो. तो कोण करतात का करतात, कशा स्वरूपात करतात याचा आढावा या मुद्द्यात घ्यायचा आहे.

**११) न्यायव्यवस्थाः**

''कायदयाचा अर्थ लावून निवाडा देणे. कायदयाचा अर्थ लावणे, घटनेचा अर्थ लावणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी कामे न्यायमंडळ करते.'' (१९)

समाजात कायदा–सुव्यवस्था राखण्याचे काम न्याय मंडळ करत असते. समाजउपयोगी, समाजहिताचे कायदे करते. या कायदयांचा अर्थ, समाजातील लोकांच्या न्यायसमस्या वकील सोडवतात. वकील समाजाला न्याय मिळवून दयायला मदत करतात. त्याबदल्यात ते मोबदलाही घेतात.

१२) **जातिव्यवस्थाः**

''ज्यांचे कुलगोल, आचारधर्म ज्ञात आहे अशा व्यक्तींचा समूह म्हणजे जात.'

रिस्लेची व्याख्याः पुराण काळातील दैवी अथवा मानवी पूर्वजांचा वंशज म्हणून सांगणारा परंपरागत एकच व्यवसाय करणारा, समाजधुरीणांनी एकजिनसी मानेला विशिष्ट (जातिवाचक) नाव धारण करणारा अनेक कुटुंबांचा गट म्हणजे जात.'' (२०)

समाजाजीवनात जातिव्यवस्था अस्तित्वात असते. विविध जाती-जमातीतून समाज तयार होतो. आता जातिव्यवस्था शिथिल झालेली आहे. समाजात विविध जातीचे लोक सहकार्याने राहतात. प्रत्येक जातीचे धार्मिक विधी, परंपरा वेगवेगळया असतात.

१३) **श्रद्धा-अंधश्रद्धा**ः

समाजजीवनात श्रद्धा-अंधश्रद्धा पहायला मिळतात. अज्ञानामुळे, अशिक्षितपणामुळे व्यक्ती अंधश्रद्धेला बळी पडतात. शिवाय मानवी प्रयत्न जिथे संपतात, हात टेकतात तिथे अंधश्रद्धा शिरकाव करते. समाजजीवनातील श्रद्धा-अंधश्रद्धा यातील रेषा अंधूक आहे. त्यामुळे त्या कादंबरीतील समाजातील लोक श्रद्धा म्हणूनच ह्या सर्व गोष्टी करतात. अंगारे-धुपारे, जादूटोणा, लिंब भारणे. अशा गोष्टी समाजात घडतात.

''जादूटोणा- निसर्गबाह्या साधनांच्या सहाय्याने निसर्गक्रम आपल्या ताब्यात ठेवता येतो व त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे या समजूतीने केलेल्या कृतींना व प्रयोगांना जादूटोणा म्हणतात. परंपरा व रूढी यांना चिकटून बसलेल्या समाजामध्ये जादूटोण्याच्या व अतिमानवी शक्ती असलेल्या व्यक्ती अस्तित्वात असल्याबद्दल रोगराई, अन्याय, दुर्देव, मृत्यू यांचे कारण सापडते. असा त्या समाजातील लोकांचा विश्वास असतो. ही अंधश्रद्धा.'' (२१)

१४) **दंतकथा-लोककथा**ः

समाजात दंतकथा-लोककथा पसरलेल्या असतात. या कथा परंपरागत असतात. मौखिकतेतून त्या कथा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्या संक्रमित होत असतात. या कथांवर समाजाचा विश्वास असतो, श्रद्धा असते.

“निवेदन, बातमी, लोकवार्ता म्हणजे स्थानिक, ऐतिहासिक आख्यायिका इतिहासाचा धागा असलेली लोककथा. आणि लोककथा म्हणजे ज्याचा कुणी कर्ता नसतो अशी मौखिक परंपरेने चालत आलेली निवेदनप्रधान गदय गोष्ट म्हणजे लोककथा होय. यात दंतकथा, परीकथा, पुराणकथा, नवलकथा हास्यकथा, वीरकथा इत्यादींचा समावेश होतो.” (२२)

१५) **भाषाः–**

कादंबरीमधील समाजजीवनात वेगवेगळी किंवा एकच भाषा वेगळया प्रकारे बोलणाऱ्या व्यक्ती, समाज असतो. समाजात बोलल्या जाणाऱ्या भाषेवरून त्या समाजाची शैक्षणिक, सामजिक, आर्थिक, वैचारिक स्थिती लक्षात येते. त्यांच्या भाषेवरून त्या व्यक्तीचा स्वभाव, वृत्ती, अनुभव, कष्ट, दुःख, दारिद्रय, अहंकार, प्रेम हे सर्व समजते. भाषेवरून समाजाची संस्कृती समजते व समाजजीवनातील भाषाा हे महत्त्वाचे अंग आहे.

## ४.८. संदर्भः–

१) संपा. प्रभा गणोरकर आणि इतर, ''वाङ्मयीन सज्ञा संकल्पना कोश,'' भटकळ फाऊंडेशन प्रकाशन मुंबई, २००१, पृ.क्र.३९५, ३९६.

२) संपा. नागनाथ कोत्तापल्ले, ''साहित्य आणि समाज,'' प्रतिमा प्रकाशन पुणे, २००७, पृ.क्र.२०,२१.

३) डॉ. रवींद्र ठाकूर, ''मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा'', दिलीपराज प्रकाशन पुणे, २००७ पृ.क्र.१८.

४) संपा. नागनाथ कोत्तापल्ले, उनि. पृ.क्र.१८.

५) श्रृती वडगबाळकर ''मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास,'' श्रीविद्या प्रकाशन पुणे, २००६, पृ.क्र.३.

६) संपा. गर्गे आणि इतर, ''भारतीय समाजविज्ञान कोश,'' समाजविज्ञान मंडळ पुणे, १९८९, पृ.क्र.४६३.

७) डॉ. रवींद्र ठाकूर, उनि., पृ.क्र.१८,१९,२०.

८) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, ''साहित्याचा अन्वयार्थ,'' मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, १९९६, पृ.क्र.४.

९) डॉ. रवींद्र ठाकूर, उनि. पृ.क्र.५८, ५९.

१०) डॉ. रवींद्र ठाकूर, उनि., पृ.क्र.६१.

११) डॉ. अंजली सोमन, ''साहित्य आणि सामाजिक संदर्भ'', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००५, पृ.क्र.५६, ५७.

१२) नागनाथ कोत्तापल्ले, ''साहित्याचा अन्वयार्थ'', उनि., पृ.क्र.११६, ११७.

१३) डॉ. तानाजी राऊ पाटील, ''मराठी कादंबरीः समीक्षा'', २००९, पृ.क्र.८.

१४) स.मा. गर्गे आणि इतर, ''भारतीय समाजविज्ञान कोश खंड-१'', समाजविज्ञान मंडळ पुणे, १९८६, पृ.क्र.८८.

१५) तत्रैव, पृ.२१०.

१६) तत्रैव, पृ.२५२.

१७) तत्रैव, खंड-२, पृ.३०१, ३०२.

१८) तत्रैव, खंड–३, पृ.३९५.

१९) तत्रैव, पृ.१३५.

२०) तत्रैव, खंड–१, पृ. ५११.

२१) तत्रैव, खंड–२, पृ.५१८, ५१९

22) प्रभा गणोरकर व इतर, ''वाङ्मयीन सज्ञा संकल्पना कोश'', भटकळ फाऊंडेशन मुंबई, २००१, पृ.२२७, ३४२.

**प्रकरण पाचवे**

# पांगिरा कादंबरीतील समाज जीवन

अनुक्रमणिका


५.१ प्रस्तावना

५.२ ग्रामीण कादंबरी

५.३ ग्रामीण रूढी–परंपरा–प्रथा

५.४ 'पांगिरा' तील राजकारण आणि भ्रष्टाचार

५.५ 'पांगिरा' तील स्त्री –जीवन

५.६ 'पांगिरा' सण – समारंभ – उत्सव

५.७ 'पांगिरा' तील पोषाख – दागदागिने

५.८ 'पांगिरा' तील आर्थिक स्थिती

५.९ 'पांगिरा' तील धार्मिक स्थिती, श्रध्दा–अंधश्रध्दा, आणि दंतकथा

५.१० 'पांगिरा' तील भाषा

५.११ 'पांगिरा' तील बदलते समाजजीवन (ग्रामीण बदल)

५.१२ 'पांगिरा' तील लोककला – तमाशा

५.१३ 'पांगिरा ' तील न्यायव्यवस्था वकिली व्यवसाय

५.१४ ' पांगिरा' तील कुटुंब संस्था

५.१५ ' पांगिरा' तील शैक्षणिक स्थिती

५.१६ समरोप

५.१७ संदर्भ

## ५.१ प्रस्तावना

प्रत्येक साहित्यात समाज जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असतेच. कधी ते जास्त प्रमाणात असते, तर कशी कमी. या प्रकरणात 'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीतील समाजजीवनाचा आढावा घेणार आहोत. ग्रामीण परिसरातील समाजजीवन शहरी समाजजीवना पेक्षा कितीतरी वेगळे असते. ग्रामीण जीवनाचा शेती, अवजारे, शेतीची कामे, जनावरे, बलुतेदार पाऊस - काबाडकष्ट या गोष्टींशी सततचा संबंध असतो. ग्रामीण समाजातील सण - समारंभ, जत्रा, निसर्ग, दैवत, धार्मिक विधी, कीर्तन- भजन, प्रथा - परंपरा, श्रध्दा - अंधश्रध्दा, पोषाख, राहणीमान, पाहुणचार, बलुतेदारी विविध जाती - धर्म, व्यवसाय या सगळ्यांचा समावेश ग्रामीण समाजजीवनात होतो. भौगोलिक परिसरानुसार यांत कमी - अधिकता जाणवते. ग्रामीण समाजाचा आपल्या शेतावर, पिकांवर आणि जनावरांवर खूप जीव असतो. आपल्या मुलांची जशी काळजी घेतात त्याप्रमाणे ग्रामीण समाज या गोष्टींची काळजी घेतो. जीव ओतून मेहनत करतो. ग्रामीण जीवन काबाडकष्टांचे, अनेक समस्यांचे असते. मात्र यातही तेथील समाज गुण्यागोविंदाने न तक्रार करता नांदतो.

पावसाळा सुरू झाला की शेतकऱ्यांची गडबड धांदल सुरू होते. कारण नवनिर्मितीचा तो महत्त्वाचा हंगाम असतो. शेतीची मशागत, पेरणी, बियांच अंकुरण, पिकांची काळजी, त्याला तळहाताच्या फोडाप्रमाणे वाढवणे. मग पीक काढणे, त्याची साठवणूक आणि मग त्याची विक्री अशा क्रमाने शेतकऱ्यांना काम करावे लागते. या कामात त्यांची घरधणीन, स्त्री त्यांना बरोबरीने मदत करते. ती कष्टाचीच प्रतिमा आहे. शेतीकाम घरकाम, मुलं, सासूरवास ही सगळी कामे ती लिलया - कौशल्याने पार पाडते. अशा या ग्रामीण परिसरावर, ग्रामीण जीवनावर जी कादंबरी आधारित आहे, ज्या कादंबरीत ग्रामीणता प्रत्ययाला येते. त्या कादंबरीला ग्रामीण कादंबरी म्हणावयास हरकत नाही.

जसजसा काळ पुढे सरकतो, तसतसे बदल सगळयाच गोष्टींमधे होत असतात. पूर्वीच्या ग्रामीण जीवनात बदल घडत आहेत. त्याला अनेक कारणे आहेत. यांत्रिकीकरण, शिक्षण, योजना, निसर्ग, राजकारण अशा अनेक गोष्टींमुळे ग्रामीण समाजजीवन बदलत आहे. ग्रामीण समाजजीवन ज्याप्रमाणे बदलत आहे. त्याप्रमाणे ग्रामीण साहित्यही बदलत आहे.

विश्वास पाटील यांची 'पांगिरा' ही ग्रामीण कादंबरी आहे. यात बदलत जाणारे खेडे गावावर आलेले पाण्याचे संकट, राजकारणाची घसरत जाणारी पातळी, एकच कुटुंबपध्दतीला बसणारे तडे, नातेसंबंधात आलेला कोरडेपणा, सरकारी योजना, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांचे काबाडकष्ट, निसर्गाचा लहरीपणा, कोर्टकचेऱ्या, धनदांडग्यांचे राज्य, जाती - पाती, या साऱ्यांची कहाणी 'पांगिरा'त मांडण्यात आलेली आहे. यांत्रिकीकरणामुळे, शहरीकरणामुळे, शिक्षणामुळे, सरकारी योजनांमुळे, राजकरणामुळे एक संपन्न खेडे कशा प्रकारे बदलत जाते. पाण्याचा गैरवापर जंगलतोड यामुळे संपन्न खेडे लयाला जाण्याचा प्रवास 'पांगिरा' त पहायला मिळतो.

'पांगिरा' त मुख्यत्वे गग्रामीण समाजजीवनाची मांडणी केलेली आहे. त्यामुळे या कादंबरीचा सामाजिक अभ्यास हा ग्रामीण जीवनाचा सामाजिक अभ्यास मुख्यत्वे असणार आहे. ग्रामीण समाज या कादंबरीत आहे. ग्रामीण जीवनपध्दती, ग्रामीण आचार-विचार, समज, सण-उत्सव, जत्रा, पोषाख, भाषा यांचा अभ्यास आपल्याला करायचा आहे.

विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' तून ग्रामीण जीवनाचा वेध घेतलेला आहे. या कादंबरीने ग्रामीण कादंबरी प्रवाहाला वेगळी दिशा दिली. स्वातंत्र्या नंतरच्या (१९६० नंतरच्या) बदलणाऱ्या सामाजिक वास्तवाची जाणीव त्यांना समाजभान असल्यामुळे झाली आणि ही जाणीव कादंबरीतून व्यक्त झाली. बदलणारे खेडे - ग्रामीण जीवन, नवनव्या सुधारणा, योजना, राजकारणामुळे बदलणारी वृत्ती, बदलणारी मूल्ये, विभक्त होणारी कुटुंबे, बदलणारा निसर्ग इत्यादी ग्रामीण जीवनाचे अंतर्बाह्य परिवर्तन बदल त्यांनी आपल्या कादंबरीत मांडलेले आहे. ग्रामीण समाज, त्याच्या समस्या, त्याचे दुःख, त्याचा संघर्षमय प्रवास,राजकारणाचा अतिरेक असे वास्तववादी जीवन-दर्शन 'पांगिरा ' तून घडते. 'पांगिरा' तील समाजजीवन पाहण्या पूर्वी ग्रामीण कादंबरी, ग्रामीण समाज काय आहे याविषयीचा थोडकयात अभ्यास केला आहे.

## ५.२ ग्रामीण कादंबरी

“वाङ्‌मयाच्या क्षेत्रात मधून मधून आवर्ते निर्माण होतात. साचलेपणा येतो. या साचलेपणातूनच नवे प्रवाह जन्माला येतात. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची परंपरा नसलेला बहुजन समाज शिक्षणामुळे जागा झाला. यातूनच नवे कवी-लेखक जन्माला आले. ते त्यांच्या समाजा विषयी, त्यांना त्यांच्या समाजाला भोगाव्या लागणाऱ्या, भोगाव्या लागलेल्या व्यथा-वेदनांविषयी लिहू लागले तेव्हा त्यांचे हे लिहिणे पारंपरिक मराठी साहित्यापेक्षा वेगळे असणे स्वाभाविक होते. त्याच्या वेगळेपणाची मुळे समाजजीवनात होती” (१)

साहित्यात वेगवेगळे प्रवाह निर्माण होत असतात. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार समाजातील विविध स्तरातून होत होता. ग्रामीण भागात, तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचले होते. समाजातील सर्वच जाती-जमाती शिक्षण घेऊ लागल्या. हा शिक्षित झालेला समाज आपले स्वतःचे असे अनुभव साहित्यातून मांडू लागला आणि साहित्यात आधी न आलेले अस्सल जीवनानुभव साहित्यात येत होते. यातूनच ग्रामीण साहित्य हा एक प्रवाह निर्माण झाला.

१९६० नंतरच्या साहित्यात ‘ग्रामीण साहित्य’ हा साहित्यप्रकार जोरकस आला. ग्रामीण जीवन ग्रामीण परिसर साहित्यातून दिसू लागले. ग्रामीण कादंबरीतील अनुभव अस्सल होते. त्यामुळे या कादंबऱ्या लोकप्रिय व दर्जेदार झाल्या. ग्रामीण कादंबरीचा दर्जेदार प्रवाह निर्माण झाला. यामुळे मराठी कादंबरी साहित्यात ग्रामीण कादंबरी ठळकपणे दिसू लागली.

### ५.२.१ ग्रामीण कादंबरी व्याख्या

१) “लेखक ज्या प्रदेशात जगला, वाढला, जी माणसं त्यानं जवळून बघितली, जिथला निसर्ग त्यानं मनसोक्त उपभोगला, त्या सबंध परिसराला तिथल्या रंगगंधासह, त्यातल्या जीवननाटयासह, त्यातल्या बऱ्यावाईट, उभ्या आडव्या, सरळ प्रमाथी प्रेरणा आणि अनुभवासकट जिवंत करण्याची उत्कट धडपड कादंबऱ्यातून दिसून येते.” (२)

२) ''खेडेगाव, तेथील जीवनपद्धती, तेथील अशा खास रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशानिष्ठ वैशिष्टयपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेले काही प्रादेशानुसार पडलेल्या आर्थिक,सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या या साऱ्यांचा ग्रामीण कक्षेत अंतर्भाव केला आहे.'' (३)

ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण जीवन, संस्कृती, व्यवसाय □शेती, निसर्ग, ग्रामीण वास्तव, ग्रामीण व्यक्ती, ग्रामीण परिसर, ग्रामीण भाषा इत्यादी ग्राम जीवनाशी निगडित असणाऱ्या गोष्टी येतात. ग्रामीण जीवन शहरी जीवनापेक्षा वेगळे असते. ग्रामीण जीवन, संस्कृती, व्यवसाय, भाषा, राहणीमान, पोषाख, दिनचर्या, प्रथा इ. अनेक बाबतीत ग्रामीण जीवन शहरी जीवनापेक्षा भिन्न असते. हे ग्रामीण जीवन वास्तव, ग्रामीण समस्या, ग्रामीण निसर्ग, ग्रामीण व्यवसाय हे सर्व ग्रामीण कादंबरीत ग्रामीण लेखकांनी मांडलेले आहे.

मराठी ग्रामीण कादंबरीकरांनी अस्सल ग्रामीण स्वानुभव कादंबरीत उतरवलेले आहेत. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, ग. दि. माडगुळकर, श्री. ना. पेंडसे, आनंद यादव, उद्‌धव शेळके, रा. र. बोरांडे या लेखकांनी दर्जेदार कांदबऱ्या लिहिल्या. याविषयी 'प्रदक्षिणा' त लिहिलेले आहे.

''ऐतिहासिक दृष्टीने बघताना असे दिसते की, ग्रामीण जीवनाकडे वळण्याची दृष्टी हरिभाऊंनीही दाखवली होती, ती या दृष्टीने पहिला टप्पा मानता येईल, दुसरा टप्पा दिघे□ठोकळ यांच्या लेखनाचा, तिसरा टप्पा पेंडसे□दांडेकर यांचा आणि चौथा टप्पा यादव□बोराडे या लेखकांचा. स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील हा पहिला दर्जेदार प्रवाह मानता येईल. '' (४)

**५.२.२** ग्रामीण समाज–

विश्वास पाटील यांच्या ग्रामीण कादंबऱ्यातील समाज□जीवन बघण्यापूर्वी ग्रामीण समाज कसा आहे हे बघू या.

**व्याख्या :–** ''ग्रामीण समाज म्हणजे खेडयात राहणारा व प्रामुख्याने शेती व्यवसायाशी संबंधीत असलेला असा समाज होय. ग्रामीण समाजाचे सर्व जीवन जमिनीवरच अवलंबून असते. ग्रामीण

समाजाचे खाणे–पिणे, जगण्याची रीतही मुख्यतः जमिनीच्या उत्पन्नाशी संबंधित असल्याने त्यात प्रादेशिक भिन्नता आढळून येते आणि त्यावर अतिवृष्टी ,अनावृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तीचा परिणाम होतो.'' (५)

### ५.२.३ खेडयांची वैशिष्टये

''खंडणे म्हणजे जमीन कसणे व खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडूतांची वस्ती ते खेडे.'' (६)

**खेडयांची वैशिष्टये :**

एकत्र कुटुंब, नातेव्यवस्थेचे महत्त्व, वस्तुविनिमयाची अर्थव्यवस्था,जातिव्यवस्था, पूर्वापार व वंशपरंपरा चालत आलेले व्यवसाय इत्यादी.

१) ''**अंधश्रद्धा व लोकभ्रम** : ग्रामीण भागात परंपरा, रूढी, धार्मिक भावना यांना अदयापही प्राधान्य आहे. निसर्गातील अनेक घटनांचा कार्यकारणभाव समजावून न घेता परंपरागत दृष्टिकोणातून पाहिल्याने निर्माण होणारी अकारण भिती हे या अंधश्रद्धेमधील कारण आहे. निरक्षरता व अज्ञान या पोटी ही अस्तित्वात येते. अनारोग्य, रोगराई यांच्या अज्ञानामुळेही अंधश्रद्धा उदयाला येते.'' (७)

२) ''**सण – उत्सव** : खेडयात राहणाऱ्या लोकांच्या काहीशा नीरस व कष्टमय जीवनात उत्सव व सण मानसिक दिलासा देणारे व थकवा दूर करणारे ठरतात. लोकनृत्ये, कला, उत्सव, जत्रा इत्यादी मार्गांनी करमणूक करतात. सण □उत्सवाचे स्वरूप प्रदेशानुसार भिन्न असते.'' (८)

३) ''**आर्थिक जीवन** : ग्रामीण समाजाचा व्यवसाय व उपजीविकेचे प्रमुख साधन शेती हे आहे. शेती पावसावरच अवलंबून आहे. ग्रामीण जीवनात दारिद्रय मोठया प्रमाणावर आढळते. (९)

४) ''**बलुतेदारी** : काही काळ आधी ही पध्दती ग्रामीण जीवनात होती. मात्र आता नामशेष झाली आहे. ''अलुती □बलुती ही खेडयातील सामाजिक व आर्थिक व्यवहाराची वैशिष्टयपूर्ण पध्दती असून ग्रामीण समाज उदरनिर्वाहाच्या गरजा परस्पर सहकार्याने पूर्ण करत खेडयातील सर्व व्यवसाय समाज परस्पर सहकार्याचा मोबदला वस्तुरूपात अगर पैशाच्या रूपात पारंपारिक पध्दतीने एकमेकांना देत असत. ही परंपरा व्यवसाय विभाजनानुसार व श्रमविभाजनानुसार होती. यालाच अलुतेदारी □बलुतेदारी पध्दती

म्हणतात. महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, पाटील, कोळी, गुरव, चौगुले हे बारा बलुतेदार तर तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, भाट, गोसावी, वाजंत्री, कलावंत, भोई इत्यादी अलुतेदार होते.'' (१०)

५) ''**धर्माचे स्थान** : (पृ क्र.४०३) : ग्रामवासियांच्या मनात देव व धर्म यांच्यावरील श्रध्देला विशेष स्थान आहे. किंबहुना त्यांचे जीवन धर्मानेच व्यापलेले आहे.भजन, कीर्तन, पूजा-अर्चा, व्रत-वैकल्ये, उपास, प्रार्थना, शुभाशुभ अशा अनेक संकल्पनांना ते महत्त्व देतात. भूत, पिशाच्च, जादूटोणा, मंत्रतंत्र इत्यादी प्रकारही ग्रामीण भागात अधिक आढळतात.

६) **ग्रामीण शिक्षण** : (पृ. क्र. ४०३) : ग्रामीण व नागरी शिक्षण यात मोठी तफावत आढळते. ग्रामीण भागात आदयापही शिक्षणाच्या सोयी अपुऱ्या आहेत. ग्रामीण समाज शिक्षणापासून वंचित आहे. आता यात बदल होत आहेत.

७) **ग्रामपंचायत** : (पृ. क्र. ४०४) : प्राचीन पंचायती प्रमुख काम न्यायदानाचे करत होते. स्वातंत्र्यानंतर १९५६ नंतर पंचायत राज्य झाले. ग्रामपंचायतीचे राज्य निर्माण झाले.

८) **सहकारी संस्था** (पृ. क्र. ४०४) : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकारी संस्था हे ग्रामीण जीवनाचे आवश्यक अंग बनले. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, बी-बियाणे, इतर उदयोगांना मदत, मार्गदर्शन यासाठी सहकारी संस्था काम करतात. दुग्धव्यवसाय खरेदी-विक्री, छोटे-मोठे उदयोगधंदे यांमधील यशात सहकारी संस्थेचा सहभाग मोठा आहे.

९) **जातिव्यवस्था** (पृ.क्र. ४०३) : ग्रामीण जीवनात जातीचे महत्त्व जास्त. दैनंदिन, व्यक्तिगत जीवन जसे जातीशी निगडित आहे, तसेच सामाजिक जीवनाचे अधिष्ठानही मुख्यतः जात आहे. जातीमुळे ग्रामीण लोकांच्या परंपरा, उच्च–नीचतेच्या कल्पना, उत्पादनपध्दती इत्यादी जातीचे प्राबल्य आहे. जातवार प्रथा-परंपरा, देवधर्म विवाहविधी वेगवेगळे आहे. अलीकडे बदलत्या परिस्थितीमुळे जातींची परंपरागत बंधने शिथिल होऊ लागली आहेत. तरीही जातीचा अभिमन पूर्णतः कमी झालेला नाही.'' (११)

अशा प्रकारे ग्रामीण समाज हा शहरी समाजापेक्षा वेगळा असतो. तेथील संस्कृती वेगळी असते. तेथील भाषाही वेगळी असते. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय असतो. शेतीवर ग्रामजीवन अवलंबून असते. ग्रामीण समाज संस्कृती जपतो. ग्रामीण समाजजीवनातील शेती, इतर व्यवसाय, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, धार्मिकता, पोषाख, रूढी□परंपरा, इत्यादी अनेक गोष्टी ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण बोलीतून मांडलेल्या असतात.

विश्वास पाटील यांच्या ‘पांगिरा’, ‘झाडाझडती’, या कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण समाजाचे चित्रण आलेले आहे.

## ५.३ रूढी – परंपरा – प्रथा :

ग्रामीण भागात प्रथा□परंपरांना अत्यंत महत्त्व असते. प्रथेप्रमाणे  गावगाडा चाललेला असतो. जो प्रथा पाळतो, त्याप्रमाणे वागतो तो चांगला असे गणित असते. त्यामुळे ग्रामीण समाजात प्रथा आनंदाने, आवर्जून पाळल्या जातात. हया प्रथा हजारो वर्षांपासून चाललेल्या असतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्या संक्रमित होतात.

रूढी □परंपरा हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. ग्रामीण भागात हया रूढी□परंपरा आवर्जून, कटाक्षाने पाळल्या जातात. या परंपरांमुळेच ग्रामीण भागाचे ग्रामिणत्व जपल्या जाते. ग्रामीण परिसरात रूढी□परंपरांना अतिशय महत्त्वाचे आणि मानाचे स्थान आहे. हया परंपरा ग्रामीण जीवनाचा जणू अविभाज्य असा भाग बनलेल्या आहेत. इतक्या त्या लोकजीवनाशी एकरूप झालेल्या आहेत. प्रत्येक ग्रामीण भागातील रूढी□परंपरा वेगवेगळया असतात. वेगवेगळया प्रसंगासाठी वेगवेगळया रूढी□परंपरा असतात.सण वाराच्या विवाहाच्या,बारशाच्या,अंत्यसंस्काराच्या,घरबांधणीच्या,प्रवासाच्या,देवदेवतेच्या इत्यादी वेगळया प्रसंगी वेगवेगळ्या रूढी परंपरा पहायला मिळतात. रूढी □परंपरेचे जाळे सर्व समाजात, सर्व जातींमध्ये पसरलेले आहे. रूढी परंपरेविरूध्द जाण्याचे धाडस सहसा कोणी करताना दिसत नाही. गावगाडयाला रूढी□परंपरेला, संकेतांना धरूनच सर्वजण आपले जीवन जगताना दिसतात.

'पांगिरा' त विश्वास पाटील यांनी (या ग्रामीण कादंबरीत) ग्रामीण भागातील 'पांगिरा' या गावातील, गावाच्या परिसरातील रूढी-परंपरांचा उल्लेख कादंबरी लेखनाच्या अनुषंगाने केलेला आहे. 'पांगिरा' या विश्वास पाटील यांच्या ग्रामीण कादंबरीत रूढी, परंपरा पहायला मिळतात. हुंडयाची परंपरा, कोंबडा उतरविण्याची परंपरा (प्रथा) धान्याच्या वाहनाची पूजा करण्याची प्रथा, जत्रेसाठी प्राण्याची, गाडीची सजावट करण्याची प्रथा, जत्रेत सिंदुबाच्या पालखीची रथाची, सालकऱ्याची प्रथा, गावात सकाळीच पिंगळा येऊन गाव जागविण्याची परंपरा, पंच मंडळी वाटणी करतात ही प्रथा, मुलगा शिकला पास झाला तर, त्याच्यावरून भाकर-तुकडा, मीठमोहऱ्या ओवाळून टाकण्याची परंपरा, पाण्यासाठी बोरींग घेतली जात होती. ती सुरू होण्याआधी शेताची पूजा, कोंबडा उतरवून टाकण्याची परंपरा, पाण्यासाठी गावातील विहीर सरकारच्या ताब्यात दिली जाते. पहिला ट्रँकर जाण्याआधी पाच सुवासिनींनी ओवाळायचे, विहिरीची पूजा करायची, गुलाल खोबर उधळायची परंपरा अशा परंपरा, प्रथा पांगिरात पहायला मिळतात.

## ५.४ राजकारण व भ्रष्टाचार

'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीत राजकारण,राजकारणी डावपेच,शह-प्रतिशह,पक्ष,आमदार,खासदार,सरपंच,पोलीस पाटील, तलाठी इ.ची कामे , निवडणुका,मिरवणुका प्रचार,भाषण,ग्रामपंचायत, सभापती, पोलीस यंत्रणा इ. चे वर्णन पहायला मिळते. 'पांगिरा' या कादंबरीत ग्रामीण वर्णनाइतके राजकीय वर्णनही आलेले आहे. राजकारणातील डावपेच, बारकावे विश्वास पाटील यांनी सूक्ष्मपणे टिपलेले आहेत. राजकारणाचे वर्णन अतिशय वास्तवपूर्ण केलेले आहे. स्वातंत्र्यानंतर राजकारण हळूहळू समाजात रूजू लागले. पाहता पाहता सर्व गावांगावांमध्ये ,सर्व समाजात, सर्व स्तरात राजकारण भिणले. ग्रामीण भागात राजकारणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो. निवडणुका ,पक्ष त्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी, पद टिकविण्याची धडपड, त्यासाठी अवैध मार्गाचा अवलंब, राजकारणातील घराणेशाही, राजकारणातील दलबदलूपणा, स्वार्थीवृत्ती, भ्रष्टाचारी वृत्ती, राजकारणाची खालावलेली पातळी, राजकारणामुळे लयाला जाणारी सामान्य कुटुंबे,

वाढते वैमनस्य, व्यसनाधीनता, पैशांचा पाण्यासारखा वापर यासारख्या गोष्टी पांगिरात पहायला मिळतात.

राजकारणी लोक गोड बोलणारे स्वत:च्या फायदयासाठी सत्ता टिकविण्यासाठी कोणत्याही थराला जातात. जनतेच्या सुख दु:खाशी त्यांना काहीही देणघेण नसत. सत्ता असली की हव ते करता येत हे राजकारण्यांना पक्क माहिती असल्यामुळे ते सत्ता जाऊ देत नाहीत. सत्ता टिकविण्यासाठी घराणेशाही निर्माण करतात. सर्वसामान्य जनता या राजकारणाच्या खेळात भरडली ,नागवली जाते.

**भ्रष्टाचार :**

पांगिरा या ग्रामीण कादंबरीत भ्रष्टाचाराचे स्वरूप कसे असते याचा उल्लेख प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आलेला आहे. सरकारी कर्मचारी, आमदार,खासदार, सरंपच,कंत्राटदार,तलाठी इ. कशा प्रकारचा भ्रष्टाचार करतात. सर्वसामान्य अशिक्षित जनतेची कशी पिळवणुक ,फसवणुक करतात याचं वर्णन विश्वास पाटील यांनी पांगिरा त केलेले आहे.

मंगोला ते पांगिरा रस्ता कायमच बाराही महिने खराबच असतो. याच कारण सांगताना अण्णा म्हणतात, ‘‘२० वर्षांपासून रस्ता तसाच आहे रस्ता ४ वर्षे झेड पीकडे तर रस्ता ४ वर्षे बी.एन्ड.सी. कडे जातो. दोन्ही कंत्राटदारांनी जरा माती टाकायची पैसे खायचे. रस्त्यावर माती-मुरूम पडो न पडो कामाच्या आधी बिलं मंजूर. विधानसभेची इलेक्शन आली की रस्त्याच्या दोन्ही बाजूला पक्कया खडीचे ढिग पडतात. इलेक्शन झाले की रात्रीतून ती खडी दुसरीकडे नेली जाते. ह्या रस्त्याने एवढे पैसे खाल्ले की त्यात एखादया नदीवर मोठ धरण बांधून झाल असत. वाघाच्या तोंडाला रक्ताची चटक लागावी तशी ह्या रस्त्याला पैशाची चटक लागली.’’ (पृ१२)

पांगिरा गावात राजकारणाचा समावेश होतो आणि गावातील गल्लीबोळात राजकारण भिणत. राजकारणाच्या नादी लागून माणूस स्वार्थी होतो. आपल्या नातेवाईकांपासून दुरावतो, वाममार्गाला

लागतो. राजकारणी सर्वसामान्य जनतेचा फक्त  वापर करून घेतात. निवडणुकीला उभे राहून लोक देशोधडीला लागतात. गोडबोले,स्वार्थी राजकारणी लोक काम न करता फक्त आश्वासन देतात. जातीचे राजकारण करतात,श्रीमंतीत राहतात, घराणेशाही टिकवतात, खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करतात. असे राजकारणातील वास्तव विश्वास पाटील यांनी पांगिरा च्या समाजजीवनात चित्रित केलेले आहे. समाजजीवनात भ्रष्टाचारही आहे. तो कसा व कशा स्वरूपात केला जातो हे पांगिरातून प्रत्ययाला येत. सरकारी कर्मचारी, आमदार  खासदार,सरपंच,कत्रांटदार,तलाठी इत्यादी सर्वसामान्य जनतेची फसवणूक करून  भ्रष्टाचार करतात. पैसे देऊन खोटी  कामे सहज केली जातात. यामुळे समाजात खोटी काम करणारे लोक बिनधास्त असतात. त्यांचा खोटेपणा आणि उद्दामपणा यामुळे वाढत जातो.

## ५.५ स्त्री □जीवन

समाजात स्त्रियांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. जसजसा काळ पुढे सरकतो तसतसा स्त्रियांच्या स्थितीत फरक पडत गेलेला आहे. वेगवेगळया काळात समाजातील स्त्रियांची स्थिती वेगवेगळी जाणवते. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांना फक्त चूल आणि मूल इतकच क्षेत्र मर्यादित होत. इंग्रज राजवटीमुळे शिक्षणाचा प्रसार झाला. समाजात जागृती निर्माण झाली. समाजसुधरकांनी स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाल पाहिजे. त्यांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क, अधिकार मिळायला पाहिजे. याविषयी समाजसुधारकांनी आग्रह धरला. जनजागृती केली आणि हळूहळू स्त्रियांची प्रगती झाली.

‘पांगिरा’ या ग्रामीण कादंबरीत ग्रामीण स्त्री जीवन पहायला मिळते. समाजात जे घडते त्याप्रमाणे ते साहित्यात उमटत असते. म्हणून ग्रामीण भागातील स्त्रियांची स्थिती किंवा स्त्री जीवन कसे आहे? हे ‘पांगिरा’ तून अनुभवण्यास मिळते.

‘पांगिरा’ कादंबरीचा काळ साधारण स्वातंत्र्यानंतरच्या १०□१५ वर्षानंतरचा आहे. त्यावेळी समाजातील स्त्रियांची स्थिती कशी होती याचा अंदाज सहज लावता येईल. स्त्री ही समाजातील, कुटुंबातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. स्त्री ही केंद्र आहे. त्याभोवती कुटुंब, समाज फिरत असतो. पांगिरातील स्त्रियांचे जीवन

कष्टाचे आहे. पुरुषांच्या खांदयाला खांदा देऊन त्या कष्ट करतात. गरिबी, दारिद्रय हा स्त्री जीवनाला लागलेला शाप आहे. शिक्षणाचा अभाव स्त्री जीवनात जाणवतो. एकूणच ग्रामीण समाजात शैक्षणिक उदासिनता आहे आणि स्त्रियांना तर शिक्षण मिळतच नाही.

पांगिरातील स्त्री कष्टकरी, मेहनती, प्रेमळ, भांडणारी, स्वार्थी, असहाय्य, नवऱ्याला साथ देणारी, मुलांवार माया करणारी, पश्चाताप करणारी, अधिकार गाजविणारी, तमाशा सादर करणारी, गरिबीत राहणारी, अशिक्षित, धार्मिक अशी आहे. स्त्रियांच्या स्वभावातील विविध छटा, त्यांची वास्तव स्थिती 'पांगिरा' त पहायला मिळते. स्त्री जीवन चित्रण कमी प्रमाणात आहे.

१) तमाशा कलावंतीण : पांगिरा गावात दरवर्षीप्रमाणे सिंदुबाची जत्रा असते. त्यासाठी गावात तमाशाचा फड लागलेला असतो. त्यातील कलावंत सुंदरा पंढरपुरकर तमाशाच्या फडाची मालकीण चाफ्याच्या आडोशाला नटत होती. ती चोपून चापून नऊवारी शालू नेसली होती. तिने ट्रंकेतला आयना काढला. मूठभर पावडर काढून आपल्या सावळया तोंडावर लावते. आरशात दोन तिनदा पाहतो. केसांच्या ओळीत कुंकू भरते. पायाला चाळांचा तिडा आवळून बांधते. हे सगळी बोर्डावर नाचण्यासाठीची तयारी असते. प्रेक्षक सुंदराची वाट बघत असतात. पदर उंचावत ढोलकीच्या ठेक्यात सुंदरा बोर्डावर येते. मोरासारखी नाचते. तिच्या आजूबाजूला इतर स्त्रियाही नाचतात. धुळीत हा नाच चाललेला असतो. पायाला खडे टोचत असतात. उन्हात उघडयावर तमाशा सुरू असतो. झाडाची सावली नाहीशी होते.कलावंतीणी घाम पुसत नाचत असतात.(पृ. २,३)

२) सोकाजीची बायको (वैजू वहिनी) सोकाजीच्या बायकोला गाव आयसाब म्हणत असतो. सोकाजी प्रमाणे तीही गावकऱ्यांवर सत्ता गाजवत असते. आयसाब गावातील लोकांना ताक □दही देत होती. एखादयावर सोकाजी रागावला तरी ती माया दाखवायची, त्यामुळे हरएक माणूस सोकाजीच्या वाडयाशी चिकटून रहायचा. (पृ. १९)

३) राधाई : ही मुरार पाटलाची बायको. संसारात दक्ष. तिला सून आलेली असते. काबाडकष्ट करणारी राधाई लग्न करून आली तेव्हा तिचे ३ दीर छोटे होते. मुरारचा भावावर जीव होता. घरची परिस्थिती बेताची. मुरारने शेतात कष्ट करायला सुरवात केली. राधाईने सोबत दिली. (पृ. २७) राधाई : मुरार पाटलाला

तालुक्याला जायच असते. सकाळी पाटील उठतात. सूनेला उठवायची हिम्मत होत नाही. मग पाटील राधाईला उठवतात. ती घाईने उठते. तोंडावर पाणी मारून भाकरी बडवायला बसते. नवऱ्याला काळजीने सांगते, आता कोर्टकचेऱ्या बंद करा. वय झाल, उभा जन्म गेला आता शेवटच हरी हरी तिथेच करायच का? २० वर्षापासून निकाल लागला नाही. राधाईची भाकरी पडते. ती थबकते घाबरते. तिच मन गलबलत. डोळयात पाणी येत. हुंदके देत ती म्हणते, ''आपल्या जीवापेक्षा तारीख लै भारी हाय का? तुमास्नी आता पयल्या सारखं निभत न्हाई. तुमच्या वयाचं बापय देवळात हरी हरी करीत निवांत बसत्यात. तुमी मातुर कोर्ट, दावा, वकील करीत जलूम काढताय.'' राधाई रडू आवरते घाईने गाडग्यातला सुकी मासळी काढून खोपरीवर घासते. शिपीभर तेल तव्यात ओतते मासळी उलथी पालथी करते. राधाईने कालच धुतलेले कपडे पाटील घालतात. राधाई दुपारच्या भाकरीच गाठोड त्यांना देते आणि १० रु देते. पाटील एवढेच का? अस विचारतात. त्यावर ती म्हणते ''काय करणार? बाजारच न्हाई. तुमची तारीख म्हणून वांग्यान आनि घेवडयानं भरल्याली पाटी बाजारात नेली. पण इक्रीच झाली न्हाय. मुलखाचा दर पडला. मी तरी काय करू? कुठला पैसा आणू? हनुमंता पँट पँट करून काटकुळा झाला. मला बी चोळी न्हाय. ''

अशाप्रकारे राधाई घरकाम करणारी, नवऱ्याची काळजी घेणारी, श्रध्दाळू, संसाराला भाजी विकून हातभार लावणारी, गरिबीत राहणारी, प्रेमळ अशी राधाई असते. (पृ. २९,३०)

४) लक्ष्मी : लक्ष्मी घरात घुसफूस करते. हणुमंता वकील होणार यावरून गावातील कितेकांनी लक्ष्मी व बाजीला खिजवल होते. वैजू वहिनी लक्ष्मीचे कान भरते. तुम्ही काम करा औत धरा आणि तो बॅलीस्टर फिरेल मोटारीतून पाँप पाँप करत. लक्ष्मी घरात मोठयाने म्हणते. 'व्हटावर मिशा फुटल्या यंदा लगीन केल तर पुढच्या साली पाळणा हलल. हे वय काय शिकायच हाय? मुंबैल जाव, नोकरी करावी, तर मेला बालीस्टर हुया निघाला. ' पाटील लक्ष्मीला दरडावतात तू लक्ष घालू नको. यावर लक्ष्मी म्हणते. ''आम्ही घाम गाळायचा, कष्ट करायचे आनी हा हातपाय मोडल्यागत शिकायला निघला. तो शिकणार असेल तर आम्ही या संसारात राहणार नाही. आम्हाला खटल तोडून पायजे.'' (पृ. ४५)

५)	बायना कांबळे : बायनाचा मुलगा आबा परगावाला शिकत असतो. राधाईप्रमाणे ती मुलाला डबा पाठवत असते. तिच वय झालेल असते. पंधरा वर्षापूर्वी बायनाचा कारभारी अचानक देवाघरी जातो. तेव्हा ती मुंबईत होती. आबा ८ वर्षाचा होता. मुलगा बाबासाहेबासारखा शिकावा असे तिला वाटत होते. तिने कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्या सभा ऐकल्या होत्या. तिला त्यातल कळत नव्हत. मात्र आपला मुलगा असा शिकून मोठा व्हावा अस तिला वाटत होत. मुंबईला बीडीडी चाळीत भाडयाची खोली होती. तिने गिरणीकारगारांसाठी खाणावळ उघडली होती. एकटी पन्नास माणसांचा स्वयंपाक करायची. त्यातच भाड आणि मुलाच शिक्षण करत होती. मात्र गिरणीच्या संपामुळे खाणावळ ओस पडली. त्यामुळे तिने मुंबई सोडली व पांगिऱ्यात आली. मुलाला जिल्हयाला कॉलेजला ठेवले आणि बायना पांगिऱ्यात राहून कष्ट करत होती. कष्टामुळे कंबर दुखत होती. गळयातील तीन तोळयाचे दागिने विकावे लागले. मात्र बायना जिद्‌दीची होती. मोलमजुरी करत होती. पण मुलाला डबा आणि जमेल तेव्हा पैसे पुरवत होती. बऱ्याचदा ती उपाशी असायची. पण डबा नेमाने पाठवायची. एसटीत कितीही गर्दी असली तरी ती आत रेटून घुसून डबा ठेवायची. एसटी तर एखादेवेळी थांबली नाही, तर बायना जीव तोडून मोठयाने ओरडायची, ड्रायव्हरला गाडीखाली कोणी आल्यासारखे वाटायचे. तो कचकन ब्रेक दाबायचा. तेवढयात बायना डबा गाडीत ठेवून देत होती. (पृ. ७७)

६)	हौसा : धुळा–तुका वेगळे झाले होते. धुळाला वरची जमीन आली तर तुकाला नदीकाठची विहीर आली होती. तो विहिरीच्या पाण्यावर मावळ काढत होता. त्याच बर चालल होत. मात्र धुळाच रान मोकळ होत. सोकाजी त्याला पाणी देत असता. त्याची तो वाट बघत असतो. मात्र दुष्काळामुळे सोकाजीलाही पाणी पुरत नव्हत. त्यामुळे तो धुळाला पाणी देत नव्हता. धुळा आणि त्याची बायको हौसा हताश होतात. धुळा काबरा□बावरा होतो. हौसा त्याला मिठीत घेते. त्याची कशीबशी समजूत घालते. अंधार पडल्यावर दोघ घरी येतात. ( पृ. ८७)

७)	दयााळू गीताबाई जानुगडे : पांगिरा गावात दुष्काळ पडला. गावातील पाणी आटल. ओढयाच्या काठावर गीताबाई जानुकडेची विहीर होती. तिची तिन्ही मुले मिल्ट्रीत होती. गिताबाई माळव फुलवायची. पाण्यासाठी वणवण करणाऱ्या लोकांना बघून तिला दया आली. तिने विहिरीवरच इंजिन बंद केल. भाजीपाला

तसाच वाळू दिला. पण गावाला पाणी दिल. लोक तिचे आभार माणायचे तेव्हा ती म्हणायची, “मला काय कमी हाय? वाघागत माझी तिनी ल्याक मिलटरीत हायत महिन्याला पैका येतू. देवान मला काय कमी केलय? एकर □ दोन एकर पिकल न्हाई म्हणून काय होतय? पिऊ दे गावाला पाणी”. (पृ. १७३)

८) हौसा – जना : धुळाने रागाच्या भरात तुकाचा खून केलेला असतो. तो जामीनावर सुटतो. त्याला आपल्या वागण्याचा पश्चाताप होतो. तो जेलमध्ये असताना तुकाच्या बायकापोरांची हालत खराब होते. दोघी जावा जावांना गावात कोणी विचारेना. गरिबी सारखी सजा त्यांना मिळते. जना□हौसाला कोणी मदतीला येत नव्हत. दोघी जावाच आता एकमेकींची संगत करत होत्या. एकत्रच राहून स्वयंपाक करत होत्या. धुळाने जनाची माफी मागितली, तेव्हा जना □हौसाला कोणी मदतीला येत नव्हत. दोघी जावाच आता एकमेकींची संगत करत होत्या. एकत्रच राहून स्वयंपाक करत होत्या. धुळाने जनाची माफी मागितली, तेव्हा जना म्हणते, “भावजी झालं ते झालं आता तुमी बी आमाला टाकून गेला तर घरातली चिलीपिली कुठल्या पांजरपोळात सोडायची.” (पृ. १७५) जना ही मोठया मनाची, क्षमा करणारी असते.

भिकुअण्णाची बायको : भिकुअण्णा गांज्याच्या केसपासून ते त्यात व्यस्त होते. घरात आता ओढाताण होत होती. त्यांची करारी बायको वाडयाबाहेर पडू लागली. घरात बैल बारदाण होता. रोजंदार गडी करून ती कुळव, फण मारू लागली. प्रसंगी कोयंडा हातात घेऊन, कुळवावर उभी राहून बैल हाकू लागली. आण्णाविना तिने रान पडू दिल नाही. अण्णा हसत सांगत, “बायकोला घरलक्ष्मी कशासाठी म्हणतात? लक्ष्मीदेवी माझं रान पडू दयायची न्हाई.” (पृ. १६३,६४)

‘पांगिरा’ तील स्त्री जीवन कष्टाचे होते, अशिक्षित होते. घरकाम करून नवऱ्याच्या बरोबरीने शेतातही काम करत होती. गरिबीत राहणारी, सहनशील, कुटुंबावर प्रेम करणारी, भांडणारी, पोटासाठी मनोरंजन करणारी, असहाय्य, तर कधी सत्ता संपत्तीचा अधिकार गाजवणारी होती. स्त्री स्वभावाचे विविध पैलू जाणवतात. या कादंबरीत स्त्री जीवन चित्रण प्रामुख्याने येत नसले तरी, घटना प्रसंगाच्या अनुषंगाने ते आलेले आहे. अशिक्षितपणामुळे स्त्रियांवर अन्याय होतो.

## ५.६ सण–समारंभ–उत्सवः

भारतीय समाजात सण–उत्सवांना महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय संस्कृतीत सणांचे महत्त्व फार आहे. जाती–धर्मात सण–समारंभ वेगळया प्रकारचे असतात. आणि ते सण साजरे करण्याच्या पद्धतीही वेगवेगळया पहायला मिळतात. भारतीय समाजात सणांची संख्या मोठया प्रमाणात आहे. सण हे समाजाची उर्जा, चैतन्य असतात. सणांमुळे समाजात, कुटुंबात उत्साहाच वातावरण तयार होते. स्त्रियांचा सणांशी निकटचा संबंध येतो. त्यामुळे स्त्रियांच्या दृष्टीने सणांना विशेष महत्त्व असते.

‘पांगिरा’या ग्रामीण कादंबरीत ग्रामीण सण, उत्सव, समारंभ यांच वर्णन विश्वास पाटील यांनी केलेल आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात सण उत्साहाने, परंपरेने, वेगळया पद्धतीने साजरे केले जातात. सण पूर्वापार चालत आलेल्या रिवाजानुसार ग्रामीण भागात साजरे केले जातात. ग्रामीण भागात सणांच्या वेळी समाजात आनंदाचे, उत्साहाचे, खेळीमेळीचे वातावरण असते.

‘पांगिरा’ कादंबरीत सुरवातीलाच जत्रेचा उत्सव कसा साजरा करतात त्याचे वर्णन आहे. गावातील जत्रा हा उत्सव गावातील, परगावातील लोकांसाठी आनंदाची पर्वणी असते. परंपरेने चालत आलेल्या नियमानुसार सिंदुबादेवाची रथातून मिरवणूक, अंघोळ, पूजा केली जाते. देवावर गुलाल, खोबरे उधळते जातात. अशाप्रकारे पांगिरा गावात जत्रेचा उत्सव मोठया आनंदाने, भक्तीभावाने साजरा केला जातो.

ग्रामीण भागात जत्रेला महत्त्वाचे स्थान समाजात होते. ग्रामीण लोक जत्रेचा उत्सव आनंदाने, श्रद्धेने साजरा करत होते. ग्रामीण भागात खरेदी ही फक्त आणि फक्त जत्रेतच केली जात होती. शेतीच्या विविध वस्तू, अवजारे, मसाले, कपडे, भांडे, खाऊ, स्त्रियांच्या बांगडया–कपडे इत्यादी अनेक आवश्यक गोष्टींची खरेदी केली जात होती. या वस्तूंचे भरपूर दुकान लागत होती. जत्रेतून वर्षातून एकदाच खरेदी करण्याची पद्धत होती. स्त्रिांसाठीही जत्रा आनंददायी होती. कारण वर्षातून एकदाच तिला खरेदी करण्याची संधी मिळत होती. देवदर्शन आणि आनंद यांचा मेळ जत्रेत घातलेला पहायला मिळतो. (पृ.१०)

‘पांगिरा’ तील समाजजीवनात फारसे सण–समारंभ–उत्सव दिसत नाही. मात्र ‘जत्रे’ चा उत्सव ग्रामीण भागात मोठया प्रमाणात आणि मोठया उत्साहात साजरा केला जातो. काळानुसार त्या चत्रेचेही महत्त्व कमी–कमी होत

जाते. आणि ती केवळ नावालाच उरते. ग्रामीण संस्कृतीत जत्रेची एक मोठी परंपरा आहे. देवीचा भंडारा, गौरी–गणपती, नागपंचमी, दिवाळी अशा सणांचा केवळ ओझरता उल्लेख आहे. फक्त 'जत्रेचे' विस्तृत वर्णन केलेले आहे.

**५.७ पोषाख व दागदागिने :**

आपल्या आचारा–विचारांचे प्रतिबिंब आपल्या पोषाखात दिसत असते असे म्हटले जाते. आपल्या समाजात निरनिराळया जाती धर्माचे, निरनिराळया प्रांताचे, निरनिराळया वयोगटाचे लोक राहत असतात. प्रत्येकाची आवड–निवड, आर्थिक स्तर, वयोगट, स्त्री–पुरुष, सामाजिक स्तर, व्यवसाय, राहण्याचे ठिकाण यावर प्रत्येकाचा पोषाख अवलंबून असतो. 'पांगिरा' या विश्वास पाटील यांच्या ग्रामीण कादंबरीत ग्रामीण पोषाखाची रचना दिसून येते. ग्रमीण परिसरातील व्यक्ती कोण–कोणत्या प्रकारचे पोषाख घालतात ते यातून लक्षात येते. ग्रामीण भागात पोषाखाची खूप विविधता पहायला मिळत नाही. कारण तिथे जास्तीत जास्त कष्टकरी शेतकरी वर्ग असतो. त्यांना दिवसभर शेतात, शेणा–मातीत काम कराव लागत. म्हणून या कामाला पूरक असा पोषाख ते परिधान करतात. मात्र सणा–वाराला, समारंभाला खास प्रसंगाला त्या व्यक्ती ठेवणीतले कपडे परिधान करतात.

**अलंकार/ दागिने :**

समाजात स्त्री पुरुष वेगवेगळे दागिने परिधान करत असतात. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना दागिने घालायला जास्त आवडतात. 'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीत शेतकरी समाजचित्रण केलेले आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती बेताचीच असते आणि दागिने घालणे भरपूर दागिने घालणे हे श्रीमंतीच लक्षण आहे. मात्र 'पांगिरा' त फारसे दागिने पहायला मिळत नाही. याचाच अर्थ 'पांगिरा' तील समाजाची आर्थिक स्थिती अगदीच बेताची होती.

'पांगिरा' तील समाजात दाग□दागिने पहायला मिळत नाही.समाजाला दोन वेळच्या अन्नाची चिंता असते. तिथे दागिने कसे असतील? जे काही दागदागिने स्त्रियांना लग्नात घालतात. ते अडीअडचणीला सदा वाण्याकडे गहाण ठेवले जातात. त्यामुळे ते दागिने वापरण्यापेक्षा वाण्याकडेच जास्त असतात. काही वेळा दागिने विकून पैसे आणावे लागतात. दागिन्यांप्रमाणे पोषाखाही आहे. गरीब शेतकरी पोषाखही साधाच वापरतात. ग्रामीण भागात जो पोषाख असतो तो परिधान करतात. श्रीमंत, राजकारणी हे कडक पांढरे खादीचे कपडे घालताना दिसतात. स्त्रिया साधारणतः पातळ, लुगडे, झंपर परिधान करत होत्या, तर पुरुष धोतर, पटका, टोपी, सदरा, तुमाण, पँट असा पोषाख परिधान करत होते. 'पांगिरा' तील समाजजीवनात पोषाख व दागदागिन्यांचे वैविध्य जाणवत नाही. समाजात गरिबी असल्यामुळे पोषाख साधाच होता.

**५.८ 'पांगिरा' तील आर्थिक परिस्थिती :**

समाजव्यवस्थेत आर्थिक व्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. आर्थिक घडामोडींचा परिणाम सामाजिक परिस्थितीवर होत असतो. आर्थिक निकषानुसार समाजात स्तर निर्माण होतात. म्हणून आर्थिकता हा सामाजिक परिस्थितीचा महत्त्वाचा भाग आहे.

'पांगिरा' या कादंबरीतील व्यक्तींची आर्थिक परिस्थिती कशी आहे? समाजातील आर्थिक व्यवहार कोणत्या स्वरुपाचे आहेत? आर्थिक घडामोडी कशा स्वरुपात? कोणत्या ठिकाणी घडतात? समाजात आर्थिकतेवरून स्तर पडलेले आहेत काय? आर्थिक स्तर वाढविण्यासाठी समाज काय प्रयत्न करतो? समाजातील

आर्थिक दुर्बलता कोणत्या समाजात जास्त आहे? त्याची कारणे काय आहेत? आर्थिक गणिते कशी मांडली जातात? या सर्वांचा अभ्यास या 'आर्थिक परिस्थिती' प्रकरणात घ्यायचा आहे.

'पांगिरा' या कादंबरीत मुख्यतः ग्रामीण समाजाचे चित्रण पहावयास मिळते. त्यामुळे ग्रामीण व्यवसाय हा मुखत्वे शेती. या शेतीवर तेथील आर्थिकता अवलंबून असते. 'पांगिरात' काही आर्थिक सधन व्यक्तीही आहेत. मात्र बहुतांश समाज हा आर्थिक दुर्बलतेतच मोडतो. तालुका, जिल्हा या ठिकाणाच्या वर्णनात आर्थिक सधनता आढळून येते. या कादंबरीत राजकारणी आहेत, त्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर कसा उंच आहे याचे वर्णन 'पांगिरा' त आलेल आहे. 'पांगिरा' गावात मुख्य व्यवसाय हा शेती व मुख्य पीक हे ऊस त्यामुळे खर्च व जा जाता गावात लोक बऱ्यापैकी सुखाने राहत होते. मात्र पाण्याच्या गैरवापरामुळे, अतिवापरामुळे पांगिरा गावात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागते. पिण्यासाठी पाणी मिळत नाही, तर शेती कशी करणार? यामुळे 'पांगिरा' गावातील शेतकऱ्यांना आर्थिक दुर्बलता जाणवत होती. गावात काही-अण्णा, सोकाजी डोकरे, तान्या इ. मंडळी श्रीमंत होती; मात्र जवळपास सारा गाव गरिबीच्या जवळपासचाच होता. शेतकरी रात्रंदिवस शेतात काबाडकष्ट करतो. शेतातील माल बाजारात नेतो, जो भाव मिळेल त्या भावात माल विकतो आणि त्या पैशात देणी देऊन संसार चालवितो. शेतातील-पिकांसाठी, खतासाठी, फवारणी-बी-बियाणे यांसाठी तो बँकेतून कर्जही काढतो. प्रसंगी बायकांचे दागिने गहाण ठेवतो. आणि शेतातील मालाच्या भरवशावर मुलींच्या लग्नाचे बेत आखतो. आणि मालाच्या पैशातून घरातील स्त्रियांना दागिने करण्याचही तो ठरवतो. अशा प्रकारे पांगिरातील समाजाचे आर्थिक उत्पन्नाचे साधन शेती हेच आहे.

१. 'पांगिरा' तील समाजात आर्थिक परिस्थितीवरुन श्रीमंत-गरीब असे स्तर पहायला मिळतात. सोकाजी डोकरे हा गावचा सरपंच असल्यामुळे तो चांगला सधन असतो. व्याजाचा धंदा करत असल्यामुळे आणि इतरही त्याचे जोडधंदे असतात. त्यामुळे पैशांचा ओघ त्याच्याकडे कायम सुरू असतो. तान्या हा सोकाजीच्या मर्जीतला असतो. त्यामुळे त्याला गावातील रस्त्यांचे, विहिरीचे, बांधकामाचे कंत्राट मिळतात. त्यातून त्याला बरेच पैसे मिळतात. त्यामुळे त्याचीही आर्थिक परिस्थिती चांगली असते. त्यानंतर शाळा मास्तर निवृत्त विचारे गुरुजी ह्यांना सरकारची पेंशन मिळते आणि अंबाईची जमीन त्यांनी स्वतःच्या ट्रस्टच्या नावाने

केलेली असते. त्यामुळे त्यांना पैशांची अडचण कधी जाणवत नाही. मात्र गावातील इतर म्हणजे मुरार पाटील, धुळा–तुका, गुरव मंडळी, डोंगरवाडीतील लोक इ. ना मात्र आर्थिक चणचण कायम जाणवत राहते.

२. पांगिरकर कांदा बाजारात विकायला नेतात. भाव चांगला मिळत नाही. व्यापारी–दलाल शेतकऱ्यांची अडवणूक करतात. शेतकरी काळजीत असतो. कमी भावात माल विकावा, तर काहीच पैसे मिळत नाही आणि माल न विकावा, तर तो खराब होणर अशा कोंडीत शेतकरी सापडलेला असतो. लिलावासाठी व्यापारी येतात भाव पाडून म्हणजे कमी मागतात. १०० रु. ८० रु. सुरवातीला दोन शेतकरी नाही म्हणतात. मात्र एक तरुण ८० रु. विकायला तयार होतो. हे ऐकताच शिवा त्याच्यावर भडकतो. तर तो तरुण आपली करूण कहाणी, आर्थिक अडचण सांगतो. डोळे पुशीत तो म्हणतो, ''काय करू रं, मी? कालपासन म्हातारीला घेऊन सारं घरदार दवाखान्याच्या दारात बसलय. पैका न्हाय. काय करू?'' शेतकऱ्यांच्या उतपन्नाच साधन म्हणजे शेतीतील माल. मात्र याचा दर व्यापारी ठरवतात. कालचा १८० रु. चा दर फक्त ८० रु. होतो. शेतकरी हवालदिल होतो. या मालाच्या भरवशावर–बाजी हणुमंता विलायती गाई घेणार असतात, चिणू आपल्या मुलीच लग्न करणार असतो. धुळा घाबरतो, त्याला तुकाच्या मुलाला अकरावीला आंबेपूरला पाठवायचये असते. सगळयांच्याच स्वप्नांचा चुराडा होतो. आर्थिक गणिते विस्कटतात. (पृ.२०५)

'पांगिरा' या कादंबरीत शोषित आणि शोषक असे गट पहायला मिळतात. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती निसर्ग, मालाचा भाव यावर अवलंबून असते; मात्र निसर्ग बेभरवशाचा आणि बाजारभाव– व्यापाऱ्यांच्या मनाचा असल्यामुळे शेतकरी गरीबच राहतो. याउलट सोकाजी, तान्या, सदावाणी, संताजी काळे, वकील वर्ग, पोलीस वर्ग, इ. यांच्याकडे पैशांचा ओघ दिवसेंदिवस वाढतो. अशी आर्थिक दरी 'पांगिरा' त पहायला मिळते.

## ५.९ धार्मिक स्थिती, श्रद्धा–अंधश्रद्धा आणि दंतकथाः

प्रत्येक समाजात, प्रत्येक काळात धार्मिकता आढळतेच. मात्र काळानुसार धार्मिकतेत फरक पडत गेलेला आहे. समाज म्हटल की देव–धर्म आलाच. आणि प्रत्येक समाज, समाजातील प्रत्येक–जाती आप–

आपला देव-धर्म पाळत असतात. ही धार्मिकता, दैवते पिढयानीपिढया चालत आलेले आहेत. प्रत्येक गावाचे जसे एक दैवत असते-ग्रामदैवत. तसेच प्रत्येक जातीचेही दैवत असते.

याविषयी कादंबरीतील समाज चित्रणाच्या ओघात माहिती आलेली आहे.

१) सिंदुबाः- हे पांगिरा गावचे ग्रामदैवत आहे. पंचक्रोशीत या देवाला मानतात. दरवर्षी सिंदुबाची जत्रा भरते. जत्रा म्हणजे उत्सवच. आजूबाजूच्या गावेच्या-गावे जत्रेला येत असत. अशी ही सिंदुबाची जत्रा प्रसिद्ध होती. सिंदुबा हा नवसाला पावणारा देव म्हणूनही प्रसिद्ध होता. संध्याकाळी देवाचा रथ निघतो. त्यावेळी नवस फेडणारे रथापुढे लोळत असत. सर्व लोक सिंदुबाला मनापासून मानत होते. (पृ.१)

२) अंबाईः- रानात अंबाईचे पडके देऊळही होते. अण्णा म्हणतात-''गावात देव लै, त्यामुळं इकडं सहसा कोण फिरकत नाही.'' (पृ.१७)

**श्रद्धा अंधश्रद्धा, धार्मिकता :**

प्रत्येक माणसाची, समाजाची कशावरतरी श्रद्धा, भक्ती, विश्वास असतो. पांगिरा तील समाजाची श्रद्धा सिंदुबा देवावर, यमाई, अंबाई अशा देवांवर होती. या देवांसाठी, घरातील देवांसाठी काही धार्मिक गोष्टी कराव्या लागतात.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील रेषा फारच पुसटशी आहे. त्यामुळे ही श्रद्धा की, अंधश्रद्धा हे ठरविणे अवघड जाते.

१) सिंदुबाची जत्रा भरलेली असते. सिंदुबा हा नवसाला पावणारा देव म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध असतो. आपआपल्या समस्या, प्रश्न लोकदेवा जवळ मांडत व नवस बोलत. समस्या सुटली की, लोक तो नवस पूर्ण करण्यासाठी जत्रेत येत असत. कुणाला मुलबाळ झाल नाही, गाईच वासरू नाही, किंवा कोणी करणी केली, तरी यावर एकच इलाज होता तो म्हणजे सिंदुबाच्या रथाच दर्शन आणि सिंदुबाचा नवस. अस केल्यावर हमखास मनोकामना पूर्ण होत असे. असा समज होता. त्यामुळे जत्रेत नवस फेडणाऱ्यांची गर्दी रथापुढे होत होती. (पृ.४)

**दंतकथाः-**

'पांगिरा' तील समाजाचा दंतकथेवर विश्वास होता. दंतकथेवर त्यांची श्रद्धा होती. दंतकथेच अस्तित्व समाजात असते. दंतकथा म्हणजे परंपरेने चालत आलेल्या काही प्रमाणात वास्तव तर काही प्रमाणात काल्पनिक गोष्टी असतात. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकतेतून संक्रमित होतात. दंतकथा हा समाजाचा एक भाग असतात. दंतकथेत समाजाचे, निसर्गाचे (इतिहांसाचे भौगोलिकतेचे, भाषेचे) प्रतिबिंब पडलेले असते. म्हणूनच वेगवेगळया समाजातील, वेगवेगळया प्रदेशातील दंतकथा त्या-त्या समाजाशी, भौगोलिकतेशी साधर्म्य असलेल्या असतात.

'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीतील समाजजीवनात दंतकथेचा महत्त्वाचे स्थान आहे. तेथील समाजात दंतकथा रूजलेल्या दिसतात. या दंतकथांना समाज सत्य मानतांना दिसतो. व दंतकथेकडे समाज आदराने बघतो. किंवा त्याविषयी समाजाला आदर आहे.

१) शर्मा नावाचा कृषसंशोधक पांगिरा गावाचा अभ्यास करायला येतो. त्याला गावाची माहिती देतांना अण्णा गावाविषयी सांगतात की, ''कौरव-पांडवांच्या लढाईच कुरूक्षेत्र म्हणजे गावकऱ्यांच्या मते यमाईच्या डोंगरावरचा सपाट पठार. याच ठिकाणी कौरव-पांडवांमधे जंगी युद्ध जुंपल. दोन्ही सैन्याच्या मधोमध समुद्रासारख भलमोठ पाण्याच तळ होत. कौरव-पांडवांच्या अग्निबाणांनी एके दिवशी एवढा आगडोंब उसळला की ऐन रणात धरणीकंप झाला. पाण्यानं गच्च भरलेले तळे गावापाठीमागच्याच डोंगरात जसच्या तस गाडलं गेले. तेव्हापासून त्या पवित्र तळयातल पाणी उमकारून बाहेर येतं. त्याचेच पाझर साऱ्या रानाबांधाला फुटले आहेत. सांगा साहेब हे पाणी कस आटणार कितीही उपसल तरी पातळी तीच राहणार.'' (पृ.१५,१६)

'पांगिरा' तील समाजजीवनात धार्मिक वृत्ती होती. सिंदुबा, यमाई, अंबाई अशा दैवतांना समाज मनोभावे पूजत होता. सिंदुबावर सर्व गावाची व आजूबाजूच्या गावाची श्रद्धा होती. समाजात श्रद्धेबरोबर अंधश्रद्धाही होती. नवस फेडण्यासाठी सिंदुबाच्या रथापुढे बायका, मुले लोळतात. पत्रिका पाहणे, भविष्य पाहणे, कोंबडे उतवणे, बकऱ्या कापणे अशा गोष्टी समाजात केल्या जात होत्या. याप्रमाणेच समाजात

दंतकथा ही होत्या. या दंतकथांचा आदर समाज करत होता. या दंतकथांवरच्या अती विश्वासामुळे समाज वास्तव परिस्थिती समजून घेऊ शकत नाही, परिणामी त्यांचच नुकसान होतांना दिसत.

## ५.१० भाषाः

भाषा म्हणजे संवादाचे मध्यम. भाषेमुळेच समाज अस्तित्वात आला. भाषेमुळेच समाजातील व्यक्ती एकमेकांना जोडल्या गेल्या. भाषा हा समाजजीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

'पांगिरा' ही ग्रामीण कादंबरी आहे. त्यामुळे त्यात बहुतांश ग्रामीण बोलीचा वापर करण्यात आलेला आहे. पांगिरात वापरलेली भाषा साधारण सातारा-कोल्हापूर या परिसरातील असावी. 'पांगिरा' तील भाषा मनाला भिडणारी, वास्तवपूर्ण आहे. अस्सल ग्रामीण शब्दांचा वापर चपखलपणे केलेला आहे. प्रसंगानुरूप रूढ ग्रामीण-म्हणी, प्रतिमा वाक्प्रचार यांचाही वापर प्रभावीपणे केलेला आहे. पांगिरातील ग्रामीण भाषेमुळे 'पांगिरा' कादंबरीची परिणातमकारकता कैकपटीने वाढलेली आहे.

'पांगिरा' कादंबरीत ग्रामीण भाषेबरोबर शहरी भाषेचाही वापर केलेला दिसतो. कार्यालयीन भाषेचा, शब्दांचा वापरही 'पांगिरा' त आहे. पांगिरातील काही पात्र जसे, सोकाजी, भिकुअण्णा, आमदार बाबा सावंत, संताजी काळे इ. प्रसंगानुरूप कधी ग्रामीण, तर कधी शहरी भाषेचा वापर करतात. स्त्रिया पूर्णपणे ग्रामीण-भाषेचाच वापर करतांना दिसतात.

'पांगिरा' तील भाषा समाजजीवनाचा आरसा आहे. 'पांगिरा' कादंबरीतील भाषेविषी म.द. हातकणंगलेकर म्हणतात,

''विश्वास पाटील यांची शैली ही त्यांच्या लेखन श्रेयाचे महत्त्वाचे अंग आहे. ती लोकसाहित्यात जन्मलेली, रमलेली शैली आहे. विषयाला सतेज त्वचेसारखी घट्ट बिलगलेली. तिची उदाहरणे पानोपानी सापडतात. केवळ शब्द, म्हणी आणि वाक्प्रचार बोलीभाषेतले आहेत, निवेदनाची जातही लोकसाहित्याची आहे. मन मात्र समकालीन ग्रामीण वास्तव तल्लख चोचीत पकडणारे. त्यामुळे वास्तवावर अधिक मोठे

जाळे टाकणाऱ्या दमदार साहित्यकृतीची अपेक्षा 'पांगिरा' वाचणाऱ्या वाचकांच्या मनात निर्माण होणे साहजिक आहे.'' (१२)

'भाषा' हे एकमेकांशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. 'भाषा' ही माणसाला मिळालेली दैवी देणगी आहे. भाषेमुळेच मानव जात एकमेकांशी जोडली गेलेली आहे. भाषेच्या माध्यमातून मानव प्रगतीची शिखरे पादाक्रांत करत आहे. 'भाषा' ही मानवाच्या जीवनात फार मोलाची कामगिरी बजावते. भाषेमुळे माणूस आहे. माणसामुळे कुटुंब आणि कुटुंबामुळे समाज. भाषेशिवाय माणूस जगू शकत नाही. मानव भाषेच्या माध्यमातून आपल्या भावना, विचार मांडू शकतो. ही देणगी फक्त मानवाला दिलेली आहे. भाषा ही एक सामाजिक संस्थेप्रमाणे काम करते. समाजातील व्यवहार, विनियमय, लेखी व्यवहार, राज्यकारभार, शैक्षणिक व्यवहार, आर्थिक व्यवहार इत्यादी सर्वकाही भाषेच्या माध्यमातूनच होत असते. भाषा ही अत्यंत महत्त्वाची आहे.

भाषेमुळे मानव आपल्या विविध भावना व्यक्त करतो. भाषेचा आणि साहित्याचा अन्योन्य संबंध आहे. भाषेशिवाय साहित्य अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यामुळे साहित्यातील भाषा ही महत्त्वाची भूमिका बजावत असते. साहित्यात वापरल्या जाणाऱ्या भाषेवरूनच साहित्याचा दर्जा निश्चित केल्या जातो. साहित्यिक आपल्या साहित्यात त्याची खास भाषाशैली वापरत असतो. त्याच्या संस्कारातील, अभ्यासातील, अनुभवातील शब्द तो साहित्यात वापरत असतो. व्यक्तीपरत्वे, प्रदेशापरत्वे, कालपरत्वे भाषा बदलत असते. स्त्रियांची, पुरुषांची व तरुणांची भाषा वेगवेगळी असते.

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यातील भाषा हे त्या कांदबऱ्यांच मोठ बलस्थान आहे. त्यांच्या कादंबऱ्यांच्या यशामध्ये त्यांनी कादंबऱ्यात वापरलेल्या भाषेचा फार मोठा वाटा आहे. कादंबऱ्यांतील भाषा साधी, सरळ, सोपी आहे. त्यांच्या भाषेला लोकसाहित्याचा गंध आहे. त्याच्यावर बालपणापासून भाषेचे जे संस्कार झाले, जी भाषा त्यांनी अनुभवली तिच्या खूना त्यांच्या साहित्यात दिसतात. त्यांच्या भाषेला ग्रामीण गोडवा आहे. अस्सल ग्रामीण वाक्प्रचार, म्हणी, शब्द त्यांनी कादंबऱ्यांमध्ये वापरलेले आहेत.

थोडक्यात विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमध्ये जो समाज दाखवलेला आहे, त्या समाजाची नैसर्गिक भाषा आहे. भरपूर समर्पक प्रतिमा वापरून भाषेचा अर्थ गडद केलेला आहे. कादंबऱ्यांतील भाषा रोजच्या जगण्यातली असल्यामुळे कादंबरीतील पात्रे, त्यांच्या समस्या, दुःख, भाव-भावना वाचकाच्या मनाला थेट भिडतात. कादंबरी वाचतांना वाचक पात्रांचा सहप्रवासी होऊन कादंबरीत वावरत असतो.

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास करतांना त्या समाजजीवनातील भाषेचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो. भाषेवरून समाज, संस्कृती कळते. म्हणून भाषेचा अभ्यासही केलेला आहे.

विश्वास पाटील हे आपल्या कादंबऱ्यातील भाषेविषयी म्हणतात,

‘‘लहानपणी जात्यावरची गाणी, लग्नातली गाणी, गौरी-गणपतीची गाणी इतर अशी अनेक लोकगीतं, काव्य माझ्या कानावरून गेलेली होती आणि त्यामुळे या लोककाव्याबद्दल मला मनापासून, पहिल्यापासून ओढ आहे आणि मोहनाराणीवरील गीत हे मी लिहिलेल आहे. धरणावरचे गीत मी लिहिलेले आहे. पण जी पावसाची गाणी आहेत ती मात्र परंपरागत आहेत. आणि ती मला माझ्या आईच्या कंठातून ऐकायला मिळाले. या काव्यातल्या काही ओळी मला पुढे महाबळेश्वर परिसरातील काही स्त्रियांच्या तोंडूनही ऐकायला मिळाल्या.

म्हणी, वाक्प्रचार यांच्या मोकळेपणाने वापराबाबत मी आरंभी सांगितल्याप्रमाणे माझ्या लेखनावर लोकसाहित्याचा परिणाम झाला. नकळत, माझ्या गावपांढरीनं, तिथल्या लोकांनी, त्या मुलखातल्या ज्या अनेक म्हणी ऐकल्या, गीत ऐकली आणि वाक्प्रचार कानी आले तेच कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात जपून ठेवलेले आहेत. आणि ते अभावितपणे त्या त्या वेळेला कागदावर उतरले गेले, पुन्हा एकदा नमूद करायचं म्हणजे माझ्या आई-वडिलांच्या दोघांच्याही तोंडून अनेक सुंदर म्हणी, वाक्‌प्रचार वारंवार मला ऐकायला मिळावे. त्याचाच उपयोग मला लेखनाच्या वेळी खूप झाल.

मला  असं वाटतं की भाषा कशी साधी, सोपी आणि सुटसुटीत असावी याचे परिपाठ शांता शेळके, आचार्य अत्रेंनी दिले होते. महाविद्यालयीन जीवनामध्ये मी आचार्य अत्रेंचं संपूर्ण साहित्य वाचले. साने गुरुजी वाचले, कुसुमाग्रज वाचले, अण्णा भाऊ साठे वाचले या सर्व लेखकांची भाषा ही साधी, सोपी, सुटसुटीत, प्रवाही आणि सहज काळजाला जाऊन भिडणारी होती. त्यामुळेच त्या भाषेचा एक नकळत परिणाम माझ्यावरही झाला. मला असं वाटतं की साधं लिहणं हे खूप अवघड असतं आणि साध लिहिण हे कसोटीचंही असतं.'' (१३)

१. **वाक्प्रचारः** 'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीत विश्वास पाटील यांनी भरभरून वाक्प्रचाराचा वापर केलेला आहे.  यामुळे वाक्याची परिणामकारकता वाढलेली आहे. वाक्यातील अर्थाला वजन प्राप्त झालेले आहे. प्रत्येक पानावर दोन-तीन वाक्प्रचार आहेत. काही नागरी भाषेतील वाक्प्रचार आहेत, तर काही ग्रामीण वाक्प्रचारही आहेत.

| | |
|---|---|
| खसखस पिकली | नाकावर टिच्चून |
| आवताण दिल | कळी खुलली |
| बोंब मारली | मुस्काटात देणे |
| हाशहुश करून | जीभ सैल सोडणे |
| ठिय्या मांडून | दातओठ खाणे |
| खाणाखुणा करणे | घाम फुटला |
| छाती फुगवणे | डोक्याला हात लावणे |
| आनंद बैठकीत मावत नव्हता | दंड थोपटून उभ राहणे |
| खदखदून हसली | घंगाळ वाजणे |
| वैषम्य वाटायच | माशा मारणे |

२. **म्हणीः-** ''प्रचलित बोधपर वाक्य'' ही व्याख्या शब्दकोशातील आहे.

वाक्प्रचारांप्रमाणे म्हणींचाही वापर विश्वास पाटील यांनी ‘पांगिरा’ या ग्रामीण कादंबरीत केलेला आहे. अस्सल ग्रामीण म्हणी वापरलेल्या आहेत.

१) कावळयान शाप दिला म्हणून डहाळी मोडत नाही. (१६).

२) देवाची करणी आणि नारळात पाणी (१७).

३) घाल खेटा आणि झिजीव पायताण (२८).

४) पोपटागत बोलून तू निम्या गावाला गाबण केल. (३२).

५) साठी नि बुद्धी नाठी. (२६).

६) कर्म तस फळ (४१).

७) मुकीला धरली, हाक ना बोंब. (५२).

८) आपलच पायताण आपल्याच टाळक्यात मारून घ्याव. (ग्रा.६४).

९) कावळयाच्या शापानं कुठं फांदी मोडती का? (८२).

१०) अवघड जागी दुखणं आनि जावाय पावणा वैदू .(९७).

३. **प्रतिमाः** ‘पांगिरा’ या ग्रामीण कादंबरीत प्रतिमा हुबेहूब अगदी समर्पक दिलेल्या आहेत. ग्रामीण प्रतिमांचा वापर अगदी चपखल केलेला आहे.

१) अडकित्त्यात सुपारी अडकावी तसा पांगिरा गाव त्याच्या (सोकाजीत्या) कचाटयात सापडला होता. (१९)

२) औताचा बैल सजवून झुंजीसाठी आणल्यावर त्याची जशी अवस्था होते तसा मानाजी बावरलेला होता. (२१)

३) भाव पाटलाच्या वडागत मोठा हो रं.ऽऽ (४९)

४) सर्वांनी एका काळजानं जमा व्हायच. (५१)

५) पहिला हप्ता आला आणि पाचोळयात उडून गेला. (५१)

६) अशी झकास चकचकीत फरशी होती की अगदी ऐन्यावानी काढावा कंगवा आणि पाडावा भांग. (५८)

७) भजनाच्या मंडपात आखाडा होणार असं दिसू लागल. (५९)

८) गणाला उभी राहिल्यागत दहा-बारा जण प्रांतापुढं उभी राहिली. (६५)

९) वाघ किंवा एकूर मारल्यागत साऱ्यांची थोबाड उजळून निघाली होती. (६७)

१०) नोटीसा बाशिंग बांधल्यागत झाडांना चिकटवल्या गेल्या. (६८)

**४. इंग्रजी शब्दः-** 'पांगिरात' इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे. समाजात जी भाषा बोलली जाते त्याचा वापर लेखक करत असतो. 'पांगिरा' कादंबरीतही समाजातील रूढ भाषेचा वापर केलेला आहे. समाजात इंग्रजी शब्दांचा वापर ग्रामीण भागातही सहज केला जातो. काही इंग्रजी शब्द इतके मराठी झाले की, ते इंग्रजी आहेत हे देखिल आपण विसरलो आहोत. इतके ते मराठी भाषेत एकरूप झालेले आहेत.

इंटरेस्ट हॉटेल, लाऊडस्पीकर, बँडवाले, चेअरमन, पँटशर्ट, लॉकअप, कलेक्टर, कमिशनर, स्टेशन बाहेर, मेंबर सोडावॉटर, ग्रज्युएट, हँगरवर, डॉक्टर, बॅलीस्टर, बँक मॅनेजर, रिसिव्हर, असेंब्लीत, अॅक्शन, कॉल, ऑर्डर लायटींग कॉल, सेंट.

**५. चित्रदर्शी भाषाः** 'पांगिरा' कादंबरीमध्ये चित्रदर्शी भाषेचा प्रत्यय येतो. व्यक्तींचे वर्णन, तमाशाचे, प्रसंगाचे वर्णन, गावाचे वर्णन, स्थळांचे वर्णन हे इतके हुबेहुब आहेत की, ते डोळयासमोर प्रत्यक्ष उभे राहतात. आणि हे विश्वास पाटील यांच्या भाषेच बलस्थान आहे. उदा. ''गावची श्रीमंती एका नजरेत ध्यानात येत होती. गावात रंगीत माडीची बरीच घरं दिसत होती. दोन-तीन ट्रॅक्टर बी रस्त्याच्या बाजूला उभे दिसत होते. एस.टी अड्ड्याला लागून छोटीशी बाजारपेठ दिसत होती. वाण्याउद्म्यांच्या दुकानाम्होरं अनेक शेतकरी उभे होते. दोन-तीन बारकुळी हॉटेलंही गिऱ्हाईकांनी भरली होती. ग्रामोफोनची रेकॉर्ड ऐकायला मिळत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला चार कारखान्यांची चार उस केंद्र उघडली होती. (१३)

उदा. ''पंच्याहत्तर हा आकडा ऐकताच धुळानं चित्त्यासारखी छेप घेतली. ''चिंचुकं हायत काय रं, भडव्या'' असं म्हणीत बोलणाराची नरडी धडली. मेलोऽऽ मेलोऽऽ ''धरा ऽऽ'' कालवा झाला.

ठिणगी पेटली. खदखदून भरलेल्या दारूच्या कोठारानं पेट घेतला. धडाधड जाळ पेटू लागला. शेतकरी हातात धावंल ते फेकू लागले. पोलिसांनी लाठयांच्या दणका सुरू केला.'' (पृ.२०६)

६. **शिव्याः** शिवी म्हणजे अपशब्द, दुर्भाषण (शब्दकोश)

समाजातील भाषेत-इतर शब्दांबरोबर शिव्यांचाही वापर होत असतो. रागाच्या प्रसंगी, भांडण्याच्या वेळी शिव्यांचा वापर-नौस र्गिकपणे होत असतो. ग्रामीण भाषेत शिव्या इतर शब्दांप्रमाणेच सहज वापरल्या जातात. अस्सल ग्रामीण शिव्यांचा वापर 'पांगिरा' त विश्वास पाटील यांनी केलेला आहे.

रांडुळया, ये टिंगारणे, भाडयाच्या, आयला, शेण्याच्या, भडवा, रांडांनो, हरामखोरांनो, वाटूळं होईल, भाडया.

७. **संवादः-** 'पांगिरा' तील भाषेतील संवाद बहुतांश ग्रामीण आहेत. या संवादातून ग्रामीण बोली, तिचा गोडवा, तिच्यातील शब्दरचना, अस्सल शब्द, वाक्प्रचार, म्हणी लोकांचा दृष्टीकोन, शैक्षणिकता, आर्थिकता समजते, समाजातील स्त्रियांचे विचार, पुरूषांचे विचार (विचारसरणी) या संवादाच्या माध्यमातून लक्षात येण्यास मदत होते.

१) अण्णा आणि शर्मा यांच्यातील संवाद.

''पावणं, कोण गावकर म्हणायच''?

''आलो आहे पुण्याहून''

''कोणच्या गावाला निघाला, म्हणायचं?

''पांगिरा''

''असं असं. पांगिरला कुणी पावणारावणा दिसतोय.'' (११)

२) ''अण्णा गावची लोकसंख्या?''

''असंल सहा-सात हजार''.

शर्मा साहेब, इथं मुक्काम कुठं ठोकणार?

''लॉजिंग''

''तसलं काय न्हाय इथं चला ऱ्हावा माझ्याच वाडयावर, तुम्ही खाऊन असं माझं काय संपणार? भरल्या गाडीला चिपाडाचं ओझं! शिवाय आपल्यासारखी गावची माहिती देणारा माणूस तुमास्नी शोधून सापडणार न्हाय.'' (१३)

## ८. लावण्या, गीते, आरत्या, पोवाडे, भजनः

'पांगिरा' तील समाजजीवनाचा अभ्यास करतांना त्या समाजातील भाषेतील गेयताही लक्षात घ्यावी लागते. पांगिरा गावात जत्रा असते. आणि जत्रा म्हणजे तमाशा आणि तमाशा म्हणजे लावण्या. त्या 'पांगिरा' त येतात. काही ठिकाणी स्त्रिया आपली दैनंदिन कामे करतांना ओव्या गुणगुणतात. तर विचारे गुरुजी देवीपुढे पारंपारिक आरती म्हणतात. अशा प्रकारे 'पांगिरा'तील भाषेत गेयता गीते पहायला मिळतात. देवासमोर भजन म्हणून गावकरी भक्तीत दंग होतांना दिसतात.

१) जत्रेनिमित्त पांगिरा गावात तमाशाचे फड उभे राहतात. ढोलकीच्या आवाजात खडया सुरात ताना घेत तमाशाला सुरवात होते.

''हेऽ बारा घरच्या गौळणी बारा।
आम्ही निघालो रे बाजाराऽ।।'' (पृ.१)

२) तमाशातील सुंदरा मोरा सारखी नाचत असते. नाचता-नाचता ती गाते.

''आमी गवळयाच्या ग नारीऽ
निघालू बाजारीऽ जी जी ग जी जीऽ''

नंतर गवळणी दह्या-दुधाचे माठ घेऊन मथुरेच्या वेशीवर पोहोचतात. मावशी पेंदया यांच्यात वाद चालला. तर राधा श्रीकृष्णाकडे पाहून म्हणते.

''नेसली ग बाई चंद्रकळा ठिपक्याचीऽ बाई ठिपक्याची।

तिरपी नजर माज्यावर या काळया किसन्याची।।''

अशा प्रकारे २ तास गवळणी चालल्या नंतर मुख्य तमाशाला सुरवात होते. सुंदरा नाचू-गाऊ लागते.

''बुगडी माजी सांडली ग जाता साताऱ्याला

ग बाई साताऱ्याला।

चुगली नगा सांगू ग माझ्या म्हाताऱ्याला

ग बाई साताऱ्याला।। (पृ.२,३)

'पांगिरा' कांदबरी ग्रामीण असल्यामुळे या कादंबरीत ग्रामीण भाषेचा वापर मोठया प्रमाणात केलेला आहे. अस्सल ग्रामीण बोलीचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. वाक्प्रचार, म्हणी, संवाद, शिव्या यामुळे भाषेचा गोडवा वाढलेला आहे. आधुनिकतेचा परिणाम म्हणून ग्रामीण समाजही इंग्रजी शब्दांचा वापर करतांना दिसतो. समाजात वापरल्या जाणाऱ्या भाषेत गेयताही आहे. ओव्या, आरत्या, भजन, लावण्या, पोवाडे, इ. भाषेतून सहजपणे प्रस्तूत झालेले आहे. काही ठिकाणी शहरी भाषेचा वापरही केलेला आहे. चित्रदर्शी भाषा हे विश्वास पाटील यांच्या भाषाशैली वैशिष्ट आहे. डोळयापुढे हुबेहुब चित्र उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे.

### ५.११ **ग्रामीण बदल (बदलते समाजजीवन)**

काळानुसार समाजात बदल होत असतो. वातावरण, व्यक्तींचे स्वभाव, पारंपारिक-विचारातील बदल, पारंपारिक पद्धतींमधील बदल, पारंपारिक वस्तूं वस्तूंमधील बदल, पोषाखातील बदल, भाषेतील बदल, राहणीमाणातील बदल, आचार-विचार-समज, शिक्षण, यांच्यात काळानुसार बदल होत असतो.

'पांगिरा' या ग्रामीण कांदबरीत १५-२० वर्षांच्या कालावधीतील बदल विश्वास पाटील यांनी मांडलेला आहे. १५ वर्षापूर्वीचे खेडे कसे होते, लोकांचा व्यवहार, विचार, वागणूक कशी होती. निसर्ग कसा होता आणि हळूहळू आधुनिकतेमुळे माणूस, गाव, निसर्ग कसकसा बदलत जातो याचे सूक्ष्म व वास्तवपूर्ण निरिक्षण विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' त नोंदविले आहे.

''पांगिरा गाव बदलत चालला होता. तेथील परंपरा, रीतितही बदल पडत होता. सिंदुबाच्या जत्रेत पूर्वीसारखी गर्दी, उत्साह नव्हता. मानू गुरव थोडयाफार जमलेल्या गावकऱ्यांना घेऊन सालकऱ्याच्या घरी निघतो. किसन गुरवाने यंदा साल पाळलेले असते. साल नावाचेच होत. पहिल्यासारख बायकापोरांना हात न लावता, मन मारून कुणी साल पाळत नव्हत. जत्रेच्या दोन दिवस आधी उघडया अंगाने नुसत्या धोतरावर बाजूला राहिल की पुरे गावकरी मूर्ती आणायला जातात. देवासमोर अंग मोडून लेझीम खेळणारे खेळगडी आता गावात शिल्लक नव्हते. गाव गाजविणारे ढोल नव्हते. बारीक सूर धरणाऱ्या पिपाण्या नव्हत्या. नसत गुलाल-खोबर शिल्लक तालही नव्हता आणि सूरही नव्हता त्याऐवजी फेरीवाल्याच्या गाडीत टेप ठेवला होता.'' (पृ.१८५)

सिंदुबाचा रथ ओढण्याइतकी ही माणसे जमत नव्हती म्हणून त्यासाठी ट्रॅक्टर लावला. डिझेल (त्यात) कोणी भरायचे यावरून सालकरी आणि पुजारी यांच्या भांडण चालतात. देव बावचळला. माणसं खोळंबली. बारा वर्षामागे रथ ओढतांना रथाच्या चाकाखाली गर्दीत मुलगा चेंगरून मेला होता. समुद्रासारखी माणस गोळा व्हायची. गळयातील दागिना देवावर फेकायची. जत्रेच्या वेळी चार-चार रात्री जागायची, नाचायची, सिंदुबाला सारं सारं आठवत होत. केवढा गाव बदलला होता. रथात बसलेला देव चांदीच्या डोळयांनी गावाकडे बघत होता! हाच का माझा गाव? स्वतःला प्रश्न विचारत होता. (पृ.१८६)

'पांगिरा' कादंबरीतील समाजजीवनात, कोणते कसे बदल होत गेले. ( काळासोबत) याचा आढावा घेतला. पूर्वीचे खेडे हळूहळू आधुनिकतेमुळे, भ्रष्टाचारामुळे, विभक्त कुटुंबपद्धती , प्रामाणिकपणा, दुष्काळामुळे, सरकारी योजनांमुळे, व्यापाऱ्यांमुळे, माणसाच्या स्वार्थी वृत्तीमुळे. या सर्वांमुळे पांगिरा गाव सधनते कडून एकसंघतेकडून, संपन्नते कडून दुष्काळाकडे, दारिद्रयाकडे बदलत गेले. ही एका बदलाची कहाणी आहे. विश्वास पाटील यांनी ग्रामीण बदल सूक्ष्मपणे टिपलेले आहेत. माणसांप्रमाणे निसर्गातील बदलही मांडलेला आहे.

### ५.१२ लोककला तमाशाः

स्वातंत्र्यानंतरच्या काळातील ग्रामीण खेडयाच वर्णन 'पांगिरा' या कादंबरीत केलेल आहे. स्वातंत्र्यानंतर हळूहळू १०-१५ वर्षात खेडे कसकसे बदलत जाते याच वर्णन 'पांगिरा' त केलेले आहे. ग्रामीण भागात मनोरंजनाच साधन म्हणजे लोककला होत्या. त्यातही तमाशा ही लोककला मनोरंजनात अग्रेसर होती. ग्रामीण भागात गावोगाव जत्रा भरत असत आणि जत्रेनिमित्त तमाशाचे फड लागत असत. तमाशा हा लोकप्रिय असा कलाप्रकार होता.

१) जसजसा काळ जात होता, तसतसा गाव बदलत चलला होता. आता गावात पूर्वीसारखा तमाशाचा फड लागत नव्हता. आधी पारावर, झाडाखाली तमाशा लागायचा. मातीतले कलावंत, उपाशी तापाशी, पोटातली भूक गिळून गावासमोर इंद्राचा दरबार उभा करायचे. आता जत्रा रोडावल्या. गेल्या दोन वर्षात पांगिरा गावात व्हिडीओ आला. १ रुपयांत देशो-देशींच्या अप्सरांच दर्शन घडत होत. त्यामुळे लोकांना तमाशापेक्षा व्हिडीओ आवडायला लागले. त्यामुळे तमासगीर कलावंत मंडळी देशोधडीला लागली. सुंदरा पंढरपूरकर ही नावजलेली कलावंतीन होती. आपल्या घुंगराच्या तालावर एके काळी तिने दहा जिल्हयाला वेड लावल होत. ती आता पन्नाशीची झाली होती. अटकर बांधा जाऊन अंग जाडजूड झाल होत. भरवशाच-ओळखीच गाव म्हणून सुंदरा, गोविंद शाहीर आणि २-३ झीलकरी पांगिऱ्यात राहत होते. कलाकारांना आपल पोट भरण्यासाठी हमीची कामे करावी लागत होती. राजा-प्रधान होऊन एके काळी इंद्राचा दरबार हलविणारा गोविंद शाहीर उन्हात लोखंडाने बुरूम फोडायचा. त्याची सवय नसल्यामुळे हाताला घट्टे पडत होते. सुंदरा जी फडावर हरिश्चंद्राची तारामती, रामाची सीता, आणि सुभेदाराची सून झाली होती तिच सुंदरा बुरमाची टोपली घेऊन उन्हात काम करायची. पायाला खडे टोचायचे. पण कामाशिवाय पोट भरायला तिच्याकडे दुसरे साधन नव्हते.

दुपारी जेवणाची सुट्टी झाली की इतर लोक गोविंद शाहीरला लावणी म्हणण्याचा आग्रह करीत. गोविंद शाहीर आढेवेढे न घेता लावणी म्हणायचा. त्याच्या साथीला झीलकरी दगडाच्याच झांजा समजून त्यावर ताल धरून रांजीऽ जीऽ करून साथ देत होते. (पृ.१७६)

२) रीतभात म्हणून पांगिरात फक्त नावालाच जत्रा भरत होती. काळानुसार गोष्टी बदलत होत्या. दोन वर्षापासून जत्रेत तमाशा आणला जात नव्हता. तमाशाला आता कुत्रसुद्धा विचारीत नव्हत. व्हीडीओ केंद्रानी अख्या गावाला विळखा घातला होता. चार-पाच रुपयांमधे व्हीडीओ अख्या बाया उघडयावाघडया बघायला मिळत होत्या त्यामुळे तमाशातली पाणचट विनोदाची पोपटपंची कोणालाही आवडत नव्हती. (पृ.१८१)

अशा प्रकारे 'पांगिरा' गावातील जत्रेत आणि एकूणच समाजात तमाशाला स्थान होते. मनोरंजनाचे साधन म्हणून लोक तमाशाला आवडीने जात असत. तमाशा कलावंत मात्र उपाशीपोटी, हाल-अपेष्टा, कसल्याही सुख-सोयीशिवाय उघडयावर, उन्हात तमाशा सादर करीत होते. लोकांचे मनोरंजन करणे हा त्यांचा उद्देश होता. कमी पैशांवर-गावकऱ्यांनी सांगेल तसे या कलावंतांना वागावे लागत होते. त्यांच्या तमाशाला गर्दी होत असे. गावोगावच्या जत्रेत हे कलावंत आपला तमाशा सादर करत असत. काळ जसजसा पुढे सरकतो तसतशा काही गोष्टी मागे राहतात. त्याचप्रमाणे जत्रा-तमाशा ह्या गोष्टीही आधुनिकीकरणामुळे मागे पडल्या. खेडोपाडी व्हीडीओ आल्यामुळे लोकांनी त्याला पसंती दिली. कारण कमी पैशात हव ते बघता येत होते. त्यामुळे या तमाशा कलावंतांचा 'तमाशा' बदं झाला. त्याकडे कोणी फिरकत नव्हते. कलावंतांना रोजगार राहीला नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. म्हणून त्यांना हमीच्या कामावर मिळेल त्या कामावर जावे लागले. हमीच्या, शेतीच्या कामाची सवय या कलावंतांना नव्हती. त्यांना ही कामे करणे अवघड जात होते. पण पोटासाठी त्यांना ही कामे करणे भाग होते. विश्वास पाटील यांची लोक कलावंतां बद्दल असलेली सहानुभूती या वर्णनातून निश्चितच जाणवते.

### ५.१३ न्यायव्यवस्था/वकिली व्यवसायः

'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीत न्यायव्यवस्था, वकील, कोर्ट, दावा, अपील, रिमांड याचा उल्लेख आहे. गुन्हेगाराला शिक्षा देण्याच मत्त्वाच काम न्यायालय करत असते. गुन्हा सिद्ध करण्याचे काम वकील करत असतात. सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यात वकील मदत करतात.

'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीत न्यायव्यवस्थेचे कामकाज. वकीलांचा व्यवसाय. वकीलांची फिस, सर्वसामान्य अज्ञानी जनतेचा वकील घेत असलेला फायदा, जनतेची अडवणूक, राजेशाही थाट इ. बाबींचे वर्णन पांगिरात आढळते.

१) मुरार तारखेसाठी तालुक्याला येतो. कोर्टाच्या आवारात गर्दी असते. वकील इकडे-तिकडे ये-जा करीत होते. त्यांच्या मागे-मागे पक्षकार मंडळी फिरत होती. पाटलाचा गोडबोले वकील हुशार होता. पंधरा वर्षांमागे मुरार हा गोडबोले वकीलाचा लाडका पक्षकार होता. पैसा नाही मिळाला तरी वकील काम करायचा तेव्हा जुन्या सायकलीवरून गोडबोले यायचा. पाटलासोबत हॉटेलात चहाभजी खायचा. पण आता जमाना पालटला. तेंव्हा पक्षकार शोधणाऱ्या गोडबोले वकीलाला आता दुनिया शोधत होती. पांढऱ्या फियाट मधून ते कधी येत कधी जात कळत नव्हत. वकील साहेब पैसा घेतल्याशिवाय बोलत नव्हते. त्यांच्या खर्चाचीही कलमं वाढली होती. जिल्ह्याला दोन बंगले होते. मुलगा कानपूरला आय.आय.टी करत होता. (पृ.३२)

२) लुबाडू वकीलः मुरार तारखेसाठी मामलेदाराच्या कोर्टात येतात. मात्र मंत्री येणार असल्यामुळे तारखा पुढे ढकलल्या होत्या. आता पुढच्या तारखेसाठी वकीलाला भेटायला पाहीजे होत. वकीलाची वाट पहात पाटील खोळंबले होते. दुपारी ३ वा. गोडबोले वकील आले. धनिक पक्षकाराशी साहेब आपुलकीने बोलत होते. मुरारने साहेबाला तारखेविषयी विचारल. गोडबोले म्हणतात फीचं काय केलं? पाटील बिना पेट्रोलची गाडी कशी चालणार? जा पाटील जरा थंड थम्सअप आणा. (पृ.३४,३५)

'पांगिरा' कादंबरीमध्ये वकील त्यांची स्वार्थी वृत्ती, बदलणारा स्वभाव, पैशांचा हव्यास, आशिक्षितांच्या, अज्ञानाचा गैरफायदा घेण्याची वृत्ती, श्रीमंतांच्या पुढे-पुढे करण्याची वृत्ती, प्रामाणिकपणे काम न करण्याची वृत्ती या सर्वांचे वर्णन 'पांगिरा' च्या समाजजीवनात आलेले आहे. सर्वसामान्य ग्रामीण जनता अज्ञानामुळे अशिक्षितपणामुळे, आपसातील हेव्यादाव्यांमुळे विनाकारण कोर्टकचेऱ्यांमध्ये वेळ, पैसा, आणि श्रम घालवतात.

### ५.१४ कुटुंबसंस्थाः

कुटुंब हा समाजाचा पाया आहे.कुटुंबसंस्था ही समाजातील महत्त्वाची संस्था आहे. अनेक कुटुंबांनी मिळून समाज तयार होतो. कुटुंब म्हणजे एक घर त्यात एकत्र राहण्याऱ्या व्यक्ती. लहान मोठे, अशा माणसांनी मिळून कुटुंब तयार होते. कुटुंबात वेगवेगळे नातेसंबंध पहायला मिळतात. नवरा-बायको, वाप-लेक, माय-लेक, भाऊ-भाऊ, जावा-जावा, सासू-सून, या नात्यांमधे कधी गोडवा, कधी कटूता, कधी जवळीक, तर कधी दूरावा असतो. 'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीत काही कुटुंबे आलेली आहेत. सोकाजीचे कुटुंब मुरारचे, बाबा सावंत, बाजी, धुळा-तुका, अण्णा, चिणू गुणाजीचे, विचारे गुरुजीचे, फौजदार-जाधवचे. इ. च्या कुटुंबाचा उल्लेख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काहींचा प्रामुख्याने काहींचा ओझरता आलेला आहे. कुटुंबाचा प्रमुख, कुटुंबातील स्त्री, मुल, सूना, सासू, भावंडे, जावा. असा उल्लेख 'पांगिरात'आलेला आहे.

१) **सोकाजीचे कुटुंबः-** गावात सोकाजीचा मोठा वाडा होता. सोकाजी गावचा सरपंच असतो. सोकाजीचा बारदाणा मोठा होता. घरात सत्ता आणि संपत्ती होती. पांगिरात सोकाजीइतका तालेकर कोणी नव्हता. सोकाजी गोड बोलून सर्वांना सांभाळायचा त्याची बायको वैजूवहिनी-गावातील लोकांना दही-दूध देत होती. अडल्या नडल्याला व्याजाने पैसे देत होती. सोकाजी एखादयावर रागावला, तरी ती गोड बोलायची. संपतराव सोकाजीचा मुलगा.तरुण असतो. सोकाजीच्या कामात मदत करतो. सोकाजी आपल्यानंतर संपतरावने गावचा कारभार पहावा यासाठी तो संपतरावला तयार करत असतो. भाऊ-मानाजी-धाकटा-शेती पाहत असतो. सोकाजी त्याला डेरीचा चेअरमन करतो. मानाजीची बायको चौथी पास असते. सोकाजीला तुकाच्या खुनात अटक होवून जामीनावर सुटका होते. तो देवपूजेला लागला होता. संपतरावने शेतीची बाजू सांभाळली होती. अजूनही गावावर उपकार करण्याचे काम सोकाजीचे घराणे करत होते. (पृ.१०)

२) **आमदार बाबा सावंतः-** आमदार बाबा सावंत आता म्हातारे झालेले असतात. आपल्या मुलाची श्रीपतरावची मिरवणूक, जयघोष, डामडौल आपल्यासारखा व्हावा अशी इच्छा बाबा सावंताची असते.

आपल्या घराण्याच राजकीय अस्तित्व त्यांला टिकवायचेच असते. त्यासाठी तो अटोकाट प्रयत्न करतो. श्रीपतरावचे शिक्षण–पुण्या–मुंबईला होते. (पृ.२२)

३) **मुरारचे कुटुंबः–** मुरार हे पांगिराचे पाटील असतात. त्यांच वय बरच असत. राधाई त्यांची बायको. मुलगा–बाजी सून लक्ष्मी, धाकटा मुलगा–हणुमंता अस मुरारच कुटुंब असते. मुरार स्वतः कष्टकरी, शेतात राबणारे, ४थी पास, राधाई–घरसंसारात दक्ष असते. लग्न होऊन नांदायला आली तेव्हा तिचे तीन दीर छोटे होते. मुरारची भावांवर माया होती. घरात बेतास बेत परिस्थिती होती. मुरारने घरासाठी, भावांसाठी नांगर उपसला. राधाईने त्यांना सोबत दिली. भाऊ मोठे झाले. दोनाचे चार झाले. घरात तान्हीनेणती लेकरबाळ हिंडू लागली. भावाभावांनी माळामुरडाचा फडयानिवडूंग काढला. सुरूंग लावून दगडाचं पीठ केल. सात–आठ वर्ष गुण्यागोविंदाचा संसार झाला. मात्र सोकाजीने भावाभावांमधे फूट पाडली. घराच्या वाटण्या झाल्या. (पृ.२६ ) मुरार आपल्या मुलांना बाजी, हणुमंताला हिंमतीने वाढवत होता. राधाईला मुरारची, मुलांची काळजी वाटत होती. हणुमंतासाठी ती सकाळी उठून डबा करत होती आणि गाडीवर पाठवत होती. मुरारला तारखेसाठी मावळ विकून पैसे देत होती. बाजीचा, सूनेचा कपडे घेण्याचा हट्ट पुरवत होती. मात्र गोड बोलून सोकाजी बाजीची जमीन स्वतःच्या नावावर करतो. बाजी व लक्ष्मीचे डोळे उघडतात. ते परत राधाई–मुरारकडे माफी मागतात आणि राधाई आणि मुरार मोठया मनाने त्यांना माफ करतात. बाजी, लक्ष्मी, हणुमंता सगळे एकत्र येऊन शेती करतात. सगळ कुटुंब गुण्यागोविंदाने नांदते. मात्र शेवटी कांदयाच्या बाजारात दंगल होते त्यात मुरार जखमी होतात.

४) **भिकु अण्णा चे कुटुंबः–** भिकु अण्णा हा गावातील अनुभवी, कायदयाच ज्ञान असलेला श्रीमंत होता. तो नेहमी कडक कांजी केलेला सदरा, टोपी, मलमलचे धोतर, पपायतान असा शाही पोषाख परिधान करत असे. भिकु अण्णा वाईट धंदे करत असतो, चोरीचा माल घेण, अफूची शेती इ. एकदा घरावर झडती येते. अण्णांची घरंदाज बायको हुंदके देते. मात्र काही सापडत नाही.

**विचारे गुरुजींचे कुटुंबः–** विचारे गुरुजी हे एक रिटायर्ड शाळा मास्तर असतात. अंकुश त्याचा मुलगा असतो. विचारे गुरुजी गावातील अंबाईच्या देवळात जात, तेथील डागडूजी करत, पेंन्शनचा पैसा

देवळाला लावत होते. याचा मुलाला अंकुशला राग येत होता. गुरुजी गरिबीत वाढले. आई नाही व्ह.फा. फायनल होऊन ते नोकरीला लागले. आयुष्यभर पैसा साठवला. रंगीत माडीच घर बांधल (पांगिरा) दोन पोरांना ग्रॅच्युएट केल. मात्र यात गुरुजीचा स्वार्थ असतो. ते गावकऱ्यांच्या जमिनी स्वतःच्या ट्रस्टच्या नावावर करतात. गावकऱ्यांना फसवतात. कायदेशीर बाबी पूर्ण करतात त्यामुळे गावकरी केस हरतात. अंबाई देवळाच्या ट्रस्टवर गाडी, घर घेतात. आरामात, ऐश्वर्यात राहतात. शेतीत वेगवेगळे प्रयोग करतात.

अशाप्रकारे. पांगिरात वेगवेगळे कुटुंब पहायला मिळतात. श्रीमंतांची घरे पक्की, सिमेंटची, रंगीत आहेत, तर गरीबांची घरे मातीची व लहान आहेत. कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. कुटुंबातील सर्वच सदस्य शेतीला हातभार लावतात. स्त्रिया कुटुंबाला आर्थिक हातभार लावतात. छोटी मुलेही कामात मदत करतात. पांगिरात आधी एकत्र कुटुंब नांदत होती मात्र हळूहळू विभक्त होत होती. (पृ.४७) चालत्या कुटुंबाच्या भिंती पाडा हा गावगाडयाचा रिवाजच झाला होता. विभक्त कुटुंबामुळे बैलांची निगा राहायची नाही. एकटयाची दमछाक व्हायची. बायकांना राजाराणीचा संसार हवा होता त्या नवऱ्याला वाटून घ्यायला सांगायच्या. संसार फुटले, सामाईक इंजिन नाही. एकटया दुकटयाला घेण परवडत नाही. शेतीला पाणी मिळेना. अशाप्रकारे विभक्त कुटुंबामुळे घराच आर्थिक नुकसान होत होते. मात्र पश्चाताप होऊन परत एकत्रही नांदत होते. एकत्र येऊन पुन्हा गुण्यागोविंदाने नांदत होते.

कुटुंबातील स्त्रिया पाहुण्यांचे आदरतिथ्यही करतात. जत्रेसाठी गावात प्रत्येकाच्याच घरी पाहुणे येणार असतात. म्हणून गावातील कुटुंब त्यांच्या खाण्यापिण्याची तयारी करतात.

**५.१५ शैक्षणिक स्थितीः**

शिक्षण हा समाजातील प्रगतीचा पाया आहे. शिक्षणामुळे समाजाची प्रगती होते. शिक्षण हे समाजातील महत्त्वाचा घटक आहे. शैक्षणिक संस्थांमुळे समाजात शिक्षणाचा प्रसार होत आहे.

'पांगिरा' ही ग्रामीण कादंबरी आहे. स्वातंत्र्यानंतरचा काळ या कादंबरीत पहायला मिळतो. ग्रामीण भागात प्रगतीचे, शिक्षणाचे वारे वहायला नुकतीच सुरवात झाली होती. शैक्षणिक उदासिनता ग्रामीण भागात पहायला मिळते. शेती हा मुख्य व्यवसाय व ती परंपरागत पद्धतीनेच ग्रामीण भागात करतात. त्यामुळे यासाठी शिक्षणाची आवश्यकता नाही. एकूणच शिक्षणाविषयी जागृती ग्रामीण समाजात नाही. शिक्षणाचा महत्त्व हळूहळू पटायला लागलेल आहे त्यामुळेच बायना, मुरार हे आपल्या मुलांना शिकवतात. आमदार, पोलीस अधिकारी, वकील आपल्या मुलांना उत्तमोत्तम शिक्षण देत आहेत. त्यांना शिक्षणाच महत्त्व कळलेल आहे. 'पांगिरा' त अशिक्षितता मोठया प्रमाणात जाणवते. अशिक्षिततेमुळे परावलंबीत्व वाढतांना दिसते. धनदांडगाई सहन करावी लागते. शिक्षित, गावातील बडयांचे, राजकारण्यांचे पाय अडाणी जणतेला धरावे लागतात. या अशिक्षितपणाचा फायदा पोलीस पाटलांपासून, तलाठी, फौजदार, वकील, आमदार, सभापती, गुरुजी इ. घेतात. अशिक्षितपणामुळे जणतेचे आर्थिक नुकसान मोठया प्रमाणात होतांना दिसते.

## ५.१६ समारोपः

अशाप्रकारे पांगिरा या कादंबरीतील समाजजीवन आहे. पांगिरातील समाज ग्रामीण आहे. शेती मुख्य व्यवसाय आहे. भाषा ग्रामीणच आहे. पोषाख पुरुषांचा -धोतर, सदरा, पटका, टोपी असा स्त्रियांचा पातळ-झंपर, श्रीमंतांचा पोषाख पँट-शर्ट, मलमलचे कपडे, भारी पोषाख आहे. ग्रामीण भागात बहुतांश लोक शेती हा व्यवसाय करतात. त्यामुळे आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. त्यामुळे दागदागिने हा विषयच येत नाही. मात्र डोरल, सोन्याचा सर, कुडया, पाटल्या अशा या दागिन्यांचा उल्लेख आहे. जर कांदयाला चांगला भाव मिळाला, तर दागिने घ्यावे असे स्त्रियांना वाटते. त्यांना लग्नात मिळालेले जे काही दागिने असतात ते गहाण किंवा विकलेले असतात. अन्न पदार्थांमधे वैविध्य नाही. आर्थिक स्थिती गरिबीची असल्यामुळे झुणका-भाकरी, मासे, मटण असे पदार्थ आहेत. खास प्रसंगी जत्रेच्या निमित्ताने मटण-भात, जिलब्या असे पदार्थ आहेत. श्रीमंत लोक - अण्णा, श्रीपतराव, तान्या

परगावी म्हणजे, तालुक्याला, जिल्ह्याला जावून हॉटेलमधे मटणबिर्याणी खातात. समाजात व्यसनाचे प्रमाण वाढतांना दिसते. तंबाखू खाणे हे व्यसन जास्त लोकांना आहे. बियर, दारू याचेही व्यसन समाजात आहे. गावात दारूचे दुकान उघडल्यामुळे व्यसनाधिनता वाढली. समाजात अशिक्षितता आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा अभाव आहे. मात्र हळूहळू शिक्षणाचा प्रसार होत आहे. ग्रामीण मुले शिकत आहेत. हणुमंता, आबा हे वकील होतात. श्रीमंतांची मुले-संपतराव, सावंत, वकीलाचा मुलगा, विचारे गुरुजीचे मुल, परगावी शिकत आहेत. काही शिकून आली आहेत. अशिक्षितपणामुळे ग्रामीण जणता फसवली, लुबाडली जात आहे.

पांगिरातील समाजजीवनात स्त्रियांना दुय्यम दर्जा आहे. मात्र स्त्री पुरुषांच्या बरोबरीने कामात हातभार लावते. काबाडकष्ट करते. शेतात, घरकाम करते. घराला आर्थिक मदत म्हणून बाजारात माळव विकते. नवऱ्याची काळजी घेते. गरिबीत संसार करते. पांगिरातील एकूणच समाजजीवनात शैक्षणिक उदासिनता आहे. फक्त मानाजी डोकरची बायको ४ थी शिकलेली असते असा उल्लेख आहे. तमाशा कलावंतीण स्त्रियांचे जीवनही कष्टमय आहे. म्हातारपणी त्यांना हमीच्या कामावर काम करावे लागते.

'पांगिरा' तील समाजजीवनात कुटुंबसंस्था महत्त्वाची आहे. एकत्र कुटुंबपद्धती आहे मात्र काळानुसार विभक्त कुटुंबपद्धती समाजात पहायला मिळते. कुटुंबपद्धतीमधे वेगवेगळे नातेसंबंध पहायला मिळतात. नवरा-बायको, बाप-लेक, माय-लेक, भाऊ-भाऊ,जावा-जावा,सासू-सून,अशा नातेसंबंधातील बारकावे पांगिरात पहायला मिळतात.

पांगिरातील समाजजीवनात सण-उत्सवही पहायला मिळतात. पांगिरात जत्रेचा उत्सव मोठया आनंदाने, उत्साहाने, कौतुकाने साजरा केला जातो. देवीचा भंडाराही विचारे गुरुजी करतात. गौरी-गणपती, नागपंचमी, दिवाळी अशा सणांचा केवळ उल्लेख आहे.

न्यायव्यवस्था ही एक सरकारी यंत्रणा आहे. ग्रामीण भागात कोर्टकचेऱ्याचे प्रमाण वाढत आहे. सर्वसामान्य जनताही दावे-प्रतिदावे वकीलाच्या मार्फत करतांना 'पांगिरा' त दिसते. वकील ग्रामीण जनतेच्या अशिक्षितपणाचा फायदा घेतात. श्रीमंत जणतेच्या अशिक्षितपणाचा फायदा घेतात. श्रीमंत

होतात. मात्र या कोर्टकऱ्यामुळे सामान्य जनता-रसातळाला जाते. त्यांच आर्थिक नुकसान मोठया प्रमाणात होत.

पांगिरातील समाजजीवनात राजकारण भिणलेले आहे. राजकारणी डावपेच, पक्ष, निवडणुका, मत मिळविण्यासाठी धडपड, आमदार खासदार, सरपंच, तलाठी, फौजदार या सर्वांचा उल्लेख पांगिरात आलेला आहे. स्वार्थी राजकारणी, राजकारण्यांचा दबाव, सर्वसामान्य जनतेची दिशाभूल, राजकारणाची घसरती पातळी, समाजाचा राजकारणत वाढत जाणारा सहभाग इ. गोष्टी पांगिरात आलेल्या आहेत.

पांगिरातील निसर्ग सुरवातीला उत्तम असतो. म्हणजे पांगिरात पाऊस, पाणी, पिके उत्तम असतात. मात्र वृक्षतोड, पाण्याचा अतिवापर, यामुळे पांगिरा गावात दुष्काळी परिस्थिती येते. निसर्गावरच मुख्य व्यवसाय शेती हा अवलंबून असतो. निसर्गाच्या कोपामुळे पीक घेण शक्य होत नाही परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

'पांगिरा' तील समाजजीवनात दंतकथा प्रचलित आहेत. कौरव-पांडवांच्या युद्धातील कुरूक्षेत्र म्हणजे यमाईचा डोंगर, सिंदुबाची कृपा, नदीतील तीन पुरुष डोह, जमीन पाण्यावर तरली आहे. इ. दंतकथा आहेत.

'पांगिरा' तील समाजजीवनात दळणवळणाची साधने-जीप, बस, बुलेट, सायकल, कार, बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर, फियाट, ॲम्बेसिटर, टेंपो इ. प्रसंगानुसार यातील वाहनांचा वापर पांगिरातील लोक करतात. ग्रामीण भाग असल्यामुळे बैलगाडीचा वापर मोठया प्रमाणात लोक करतात. श्रीमंत लोक जीप, कार यांचा वापर करतात. 'पांगिरा' तील समाजजीवनात भ्रष्टाचार मोठया प्रमाणात पहायला मिळतो. कंत्राटदार, आमदार, खासदार, तलाठी, सरपंच इ. भ्रष्टाचार करतात. विविध योजनांमधे पैसे खातात.

'पांगिरा' त बदलते समाजजीवन पहायला मिळते. पूर्वीच्या खेडयांमधे, लोकांमध्ये (निसर्गात) काळानुसार कसाकसा बदल होतो. व त्या बदलाचे काय परिणाम होतात याचे विश्लेषण पांगिरा त पहायला मिळते. एक संपन्न खेडे कसे लयाला जाते. हाच खरा या कादंबरीचा विषय आहे.

पांगिरातील समाजजीवनात धार्मिकता, श्रद्धा–अंधश्रद्धा पहायला मिळते. सिंदुबा हे ग्रामदैवत आहे. पांगिरा व आजूबाजूची गावे या देवाला श्रद्धेने पुजतात. नवस बोलतात व तो फेडतात. कुंडली बघणे, बकरी कापणे, कोंबडी ओवाळणे, पाण–सुपारी शेतात ठेवणे, पण त्या लावणे, परडया भरणे इ. श्रद्धा पहायला मिळतात. 'पांगिरा' तील समाजजीवनात लोककलेला महत्त्वाचे स्थान आहे. जत्रेतील तमाशाला लोक गर्दी करत, दाद देत. मनोरंजनाचे एकमेव साधन तमाशा होते. मात्र काळानुसार यात बदल झाला. व्हिडीओ आल्यामुळे तमाशा कला दुर्लक्षित झाली. कलावंताचे हाल होत होते. याचप्रमाणे गावात रामप्रहरी पिंगळा येत होता. आता त्याला भिकाऱ्याचे स्वरूप आलेले आहे.

पांगिरा तील समाजात काही खेळांचा उल्लेख आलेला आहे. सुरवातीच्या काळात कुस्ती, सुरपारंब्या, झोके, झिम्माफुगडी, असे खेळ आहेत. मात्र काळ बदलला तसे खेळही बदलले. क्रिकेट हा खेळ आता खेळला जातो.

'पांगिरा' तील समाजजीवनात रूढी–परंपरेला–प्रथेला महत्त्वाचे स्थान आहे. जत्रेची परंपरा, सणांची परंपरा, पंचपरंपरा, हुंडा प्रथा, दृष्ट काढणे, नारळ फोडणे, सुवासिणींनी ओवाळणे, मालाच्या गाडीची पूजा करणे इ. प्रथा परंपरा आहेत.

अशाप्रकारे 'पांगिरा' तील समाजजीवन आहे. 'पांगिरा' तील समाजजीवनात चांगली, वाईट, स्वार्थी, धार्मिक, श्रद्धाळू, अशिक्षित, सुशिक्षित, कष्टकरी गरीब, श्रीमंत इ. लोक राहत आहेत. काळानुसार समाज, समाजातील लोकांची माणसिकता, निसर्ग, व्यवसाय, वृत्ती बदलतांना दिसते. पांगिरातील समाज साधनतेकडून, संपन्नतेकडून दुष्काळाच्या खाईत कसा जातो हे 'पांगिरा' त आहे.

## ५.१७ संदर्भः

१. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, ''ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध,'' स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, आ. तृतीय, २००७, पृ.क्र.२४.

२. संपा. अनिरूद्ध कुलकर्णी, ''प्रदक्षिणा खंड-२'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००८, पृ.क्र.१६९.

३. आनंद यादव, ''ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या'', मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, आ.तृतीय, १९९३, पृ.क्र.६.

४. संपां. अनिरूद्ध कुलकर्णी, उनि, पृ.क्र. १६९.

५. संपा. गर्गे आणि इतर, ''भारतीय समाजविज्ञान कोश खंड-२'', समाजविज्ञान मंडळ पुणे, १९८६, पृ.क्र. १६९.

६. तत्रैव, पृ.क्र.३९८.

७. तत्रैव, पृ.क्र.४०१.

८. तत्रैव, पृ.क्र.४०१.

९. तत्रैव, पृ.क्र.४०३.

१०. संपा. गर्गे आणि इतर, ''भारतीय समाजविज्ञान कोश खंड-१'', समाजविज्ञान मंडळ पुणे, १९८६, पृ.क्र. १५८.

११. संपा. गर्गे आणि इतर, ''भारतीय समाजविज्ञान कोश खंड-२'' उनि , पृ.क्र.३०१, ३९७, ३९८, ४००, ४०१, ४०२, ४०४.

१२. म.द. हातकणंगलेकर, ''महाराष्ट्र साहित्य पत्रिका'', अंक २५६, जाने-मार्च १९६१, पृ.क्र.१६.

सुवर्णा निंबाळकर, ''शोध झाडाझडतीचा'', पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००३, पृ.१४८, १४९.

१. **प्रकरण सहावे**

# झाडाझडती कादंबरीतील समाजजीवन

## अनुक्रमणिका


६.१ प्रस्तावना

६.२ सामाजिक कादंबरी

६.३ 'झाडाझडती'तील रूढी-परंपरा-प्रथा

६.४ 'झाडाझडती'तील राजकारण आणि भ्रष्टाचार

६.५ 'झाडाझडती'तील स्त्री जीवन

६.६ 'झाडाझडती'तील सण-समारंभ-उत्सव

६.७ 'झाडाझडती'तील पोषाख व दागदागिने

६.८ 'झाडाझडती'तील आर्थिक स्थिती

६.९ 'झाडाझडती'तील धार्मिक स्थिती, श्रध्दा, अंधश्रध्दा व दंतकथा

६.१० 'झाडाझडती'तील भाषा

६.११ 'झाडाझडती'तील न्यायव्यवस्था

६.१२ 'झाडाझडती'तील कुटुंबसंस्था व नातेसंबंध

६.१३ 'झाडाझडती'तील शैक्षणिक स्थिती

६.१४ 'झाडाझडती'तील समस्या

६.१५ 'झाडाझडती'तील व्यवसाय

६.१६ समारोप

६.१७ संदर्भ

## ६.१ झाडाझडती प्रस्तावना :

'झाडाझडती' ही विश्वास पाटील यांची वास्तवदर्शी सामाजिक कादंबरी आहे. कादंबरी विश्वात 'झाडाझडती' ही सामाजिक कादंबरी मैलाचा दगड ठरणारी आहे. विश्वास पाटील हे स्वत: पुनर्वसनाच काम पहात होते. त्यावेळी धरणग्रस्तांच्या अनेक समस्या, दु:ख, प्रश्न त्यांनी स्वत: ऐकले. अनेक धरणग्रस्त त्यांना स्वत: येऊन भेटत व आपले दु:ख व्यक्त करत होते. विश्वास पाटील हे स्वत: शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना या शेतकऱ्यांविषयी, धरणग्रस्तांविषयी कणव वाटत होती. मग त्यांनी स्वत: धरणग्रस्तांच्या गावांना, त्या परिसराला भेटी देऊन सत्य परिस्थिती पाहिली. त्याचा अभ्यास केला. शिवाय स्वत:चा सरकारी अधिकाऱ्याचा स्वानुभव होताच यातून 'झाडाझडती' ची निर्मिती झाली.

कष्टकरी, शेतकरी, पददलित अशांविषयी विश्वास पाटील यांना मुळातच आस्था आहे आणि ही आस्था, कणव कादंबरीत प्रतिबिंबित झाली आहे. विश्वास पाटील यांचे स्वत:चे अनुभवविश्व बहुकेंद्रित असल्यामुळे ते कादंबरीत ही उतरले आहे. 'झाडाझडती' कादंबरीतील घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रणे त्या पात्रांची भाषा, जगण्यातील चढ-उतार, भावूक प्रसंग, संघर्षाचे प्रसंग, नात्यांमधील बंध, सरकारी कामकाज, राजकीय व्यक्तीचे वर्चस्व, धनदांडग्यांची दडपशाही, मृत्यूच्या हेलावणाऱ्या घटना, जीवनावश्यक गोष्टीसाठी करावा लागणारा टोकाचा संघर्ष, आर्थिक स्थितीनुसार समाजात निर्माण झालेली दरी, प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याची धडपड करणारी, सत्व टिकवून ठेवणारी माणसे हे सर्व कुठेही काल्पनिक वाटत नसून वास्तवाची जाणीव होते. या सर्वांतून थेट समाजवास्तव लेखकांनी वास्तववादी भाषेतून मांडलेले आहे. योजनांमुळे माणसे उद्ध्वस्त होतात हे योजनेचे अपयश विश्वास पाटील यांनी मांडले. पुनर्वसन कायदा असला तरी त्याची अंमलबजावणी होत नाही. हे त्यांनी सडेतोडपणे मांडले आहे. राजकारणातील व सरकारी कार्यालयातील स्वार्थी, भ्रष्टाचारी वास्तव बेडरपणे मांडलेले आहे.

'झाडाझडती' ही विश्वास पाटील यांची सामाजिक वास्तवदर्शी कादंबरी आहे. 'झाडाझडती' ही धरणग्रस्तांच्या जीवनाचा, त्यांच्या संघर्षमय जीवनाचा, कष्टाचा, मरणप्राय जगण्याचा वेध घेते.

या कादंबरीत धरणग्रस्तांच्या दु:खाला वाचा फोडली आहे. धरणग्रस्तांच्या समस्या, दारिद्र्य यांची फसवणूक, त्याची अगतिकता, त्यांची होणारी अडवणूक, त्यांना मिळणारी तुच्छतेची वागणूक, राजकारण्यांकडून सरकारी कर्मचाऱ्यांकडून, गावातील धनदांडग्यांकडून त्यांच्यावर होणारा अन्याय, दडपशाही याचे सखोल वास्तवपूर्ण वर्णन विश्वास पाटील यांनी केलेले आहे. धरणग्रस्तांचे रोजचे मरण, झगडणे यात आहे. धरण बांधून १५ वर्षे होऊनही धरणग्रस्तांना न्याय मिळत नाही. दिवसेंदिवस त्यांच्या समस्या वाढतच आहेत आणि धरणग्रस्त ओढून-ताणून हजार समस्या गैरसोयी घेऊन कसेतरी जगत आहेत, संघर्ष करत आहेत.

जांभळी गाव आणि आजूबाजूची गावे धरणाच्या पाण्याखाली जातात, धरणग्रस्तांना खैरपूरात जागा मिळते. जांभळी गावातील लोकांची ताटातूट होते, काही लोक केळापूरला जातात. धरण होण्यापूर्वी धरणग्रस्तांना अनेक आश्वासने दिली जातात. चांगली जागा, चांगली शेती, वीज, नळ, चकाचक रस्ते, शाळा, धरणग्रस्तांना नोकऱ्या अशी बरीच आश्वासने दिली जातात. मात्र ती पाळली जात नाहीत. धरणग्रस्तांना स्वत:च गाव, जमीन, घर, शेती, दैवत, माणसे, सगळे-सगळे सोडून निर्वासितांसारखे दुसऱ्यांच्या गावात जावे लागते. त्या गावातील लोक त्यांना आपल समजत नाहीत. स्वत:च्या चांगल्या जमिनी न देता (बागायती) पडीक जमिनी देतात आणि धरणग्रस्तांनी त्या नीट करून शेतीसाठी तयार केल्या की पुन्हा त्या काढून घेतात. राजकारणी, सरकारी कर्मचारी यांना धरणग्रस्तांविषयी अजिबात आस्था नसते. धरणग्रस्तांची कामे वर्षानुवर्षे रेंगाळत असतात. रहायला घर नाही, कसायला जमीन नाही जी आहे त्यातही हजार भानगडी, हाती पैसा नाही, भिकाऱ्यासारखे जगणे, अनंत अडचणी अशा अवस्थेत धरणग्रस्त जगतात. ते कसे जगतात याचे अतिशय कळकळीने वर्णन विश्वास पाटील यांनी केलेले आहे.

‘झाडाझडती’ ही सामाजिक कादंबरी आहे. त्यामुळे समाजातील धरणग्रस्तांचे जीवन त्यांनी वास्तवपूर्ण मांडले. समाजातील विकास, समाजातील राजकारण, समाजातील लोकांच्या समस्या, समाजातील लोकांची वृत्ती, समाजातील अशिक्षितता, समाजातील दारिद्र्य, समाजातील लोकांचा व्यवसाय, समाजातील स्त्रियांची स्थिती इत्यादी सामाजिकतेचा विचार या प्रकरणात करणार आहोत.

विश्वास पाटील यांची ‘झाडाझडती’ ही सामाजिक कादंबरी आहे. त्यामुळे या कादंबरीमध्ये सामाजिकता मोठ्या प्रमाणात आहे. ‘झाडाझडती’ तील समाज त्यांच्या गुण–दोषांसकट वाचकाच्या डोळ्यापुढे ठळकपणे उभा राहतो. ‘झाडाझडती’ विषयी सदा कऱ्हाडे म्हणतात,

‘‘१९६० नंतर बहुजननिष्ठ सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या तरी रूढ नमुनारूपातील तंत्रमंत्राचीच अनुकृती होत राहिली. पण विश्वास पाटील यांच्या ‘झाडाझडती’ ने सामाजिक कादंबरीचे नवे नमुनारूप सिध्द केले. ही अत्यंत स्पृहणीय व स्वागतार्ह घटना आहे.’’(१)

‘झाडाझडती’ कादंबरीत घटना प्रसंगांच्या अनुषंगाने येणारे समाजाचे चित्रण वास्तव आहे. या कादंबरीत समाज त्याच्या सर्व अंगोपांगांसह उभा राहतो. समाजाचे स्वरूप, वैशिष्ट्ये, घटक अशा सगळ्या गोष्टी ठळकपणे जाणवतात. याविषयी शंकर सारडा लिहितात,

‘‘‘झाडाझडती’ हे एक विशाल समूहचित्र आहे. धरणग्रस्तांची समस्या त्यात केंद्रिभूत आहे, परंतु त्यापेक्षाही त्यातून होणारे जीवनदर्शन हे अत्यंत व्यापक आहे. पंधरा वर्षांचा काळ या घटनाक्रमाचा असला तरी त्याला प्रदीर्घ भूतकाळाची जोड आहे. दंतकथा, डोंगरदऱ्या, देवदेवस्की, श्रध्दा, अंधश्रध्दा या सर्वांतून ती स्पष्ट होते. जन्म, विवाह, बाळंतपण, ऋतूचक्र, बलात्कार, मारामाऱ्या, आत्महत्या, खून, मृत्यू, मोर्चे, निदर्शने, संप, ग्रामपंचायत ते मंत्रालय साखरकारखाने, दूधसंघ, शिकार आणि हल्ले, घातपात, यांचा एक मोठाच नाट्यपूर्ण पट आपोआप पुढे येतो.’’(२)

विश्वास पाटील यांच्या ‘झाडाझडती’ या ५१९ इतक्या पृष्ठसंख्येच्या कादंबरीमध्ये सामाजिकता पानोपानी व्यापलेली आहे. ‘झाडाझडती’ समाजजीवन पाहण्याआधी सामाजिक कादंबरी म्हणजे काय याची थोडक्यात ओळख करून घेऊ.

## ६.२ सामाजिक कादंबरी :

''**सामाजिक कादंबरी :** विविध पात्रे, त्यांच्या कृती आणि एक ठराविक कालखंड या कादंबरीमध्ये रंगवलेला असतो. या कादंबरीमध्ये विशिष्ट स्थळ व त्याचे भरपूर तपशील कादंबरीकार देत असतो. या कादंबरीमध्ये एक सामाजिक संदर्भ असतो. विविध व्यवसायाची, वयाची, स्वभावाची माणसे असलेला समाज जी एका विशिष्ट देशाचाच एक छेद असतो. त्यातली माणसे त्या विशिष्ट संस्कृतीचे नमुने असतात आणि कोणत्या ना कोणत्या उच्च, मध्यमवर्गीय, कनिष्ठ वर्गाचे प्रतिनिधीत्व करीत असतात. एका विशिष्ट सामाजिक वातावरणाची निर्मिती या कादंबरीत महत्त्वाची ठरते. ह्यासाठी माणसामाणसांमधील परस्पर व्यवहारांचे चित्रण ही कादंबरी विशेषत्वाने करते. सामाजिक कादंबरीचे वैशिष्ट्ये हे की ती परिवर्तनशील गतिशीलतेवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे काळानुसार, परिस्थितीतील बदलानुसार मानवी संबंधामध्ये कसा फरक पडत जातो. त्याचे चित्रण ती करते. त्यामुळे सामाजिक कादंबरी सतत गतिमान असलेल्या काळाचे भान देते. काळानुसार बदलत जाणाऱ्या सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तनाचे मानवी वर्तनावर कसे कसे परिणाम होतात याचे चित्रण सामाजिक कादंबरी करते. त्यातून निर्माण होणाऱ्या नैतिक प्रश्नांचा ऊहापोह करते. सामाजिक कादंबरीचे मूल्यमापन करताना ती कादंबरी समाजाच्या गतिशील परिवर्तनाचे बदलत्या काळाचे काळानुसार बदलणाऱ्या मानवी वृत्तीप्रवृत्तीचे आणि मूल्यव्यवस्थेचे चित्रण करते की नाही हे पाहणे म्हणजे सामाजिक कादंबरीची समीक्षा करणे होय.'' (३)

सामाजिक कादंबरीमध्ये समाज, समाजातील समस्या, प्रश्न, बदल, वृत्ती, व्यक्ती इत्यादी गोष्टी चित्रित होतात. समाजाचे सूक्ष्म वर्णन या कादंबरीत असते. सामाजिक जीवनाचे चित्रण करतांना लेखकही त्या समाज जीवनातील एक असतो. त्यामुळे व्यक्तिचित्रणात, आशयात, विषयात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला असतो. सामाजिक कादंबऱ्यांचे तीन प्रकार असतात. यातील वास्तववादी सामाजिक कादंबरी ह्या प्रकारात विश्वास पाटील यांचे लेखन मोडते.

''**वास्तववादी कादंबरी :** या कादंबरीच्या मुळाशी सभोवतालच्या सृष्टीचे चित्रण. काल्पनिक कादंबऱ्यांची प्रतिक्रिया म्हणूनच वास्तववादी कादंबरी जन्माला येते. सामान्य घरगुती जीवनाचे चित्रे देणाऱ्या

कादंबऱ्या याच वर्गात मोडतात. समाजातील निरनिराळे दोष, उणिवा, समाजास प्रतिदिन भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांकडे कादंबरीचे लक्ष वळते म्हणून वास्तववादी कादंबरी लिहित असताना उपहास पध्दतीने दोषाविष्करण करण्याची किंवा समाजातील विस्कटलेल्या घडीच्या मुळाशी असणारी कारणे हुडकून काढून त्यांच्या परिहाराचे उपाय सुचविण्याची त्याला इच्छा होते व त्यामुळे वास्तववादी कादंबरीचे टीकात्मक व प्रश्नात्मक असे दोन प्रकार आढळतात.

समाजातील तळाच्या लोकांच्या जीवनाचे चित्र रेखाटणे, श्लील अश्लील बंधने झुगारून देऊन समाजाच्या जीवनाच्या सर्व अंगाचे यथार्थ चित्र, मानसिक खळबळीचे चित्रण ही सामाजिक कादंबरीची अंगे आहेत.'' (४)

### ६.३ 'झाडाझडती'तील रूढी-परंपरा-प्रथा :

रूढी परंपरेचा शब्दकोशातील अर्थ : परंपरा - पूर्वीपासून सारखा चालत आलेला. रूढी - प्रघात, वहिवाट

रूढी-परंपरा प्रथा समाजात पूर्वापार चालत आलेल्या असतात. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. समाजात या परंपरांना महत्त्वाचे स्थान असते. परंपरांना, प्रथांना धरूनच समाज वाटचाल करत असतो. समाजातील लोकांचा परंपरांवर गाढ विश्वास असतो. म्हणून ते परंपरांचे पालन करतात.

'झाडाझडती' या कादंबरीत समाजातील काही प्रथा-परंपरा पहायला मिळतात. सुवासिणींनी आवाळण्याची प्रथा, दत्तक घेण्याची प्रथा, दृष्ट काढण्याची प्रथा इ. आहेत. याशिवाय अंतिम संस्काराच्या प्रथाही यात आहेत. मेल्यावर अंगारा लावणे, पाटावर बसवून दह्या-दुधाने अंघाळ घालणे इत्यादीं. घरातील व्यक्ती मेली असेल, तर घरातील लग्न एक वर्षाच्या आत करावे लागते. नाहीतर ३ वर्षे करता येत नाही. ही प्रथा आजही पाळली जाते. ग्रामदैवताला कौल लावण्याचीही प्रथा पहायला मिळते. काळुबाईला गावातील लोक आपल्या समस्या निवारण्यासाठी कौल लावत असत. दृष्ट होऊ नये म्हणून मुलाची सूनेची मीठ-मोहऱ्या उतरवून टाकण्याची प्रथा काजळ लावण्याची प्रथा आहे. आजही ही प्रथा पाळली जाते. गाव, घर सोडून जातांना त्या

जागेची पूजा करणे, दही–भाताचा नैवेद्य दाखवन त्या जागेला दंडवत घालण्याची प्रथा आहे. शिवाय नवीन जागेत राहण्याआधी त्याचीही पूजा करतात. परंपरागत काही प्रथा आहेत. पहिल बाळंतपण माहेरी व्हाव ही प्रथा आहे. मात्र आवडा ही प्रथा मोडते आणि फुलाच बाळंतपण सासरी करते. बाळंतवीडा, शिदोरी, आहेर अशाही प्रथा आहेत. हुंडा प्रथा 'झाडाझडती'त आहे. शेवंतीच्या सासऱ्याला आठ हजार हुंडा गुरुजी देतात. शेवंतीचा हुंड्यासाठी छळ होतो. बापाकडून बुलेट आण म्हणून तिला माहेरी पाठवतात. कुशापाच्या मुलीलाही पंधरा हजार हुंडा देण्याचे ठरते. अशा प्रकारे ठिकाण बागायतदार, नोकरदार असेल तर हुंड्याचे पैसे वाढतात आणि धरणग्रस्त असेल तर कमी होतात. पण यालाही अपवाद म्हणजे हैबती आणि पांडू येताळाचा मुलगा या दोघांच्याही लग्नात देवघेव झाली नाही. लग्न साधेपणाने होत.

## ६.४ 'झाडाझडती'तील राजकारण आणि भ्रष्टाचार :

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीत समाजातील राजकरण, राजकारणातील व्यक्ती, त्यांची वृत्ती, काम करण्याची पध्दती, त्यांचा सत्तेचा वापर, सत्ता मिळविण्यासाठी व टिकविण्यासाठी वापरलेले वैध–अवैध मार्ग, गरीब–अशिक्षितांविषयी वाटणारा अनादर इ. अनेक राजकारणाशी निगडित गोष्टी झाडाझडतीच्या समाजजीवनात पहायला मिळतात. शिवाय भ्रष्टाचाराची वाढती वृत्तीही पहायला मिळते.

१) जांभळी धरण व्हाव म्हणून खासदार शिंगाडे उपोषणाला बसतात, शिंगाडे जुना जाणता पुढारी असतो. त्याचा दबदबा असतो. उपोषणाला बसल्यामुळे खालपासून वरपर्यंत चक्र हालतात. शिंगाडे दिसायला उंच, गोरे, अंगात खादीचे कडक कपडे, जांभळीकरांना जेलमध्ये टाकलेल त्यांना आवडत नाही. लोकांना सोडवून वाड्यावर आणतात. शिंगाडेंना आपल्या परिसराचा विकास व्हावा हा ध्यास होता. स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेला होता. लोकाग्रहास्तव खासदार झाले आता मंत्री होण्याची इच्छा होती. (पृ. ६, ७, ३०) स्वत:ची दिडशे एकर जमीन पाण्याखाली यावी. आपल्यासोबत गावांचाही विकास व्हावा म्हणून तरुणपणी जांभळी योजनेची मागणी करतात. खूप प्रयत्न करतात. पण यश येत नाही. खासदारांनी आपली प्रगती थांबवली नाही. स्वत:ची मोठी एजन्सी, पुतण्यांची दारूचे तीन दुकान, दोन पेट्रोल पंप असा पैशाचा ओघ सुरूच होता.

जांभळी धरणाचा नाद त्यांनी सोडला होता. पण मुलाच्या हट्टासाठी मुलाला साखर कारखाना काढण्यासाठी ऊसक्षेत्र पाहिजे आणि ऊसासाठी पाणी आणि पाण्यासाठी धरण म्हणून शिंगाडे उपोषणाला बसून धरणाची मागणी पूर्ण करतात. सभेत खासदार धरणग्रस्तांशी गोड बोलतात. ''विकासासाठी कोणीतरी झळ सोसलीच पाहिजे. धरणग्रस्त म्हणजे धरतीची लेकरं, आम्ही तुम्हांला पोटाशी बांधू, उघड्यावर पडू देणार नाही. तुमचा राग आम्ही विसरणार नाही. जेवढी तुमची जमीन जाईल, तेवढी जमीन देऊ घराच्या बदली घर देऊ, फणाला फण आणि खणाला खण देऊ! ह्या जांभळी गावाचं पुनर्वसन माझ्या स्वत:च्या गावात खैरापुरलाच झालं पाहिजे. ह्या वनवासी लेकरांवर माझीच नजर राहिली पाहिजे. कलेक्टरजी, प्लॅन बदला चला, खैरापूरला चला. अनेक लोकांच्या विकासासाठी यांनी गाव पाठीवर घेऊन निघायचं. बापजाद्यांची मिळकत, देवदेवस्की सोडायची अन् देशोधडीला लागायचं? अजिबात नाही. कलेक्टरसाहेब, मी प्रामाणिकपणे सांगतो आमच्या गावात क्षेत्र कमी पडलं तर खुशाल माझ्या वीस–चाळीस एकरांत धरणग्रस्तांनी औतं घालावीत. तुम्ही धरणग्रस्त नाराज आहात. तुमचं मन कसनतंय. पण काळजी कशाला करता? ही माझ्या गावची माणसंच सांगतील तुम्हाला ये राघू भिवा, ऊठ ऽ ऽ ये, बाळकू भैरू ऊठ, वसंता, बाळासाहेब, ऊठा सांगा काय करणार तुम्ही आमच्या धरणग्रस्तांसाठी ? तुम्ही धरणग्रस्त, आता वर डोंगरात अडचणीत राहता. तिथं ना चांगल्या शाळा, ना देऊळ, ओढ्या ओघळीचे रस्ते आणि जुनाट पडकी घरं. मरणाचा पाऊस आणि गुडघाभर चिखल. या माझ्या गावात शासनाच्या पायरीवर डोकं फोडून जीव देतो. पण तुमच्यासाठी नवी सिमेंट क्राँकिटची घरं, डांबरी शेड, दारात नळाच्या कारंज्या, घराघरांत वीज आणि शेतात ऊस स्वर्गसुख स्वर्गसुख म्हणतात ते अजून काय असणार आहे? मनातली स्थलांतराची भीती सोडा. पुनर्वसनाची फिकीर सोडा. माझ्या गावात तुमचं पाऊलं, म्हणजे स्वर्गातलं पाऊल ! तुमच्या जीवाला बोचणी तर माझ्या काळजाला कळ फिकीर कशाला करता?'' (पृ. ४०)

असं खासदार गोड बोलून नोकरीच अमिष दाखवून धरणाला लोकांची संमती मिळवतात आणि पुढे गोड बोलून धरणग्रस्तांना म्हणतात, ''मंडळी बघितलात ना आमचा गाव? आवडला नं? जमिनी आता दिसतात उघड्या बिनपिकाऊ. पण तुमच्या धरणाचं पाणी येऊ दे एकदा. पहा कसे सोन्याचे कोंब फुटतात शिवारात. ऊसाशिवाय दुसरं कुठलं पीक घ्यायला नको. आता आमचा कारखानाही मंजूर होईल. तुम्ही

सर्वांनी सभासद व्हायचं कारखान्याचं. आमचे राघू भिवा आहेत. राऊ आहेत. सर्जेराव आहे. धरणग्रस्तांनी घाबरायचं नाही. उपाशी असाल तर खुशाल आमच्या बुट्टीतली भाकरी ओढा. '' (पृ.५४, ५५)

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीत राजकारण, त्यातील व्यक्ती, सत्ता, सत्तेची नशा, सत्तेसाठी काहीही करण्याची तयारी, सत्तेचा गैरवापर, सत्तेपुढे झुकणारे सरकारी कर्मचारी इ. चे वर्णन अतिशय वास्तवपूर्ण आहे.

खासदार शिंगाडे स्वत:च्या स्वार्थासाठी उपोषणाला बसून जांभळी धरणाला परवानगी मिळवतात. गोड बोलून धरणग्रस्तांची संमती मिळवतात. दत्तू सरपंच आपल्या पदाचा वापर करून जिवंत आसणाऱ्या सावत्र आईला मृत घोषित करून तिचे पैसे घेतो. लाला जाधव - दत्तू करवंदे पैशासाठी धरणाच काम थांबवतात. राजकारणी लोक सरकारी सवलती लीलया उपटतात. जी जागा धरणग्रस्तांना मिळते ती सर्जेराव कारखान्याच्या कामासाठी मिळवतोच. सर्जेराव आपली जमीन धरणग्रस्तांकडून दडपशाहीने परत मिळवतो आणि गावातील इतरही लोक सर्जेरावच्या पाठींब्यामुळे आपल्या जमिनी परत मिळवतात. पुढारी आणि सरकारी अधिकारी, कर्मचारी दोघेही एकमेकांच्या अडचणीत मदत करतात. राघू भिवाच्या जमिनीवर हैबतीची नोंद होऊ देत नाही. राघू भिवा खासदाराचा जवळचा माणूस होता. त्यामुळे त्याच्याविरोधात कोणी बोलत नव्हत. प्रामाणिक सरकारी अधिकाऱ्यांना मनाप्रमाणे काम करता येत नाही. कारण पुढारी दबाव आणून त्यांना हव तस करतात. प्रसंगी या प्रामाणिक अधिकाऱ्याची बदली करतात. आपल जो ऐकत नाही. आपल्या मनाप्रमाणे जो काम करत नाही त्याला हे राजकारणी, पुढारी आपल्या मार्गातून बाजूला करतात. काही अपवाद वगळता सरकारी कर्मचारी हे पुढाऱ्यांच्या ओंजळीनेच पाणी पिणारे असतात. नोकरीच्या निवडीत फाटकसाहेब पुढाऱ्यांच्या लोकांना आवर्जून नोकऱ्या देतात. कारण बदली झाली तर हे राजकारणी ती होऊ देत नाहीत. खासदार, आमदार, मंत्री हे गोड बोलतात. जनतेला आश्वासन देतात. राजकारणात आपली घराणेशाही पुढे चालू राहण्यासाठी प्रयत्न करतात. सरकारी कर्मचारी, अधिकारी पोलीस यांना आपल्या शब्दाखाली ठेवतात. समाजात नेत्यांची फॅशन सुरू होते. भांबरे हा यातीलच नेता. हा नुसता सभा-संमेलनातून फिरतो. गांधी, साने गुरुजींच नाव घेऊन दयेचा जोगवा मागतो. समाज सेवेच्या नावाखाली स्वत:चा फायदा करून घेतो. राजकारणी, पैसेवाल्यांना कोणत्याच ठिकाणी,

कोणत्याच बाबतीत अडचण येत नाही. कशाही परिस्थितीतून ते मार्ग काढतात. कडक कायदा असतांनाही लाला जाधवच्या लाकडाच्या लाँच भरभरून जातात. त्याला फॉरेस्टर काहीही करत नाही. मंत्र्यांना सर्वसामान्यांच्या सुख-दु:खाची काहीही देणे-घेणे नसते. वर्षानुवर्षे प्रलंबित कामेही ते करत नाहीत. दुधाच्या योजनेसाठी सर्जेरावला स्वत:च्याच मतदारसंघातील जागा पाहिजे असते आणि त्या जागेसाठी पुन्हा धरणग्रस्तांनाच उठविण्याची योजना आखतात. कारण गावकऱ्यांची मत जास्त आणि धरणग्रस्तांची कमी. राघू भिवा व त्याच्या मुलांना हैबतीचा खून करूनही अटक होत नाही. कारण खासदाराचा दबाव असतो. आपल्या कामाला येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी राजकारणी काहीही करतात. खासदार शिंगाडे राघूला वाचविण्यासाठी खोटा अहवात तयार करतात. जामीनाची व्यवस्था करतात, वकील लावतात. शिवाय आवडाला पैसे घेऊन जबाब बदलायला सांगतात. जांभळी पर्यटन केंद्राच्या उद्घाटनाच्यावेळी धरणग्रस्त मोठ्या संख्येने येऊन आंदोलनाच्या तयारीत असतात. हे मंत्र्याला त्यांच्या जावयाला कळते. त्यांना हे आंदोलन मोडायच असते. कारण त्यांना कोट्यावधीचा पैसा यातून मिळणार होता. आंदोलनामुळे काही वाईट झाले तर नुकसानच होणार होते. म्हणून मंत्री सुबराव आण्णा स्वत:च्या स्वार्थासाठी धरणग्रस्तांच्या दोन मागण्या मान्य करतात. बाकीच्या मागण्यांचे आश्वासन देतात आणि धरणग्रस्तांना जायला सांगतात.

**'झाडाझडती'तील भ्रष्टाचार :**

'झाडाझडती' ही सामाजिक कादंबरी आहे. त्यात समाजातील वृत्ती-प्रवृत्ती बघायला मिळतात. जांभळी धरण होणार म्हणून सरकारी यंत्रणा कामाला लागते. सरकारी कर्मचारी यांची वृत्ती यांचा भ्रष्टाचार या कादंबरीत आहे. माणसाला पैसा जास्त महत्त्वाचा आहे. इतर कोणत्याही नात्यापेक्षा पैशासाठी माणूस कोणत्या ही थराला जातो. सरकारी काम तर पैशाशिवाय होतच नाही. ज्याने पैसे दिले त्याचे काम लवकर होते. न्यायव्यवस्थेतील कर्मचारी, सरकारी कर्मचारी, पोलीस, कंत्राटदार, तलाठी, दलाल इ. सर्वजण भ्रष्टाचार करतात. गरीब, अज्ञानी, गरजवंताला फसवतात. लुबाडतात. मात्र या प्रवृत्तीला अपवाद असणारे देशमुख, पवार यांसारखे सरकारी कर्मचारी आहेत आणि यांच्यामुळेच जनतेचा चांगुलपणावरचा विश्वास टिकून आहे.

भूसंपादन अधिकाऱ्यांचा वाघधरे साहेबाचा कारकून शाम चोरगे असतो. ताया कांबळे हा गावातील गुरुजींचा विरोधक म्हणून लाला जाधव, दत्तू करवंदे हे त्याला मदत करत त्याच्या पाठीशी उभे असतात. हा ताया कांबळे आणि चोरगे मित्र असतात. ताया कांबळे संपादनातील घरांच्या किमती धरणग्रस्तांना पैसे घेऊन वाढवून देत होता. त्याचा वशीला चोरगेशी असतो. धरणग्रस्त तायाच्यामार्फत चोरगेशी संपर्क साधत. ताया गावातील अनेक जणांच्या घराच्या किंमती वाढवून देतो, संपादनात घर चांगल दाखवून सरकारकडून दुप्पट पैसे काढतो. नुसती जमीन न दाखवता त्या जमिनीत झाडे नसली तरी झाडे दाखवतो, विहिरी दाखवतो. दुप्पट-चौप्पट पैसे काढतो. लोकांना म्हणायचा, ''तुमच्या आमच्या बापाच काय जात? सरकार गबर आहे पैसे देणार! कुठे बोंब करू नका. मिळतील ते पैसे चूपचाप घ्यायचे. एवढ जोखमीचं काम करण्यासाठी साहेब निम्मे पैसे घेतो तर घेऊ दे. आपल्या बापाचं काय जात? ज्यो तळ राखील त्यो पाणी चाखील.'' ज्यांच्या कागदोपत्री अडचणी होत्या तेही लोक ताया आणि दत्तू सरपंचामार्फत चोरगेला, साहेबाला भेटत. ज्यांच्या सातबारावर बहिणींची नाव होती. त्यांची लग्न होऊन २० वर्षेही झाली होती. चोरगे लोकांना धमकी द्यायचा, तुमचे अर्धे पैसे बहिणींना द्यावे लागणार. ताया लोकांना सांगायचा टाक मिटवून. अशी अनेक गिऱ्हाईके तायाने मिळवली होती आणि त्यासोबत पैसाही जे लोक ताया कांबळेकडे गेले त्यांना रग्गड रक्कम मिळते आणि बाकींच्याना कमी. सारख्याच घराचे पैसे ताया कांबळेच्या लोकांना २५ हजार, तर इतरांना फक्त ७ हजार मिळतात. (पृ. ५८)

'झाडाझडती' या कादंबरीतील समाजामध्ये भ्रष्टाचार पहायला मिळतो. कंत्राटदार, सरपंच, कारकून, तलाठी, फॉरेस्टर, पोलीस, सरकारी कर्मचारी, वकील इ. बिनबोभाटपणे भ्रष्टाचार करतात. भरपूर पैसे कमावतात. गरीबांच्या अज्ञानाचा फायदा घेतात. या भ्रष्टाचारांच्या यादीतील प्रमुख म्हणजे लाला जाधव आणि दत्तू करवंदे हे होत. हे जिल्ह्याला बंगले घेऊन ठेवतात. लाला जाधव राजकारणी, पैसेवाला असतो. त्यामुळे तो नियमात न बसणारे कामही करून घेतो. हे दोघे बांधकामाच कंत्राट घेतात. दर्जेदार कामाचे पैसे घेतात आणि काम दर्जाहीन करतात. धरणग्रस्त जे मुंबईला राहतात. त्यांना पैसे देऊन अधिकारपत्र स्वत:च्या नावावर करून चांगल्या जमिनी मिळवतात. बांधकामात सिमेंट ऐवजी माती वापरतात. सागवान लाकडाऐवजी

जांभळीच लाकूड वापरून चार-चार लाखाचे बील फाडतात. दरवर्षी याच कामाचे टेंडर निघते. शाम चोरगे हा कारकून आणि त्याचा सोबती ताया हे दोघे मिळून गावकऱ्यांकडून पैसे घेतात. संपादनाच्या जमिनीत झाडे, विहिरी दाखवून सरकारकडून दुप्पट, चौप्पट पैसे काढतात. धरणग्रस्तांना थोडे देऊन बाकी स्वत: घेतात. धरणाचे कंत्राटदार इतके पैसे खातो की, त्याच्या सात पिढ्यांच कल्याण होते. खैरपूरचे गावकरी खोटी वाटणीपत्र दाखवून आपली जमीन स्लॅबमधून कमी करतात. जांभळी धरणग्रस्तांना खैरपूरला सामान नेण्यासाठी सरकार ट्रक देतो पण तो ट्रक मिळायलाही तिनशे रुपये द्यावे लागतात.

किसन फॉरेस्टर हा वाडीतील लोकांची लुबाडणूक करतो. त्यांच्याकडून कोंबड्या, तांदूळ, मध, दारू आणि शिवाय पैसेही घेतो. हरबा हा लॉंच चालवणारा प्रवाशांकडून रूपया बाराआणे घेतो हे त्याच्या साहेबाला कळते तोही यातला वाटा मागतो. ताया-विष्णू यासारखे दलाल प्रत्येक कामातून जास्तीत जास्त पैसे काढतात. चोरगे, वाघधरे, जोशी, पत्रावळे इ. सरकारी कर्मचारी पैसे घेतल्याशिवाय काम करत नाहीत. जे पैसे देणार नाहीत त्यांचे काम वर्षानूवर्षे होत नाही.

गुरुर्जी याविषयी म्हणतात, सरकार भरभरून देत. पण गरजवंतांपर्यंत ते पोहोचत नाही. पोहचू दिल जात नाही. मधल्यामधे सगळ गडप होत.

भ्रष्टाचाऱ्यांच्या मागे राजकारणी उभे असल्यामुळे त्यांची ताकद अधिकच वाढते. आपण काहीही केल तरी चालत अशी वृत्ती वाढते. ‘झाडाझडती’त भ्रष्टाचारी लोक, भ्रष्टाचाराची पध्दत, भ्रष्टाचारी लोकांची लालसा, याविरूध्द अडाणी, अडलेले गरीब लोक, काम करून घेण्यासाठी नाइलाजाने पैसे देतात आणि यामुळे भ्रष्टाचारी लोकांचे फावते.

## ६.५ ‘झाडाझडती’तील स्त्री जीवन :

‘झाडाझडती’ ही विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांवरील वास्तववादी सामाजिक कादंबरी आहे. या कादंबरीतील समाज बहुतांश ग्रामीण आहे. ग्रामीण भागातील धरणग्रस्तांच्या समस्या, ग्रामीण जीवन या कादंबरीत आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्री आपल्याला या कादंबरीत पहायला मिळते.

ग्रामीण स्त्रीचे राहणीमान, विचार, शिक्षण, आवड, व्यवहार, काबाडकष्ट करण्याची वृत्ती, श्रध्दाळू स्वभाव, काळजी घेण्याचा स्वभाव, घर सांभाळून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी अशा स्त्रियांच्या बाबतीतील माहिती ‘झाडाझडती’ च्या स्त्रियांच्या स्थितीत मिळते. या कादंबरीतील स्त्री ग्रामीण गरीब असल्यामुळे ती शिकलेली नाही. लग्न झाल्यावर नवऱ्याच घर आपलं करून ती तेथे रमते. नवऱ्याला प्रत्येक गोष्टीत साथ देते. कुटुंबात महत्त्वाची भूमिका ती बजावते.

१) **आवडा :** सर्वप्रथम आवडा गोविंद जाधव या कादंबरीतील महत्त्वाच्या स्त्री व्यक्तिरेखेविषयी पाहू. आवडा ही धाडसी, खंबीर, न डगमगणारी स्त्री होती. जांभळी गावात भूमिपूजनाच्या कार्यक्रमाच्यावेळी ती पायाने पूजेचे ताट उधळते आणि हे ती मंत्र्यासमोर न घाबरता करते. आवडा गोविंदाची बायको असते. लंगड्या गोविंदाचा संसार ती हिमतीने करते. त्यांना गुणवंता आणि हैबती अशी दोन मुल असतात. तिचा एक मोठा गुणवंता ती आपल्या माणसभावाला सुभानजीला दत्तक देते. अशी ती मोठ्या मनाची असते. नवऱ्याची, मुलाची काळजी घेते. वयाच्या पंधराव्या वर्षी आवडाच लग्न होत. जिथे तिथे उडी घेऊन आवडा संसार वाढवित होती. आवडा श्रध्दाळू होती.

अशी आवडाई धीट, धीराची, समजूतदार, बेधडक, कामाला वाघ असणारी, घराचा मोठा आधार असणारी, संकटांना न घाबरणारी, मुलावर–सूनेवर माया करणारी, धाडसी, खंबीर, न डगमगणारी, हिंमतबाज, प्रेमळ, स्वाभिमानी, परोपकारी, श्रध्दाळू, सुनेला मुलीप्रमाणे वागविण्याचा मोठेपणा तिच्यात असतो, आपल गाव, घर, शेत, प्राणी–पक्षी यांच्यावर प्रेम करणारी, माळा–मुराडाच्या शेतीला ती कष्टाने न डगमगता विहिताखाली आणते. आधुनिक विचारसरणीची, समजूतदार स्वभावाची, खरी शेतकरी असते, सकारात्मक विचार करणारी, तत्त्वज्ञानी असते. हैबती जखमी झाल्यावर प्रसंगावधान

दाखवते. श्रीमंतांच्या अमिषाला, पैशाला ती बळी पडत नाही, बेडर वृत्तीची असते. हैबतीच्या जाण्यामुळे ती खचते, पण म्हाकूमुळे ती पुन्हा उभी राहते. आंदोलनात सहभागी होते. मंत्र्यांना स्पष्ट सांगते, आमचा विरोध नाही, पण आम्हांला जिवंतपणी मरण नको. एवढीच आमची मागणी आहे.

अशी आवडा ही 'झाडाझडती'तील सशक्त स्त्री आहे.

२) **बनुबाई :** 'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीतील एक स्त्री व्यक्तिरेखा बनूबाई आहे. बनूबाई अशिक्षित आहे. तिच्या सावत्र मुलाने दत्तूने तिला घरातून हाकलून दिलेले असते. म्हणून ती भावाकडे राहते. चोरून बायकांची धुणी-भांडी करून पैसे कमावते. जांभळी धरणातील धरणग्रस्त ती असते. तिला जमिनीचे पैसे मिळतात. अस समजल्यावर ती जांभळीत येते. मात्र पैसे वाटपाच्या यादीत तिच नाव नसत. तिला पस्तीस हजार मिळायल पाहिजे असतात.

बनूबाईला मुलबाळ होत नाही. लग्नाला अकरा वर्षे होतात. बनुबाईनेच नवऱ्याचे लग्न दत्तूच्या आईशी लावले. लग्न झाल दत्तूचा जन्म झाला. दत्तू जसजसा मोठा होत होता. तस बनुबाईला पाण्यात पहात होता. हे तिच्या नवऱ्याला कळल होत. तो बनूबाईला दत्तूपासून सावध रहा. हा स्वार्थी आहे. असं सांगतो.

अशा प्रकारे बनूबाई निराधार, निरक्षर, एकटी असते. स्वत:ची जमीन, पैसे दत्तू हा सावत्र मुलगा घेतो. बनूबाई मोठ्या मनाची असते. म्हणून ती आपल्या नवऱ्याच दुसर लग्न लावून देते. तिला मुलबाळ होत नाही. दत्तूच्या त्रासाला कंटाळून चुलत भावाकडे जाते. त्याच्यावर भार नको म्हणून न लाजता दुसऱ्यांची भांडी घासते. भावाकडे जास्त दिवस न राहण्याचा स्वाभिमान तिच्यात असतो. ती अशिक्षित असली तरी दत्तू विरोधात लढते. काबाड कष्ट करून पैसे मिळवते. दारिद्र्यामुळे तिची रया गेलेली असते. डोक्याला तेल, अंगावर चांगल लुगड मिळत नाही. वकील तिला फसवतो ती बारा वर्षे झगडते, पण तिला न्याय मिळत नाही. शेवटी देशमुख साहेब दत्तूला सक्तमजुरीची शिक्षा देतात. पण तो स्टे आणतो. बनूबाई आता सत्तरीची म्हातारी होते. कॉलनीतील खानावळीत पोळ्या लाटण्याचे, मुल सांभाळायच काम करते. अखंड कष्ट करणे तिच्या नशिबात आहे. तिला गरीब स्त्रियांविषयी कळवळा असतो. त्यांना

अडीअडचणीत मरण्यापेक्षा कॉलनीवर काम करायला, पैसे कमवायला बोलावते. दत्तूला शिक्षा व्हावी म्हणून ती खूप प्रयत्न करते. मला पैसे, शेती, घर नाही मिळाल तरी चालेल. पण त्याला शिक्षा झाली पाहिजे. अस ती सत्तरीतही म्हणते.

३) **नकुसा :** 'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीत समाजातील वेगवेगळ्या स्त्रियांचे चित्रण केलेले आहे. त्यांच्या समस्या मांडलेल्या आहेत.

नकुसा ही साधी, सरळ स्त्री असते. शिवराम हा तिचा नवरा असतो. लग्नाला दहा वर्षे होऊन ही मुलबाळ होत नाही. बरेच प्रयत्न करतात. अंगारे-धुपारे करते. मात्र यश येत नाही. पण दहा वर्षांनंतर तिला दिवस जातात. नवसाने मुलगा होतो. नकुसा बाळाची जीवाच्या वर काळजी घेत होती. कोणाची दृष्ट लागू नये म्हणून बाळाच्या डोळ्यात काजळ घालायची. गालावर तीट लावून त्याच्यावरून मीठमोहऱ्या ओवाळते. उंबरठ्यावर उभी राहून सकाळ संध्याकाळ अंगारा फुकायची. बाळाला अशी जपायची. गावात भांडणे झाली की, बाया तिला वांझुटी रांड म्हणायच्या, तिला याचे वाईट वाटायचे.

अशी नकुसा, भोळी -भाबडी शिवरामच्या मृत्यूनंतर कणखर बनणारी, बिरज्यावर अतोनात प्रेम करणारी, त्याच्यासाठीच जगणारी, अंधश्रध्दाळू वृत्तीची, काबाडकष्ट करणारी, बिरज्याला मोठ करण्यासाठी धडपडणारी कंठाबाईने जमीन मागितल्यावर मला माझा मुलगा गमवायचा नाही. म्हणून मुलासाठी ती जमीनही वापस करायला तयार असते.

४) **फुला :** फुला ही एका धरणग्रस्ताची शेतकऱ्याची साधी मुलगी असते. तिच लग्न हैबतीशी होत आणि हैबतीचा संसार ती सुखाने करते. आवडाई या सासूशी ती मुलीप्रमाणेच वागते. आपल सुख-दुःख ती आवडाला सांगते. हैबतीच्या नोकरीचा तिला अभिमान असतो. नवऱ्याची ती काळजी घेते. त्याला अंघोळीला गरम पाणी काढून देते, अंग घासून देते, गरम भाकरी खाऊ घालते, घरात-शेतातही सासूला मदत करते.

दिवस गेलेले असतांना घरातील सगळ काम ती करत होती. हैबतीला फुलाच्या गुणाची कल्पना येते. हैबतीला नोकरीची काळजी असते. फुला त्याला धीर देते. म्हणते, ''शेतकऱ्याचीच लेक हाय मी. वाघिणीगत झट्या घीन जमनीसंग! काय बी काळजी नगा करू कारबारी.'' (पृ. १५७, ५८)

हैबतीची तिला रोज आठवण यायची. फुलाला मुलगा होतो. फुला शेतात काम करायची. शेतात हैबती मणाच पोत पाठीवर घेऊन फर्लांगभर चालून गाडीत टाकत होता. नवऱ्याचे हाल फुलाला बघवेना. तिने पदर खोचला. मणाच पोत उचलणार नाही म्हणून अर्ध पोत डोक्यावर घेऊन गाडीत टाकत होती. रात्री फुला हैबतीची पाठ शेकून देते. हैबतीवर जेव्हा शेतात हल्ला होतो. तेव्हा फुला घरी असते. नवरा अजून आला नाही म्हणून ती काळजीत असते. ती धावत रानाकडे निघते. हैबतीला रक्तबंबाळ बघून ती हंबरडा फोडते. पण सावरून सासूला म्हणते. जरा हातभार लावा मी एकटीच उचलते यांना. दवाखान्यात जावू. आवडा तिला गावात पाठवते. फुला सुसाट पळत गावात जाते. गावातील लोकांना आणि औषध घेऊन उड्या घेतच येते. वाटेत झाडाझुडपामुळे तिच पातळ फाटत, अंग ओरबाडत. फुला हैबतीच्या जखमेत हळद भरते. रानपाला बांधून, पदर फाडून जखम बांधते. हैबती मेल्यावर छाती पिटून आक्रोश करते. आवडा या घटनेने खचते, आजारी पडते. फुला रात्रंदिवस तिच्या उशाशी बसून तिला औषधपाणी देते.

अशी फुला सासूला आई मानणारी, काम करणारी, कोणतेही कष्ट करण्याची हिम्मत असणारी, नवऱ्याची काळजी घेणारी सासूची काळजी घेणारी अशी स्त्री असते.

५) **हिराबाई :** हिरा ही खैरमोडे गुरुजींची बायको असते. ती शाळेत कधी गेलेली नसते. गृहकृत्य दक्ष असते. गुरुजींची काळजी तिला असते. गुरुजींची समाजसेवा करणे तिला अजिबात आवडत नाही. गुरुजींनी नोकरी सांभाळावी असे तिला वाटते. शेवंतीचे फार लाड करू नये. कारण ती मुलगी आहे. अशी तिची समजूत असते. मुलीचे जास्त लाड कराल ती एक दिवस डोक्यावर मिरे वाटेल. अशी भिती तिला असते.

हिरा मास्तरची काळजी घेते. नातवंडांवर माया करते. गुरुजींचा सकाळी आवाज येत नाही म्हणून हिरा गुरुजींकडे जाते. तर गुरुजी देवाघरी गेलेले असतात. हिरा मोठ्याने रडते.

अशी हिरा अशिक्षित, जुन्या विचारांची, मुलगी म्हणजे घोर अशा समजूतीची, अंधश्रध्दाळू, वास्तववादी विचारांची, समजूतदार, घरासाठी न लाजता काम करणारी, नवऱ्यावर प्रेम करणारी अशी असते. यावरून स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन कळतो.

६) **शेवंती :** ही खैरमोडे गुरुजींची लाकडी एकुलती एक मुलगी असते. वडलांजवळ झोपणारी, त्यांच्याकडून गोष्टी ऐकणारी अशी छोटीशी शेवंती असते. गुरुजी तिला महागाचा घागरा-चोळी आणतात. ती घालून लगेच मिरवते. शेवंती दिसायला सुंदर असते. शेवंती शाळेत शिकत असते. दहा वर्षाची शेवंती बाबाजवळ झोपते हे हिराला आवडत नाही. हिरा तिला रागवते. शेवंती आईला तू गप्प बस. माझ्या नानाजवळ झोपायला मला कोणाची भिती नाही, अस ठणकावून सांगते.

अशी ही शेवंती. शिकलेली, समाजामुळे लवकर आणि काहीही दोष नसतांना बिजवराशी लग्न करते. त्याचा संसार सुखाने करण्याचा प्रयत्न करते. हुंडाबळी ठरते. माहेरी राहते. सहनशील, समजूतदार, हिमतबाज, प्रेमळ, धीराची, हुशार, सुंदर अशी ही शेवंती असते.

७) **कमळी :** कमळी ही गोम्या कोळ्याची बायको असते. गोम्या हा गावभर पखालीने पाणी भरत असतो. त्याबदली त्याला भाकरी-भाजी मिळत होती. पण धरणामुळे नव्या गावठाणात बलुतेदारी चालणार नाही, घरोघरी नळ असल्यामुळे पाणी भराव लागणार नाही. परिणामी गोम्याला व त्याच्या रेड्यालाही काम नसणार हे कमळा ओळखते. गावातील लोक आपली जनावर विकायला नेत होते. कमळी नवऱ्याला हल्या विका, त्याचा काही उपयोग नाही अस म्हणून आठ दिवस भांडत असते. बाजारात नेऊन विका असा ती हट्ट करते. ती नवऱ्याला म्हणते, ''बिनउप्योगाचा तुमचा राजा बांधा गळ्यात अन् काढलेली पाच पोरं द्या हिरीत ढकलून ऽऽ,'' (पृ. १५२)

कमळीला वास्तव परिस्थितीची जाणीव होती. नवीन गावठाणात नळ आले नव्हते. म्हणून गोम्याच हल्ल्यावरून पखाली टाकायचा. त्याला भाकरी मिळायच्या त्यामुळे कमळी खूष होती.

अशी ही कमळी-व्यवहारी, भांडखोर असते. कष्ट करणारी मुलांना नवऱ्याला सांभाळणारी असते.

८) **साळू :** साळू ही गुणवंताची बायको असते. झांजडवाडीत ती राहते.

आदरातिथ्य करणारी, सकाळी उठून काम करणारी, पावसाळ्यात गिरणीच पीठ तिथे मिळत नाही. म्हणून पावसाळ्यात जात्यावरच दळावे लागायचे. तिला माहेरी जावस वाटायचे. पण तिचे माहेरही धरणात बुडलेले होते. पावसाळ्याआधी साळू सगळी तयारी करून ठेवायची. डोंगर उतरून निजामपूरला येते. तिथून भरपूर सामान घेते. बोंबील, सुकट आणि वाळका मास डाल भरून आणते. कारण पाऊस भरपूर पडतो. त्यामुळे घराबाहेरही निघता येत नाही. पावसाळ्याचे तिचे नियोजन चोख असते. शेतीकाम करणारी, काटकसरी, प्रेमळ अशी असते.

**'झाडाझडती'तील इतर स्त्रिया :**

१) **मंजुळा :** मंजुळा ही कुशापाची बायको असते. कुशापाचा दिलदार, आदरातिथ्याचा स्वभाव. त्यामुळे मंजुळाच्या घरी सारखी वरदळ असते. ती सर्वांचं आदरातिथ्य करत असावी. कुशापा मुलीसाठी मोठ ठिकाण पाहतो. तेव्हा ती त्याला समजावते. आपण अंथरून पाहून पाय पसरावे. कमी पैशात लग्न होईल असा इकडचाच मुलगा बघावा अशी ती समजूतदार, परिस्थितीची जाणीव तिला असते. जमिनीचे पैसे मिळाल्यावर नवऱ्याला घरी न ठेवता बँकेत ठेवण्याचा मोलाचा सल्ला देते.

२) **कंठाबाई :** ही अंगात देवी येणारी खैरपूरची स्त्री असते. कंठाबाईवर गावोगावीच्या लोकांची खूप श्रध्दा असते. कंठाबाई बालविधवा असते. नवरा मेला तेव्हा ती अकरा वर्षाची असते. तेव्हापासून ती यल्लामाची पूजा करते आणि गावकऱ्यांना संकटातून तारते. लोकांच्या समस्येवर, प्रश्नांना ती मार्ग दाखवते. लोकांना, लिंब, अंगरा, नारळ अस देते. तिच्याविषयी समाजात बरेच समज-गैरसमज असतात. कंठाबाई नकुसाला स्वखुशीने स्वत:ची जमीन देते. मात्र तिची वृत्ती बदलते आणि ती जमीन परत मागते. त्यासाठी ती नकुसाच्या शेतात नारळ, लिंब पुरते. कंठाबाईला पोपटाचा कंठ फुटतो. म्हणून कंठाबाई म्हणतात, तिची नजर फिरली की ती दगडाच पाणी करते. आमावस्या पौर्णिमेला तिच्या अंगात येते लोकांच्या अंगातील भूत काढते. अनेक हडळींना कुत्र्या बनवते. अशा दंतकथा तिच्याविषयी समाजात असतात.

३) **रूपा :** रूपा ही हैबतीच्या मामाची मुलगी असते. दिसायला गोरी-सुंदर असते. हैबतीला तिच्याशी लग्न करायचे असते. मात्र धरणग्रस्त आहे म्हणून रूपा त्याला ठामपणे नकार देते. ती दहावीत शिकत असते. शिक्षणामुळे तिला चांगल-वाईल कळते आणि ते सांगण्याच धाडस येते.

४) **मंजी :** ही खैरपूरच्या गावठाणात देहविक्रय करणारी असते. खैरपूरचे धनदांडगे मुलं तिच्याकडे येत असतात. मंजी गावठाणातील गरीब मुलींना या धंद्यात ओढते.

अशा प्रकारे 'झाडाझडती'तील स्त्रीजीवन कष्टाचे आहे. स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जा आहे. शिक्षणापासून ती वंचित आहे. समाजातील रूढी-परंपरांचे ती पालन करते. ती काबाडकष्ट करते. घर-संसार चालवते. घरात राबते त्याचसोबत पुरुषांच्या बरोबरीने शेतातही राबते. आर्थिक परिस्थिती हलाखीचीच असते. त्यामुळे हौसमौज नाही, दागदागिने नाही. पण याची ती कधी तक्रार करत नाही. स्वभावाने साधी-अंधश्रध्दाळू असते. नवऱ्याची बोलणी, मार, शिव्या खाणारी आणि कधी नवऱ्याशी भांडणारी अशी आहे. स्वभावाने समजूतदार, परिस्थितीची जाणीव असणारी, आर्थिक नियोजन करणारी, गरिबीत संसार करणारी, मनमिळावू अशी स्त्री आहे. बालविवाह झालेल्या स्त्रिया यात आहे. बालपणापासूनच संसाराची जबाबदारी पेलणारी. कणखर अशी स्त्री आहे. कंठाबाई सारखी बालविधवा स्त्री समाजातील लोकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन समाजात अंधश्रध्दा पसरवते. मंजीसारखी स्त्री देहविक्रय करते आणि इतर मुलींना त्यात ओढते. या स्त्रिया समाजात वाईट काम करतात. मात्र इतर स्त्री जीवन कष्टाचच आहे.

## ६.६ झाडाझडतीतील सण-समारंभ, उत्सव :

झाडाझडती ही सामाजिक कादंबरी आहे. यात वास्तवता मांडलेली आहे. धरणग्रस्तांना रोजचा दिवस जगताना अनंत यातना होतात. त्यात ते सण- समारंभ कसे साजरे करणार? जगण्याची लढाई ही महत्त्वाची आहे. तिच्यापुढे बाकीच्या गोष्टी दुय्यम ठरतात. त्यामुळे झाडाझडती या कादंबरीत फारसे सण-समारंभ आलेले नाहीत.

१) हैबतीचा लग्न समारंभ : हा खरतर मोठा समारंभ असतो. पण धरणग्रस्तांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे हा समारंभ साधेपणाने केला जातो. हैबतीच लग्न लाडूबाच्या देवळात करतात. गावातील सगळी लोक न बोलावता येतात. सध्याकाळी बैलगाडीतून वरात काढतात. ढोल-लेझीम खेळतात. नवरा-नवरीने देवाचे दर्शन घेतले. नाव घ्यायच कार्यक्रम होतो. फुलाने हैबतीच्या हातात गुळाचा खडा देवून लाजत नाव घेतले.

''आला आला रूखवत त्यात होता रूपया

नवरा माजा धरणावरचा शिपाया (पृ. ११५)''

२) बारशाचा समारंभ : शिवराम-नकुसाला बऱ्याच वर्षांनी मुलगा होतो त्याच बारस आणि पुन्हा खर्च नको म्हणून जावळाचाही कार्यक्रम असतो. बारशाला पावणेरावळे, भावकी, गावकी गोळा होते. दारात मांडव, त्यावर पताका,झिरमुळया,स्पीकर, मांडवावर सोडलेले तांबूस लाईट, काझीमभाईचा ताशा, पावण्यासाठी टोपी चोळीचा आहेर, बाळाला नवे कपडे घालून बिरज्या नाव ठेवतात, मामाच्या मांडीवर बसवून केसाची बट कापून जावळ काढतात. (पृ. ११५)

३) धरणामुळे माणसे विस्कटली होती. पूर्वीचे सगळे बदलले होते. माणसाची, गावाची, घराची घडी विस्कटली होती. साळूला आपल्या माहेरची फार आठवण यायची. धरण होणयाआधी साळू श्रावणात भावाबरोबर माहेरी जायची. गौरीत झिम्माफुगडी खेळत होती. मात्र दोन वर्षांत ती माहेरी गेलेली नसते. (पृ. २१५)

४) लग्न समारंभ : गुरुजींच्या शेवंतीच लग्न खैरपूरच्या यमाईच्या देवळात लागते. धरणग्रस्त म्हणून लग्न साधेपणाने केले जाते. नामूच लग्नही समाज मंदिरात साधसुध होत. (पृ. २९४, ४३६)

५) समाजात विविध सण-समारंभ उत्सव साजरे केले जातात. मात्र झाडाझडतीत जगण्याचाच प्रश्न असल्यामुळे इतर गोष्टींकडे बघायलाही कोणाला उसंत नाही.

''गावठाण दिगू आण्णाला विसरून गेले होत. कारण जो तो अन्नाच्या आणि पोटाच्या माग. ब्राम्हण माणूस लग्नकार्याला, वास्तुशांतीला, सणासमारंभाला लागतो. पण असल आता वसाहतीत काहीच

घडत नव्हत. कुणाच लग्न जुळल तर ते परगावच्या धरणग्रस्ताच्या मुलीशीच जमणार. कुठल्या तरी पडक्या देवळात लग्न आटोपल जायच. त्यासाठी चाफ्याची फुलं असली की काम भागल. देवच जागेवर नव्हते ती जत्राखेत्रा कशाच्या होताहेत?'' (पृ. ३२२)

## ६.७ झाडाझडतीतील पोषाख / दागदागिने :

झाडाझडतीतील समाज हा ग्रामीण आहे. त्यामुळे त्यांचा पोषाख, त्यांचे कपडे ग्रामीण भागातीलच आहे. धरणग्रस्त झाल्यावर लोकांची आर्थिक स्थिती बिकट होते. हे त्यांच्या कपड्यांवरून लगेच लक्षात येते.

श्रीमंत, राजकारणी, कारखानदार, सरकारी कर्मचारी इ. चे पोषाख उत्तम, श्रीमंती असतात. पोषाखाप्रमाणेच अलंकाराचही आहे. आर्थिक स्थिती बिकट असणाऱ्यांकडे, धरणग्रस्तांकडे कसले दागिने / अलंकार असणार ? जे आहेत तेही गहाण नाहीतर मोडेलेले आहेत. त्यामुळे झाडाझडतीत दागिन्यांचा उल्लेख जास्त येत नाही.

झाडाझडती'तील समाज हा गरीब आहे. शेती व्यवसाय करणारा आहे आणि धरणग्रस्त आहे. त्यामुळे त्यांचे कपडे सामान्यतच आहेत. ग्रामीण जनता असल्यामुळे ग्रामीण भागात जो पोषाख असतो, तोच झाडाझडतीच्या समाजातील व्यक्तीचा आहे. राजकारणी, श्रीमंत यांचा पोषाख मात्र चकचकीत कडक आहे.

पुरुषांचा पोषाख साधारण पैरण आणि खाली धोतर असा आहे. वयस्क मंडळी डोक्यावर मुंडास पटका बांधत असत. खैरमोडे मास्तर खादीचा पेहराव घालत असत. हैबती लेंगा, टेरलिंगची पैरण घालत होता. दत्तू हा पुढाऱ्यासारखे पांढरे कांजीचे कपडे घालत असे. दिगूअण्णा उघडे अंग व खाली धोतर, राजकारणी शिंगाडे खादीचा कडक कांजीचा पोषाख, हातावर शाल, सुभानजीचाही थाट श्रीमंती होता. कडक इस्त्रीचे कपडे, त्याच्या खमीसाला सोन्याची चार बटणे होती आणि गळ्यात सोन्याचा सर. रूपा पातळ नेसत होती. दहावीत असतांनाही आणि लग्न झाल्यावरही. कुशापा हा मणसमाळचा राजा होता. तो

टेरलिंगची नीळ दिलेली घोळदार पैरण आणि कमरेला रेशीमगाठी धोतर गुंडाळत होता. डोक्यावर नारिंगी रंगाचा पटका, डाव्या हातात चांदीचं कड असा कुशापाचा थाट होता. मात्र धरणामुळे तो राजाचा रंक होतो. त्याचा श्रीमंती पोषाख जाऊन तो गबाळा होतो. बारश्याच्या सोहळ्याला आहेराची पध्दत असते. हैबती शिवरामला टोपी, नकुसाला लुगड, बाळाला कपडे असा आहेर आणतो. आवडाईकडे नवऱ्याने घेतलेली पैठणी, कानातल्या कुड्या, चांदीची जोडवी, नथ असे दागिनेही त्यात असतात. शिवाय गुणवंताचा बालपणीचा चांदीचा करदोडाही ती जपून ठेवते. राघू भिवा हा आधी साधे शेतकऱ्यांचे कपडे घालत असे. खादीच धोतर, सदरा, टोपी असा पोषाख घालतो. मात्र कारखान्याच पाणी लागल्यापासून तो बदलतो. पांढरे कपडे, अंगात मंत्रीटाईप पांढरा आखूड कोट, पायात चकमकते बुट असा श्रीमंती थाट तो करतो. हैबतीला गुणवंता स्वत:चे नवे कपडे देतो. नायलॉनचा सदरा आणि पांढरी मऊसूत विजार. स्त्रियां पातळ, लुगड असा पोषाख घालत. खास प्रसंगी ठेवणीतले कपडे घालण्याची प्रथा होती. गरीब समाज असल्यामुळे फारसे दागिने कोणी घालत नव्हते. स्त्रिया नथ, जोडवे, कुड्या असे दागिने घालत. श्रीमंत पुरूष गळ्यात सोन्याची चेन घालत. कुशापा दंडात चांदीच कड घालत होता. अशा प्रकारे झाडाझडतीतील पोषाख व दागिने आहेत.

## ६.८ आर्थिक स्थिती :

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीत विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांच्या दु:खाला वाचा फोडलेली आहे. आर्थिक बाबतीत धरणग्रस्त कायमच गरीब. जांभळी गावात रहात होते. तेव्हा स्वत:च घर, जमीन, गाव, जनावरे, फळबागा, शेतीचा बारदाणा अस सगळ चांगल होत. गावातील जवळपास सर्वांचीच आर्थिक परिस्थिती बरी होती. मात्र धरण झाल्यावर हे लोक अधिक गरीब झाले. त्यांची आर्थिक स्थिती कोलमडली. नव्या गावात, नव्या शेतात, नव्या लोकांमध्ये जुळवता जुळवता ह्या लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत खालावली. स्वत:च्या गावात राजा असणारे गावकरी धरणग्रस्त झाल्यावर भिकारी झाले.

मात्र श्रीमंत, राजकारणी, सरकारी कर्मचारी, कंत्राटदार, कारखानदार इ. चे मात्र काहीही कधीही नुकसान होत नाही. धरणग्रस्त झाले तरी त्यातून त्यांना आर्थिक फायदाच झाला. श्रीमंताची श्रीमंती अधिक वाढली आणि गरीबांची गरिबी. त्यामुळे 'झाडाझडती' या कादंबरीत सर्वसामान्य गरीब आणि श्रीमंत अशी आर्थिक दरी पहायला मिळते.

आर्थिक परिस्थिती कमजोर, दुर्बल असल्यामुळे समाज जीवनात अनेक प्रश्न, समस्या निर्माण होतात आणि आर्थिक परिस्थिती उत्तम असल्यामुळे कोणत्याही समस्या प्रश्न चुटकीसरशी सोडवले जातात. त्यामुळे आर्थिक स्थिती कशी आहे, यावर सामाजिक स्थिती ठरत असते. समाजातील स्थान, समाजातील लोकांचा दृष्टिकोन इ. गोष्टी आर्थिक स्थितीशी निगडीत असतात. आर्थिक स्थितीवर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. उदा. शिक्षण, राहणीमान, खाने, समारंभ, धार्मिक विधी, हौस, नातेसंबंध, मित्रपरिवार इ. 'झाडाझडती' या कादंबरीत धरणग्रस्तांची आर्थिक स्थिती कशी आणि श्रीमंत, राजकारणी, व्यावसायिक इ. ची आर्थिक स्थिती कशी आहे, याचा तपशीलवार वर्णन आहे.

१) **दारिद्र्य :** 'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीत समाज जीवनातील दारिद्र्य कशा स्वरूपाचे आहे ते का आहे याचे वर्णन आहे. 'झाडाझडती' कादंबरीतील धरणग्रस्त कुटुंब दारिद्र्यात दिवस काढतात. धरणामुळे त्यांची आर्थिक घडी विस्कटते आणि त्यांना हलाखीत जीवन जगावे लागते.

जांभळी गावातील बनूबाई तक्रार करण्यासाठी जेव्हा रिक्षाने आंबेपूरला येते, तेव्हा रिक्षाचे साडेतीन रुपये भाडे ऐकून तिच्या पोटात गोळा येतो. बनूबाई दारिद्र्यात दिवस काढत होती. हे तिच्या अवतारावरून सहज लक्षात येत होत. डोक्याला कित्येक दिवसात तेल नाही, लुगड्याचा रंग उडालेला ते लुगड पोतेऱ्यासारख झाल होत. तरी ती ते घालत होती. (पृ. ७७)

शिवरामला बऱ्याच वर्षांनंतर मुलगा होतो. पैसे कमी लागावे म्हणून तो एकाच दिवशी मुलाच बारस व जावळाचाही कार्यक्रम ठेवतो. नकुसाच्या माहेरून कोणी येत नाही. म्हणून हैबती गुरुजींकडून पैसे घेऊन आहेर आणतो. उरलेले पैसे हाता-पाया पडून उधार ठेवायला सांगतो. (पृ. ११७)

अशा प्रकारे 'झाडाझडती' या कादंबरीतील समाजात धरणग्रस्तांच्या जीवनात दारिद्र्य होत. कमालीची आर्थिक टंचाई होती. धरणामुळे त्यांचा नांदता गाव आणि पैसाही पाण्यात जातो. धरणामुळे त्यांच्या जीवनात दारिद्र्य येत.

२) **महागाई :**'झाडाझडती'च्या समाजजीवनातील आर्थिक स्थिती खालावण्याच एक कारण म्हणजे महागाई हेही आहे. या महागाईमुळे समाजातील आर्थिक स्थिती खालावलेली होती.

धरणग्रस्तांना नव्या गावठाणात घर बांधण्यासाठी सरकारतर्फे कर्ज मिळत होत ते फक्त दोन हजार रुपये आणि ते ही तीन हप्त्यांमध्ये त्यासाठी धरणग्रस्तांना पन्नास चकरा माराव्या लागणार होत्या. महागाई इतकी वाढलेली होती की, त्या दोन हजारांमध्ये घराच्या साध्या भिंतीही बांधून होत नाहीत. (पृ. १५९)

आवडाई फुलाच बाळंतपण होईपर्यंत भाड्याच्या घरात राहण्याचा विचार करते. मात्र एका खोलीच भाड साठ रुपये होते. महिना साठ रुपये आणायचे कुठून? असा यक्ष प्रश्न तिच्यापुढे होता. हैबतीला २०० रुपये पगार होता. यातच सगळा खर्च भागवावा लागत होता. (पृ.२०२) आवडाला फुलाला खारीक, खोबर, बदाम द्यावेसे वाटत होते. मात्र महागाईमुळे ती ते देऊ शकत नाही. त्याऐवजी ती गुळ-शेंगदाणे देते. (पृ. २०७)

महागाईमुळे धरणग्रस्ताच जीवन दरिद्री होत जाते. आधीच पैसे नाहीत. त्यात महागाई त्यामुळे धरणग्रस्तांना हलाखीत जगावे लागते.

**३) आर्थिक विषमता :**

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीतील समाजजीवनात आर्थिक विषमता पहायला मिळते. समाजातील घटकांमध्ये आर्थिक दरी पहायला मिळते. या विषमतेमुळेच समाजात एक श्रीमंत आणि एका गरीब अशा जाती निर्माण झाल्या. आर्थिक विषमतेमुळे सामाजिक विषमताही प्रस्थापित होते. आर्थिक विषमतेमुळे समाजात हुकूमशाही वाढते. एक अन्याय करणारा श्रीमंत गट व दुसरा अन्याय सहन कराणारा गरीब गट निर्माण होतो.

जांभळी धरणामुळे धरणग्रस्तांची आर्थिक स्थिती कमालीची खालावते. त्यांच्या या आर्थिक दुर्बलतेमुळे समाजात धरणग्रस्त नावाची नवी जात निर्माण होते. समाजात आणखी एक आर्थिक सुबत्तेचा वर्ग म्हणजे सरपंच पाटील, राजकारणी, तलाठी, सरकारी कर्मचारी, कंत्राटदार इत्यादी स्वार्थी भ्रष्टाचारी वाममार्गाने पैसे कमावणाऱ्या, सरकारी योजनेचा सर्वस्वी लाभ घेणारे, पैशामुळे वकीलांकडून आपल्या बाजूने कायदे वळवणारे पैसे देऊन वाट्टेल ते करणारे अशा लोकांचा समाजातील दुसरा वर्ग 'झाडाझडती'तील समाज जीवनात अशा प्रकारची आर्थिक विषमता होती.

जांभळीकर धरणग्रस्त आंदोलनासाठी सात-आठ वर्षांनी आपल्या जांभळी पर्यटन क्षेत्रात येतात. लाडूबाच्या डोंगराच्या पायथ्याशी पांढरी घर, कॉलनीत जिकडे-तिकडे डांबरी रस्ते, विजेच जाळ, विदेशी गाड्या, सुटाकोटातील माणस आणि स्कर्टमधील गोऱ्यापान पोरी. हा असा मुलूख पाहून जांभळीकरांना सिनेमातील देखावाच वाटतो. एवढ्या कमी वेळात सर्व सोयी सुविधा त्यांना मिळतात आणि धरणग्रस्तांना पंधरा वर्षात ना रस्ते, ना वीज, ना पाणी, ना शिक्षण, ना शेती , ना जागा, ना नोकऱ्या काहीच मिळत नाही.

''इथल्या पांढऱ्या इमारती चमचमत्या गाड्या  सुटाकोटातली माणसं. सारच परदेशातून अवतरलेलं. जांभळी परिसराच्या नरडीवर पाय ठेवून विकासाचा चकचकीत बुट उभा आहे. पण त्याच्या

तळव्याला बारीक मोठं तांबीरलेलं खिळं. त्याची बोचणी, टोचणी, आग धग सोसता सोसता आमचा श्वास कोंडला रे.'' (पृ. ५१६) धरणग्रस्त आपली वेदना विरोधाभास, विषमता या वाक्यातून मांडतात.

''झाडाझडती'' या कादंबरीतील समाजात आर्थिक विषमतेची मोठ्ठी कधीही भरून न येणारी दरी पहायला मिळते.

४) **तोकडे उत्पन्न :**

'झाडाझडती' या विश्वास पाटील यांच्या कादंबरीतील समाजातील आर्थिक स्थिती खालावण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे धरणग्रस्तांचे तोकडे उत्पन्न होते. अपुरे तोकडे उत्पन्न असल्यामुळे धरणग्रस्तांना दारिद्र्यात दिवस कंठावे लागत होते. दिवसेंदिवस त्यांची गरिबी वाढतच होती. जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्याएवढेही त्यांचे उत्पन्न नव्हते. उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी त्यांची आर्थिक स्थिती होती.

बनूबाई वकीलाला केससाठी ५० रुपये देते. ते मिळविण्यासाठी ती तीन महिने लोकांची भांडी घासते. (पृ. ७७) आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे धरणग्रस्तांना अनेक तडजोडी कराव्या लागत होत्या. खैरमोडे गुरुजी निवृत्त होतात. त्यांच्या पेन्शनमध्ये प्रवासखर्च व संसाराचा खर्च त्यात भागत नसल्यामुळे हिरा मास्तरीण रोजंदारीवर जात होती. (पृ. २४९)

सुगंधी वकीलाने धरणग्रस्तांची वाढीव रकमेची केस जिंकलेली होती. धरणग्रस्तांची वाढीव रक्कम आणि व्याजही मिळत. त्यामुळे ते खुशीने नाचतात. कारण एवढे (२-४ हजार) पैसे जांभळीकरांनी पाच-सहा वर्षांमध्ये बघितलेले नसतात. वर्षातून एखाद्यावेळी शंभर रुपयांची नोट बघायला मिळायची मारामार तिथे हजाराची गोष्ट बाजूलाच होती.

गुरुजींवर हल्ला होतो. त्यांच्या भेटीसाठी जिल्हाधिकारी व डि. एस. पी. येतात. त्यांना सरबत करायच होत मात्र साखर कमी पडते. गुरुजी बायकोला सांगतात सरबताऐवजी चहा कर जेवढा होईल तेवढा थोडा थोडा घेऊ. (पृ. ४१२) तोकडे उत्पन्न असल्यामुळे प्रत्येक धरणग्रस्ताला तडजोड करावी लागते.

अशा प्रकारे झाडाझडती या कादंबरीतील आर्थिक परिस्थिती आहे. जांभळी व इतर गावातील लोक धरण होण्यापूर्वी सुखा-समाधानाने आनंदाने रहात होते. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. बलुतेदारांनाही आनंदाने जगता येत होत. मात्र धरणग्रस्त झाल्यापासून त्यांची आर्थिक परिस्थिती कमालीची घसरली होती. जांभळीत आवडाईला केळी, पेरूच चांगल उत्पन्न येत होत. खैरपूरात शिंगाडेचा बंगला असतो. श्रीमंती थाट असतो. वाडीवर राहणारा कुशापा मुलीच्या लग्नासाठी पैसा उभा करण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालून वाघ मारतो. मात्र त्यात तो अपयशी होतो. काही वर्षांनी त्याला एका जमिनीचे १५ हजार मिळतात. ते तो दुसऱ्या मुलीच्या लग्नासाठी सांभाळून ठेवतो.

जांभळीच्या बनूबाईची आर्थिक स्थिती बिकटच असते. दत्तू विरोधात तक्रार करण्यासाठी ती जिल्ह्याला येते. रिक्षाचे भाडे पाहून ती घाबरते. डोक्याला तेल नाही, पातळ जुने पैशाअभावी बनूबाईचे हाल होतात. पैसे नसल्यामुळे स्वस्तातला वकील बघते. त्याला पैसे देण्यासाठी धुणी-भांडी करते.

जांभळी गावात कॉलनीत साहेब लोक मात्र अगदी आरामात सुख-सोयींनी राहत असतात. आर्थिक विषमता जाणवते. शिवराम आपल्या मुलाच बारस आणि जावळ एकाच वेळी ठेवतो. खर्च वाचविण्यासाठी हैबती त्याला उधारीवर आहेर आणतो. जांभळीकरांकडे काठीने मारल तरी पैसा नसतो. महागाई वाढत असते. सरकार घर बांधण्यासाठी २ हजार कर्ज देते. पण त्या पैशात साधी एक भिंतही होत नाही. जांभळीतील मुलांना रबराचा चेंडू मिळत नव्हता. म्हणून ते चिंध्याच्या चेंडूने खेळत. धरणाच्या कामावर रोजंदारीवर जांभळीकर जात होते. मात्र काम पूर्ण झाल्यामुळे लोक बेकार झाले.८-९ रु. मिळत आता तेही मिळत नव्हते. खैरपूराच्या गावठाणात जांभळीकर धरणग्रस्त येतात. मात्र पैशाअभावी पाल्याची, गंजक्या पत्र्यांची, फुटक्या कौलाची प्लॅस्टिकच्या कागदाची अशांची घर बांधतात. शिक्षणासाठी, गावाला जाण्यासाठी अर्ज, तक्रार, कोर्टात जाण्यासाठी धरणग्रस्त घरातील थोड थोडक सोन-चांदी विकून टाकतात. आवडाई आपल्या सूनेला पैशाअभावी खारीक खोबर, बदाम देऊ शकत नाही. मात्र गुळ शेंगदाणे देते.

वाडीतील लोकांचेही धरणामुळे नुकसान झालेले असते. रानडुकर पिकाच नुकसान करतात. त्यांना मारायला ठासणीच्या बंदूकी होत्या. काडतूस महाग असल्यामुळे त्याचा विचारही लोक करत नसतात.

जांभळीच्या धरणग्रस्त गावठाणात अतिशय हलाखीत राहत असत. जांभळीकरांनी दागिने विकून शेत घेतलेले असते. ती शेती खैरपूरकर कसू देत नाहीत. पोलीसात तक्रार करावी, तर पोलीस संरक्षण देण्याचे २५ रु. रोज मागतात. त्यामुळे कमळी आणि सावळेराम तो विचार रद्द करतात आणि वकीलांकडे जाऊ असा विचार करतात. पण दोघांकडे एसटीच्या भाड्याएवढे जेमतेम पैसे असतात. धरणग्रस्तांची समाजामध्ये एक नवीन जात निर्माण झाली असे गरुजी म्हणतात. धरणग्रस्तांची मुल गबाळी वाटतात. खायला काही मिळत नाही. वर शाळेत जाणे, चांगले कपडे कसे मिळणार? गुरुजींना पेन्शन मिळते. मात्र घरखर्च, प्रवासखर्च ह्यात भागत नाही म्हणून हिरा मास्तरीन रोजंदारीवर जाते. अचानक गावठाणातील लोकांना वाढीव रक्कम मिळते. त्यामुळे सगळे आनंदात असतात. दोन–दोन, चार–चार हजार रुपये मिळतात. एवढे पैसे जांभळीकरांनी पाच–सहा वर्षांत पाहिले नसतात. वर्षातून १०० रु. चे दर्शन घडण कठीण होत. जांभळी धरण झाल्यापासून बलुतेदारांचे फार हाल होत होते. नवीन गावठाणात बलुतेदारी बंद, हाताला कामाची सवय नाही. त्यामुळे पैसे नाही. अशी त्यांची स्थिती होते. ज्ञानू शिंपी, बंडू न्हावी, गोम्या कोळी इ. चे नवीन गावात बस्तान बसत नाही. परिणामी त्यांची आर्थिक ओढाताण होते.हैबती एकटाच परिवाराला सोडून नोकरीवर रहात असतो. रविवारी त्याला घरी जावस वाटत. पण २५ रु. खर्च असतो त्यामुळे तो जात नाही. गावठाणात दुभती जनावरे नव्हती. गावकरी कोराच चहा पित असत.

डोंगरवाडीतील कुशापा हा राजा होता. मात्र धरणामुळे तो रंक होतो. धरणाचे पैसे संपत आलेले असतात. उरलेले पैसेही बायकोच्या आजारपणामुळे खर्च होतात. झाडाला पाणांऐवजी पैसे लागले तर किती बर अस त्याला वाटत. वाडीतील लोक व्यापाऱ्यांऐवजी स्वत: करवंद विकायच ठरवतात. सगळा खर्च जाऊन पैसे उरत होते. याआधी वाडीतील लोकांना एवढे पैसेही मिळत नव्हते.

पांडूबाची कथा वेगळीच होती. एकच खात धरल्यामुळे त्याला फक्त चार एकर जमीन मिळते. त्यात घरात बारा-तेरा लोक दिड एकर जमीन टाकाऊच होती. ठरलेल्या जमिनीत पोट भरत नव्हते. म्हणून तो सर्व घरातल्यांना घेऊन मोजमजूरीला जायचा. त्याचा नातू राजा आजारी होता. तरी त्याला दवाखान्यात नेण्याइतकेही पैसे नव्हते. त्यामुळे तो मरण पावतो. गुरुजींची आर्थिक स्थिती कठीण असते. मुलीच्या लग्नासाठी ग्रॅज्युएटी खर्च करतात. पंढरी पाटलांकडून तीन हजार उसने घेतात. शेवंतीला दोन मुले होतात. तरी ते तीन हजार परत दिले जात नाहीत. सारखी तडजोड करावी लागते. धरणग्रस्तांना काही करण्याआधी पैशाचा विचार करावा लागतो. हैबतीला परमनंट झाल्यावर पार्टी द्यायची असते. तो पार्टीच्या खर्चाचा, पेढ्याच्या खर्चाचा हिशोब आधी करतो. मसणमाळचा राजा कुशापा केव्हाच रंक होतो. राजाचा डोलारा गळून पडतो. अंगातील भारी कपडे गेले, हातातील चांदीचं कडं गेल. बंदुकीही गेल्या हे सगळे पैशामुळे होते. कुशापा स्वत:च्या पुनर्वसनासाठी सरकारी कार्यालये झिजवत होता. त्यासाठी त्याला दर हप्त्याला एक - दोन मेंढर विकावी लागायची. कुशापाची बायको मंजुळा मुलींसाठी इकडचाच मुलगा बघा. असा सल्ला देते. पाच-सहा हजारात लग्न होईल. बागायतदार मुलांसाठी भरपूर पैसा खर्च होईल. मात्र कुशापा ऐकत नाही. त्याला पैशापेक्षा मुलीचे सुख जास्त महत्त्वाचे वाटते. मुलीच्या लग्नासाठी पैसे आणण्यासाठी कुशापा स्वत:च्या जीवावर उदार होऊन वाघ मारतो. मात्र त्यात तो अपयशी होतो.

गुरुजींच्या भेटीला अधिकारी येतात. मात्र त्यांना सरबतासाठी साखर कमी पडते. गावठाणातील मुली पैशासाठी देहविक्रय करतात. जांभळीकर जांभळीतील मारुती गावठाणात आणतात. मात्र त्यावर तेल ओतत नव्हते. कारण कित्येक दिवसात मुली-बायकांनाच तेल मिळाले नव्हते. तेलाची फोडणीही लोक विसरून गेले होते.

वाड्यांची पाहणी करायला अधिकारी येणार असतात. त्यांना हार आणण्यासाठी किमान ३० रु. लागणार असतात. मात्र ते कोणाकडेही नसतात. गुणवंताकडे कोंबड्या विकल्याचे २० रु. असतात.

उरलेले कुशापा देतो. वाड्यातील लोकांना पुनर्वसनाच्या कामासाठी मुंबईला जायचे असते. पैशाची व्यवस्था करण्यासाठी कोणी कोंबड्या, कोणी करडे, दारू मध विकले तर कोणी उचल घेतलेली असते. 'झाडाझडती'त आर्थिक विषमता जाणवते. सरकारी कर्मचारी, राजकारणी, कारखानदार व्यापारी असा श्रीमंत वर्ग आहे आणि शेतकरी, धरणग्रस्त असा गरीब वर्ग आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत, तर गरीब अधिक गरीब होत आहेत. जांभळी पर्यटन केंद्र होते. त्यामुळे श्रीमंतांचे बंगले, हॉटेल्स, रोषणाई, सुख-सुविधा इ. सर्व होतात. त्यांच्याच हाताखाली, घरात धरणग्रस्त पैशासाठी काम करतात.

अशा प्रकारे 'झाडाझडती'तील आर्थिक स्थिती आहे.

### ६.९ झाडाझडतीतील धार्मिकता, श्रध्दा अंधश्रध्दा व दंतकथा :

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीतील समाजजीवनात धार्मिकतेचे महत्त्व आहे. समाज धर्माने,धार्मिक चालीरीतींनी बांधलेला आहे. झाडाझडतीत विविध गावांचा उल्लेख आहे. त्या गावातील ग्रामदैवत, गावांतील धार्मिक परंपरा, प्रथा पहायला मिळतात. झाडाझडतीतील समाजाची आपआपल्या दैवतांवर अगाध श्रध्दा पहायला मिळते. संकटांमध्ये आनंदात लोक देवाला विसरत नाही. देव पाठीशी आहे तो कोणाच वाईट करणार नाही. असा ठाम विश्वास लोकांमध्ये आहे. धर्म आणि समाजस्थिती यांचा जवळचा संबंध आहे. धर्मकल्पनांचा समाजजीवनावर पगडा असतो.

१) जांभळी गावाच्या बाजूला डोंगर असतो.डोंगरात देवबन असते. त्यात लाडूबाच पत्र्याच देऊळ होत. गावात मारुतीच देऊळ होत. दहा वर्षामागे मुंबईत राहणाऱ्या जांभळीकरांनी वर्गणीतून ते देऊन बांधलेल होत. देवळाच्या भोवती चिंचेच बन होत. (पृ. ४) गावात हटवटीत काळूबाईच देऊळ होत. स्टँडला लागूनच वडांच्या झाडात काळूबाई होती. पंधरा-वीस मणाचा लांब पत्थर, तीच गावची काळूबाई बिन मंदिराची वडालिंबाच्या सावलीत राहणारी आणि गावाची राखण करणारी. तिची पूजा तिच्या समोरील नैवेद्य घेणे हे गावातील ब्राम्हण दिगू अण्णा करायचा. धरण होऊ नये म्हणून गावातील लोकांना जेलमध्ये टाकल. गावकऱ्यांनी काळूबाईला कौल लावला होता. (पृ. ७, ८)

२) गुरुजींही धार्मिक होते. अंघोळ झाल्यावर देव्हाऱ्यातील खंडेरायाला अगरबत्ती लावत. कामाला बाहेर पडण्याआधी चौकटीवरच्या बाबसाहेबांच्या फोटोला ते मनोभावे नमस्कार करत. गुरुजींना गावकऱ्यांसोबत जमिनी बघायला खैरपूरला निघायच असत. सर्व धरणग्रस्त काळूबाई समोर जमतात. दिगूअण्णा काळूबाईची पूजा करत असतो. धरणग्रस्त आया माया देवीला कौल लावीत होत्या खैरपूरला जमीन कशी मिळेल, घरासाठी जागा कशी असेल. यासाठी दिगूअण्णा भातवाण पाण्यात बुडवून ते आईच्या अंगाला चिकटवीत होता. भातवाण हव तस पडेपर्यंत तो देवीला कौल बोलत होता. (पृ. ४९)

३) खैरपूरच ग्रामदैवत महादेव होत. गावाच्या मधोमध एक जुनाट मंदिर होत. हे फार जुन आणि जागृत देवस्थान होत. (पृ. ५१)

४) झांजडवाडीच दैवत जनाई असते. जनाईच्या देवळातच गावातील लोक सभा, बैठक यासाठी जमत होते. (पृ. ५१)

५) खैरपूरमधील धरणग्रस्ताच्या गावठाणापलिकडे इठलाईचा आंबा होता. त्या झाडावर भूत आहे अस सर्वांच म्हणण होत. त्यामागे एक घटना घडली होती. ४० वर्षापूर्वी इठलाई ही खासदार शिंगाडेची चुलती होती. तिने बहिणीचा मुलगा दत्तक घेतला. त्याच नाव मनोहर. इस्टेटीसाठी शिंगाडेच्या गड्यांनी त्या मुलाला आंब्याच्या झाडाजवळ जिवंत पुरला आणि तो वाहून गेला अशी गावात बोंब मारली. थोड्या दिवसांनी इठलाईला खरी गोष्ट समजली. ती वेडी झाली आणि आंब्याच्या झाडाखाली बसून मनुहर मनुहर अशा हाका मारायची. एक दिवस ती मेली आणि झाड झाली. तेव्हापासून झाडाच्या शेंडीला तिचा आत्मा टांगणीला लागला. ती साऱ्या झिंज्या वाऱ्याला लावते. मग झाड अंगात आल्याप्रमाणे घुमायला लागत. ती गदा-गदा फांट्या हलवते आणि मनुहर मनुहर अशा हाका मारते अशी दहशत या आंब्याची गावठाणातील लोकांना होती. (पृ. ३३७)

६) गावठाणातील लोकांचा कंठाबाईवर विश्वास होता. या कंठाबाईच्या अंगात देव आहे. असा समज गावकऱ्यांचा असतो. नकुसाच्या जमिनीचा अजून ठावठिकाणा नसतो. त्यामुळे ती चिंतेत असते. दहा ठिकाणी अंगारे-धुपारे करते. पण यश येत नाही. हिराबाई तिला म्हणते कंठाबाईकडे जावू तिचा

अंगारा यश देतो. हिराबाईला कंठाबाईवर श्रध्दा होती. तिला स्वत:च्या मुलीविषयी शेवंतीविषयी विचारायचे होते. (पृ. २४८)          'झाडाझडती'तील समाज जीवनात धार्मिकतेला महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक गावाची दैवते / ग्रामदैवते आहेत. त्या त्या देवतांवर लोकांची गाढ श्रध्दा आहे. धार्मिक प्रथा, नियम लोक काटेकोर पाळतांना दिसतात. देव आहे तो चांगलं करेल, तो संकटातून वाचवेल अशी श्रध्दा समाजातील लोकांची आहे. मोठ्या श्रध्देने लोकं देवाला पुजतात.

जांभळी गावाचे दैवत म्हणजे लाडूबा, काळुबाई, मारुती, तामजाई हे असतात. यावर गावकऱ्यांची खूप श्रध्दा असते. काळूबाईच्या पुजेचं काम गावातील ब्राम्हण दिगूअण्णा करत असतो. गावकरी देवीला कौल लावून आपल्या समस्या सोडवत असतात. धरण होऊ नये म्हणून काळूबाईला साकडं घालत असतात. काळूबाईला नवसं बोलत असतात. जांभळी धरण होणार नाही हे दिगू आण्णाने देवीला कौल लावून हजार वेळा सांगितलेलं असते.     वसंता खैरमोडे गुरुजींची आई श्रध्दाळू होती. मुलासाठी ती शिधा मागून देवाला नैवेद्य   करायची. खंडेरायाच्या कृपेने वसंता झाला अशी तिची श्रध्दा होती.

जांभळी गावात उघड्यावरच तामजाई देवी होती. ती गावाची गुराढोरांची देवी होती. गुराखी वर्गणी गोळा करून देवीला खाऱ्या माशाचा नैवेद्य दाखवतं. देव देवस्की नियमाने गुराखी करत. त्यामुळे गुरांना गोचड्या, भुळकी असा त्रास होणार नाही असं गुराख्यांना वाटत होतं. दरवर्षी असा सोहळा गुराखी आपल्या प्राण्यांसाठी, त्यांच्या प्रेमासाठी करत असत. नकुसा शिवरामला अपत्य नसल्यामुळे त्यांनी बरेच अंगारे-धुपारे केलेले असतात. त्याला मुलगा होतो. आपल्या मुलाला दृष्ट लागू नये म्हणून नकुसा त्याला काजळ लावायची. त्याच्यावरून मीठ-मोहऱ्या ओवाळायची. घराच्या उंबरठ्यावर उभी राहून सकाळ-संध्याकाळ अंगारा फुकत होती.

खैरमोडे गुरु जी धार्मिक असतात. ते अंघोळ झाल्यावर देव्हाऱ्यातील खंडेरायाला अगरबत्ती लावत. बाबासाहेबांच्या फोटोला पाया पडत. खैरपूरचं ग्रामदैवत महादेव असतो. खूप जुन मंदिर असतं आणि जागृत देवस्थाने म्हणून प्रसिध्द असतं. गोम्या कोळ्याची श्रध्दा वेताळ देवावर होती. हा भुतांचा राजा आहे. त्याच्यामुळे

पान–सुपारी ठेवून गोम्या देवाला संतापू नको म्हणतो. जांभळीतील मंडळी धार्मिक होती. श्रावणात पोथी ऐकणे, कार्तिकी, मार्गशीर्षची पंढरीची वारी करणे असे धार्मिक उपक्रम जांभळीकर करत. संकटात देवच मदतीला धावून येतो, अशी श्रध्दा जांभळीकरांची होती. फुलाला प्रसववेदना सुरू होतात. बाहेर जोराचा पाऊस पडत असतो. झोपडीतून पाणी वाहत असते. अशा परिस्थितीत आवडाई घाबरते. ती काळूबाईचा अंगारा फुलाल लावते आणि नवस बोलत.गोम्या कोळ्याचा आपल्या रेड्यावर फार जीव असतो. रेडा आजारी असतो. तो वाचविण्यासाठी गोम्या कंठाबाईचे अंगारे–धुपारे आणतो. रेड्यावरून लिंबू ओवाळून टाकतो. मात्र त्याचा उपयोग होत नाही. रेडा मरतो.

खैरपूरातील धरणग्रस्तांच्या गावठाणापलिकडे इठलाईचा आंबा असतो. त्यावर भूत आहे असा समज सर्वांचा असतो. त्यामागे एक घटनाही आहे.

खैरपूरात कंठाबाई नावाची बाई असते. तिच्या अंगात देवी येते. तिच्यावर गावकऱ्यांची व गावठाणातील लोकांचीही श्रध्दा बसते. गावठाणातील लोकांना चांगल्या मुहूर्तासाठी, बरं नसलं की, सरकारी काम अडत असल्यावर, मुलीच लग्न जमविण्यासाठी किंवा आपल्या समस्या, प्रश्न घेऊन कंठाबाईकडे जात. कंठाबाई त्यांना उत्तर देत होती, अंगारा देत होती आणि उपायही सांगायची. आवडाई, हिराबाई, नकुसा, बंडू न्हावी, गोम्या कोळी अनेकांची श्रध्दा कंठाबाईवर होती.

कुशापाचं पुनर्वसनाच काम काही केल्या होत नव्हतं. म्हणून तो ब्राम्हणाकडे जातो. ब्राम्हण त्याला अंगारा देतो.

खैरपूरच्या गावठाणात जांभळीतील लोक त्यांचा मारुती आणतात व त्याची स्थापना करतात. त्याला जाता–येता नमस्कार करतात.

समाजात चांगल्या–वाईट गोष्टींविषयी समजूती पक्क्या झालेल्या असतात. जसे कोल्हयाचं तोंड पाहिलं की चांगलं घडणार, अस्वल मुंग्या खातांना पाहिलं की वाईट घडणार इ.

अशा प्रकारे ‘झाडाझडती’तील समाजात धार्मिकता बघायला मिळते. याला जोडून अंधश्रध्दाही येते.

**झाडाझडतीतील दंतकथा :**

'झाडाझडती'तील समाजात काही दंतकथा पहायला मिळतात. कोणतेही गाव, परिसर, समाज यामध्ये दंतकथा रूढ झालेल्या असतात. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकतेतून संक्रमित होतात.

(दंतकथा : तोंडातोंडी चालत आलेली गोष्ट)

१) जांभळी गावाजवळ लाडूबा नावाचा डोंगर असतो. त्यावर देवबन नावाच घनदाट जंगल असत. या देवबनाविषयी एक दंतकथा आहे. देवबन हे लाडूबाच्या जवळच दहा पंधरा एकराच घनदाट जंगल. तिथे आंबा-जांभूळ, ऐन अशी दाट झाडी होती. आजूबाजूच जंगल उजाड झाल. पण देवबनातील झाडी जशीच्या तशी कारण या बनातील झाड जर कोणी तोडल तर त्याचा वंशखंड होतो म्हणतात. या भीतीनेच झाड आबादानी राहिली. (पृ. ६)

२) जांभळी गावाविषयीची दंतकथा : जांभळी गाव प्राचीन आहे. नदीकाठची संस्कृती होती. गावाला कूस आहे. वेशीची कमान आहे. काळूबाई गावाच्या आधीच आली असावी. कारण आधी देव अवतरतो आणि मग गाव. मुंबईची मुंबादेवी म्हणजे काळूबाईची पाठची बहीण. तिला राजमहाराजांसारखं मुंबईला दिली नाही. हिला वनवाशी बहीण सह्याद्रीच्या दऱ्यात, वाघजाईच्या काळी गरीब गावात दिली. काळूबाई उघड्यावरच होती. वशा गुरवाने स्वप्नात काळूबाईला छप्पर बांधण्याचे वचन दिल. मात्र देऊळ बांधायच तर दिवस बुडाल्यावर कामाला सुरवात करावी आणि दिवस उगवायच्या आत काम पूर्ण झाल पाहिजे. एका रात्रीत देऊळ बांधून पूर्ण करायच सगळा लाकुडफाटा, दगड दिवस बुडाल्यावर गोळा करायचे. जर देऊळ निम्म्यावरच राहील तर गावाच वाटोळ होईल. हा काळूबाईचा पण अनेक पिढ्यांना माहिती होता. म्हणून देवळाच्या नादी कोणी लागत नव्हत. मात्र वशा गुरवाने देऊळ बांधायच ठरवल. मुहूर्त बघून कामाला सुरूवात झाली. पण काम पूर्ण झाल नाही. सगळ्या गावकऱ्यांना धास्ती बसली ''झक मारली आणि काळूबाईच्या नादी लागलो. एक दिवस ह्या गावाची वाट लागणार. आजचं उद्यावर जाईल एवढचं पण गावचं मरण चुकायचं नाही.'' (पृ. १२)

'झाडाझडती' या कादंबरीत या दंतकथा पहायला मिळतात. यावर लोक विश्वास ठेवतात. त्याप्रमाणे वागतात. देवबनातील झाड तोडली तर त्याचा वंशखंड होतो. म्हणून कोणी तोडत नाहीत.

काळूबाईच देऊळ रात्रीतून बांधून होत नाही. म्हणून पुन्हा कोणी तसा प्रयत्न करत नाहीत. बाळू-बापूचे डोंगर एकमेकांचे जुळे भाऊ, पावसाळ्यात ते रडतात म्हणून मोठ-मोठा आवाज आणि भरपूर पाऊस पडतो. आभाळातील सप्तऋषी म्हणजे मामा-भाच्याचा औत. चकोर राजा आणि मोहना राणीची गोष्ट इ. दंतकथा प्रचलित आहेत.

## ६.१० झाडाझडती तील भाषा :

'झाडाझडती' ही सामाजिक कादंबरी आहे. या कादंबरीतील समाजाची भाषा कशी आहे, हे आपण पाहणार आहोत. 'झाडाझडती'तील भाषेविषयी लेखक विश्वास पाटील म्हणतात, ''भाषेचा अस्सल बाज हा झाडाझडतीचा गाभा आहे. पावसाची गाणी आईच्या मांडीवर डोक ठेवून चांदण्या रात्री खळ्यावर ऐकली आहेत. तर बैलांच्या अंगावर चाबकाबरोबर हासडली जाणारी शिवी रामनामासारखे जपणारे इरसाल गावकरीही जवळून पाहिले आहेत. श्रावणातल्या पोथ्या, डफावरची गाणी, शायरी, कवने, जत्रेतले तमाशे यांच्या संस्काराने माझी भाषा समृध्द झाली.(३)

अशी विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' तील भाषा ग्रामीण, वास्तवदर्शी आहे. समाजजीवनाचे प्रतिबिंब 'झाडाझडती'च्या भाषेत ठळकपणे पडलेले आहे. समाजमन, समाजातील वृत्ती, प्रवृत्ती, गेयता, रीतीरिवाज, परंपरा इ. अनेक गोष्टी भाषेतून आविष्कृत होतात.

शंकर सारडा 'झाडाझडती'तील भाषेविषयी म्हणतात, '''झाडाझडती' मधील भाषा, झाडं-झुडपं, पशु-पक्षी, डोंगरदऱ्या, निसर्गचक्र आणि मानवी हर्ष-खेदांचा फुलोरा या सर्वांना सहजपणे सामावून घेणारी, रांगडी तशीच गोड आहे. ग्रामीण भाषेच्या अनंत कला ती प्रकट करते. सत्ताधीशांची आणि नोकरशहांची मग्रुरीची भाषा, कायद्याची अडवणुकीची भाषा आणि साध्या सरळ ग्रामीण जीवांची भाषा यांचा झटका झणझणीत ठरतो.'' (४)

विश्वास पाटील यांनी समाजाची भाषा वापरलेली आहे. 'झाडाझडती'चा परिसर हा पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील आहे. त्यामुळे तेथील भाषेचा वापर साधारणत: कादंबरीत केलेला

आहे. शिवाय लेखकाच्या परिसरातील त्यांच्यावर झालेल्या भाषेच्या संस्काराचाही वापर त्यांनी केलेला आहे. वाक्‌प्रचार, म्हणी, ओव्या, शिव्या, अस्सल उपमा, चपखल शब्दयोजना, चित्रदर्शी वर्णने, नेमकेपणा इ. गुण वैशिष्ट्ये 'झाडाझडती'च्या भाषेत जाणवतात.

१) **वाक्‌प्रचार** : विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती'त वाक्‌प्रचारांचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. काही प्रमाण भाषेतील वाक्‌प्रचार आहेत. तर काही ग्रामीण बोलीतील. या वाक्‌प्रचारांमुळे भाषेची परिणामकारकता वाढलेली आहे.

बिलामत येणे, हबकणे, नाकाला दम लागणे, दबदबा असणे, दूम लागणे, काळीज धाकधूक करणे, बुडाला मुंग्या लागणे, आटापिटा करणे, दोन हात करणे, कानाडोळा करणे, खिरीत खराटा पडणे, पत वाढणे अंगाचं पाणी पाणी होणे, कंठ दाटून येणे.

२) **म्हणी** : 'झाडाझडती' त समाजात बोलल्या जाणाऱ्या म्हणींचाही प्रसंगानुरूप वापर केलेला आहे.

१) किती पिळला म्हणून रेडा दूध दिल का ? (पृ. १०)

२) डोंगराला धडक मारून आपलंच कपाळ फुटतं. (पृ. १७)

३) नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही. (पृ. ३३)

४) धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय. (पृ. ३५)

५) ज्याचं जळतं त्यालाच कळतं. (पृ. ३८)

६) उघड्यापाशी नागड गेल आन रातभर थंडीनं मेलं (पृ. ४७)

३) **प्रतिमा :** 'झाडाझडती' त प्रसंगाला शोभतील अशा प्रसंगाला नेमक्या शब्दांत मांडण्यासाठी, प्रसंगाची दाहकता व्यक्त करण्यासाठी योग्य, चपखल प्रतिमांचा वापर विश्वास पाटील यांनी केलेला आहे. अस्सल ग्रामीण प्रतिमांचा वापरही केलेला आहे.

पखाल ढेकर दिल्यागत डुब ऽ डुबऽ करू लागली. (पृ. ४)

बातमी गावात वणव्यासारखी पसरली. (७)

बाजूच्या पिंपरणीची पानं गावकऱ्यांच्या काळजासारखी लट लट हालत होती. (५)

रीपा मारता मारता तो गडबडला आणि आढ्यासह भोपळ्यासारखा खाली आपटला.(१३)

जांभळीकरांच्या कानावर धरण हा शब्द पडताच सारे नागासारखा फणा काढातात. (१४)

कंदिलाच्या वातीसारखं तिचं काळीज फुरफुरत होतं.(१५)

तुका–गोईंदा गुरासारखे बेरडत होते. (१८)

एकाएकी ह्याच झाडाखाली तिचं पोट आभाळागत गडगंडायला लागले. (२०)

बांधात घुसलेल्या घेवड्याच्या वेलासारखा इथं पावलोपावली आठवणी गुंतलेल्या. (२०)

उंडार बैलानं कुपाटीच्या नांग्या शिंगानं सहज उडवात्यात तसा तो बांध रेटीत बागेत घुसला. (२३)

४) **शिव्या :** 'झाडाझडती' त शिव्यांचाही वापर मोठ्या प्रमाणात झालेला आहे. विश्वास पाटील म्हणतात. त्याप्रमाणे गावाकडे रामनामासारख्या जपणारे गावकरी आहेत. साध्या बोलण्यातही शिव्यांचा वापर केला आहे.

शिंच्यांना, मढं बशीवलं, तुमच्या आयला, मुडद्यांनी, भडव्यांनी, भाड्या, रांडा, आयमाय आठवल, मुडदा बसल.

५) **इंग्रजी शब्द :** इंग्रजी शब्दांचाही वापर होतांना 'झाडाझडती'त दिसतो. शिकलेले लोक, सरकारी कर्मचारी, राजकारणी इंग्रजी शब्दांचा वापर करतात. ग्रामीण जनताही इंग्रजी शब्दांचा वापर कधी शुध्द तर कधी अशुध्द स्वरूपात करते.

स्टँड, कॉलनी, मिलीक्टरी (२१) बुलडोझर, इन्स्पेक्टर, इंजिनिअर कलेक्टर, मेसेज, हॉटेल, एजन्सी, रिटायर, पेमेंट, स्टाफसह, स्टुलावर सर्टिफिकेट, ऑफिस, रजिष्टर, असिस्टंट, हॅव नो टाईम (७६), कँटीन, अंडरस्टँड, अर्ग्युमेंट क्रॉस, चीफ क्रॉस, नोटीस नॉन मॅट्रीक, अडजेस्टमेंट, पर्मनंट,

जुनीअर, रेस्ट हाऊस, ऑर्डर, साईटवर, ड्रायव्हर, शेडमध्ये, मटेरियल, ॲम्बेसिडर, लिमिटेशन ॲक्ट, स्लॅब, लाँच, मीटिंग, टॅक्सी, पोस्ट मार्टेम (३२८), सर्कल, सह्या, मस्टर, इमीजियट, कंप्लेंट इत्यादीं.

६) **ओव्या, गाणी :** 'झाडाझडती' त ओव्या, गाण्यांचाही वापर केलेला आहे. ग्रामीण भागात आजही यांचा वापर केला जातो. स्त्रिया काम करता करता ओव्या म्हणतात. त्यामुळे त्यांच्या कामाचा भार हलका होतो. या ओव्या / गाण्यांमध्ये स्त्रियांच्या भावना व्यक्त होतात.

१) साळू वहिनी सकाळीच जात्यावर वरी दळायला बसते. दळता–दळता ती गाते.

काळ्या आंब्याच्या झाडाखाली

बाळू बापूला साद घाली

गळतो ढग

डोळा फुटलं पाणी पाणी लाडक्या बंधुराजा

साद घालू कंच्या रानी ?

या ओव्यांतून ती आपल माहेरपण तुटल्याच दु:ख व्यक्त करते. (पृ. १०९)

२) नकुसा आणि आवडाई जात्यावर बसून दळता –दळता ओव्या, गौरीतली गाणी गायच्या. चकोर, राजा आणि मोहना राणीच गीत सगळ्या आयामायांना माहिती होत ते गीत त्या दोघी गात.

''येशी बाहीरी चालला रथ ।

तुज्या मुलखी चाक रूतं ।।

बुडला दरबार, बुडलं घरदार ।

पांगला रानवरा, तुज्या दारीचा स्वार ।।'' (१५६)

**७) संवाद :**

‘झाडाझडती’ कादंबरीतील संवाद हे त्यातील भाषेचं महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या कादंबरीतील संवादामुळे घटना–प्रसंगांचा धारदारपणा वाढतो. वाचकांच्या मनाला हे संवाद थेट जाऊन भिडतात. कादंबरीतील संवाद हे कादंबरीला नेमकेपणाने पुढे नेतात. संवादामुळे त्या त्या पात्रांची वृत्ती, वैचारिकता, भाषा, संस्कार, दुःख, आर्थिक स्थिती, शिक्षण हे समजायला मदत होते. ‘झाडाझडती’ कादंबरीतील संवादाविषयी विश्वास पाटील म्हणतात.

‘‘झाडाझडती’ मधील संवाद धारदार आहेत. याचं कारण ते बोलत असतांना ह्या व्यक्तीने जे काही भोगलेलं आहे, जे त्याच्या मनाच्या तळात आहे ते आपोआपच त्याच्या मुखावाटे बाहेर पडतं. मी अनेक ठिकाणी सांगितलंय की मी जिल्हा पुनर्वसन अधिकारी म्हणून पुण्याला होतो. तेव्हा अनेक धरणग्रस्त भेटायला येत. ते लोक म्हणत, ‘‘आहो, साहेब, कशाला विचारता तुम्ही परवानगीचं? आगीत सापडलेलं मेंढरू काय कुठल्या दिशेला उडी मारायची हे ठरवून उडी मारतं का?’’ या लोकांचा संवाद कुठूनतरी वेदनेतून उचंबळून वर आला होता आणि ही ‘झाडाझडती’ची कहाणी सुध्दा संघर्षाची, रखरखत्या वास्तवाची कहाणी आहे. रसरसत्या निखाऱ्यावर पापड जसे भाजावेत तशी ही माणस भाजली जातात आणि त्यामुळे त्यांच्या वेदनांना एक शाब्दिक रूप येतं ते अधिक टोकदार असतं. त्यामुळे ते आपोआप येतं. तिथे उसन्या लेखनकलेची आवश्यकता भासत नाही.’’ (५)

१) गोम्या कोळी आणि दादू येसकर यांच्यातील धरण होणार की नाही अशा दुहेरी मनस्थितीत असतात. त्यांच्यात झालेला संवाद,

‘‘येऽ रं, तंबाखू खाऊन जा.’’

‘‘येसकर, लै काळजीत दिसता?’’

‘‘त्या धरणाचं काय झालं?’’

‘‘त्या खासदार शिंगाड्याचं उपोषण –’’

‘‘सुटलं म्हणत्यात ते –’’

‘‘त्येचं भूत कुठं मानगुटी वरन उतरलंय अजून रं?’’

‘‘म्हणजी?’’

‘‘तेच काय कळंना, आधी सांगावा दिऊन ढगातनं इजबाई कोसाळती का? तसंच धरणाचं. कवा उरावर बसंल कुणाला ठावं –’’

‘‘गुर्जी कुठायत?’’

‘‘बाजाराला गेल्याती मघाच्या एसटीनं न्हाय आलं. म्हणूनच टेकलुया इथं. धरणाच काय घडंल कुणी सांगावं?’’(पृ. ५)

२) दत्तू बनूबाईला मृत घोषित करून तिची रक्कम स्वत:च घेतो. बनूबाई वाघधरे साहेबाला भेटायला आंबेपूरला येते. त्या दोघांमधील संवाद.

‘‘साहेब, म्या काय करू वो?’’

‘‘तुम्ही मेलेल्याचं सर्टीफिकेट मिळवा.’’

‘‘पण साएब, ही काय म्या जिती हाय.’’

‘‘म्हातारेऽ असं ओरडून चालत नाही. तुला मेलेल्याचं सर्टिफिकेट मिळवावेच लागेल.’’

‘‘पन मी जित्तीच हाय –’’

‘‘तसा कागदोपत्री पुरावा लागतो; तो दाखला मिळवा. खोट्या कागदपत्राबद्दल फौजदारी करा त्या दत्तूवर. दुसरा इलाज नाही.’’

‘‘पन साएब तुमी तर एवढं मोठंऽ! तुमीच ठोका, की बेड्या त्या मुडद्याला!’’ (पृ. ७२)

**१) चित्रदर्शी भाषा :**

‘‘झाडाझडती’तील चित्रदर्शी भाषेविषयी प्रा. निर्मला मोने म्हणतात, ‘‘विश्वास पाटील यांची भाषाशैली विलक्षण चित्रदर्शी आहे. ही ती ग्रामीण भाषा नव्हे, पण रानातली उभी पिकं, घरं, नदीत नाव चालवणारा भाई, त्याचा रेडा, बाजार, कोसळणारा पाऊस, चिवारीचं जंगल, वाघाची शिकार आणि

आसपासच जंगल, नव्याने उठणारी कॉलनी, चढणारं धरण यांची वर्णन मुळातूनच वाचण्यासारखी आहेत. एखादा रंगीत चित्रपट समोर दृश्यांच्या लडी उलगडत जावा, तशी त सारी दृश्यं वाचक पाहतो.'' (६)

'झाडाझडती'तील जांभळीच वर्णन बुलडोझरच्या पडझडीच वर्णन, नवीन गावठाणाच वर्णन, समस्यांच वर्णन, शेतीच्या कामांच वर्णन, निसर्गाच वर्णन, व्यक्तींच वर्णन, पोषाखाच वर्णन इत्यादी अनेकांची वर्णने अतिशय सूक्ष्मपणे आणि चित्रदर्शी आहेत.

उदा. ''रात्र वाढेल तशी माणसं चुळबुळू लागली. स्टँडला लागूनच वडांच्या झाडात काळूबाई होती. पंधरा-वीस मणाचा मोठा लांबरूंद पत्थर, तीच गावची काळूबाई. बिन मंदिराची, वडालिंबाच्या सावलीत राहणारी आणि गावची राखण करणारी.'' (पृ. ८)

अशाप्रकारे 'झाडाझडती' तील भाषा समाजातील सर्वसामान्य जनतेची आहे. भाषा सर्वसामान्यांच्या इच्छा, आकांक्षा, आनंद, समस्या, राग-द्वेष, श्रध्दा मांडते. धनदांडगे, राजकारणी, सरकारी कर्मचारी इ. मग्रुरीची अरेरावीची भाषा आहे. गरीबांची धरणग्रस्तांची अगतिकतेची भाषा आहे.

**६.११ 'झाडाझडती'तील न्यायव्यवस्था :**

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीत समाजातील न्यायव्यवस्थेचे वर्णन आहे. कोर्ट, कचेरी, वकील, दावे-प्रतिदावे, नोटीस इ. बाबत वर्णन आहे. ग्रामीण भागातील अशिक्षिता कायद्याचा गैरफायदा, अव्यवहारी कायदे, राजकारणी श्रीमंत अशा लोकांच्या बाजूने उभे असणारे वकील, कायद्यातील पळवाटा शोधणारे लोक. कायद्याची कडक अंमलबजावणी न करणारे कर्मचारी अशिक्षितांना लुबाडणारे वकील, त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेणारे वकील, वकीली व्यवसायातील वाढता स्वार्थीपणा इ. चे वर्णन आहे.

१) सुगंधी बाप-लेकाने धरणग्रस्तांची वाढीव रकमेची केस जिंकलेली होती. संपादन केलेल्या जमिनीची किंमत कोर्टातून वाढून आली होती. हे बापलेक बऱ्याच धरणग्रस्तांच्या केस लढले. धरणग्रस्त मात्र ही गोष्ट विसरूनही गेले होते. वकिलांनी हे खटले हायकोर्टापर्यंत चालवले. रकमा वाढीव मिळाल्या आणि संपादनाच्या तारखेपासून व्याजही मिळाल. मात्र अधिकारपत्र वकीलाकडे होती. धरणग्रस्त आंबेपूरला

वकीलाकडे गेले. जेवढी रक्कम मिळेल तेवढी घेऊन आनंदी झाले. दोन-दोन चार-चार हजार मिळाले. वकील आधी सायकलवरून फिरत होता. आता मोठ्ठा बंगला बांधतो, दोन बांधतो. वकिलांनी आपल्या तुमड्या भरल्या. वकीलाल धरणग्रस्ताची केस म्हणून स्टँपची सवलत मिळाली. निम्मीच रक्कम लागली. (पृ. २४९)

२) बनूबाईने दत्तूवर फौजदारी केलेली होती. बारा वर्षे होतात. पण तिला न्याय मिळत नाही. तो दत्तू वकीलाला पैसे देतो आणि आपल्या बाजूने वळवतो. बनूबाईकडून वकीलाला काय पैसे मिळणार नसतात. दत्तू भरपूर पैसे देतो. वकील बनूबाईचे कागदही गडप करतो. हरवल म्हणून सांगतो. (पृ. ३९९)

३) अव्यवहारी कायदा : कुशापाला भूखंडही मिळणार नसतो आणि पुनर्वसनही होणार नसत. कारण कायदा त्याच पुनर्वसन नाकारतो. ज्यांची काही जमीन पाण्यात जाऊनही पाण्याबाहेर १६ एकर जमीन उरते. तो पुनर्वसनाला पात्र होत नाही. कुशपाची पाण्याबाहेर सोळा एकर नाही तर साठा एकर जमीन उरते म्हणून कुशापाच पुनर्वसन होत नाही. पण खरी परिस्थिती ही असते की जी पाण्याबाहेर जमीन असते ती डोंगर उताराची असते. त्यात काही पिकत नाही. करवंद आणि घाणेरीच्या जाळ्या असतात. डोंगर उतारावर औत तरी चालणार का ? धरणासाठी नदीकाठच्या लोण्याचा गोळा असलेली जमीन घेतली आणि उरलेली दगडाची. पोराबाळांना घेऊन मी एकटा कसा जगू. माझी उरलेली साठ एकर जमीन घ्या आणि माझंही पुनर्वसन करा. अस कुशापा म्हणतो. पण कायद्याने उरलेली जमीन घेता येत नाही. डोंगर उतारावरची जमीन सरकारच्या काय कामाची? कुशापा डोळ्यात पाणी आणून म्हणतो, ''वा रं कायदा ? वा रं सरकार. सार तुमच्याच फायद्याच. माझ पुनर्वसन नाही. माझ्या गावात, माज्या माणसांत मी ऱ्हायचं नाही. कायद्यानं पुनर्वसनबी होत न्हाई. हे गाबणं सरकार सोताचा आनी पाण्याचा लाभ उठविणाऱ्या बागायतदारांच्याच फायदाचं कसं बघतं गां ?'' (पृ. १०३)

न्यायव्यवस्था, कायदे कितीही चांगले असले तरी ते वापरतात कसे यावर सगळ अवलंबून असत. श्रीमंतांसाठी, राजकारण्यांसाठी कायद्यातील पळवाटा वकील पैसे घेऊन काढून देतात. काहीही गुन्हा

केला, तरी कायदा आपल्या बाजूने आहे हे या लोकांना चांगल माहिती होत आणि यामुळेच हे लोक शेफारतात, माजतात, सर्वसामान्यांवर कुरघोडी करतात. त्यांना आपल्या म्हणण्याप्रमाणे वागवतात.

भ्रष्टाचाराने वकिली व्यवसायालाही सोडले नाही. वकीलाला पैसे दिले की तो कायदा फिरवतो. खोट, अयोग्य काम करतो. पैसेवाल्यांच्या बाजूने उभा राहतो. अशिक्षितांची पिळवूणक करतो. स्वत:चा फायदा पाहतो, माया जमवतो. बनूबाईला तिच्या सावत्र मुलाने फसवून मयत दाखवून तिची जमीन, पैसा तो घेतो. ती न्यायासाठी वणवण भटकते, लोकांची धुणी–भांडी करून पैसे कमावते आणि वकीलाला देते. मात्र वकील बदलतो. तिला न्याय मिळत नाही. बनूबाई म्हातारी होते, पण या जन्मात तरी तिला न्याय मिळेल की नाही हे सांगता येत नाही. याउलट दत्तू खरा गुन्हेगार असूनही पैसे देऊन कायदा आपल्या बाजूने वळवतो, वर्षानुवर्षे केस लांबवतो. या जन्मी तर त्याला शिक्षा होईल, असे वाटत नाही. वकील आपल्या कामाच्या सुरवातीला प्रामाणिक, गरीबांचे कैवारी अशा थाटात वावरतात. सुगंधी वकील त्यातलेच धरणग्रस्तांचे वाढीव रक्कम मिळविण्यासाठीची केस फुकट लढण्याचा आव आणतात आणि केस जिंकल्यावर थोडेसेच पैसे धरणग्रस्तांना देऊन उरलेले आपल्या खिशात घालून बंगले बांधतात.

वर्षानुवर्षे लांबत जाणारे निकाल, वाडीतील दोन मुलांवर किसन फॉरेस्टर फौजदारी करतो. दोन महिन्यांपासून छप्पन्न वेळा त्या मुलांना वाघेठाणला चालत जाव लागत. या प्रवासातच ते मुल वाळतात. राघू भिवावर मास्तरला मारहाण करण्याची केस असते. त्यावर पैसे घेऊन स्टे आणतात. धोंड्यावर केस सुरू असते. मात्र तो तारखेला हजर न राहता पुढची तारीख मागून घेतो. सुगंधी वकील धनदांडग्यांना त्यांच्या धरणग्रस्तांना दिलेल्या बागायती जमिनी परत मिळवून देण्यासाठी तयार होते. यासाठी ते जुन्या तारखेचे खोटे स्टॅप वापरून खातेमोड दाखवतात आणि धरणग्रस्तांनी कसलेली जमीन वापस मिळवतात.

काही अव्यवहारी कायदेही आहेत हे कुशापाच्या प्रकरणावरून लक्षात येते. कुशापाची १०० एकर जमीन असते. त्याची जमीन पाण्यात जाऊनही शिल्लक ६० एकर जमीन राहते. ज्यांची जमीन पाण्यात जाऊनही १६ एकर शिल्लक राहते. त्याच पुनर्वसन कायदा नाकारतो. असा कायदा आहे. त्यामुळे कुशापाच पुनर्वसन होत नाही. पण वास्तवता ही आहे की, कुशापाची चांगली, पिकावू जमीन धरणात जाते, जी उरते

ती बिनपिकावू, डोंगर उताराची असते. त्यातून काहीही उत्पन्न मिळू शकत नाही. शिवाय पूर्ण गावाच पुनर्वसन होणार आणि एकटा कुशापाचा परिवार, जंगलात कसा राहणार? हे वास्तवता कायदा बघत नाही. आपल पुनर्वसन व्हाव म्हणून कुशापा वर्षोनुवर्षे झगडतो, पण त्याला न्याय मिळत नाही.

हैबतीचा खून होतो. त्यालाही न्याय मिळत नाही. खासदार, पोलीस, वकील यांच्या मदतीने राघू भिवा सुटतो. 'झाडाझडती'तील न्यायव्यवस्था अशी आहे.

### ६.१२ 'झाडाझडती'तील कुटुंबसंस्था :

'झाडाझडती' ही सामाजिक कादंबरी आहे. समाजाचा पाया कुटुंबसंस्था असते. 'झाडाझडती'त बरेच कुटुंब आहेत. आवडाईचे कुटुंब, खैरमोडे गुरुजींचे, नकुसाचे, पांडू येताळ, दिगू आण्णा, गोम्या कोळी, सुभानजी, कुशापा, शेवंती, खासदार शिंगाडे इ. चे कुटुंब, त्यातील नातेसंबंध 'झाडाझडती'त पहायला मिळतात. आई, मुलगा, आई, मुलगी, सासू-सून, नवरा-बायको, बाप-लेक, इतकंच नाही. तर कुटुंबाचे प्राणीप्रेम, जमिनीवरचे प्रेम, गावावरचे प्रेम, शेजाऱ्यांविषयी आपुलकी असे कुटुंबांचे वेगवेगळे पदर 'झाडाझडती'त आहे.

१) **गोम्या कोळी :** गोम्या कोळी हा पखाल वाहणारा बलुतेदार होता. गोम्या आणि त्याचा हल्या दोघेही निमूटपणे, प्रामाणिकपणे काम करतात. गोम्या पाणी भरणं झाल की बलुत्याच्या घरी जायचा. चतकोर-चतकोर भाकरी गोळा करायचा. एकादीकडून ताक मागायचा व ते खायचा (पृ. ३)

गोम्याची बायको कमळी व त्याला दोन मुल असतात. नवीन गावठाणात पखाल वाहण्याचे काम नसणार म्हणून कमळी पैशासाठी गोम्याला हल्या विकायला सांगते. मात्र गोम्याचा जीव हल्यात असतो. तो त्याला विकत नाही. कमळी मात्र गोम्याशी भांडत असते. तिला मुलांची काळजी असते. नवीन गावठाणात गोम्याला एक एकर जमीन मिळते. गोम्याचे संसारात, कामात फारसे लक्ष नसते. सगळंकाही कमळी बघते. हल्याला घेऊन गोम्या, कमळी शेतात काम करत असतात. हल्या शेजारच्या शेतात जाऊन नासधुस करतो. म्हणून तो शेतकरी धोंड्या हल्याला मारतो. हल्या आजारी पडून मरतो. याचा गोम्याला धक्का बसतो. तेव्हापासून गोम्या घुमा होतो. तो ना बोलतो ना काम करतो. एका जागेवर बसून असतो. कमळी शेतासाठी धडपडते.

२) **आवडाईचे कुटुंब :** आवडाई तिचा नवरा गोविंदा मुलगा हैबती, सून फुला आणि नातू-सदा असा तिचा परिवार होता. एक मुलगा गुणवंता तिने मावसभाऊ सुभानजीला दत्तक दिलेलो असतो. आवडाई कर्तबगार स्त्री असते. सगळं घर, व्यवहार ती सांभाळते. आवडाचा नवरा लंगडा होता. मात्र तिने मोठ्या हिमतीने

त्याचा संसार केला. हैबती मोठा झाला म्हणून त्याच्या लग्नाचं ती बघते. वयाच्या पंधराव्या वर्षी तिच लग्न होत. तिच्या नवऱ्याने गोविंदानेही खूप सोसलेल असत. घरातील अदावतीमुळे तो लंगडा होतो. जिथे तिथे उडी घेऊन आवडा संसार वाढवीत होती. तिला आपल्या ७० वर्षांच्या नवऱ्याची काळजी वाटत होती. गोविंदाच आपल्या शेतात, झाडांवर आणि आवडाईवरही खूप प्रेम होत. या शेताला, गावाला सोडून त्याला जायच नसत. शेतावरून बुलडोजर फिरतो हे त्याला सहन होत नाही आणि तो विहिरीत उडी घेऊन जीवन संपवतो. याचा आवडाला धक्का बसतो. मात्र ती यातून सावरते. वर्षांच्या आत मुलाच साध्या पध्दतीने धरणग्रस्ताच्या मुलीशी फुलाशी लग्न लावते. हैबतीला कॉलनीवर नोकरी मिळते. पण तो परमनंट होत नाही. फुलाला नव्या गावठाणात मुलगा होतो. त्याच नाव सदा ठेवतात. आवडा, फुला, हैबती शेत कसताता. मात्र खैरपूरकर त्यांना ती कसू देत नाहीत. हैबती बऱ्याचवेळा तक्रारी करतो. पण त्याच कोणी ऐकत नाही. त्याच्या नोकरीचे दिवसही भरवत नाहीत. शेवटी तो शेती करतो. मात्र राघू भिवा त्याला नीट जगू देत नाही. त्याच्यावर हल्ला करतो आणि त्याचा खून करतो. आवडाई यामुळे उन्मळून पडते. धीराने त्याला दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न करते, तिला फुलाही साथ देते. मात्र हैबती वाचत नाही. राघू भिवा ही केस मिटविण्यासाठी आवडाला पैसे देतो, मात्र ती ते घेत नाही. अशा प्रकारे आवडाईचे कुटुंब प्रेमळ समाधानी, परोपकारी, गावाला धरून राहणारे असते.

३) **खैरमोडे गुरुजींचे कुटुंब :** खैरमोडे गुरुजी चालती–बोलती आग होते. त्यांचा धरणाला विरोध होता. कारण कोयना धरणग्रस्तांचे हाल त्यांनी पाहिले होते. मुलांनी शिकाव यासाठी ते आटापिटा करत. गुरुजी जातीने महार होते. त्यांनी धरणग्रस्तांच नेतृत्व स्वीकारल. गावकरीही त्यांना पाठींबा देत. गावासाठी मास्तर अहोरात्र लढत असतात. त्यासाठी ते नोकरीवरही लाथ मारतात. स्वखर्चाने काम करतात. गावकऱ्यांना मदत करतात. हे सर्व त्यांच्या बायकोला हिराला आवडत नाही. हिरा ही शाळा शिकलेली नसते. आर्थिक ओढाताण होते. म्हणून हिरा न लाजता रोजंदारीवर जाते. घरकाम करते. त्यांना एक शेवंती नावाची मुलगी असते. गुरुजी तिचे फार लाड करतात. तिला खूप शिकविण्याची त्यांची इच्छा असते. मात्र गावातील रिकामटेकडी मुल शेवंतीला त्रास देतात. म्हणून हिराच्या हट्टामुळे गुरुजी स्वत:च्या तत्त्वाला मुरड घालून

शेवंतीच लग्न करतात. शेवंतीला एक मुलगा, एक मुलगी होते. पण तिचा नवरा हुंड्यासाठी शेवंतीचा छळ करतो. तिला माहेरी आणून सोडतो. हिरा आणि गुरुजी तिला मायेने सांभाळतात. शेवंती ही रोजंदारीवर जाते. तिच्यावर मुल बलात्कार करतात. गुरुजी कोलमडतात. ते पोलीसात जायला निघतात. मात्र हिरा त्यांना अडवते आणि आपल्या मुलीचे धिंडवडे नको म्हणून त्यांना पोलीसात जावू देत नाही. गुरुजी म्हातारे होतात आणि देवाघरी जातात. त्यांच्यानंतर शेवंती पत्रव्यवहार, अर्ज इ. कामे ती आत्मविश्वासाने करते. परिवाराला सांभाळते.

अशा प्रकारे गुरुजींचे कुटुंब आहे. गुरुजी हे धरणग्रस्तांसाठी लढणारे होते. हिरा थोडी अंधश्रध्दाळू, मुलीची काळजी असणारी आहे. शेवंती सर्व आघातातून आत्मविश्वासाने जगते.

४) **गुणवंताचे कुटुंब :** गुणवंता हा आवडाचा मुलगा असतो. आवडाच्या मावसभावाला-सुभानजीला तो दत्तक दिलेला असतो. गुणवंता झांजडवाडीला बायको साळू मुल बज्या आणि बैज्या यांच्या सोबत राहत असतो. साळू घरकाम करते,शेतातही काम करते. आल्या-गेल्याच करते. मुलांना सांभाळते. गुणवंता हा स्वभावाने प्रेमळ असतो. कुशपाशी त्याची दाट मैत्री असते. दोघेही एकमेकांच्या अड्या-नड्याला उपयोगी पडतात. गुणवंताला हैबतीचीही काळजी असते. गुणवंता गावकऱ्यांमध्ये हुशार असतो.

सुभानजी हा दिलदार असतो. तो नेहमी आवडाईला आर्थिक मदत करतो. तो मुंबईला नोकरीला असतो. गावाकडील अनेक मुलांना तो नोकरीला लावतो. सुभानजी मरतो तेव्हा सर्वांनाच फार दु:ख होत.

५) **शिवरामचे कुटुंब :** शिवराम सणगर हा जांभळीचा रहिवाश असतो. काही दिवस तो मुंबईला नोकरी करतो. पण तिथे काही जम बसत नाही. म्हणून जांभळीत शेती करतो त्याची बायको नकुसा असते. लग्नाला बरीच वर्षे होऊनही मुलबाळ होत नाही. अंगारे-धुपारे असे सगळे प्रयत्न करतात. शेवटी त्यांना मुलगा होतो. त्याचं नाव बिरज्या ठेवतात. हैबती आणि शिवरामची दाट मैत्री असते. आवडा आणि नकुसाचेही घरोब्याचे संबंध असतात. म्हणूनच बिरज्याच्या बारश्याला हैबती मामा बनून आहेर आणतो. शिवराम बुलडोझरखाली मारला जातो. नकुसा मुलाकडे पाहून आवडाईच्या आश्रयाने जगते. गावठाणात तिला लवकर जमीन मिळत नाही. ती कंठाबाईकडे जाते. अंगारे-धुपारे करते. कष्टाने ती शेती करत जगते.

६) **पांडू येताळचे कुटुंब :** पांडबाने इर्षेने आपला संसार उभा केला होता. त्याची बायको जेव्हा जिवंत होतो तेव्हा दोघांच पटत नव्हत. दोघ सारखी मोठ्याने भांडायची. धाकटा अशोक लहान असतानाच साध्या आजाराच निमित्त होऊन ती मरते. अशोक पाळण्यात, थोरली तीन मुल पाठीवर विधवा बहिण, पुन्हा लग्न कराव अस गाव म्हणत होत पण पांडबाने त्याकडे दुर्लक्ष केल. तो अशोकचीही आई झाला. पोर लहानाची मोठी केली दोन सुना आल्या. अशोक दहावीत शिकत होता. पांडबाला जांभळी गाव सोडतांना वाईट वाटतं. नव्या गावठाणात त्याला कमी जागा, कमी शेती मिळते. त्यामुळे त्याच्या घरावर आर्थिक संकट येते. घरादारासहीत तो या वयातही रोजंदारीवर जातो. घर लहान, माणसे जास्त म्हणून तिसऱ्या मुलाच लग्न करता येत नाही. अशोकला मात्र तो मोठ्या कष्टाने शिकवतो. मात्र अशोक कृतघ्न निघतो. शाळेतील सहशिक्षिकेशी लग्न करून सासरी राहतो. याचा पांडबाला भयंकर राग येतो. पांडबाचा जीव त्याच्या राजा नातवावर फार असतो. मात्र तापाने तो मरतो. पांडबा या दु:खातून बाहेर येत नाही आणि तोही मरतो.

७) **दिगू अण्णाचे कुटुंब :** दिगू अण्णा हा जांभळीतील देवपूजा करणारा ब्राम्हण असतो. तो आणि त्याची बायका जांभळीत राहत असतात. त्याचा मुलगा-सून पुण्याला असतात. दिगुअण्णाचा काळूबाईवर विश्वास असतो. धरण होणार नाही असं तो ठामपणे गावकऱ्यांना सांगत असतो. मात्र धरण होते आणि तो आणि त्याची बायको पुण्याला मुलाकडे जातात. सून भांडायची, पण खैरपूरच्या वाळूसऱ्यापेक्षा पोराबाळांचे जोडे खात पुण्याला राहण केव्हाही चांगल म्हणून ते सूनेकडे राहत होते. (पृ. ३२२) पाच सहा वर्षांनंतर दिगूअण्णा गावठाणात येतो. सूनेच आणि त्याच भांडण होत. तो मनातून चिडतो. जांभळी गावात त्याला मान होता पुण्यात सुनेची बोलणी खाण्याऐवजी आपल्या गावात जाऊन रहाव अस त्याला वाटत. मात्र गावठाणातील गैरसोय पाहून तो पुण्याला परततो.

८) **कुशापाचे कुटुंब :** कुशापा हा मसणमाळचा राजा होता. त्याच्याकडे १०० एकर जमीन होती. मनाने तो उदार होता. गावात सरकारी कर्मचारी आला की, कुशापाच्याच वाड्यात त्याचा मुक्काम असे. कुशापा पाहुण्याच स्वागत खुशीन करत होता. गुणवंता हा कुशापाचा जानी दोस्त होता. एकमेकांच्या मदतीला

दोघेही धावून जायचे. धरणामुळे कुशापाची पिकाऊ जमीन पाण्याखाली जाते व त्याचे नुकसान होत. उरलेली जमीन जास्त असल्यामुळे त्याच पुनर्वसन होत नाही. त्याच एकट्याचच पुनर्वसन कायद्यात बसत नाही. त्यामुळे तो अस्वस्थ होते. धरणामुळे तो कंगाल होतो. त्याची श्रीमंती जाते. त्याची बायको मंजुळा, मुली सायली, इमली आणि छबली असा परिवार असतो. मंजुळा पाय घसरून पडते. तिच्या दवापाण्याच्या खर्चात त्याचे पैसे संपतात. मुलीला बागायतदाराकडे द्यायच ठरवतो. मात्र ते पंधरा हजार हुंडा मागतात. कुशापा ठरवतो. काहीही झाल तरी मुलीला सुखात ठेवायची इथेच लग्न करायच. पैशासाठी तो स्वत:च्या तत्त्वाविरूध्द दारूचा धंदा करतो. त्यात पकडल्या जातो. मग स्वत:च्या जीवाशी खेळून धाडसाने वाघ मारतो व त्याच कातड पुण्याला विकायला नेतो. मात्र तिथेही तो फसतो. माघारी पळून येतो आणि शेवटी बागायतदाराऐवजी धरणग्रस्तांच्या मुलाशी आपल्या सायरीच लग्न लावतो. जांभळी पर्यटन झाल्यावर त्याला जुन्या जमिनीचे पैसे मिळतात. ते पैसे बायको बँकेत ठेवायला सांगते दुसऱ्या मुलींच्या लग्नासाठी. अशा कुशापा दिलदार असतो. जगाला देण्याच काम त्याने केल होत कोणाकडून काही कधी त्याने मागितले नव्हते. तो कधी चोरीमारी, ना लांडीलबाडी असा कुशापा प्रामाणिक, प्रेमळ, मदतीला नेहमी तयार असा होता. मंजुळा ही अंथरूण पाहून पाय पसरणारी होती.

अशा प्रकारे कुटुंबातील महत्त्वाचे नाते म्हणजे पती-पत्नीचे. 'झाडाझडती' कादंबरीतील समाजातील कुटुंबसंस्थेत या नात्याचे पदर दिसतात. स्त्रिया आपल्या पतीची काळजी घेणाऱ्या, त्यांच्या सुख-दु:खात सहभागी असणाऱ्या, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या, घरातील आर्थिक भार उचलणाऱ्या, पुरुषांच्या बरोबरीने शेतात राबणाऱ्या, आहे त्या परिस्थितीतही आनंद मानणाऱ्या, नवऱ्याच ऐकणाऱ्या अशा साध्या भोळ्या पत्नी आहेत. पतीही काबाडकष्ट करणारे, बायकोवर प्रेम करणारे, माया करणारे, काही-बायकोला मारणारे, शिव्या देणारे, बायकोला काही कळत नाही अशा समजूतीचे नवरे आहेत. पण तरीही या नात्यामध्ये प्रेम आहे.

याशिवाय 'झाडाझडती'त इतरही नातेसंबंध काही रक्ताचे, तर काही मानलेले आहेत. या नातेसंबंधाचा उल्लेख ओझरता असला तरी, या नात्यातील गोडवा जाणवतो. समाजात सगळीच नाती काही

रक्ताची नसतात, काही मानलेलीही असतात आणि ही नाती फार मजबूत असतात. अशीच नाती म्हणजे हैबती भाऊ आणि नकुसा बहीण हे नात मानलेल आहे. नकुसाच्या मुलाच बारस असत तिच्या माहेरून कोणी येत नाही ही अडचण बघून आवडाई हैबतीला मामा म्हणून आहेर आणायला लावते. नकुसाची लाज राखली जाते. आवडाई कायम नकुसाजवळ असते.

असच नात म्हणजे गुरुजी आणि आवडाईच. दोघांमध्ये मानलेल्या भावा-बहिणीच नात असत. गुरुजींच्या लढ्यात कायम आवडाई त्यांच्या पाठीशी असते. गुरुजींना मारतात. तेव्हा ती त्यांच्या गळ्यात पडून रडते. गुरुजी मी थकलो असे जेव्हा म्हणतात तेव्हा ती म्हणते, ''तुम्ही माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान आहात तुम्ही इतक्यात थकू नका. ती गरुजींना धीर देते.''

रक्ताची नाती भावा-बहिणीच म्हणजे आवडा-सुभानजीच. सुभानजी हा आवडाचा मावसभाऊ असतो. तिच्यासाठी तो नेहमी तत्पर असतो. आर्थिक मदत तो न सांगता करत असतो. दोघांची एकमेकांवर फार माया असते.

भावा-भावांच नात म्हणजे गुणवंता आणि हैबती याच. गुणवंता हा मामाकडे दत्तक गेलेला असतो. हैबतीविषयी त्याला काळजी असते. परमनंटच काय झाल? अस तो हैबतीला विचारत असतो. स्वत:जवळचे पैसे हैबतीला देत असतो. पैसेच नाही, तर सुभानजीने पाठवलेल्या कपड्यातील कपडेही तो हैबतीला देतो. हैबतीशी मन मोकळ्या गप्पा मारतो.

याशिवाय मैत्रीच नातही 'झाडाझडती'त पहायला मिळत. गुणवंता आणि कुशापा हे दोघे चांगले मित्र असतात. एकमेकांच्या अडचणीत एकमेकांना मदत करतात. त्यांचा एकमेकांवर विश्वास असतो. असच मैत्रीच नात शिवराम आणि हैबती मधेही असत.

अशाप्रकारे 'झाडाझडती'त नातेसंबंधाचे विविध पैलू, विविध पट आहेत. कुटुंबामुळेच नाते टिकून असतात आणि नात्यांमुळे समाज.

### ६.१३ 'झाडाझडती'तील शैक्षणिक स्थिती :

‘झाडाझडती’ ही धरणग्रस्तांवरील सामाजिक कादंबरी आहे.‘झाडाझडती’ तील समाज साधारणत: ग्रामीण आहे. ग्रामीण भागात शिक्षणाच्या बाबतीत उदासिनता जाणवते. हळूहळू शिक्षणाच्या बाबतीत जागृती होतांना दिसते. शिक्षणामुळे जसे फायदे होतात, तसेच शिक्षणामुळे शिक्षित लोकांमुळे फसवणूकही केली जाते. अशिक्षितता ही समाजातील मोठी समस्या आहे. अशिक्षिततेमुळे समाजातील जनतेची पदोपदी फसवणूक होते. त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला जातो, त्यांना लुबाडले जाते. त्यांना राबवले जाते.

‘झाडाझडती’ या कादंबरीत खैरमोडे गुरुजी हे शिकलेले असतात. ते धरणग्रस्तांचे प्रतिनिधित्व करतात. धरणग्रस्तांना योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहतात. त्यांना कायद्याची, सरकारी कामकाजाची, कोर्ट कचेऱ्यांची, अर्जाची माहिती असते. त्यामुळे ते लढा देत असतात. इतर धरणग्रस्त फारसे शिकलेले नसतात. जवळपास सर्वच अशिक्षित असतात. स्त्रियांचा तर शिक्षणाचा प्रश्नच येत नाही. गुरूजी मात्र सर्वांना शिका, मुलांना तळमळीने शिका सांगतात, शिक्षणासाठी मुलांना मदत करतात. याउलट राजकारणी, वकील, सरकारी कर्मचारी, कारखानदार, व्यावसायिक स्वत:च्या शिक्षणाचा, माहितीचा गैरवापर करतात. अशिक्षितांची पिळवणूक, फसवणूक करतात. स्वत:च्या फायद्यासाठी कायद्यांचा वापर करतात. अशिक्षितांवर अन्याय करतात, भ्रष्टाचार करतात स्वत:च्या अधिकाराखाली जनतेला राबवतात, घाबरवतात.

१) खासदार शिंगाडे यांनी जांभळी धरण व्हाव म्हणून भरपूर प्रयत्न केलेले असतात. मात्र ते अपयशी होतात, पण त्यांचा मुलगा पुण्याहून लॉ करून येतो. सर्जेराव एसपी कॉलेजमध्ये शिकलेला असतो. तो आल्यावर धरण बांधण्याचा हट्ट करतो. (पृ. ३१)

२) खैरमोडे गुरुजीचा जन्म नवसाने झाला होता. गुरुजी लहानपणीच चुलत्यासोबत मुंबईला गेले होते. तिथे व्ह. फा. फायनल झाले. सुरुवातीला कोयनेच्या परिसरात नोकरीला होते. (पृ. ३५)

३) हैबती नोकरीला असतो. आठ महिने नोकरीवर असतो. त्याचा मामा सुभानजी त्याला विचारतो तू परमनंट झाला का? यावर हैबती म्हणतो म्हणजे? म्हणजे कायमची नोकरी, बघ नाही तर मधे ब्रेक देतील.

हैबतीला ब्रेक म्हणजे काय हेही माहिती नसतं. अशिक्षितपणामुळे हैबतीला हे सगळे माहिती नसते. (पृ. ४५)

४) धरणग्रस्तांना जमिनीचे पैसे मिळत असतात. शिवराम सणगराला फक्त ५० रु. मिळतात. तो अधिकाऱ्याला विचारतो तर अधिकारी सांगतो, याच्या वडलाने १५ वर्षांमागे तगाई काढली होती. त्याचे व्याजासकट पाच हजार काटले. घरपट्टीची थकबाकी ३०० आणि घरफाळा १५० आणि १५०० अल्पबचतीत गुंतवले. हे सरकार परस्पर करते आणि शिवरामला यातल काहीसुध्दा कळत नाही. (पृ. ६०)

५) बनूबाई जमिनीचे पैसे घेण्यासाठी जांभळीत येते. गुरुजी विचारतात तुला पैसे वाटपाची नोटीस आली का? ती म्हणते नाही, माझ नावही यादीत नाही. बनुबाईला तिच्या सावत्र मुलाने फसवले असते. बनूबाई मृत झाली म्हणून तिची सगळी जमीन तो स्वत:च्या नावावर करतो. बनुबाईच्या अशिक्षितपणामुळे तिला हे कळत नाही. ती आंबेपूरला साहेबाला भेटायला येते. आंबेपूरच्या इमारती बघून बावरून जाते. ती दिसेल त्याला काल जांभळीला आलेल्या साहेबाचा पत्ता विचारू लागली. कोणाला काहीच कळेना. शेवटी एक पट्टेवाला तिला पत्ता सांगतो. शिक्षण नसल्यामुळे तिला अधिकाऱ्याच नाव, पत्ता सांगता येत नाही. (पृ. ६२, ६९)

६) हैबतीच्या मामाची मुलगी रूपा शाळेत दहावीत शिकत असते. मामा तिला तिच्या लग्नाविषयी विचारतो. रूपा शिकलेली असल्यामुळे ती सारासार विचार करते. स्पष्ट बोलते. मी धरणग्रस्ताशी लग्न करणार नाही, अस स्पष्ट सांगते. (हैबती नॉनमॅट्रीक असतो) (पृ. ८१)

अशा प्रकारे 'झाडाझडती' तील शैक्षणिक स्थिती आहे. श्रीमंतीचे, राजकारण्याची मुल शहरात जाऊन शिकतात. मात्र ग्रामीण भागातील मुल शिक्षणात मागेच असतात. जांभळीतील एकमेव अशोक डिएड् होतो. बाकीचे हैबती मॅट्रिक नापास, म्हाकू, बाबू इ. शिकलेले असतात. मात्र शिक्षकांच्या मुली शिकतांना दिसतात. खैरपूरच्या शिक्षकाची मुलगी डी.एड्. होते. शेवंती शिकते, रूपाही दहावीपर्यंत शिकते. गावठाणाती, वाड्यांतील शाळा मात्र नावालाच असतात, सरकार, मास्तर, पालक, मुल यापैकी

कुणालाच शिक्षणाची आस्था नसते. ‘झाडाझडती’त शिक्षणापेक्षा पोटाचा प्रश्न मोठा आहे. शाळा नाही तर मास्तर नाही, तर शैक्षणिक प्रगती कशी होणार? खैरमोडे गुरुजींना मात्र शिक्षणाविषयी कमालीची आस्था असते. ते सगळ्यांना शिकायला सांगतात. पुरुषच शिकलेले नसल्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न येत नाही. शिक्षण नसल्यामुळे गावकऱ्यांचे प्रत्येक बाबतीत अडते. प्रत्येक बाबतीत दुसऱ्यावर आवलंबून रहावे लागते.अशिक्षितपणामुळे त्यांच्यावर धरणग्रस्त बनण्याची वेळ येते. अस गुरुजींना वाटत.

धरणग्रस्तांची फसवणूक, पिळवणूक, छळवणूक, अत्याचार हे सगळ त्यांच्या अशिक्षितपणामुळे होत असत. हैबतीची नोकरी परमनंट होत नाही. धरणग्रस्तांना जमिनीचे योग्य पैसे मिळत नाहीत. बनूबाईला तिच्या सावत्र मुलाने फसवलेले असते. हिरा मास्तरीण शिकलेली नसते. वाडीतील लोक विचारपूस न करता दिलेली रक्कम घेतात. कागदपत्र, अर्ज यावर लोक अंगठाच मारत असतात. कारण कोणी शिकलेले नसते. समोरच्यावर विश्वास ठेवून न वाचता अंगठे देतात. खैरमोडे गुरुजी मुलांनी शिकाव म्हणून प्रयत्न करतात. शाळा नाही म्हणून स्वत:च्या घरासमोर मुलांना शिकवतात. शाळा व्हावी म्हणून प्रयत्न करतात. स्वत:च शिकवतात. तक्रार करून करून एक दमेकरी शिक्षक मिळतात. मात्र त्यांनाही शिक्षणाची, शिकविण्याची इच्छा नसते. वाडीत तर शाळा नावालच असते. पावसाळा भयंकर असतो त्यामुळे मास्तर येतच नाही. शाळेत शाळा सोडून इतर सगळे कार्यक्रम होतात. अशोक मास्तर होतो. मात्र तो घरच्यांपासून लांब राहतो. शिक्षणाचा असाही दुष्परिणाम बघायला मिळतो. खैरमोडे गुरुजी थकले, तरी मुलांना शिका, शिक्षण हाच आधार आहे. अस परोपरीने सांगतात. अशा प्रकारे ‘झाडाझडती’त शैक्षणिक दुरवस्था बघायला मिळते.

## ६.१४ झाडाझडतीतील समाजजीवनातील समस्या :

## (धरणग्रस्तांचं जीवन) :

‘झाडाझडती’ च्या कादंबरीतील समाज हा धरणग्रस्तांचाच आहे. म्हणून त्यांच्याच म्हणजे धरणग्रस्तांच्या समस्या यात वर्णन केलेल्या आहे. ही कादंबरीच धरणग्रस्तांच्या जीवनाने व्यापलेली आहे.

'झाडाझडती'तील समस्या म्हणजेच धरणग्रस्त आहेत. या धरणग्रस्ताच जीवन, ते कसे धरणग्रस्त झाले, त्यांच्या जीवनातील पावलोपावली असणाऱ्या समस्या, त्या समस्या वर्षानुवर्षे झगडूनही सोडवल्या जात नाहीत उलट वाढतच जातात.

१) खैरमोडे गुरुजीनी कोयनेतील धरणग्रस्तांचे हाल स्वत: पाहिलेले असतात. तेथील धरणामुळे बुडालेल्या वाड्या डोंगरावर रहात होत्या. तीन वाड्यांची पोर डोंगर पार करून शाळेत येत होती. शाळा भैरोबाच्या अंधाऱ्या देवळात भरत होती. वीज कोयनेला, समृध्दी महाराष्ट्राला आणि भिकेची थाळी धरणग्रस्तांना रॉकेलला पैसा नाही. म्हणून शाडूच्या मातीने कपडे धुत होते. पोस्टकार्ड टाकायला आठ मैल जाव लागत होत. असे धरणग्रस्तांचे हाल पाहिल्यामुळे गुरूजींचा धरणाला विरोध होता. (पृ. १०)

३) बुलडोझरखाली आवडाची बाग सर्वप्रथम आली तो तुडवत डोझर पुढे-पुढे जातो. आवडा हे बघून मोठ-मोठ्याने रडते. जमीनदोस्त होत जाणार जित्राप बघून जांभळीकरांच्या पायाखालची जमीन सरकत होती. गोविंदालाही हे बघवत नव्हत. तो आतून आक्रंदत होता. आपल्या डोळ्यापुढे संसाराच सरण त्याला बघवत नव्हत. या शेताबांधात त्याचा आणि सर्वच गावाचा जीव, आठवणी पावलो-पावली गुंतलेल्या होत्या.ऊन-वारा-पाऊस झेलून रक्तभात गिळून कष्ट केलेले असतात. पोरबाळं, कोंबडी, कुत्री, शेरड-करड घेऊन संसार उभा केला होता. या साऱ्यावरून पाणी फिरल. याच गोविंदालाच दु:ख होत आणि आपल गाव, शेत, जमीन सोडून न जाण्यासाठी तो विहिरीत उडी मारून जीवन संपवतो. (पृ. २३, २४)

४) धरणग्रस्तांसाठी नव्या गावात काय-काय आहे. हे अधिकारी वाचून दाखवतो. खाली दहा-पंधरा गावात धरणग्रस्तांसाठी भूसंपादन सुरू आहे. त्यांना चांगल्या प्रतीच्या जमिनी मिळणार आहेत, त्यांच्यासाठी गावठाणे बांधली जाणारी, नळपाणी पुरवठा योजना, समाज मंदिरासाठी जागा, चावडी, गुरांसाठी खळ्या वाडग्याची सोय, प्रत्येकाला राहण्यासाठी वेगळा भूखंड, घरबांधणीकरिता कर्ज, अशा अनेक गोष्टीही मिळणार अस आश्वासन अधिकारी देत होते. (पृ. ३४)

५) खैरमोडे गुरुजींना या आश्वासनाचा फोलपणा माहिती होता. ताटाबाहेरची शीतही कोणाला न देणारे हे लोक धरणग्रस्तांना कशी जमिनी देतील? जमिनीच्या नावाखाली फोंडा माळ देतील. नांगर चालणार नाही,

बैल पालथी पडतील. आता सगळे पोपटासारखे बोलतात, आश्वासन देतात. त्यात त्यांच काही जात नाही. याची साधी बदली झाली तरी वैतागतात आणि धरणग्रस्त त्यांचा गाव सोडणार, जो उद्या कधीही दिसणार नाही. गुरुजींच्या डोळ्यापुढे कोयनेतील खंगलेल्या धरणग्रस्तांची चित्रे होती. माणसांतून उठणारी माणसं (पृ. ३५).

६) धरणग्रस्तांना जमिनीला जमिन देणार हे काही खर नव्हत. जेवढी जमीन बुडाली तेवढी मिळणार नव्हती. कितीही एकर जमीन असली आणि कुटुंबात कितीही माणस असली तरी प्रत्येक बुडीत खातेदाराला जास्तीत जास्त सात एकर जमीन मिळणार होती. नाही तर बहुतेक खातेदार फक्त तीन एकराचे धनी बनणार होते. (पृ. ५२)

७) जांभळीकराना घराची-शेतीची नुकसानभरपाई वाटण्यात येत होती. तिथे तलाठी, ग्रामसेवक,बँकवाले,सोसायटीवाले आप-आपले पैसे गावकऱ्यांकडून वसूल करायला आले होते. शिवराम सगणराला सात हजारापैकी पन्नास रुपयेच मिळतात. कारण त्याच्या वडलाने काढलेली तगाई व्याजासकट पाच हजार होते. ते कापून घेतात. घरपट्टीची थकबाकी ग्रामपंचायत तीनशे रुपये कापते, दिडशे घरफळा तलाठी घेतो आणि दिड हजार अल्पबचतवाला गुंतवतो. गरुजी संतापून बोलतात. ह्या पन्नासी रुपयांत घर, जमीन कस घ्यायचं? यावर वाघधरे साहेब बोलतात. उद्या गाव उठल्यावर या लोकांची वसुली कशी होणार ? गरुजी कळवळून आपल दु:ख मांडतात, ‘‘का उठवता आम्हांला माणसातून? का खेळताय आमच्या जीवाशी? त्या तिकडं शहरात तुमच्या चालू गिरण्याबी आजारी पडतात. त्यासाठीबी तुमच्याकडे दवापाणी आहे अन् धरणाच्या सरणावर चढलेली ही अकरा हजार माणसं दिसत नाहीत तुम्हाला ?’’ (पृ. ६०)

८) जांभळीतील लोक आनंदाने रहात होते. मात्र धरणामुळे अनेक समस्या निर्माण होतात. पांडू म्हाताऱ्याला सोळा एकराने पैसे मिळण्याऐवजी तीन एकराचे मिळतात. पांडू दहा वर्षाचा असल्यापासून आज साठ वर्षापर्यंत जमीन कसतो. त्याच्या आजोबाने, बाबाने ती कसलेली होती. पण ही जमीन जंगल खात्याकडून नव्याण्णव वर्षाच्या कराराने मिळालेली होती. त्यावर सरकारचच नाव होत. पण पांडबाला हे काही कळत

नाही. तो रडत बोलतो, माज्या तीन डूया खपल्या त्या रानात. आता चार पोर आनी वीस खानारी तोंड हायत घरात. एवढं लेंढार घीऊन मी कुठं जाऊ ?

अशाच कराराच्या जमिनी गावात पंधरावीस जणांकडे होत्या. तेच त्यांच्या चरितार्थाच मुख्य साधन होत. पण कायद्यापुढे कोणाच काही चालत नाही. (पृ. ६१)

९) धरणग्रस्तांच आयुष्य झगडण्यातच चालल होत. तरीही त्यांच्या साध्या मागण्याही पूर्ण होत नव्हत्या. केळापूरमधील धरणग्रस्तांवर पुन्हा बेघर होण्याची वेळ येते. एका जन्मात किती वेळा पुनर्वसनाला त्यांनी तोंड द्यायच होत? राघू भिवा हैबतीच्या खुनात आरोपी ठरतो, पण फरारी असतो. त्याला पकडण्याच धाडस कोण करणार? असे सर्व प्रश्न घेऊन धरणग्रस्त जांभळी पर्यटन केंद्राच्या उद्घाटनाच्यावेळी मंत्र्यांसमोर आंदोलनासाठी येतात. तीन दिवस चालून ते येतात. निम्म्या अर्ध्या कपड्यातले पिचले-खचले. धरणग्रस्त पुढे सरकारयचे. त्यांची खंगती हाड, अंगावरचे फाटके-मळके कपडे, कैकजणांना गरिबीने तरुणपणीच म्हातारपण येत. धरण झाली, पाणी फुटल, त्याबरोबर धरणग्रस्ताच नशिबही फुटली होती.

धरणग्रस्त आपला बुडालेला गाव पाण्यात शोधत होती. या धरणाने एकोप्याची गावे तोडली. माणस फोडली. साऱ्यांच्या चिंध्या-चिंध्या केल्या. त्यांच्या हक्काच गाव पाण्यात घालून गावठाण गळ्यात येत. तिथले डास, दलदल, ओढा, पाल्याची रडकी-बोडकी गावठाण, पंधरा वर्षांच्या या जीवघेण्या प्रवासात बहुतेक बाया-बापड्यांची जवानी जळली होती. हाड ढिली झाली होती.

मंत्र्यांनी धरणग्रस्तांच्या दोन मागण्या मान्य केल्या. इतरांचं आश्वासन दिल. पण धरणग्रस्तांना अजून खूप लढायचं होतं. झगडायचं होतं. प्रश्नांचे डोंगर शिल्लक होते. (पृ. ५१३, ५१४, ५१५, ५१९)

'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीचा मुख्य विषय हा धरणग्रस्त हा आहे. यात त्यांच्या समस्या, त्यांच जीवन मांडलेल आह. खैरमोडे गुरुजींनी कोयनेतील धरणग्रस्तांचे हाल पाहिलेले असतात. म्हणून त्यांचा धरणाला विरोध होता. राजकारणी स्वतःच्या फायदयासाठी धरण बांधतात. धरणग्रस्तांना

खोटी अश्वासन देतात. ती मात्र पूर्ण करत नाही. जांभळीतील लोकांना आपली जमीन, शेत, गाव, घर, झाड, प्राणी सोडून जावस वाटत नाही.

नुकसानभरपाईचे पैस धरणग्रस्तांना घरपट्‌टी, पाणीपट्‌टी, तगाई, अल्पबचत, असे काटून नाममात्र मिळतात. कराराच्या जमीनदारांना सोळा ऐवजी तीन एकराचेच पैसे मिळतात. पैसे मिळाल्यावर काही धरणग्रस्त ते खर्च करून टाकतात. धरणग्रस्त मुलाला मुलीही मिळत नाहीत. कुशापाची पिकाऊ जमीन धरणात जाते. पडीत जमीन शिल्लक राहते. त्याची जमीन जास्त अस त्यामुळे त्याच एकटयाचच पुनर्वसन होत नाही. तो दहा वर्षे यासाठी झगडतो. पण ते हात नाही. धरणग्रस्तांना, नोकरीत पाच टक्के जागा असतात. मात्र हा कायदा कोणी मानत नाही. खऱ्या धरणग्रस्तांना याचा लाभ होत नाही. धरणग्रस्तांना आपल्या चांगल्या जमिनी दयायला कोणी तयार नव्हते. ज्या दिल्या त्याही वापस घेतात आणि माळाच्या, बिनपिकाऊ जमिनी धरणग्रस्तांना मिळतात. त्या जमिनी ते कष्टाने सुपीक बनवतात तर पुन्हा त्यांच्याकडून हयाही जमिनी काढून घेतल्या जातात. जनावरांना जागा, चारा नाही म्हणून धरणग्रस्त मातीमोल भावाने विकतात. एकाच गावात संपूर्ण जांभळीच पुनर्वसन न होता गाव फुटते. पैसे कमी असल्यामुळे नवीन गावात जमिनी घेतांना धरणग्रस्तांच्या नाकी नऊ येतात. धरणग्रस्तांचा भोग जगावेगळा होता. त्यांना राहण्यासाठी घाणेरडी, दलदलीची जागा दिली जाते. स्वतंत्र पाणी योजना नाही, स्मशान नाही, पडकी शाळा. वाडीकर धरणग्रस्तांच्याही अशाच समस्या होत्या. धनदांडगे आपल्या जमिनी धाकदडपशाहीने परत मिळवत होते. हैबतीसारख्या धरणग्रस्ताला मुद्‌दाम परमनंट केल्या जात नाही. धरणग्रस्तांची सरकारी कामेही हेलपाटे मारूनही वर्षानुवर्षे होत नाहीत. धरणामुळे माणसाच्या जातीच वाळवण होत.

खरतर मनात आणल तर चार दोन गावांच पुनर्वसन करण खरच अवघड नसत. पण कोणी मनातच आणत नाही. धरण गाळाने भरतात तरीही लोकांच पुनर्वसन होत नाही. हे वास्तव आहे. धरणग्रस्तांना प्रत्येक ठिकाणी संघर्ष करावा लागतो.

वाडीकर धरणग्रस्तांच्या समस्याही डोंगरा एवढया असतात. धरणामुळे रस्ते बांधत नाही. कायमस्वरूपी लाँच देत नाही आणि पुनर्वसनही करत नाहीत. हैबतीचा लढा सुरूच असतो. त्याच आयुष्य

असच निघून जात. तो काळूबाईला मरता मरता म्हणतो, किडा, मुंगी, बेडूक कोणत्याही प्राण्यांचा जन्म दे, पण धरणग्रस्ताच्या पोटी जन्म देऊ नको. हैबतीचा खून होतो. मारेकरी श्रीमंत असल्यामुळे पकडले जात नाहीत. उलट हैबतीचा रिपोर्ट बदलला जातो. तो दारूच्या नशेत होता असा तो करतात. हैबतीने आयुष्यात कधी दारूला कधी हातही लावलेला नसतो.

धरणग्रस्त मोर्चा घेऊन जांभळी धरणाच्या उद्घाटनाच्या वेळी येतात. मंत्र्यांना हा गोंधळ नको म्हणून मंत्री त्यांच्या दोन मागण्या मान्य करतात. बाकीच्यांच आश्वासन देतात. मात्र धरणग्रस्तांना अजून खूप लढायच होत. झगडायच होत. प्रश्नांचे डोंगर शिल्लक होते. पंधरा वर्षाच्या काळात धरणग्रस्त झगडत होते. त्यांच नांदत, सुखी समाधानी गाव जीवन जाऊन भिकाऱ्यासारख जगण त्यांच्या नशिबी आल होत. कष्ट उपासमार, गरिबी प्रत्येक गोष्टीसाठी खेटे घेणे, धनदांडग्यांची दडपशाही, राजकारण, असंख्य समस्या त्यांच्या जीवनात येतात. हसत खेळत जांभळी गाव लयाला जात आणि उदासवाण, भयाण, रया गेलेल गावठाण उदयाला येत. समस्येला तोंड देता देता बनूबाईच आयुष्य चिंधी होत. गोविंदा, पांडू, गुरुजींसारखी देवगुणाची माणस जातात. नकुसा □फुलाची कपाळ पांढरी झाली. शेवंताला कुंकू मानवल नाही. त्यांच्या हक्काच गाव त्यांना सोडाव लागल. जिथे मानाने राहत होते तिथेच धुणी भांडी, गुराखी अस काम कराव लागणार होत. धरणाची धग सोसता सोसता धरणग्रस्तांचा श्वास कोंडत होता.

### ६.१५ **‘झाडाझडती’तील व्यवसाय** :

‘झाडाझडती’त शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. मात्र घर चालविण्यासाठी पैसे कमावण्यासाठी, आणखी पैसे कमवण्यासाठी लोक व्यवसाय करतात. ‘झाडाझडती’ तील समाजजीवनात काही व्यवसाय पहायला मिळतात. व्यवसायीकांची स्वार्थी,पैसे कमवण्याची वृत्ती पहायला मिळते. व्यावसायीकांकडून शेतकऱ्यांची पिळवणूकही पहायला मिळते.

१) जांभळी गावात बलुतेदारी पध्दत होती. बलुतेदारांचे वेगवेगळे व्यवसाय होते.

गोग्या कोळयाचा □ पखालीने पाणी भरायचा व्यवसाय

शिवा चांभाराचा  चपला शिवण्याचा व्यवसाय

बंडू न्हावी  दाढी डोई करण्याचा व्यवसाय

शिंपी  कपडे शिवण्याचा व्यवसाय

कुंभार  माठ, मडके, गाडगे करण्याचा व्यवसाय

इ. बलुतेदार आपल काम करायचे व त्या बदल्यात त्यांना धान्य, भाकरी असा मोबदला मिळत होता. गोम्या कोळी घरोघर पाणी भरायचा. त्या बदल्यात त्याला भाकरी मिळायच्या (पृ. ३)

ग्रामीण भागात शेती हाच मुख्य व्यवसाय असतो. 'झाडाझडती'त शेती हा व्यवसाय आहेच. पण याशिवाय फळ, भाजी विकण्याचा व्यवसाय, वाडीकर लोक झाडपाला औषधी, मध, दूध, मोहाची दारू, चंदन असे व्यवसाय करतात. जांभळीतील बलुतेदार पखालीने पाणी भरणे, कुंभार, चांभार, न्हावी, येसकर, शिंपी इ. आपआपले व्यवसाय करत होते आणि त्यांना योग्य मोबदलाही मिळत होता. मात्र नव्या गावठाणामुळे त्यांच्या व्यवसायाची घडी विस्कटते आणि त्यांचे जगणे अवघड होते. जे काम आजपर्यंत केल नाही ते करावे लागते.

लाला जाधव हा कोळशाच्या वखारीचा व्यवसाय करतो. नंतर रस्त्याचे पुलाचे कंत्राट घेतो. भरपूर पैसे कमावतो. रामय्या कंत्राटदार जांभळी धरणाच कंत्राट घेतो. दोन महीने स्वतःच्या स्वार्थासाठी काम बंद ठेवून सरकारकडून पैसे काढतो. व्यापारी हे गरीबांना लुबाडणारे आहेत. त्यांच्याकडून कमी पैशात माल कष्ट करून घ्यायचे आणि जास्तीत जास्त पैसे कमवायचे हाच त्यांचा खरा व्यवसाय असतो. हेडे आणि कसाई मातीमोल भावाने जनावरे विकत घेतात. वाडीकर पैशासाठी अवैध गोष्टीही, चंदन दारू, कोळसा इ. विकतात. वाडीकर स्वतः करवंद बाजारात नेऊन विकतात. त्यांचा चांगला फायदा होतो. व्यापारी मात्र वाडीकरांची अडवणूक करतात आणि स्वतःकडेच करवंद विकायला (कमी पैशात) भाग पाडतात. कुशापा मुलीच्या लग्नाला पैसे हवे म्हणून आवडत नसतांना दारूचा व्यवसाय करतो. जांभळी धरण पर्यटन केंद्र म्हणून जाहिर झाल्यावर व्यावसायीकांची गर्दी तिथे होते. मातीमोल भावाने शेतकऱ्यांच्या

जमिनी घेऊन हॉटेल्स, बंगले बांधतात. गरीब शेतकरी आहे तिथेच राहतो. मात्र त्याच्या जीवावर व्यापारी गलेलठ्ठ होतात.

## ६.१६ 'झाडाझडती' कांदबरीतील समाजजीवन : समारोप

विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीमध्ये समाज जीवन मोठ्या प्रमाणावर आलेले आहे. समाज जीवनाच्या बारकाव्यासंह या कादंबरीत वाचायला मिळते. समाजातील गोष्टींची वास्तवपूर्णतेने मांडणी 'झाडाझडती'त केलेली आहे. 'झाडाझडती'तील समाज काल्पनिक न वाटता वास्तवपूर्ण वाटते. यातच त्या कादंबरीचे यश आहे.

या कादंबरीतील समाजात आर्थिक परिस्थितीनुसार गट पहायला मिळतात. श्रीमंत, मध्यमवर्ग, गरीब असे गट आहेत. धरण होण्यापूर्वी गावातील सर्वांची आर्थिक स्थिती बरी होती. मात्र धरणग्रस्त झाल्यापासून ती परिस्थिती खालावते. स्वतःच्या गावात राजा असणारे भिकारी होतात आणि भिकारी असणारे स्वार्थी, दलाल राजकारणी हे श्रीमंत होतात. पैशाअभावी अनेक कामे खोळंबतात. तर तिच कामे पैशामुळे चुटकीसरशी होतात. श्रीमंत गरीबांवर अत्याचार, अन्याय करतो. अधिकार गाजवतो. 'झाडाझडती'मध्ये समाजात आर्थिक दरी मोठ्या प्रमाणात पहायला मिळते.

'झाडाझडती'तील शैक्षणिक स्थिती बेताचीच होती. बोटावर मोजण्याइतकी मंडळी शिकलेली होती. नव्या पिढीत मात्र शिक्षणाचे महत्त्व कळायला लागले होते. श्रीमंतांची मुल शहरात जाऊन शिकत होते. ग्रामीण भागात शाळा नाहीत. काही ठिकाणी आहेत तर शिक्षक नाहीत. शिक्षक आहेत तर तेही कामचुकार. त्यामुळे मुलांनाही शिक्षणाची गोडी नाही. खैरमोडे गुरुजींना मात्र शिक्षणाचं महत्त्वं पटलेलं होतं. ते समाजात शिक्षणाविषयी जागृती निर्माण करतात. 'झाडाझडती'तील गरीब वर्गाला शिक्षणापेक्षा पोटाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. अशिक्षितांवर अन्याय केला जातो. सुशिक्षित वर्ग आपल्या शिक्षणाचा गैरवापर करतात. एकूणच समाज हा अशिक्षितपणाकडेच जास्त झुकलेला आहे.

‘झाडाझडती’तील समाज हा श्रध्दाळू, धार्मिक आहे. काळूबाईवर सर्वांची अतोनात श्रध्दा आहे. खंडोबा, तामजाई, महादेव, वेताळ, मारुती इ. देवतांना समाज पुजतो. समाजात श्रध्देप्रमाणे अंधश्रध्दाही आहे. कंठाबाई या अंगात येणाऱ्या बाईकडे अनेकजण जातात. अंगारे-धुपारे करतात. कोणतेही काम करण्याआधी देवाचे स्मरण केले जाते. धार्मिक परंपरा ‘झाडाझडती’तील समाज आवर्जून पाळतो. देवावर समाजाचा विश्वास होता. देव आपल्याला कोणत्याही संकटातून वाचवेल अशी समाजाची श्रध्दा होती.

‘झाडाझडती’तील समाज हा बहुतांश ग्रामीण आहे. त्यामुळे ग्रामीण पोषाखच तेथील समाजात पहायला मिळतो. श्रीमंत, कारखानदार, कंत्राटदार, सरकारी कर्मचारी, राजकारणी, सरपंच इ. लोकांचे पोषाख हे चांगले, कडक, पांढरे, स्वच्छ व श्रीमंती थाटाचे होते. तर गरीबांचा पोषाख साधा, कळकट होता. पोषाखाप्रमाणेच दाग-दागिन्यांचंही तसंच होतं. श्रीमंतांकडे दागिने, तर गरीबांकडे दागिने नाहीत. जे काही थोडे होते ते गहाण होते. पुरूष पैरण, धोतर घालत. डोक्यावर मुंडास, पटका बांधत. खैरमोडे गुरुजी खादीचे कपडे वापरत होते. स्त्रिया लुगड परिधान करत. दागिन्यांचा वापर फारसा नव्हता स्त्रिया कार्यप्रसंगी नथ, कुड्या, जोडवे घालत. तर श्रीमंत पुरुष सोन्याची चेन, चांदीच कड घालत होते.

‘झाडाझडती’मध्ये एकत्र कुटुंब पध्दती पहायला मिळते. या कादंबरीत बरेच कुटुंब आहेत. कुटुंबातील विविध नातेसंबंध यात आहेत. आई-मुलगा/ मुलगी, बाप-लेक, भाऊ-भाऊ, नवरा-बायको आणि मानलेली नाती अशा विविध नात्यांचे पदर या कादंबरीत पहायला मिळतात.

‘झाडाझडती’तील समाजात रूढी-परंपरा प्रथा आहेत. त्या तेथील समाज काटेकोरपणे पाळते. बालविवाह, हुंडा, दत्तक, दृष्ट काढणे, जागेची पूजा करणे, मुहूर्त बघणे इ. बऱ्याच प्रथांचे पालन समाज करतांना दिसतो.

‘झाडाझडती’तील समाज जीवनामध्ये जगण्याचा-पोटाचा प्रश्न हा महत्त्वाचा असल्यामुळे सण-समारंभाकडे लक्ष देण्यास ते साजरे करण्यास समाज तयार नव्हता. जे काही आवश्यक सण-

समारंभ करावे लागतात. ते साधेपणाने, कमी खर्चात केले जात होते. लग्न, समारंभ, बारशाचा समारंभ, या समारंभांचे वर्णन केलेले आहे.

'झाडाझडती'तील समाजामध्ये गरिबी होती. त्यामुळे अन्नपदार्थ हे साधेच व जे शेतात पिकते. तेच खाण्याकडे कल होता. समाजात लोक मांसाहाराचाही समावेश करत होते. श्रीमंत लोक मात्र हव ते खात होते.

'झाडाझडती'तील समाजामध्ये व्यसनाधीनता आहे. श्रीमंत, सरकारी कर्मचारी, राजकारणी, कंत्राटदार, इ. ना दारूचे व्यसन आहे. दारूशिवाय या लोकांना जेवण जात नाही. चिलिम, तंबाखू, बिड्या असेही व्यसन समाजात आहेत.

'झाडाझडती'तील समाजातील प्रमुख व्यवसाय हा शेतीच आहे. काही श्रीमंत, राजकारणी लोक इतरही व्यवसाय करतात. व्यावसायिकांची लुबाडणारी वृत्ती पहायला मिळते. जांभळी गावात बलुतेदार होते. मात्र धरणानंतर हे व्यावसायिक बेरोजगार झाले. वाडीकर लोक रानातील मध, करवंद, औषधी, चंदन, दारू, दुध अशा वस्तू विकतात व पैसे मिळवतात. श्रीमंत लोक कोळशाच्या वखारीचा व्यवसाय करतात व अवैध मार्गाने पैसा कमावतात.

'झाडाझडती'तील न्यायव्यवस्था ही वकीलांमुळे त्यांच्या स्वार्थी, लाचखोर स्वभावामुळे दुषित होते. वकील हे अज्ञानी जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतात. त्यांच्याकडून भरपूर पैसे घेतात. त्यांची दिशाभूल करतात आणि हव्या तशा कायद्यात पळवाटा शोधतात.

'झाडाझडती'तील समाजात काही दंतकथाही आहेत. देवबनाची दंतकथा, जांभळी गावाची, बाळू-बापू डोंगराची, चांदण्यांची कथा, चकोर राजाची व मोहना राणीची गोष्ट इ. दंतकथा आहेत.

'झाडाझडती'तील समाजात सरकारी कार्यालयात भ्रष्टाचार पहायला मिळतो. दिवसेंदिवस भ्रष्टाचार फोफावतांना दिसतो. या भ्रष्टाचारामुळे लोक माणुसकी विसरत चालले आहे. सरकारी कामासाठी तर पैसा हा अनिवार्य घटक झालेला आहे. पैसा दिल्याशिवाय कामच होत नाही आणि जो

प्रामाणिकपणे वागतो. त्याच नुकसान होत. मात्र काही देशमुख, पवार यांच्यासारखे प्रामाणिक कर्मचारी आहेत.

'झाडाझडती'तील स्त्री ही ग्रामीण जीवनाच प्रतिनिधित्व करणारी आहे. ती अशिक्षित आहे. मात्र कष्टाळू, प्रेमळ, नवऱ्याच्या कामात बरोबरीने हातभार लावणारी, धीट, श्रध्दाळू आहे. कुटुंबाला सांभाळण्याच महत्त्वाच काम ती चोखपणे बजावते. तिच जीवन कष्टमय आहे. हौसमौज तिच्या आयुष्यात नाही. तरी ती तक्रार न करता समाधानात जगते. परंपरांच पालन ती करते. नातेसंबंध टिकवते.

'झाडाझडती'तील समाजातील राजकारणाचे, राजकीय व्यक्तींचे, त्यांच्या स्वार्थी धोरणाचे, त्यांच्या सत्तेच्या लालसेचे यथार्थ वास्तवपूर्ण वर्णन आहे. गोडबोले शिंगाडे व वेळ आल्यावर रंग बदलतात. स्वत:च्या स्वार्थासाठी योजना राबवतात. मतांसाठी काहीही करायल तयार असतात. सरकारी कर्मचाऱ्यांना स्वत:च्या तालावर नाचवतात. स्वत:ची घराणेशाही पुढे चालवतात.

'झाडाझडती'तील समाजातील मुख्य समस्या ही धरणग्रस्तांचीच होती. त्यांच्या समस्येचे निराकरण शेवटपर्यंत होत नाही. झगडून, समस्यांना वाचा फोडता- फोडता धरणग्रस्तांची एक पिढी तर बरबाद होते. मात्र त्यांच्या समस्या कमी होत नाहीत. पाणी नाही, रस्ते नाही, शाळा नाही, दवाखाने नाही, दळण-वळणाची साधने नाहीत. महागाई, गुरांना चारा नाही, जागा नाही, धरणग्रस्तांमुळे मुलांचे लग्न होत नाही. रोगराई, माळा मुरडाच्या जमिनी मिळतात. त्याही धाक-दडपशाहीने वापस घेतल्या जातात. वाडीकरांच्या समस्या तर फार बिकट होत्या. रस्ते नाही, योजना नाही, वाहन नाही, सुविधा नाही, दवाखाना नाही, शाळा नाही. कोणत्याच सुविधा नाही, आपल्या गावात गुण्या-गोविंदाने राहणारे लोक धरणामुळे भिकाऱ्यासारखे जीवन जगत होते.

'झाडाझडती' कादंबरीत ग्रामीण समाजाचे वर्णन केलेले आहे. त्यामुळे या कादंबरीत मोठ्या प्रमाणात ग्रामीण भाषेचा वापर केलेला आहे. या कादंबरीत जो समाज दाखवलेला आहे त्या समाजाची, त्यांच्या रोजच्या व्यवहाराची भाषा या कादंबरीत आहे. भाषेमुळे कादंबरीची परिणामकारकता व वास्तवता वाढलेली आहे. पात्रांच्या भाषेमुळे त्यांचे दु:ख मनाला भिडते. भाषेतील सर्व वैशिष्ट्यांसह ती

कादंबरीत वावरते. परिणामकारक म्हणी, वाक्‌प्रचार, लोकगीते यांचा वापर केलेला आहे. प्रसंगांच्या चित्रदर्शी वर्णनामुळे तो प्रसंग खरोखर बघितल्यासारखे वाटते. असं भाषेचे सर्व गुण ‘झाडाझडती’च्या भाषेत आहेत.

अशा प्रकारे ‘झाडाझडती’ची सामाजिकता पहायला मिळते. ‘झाडाझडती’ तील समाजा प्रत्यक्षात आहे. असा भास वाचकांचा निर्माण होतो. प्रत्येक घटना, प्रसंग, व्यक्ती वास्तवपुर्ण वाटतात. ‘झाडाझडती’ हे एका समाजाचे खरेखुरे चित्र आहे.

विश्वास पाटील यांची धरणग्रस्तांविषयीची अनुकंपा, सहानुभूती, कळकळ ‘झाडाझडती’ कादंबरीतून व्यक्त झालेली आहे.

## ६.१७ संदर्भ :


१) सदा कुऱ्हाडे, ''मानाचे पान : झाडाझडती'', ललित, मार्च १९९३, पृ. क्र. ३२.

२) शंकर सारडा, ''साहित्य'', साप्ताहिक सकाळ, ४ जुलै, १९९२, प्र. क्र. ५२.

३) प्रभा गणोरकर व इतर, ''वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश,'' भटकळ प्रकाशन, मुंबई, २००१.

४) बापट व इतर, ''मराठी कादंबरी तंत्र आणि विकास'', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती ३, १९७३, पृ. २०१.

५) विश्वास पाटील, 'झाडाझडती', म. सा. प. दिवाळी अंक, १९९२, पृ.क्र.५२.

६) शंकर सारडा, उनि., पृ. क्र. ५२.

७) निर्मला मोने, 'झाडाझडती : विश्वास पाटील', मुलाखत, म.सा.प. अंक २६०, जाने. मार्च १९९२, पृ. क्र. २६.

प्रकरण सातवे

# ‘पानिपत’ कादंबरीतील समाजजीवन

## अनुक्रमणिका


७.१ ऐतिहासिक कादंबरी

७.२ प्रस्तावना (‘पानिपत’ कादंबरीतील समाजजीवन)

७.३ ‘पानिपत’ मधील रुढी–परंपरा–प्रथा

७.४ ‘पानिपत’ मधील धार्मिक स्थिती

७.५ ‘पानिपत’ मधील स्त्रियांची स्थिती

७.६ ‘पानिपत’ मधील सण–समारंभ–उत्सव

७.७ ‘पानिपत’ मधील राज्यकारभार

७.८ ‘पानिपत’ मधील आथिक स्थिती

७.९ ‘पानिपत’ मधील कुटुंब संस्था (नातेसंबंध)

७.१० ‘पानिपत’ मधील श्रद्धा–अंधश्रद्धा

७.११ ‘पानिपत’ मधील पोषाख व दागदागिने

७.१२ ‘पानिपत’ मधील भाषा

७.१३ ‘पानिपत’ मधील व्यवसाय

७.१४ समारोप

७.१५ संदर्भ

## ७.१ **ऐतिहासिक कादंबरीः**

ऐतिहासिक कादंबरी हा कादंबरीचा एक प्रकार आहे. त्यात इतिहास हे महत्त्वाचे अंग असते. ऐतिहासिक कादंबरीत इतिहास आणि साहित्य यांचा संगम झालेला असतो.

ऐतिहासिक कादंबरीची व्याख्याः

१) ''भूतकालीन वास्तवाचा यथार्थ प्रत्यय ऐतिहासिक कादंबरी करून देते. (पृ.६४)

२) ज्या कादंबरीची मूळ भूमिका ऐतिहासिक स्वरूपाची असेल, तिलाच फक्त ऐतिहासिक कादंबरी म्हणता येईल.

कादंबरीला 'ऐतिहासिक' हे विशेषण मुद्दाम लावले जाते तेव्हा त्याचा सरळ अर्थ असा असतो की, सर्वच कादंबऱ्यांतून इतिहास नसतो. काही कादंबऱ्यांतून इतिहासाचा उपयोग केवळ पार्श्वभूमीसाठी करण्यात आलेला असतो. अशा कादंबऱ्यांमधील इतिहासतत्त्व मुद्दाम अथवा अजाणतेपणी गौणत्त्वानेच आलेले असते. प्रमुख तत्त्व म्हणून आलेले नसते. अशा कादंबऱ्यांना 'ऐतिहासिक' हे विशेषण लावता येणार नाही. (पृ.६५)

३) ऐतिहासिक कादंबरी लेखकाच्या कालापेक्षा भिन्न असे भूतकालीन जीवन व वातावरण साकार करण्याचा प्रयत्न करते-असे बुचनने म्हटले आहे.

लेखकाने आपल्या काळाशी-वर्तमान काळाशी संबंध नसलेल्या, प्रत्यक्ष न अनुभवलेल्या भूतकाळाचे ज्ञान करून घेऊन त्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचे चित्रण जिच्यात केलेले असते, तिला ऐतिहासिक कादंबरी म्हणता येते. या कादंबरीचे यश हे त्यातील वैशिष्टयपूर्ण वास्तवाच्या चित्रणावर प्रामुख्याने अवलंबून असते. ते वास्तव वर्तमानकालीन वाचकाच्या अनुभवाचे असणार नाही.

ऐतिहासिक कादंबरीकर निर्मितीसाठी पुराव्याने सिद्ध झालेल्या ऐतिहासिक घटना आणि व्यक्ती यांचा आधार घेत असला तरी तो केवळ त्यांची नोंदणी करीत नसतो, तर त्या आधारे आपल्या कल्पनेच्या सहाय्याने स्वतंत्र कथानकाची निर्मिती करतो. (पृ.६५-६६)

४) डॉ. वऱ्हाडपांडे यांनी ऐतिहासिक कादंबरीचे विवेचन करतांना 'ऐतिहासिक सत्य + कल्पनाशक्ती/प्रतिभा = ऐतिहासिक कादंबरी' हे सूत्र मान्य केले. (पृ.६७)

५) रस्कीनच्या मते, ''ऐतिहासिक कादंबरी ही भूतकालीन घटनांची कथा असते आणि या भूतकालीन घटनांच्या विवेचनासाठी कल्पनाशक्ती वापरलेली असते.''

६) प्रा. हडसनच्या मते, ''ऐतिहासिक कादंबरीकार आपल्या निर्मितीक्षम कल्पनासामर्थ्याने इतिहासातील रूक्ष व नीरस घटनांना जिवंत करीत असतो. (पृ.६७)

या विचारावंतांनी आपल्या व्याख्येत निव्वळ भूतकालीन घटना अथवा व्यक्ती या ऐतिहासिक कादंबरीत महत्त्वाच्या नसून त्या घटनांच्या आधारे निर्माण होणारे कथानक आणि त्यासाठी आवश्यक असणारी कादंबरीकाराची सृजनशील प्रतिभा यांचे महत्त्व सांगितलेले आहे. (पृ.६७)

७) जान्हवी संत यांच्या मते, ''ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहास व कथेच्या मूल्यांना आविष्करण लाभते. तिची उत्पत्ती आत्मविस्ताराच्या आंतरिक प्रेरणेने झालेली असते. म्हणूनच इतिहासाचा जीवनरस शोषून तरारलेली बहरलेली भावसंपन्न कथा म्हणजे ऐतिहासिक कादंबरी. (पृ. ६७)

८) ''लेखकाच्या युगाच्या दूरकालीन युगातील भूतकालीन घटना, व्यक्ती आणि परिस्थितीच्या पुराव्याने सिद्ध झालेल्या ज्ञात निष्कर्षांवर आधारित अशी तत्कालीन वातावरणाची पुनर्निर्मिती कलात्मक कल्पनेच्या द्वारे ज्या कादंबरीत केलेली असते, ती ऐतिहासिक कादंबरी होय''. (१)

अशाप्रकारे विविध विचारवंतांनी ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या केलेली आहे. ऐतिहासिक कादंबरीत केवळ इतिहासच नसतो, तर त्याच्या जोडीला किंवा इतिहासातील घटना, व्यक्ती रंगविण्यासाठी कल्पनेचा आधार घेतलेला असतो. सत्य इतिहासाचा आधार घेऊन कल्पनेच्या सहाय्याने लेखक कादंबरीची निर्मिती करतो. काही लेखक सत्य इतिहासाचा जास्त प्रमाणात आधार घेतात, तर काही लेखक कमी प्रमाणात. ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहासाच्या सत्यतेचे प्रमाण ठरलेले नसते. हे प्रमाण सर्वस्वी लेखकावर अवलंबून असते. इतिहासातील सत्यता किती वापरायची हे लेखक ठरवत असतो. पण केवळ कल्पनेच्या आधारे ऐतिहासिक कादंबरी साकारता येत नाही. इतिहासातील सत्याचा

पाया त्यसा कादंबरीत असावाच लागतो. मात्र केवळ इतिहास लिहिणे म्हणजे ऐतिहासिक कादंबरी नव्हे. कादंबरी लिहितांना लेखक ऐतिहासिक घटनांना कल्पनेच्या सहाय्याने शब्दरूप देत असतो. ऐतिहासिक कादंबरीतील घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रण करतांना ते त्या काळाशी सुसंगत वाटेल याची काळजी लेखक घेत असतो. ऐतिहासिक घटना–प्रसंगांच्या वर्णनाला उठाव देण्यासाठी किंवा काही ऐतिहासिक घटना तपशीलवार मांडण्यासाठी लेखक काल्पनिकतेचा वापर करत असतो.

''ऐतिहासिक कादंबरीकार इतिहासाचे आकलन करून घेतांनाच त्यातील नाट्य अचूकपणे टिपून त्यातील नवीनता दाखविण्याचा प्रयत्न करतो. भूतकालीन घटितांचा आपल्या मनावर झालेला परिणाम तो अधिक महत्त्वाचा मानतो. आपली ही स्वतंत्र अनुभूती तो प्रमाणभूत घटिते आणि काही संभवनीय घटना, प्रसंग यांच्या माध्यमातून ऐतिहासिक कादंबरीतून मांडतो.

त्यामुळेच इतिहासात नसलेल्या व प्रत्यक्ष न घडलेल्या घटना आणि व्यक्ती ऐतिहासिक कादंबरीत असू शकतात. लेखक इतिहासातील वास्तवता वापरत असतो. ऐतिहासिक कादंबरीतून मांडले गेलेले सत्य कित्येकदा ऐतिहासिक सत्यापेक्षा पुष्कळच निराळे व स्वतंत्र असू शकते. ऐतिहासिक स्थळे, व्यक्ती व प्रसंग यांना आबाधित ठेवून त्यांच्या सहाय्याने कादंबरीकाराने त्या स्थळकाळाशी सुसंगत असा कल्पनाविलास केलेला असतो. ऐतिहासिक कादंबरी ऐतिहासिक वास्तवातील मूर्त घटकांची पुनर्रचना करून त्यास स्वतंत्र नवे रूप देण्याचा प्रयत्न करते.'' (२)

ऐतिहासिक कादंबरी ही इतर कादंबरी प्रकारांपेक्षा वेगळी असते. ''महाकाव्याची रचनापद्धती ऐतिहासिक कादंबरीशी मिळती जुळतीच म्हणावी लागेल. ऐतिहासिक कादंबरीकार देखील प्रमुख अशी युगप्रवर्तक घटना अथवा व्यक्ती घेऊन त्यास काल्पनिक उपकथानकांची दंतकथा, आख्यायिका यांची जोड देऊन एका विशिष्ट काळातील समाजजीवनाचे जिवंत चित्रण करतो. त्या काळाचे हुबेहूब वास्तव चित्र रेखाटण्याचा त्याचा प्रयत्न असतो. सत्य आणि कल्पित यांचे बेमालूम रसायन तयार करून तो इतिहासाची निर्मिती करतो.'' (३)

ऐतिहासिक कादंबरीमधे त्या काळातील म्हणजे गत काळातील समाजाचे चित्र साकारलेले असते. समाजातील संकेत, रूढी-परंपरा, शिक्षण, भाषा, व्यवसाय, स्त्रियांची स्थिती, पोषाख, इ. बाबींचे वर्णन कादंबरीत येत असते. यावरून त्या काळातील एकूणच सामाजिक, राजकीय आर्थिक, धार्मिक स्थिती कशी होती हे कळते.

## ७.२ प्रस्तावनाः

'पानिपत' ही विश्वास पाटील यांची पानिपतच्या लढाईवरील कादंबरी आहे. या ऐतिहासिक कादंबरीत (दत्ताजीचे वीरमरण) सदाशिवराव भाऊंची पुण्यापासूनची सुरू झालेली युद्ध मोहीम आहे, लांब पल्ल्याचा प्रवास, प्रचंड मोठे सैन्य, शस्त्र, प्राणी आणि इतर लोक या सर्वासमवेत भाऊ पानिपतच युद्ध करतात. त्यांचा पराजय होतो. त्यांचा मृत्यू होतो. यानंतर अब्दालीच्या सैनिकांनी मराठयांची केलेली कत्तल, पळून महाराष्ट्रातून आलेले सैनिक आणि शेवटी हे ऐकून नानासाहेबाचा मृत्यू. साधारणतः अशा प्रकाराचा काळ आणि घटनाप्रसंग 'पानिपत' मधे आहेत. 'पानिपत' मधील काळ-पेशवेकाळ आहे. त्यामुळे त्यात त्या काळातील समाजजीवन आहे.

पेशवेकाळातील समाजातील रूढी-परंपरा, पोषाख, भाषा, समजूती, धार्मिकता, शिक्षण, सणा-समारंभ, व्यवसाय, जातियता, आर्थिकता, राज्यकारभार, स्त्रियांची स्थिती, दाग-दागिने, दंतकथा, इ. समाजजीवनाचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे. साधारणतः या कादंबरीतील काळ इ.स. १६५९ ते १६६१ हा आहे. या काळातील सामजजीवन 'पानिपत' मधे पहायला मिळते.

कादंबरीचा प्रकार कोणताही असला तरी त्यात समाजजीवन असतेच. कादंबरीमधील व्यक्तिचित्रणे, भाषा, वातावरण, स्थळकाळ इत्यादी अनेक गोष्टीतून समाज डोकावत असतो. कोणत्याही कादंबरीत त्या काळचे समाजजीवन प्रतिबिंबित होते. म्हणून ऐतिहासिक, ग्रामीण, दलित, स्त्री-वादी अशा कोणत्याही प्रकारच्या कादंबरीमध्ये समाज दर्शन होते. आणि म्हणून विश्वास पाटील

यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील समाजजीवन कशाप्रकारचे होते याचा अभ्यास या प्रकरणात करायचा आहे.

ऐतिहासिक काळातील समाज जीवन कशा स्वरूपाचे होते, त्या काळातील भाषा, रूढी-परंपरा-प्रथा, आर्थिक-धार्मिक-राजकीय स्त्रियांची स्थिती, याचा अभ्यास करायचा आहे. विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचा मुख्य विषय सामाजिक नसला, तरी विषयच्या अनुषंगाने येणाऱ्या सामाजिकतेचा अभ्यास या प्रकरणात आहे.

### ७.३ 'पानिपत' मधील प्रथा-परंपराः

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत पेशवेकाळातील प्रथा-परंपरा पहायला मिळतात. त्या काळात प्रथा-परंपरांचे पालन काटेकोरपणे केले जात होते. या परंपरांविरुद्ध जाणाऱ्यांना कडक शासन केले जात होते. प्रथा-परंपरांचा पगडा मोठया प्रमाणात समाजावर होता.

प्रथा-परंपरांचे पालन सर्वजण काटेकोरपणे आणि श्रद्धेने करत होते. स्त्रियांचा डोहाळ जेवण, बाळंतपण, माहेरी करण्याची पद्धती होती. आनंदाची बातमी कळल्यावर भिक्षुकांना दक्षिणा देणे, गळयातील दागिना देणे, मिठाई वाटणे, मेजवाणी देणे अशी प्रथा होती. तहामधे, मसलतीमधे, ज्या गोष्टी ठरल्या त्या दोन्ही पक्षांनी पाळण्यासाठी आपआपल्या धर्माप्रमाणे शपथ घेतली जात होती. मराठे बेलभंडारा घेत व देत, तर मुस्लिम सानकरोटी देत व घेत. शब्द पाळण्याचे वचन या माध्यमातून घेतले जात होते. अंत्यविधी करणे ही प्रथा कशाही परिस्थितीत पाळली जात होती. लढाईत मृत्यू पावलेल्या मराठा सरदार, वीर, दत्ताजी इ. च्या अंत्यविधीचे वर्णन आहे. जो काही लाकूड फाटा सापडेल तो गोळा करून सरण रचून, कफन म्हणून जे सापडेल ते टाकून, पान-सुपारी ठेवून, पाणी पाजून, अग्नी दिला जात होता. त्या अग्नित अंगावरील दाग-दागिने लोक टाकत असत.

भोगीच्या दिवशी पुरूषांना उटण्याने अंघोळ घालण्याची प्रथा होती. पेशवेकाळात सतीच्या प्रथेचे मोठेच वर्चस्व होते. स्त्रिया आपल्या पतीनिधनानंतर स्वेच्छेने सती जात असत. दत्ताजी

बायकोला सांगतात ''मी मेल्यावर तू सती जाऊ नको, कारण बाळ पोटात असतांना सती जाण महापाप होईल.'' (पृ.५०) भगिरथीची सती जाण्याची इच्छा असते; पण ती बाळामुळे जात नाही. अहिल्याबाई होळकरांचीही सती जाण्याची इच्छा होती; मात्र सासऱ्याच्या विनंतीमुळे त्या सती जात नाही. हिंदू धर्मात सती जाणे हा पुण्याचे काम मानले जात होते. अनेक स्त्रिया सती गेल्याचे महिपतराव सांगतात. रघूजी भोसले, शाहू महाराज, खंडेराव होळकर, चिमाजीआप्पा, बळवंतराव यांच्या स्त्रिया सती जातात. सती जाणारी स्त्री आपल्या अंगावरील दाग दागिने गोरगरिबांना दान करते. त्या स्त्रिला मळवट भरला जातो. वाद्ये वाजात, ती स्त्री दान देते. आणि सती जाते. लोक त्या चितेतील राख अंगारा म्हणून नेतात.

स्वागत करण्याची प्रथा होती. पाहूण्यांच, नातेवाईकांच, जिंकलेल्या सैन्याच स्वागत वेगवेगळया, श्रीमंती थाटाने करण्याची पद्धत होती. स्वागतासाठी आबादागिऱ्या नाचवत, चवऱ्या ढाळत, मौल्यवान-महागडे नजराणे दिले जात, गळयात पैसे, गुलाबपुष्पांच्या माळा घालत, तोफांना बत्ती दिली जात होत, हारतूरे दिले जात, गुलाब अत्तर शिंपडले जात होते, मिठी मारली जात होती. पुरुषांना एकापेक्षा जास्त विवाह करता येत होते. पत्निचे निधन झाल्यावर किंवा जिवंत असल्यावरही एकापेक्षा जास्त विवाह पुरुषांना करता येत होते. शिवाय कलावंतीण-ठेवण्याचीही पद्धत होती. बालविवाहाची प्रथा होती. पेशवेकाळात बहंतांश विवाह बालविवाहच होत असत. बाल-जरठ विवाहही होत होते. लग्नाच्यावेळी मुलीचे वय आठ-नऊ वर्षे होते. मुहूर्त काढण्याची प्रथा पेशवेकाळात होती. चांगल्या कामासाठी, एखादया कामाच्या सुरवातीसाठी मुहूर्त पाहिल्या जात होता व तो कटाक्षणे पाळलाही जात होता. सदाशिवराव भाऊंच्या पानिपत मोहिमेसाठी खास शिवलिखिताचा मुहूर्त काढण्यात येतो, लग्न कार्याचा मुहूर्त काढण्यात येतो, गावाला जाण्यासाठी, गावावरून परतण्यासाठी, देवदर्शनाला जाण्यासाठी, यात्रेला जाण्यासाठी इ. गोष्टींसाठी मुहूर्त काढला जात होता. पराजित सैन्याला गुलाम करण्याची प्रथा होती. सैन्याच्या पगाराचा दिवस ठरलेला होता. पौर्णिमेच्या दिवशी पगार देण्याची प्रथा होती. पेशव्यांना मुजरा करायला जाण्याचीही प्रथा पाळली जात होती. भाऊंचे सैन्य यमुनेच्या काठावरील गावांमधून जातांना गावकरी त्यांच स्वागत ओवाळून करतात. अब्दालीला यमुनेचा

उतार शोधण्यासाठी गुलाबसिंग मदत करतो. मात्र त्याआधी यमुनेला शांत करण्यासाठी पाण्याचा विडा आणि अशर्फी पाण्यात अर्पण केल्या जातात.

अशा प्रकारे पेशवेकाळातील विविध प्रथा-परंपरा 'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत पहायला मिळतात.

### ७.४ पानिपत मधील धार्मिक स्थितीः

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत समाजातील धार्मिकतेचे वर्णन आहे. या कादंबरीतील काळ पेशवेकाळ आहे. या काळात धार्मिकता मोठया प्रमाणात पाळण्यात येत होती. धार्मिकतेचा मोठा पगडा जणतेवर होता. धार्मिकेचे पालन प्रत्येकजण आवर्जून करत होता. धर्मावर प्रत्येकाची श्रद्धा होती. काही वेळेला धार्मिकतेचा अतिरेक झालेला आढळतो. सहसा धार्मिकतेच्या विरोधी कोणी जात नव्हते. समाजाची आप-आपल्या धर्मावर नितांत श्रद्धा होती. दैनंदिन जीवनात, सण-समारंभात धार्मिकतेला महत्त्वाचे स्थान दिले जात होते. धार्मिक उपचार कटाक्षाने पाळले जात होते आणि स्त्रियाही धार्मिक विधी आनंदाने, श्रद्धेने पुरुष करत होते.

''आपलं बोलणं लाखात एक आहे. याआधीही मी यात्रेकरूंना समजावण्याचा दोनदा प्रयत्न केला. पण कोणी मानत नाही. आमच्या राज्यात धर्माचं एवढं अवडंबर माजलं आहे की, त्या ओझ्याखाली विवेकाचं कंबरडं मोडलं आहे. धर्माच्या अवडंबरापासून मीही मुक्त नाही. आम्ही यात्रेकरूंना जुलुमाने थांबवू तर आम्हालाच धर्मबहिष्कृत करायला निघतील ते. खुद्द पेशव्यांनी यात्रेकरूंना सांभाळून नेण्याचा सल्ला दिला आहे. आम्हाला त्यातूनही आम्ही जुलूमजबरदस्ती केली तर......हर सरदाराच्या नात्यागोत्यातले, कुटुंबातले कोणी ना कोणी यात्रेकरू आहेत. आमचे बहाद्दर क्षणार्धात अग्निकुंडात स्नान करायला राजी होतील. पण तथाकथित धर्माविरोधी कोणाला ब्र काढू देणार नाहीत. कालच आमच्या फौजा आग्र्याला लागल्या. तेव्हा प्रवासात मथुरा जवळ असल्याची चर्चा चालली होती. आमची खात्री आहे, आता या क्षणी सारे आम्हाला इथेच टाकून मथुरेच्या वाटेला

लागले असतील. धर्माच्या नादात कर्माला गचांडी मिळते. हे आपल म्हणणं रास्त आहे आमच्या मुलखात टाचेत काटा रुतला, आत घुसला, बसला की त्याला कुरूप झालं म्हणतात. तो काटा असा जिव्हारी बसतो की काढताही येत नाही आणि चालताही येत नाही. हा देवाधर्माचा, तीर्थादिकांचा काटा सांभाळीत आम्हाला पावलं उचलावी लागतील. '' (पृ.१७४)

अशाप्रकारे समाजामधे धर्मांच्या बाबतीत अतिशय दृढता होती, प्रेम होत. त्यामुळे धर्मासाठी, धार्मिक गोष्टींसाठी लोक काहीही करायला तयार होते.

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत पेशवेकाळातील साधारणतः १७६० ते १७६१ या एका वर्षाचे वर्णन आहे. या कादंबरीत या काळातील समाजातील धार्मिकता, तिचे स्वरूप, नियम इ. बाबत माहिती मिळते. त्या काळात धार्मिक परंपरा काटेकोरपणे पाळण्यात येत होत्या. जवळपास सर्वच समाज धर्म कडक पाळत होता. समाजात-पाप-पुण्य कल्पना रूढ होत्या. पाप नाहीस होण्यासाठी आणि पुण्य कर्मकांड मिळविण्यासाठी धार्मिक विधी आवर्जून केल्या जात होते. धार्मिक परंपरा पाळण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले जात होते. धर्मासाठी प्राणही देण्याची तयारी लोकांची/समाजाची होती. हिंदूंप्रमाणे मुसलमान धर्मातही कट्टर धार्मिकता पहायला मिळते. मुसलमान धर्मातही धार्मिक विधी कटाक्षाने पाळले जात होते. आपल्या धर्माविषयी त्यांना अभिमान होता. तो टिकावा यासाठी ते प्रयत्न करतांना दिसतात.

हिंदू धर्मातील सर्व जातींमधील स्त्री-पुरुष धार्मिक होते. धार्मिक विधी नियमितपणे पाळले जात होते. प्रत्येकाची आपआपल्या दैवतांवर गाढ श्रद्धा होती. कोणत्याही स्थितीत देव आपल्याला तारेल असा ठाम विश्वासही समाजात पहायला मिळतो.

रघुनाथ दादा, रेणको, जनार्दन, अशी मंडळी यमुनेत सूर्यदेवाला अर्ध्य देतात. मोहिमेवर असतांनाही धार्मिक विधी पाळले जात होते. रघुनाथ दादांसोबत दिल्लीच्या मोहिमेवर स्त्रिया व इतर लोकही तीर्थाटनाला निघतात. रघुनाथ दादा मोहिमेवर जातांना देव्हारा घेऊन जात.त्यात ओंकारेश्वर, पर्वती, कसब्याचा गणपती, जोतिर्लिंग, खंडेराया अशा देवता होत्या. देवपूजा झाल्याशिवाय दादासाहेब

पाणीही पित नसत. नजिबने कत्तल केलेल्या गाईची हाडे, अवशेष मराठी सरदारांच्या हातात पूजेच्या वेळी येतात. तेव्हा सरदार पुन्हा स्नान करतात. अंगावर गोमूत्र शिंपडून स्वतः शुद्ध करतात. नजिबला गाई मारू नको अस दत्ताजी समजवतात. मात्र तो म्हणतो गाईवरची सुरी थांबवणार नाही. हा नजीब धर्मासाठी प्राण देईल; पण मागे हटणार नाही. असा नजीब व त्याचे सैनिकही गाझी होण्यास धर्मासाठी एका पायावर तयार असतात.

दत्ताजी आणि जानकोजी हे बायकांसमवेत भद्रकालीला महाभिषेक करतात. भिष्मकुंडात अंघोळी करतात. कृष्णाच्या पादुकांच दर्शन घेतात, बाणगंगा, तीर्थास जातात. सकाळी पवित्र कुरुक्षेत्र सरोवरात स्नान करतात. पाप क्षालनासाही इतर मराठा वीरही अंघोळी करतात. कुरुक्षेत्रातील प्रत्येक देवळात दर्शनासाठी मराठी सैन्य जात होते. दत्ताजींनी तिथे श्राद्ध केले होते. सूर्यग्रहनाच्यावेळी दत्ताजी भरभरून दानधर्म करतात. पुण्यप्राप्ती होते म्हणून दत्ताजी व इतर सरदारही भरपेट दान करतात. दत्ताजी लग्नानंतर कन्हेरी देवीला जातात आणि पहिला मुलगा होऊ दे असा आशिर्वादही मागतात. दत्ताजी मोहिमेसाठी यश मिळाव म्हणून गडमुक्तेश्वराला सहस्त्र ब्राह्मणभोजन घालतात. दानधर्म तर रोजच करत होते. मुसलमान दुराणी बादशहा धर्मगुरूंचा मुल्लामौलवींचा आदर करतो. अल्लादा दुवे देतो. सकाळी नमाज पढतो.

चंद्रग्रहण, सूर्यग्रहणाच्या वेळी लोक नदीत स्नान करून पापमुक्त होतात. भाऊ साहेब रोज स्नानसंध्या, पूजाअर्चा करत होते. उत्तरेतील तीर्थांच्या दर्शनासाठी भाऊंच्या पानिपत मोहिमेत अनेक लोक सोबत जातात. उत्तरेतील काशी, कुरुक्षेत्र, हरिद्वार, गंडमुक्तेश्वर प्रयाग इ. ठिकाणची यात्रा करणे म्हणजे पुण्य मिळणे असे समिकरण समाजात होत. त्यामुळे भाऊंच्या सोबत मोठया संख्येने यात्रेकरू जातात. बळवंतराव भाऊंना रोखठोक बोलू नका असा सल्ला देतात. कारण भाऊंना यात्रेला नाही, तर मोहिमेला जायचे असते. त्यांना सोबत यात्रेकरू नको असतात. पण मराठी माणसावर धर्माचा, देवादिकांचा खूप मोठा पगडा असतो. त्यामुळे भाऊंना यात्रेकरुना विरोध करता येत नाही. नानासाहेब पेशव्यांचा तर देवावर, धर्मावर अफाट श्रद्धा, विश्वास असतो. भाऊंची पानिपत मोहीम यशस्वी

होण्यासाठी नानासाहेब अनेक नवस बोलतात. देवाब्राह्मणांना साकडे घालतात. गावो-गावींच्या देवस्थानांना सढळ हाताने दान करतात. अन्नछात्र, सहस्त्र भोजणे, नंदादीप, नगारखाना, वर्षासने, जीर्णोद्धार झाडे लागवड इ.चे हुकूम सोडतात. भाऊंना विजयदेवता प्रसन्न होण्यासाठी प्रांताप्रांतीच्या देव-दैवतांवर सेवाभावाचा वर्षाव करतात. दासोपंत अग्निहोत्री म्हणतात, ''आता या पुण्यामुळेच अब्दुल्या वाहून जाईल. आणि वाचलाच तर भष्म होईल.'' अशी गाढ श्रद्धा देवांवर होती.

यात्रेकरूंना भाऊ मोहिमेत पुढे नेणार नाही ही अफवा जेव्हा यात्रेकरूंना कळते तेव्हा ते रागावतात आणि रागाच्या भरात भाऊंना शापही देतात. यात्रा न धडली तर भाऊंना देव पाप देतील. यात्रेत खंड पडला तर सत्यानाश होईल. अशा प्रकारची तीव्र भावना यात्रेकरूंची होती.

पानिपत मोहिमेचा पेच वाढत असतो; पण यात्रेकरूंना, स्त्रियांना या गोष्टींचे सोयर-सुतक नसते. मुचकुंद तीर्थावर अट्टाहासाने स्त्रिया व यात्रेकरू जातातच. तिथे जाऊन पापक्षालनाचे पुण्य मिळवतात. पायगुडे सरदार दागिने मोडून तीर्थरूपांचे श्राद्ध घालतात. यातच सूर्यग्रहण येत. यात्रेकरु सूर्यग्रहणाची पर्वणी साधल्याशिवाय-पुण्यसंचय केल्याशिवाय निघायचे नाही अस ठाम सांगतात. भाऊंचा नाईलाज होतो. धर्मापुढे भाऊंना कर्माला फाटा दयावा लागतो.

भाऊ सूरजमलला आपल्या समाजातील धर्माविषयी सांगतात की समाजात धर्माच एवढ अवडंबर माजल आहे की, त्या ओझ्याखाली विवेकाच कंबरड मोडल आहे. धर्मासाठी लोक अग्निकुंडातही उडी घेतील. धर्माच्या नादात कर्माला गंचांडी मिळते. हा देवाधर्माचा, तीर्थादिकांचा काटा-कुरूप सांभाळतच आम्हाला पावल उचलावी लागतील. पानिपत मोहिमेवर असतांना जी-जी कोणती धार्मिक स्थळे लागत होती. त्या-त्या स्थळांना यात्रेकरू आवर्जून, कोणालाही न जुमानता भेटी देत होते. मंगलधामांचे दर्शन घेऊन अधिकाधिक पुण्य मिळवावे असा विचार यात्रेकरू करत होते. मथुरेतील शास्त्री यज्ञाचा घाट घालतात. मोठा यज्ञ केल्या जातो. त्यात वेळ आणि पैसा दोन्हीही मोठया प्रमाणावर खर्च होतो. त्यातच अधिक, श्रावण महिना येतो लोकांच्या धार्मिकतेला तर उधान येत.

ग्रंथपठण, श्रवण, मंत्रवचन, यज्ञ अशी कर्मकांडे केली जात होती. मथुरेत लष्कर भान हरपून देव-देव करत फिरत होते.

मुसलमान धर्मातही धार्मिक गोष्टी कटाक्षाने पाळतात. मोहरम शिया पंथीय मुसलमान भव्य-दिव्य पद्धतीने साजरा करतात. अब्दाली यमुनापार होण्याआध्याी तो नमाज पढतो. आणि मगच यमुनेत घोडी घालतो.

मराठी स्त्रियांची वृत्ती धार्मिक होती. देवधर्म त्या न चुकता करत होत्या. दसऱ्याला कुंजपुऱ्यातील कालिका देवीला जाऊन साडीचोळी, मळवट भरतात. स्त्रिया ह्या फक्त आणि फक्त देवाधर्मासाठीच मोहिमेवर येतात. रखमाबाईंना काहीही झाले तरी कुरुक्षेत्रावर जायचेच होते. त्यांच्या मतानुसार-देवाच्या पायरीजवळ येऊन दर्शन न घेणे म्हणजे पाप असेच मत इतर भट-भिक्षुक, शास्त्री यांचेही होते. कुरुक्षेत्राचे दर्शन घेतले तर ग्रह पालटतील आणि विजय होईल असा विश्वास यात्रेकरूंचा होता. मात्र भाऊसाहेब कुरुक्षेत्राला जाण्यास नकार देतात. त्यावर सर्वजण रागावतात. पेशव्यांच्या बंधूने धर्म पाळायचा नाही तर धर्माचा वाली कोण? असे स्पष्टपणे विचारतात. चंद्रग्रहणाच्यावेळी पार्वतीबाई यशसिद्धी होण्यासाठी श्रीमनसादेवी पुढे ब्राह्मणांना अनुष्ठानाला बसवतात. चंद्र ग्रहणाच्या दिवशी यात्रेकरू, बुणगे देवळात दर्शन घेत होते. कुरुक्षेत्राची यात्रा घडावी म्हणून यात्रेकरू ब्राह्मणांना अनुष्ठानास बसवतात. देवी तलावात मंगलस्नानासाठी रांग लागते. युद्धाला सुरवात करतांना जो तो आपल्या देवतेला स्मरण करतो.

अशाप्रकारे 'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत समाजात धर्माचा, धार्मिक विधीचा-कर्म-कांडांना महत्त्वाचे स्थान होते. धार्मिक कर्मकांड नित्यनियमाने लोक करत होते. त्यात खंड पडू देत नव्हते. धर्माविरोधी बोलण्याचे, जाण्याचे धाडस कोणी करत नव्हते. समाजावर धर्माचा पगडा मोठया प्रमाणावर आणि खोलवर पडलेला होता.

## ७.५ पानिपत मधील स्त्रियांची स्थितीः

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत पेशवेकाळातील समाज आहे. त्या काळातील स्त्रियांची स्थिती,स्त्रियांचे अधिकार, समाजात-घरात स्त्रियांचे स्थान, स्त्रियांची शैक्षणिक स्थिती, स्त्रियांची पोषाख-दागदागिने इत्यादींची माहिती मिळते. (आर्थिक स्थिती, स्वातंत्र्य)

'पानिपत' या कादंबरीत पार्वतीबाई, गोपिकाबाई, भगिरथी, दादासाहेबंच कुटुंब, मलिकाजमानी, रखमाबाई अक्कासाहेब, बळवंत, लक्ष्मीबाई साहेब, गौतमीबाई, अहिल्याबाई, सदरून्नीस बेगम, हंसिया इ. स्त्रियांचे वर्णन प्रसंगा प्रमाणे आलेले आहे. 'पानिपत' मधील स्त्रिजीवण साधारणतः उच्चभू समाजातील आहे. पेशव्यांच्या, सरदारांच्या इ. च्या स्त्रियांचे वर्णन आहे. त्यामुळे ह्या स्त्रिया श्रीमंत वर्गातील, अधिकारी वर्गातील आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ उच्चभू स्त्रियांच्या स्थितीची माहिती आहे. एकूणच समाजातील स्त्रिजीवनाविषयी माहिती मिळत नाही.

'पानिपत' मधील स्त्री पतीला परमेश्वर मानणारी, पतीची सेवा करणारी, धार्मिक श्रद्धा असणारी, प्रथा-परंपरेचे पालन करणारी, अलंकार परिधान करणारी, मर्यादेत राहणारी, अशिक्षित, फारसे कष्ट न करणारी, अधिकाराचा-ऐश्वर्याचा उपभोग घेणारी, मोहिमांसोबत जाणारी, सती-प्रथा पाळणारी, नवऱ्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभी राहणारी. स्वार्थी-राजकारणी, नवऱ्यावर अविश्वास असणारी. अशा वेगवेगळया स्वभावाच्या/वृत्तीच्या स्त्रिया 'पानिपत' मध्ये आहेत.

पार्वतीबाईंना भाऊंची काळजी होती. भाऊंना झोप नसली की, त्यांनाही झोप लागत नव्हती. कित्तेक दिवसात दोघांना निवांतपणा नव्हता. एकमेकांनी सोबत उजाडणारा आणि डुबणारा दिवस कित्तेक महिन्यांत दोघांनी बघितला नव्हता. झुंजमुंजू होताच भाऊ कचेरीत जातात. पार्वतीबाई तक्रार करतात की दिवसभर राजकारण, डाव, रात्री भोजनासही लवकर येत नाहीत. यावर भाऊ समजावतात गिलच्यांचे पारिपत्य झाल्यावर निवांतपणे दोघे गोष्टी करू पार्वतीबाई आनंदित होतात. भाऊंना उपसमारीचा पेच सतावतो. ते म्हणतात, ''तूर्तास पडलेल्या पेचाचे निवारण कधी व्हायचे, हे श्रीगजाननास ठावे. (पृ.२०९) यावर पार्वतीबाई अनभिज्ञपणे म्हणतात, ''पेच? आता कसला पेच? स्वारींनी दिल्ली जिंकली आणि स्वारींच्या पराक्रमाची कीर्ती त्रिखंडात पसरली''. (पृ.२१०) यावर भाऊ

पार्वतीबाईंनी सगळ समजावून सांगतात. उपासमार, पर्तन्यकाळ, यमुनेचा पूर, पैशांचा अभाव उत्तरेतील राजांची स्थिती इ. अशा चालू घडामोडींविषयी भाऊ बोलतात. त्यातले जेवढे कळले तेवढे पार्वतीबाई ऐकतात. बऱ्याच गोष्टी त्यांना कळत नाही. मात्र आपला पती एका मोठया जोखीमेत अडकला आहे. याची जाणीव त्यांना होते. (पृ.२०९, २१०) यावरून पार्वतीबाईंच्या भोळया स्वभावाची कल्पना येते. चालू घडामोडींची, राजकीय स्थिती, राजकारण इ. ची काहीही माहिती त्यांना नसते. भाऊ जे सांगतात त्यातल बरचस त्यांना काही कळत नाही.

गोपिकाबाई श्रीमंतांच्या उश्याशी बसून होत्या. पतीचे आजारपण आणि मुलाचा मृत्यू यामुळे त्या रोड झाल्या होत्या. त्या श्रीमंतांचे पायाचे तळवे चोळत होत्या. त्यांना पतीची काळजी वाटत होती. (पृ.४८९) त्या काळजीने श्रीमंतांना म्हणत होत्या, ''शोक आवरावा. दौलतीच्या धन्याने अतिशोक करू नये. जिवाला जपावे. आपण सलामत तर दौलत सलामत!'' (पृ.४९०) पानिपतच्या युद्धानंतर नानासाहेब हवालदिल होतात. भ्रमिष्टासारखे वागतात. याच अवस्थेत ते गोपिकाबाईंना कमचीने मारतात. रागाने ते गोपिकाबाईंमुळेच पानिपत झाले असे म्हणतात. त्यांना आवरण्याच धाडस कोणत नव्हत. तितक्यात पार्वतीबाई तिथे येतात. आणि पेशव्यांचा राग शांत होतो. पार्वतीबाई म्हणतात, जोपर्यंत इकडची स्वारी येत नाही तोवर मी पुण्याला कसे येऊ? इकडची स्वारी जगाच्या पाठीवर कुठेही सुखरूप असावी. भाऊ जीवंत आहेत अशी खोटी आशा त्यांना होती. (पृ.५१२-५१३) युद्धात कैकांचा पत्ताच लागलेला नव्हता. पार्वतीबाईंप्रमाणे कित्येक स्त्रिया मळवट भरून घरधन्याची वाट बघत होत्या. श्रीमंतांच्या शेजारी गोपिकाबाई रात्रंदिवस बसून होत्या. त्यांचेही मन आक्रंदत होते. मुलगा गेल्याचे दुःख, नवरा आजारी असल्याचे दुःख आणि भाऊंचा दुःस्वास केल्याचे दुःख त्यांना होत होते. त्यांच्या मनाला बोचणी लागली होती. (पृ.५१४)

अशाप्रकारे 'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीतील स्त्रिजीवन आहे. त्या काळातील स्त्रिया धार्मिक वृत्तीच्या होत्या. तिर्थक्षेत्रास जाणे व देवदर्शन घेणे यामुळे पुण्य प्राप्त होते असा त्यांचा समज होता. उत्तरेकडील स्त्रियांची स्थिती असुरक्षित होती. नजीब स्त्रियांवर अन्याय करत होता. त्याचे सैनिक

ही स्त्रियांवर अत्याचार करत होते. नजीबच्या अत्याचाराविरोधात जानकोजी उभे राहतात त्यांना दत्ताजीची बायको भागिरथी साथ देते. भागिरथी पंधरा–सोळा वर्षांची असूनही  तिला समज चांगली होती. ती नवऱ्याची काळजी घेत. त्याला समजावते. त्याला धीर देते. दत्ताजीच्या मृत्यूनंतर भागिरथी कोसळते. तिला अतिशय दुःख होत. जानकोजीही जखमी असल्यामुळे त्यांची बायको काशीबाई गलबलते. मात्र भागिरथी शोक आवरते व धैर्याने प्रसंगाला तोंड देते. सैन्य वाचवते. अहिल्याबाई, भागिरथी विधवेची पांढरी वस्त्रे परिधान करतात.

मल्हारबाच्या पत्नी गौतमीबाई त्यांना समजावतात. आपसातील वादामुळे नजीब सुटू देवू नका. काही राग असेल तर पेशव्यांना सांगा. वाद आज ना उदया मिटतील; पण स्वारींच्या पिकल्या केसाला बट्टा लागू नये अस तिला मनापासून वाटत. अशा गौतमीबाई समंजस होत्या. चांगल्या–वाईटाची जाणीव त्यांना होती.

स्त्रियांच्या लग्नाच वय साधारणतः १२–१३ वर्षे असाव. स्त्रिया पातळ, अंगावर भरपूर दागिने, अंगावर शेल, शाल पांघरत होत्या. गोपिकाबाई ह्या स्वार्थी, संशयी, स्पष्ट बोलणाऱ्या होत्या. त्यांना राजकारणाची, राज्यकारभाराची जाण होती. त्यांचा स्वभाव रागीट होता. त्या पेशव्यांनाही उलट बोलत होत्या. रखमाबाई आक्कासाहेब ह्या प्रौढ स्त्री होत्या त्यांना त्रिस्थळी यात्रा करायची होती. त्यासाठी त्या भाऊंसोबत पानिपतच्या मोहिमेसोबत येतात. अशा अनेक स्त्रिया निघतात. आक्कासाहेबांचा देव–देवतांवर, कर्मकांडावर अती विश्वास होता. मोहिमेवर असतांना भाऊंना पार्वतीबाईंशी बोलण्याचीही सवड मिळत नव्हती. मात्र त्या भाऊंन समजून घेत होत्या. त्यांच्यावर न रागावता त्यांच्या आरामाकडे लक्ष देत होत्या.

मुस्लिम स्त्री नबाबहादूराच्या मातोश्री सदरून्नीस बेगम ह्यांचा दरबारात वचक होता. त्या दरबारात बोलत होत्या, राज्यकारभार बघत होत्या. गरज असल्यास फटकारू शकत होत्या. त्या सामर्थ्यवान होत्या.अब्दालीची बाजू मांडण्यासाठी सुजाकडे महमुदशहाची बेगम मलिकाजमानी येते. ती

गोड बोलून काम साधणारी पाताळयंत्री होती. तिला राजकारणाची चालू घडामोडीची माहिती होती. ती हुशार होती.

जाटांची राणी हंसिया ही प्रेमळ स्वभावाची, मोठया मनाची होती. तिने मराठयांच्या सैन्याची, स्त्रियांची बडदास्त आपुलकीने ठेवली होती. ती चतुर होती. कणवाळू, आदरतिथ्य करणारी, राजकारणाची जाण असणारी होती.

बळवंतरावाच्या पत्नी लक्ष्मीबाई ह्या भाविक वृत्तीच्या होत्या. नवऱ्यावर प्रेम करणाऱ्या होत्या. नवऱ्याला यश मिळाव म्हणून त्या व्रतवैकल्ये, होम, अनुष्ठान करतात. पार्वतीबाई साध्या-भोळया होत्या. त्यांना राजकारणाची फार जाण नव्हती. मात्र काळानुसार त्या बदलतात. लाजाळू, पार्वतीबाई हातात नंगी तलवार घेऊन अंबारीत बसतात. नवऱ्याला धीर देतात. काही प्रसंगी स्पष्ट बोलतात. गोपिकाबाई स्वार्थी असतात. त्या नानासाहेबांना भाऊंना मदत पाठवू नका अस रागाने सांगतात. त्यांना सत्तेचा हव्यास असतो. त्या भरजरी कपडे, गळाभर दागिने घालतात.रूबाबात राहतात. सत्ता गाजविण्याची त्यांना हौस असते.

पार्वतीबाई, रखमाबाई, अक्कासाहेब ह्यांचा स्वभाव अंधश्रद्धाळू होता. पानिपतची माती परधार्जिनी आहे यावर त्या दोघींचा विश्वास बसतो. आक्कासाहेबांना वाटत की, देवदर्शन घेतले नाही म्हणून मराठयांवर संकटे येतात.

बळवंतरावांच्या पत्नी लक्ष्मीबाई पतिनिधनानंतर प्रतिप्रेमामुळे सती जातात. पार्वतीबाई नवऱ्याची काळजी घेतात. त्यांना बळजबरी जेवायला, दुध प्यायला भाग पाडतात. युद्धानंतर त्यांना भाऊंचीच काळजी वाटते. त्यांचे डोळे भाऊंनाच शोधतात. युद्धानंतरही त्या तशाच सुवासिनीचा वेष परिधान करतात. गोपिकाबाईना पेशव्यांची काळजी वाटते. त्यांना आपल्या वागण्याचा पश्चाताप होतो. मुलाच्या मृत्यूच व नवऱ्याच्या आजारपणाच्या दुःखाने त्या रोड होतात.

पेशवेकाळातील स्त्री ही आदबीने, मर्यादेत राहणारी, भरजरी वस्त्र–दागदागिने परिधान करणारी, धार्मिक वृत्तीची होती. पती परमेश्वर मानणारी होती. पती हेच तिच सर्वस्व होत. प्रसंगानुसार ती कणखर बनत होती. काही स्त्रियांना राजकारणाची चांगली जाण होती. काही स्त्रिया राज्यकारभार बघत होत्या.

## ७.६ पानिपत मधील सण–समारंभ–उत्सवः

'पानिपत' मधील समाजजीवनात सण–समारंभ परंपरागत पद्धतीने, उत्साहाने आणि श्रद्धेने साजरे केले जात होते. हिंदूप्रमाणे मुसलमान धर्मातील लोकही त्यांचे सण–समारंभ उत्साहाने साजरे करत होते.

**इस्लाम सण मोहरमः–** ताबूताची तयारी सुजाच्या सैन्यात चालली होती. बांबूच्या काठयांचे एकमेकांत गुंफून मशिदीच्या आकाराचे ताबूत तयार केले होते. बांबूच्या सांगाडयात रंगीत आणि झिरमिरीत कागदांनी चमकदार बेगडींनी रंग भरला होता. उंच झाडाएवढे एक–एक ताबूत तयार झाले होते. सकाळी सुजासह त्याच्या अनेक सरदार–दरकदारांनी गर्द हिरवे घोळदार पोषाख परिधान केले होते. हातात करवंटी धरून स्वतः फकीर होऊन ते अब्दालीच्या साऱ्या लष्करातून फिरत होते. ते मोठमोठयाने ओरडत होते, ''दे अल्लाके नाम पे, दे अल्ला के नाम पेऽ खैरात देऽऽ'' दुराणी बादशहा बाहेर आला त्याने सफरचंद–अंजिरे ही फळे सुजाला दिली. संध्याकाळी चार वाजता ताबूताची मिरवणूक निघते. ताबूत म्हणजे हुसेनची कबरसमाधीच. करबलाची दुःखद आठवण म्हणून शिया पंथीय मुसलमान ताबूत काढत होते. नबाबी ताबूताची नक्षीदार महिरप, चारी बाजूंची द्वारे उठून दिसत होती. बेगमांच्या गळयातील दागिनेही ताबूतावर ठेवण्यात आले होते. तांबूताच्या आत शुभ्र पांढरे कफन अंथरले होते. त्यावर फुले आणि पगडी ठेवली होती. मिरवणुकीत पंजेतन पाक, पाच पंजे धरले होते. पैगंबरांच्या परिवारातील पाच पुरुषांचे ते प्रतीक होते. मिरवणुकीतील उभारलेले तांबडे बावटे हे करबलाच्या युद्धातील हुसेनच्या रक्ताची साक्ष सांगत होते. तर त्याच्या बंधू हसन, ज्याला विषप्रयोगाने मारला त्याच्या काळयानिळया रक्ताची याद हिरवे बावटे देत होते. 'झुल्फिकार' ही अलीची अजिंक्य तलवारही

मिरवणुकीत अग्रभागी तळपत होती. मिरवणूक ताबूत घेऊन यमुना नदीकडे विसर्जनासाठी जाणार होती. ताबूतासमोर मर्सिया गाऊ लागले. हे ऐकून शिया मुसलमान रडत होते. सारे छात्या बडवत होते. शेवटी ताबूताचे नदीत विसर्जन करतात. (पृ.२२९-२३०)

**दसरा सणः-** दसऱ्याचा सण मोठा, नाही आनंदा तोटा! सार मराठी लष्कर खुषीत होते. सगळीकडे आनंदी-आनंद पसरला होता. कुंजपुऱ्याच्या मोहमेत यश मिळाले होते. दसऱ्याच्या मुहूर्तावर स्वारबारगीर आपआपली घोडी धूत होते. स्त्रिया चूलीवर गोडधोड पुरणपोळया करीत होत्या. गुरवाची शिंगे आणि तुताऱ्या वाजत होत्या. सनई-चौघडा झाडत होता. ताशेकर्णे वाजत होते. राणीवशातल्या स्त्रियांनी आणि इतर बायकांनी कालिका देवीला साडीचोळी अर्पण करून मळवट भरला होता. भल्या सकाळी मंगल स्नाने आटोपून सरदार-दरकदार नव्या वस्त्रांनिशी सज्ज होते. दुपारी सोने लुटण्यासाठी मराठी फौजा निघतात. यमुनेकाठी शमीची झाडे होती. सिमोल्लंघनाची मिरवणूक निघते. अंबारीत पेशवे व सरदार होते. जेरेशास्त्री मंत्रपठण करतात. भाऊ पाच बाणाने शमीची पाच पाने उडवतात. हर हर महादेवचा गजर होतो. सारे शमीच्या पानावर तुटून पडतात. सोने लुटून वाजतगाजत मिरवणूक तळाकडे येते. सर्वांनी पगडयांतून अंगरख्यातून सोने खोवले. रात्री मोठा दरबार भरतो. सरदारांनी विश्वासरावला नजराने पेश केले. भाऊंनी सर्वांना मानाप्रमाणे वस्त्रे देऊन त्यांचा आदर सत्कार केला. (पृ.२९५ ते २९८)

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीतील समाजजीवनातील सण-समारंभाचे वर्णन काही ठिकाणी आहे. पेशवेकाळातील ही कादंबरी आहे. त्या काळात सण-समारंभ उत्साहाने, श्रद्धेने, थाटा-माटात, परंपरेप्रमाणे साजरे केले जात होते.

दसऱ्याचे वर्णन दोन वेळेला आलेले आहे. दसऱ्याला घोडे सजवून लष्कर मुलूखगिरीवर सोने लुटायला जात होते. एकमेकांना सोने देत होते. स्त्रिया पुरणपोळया करत होत्या. वादये वाजवली जात होती. स्त्रिया देवीला साडी-चोळी नेसवत. पुरुषमंडळी सकाळीच मंगलस्नान करुन नवीन कपडे परिधान करत होते. सिमोलंघनाची मोठी मिरवणूक निघत होती. पेशवे-सरदार सोन लुटून नगरात येत.

भोगी–संक्रांतीचा सण हा मराठयांचा जणू काही लढाईचाच होता. १७६० च्या संक्रांतीला दत्ताजींना वीरमरण येत आणि १७६१ च्या संक्रांतीला भाऊसाहेबांना विश्वासरावला आणि बऱ्याच वीरांना वीरमरण येत.

लढाईला जाण्याआधी दत्ताजीला भगिरथीबाई प्रथेप्रमाणे उटीने आंघोळ घालते. जेवायला भोगीचा खास खिचडी, खीर, तूप, बारा भाज्या असा बेत करते. रंगपंचमी या सणाचाही उल्लेख आहे. देवगिरी किल्ल्याच्या पायथ्याला मराठी लष्कराचा तळ पडतो. रंगपंचमी दोन दिवसांनी असते त्याची तयारी लष्करातील लोक करतात. बाघ–बकऱ्याच्या खेळाचा सराव, कलावंत मंडळी आपल्या कलेचा सराव करत होती. औरंगाबादवरून रंगांच्या बैलगाडया येतात आणि दारूचे रांजनही. होळी हा सणही दत्ताजीच्या मृत्यूमुळे साध्या पद्धतीने साजरा केला जातो. होळी पेटवून बोंब मारली जाते.

हिंदुंच्या सण–समारंभाप्रमाणेच मुसलमानांच्या मोहरमचेही वर्णन 'पानिपत' मधे आहे. शियापंथीय मुसलमान मोठया हौसने, उत्साहाने मोहरमचा सण साजरा करतात.

'पानिपत'च्या मोहिमेवरील काही लोक नवरात्राचे उपवास कडक करतात. स्त्रिया ह्या संकट निवारण्यासाठी अंबाबाईचे कडक उपवास करतात.

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीतील समाजजीवनात सण–समारंभ थाटात करत होते. श्रीमंती थाट या सण–समारंभात पहायला मिळतो. मिरवणूक, दागदागिने, सजावट, अंबाऱ्या असा मोठा श्रीमंती थाट माट होता.

## ७.७ 'पानिपत' मधील राज्यकारभार.

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत नानासाहेब पेशव्यांच्या काळातील वर्णन आहे. पेशवाई काळात राज्यव्यवस्था विविध विभागात विभागल्या गेली होती. त्या–त्या विभागांकरता विशेष पदाधिकारी नेमले होते. मराठयांच्या महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील जो काही प्रदेश होता त्या प्रदेशात राज्यव्यवस्था होती. अधिकारी नेमून तेथील कारभार बघितला जात होता. ते अधिकारी त्या–

त्या प्रदेशातील कर, सरंजाम राजधानीत म्हणजे पुण्यात जमा करत होते. पेशवाईचे कामकाज हे लेखी स्वरूपात होते. जमा-खर्चाच्या नोंदी, दैनंदिन नोंदी, पत्रांच्या-खलित्यांच्या नोंदी, आदेशांच्या नोंदी अशा सर्व प्रकारच्या लेखी नोंदी कारकून करत होते. वेगवेगळया खात्यांचे काम वेगवेगळया अधिकाऱ्यांवर सोपवले जात होते. या सर्व खात्यांवर, प्रदेशांवर, निर्णयावर, हिशोबावर पेशव्यांचे लक्ष असायचे. राज्यातील बित्तंबातमी पेशव्यांना दिली जात होती. विविध पदाधिकारी नेमलेले होते. सरदार, सुभेदार, कामवीसदार, मामलेदार, सरंजामदार, पाटील, देशमुख, कुलकर्णी, दिवाण, वकील, पंडित, जहागिरदार, चिटणीस, फडणीस इ. अधिकारी वर्ग तर कामगार, सेवेकरी वर्ग म्हणजे-हुजरे, चोपदार, खिजमदगार, सेवक, राऊत, दरकदार इत्यादी.

मराठयांप्रमाणे नजिबच्या राज्यकारभारातही पदाधिकारी होते. त्याचाही कारभार साधारणतः अशाच पद्धती ने चालत होता. कोणाचा पराक्रम आवडला तर किंवा सत्कार करण्यासाठी 'किताब' देण्याची पद्धत होती. पदे-अमीरउमराव, बहाद्दर, रूस्तम ई. हिंद, वजिर, अमिरेलष्कर, तैमूर, दिवाण, वजीरे आलम, वकील इत्यादी.

राज्यकारभारात विविध खाते निर्माण केलेले होते. त्या खात्यांपैकी महत्त्वाचे खाते म्हणते टपालखाते व हेरखाते. या अत्यंत महत्त्वाच्या खात्यांमुळे राजयकारभार सुरळीतपणे चालत होता.

**७.७.१ टपालखाते (डाकखाते):-** हे खाते त्या काळात अत्यंत वेगवान होते. राज्यकारभारात सिंहाचा वाटा या खात्याचा होता. खलिते, संदेश, पत्र (तवारिख) इ. टपालखात्यामार्फत चालत होते. या खात्याची स्वतंत्र व्यवस्था होती. टपाल नेणाऱ्या व्यक्तींना-सांडणीस्वार, हरकारा असे म्हणत होते. ह्या व्यक्ती अत्यंत प्रामाणिकपणे आणि अहोरात्र घोडयावर प्रवास करुन डाक पोहोचवत होते.

अंतर्वेदीतून लवकरात लवकर खलिता यायचा म्हटल, तरी तेवीस-चोवीस दिवस लागत होते. (पृ.७५) भाऊ गोविंदपंतांना खलिता पाठवतात. त्यात लिहितात, ''पावसाळयापूर्वी यमुनेवर नावांचा पूल बांधणं आवश्यक आहे. सध्या फौजेचा खर्च वाढला आहे. माळव्यात येईतो दहाबारा लाखांचा

बंदोबस्त ठेवा. आता तातडीने पाचसहा लाख पाठविण्याची सोय बघा. उत्तरेच्या बातम्या वेळेवर येत नाहीत. जलद डाकेची व्यवस्था करा. दिवसाआड खलिता धाडण्याची व्यवस्था ठेवा.'' (पृ.११८) हा खलिता घेऊन सांडणीस्वार रवाना होतो.

अब्दालीच्या छावणीतून पांढरी बावटे लावून दोन सांडग्या येतात. शहाचा खलिता भाऊंना देतात. त्यात ''गोविंदपंतांना स्वर्गात धाडले. तुम्ही सर्वच त्या वाटेने जाणार आहे. तुमच्या तेथील बंदोबस्तासाठी त्यांना पाठवले. सोबतची संदूक पाहून पोच दयावी.'' त्या संदूकेत पंतांचे मुंडके होते. भाऊ प्रचंड रागावतात. आणि लगेच अब्दालीला पत्र लिहितात, ''आमची सारी फौज त्या वाटेने जाणार असे आपण लिहिले आहे. खाविंदांना आम्ही विचारतो, ती वाट कोणास चुकली आहे? सारे त्याच वाटेचे वाटेकरी!.......तिकडे जावयास भितो तरी कोण? आम्ही कुठले राजे नाही की, बादशहा नव्हेत! मी तो एका दौलतीच्या धन्याचा चुलतभाऊ एक साधा शिपाई! माझी तिथे बरीवाईट व्यवस्था झाली तर त्याचे काय एवढे? पण आपला लौकिक थोर! आपण कंदहारचे पातशहा, आपली मानाप्रमाणे शाही बडदास्त ठेवली पाहिजे! त्याचसाठी पंत एवढया घाईने तिकडे रवाना झाले.'' (पृ.३५३) असे उत्तर देऊन भाऊ अब्दालीच्या वकीलाला माघारी पाठवतात.

अशा प्रकारे खलिते, पत्र हे त्या काळात संपर्काचे-समाचाराचे एकमेव साधन होते. याच्या भरवशावरच पुढील योजना आखल्या जात होत्या.

### ७.७.२ हेरखातेः-

हेरखाते हे एक राज्यकारभारातील महत्त्वाचे खाते होते. या खात्यात विश्वासू-तडफदार-चपळ लोक काम करत होते. जीवाची पर्वा न करता बातमी पोहोचविण्याचे जिकरीचे काम हेरखाते करत होते. शत्रूच्या प्रदेशात, गोटात जाऊन बातम्या काढून आणणे आणि त्या आपल्या राजाकडे पोहचवण्याचे काम हेर करत होते. प्रदेशानुसार हेर होते. हेर वेगवेगळया वेषभूषेत वावरत होते. शत्रूपक्षाला संशय न येऊ देता ते बातम्या शिताफीने काढत होते.

भाऊसाहेबांचे खास वकील शामजी रंगनाथ हे सुजाला आपल्या बाजूने वळविण्यासाठी फौजबादेला जातात. तिथे ते सुजाचा दिवाण काशीराज पंडित यांच्याशी एका बागेत जाऊन बोलतात. काशीराज म्हणतो, ''आता निवांत बोला. इथल्या भिंतींनाच नव्हे तर हरएक पानाफुलांनाही कान आहेत. तुम्हाला कल्पनाही नसेल शामजीपंत, आमचा जासूदखाना एवढा अजीब आहे की, हिंदुस्थानभर आमचे जासूद तर फिरतातच पण दर पंधरवाडयाला काबूलहू आणि खुद्द तुमच्या पुण्यनगरीतून तवारीखा येतात आमच्या दरबारात. नबाबाचे जासूद दहा हजारांवर आहेत.'' (पृ.१३६)

अब्दाली म्हणतो, ''सुदैवानं आमचं हेरखातं मजबूत आहे म्हणून ह्या खबरा वेळेवर कळतात आम्हाला. आमच्या जासूदांनी मधल्यामधे त्या दोघांची (भाऊ आणि अलासिंग जाटांचा) पत्रे पकडून आणली आहेत.'' (पृ.२८६) अब्दालीला हेरांकडून मराठयांनी पानिपत परिसरात आपल्या मजबूत तोफा चौफेरा पेरल्याची खबर आधीच कळली होती. (पृ.३१५)

नानासाहेब पेशव्यांना पानिपतच्या पराभवाची वार्ता समजते ते दुःखी होतात. ते भक्कम सांडण्या आणि अव्वल हरकारे, खबरे दोनतीन दिशेने खऱ्या बातमीसाठी पाठवतात. मिळेल तशी खबर आणण्याचा हुकूम देतात. (पृ.४७८)

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत राज्यव्यवस्थेचे स्वरूप विविध खात्यांमध्ये विभागलेले होते. राज्यव्यवस्थेमध्ये अनेक पदे होती. अनेक अधिकारी-कर्मचारी काम करत होते. मराठयांच्या जिंकलेल्या प्रदेशावर मामलेदार, नेमला जात होता. तो त्या प्रदेशाचा सगळा कारभार पाहत होता. त्याच्या राज्यातला महसूल, हिशोब तो पुण्याच्या कचेरीत जमा करत होता. राज्यकारभार सुव्यवस्थित चालण्यासाठी विविध पदांचे, वेगवेगळया कामासाठी व्यक्ती नेमलेल्या होत्या. दिवाण हा राज्याचा हिशोब बघत होता. वकील हा राज्याच्या न्यायालयीन बाजू बघत होता. सरदार, सुभेदार हा त्या-त्या प्रदेशाचा कारभार बघणारे होते. सरंजामदार-हा सरंजाम गोळा करणारा होता. कारकूण-फडणीस हे लिखाणाचे काम करत होते. पेशव्यांच्या सरदारांच्या स्वतंत्र मुद्रा होत्या. त्याद्वारे आर्थिक व्यवहार चालत होते. हेरखाते-टपालखाते-यामार्फत संपर्क, बातम्या मिळत होत्या.

याशिवाय पेशव्यांच्या सरदारांच्या दैनंदिन कामकाजासाठी सेवक, चाकर,? खिजमतगार, चोपदार, राऊत, सरदार, दरकदार इत्यादी नेमलेले होते. मराठयांप्रमाणे नजीब-अब्दालीचाही राज्यकारभाराचे स्वरूप साधारणतः असेच होते. त्यांच्या राज्यातही पदे निर्माण केली होती व त्यानुसार राज्यकारभार चालवला जात होता. बादशहा, वजीर, नबाब, सरदार, जहागिर, वकील, मीरबक्षीगिरी, सेनापती इत्यादी पदे होती. अब्दाली हा पराक्रम करणाऱ्याला किताब देत असे. रूस्तुम-ई-हिंद, फर्जदखान, दुराणी इत्यादी.

मोहिमेवर असतांनाही कचेरीचा डेरा होता. त्यात राज्यकारभाराचे निर्णय, हिशेब, खलिते, लिखापढी इ. गोष्टी केल्या जात होत्या. 'पानिपत' मधील राज्यव्यवस्थेचे स्वरूप हे भव्य होते. आर्थिक उलाढाली मोठया प्रमाणावर होत्या. युद्ध मोहिमा यावरील खर्च मोठा होता.

## ७.८ 'पानिपत' कादंबरीतील आर्थिक स्थिती.

'पानिपत' कादंबरीमध्ये १७६०-६१ व त्याआधीच्या काही काळाचे म्हणजेच पेशवेकाळाचे वर्णन आहे. त्या काळातील अर्थव्यवस्था आजच्या तुलनेत फार भिन्न होती. खंडण्या, मुलूखगिरी, सरंजाम, कर वसूली अशा स्वरूपात आर्थिक आवक होत होती. अशा कामांसाठी विशिष्ट पदाधिकारी नेमले होते. उदा. कमावीसदार, मामलेदार, सरदार, तालुकदार, महालदार इत्यादी.

सर्व आर्थिक व्यवहाराचे हिशोब लेखी ठेवले जात होते. हे सर्व व्यवहार, आर्थिक हिशोब सदाशिवराव भाऊ बघत होते. ते याबाबतीत फार शिस्तीचे होते. पदाधिकारी मात्र स्वार्थामुळे प्रामाणिकपणे रक्कम राज्यात पूर्णपणे देत नव्हते. त्यामुळे पेशवाईची आर्थिक स्थिती खालावली होती. मात्र वैयक्तिक पेशवे, त्यांचे कुटुंब, सरदार-त्यांचे कुटुंब ऐश्वर्यात राहत होते.

१) रघुनाथदादांनी उत्तरेत पहिली स्वारी केली होती तेंव्हा त्यांनी एक कोटी रुपये खंडणी सूरजमल जाटाकडे मागितली होती. मात्र त्याने चाळीस लाख देऊ केले. दोघांत युद्ध झाले. जयाप्पाने दोघांत तह घडवून

आणला. (पृ.१७) अशा प्रकारे जिंकलेल्या प्रदेशातून खंडणी घेतली जात होती व यातून राज्यकारभार चालवला जात होता.

२) पेशवाईची आर्थिक स्थिती खालावली होती. ''पेशवाई कर्जाच्या गर्तेत अडकली होती. सरदारांनी आपआपल्या जहागिऱ्या निर्माण करून तटबंदी केली होती. प्रत्येक सरदाराचं सैन्य वेगळं. सरंजाम वेगळा. मुलूखगिरीतून फारच थोडी रक्कम शनिवारवाडयापर्यंत पोचत होती. पेशव्यांची उत्तरेत वसुलीसाठी नेमलेल्या कमावीसदारांनी, मामलेदारांनी स्वतःच्या तुंबडया भरल्या होत्या. वाडया, हवेल्या बांधून जमीनदारी केली होती. पेशवे कर्जाच्या ओझ्याखाली दबले होते. त्यांनी दत्ताजीला आयोध्या बंगल्यात जाऊन किमान साठसत्तर लाखांची सोय करण्याचा आदेश पुन्हा पुन्हा दिला होता.'' (पृ.२०) यावरून असे लक्षात येते की कर्ज घेण्याची पद्धत होती. आर्थिक उत्पन्न चे साधन सरंजाम गोळा करणे, मूलूखगिरी करणे हे होते. मात्र हे सर्वजण स्वतःच्या तुंबडया भरत होते आणि शनिवारवाडयापर्यंत फारच थोडी रक्कम पोहचत होती. त्यामुळे पेशवाईला आर्थिक व्यवहार करण्यासाठी कर्ज काढावे लागत होते.

३) जामदारखान्यात खडखडाट होता. एक नाणे नाही की, आश्रफी नाही. आता लष्कराला दयायचे काय? नाण्यांशिवाय त्यांनी खरेदी करायचे काय आणि खायचे काय? असा सवाल महिपतराव करतात. यावर भाऊ चिंतिंत होतात. त्यांना एकच मार्ग सापडतो ते म्हणतात, ''हर सरदाराच्या डेऱ्यापुढून बुट्टया-पाट्या फिरवा. अबलांच्या गळयात जेवढे सुवर्णालंकार असतील ते गोळा करा. आपल्या दौलतीच्या मालकीच्या सुवर्णाच्या चीजवस्तू फौजेसोबत असतील. त्याही सोडू नका. साऱ्या चिजा टांकसाळांच्या हवाली करा आणि नाणी पाडा.'' (पृ.३८९)

४) मराठयांप्रमाणेच अब्दालीकडेही आर्थिक ओढ होती. युद्धानंतर अब्दाली सुजाला म्हणतो, ''नबाबसाहेब, तुम्हाला आम्ही अजून थोडी तकलीफ देणार आहोत. आमच्या लष्करात घासदाण्याचे हाल कसे आहेत, हे आपण जाणताच. सैन्याचा दोन दोन वर्षाचा पगार झाला नाही. नजिबाकडून ऐवज नाही. ज्यांनी जिंकले ते मराठे नागवेच, उपासपोटी होते! अशा स्थितीत तुमच्यासारख्या दोस्ताकडून आम्ही थोडयाशा द्रव्याची अपेक्षा केली तर ती आमची गलती ठरेल का?'' (पृ.४८५)

पेशवाई दौलत कर्जात होती. आर्थिक दृष्टया राज्यकारभार चालविणे, मोहिमा करणे अवघड चालले होते. विविध प्रदेशातून येणारा आर्थिक ओघ कमी झालेला होता. वसुलीसाठी योजलेले अधिकारी स्वतः रक्कम ठेवून घेऊन कमी रक्कम दौलतीत जमा करत होती. त्यामुळे राज्याचा आर्थिक भार वाढत होता. म्हणून मोहिमेसाठी रक्कम मिळणार नाही अस ठरवतात. म्हणून भाऊंना पानिपत मोहिमेसाठी स्वतःच रक्कम उभी करावी लागते. मात्र आवक कमी आणि खर्च अमाप असतो. त्यामुळे आर्थिक टंचाई तीव्र होते. अब्दालीकडेही आर्थिक सुबत्ता नसतेच. त्याच्या सैन्यातही उपासमार होते. युद्धानंतर शेवटी तर त्याला नबाबाकडून द्रव्य मागावे लागते.

मात्र श्रीमंत, भाऊ, सरदार मोठया घराण्यातील स्त्रिया हे सर्वजण ऐषोआरामात राहत असतात. भरपूर दानधर्म करतात. दागदागिने वापरतात. श्रीमंती थाटाने राहतात.

## ७.९ ‘पानिपत’ कादंबरीतील कुटुंबसंस्था आणि नातेसंबंध.

‘पानिपत’ या विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक कादंबरीमध्ये काही कुटुंबांचा उल्लेख आहे. ही कुटुंबे पेशवेकाळातील आहेत. साधारणतः १७६०-१७६१ या काळातील ही कुटुंबे आहेत. त्या काळात एकत्र कुटुंबपद्धती होती. ‘पानिपत’ मध्ये पेशवे व इतर अधिकारी यांच्याच कुटुंबाचा उल्लेख आहे. सर्वसामान्य कुटुंबाविषयी वर्णन या कादंबरीत नाही. नानासाहेब पेशवे, भाऊसाहेब, फडणीस, दत्ताजी, मल्हारराव इ. च्या कुटुंबांचे वर्णन या कादंबरीत आहे. कुटुंबातील नात्यांच्या बंधाचे वर्णनही या कादंबरीत आहे. वेगवेगळे नातेसंबंध, नातेवाईक, त्यांच्यातील भाऊ-भाऊ, पती-पत्नी, दिर-जाऊ, मैत्रिचे नाते, मानलेले नाते अशा विविध नात्यांचे संबंध या कादंबरीत पहायला मिळतात.

### १) दत्ताजी शिंदेचे कुटुंबः

दत्ताजी शिंदे हे मराठयांचे/पेशव्यांचे उत्तरेतील सरदार होते. दत्ताजी हे फार पराक्रमी होते. त्यांचे भगिरथीबाईंशी लग्न झाल होत. दोघेही जोडीने कण्हेरी देवीच्या दर्शनाला जातात. दत्ताजी देवीकडे पहिला पोरगाच मागतात. भगिरथी लाजते. मुलाच्या चाहुलीने दत्ताजी आनंदी होतात. दत्ताजी

भगिरथीची काळजी घेतात. तिच्यासाठी स्वतः झाडावर चढून चिंचा आणतात. भगिरथी लटक्या रागाने म्हणते, ''स्वतः चिंचेच्या झाडावर कशाला चढलात. एखादया शिपायाला सांगायच होत.'' यावर दत्ताजी म्हणतात, ''काही गोष्टी अशा असतात की त्या सेवकाऐवजी आपणच करण्यात मजा असते. बाळाच्या कल्पनेनं मी वेडा व्हायचा राहिलो बघ भगिरथी.'' (पृ.२१)

दत्ताजी आणि भगिरथी हे पती-पत्नी एकमेकांवर जीवापाड प्रेम करतात. भगिरथी आपल्या कुटुंबासाठी स्वतःच दुःख आवरते.

**२) भाऊसाहेबांचे कुटुंबः-**

सदाशिवराव भाऊ आणि पार्वतीबाई हे दोघे पती-पत्नी असतात. दोघांचही एकमेकांवर प्रेम होत. भाऊंच्या पहिल्या पत्नी उमा देवाघरी जाते. त्यांच्या जागी पार्वतीबाई येतात. पानिपतच्या मोहिमेवर भाऊंसोबत त्याही जातात. भाऊंना कामाचा प्रचंड व्याप असतो. मध्यान्ह उलटल्यावर भाऊ परततात. पार्वतीबाई त्यांची वाट बघत तशाच बसतात. त्यांना भाऊंशी बोलायच होत. मात्र भाऊ थकून झोपतात. याविषयी त्या तक्रार न करता समाधानी राहतात.

मोहिमेच्या व्यापात भाऊसाहेबांना पार्वतीबाईंना वेळ दयायला जमत नाही. पार्वतीबाई लटक्या रागाने तक्रार करतात. यावर भाऊ म्हणतात, ''आणखी काही महिने कळ काढ, मग खुशाल बोल!. सासुरवाडीला जाऊ, जंजिऱ्याला जाऊ, सागर किनाऱ्यावर दोघ गोष्टी करू'' (पृ.२०९) अस आश्वासन देतात. पार्वतीबाईंना सदय स्थितीविषयी भाऊ सांगतात. अपूरी रसद पाऊसकाळ, पूर, शत्रू, अशा सर्व समस्या भाऊ पार्वतीबाईंना सांगतात. मात्र त्यांना यातल सगळच कळत नाही. मात्र जे कळत यावरून आपला पती संकटात अडकला आहे याची जाणीव त्यांना होते. (पृ.२१०)

युद्धानंतर भाऊंचा पत्ता लागत नाही. मात्र पार्वतीबाई त्यांची वाट बघतात. सधवा राहून त्या आपल्या पतीची अहोरात्र वाट पाहतात.

असे हे पार्वतीबाई व भाऊंचे जोडपे एकमेकांवर प्रेम करणारे, काळजी घेणारे होते.

**३) नानासाहेबांचे कुटुंबः**

नानासाहेब हे पेशवे होते. त्यांनी भरपूर पराक्रम केला २० वर्षे पेशवाई सांभाळली. आता थोडी शिथिलता आली होती. निवांतपणाच्या जागी विलास चैन आणि इष्कबाजी आली होती. गोपिकाबाई ह्या त्यांच्या पत्नी होत्या. त्यांचा स्वभाव तापट, रागीट, सत्तालालसू होता. त्यांना पेशव्यांच्या नाटकशाळेचा छंद अजिबात आवडत नव्हता. यावरुन दोघांमध्ये वाद होत होते. भाऊविषयी गोपिकाबाईच्या मनात दुराग्रह असतो. तितकेच प्रेम पेशव्यांना भाऊंविषयी असते. गोपिकाबाई पेशव्यांना भाऊंविषयी सांगतात यावर पेशवे म्हणतात, ''आजकाल तुम्हाला हजार जिल्हा फुटू लागल्या आहेत.'' मघाच आपण छंदीफंदी म्हणालात. नाटकशाळा, ऐषाराम यामध्ये आम्ही मश्गूल असतो म्हणून जेव्हा तेव्हा दोष देत सुटता आपण. आमची बिघडलेली मनःस्थिती बघून आमच्याच जीवनाभावाच्या लोकांबद्दल कान फुंकता, जेणेकरून आमची माणसे दुखावतील. म्हटलय ना-परबुद्धि विनाशाय स्वीबुद्धिः प्रलयंगता! जाऊ देत भाऊंच्या जे नशिबी असेल ते होईल.'' (पृ.८९)

पानिपत मोहिमेवर भाऊंसोबत विश्वासरावला पाठवायचा हट्ट गोपिकाबाई धरतात. यावरून पेशवे व गोपिकाबाई यांच्यात वाद-विवाद होतात. पेशवेपद गेल्यावर कसे हाल होतात. याची आठवण काढून त्या रडतात. पेशवे त्यांना धीर देतात. (पृ.९०)

पेशव्यांच्या उशाशी गोपिकाबाई रात्रंदिवस बसून होत्या. त्यांचेही मन आक्रंदत होते. कुंकवाचा धनी वाचू दे असा धावा त्या देवाकडे करत होत्या. (५१४)

असे नानासाहेब व गोपिकाबाईंचे वाद-विवादाचे नाते होते. पेशव्यांच्या शेवटच्या काळात मात्र गोपिकाबाई बदलतात.

**इतर कुटुंबेः-**

'पानिपत' या ऐतिहासिक कांदबरीमध्ये इतरही काही कुटुंबांचा उल्लेख आहे. त्यातील एक म्हणजे-

१) नाना फडणवीस त्यांची पत्नी यशोदाबाई आणि मातोश्री रखमाबाई अक्कसाहेब हे कुटुंब मोहिमेसोबत जाते. रखमाबाई ह्या फार धार्मिक होत्या. त्रिस्थळी यात्रा घडावी म्हणून त्या मोहिमेसोबत जातात. बळवंतराव मेहेंदळे हे आक्कासाहेबांचे बंधू होते. तेही आपल्या कुटुंबासोबत मोहिमेत जातात.

२) पानिपतच्या मोहिमेसोबत बळवंतराव मेहेंदळे व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईही जातात. दिल्ली जिंकण्यासाठी जेव्हा बळवंतराव निघतात तेंव्हा लक्ष्मीबाई घळाघळा रडतात. यावर बळवंतराव चारच दिवसाचा प्रश्न आहे अशी समजूत घालतात. मात्र लक्ष्मीबाई म्हणतात, ''स्वामींचा चार क्षणांचाही वियोग सहन होत नाही आम्हाला.''(पृ.१८६) बळवंतराव मोठया कष्टाने लक्ष्मीबाईचा निरोप घेतात. बळवंतरावच्या विजयाच्या बातमीमुळे लक्ष्मीबाई आनंदी होतात. त्यांनी अनुष्ठानात बसलेल्या ब्राह्मणांना दुप्पट शिधा, दक्षिणा देतात. सुलतानखानाच्या हल्ल्यामध्ये बळवंतरावांना वीरमरण प्राप्त होते. लक्ष्मीबाई धाय भोकलून रडतात. त्या सती जातात आणि मुलाला अप्पाला भाऊ आश्रय देतात.

३) मल्हारराव होळकरांचे कुटुंबः- मल्हारराव होळकर हे मराठयांचे उत्तरेतील पराक्रमी सुभेदार होते. मल्हाररावांचे सैन्य कोटपुतळीला दाखल होतात. त्यांच्यासोबत मल्हाररावची बायको गौतमीबाई आणि सून अहिल्याबाई होत्या. या दोघी भगिरथीबाईला धीर देतात. गौतमीबाई नवऱ्याला मल्हाररावांना म्हणते आपण उगीच जयनगरकडे वेळ दवडला. आपल्या दिरंगाईमुळे दत्ताजीचा हरनाक बळी गेला. या बोलण्यामुळे मल्हारराव दुःखी होतात. गौतमीबाई त्यांना समजावतात, ''शिंदे-होळकरांमध्ये काही राग असेल तर स्वारींनी रघुनाथ आणि भाऊंशी बोलून घ्यावे. पण त्या सापाला नजिब्याला पाठीशी घालू नये. आजचे वाद उदया मिटतील...उगा पिकल्या केसाला बट्टा लागेल आणि चारचौघात थट्टा होईल! सुभेदार आता तुम्हाला पुन्हा तलवारी पाजळाव्याच लागतील.'' (पृ.६५) अशी समजूत काढून गौतमीबाई मल्हारबांना चांगल्या गोष्टी सांगते. यावर खूष होऊन मल्हारबा म्हणतात,

''गौतमा, खऱ्या मर्दाची बाईल शोभतेस तू!'' (पृ.६५) असे गौतमा व मल्हारबांचे नते बरोबरीचे होते. गौतमाबाईंनी सांगितलेले मल्हारबा ऐकत होते. त्यांची मोठया मनाने स्तुतीही करत होते. गौतमीबाईमुळे मल्हारबाबाला प्रेरणा-स्फूर्ती मिळत होती.

अशा प्रकारे ‘पानपित’ या कादंबरीत काही मोजकेच कुटुंब आलेले आहेत. कुटुंबातील पती-पत्नीचे संबंध प्रेमाचे-जिव्हाळयाचे होते. पत्नी पतीला परमेश्वर मानत होती. पतीही पत्नीची सर्वतोपरी काळजी घेत होता. याला अपवाद म्हणजे गोपिकाबाई व नानासाहेब पेशवे यांच्या नात्याचा होता. या दोघांचे संबंध वाद-विवादाचे होते. भाऊ-भाऊ म्हणून पेशवे व सदाशिवराव भाऊ यांचे संबंध राम लक्ष्मणासारखे होते. दिर-जाऊ म्हणून भाऊ आणि गोपिकाबाईंचे संबंध ताण-तणावाचे होते. गोपिकाबाईंना भाऊंवर अजिबात विश्वास नव्हता. माता-पिता आणि मुलगा म्हणून पेशवे गोपिकाबाई व विश्वासराव यांचे संबंध प्रेमाचे आदराचे होते. माता-पित्याने जे सांगितल जी आज्ञा दिली ती मानणारे विश्वासराव होते. काका-पुतण्या यांचे संबंधही प्रेमाचे-विश्वासाचे होते. दत्ताजी आणि जानकोजी, भाऊसाहेब आणि विश्वासराव यांचे संबंध भावनिक प्रेमाचे-आदराचे, काळजीचे होते.

## ७.१० ‘पानिपत’ कादंबरीतील श्रद्धा-अंधश्रद्धा

‘पानिपत’ या ऐतिहासिक कादंबरीतील समाजात श्रद्धा-अंधश्रद्धा होत्या. श्रद्धाळू वृत्तीही मोठया प्रमाणात होती. त्या काळात श्रद्धा म्हणून केल्या जाणाऱ्या कृतीला अंधश्रद्धा मानत नव्हते. ती एक श्रद्धाच, धार्मिकताच मानल्या जात होती. समाजात काही समजही रूढ होते.

‘‘भाऊसाहेब यात्रेकरू जनानखाना, बुनगे येथेच ठेवून पुढे जाणार, ही बातमी लष्करात पसरते तेव्हा आपल्याला त्रिस्थळी यात्रा घडणार नाही या विचाराने लोक संतप्त होतात. ते जागोजागी मांत्रिकातांत्रिकाभोवती हस्तरेषा जाणणाऱ्या पंडिताभोवती, पोपटवाल्या ज्योतिष्यांभोवती, राऊतांनी, यात्रेकरूनी गराडा घातला होता. पोपटाच्या चोचीत पिंपळाचे पान देऊन एक पोपटवाला ज्योतिषी ओरडत होता. ‘‘आल्यामतीर कोल्यामतीर फूंडऽ राजराजेश्वराऽ दूरदेशीच्या पाखराऽ परमेश्वरा सांगऽऽ देवधर्माचे, जपातपाचे भक्तिभावाचे आदमी माणूस भाऊसाहेब न नेलं तर फौज डुंबेल का जगेल? फौज डुंबेल असं तुला वाटत असेल तरआल्यामतीर कोल्यामतीर घूंऽऽ. फौज डुंबणार असेल तर मुखातल पान टाक आणि डुबणार नसेल तर शेवटीवर नाच. घूईंग घूईऽऽ’’ (पृ.१३२)

पोपटाने चोच उघडली. पान पडले. सर्व घाबरतात. ठिकठिकाणी भटभिक्षुक गंभीर चेहरे करून बसले होते. पंचांगांच्या पानावर नाणी टाकून स्त्रिया काळजीने भविष्य विचारीत होत्या. बव्हंशी सारे शास्त्री पंडित सांगत होते, ''भाऊसाहेबांचं नशीब चांगल नाही. अवतीभवती पापग्रहांची गर्दी. कदाचित प्रलयही ओढवेल. एका बाजूला नंदीबैलवालेही उभे होते. फौज तरेल का बुडेल म्हणून राऊत विचारणा करीत होते. गळयातल्या घंटा वाजवीत बैल बुडेल म्हणून, तर कधी न बुडेल म्हणून मान हलवून सांगत होते. फलजोतिष्य सांगण्यात फौजेत जेरेशास्त्रांचा हात धरणारे कोणी नव्हते. ते म्हणतात, ''फोजेचे यापुढं काही खर नाही. बरेच ज्योतिषी भाऊंची पत्रिका मांडून उभी-आडवी गणितं करीत होते. कुठे काशीकापडवाले तर कुठे माकडवालेही आपापल्या ढंगाने, बुद्धीने भविष्य पडताळत होते. (पृ.१३२, १३३)

अब्दालीची अल्लावर श्रद्धा होती. अल्लामुळेच आपल्यावरचे संकटे दूर होतात व आपल्याला संधी मिळते अस त्याला वाटत. त्याचा नशिबावरही विश्वास असतो.

चांगल्या गोष्टीची सुरवात मुहूर्त काढूनच करण्याची श्रद्धा होती. त्याप्रमाणे युद्धाला निघण्याचा मुहूर्त, गावात प्रवेश करण्याचा मुहुर्त बघितला जात होता.

पानिपतच्या मोहिमेसोबत स्त्रिया, यात्रेकरू जातात कारण त्यांना तीर्थादी विधी केली की पुण्यप्राप्ती होते अशी श्रद्धा त्यांची होती. त्यासाठी हजारो भाविक सैन्यासोबत जातात. नानासाहेब भाऊंना यशप्राप्ती व्हावी म्हणून गावोगावींच्या देव-देवतांना साकडे घालतात. नवस बोलतात. भाऊंच्या लष्करातील लोक-दुखणे कमी व्हावे म्हणून गंडेदोरे बांधत होते. शिवाय प्राण्यांच्या आजारावर इलाज म्हणूनही प्राण्यांना गंडे-दोरे बांधत होते. भाऊ यात्रेकरून मागे ठेवणार ही बातमी ऐकून ते मांत्रिक, ज्योतिषी हस्तरेषा जाणणाऱ्या पंडिताकडे, पोपटवाल्याकडे, नंदीबैलवाल्याकडे, काशीकापडवाल्याकडे, माकडवाल्याकडे अशांकडे जातात व फौज तरेल की बुडेल याचा कौल घेतात. त्यांची या लोकांवर भविष्य सांगण्याऱ्यांवर श्रद्धा होती. सुजा उद्दौलाच्या सैन्याविषयी समज असतो की, गोसाव्यांची ही फौज भानामतीचे चाळे करते. जंतरमंतरच्या जोरावर शत्रूचे तोफगोळे गारभांडी खाऊन पचवतात.

श्रावण महिन्यात होम करावा असे श्रद्धाळूंना वाटते. जर होम केला तर त्यातील काष्टे, तेल–तूप जसे जळेल तसे तिकडे नजीब–अब्दाली जळतील. अशी श्रद्धा असते. आमावस्येच्या रात्री मराठे सरदार एकमेकां शेजारी झोपतात. पाप–पुण्याला भिणारे काही शिपाई होते. जेरेशास्त्रांना आकाशात तारा ढळतांना दिसतो. हा प्रकार म्हणजे अनर्थ आहे हे ते सर्वांना सांगतात. भाऊंची पत्रिका पाहून आता सर्वनाश होणार अस सांगतात. यात्रेकरू व स्वारशिपाई मांत्रिक, पोपटवाला, ज्योतिशी यांच्याकडे गर्दी करतात. शकून–अपशकूनांवर समाजाचा विश्वास होता. पानिपतच्या युद्धाला निघतांना पार्वतीबाई पंचारती ओवाळतांना निरांजन विझते. त्यांच्या काळजात कालवाकलाव होते त्या रडतात. त्यांना अपशकून वाटतो. युद्धानंतर अब्दालीच्या सैन्याला भाऊंचे, त्यांच्या घोडयाचे, अताईखानाचे भूत दिसते. ते घाबरतात. अब्दालीलाही हा युद्धाचा परिसर झपाटल्यासारखा वाटतो. नानासाहेबांना भाऊंच्या जाण्याने दुःख होते. ते या दुःखाला इश्वरी कोप, कलीचा क्षोभ, जगजन्मीची पापे कारणीभूत आहेत अस माणतात. माणसाच्या दुःखाला गतजन्मीची पापे कारण असतात अस समाज मानत होता. नानासाहेबांची प्रकृती सुधारावी म्हणून देव–दैवतांना साकडे घातले होते. अनुष्ठानास लोकांना बसविले जाते. कोणत्याही प्रसंगात देव तारणहार असतो अशी गाढ श्रद्धा समाजात होती.

पर्वतीवरील देवीचे मंदिर हे गोपिकाबाईचे पायाचे दुखणे कमी झाले म्हणून बांधण्यात आले. तेथील बाकीची मंदिरेही नानासाहेबांनी बांधली.

अशा प्रकारे समाजात श्रद्धा होती. शकुन–अपशकुन, मुहूर्त, गंडे–दोरे बांधणे, पत्रिका बघणे, ज्योतिष्याकडे–मांत्रिकाकडे जाणे, भूताटकीवर विश्वास, देवाला नवस बोलणे–साकडे घालणे, होम–हवण–श्राद्ध करणे, तीर्थस्नानाने त्रिस्थळी यात्रेने पापक्षालन व मोक्षप्राप्ती होते अशा प्रकारच्या श्रद्धा समाजात रूढ होत्या.

## ७.११ 'पानिपत' मधील पोषाख, दागदागिने

'पानिपत'या कादंबरीत स्त्रियांचा पुरुषांचा, सरदारांचा, मुस्लिम पुरुषांचा अशांच्या पोषाखांचे, दागदागिन्यांचे वर्णन आलेले आहे. पेशवेकाळात स्त्रिया भरपूर दागदागिने घालत होत्या. पुरुषही दागिने घालत होते. आर्थिक परिस्थितीनुसार स्त्री-पुरुष दागिने परिधान करत होते.

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत पुरुष-डोक्यावर मंदील, अंगात अंगरखा, खाली तुमान, भरजरी शेला, गळयात पाचूच्या, मोत्यांच्या रत्नांच्या माळा घालत होते. स्त्रिया-लुगडे नऊवारी पैठण्या शालू, नाकात हिऱ्याची नथ, गळाभर दागिने, पायात साखळया, सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचे बाजूबंद, मोत्याच्या कुडया, पुतळया, अंगठया पाटल्या असे दागिने व वस्त्र परिधान करत होत्या. स्त्रिया अंगावर काश्मिरी शाल पांघरत होत्या. पुरुष भरजरी दुशेले वापरत होते.

मुस्लिम पुरुष-मंदिल, मांडचोळणा डोक्यावर पोलादी टोप, भरजरी पीळदार तांबूस बत्ती, अंगात जरीचा झगा, कमरेला जडावाचा पट्टा, पायात लखनवी जोडा. अफगाणी झगा, डोक्यावर फ्रेंच धरतीची तांबडी टोपी, अंगात गुडघ्यापर्यंत कोट, लांब बुट, सपात्या, लखनवी कुर्ता, तुमान, मोहरमच्यावेळी गर्द हिरवा घोळदार पोषाख, अफगाणी टोपी, चामडयाचे जाकीट, रेशमाची विजार, गळयात मोत्यांच्या माळा.

कुंजपुऱ्यातील मुस्लिम स्त्रिया खमीज पायजमा घालत होत्या.

इतर लोक आपआपल्या हुद्दयाप्रमाणे वेष परिधान करत होते. शिंदेशाही पगडी, फेटे, पागोटे, धोतर, असा पोषाख करत होते.

स्त्रिया, पुरुष, सरदार हे दागिनेही परिधान करत होते. आपल्या हुद्दयाप्रमाणे श्रीमंतीप्रमाणे लोक भरजरी, जरीचे, उंची वस्त्रे व दागिने परिधान करत होते. दैनंदिन जीवनात स्त्री-पुरुष दागदागिने घालत होते. राजे-महाराजे पेशवे वजिर, सरदार, मुस्लिम राजे इ. श्रीमंत लोक भरजरी रेशमी उंची वस्त्रे घालत, हिरे, मोती रत्ने, सोने इ. चे दागिने घालत होते. वेगवेगळया प्रसंगी वेगवेगळे दागिने, पोषाख घालत होते.

## ७.१२ 'पानिपत' कादंबरीतील भाषाः

''एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्च यांची पद्धती म्हणजे शैली''. अशी भालचंद्र नेमाडे यांनी शैलीची व्याख्या केली आहे.

भाषा शैली विषयी शहा पुढे म्हणतात,

''शैली या शब्दातून या अविष्कार माध्यमाला लाभलेले वळण असा अर्थ आहे. व्यक्तिपरत्त्वे भाषेला मिळणारे हे वळण भिन्न असल्यामुळे प्रत्येकाची भाषाशैली वेगळी असते. भाषाशैलीवर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा, वाङ्मयाच्या संदर्भात कथावस्तूच्या स्वरूपाचा प्रभाव पडलेला असतो. लेखक ज्या विशिष्ट काळातील व विशिष्ट भूप्रदेशातील मानवी जीवनाचे चित्रन करीत असतो, त्या मानवी जीवनाचे खास भाषिक अंग असते. या भाषिक अंगासह भूतकालीन मानवी जीवनाचे चित्रण ऐतिहासिक कादंबरीकार रेखाटत असते. विशिष्ट काळातील, विशिष्ट भूप्रदेशातील मानवी जीवनाचे हुबेहूब आणि जिवंत चित्र रेखाटण्यासाठी लेखकाला अनुरूप भाषेचा कालिक वैशिष्टयांचा नेमका आणि मार्मिक उपयोग करूनच लेखकाला भूतकालीन वास्तव जिवंत करता येते. परिवर्तनशीलता हा भाषेचा स्वभाव असल्यामुळे यादवकालीन भाषेपेक्षा शिवकालीन भाषेत आणि शिवकालीन भाषेपेक्षा पेशवेकालीन भाषेत शब्द, विशम चिन्हे, ऱ्हस्वदीर्घ, वाक्प्रचार, वाक्यरचना इत्यादी अनेक स्वरूपत भिन्नता आढळते. भाषेमध्ये समाजजीवनाचे प्रतिबिंब कसे पडलेले असते हे तत्कालीन वाङ्मयीन ग्रंथांच्या अभ्यासातून समजून घेता येते.''(४)

भाषा दर बारा कोसांवर बदलते असे म्हणतात. त्याचप्रमाणे भाषा ही काळानुसारही बदलते. वेगवेगळया काळातील भाषा वेगवेगळी जाणवते. प्रत्येक काळाचे भाषेचे स्वतःचे वेगळे वैशिष्टय असते. भाषेवरून प्रदेश व काळ ओळखला जातो. ऐतिहासिक कादंबरीमध्ये भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण भाषेमुळेच, तिच्या त्या काळातीलल वैशिष्टयामुळेच इतिहास कादंबरीत निर्मिला

जातो. ऐतिहासिक कादंबरीमध्ये जो काळ दाखवलेला आहे त्या काळातील भाषेचा वापर कादंबरी लेखनात केलेला असेल, तर कादंबरीचा प्रभाव हा मोठया प्रमाणावर पडतो. ती कादंबरी वास्तव वाटते. वाचकाला ती कादंबरी खरोखर त्या काळात घेऊन जाते. त्या कादंबरीतील भाषेमुळेच कादंबरीची परिणामकारकता वाढते. भाषा हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे.

भाषेमध्ये समाजाचे व काळाचे प्रदेशाचे प्रतिबिंब पडलेले असते. भाषेवरून समाज, काळ, प्रदेश याचा चटकण बोध होऊ शकतो. भाषेमुळे समाजाचा बोध होतो. ऐतिहासिक कादंबरीमध्ये भूतकाळातील काळ वर्णन केलेले असतो. त्या काळाचे-वर्णन करण्यासाठी त्या काळातील बोलली जाणारी भाषा लेखक वापरत असतो. त्यासाठी त्याला त्या काळातील भाषेचा, शब्दांचा, वाक्प्रचारांचा, म्हणींचा, वाक्यरचनेचा अभ्यास करावा लागतो. भाषेचा वापर जेवढा वास्तव त्या काळातील असेल तेवढे ऐतिहासिक चित्र वास्तव वाटते. ऐतिहासिक कादंबरी अतिशय महत्त्वाचे अंग म्हणजे त्यातील भाषा होय.

ऐतिहासिक कादंबरीत विविध स्तरातील व्यक्तींचे वर्णन केलेले असते. त्यांच्या स्तरानुसार, संस्कारानुसार, वातावरणानुसार त्यांची भाषा असते. भाषेच्या माध्यमातून पात्रांवरील संस्कार, त्याची भाषा असते. भाषेच्या माध्यमातून पात्रांवरील संस्कार, त्याची श्रद्धा, त्याचे विचार, त्याचा आदर, शिष्टाचार, त्याचा राग इत्यादी सर्व गोष्टी कादंबरीत साकार होतात. यावरुन त्या पात्राचे व्यक्तिमत्त्व कसे आहे हे ठरते. ऐतिहासिक कादंबरीत वेगवेगळया जातींचे वेगवेगळया आर्थिक स्तरांच्या व्यक्ती असतात. या वेगळेपणाप्रमाणे त्यांची भाषाही वेगळी असते. ऐतिहासिक कादंबरीतील सर्वच पात्रांची भाषा एक सारखी नसते. याचप्रमाणे स्त्रियांची अशी खास भाषा-शब्द असतात. त्याद्वारे त्यांचा आदर, भक्ती, समर्पण, श्रद्धा, ज्ञान, वृत्ती, इत्यादी गोष्टीचा बोध होतो. ऐतिहासिक कादंबरीच्या भाषेत लेखक त्या काळातील बोलल्या जाणाऱ्या भाषेची विशिष्ट पद्धती वापरत असतो. त्यासाठी त्याला भाषेचा वेगळाउ अभ्यास करावा लागतो.

‘पानिपत’ या विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक कादंबरीत पेशवेकालीन भाषेचा वापर केलेला आहे. त्या काळात समाजात विविध स्तरात व विविध धर्मांमध्ये जी भाषा बोलली जात होती ती वापरलेली आहे. ‘पानिपत’ मधील भाषेत पेशव्यांची भाषा, सरदारांची भाषा, कार्यालयीन भाषा, कराराची भाषा, खलित्यांची भाषा, स्वार-राऊत-सेवक यांची भाषा, धार्मिक गुरुंची भाषा, शिष्टाचाराची भाषा इत्यादी भाषेचे विविध पदर, स्तर रंग या कादंबरीत पहायला मिळतात. भाषेमुळे पानिपत ही कादंबरी वाचकाला पानिपतच्या युद्धसंग्रामात घेऊन जाते. वाचक स्वतः भाऊंसोबत वावरत आहे असे वाटते. हेच या कादंबरीचे यश आहे. आणि ते त्यातील भाषेमुळे आहे.

पानिपत च्या भाषेविषयी शंकर सारडा ग्रंथविशेष मध्ये म्हणतात,

‘‘बखरीला साजेशी अशी भाषा या कादंबरीला एक वेगळाच गोडवा देते. तिच्यात सांगलीकडची गावरान मराठी आणि बखर-पत्रव्यवहाराची भाषा यांचे मिश्रण आहे. कुठेही ही भाषा कृत्रिम व खोटी वाटत नाही.

‘‘तटबंदीला ढुसण्या देऊन मराठे दिल्लीत घुसले,’’ ‘‘मोहल्यामोहल्यात शस्त्रास्त्रांची टिपरीघाई सुरू होती’’ ‘‘ओंकारेश्वराची शपथ घेऊन सांगतो त्या नजिब्याची तंगडी फासटून एक यमुनेच्या डाव्या काठाला आणि दुसरी उजव्या काठाला टाकीन तरच.....’’, ‘‘कोसभर अंतर दवडल्यावर नजीब म्हणाला, त्या मरगठ्ठयांच्या नजरा मला जहरी दिसल्या’’, ‘‘नजीब मला तरी शुद्ध दिसतो आणि समजा बदललाच तर त्याला जिता फाडून शिळया भाकरीसंगे खाईन.’’ ‘‘इकडचा स्वभाव...एवढेसे मनाला लागले की काळया ढगासारखे गदगदून जातात.’’ ‘‘मुंडी छाटली तरी विनागर्दनीची आपली धड ताबुतासारखी नाचतील.’’

ही भाषा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल.’’(५)

‘पानिपत’ कादंबरीतील भाषेविषयी लेखक विश्वास पाटील एका मुलाखतीत सांगतात,

‘‘पानिपतच्या लढाईच्या काळाचा फील यावा यासाठी मी तत्कालीन अस्सल कागदपत्र अभ्यासली. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण त्या दरम्यान पानिपतमधून महाराष्ट्राला व महाराष्ट्राकडून

पानिपतला अशी हजारो पत्रं लिहिली गेली होती. सुदैवाने आजही ती उपलब्ध आहेत. या पत्रांमध्ये लढाईच्या वर्णनापासून 'चिंगी गरोदर आहे' इथपर्यंतची वर्णनं मिळाली. या पत्रांमुळे त्यावेळेच्या चालीरीती, भाषा समजून घ्यायला खूपच मदत झाली. तोफेसाठी वापरला जाणारा 'सुतरनाळ' हा सुंदर मराठी शब्दही असाच समजला.

याशिवाय अरबी-फारसी भाषेतील बखरी, तवारीका यांच्यावरही खूप भर दिला. तेव्हाच्या मध्यपूर्वेतल्या राजांची एक गोष्ट खूप चांगली होती. ती म्हणजे राजासोबत तिथले उत्तमोत्तम कवी, इतिहासकार, भूगोलतज्ज्ञ असायचे. त्यांनी केलेल्या वर्णनातून पानिपतची प्रत्यक्ष स्थिती, तिथल वातावरण समजून घेता आलं. अशी चौफेर तयारी केली. ''(६)

'पानिपत' या कादंबरीमध्ये त्या काळातील भाषेतील सर्व गुण-वैशिष्टये आलेली आहे. त्या भाषेचा विशिष्ट ढंग आलेला आहे. त्या काळात वापरले जाणारे खास शब्द, वाक्यरचना आहे. 'पानिपत' च्या भाषेत चित्रदर्शीपणा आहे. विविध संवाद आहेत. वाक्प्रचार, म्हणींमुळे वाक्याला एकप्रकारचे वजन प्राप्त होते. अचूक, प्रत्ययकारी प्रतिमांमुळे वाक्याचा अर्थ अधिक गडद होतो.

१) **वाक्प्रचारः**

विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत बरेच वाक्प्रचार वापरलेले आहेत. ते अतिशय चपखलपणे बसलेले आहेत. वाक्प्रचारामुळे वाक्याला एक प्रकारचे वजन प्राप्त होते. 'पानिपत' च्या भाषेमध्ये मोठया प्रमाणावर वाक्प्रचारांचा वापर केलेला आहे.

मुसंडी मारायची, कंबरड मोडलं, चेव चढला, गिल्ला केला.

२) **म्हणीः**

'पानिपत' कादंबरीमध्ये वेगवेगळया म्हणींचाही वापर केलेला आहे.

१) आजा मेला आणि नातू झाला म्हणतात ते खोटं नाही. (पृ.१८)

२) नदी ओलांडेपर्यंत सुसररबाय सुसरबाय तुझी पाठ मऊ म्हणायच आणि पलिकडचा तीर गाठायचा. (पृ.२२)

३) तेल जायचं, तूपही जायचं आणि हाती धुपाटणही लागायंच नाही. (पृ.२३)

४) एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरु मारायचे का? (पृ.२४)

५) नजिबचे तीन तेरा आणि नऊ बारा वाजविले असते. (पृ.२६)

६) माणसानं नकटं असावं पण धाकटं असू नये म्हणतात तेच खरं. (पृ.२६)

७) आप भला तो सब भला. (प.३९)

८) घरचं झालं थोडं आणि व्याह्यानं धाडलं घोडं. (पृ.४१)

९) नुसता खायला कार आणि भुईला भार होता. (पृ.४४)

१०) शरण आलेल्याला मरण देऊ नये. (प.६४)

**३. प्रतिमाः**

'पानिपत' कादंबरीत चपखल बसणाऱ्या प्रतिमा वापरलेल्या आहेत. त्या प्रतिमांमुळे वाक्यातील प्रसंग चटकण लक्षात येतो. प्रसंगाचे चित्र अधिक स्पष्टपणे प्रतिमांमुळे दिसते.

१. जशी जळू अंगाला चिकटते आणि रक्त ओढते तसा नजीबचा स्वभाव. (पृ.२)

२. नजीब दिसावयास देखणा आणि गाजरा सारखा लालेलाल. (पृ.३)

३. मुहूर्त काढावा आणि नाममात्र अक्षता उराव्या अशीच आता विजयाची अवस्था होती. (पृ.३)

४. शाही घोडी मरतुकडया कुत्र्याचं जिणं जगू लागली. (पृ.५)

५. रघुनाथदादा कढईसारखे उकळू लागले. (पृ.७)

६. नजिब्या मराठी दौलतीला लागलेलं ग्रहण आहे. (पृ.८)

७. काळकाभिन्न जव्हेरजंग चालला की रस्त्यावरून कातळाचा कडाच सरकतोय की काय असं बघणाऱ्याला वाटायचं. (पृ.२२)

८. अयोध्येकर सुजा गरीब गायी सारखा तोंड करून नजिब्याच्या संगतीसाठी हंबरू लागला. (पृ.३६)

९. चेहरा श्रमलेला असला तरी डोळे मशाली सारखेच जागते होते. (पृ.४९)

**४. चित्रदर्शी वर्णनः–**

विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' या कादंबरीतील भाषेचे एक वैशिष्टय म्हणजे ती चित्रदर्शी आहे. कादंबरी वाचतांना चित्राप्रमाणे तो प्रसंग वाचकाच्या डोळयापुढे उभा राहतो. बारीक सारीक तपशीलांमुळे अचूक शब्दयोजनेमुळे प्रसंगाच्या तपशीलवार वर्णनामुळे तो प्रसंग ती घटणा घडतांना जणू वाचक बघत आहे अस वाटत.

१. दत्ताजींच्या बुराडीच्या युद्धाचे वर्णनः

''एकाएक पेटलेल्या युद्धामुळे दत्ताजी बेभान झाले. रणमदात बेहोष होऊन त्यांनी एका बाजूने आगीत उडी घेतली. समोरच्या गोलंदांजांना कापून काढले.....जानकोजी ''हर हर महादेव'' चा घोष करीत वेगाने दौडत आला. दत्ताजींच्या बाजूला घुसला. पाच-पन्नास रोहिले दत्ताजींवर तुटून पडले. एकटया दत्ताजींनी तलवारीची खणाखणी चालविली होती. त्यांच्या मदतीला आलेले जानकीची रोहिल्यांची डोसकी सणासण उडवू लागले. तोच एका रोहिल्याने मध्येच उडी ठोकून जनकाजींच्या घोड्याचा लगाम धरला. दुसऱ्या हाताने वार केला. जानकोजींच्या हाताला निसटता वार लागून अंगरख्याचा चिरफाळा उडाला. पेटलेल्या जकोजींनी बेभान होऊन हातातला जामदाडा पुढे फेकला, तसा एक रोहिला खांडोळी होऊन जागीच गारद झाला.'' (पृ.३१)

**५. पेशवेकालीन भाषेतील विशिष्ट शब्दयोजनाः**

कोणत्याही काळातील भाषेचे वैशिष्टय, वेगळेपण हे त्या भाषेतील वैशिष्टयपूर्ण शब्दयोजनेमुळे असते. एखादया वैशिष्टयपूर्ण शब्दामुळे ती भाषा कोणत्या काळातील-कोणत्या प्रदेशातील आहे हे ओळखले जाऊ शकते. 'पानिपत' कादंबरीतील पेशवेकालीन भाषेतील काही वैशिष्टयपूर्ण शब्द पुढील प्रमाणे आहेत.

पेशव्यांना आदराने श्रीमंत म्हटले जात होते. पेशव्यांच्या घराण्यातील लोकांना -दादासाहेब, भाऊसाहेब, नानासाहेब, काकासाहेब, असे संबोधले जात होते. स्त्रियांना 'बाई' या शब्दाने संबोधले जात होते. जसे गोपिकाबाई, पार्वतीबाई, राधाबाई, गौतमाबाई, काशिबाई, लक्ष्मीबाई इत्यादी. खबर, खलिता, तातडीने, दौलत, साहेबी नौबत, जल्दी वखताला, मसलत, एकदिल, झुंजात, खाशाने,

जरीपटका, जरब बसवने, जिकिरीच, नालबंदी, शिबंदी, मुलुखगिरी, कर्जाच्या गोणी, ताजीम, खाजगीकडे, वार्ता, मातोश्री, हवाली केली, सांगावा धाडला रणभेरी झडायच्या, आबदागिऱ्या, तीर्थरूप, त्रिखांडात कीर्तिमान, जान कुर्बान, सुबुरीनं घ्याव, ऐकिवात नाही, आण, झुजांत, बोरुबहाद्दर, सभावना, अंतःपुरातील, दुज्या, प्रातःकाळी, मूर्तिमंत, रणगाझी, तटबंदी, उमर, वसते प्रदान केली, खातरजमा, इष्कबाजी, इकडची स्वारी, फौजबंद होवे, मोहीम, कर्तव्यकठोर, चतुरस्य, गौरविश्वास इत्यादी अनेक शब्द आहेत.

पेशव्यांच्या घरातील स्यियांनाही 'साहेब' ही उपाधी लावली जात होती, राधाबाई साहेब, गोपिकाबाई वहिनीसाहेब,  बाईसाहेब, इत्यादी.

मराठयांप्रमाणे त्या काळातील इस्लामी नजीब-अब्दालीच्या मुस्लीम भाषेतही वैशिष्टयपूर्ण शब्द वापरले जात होते. बादशहाला अधिकारी व्यक्तीला हुजूर, खुदावंत, आलमपन्हाँ, साहेबान, शहापसंद, क्बिलायेआलम, जहॉपन्हॉ, जिल्लेसुभानी इत्यादी. दुवे देतो, बाबाजान एहसानमंद, किताब गुस्ताखी माफ, शाही फर्मान, तवारिखा, जवॉमर्द, अखबार थैली, निगाह रखो, परवरदिगार, वचनचिठ्ठी, असफी, तामिली, शुक्रगुजार, सुलूख, काफर, जिहाद, जनाना, बेगम, नजर कर, कत्लेआम, बरकुदरदार, मेहेरबानी, मसनेद, इत्यादी.

**६. संवादः**

'पानिपत' कांदबरीतील भाषेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यातील संवाद. यातील संवादामुळे पात्रांची वैचारिकता, ज्ञान, स्वभाव कळतो. 'पानिपत' मध्ये विविध संवाद आलेले आहे. सरदारांमधील, स्त्रियांमधील, अधिकाऱ्यांमधील, पती-पत्नीमधील, भावा-भावांमधील, काका-पुतण्यामधील असे बरेच संवाद आहेत.

१) दादासाहेब जेव्हा नजीबवर हल्ला करायला जातात, तेव्हा दत्ताजी त्यांना अडवतात. त्या दोघातील संवाद.

''कुठं निघालात?''

‘‘तुमच्या धर्मपुत्राची, आमच्या बंधूंची भेट घ्यायला.’’

‘‘मी जाऊ देणार नाही.’’

‘का?’’

‘‘तो आता एकटा आहे माझा अश्रित आहे. आश्रिताला मारणं पाप आहे. त्याचं सैन्य कमी आहे. आश्रित-’’

‘आश्रितच घर पेटवू लागला तर काय करायचं?’’

‘‘ते काही असलं तरी मी तुम्हाला त्याच्यावर जाऊ देणार नाही.’’ (पृ.१२-१३)

२. दत्ताजींचा मृत्यू होतो तेव्हा भगिरथीबाई आणि अहिल्याबाई यांच्यातील संवाद. अहिल्याबाई म्हणतात, ‘‘बाई, रडू नका. आपण मराठी सरदारांच्या बायका. आपलं लगीन सरदारांशी नव्हे, तर त्यांच्या तलवारीशी लागतं. तलवार गळाली की आपण कोसळले.’’

‘‘बाईसाहेब, खंडेराव गेले तेव्हा त्याचं तुम्ही अंत्यदर्शन तरी घेतलं असेल.’’ हुदंके देत भगिरथी म्हणाली. ‘‘झाल्या गोष्टींना इलाज नसतो’’ (पृ.६३)

‘‘पानिपत’’ कादंबरीतील भाषा पेशवेकालीन आहे. त्या काळातील भाषेचा ढंग कादंबरीत पहायला मिळतो. पेशवेकाळातील भाषा ही आदरार्थी होती. आदरार्थी वाक्यरचना मोठया प्रमाणावर आहे. आदरार्थी शब्द आहेत. स्वतःविषयी ‘मी’ न म्हणता ‘आम्ही’ म्हटले जात होते. स्त्रियांनाही ‘साहेब’, ‘बाई’ अशा आदरार्थी उपाध्यांनी बोलले जात होते. पेशवे अब्दाली यांच्याविषयीचा कमालीचा आदर त्यांच्याविषयी वापरणत येणाऱ्या शब्दांमधून दिसतो. उदा. श्रीमंत, जहॉपन्हाँ इ.

‘पानिपत’ कादंबरीतील भाषेसाठी लेखकांनी त्या काळातील पत्रांचा, खलित्यांचा, बखरींचा अभ्यास केला. त्यामुळे त्यातील भाषा ही वास्तव वाटते. कादंबरीतील भाषेत ठिकठिकाणी वाक्प्रचार पेरून वाक्याचा अर्थ धारदार केलेला आहे. त्याचप्रमाणे म्हणी वापरून वाक्याचा नेमका अर्थ-घटनेचा नेमका अर्थ वाचकांपर्यंत पोहोचवला आहे. घटनेचा नेमका अर्थ वाचकांपर्यंत पोहोचवला आहे. अचूक, चपखल प्रतिमा वापरुन प्रसंगाला उठाव दिलेला आहे. कादंबरीतील चित्रदर्शी वर्णनामुळे वाचकाला

प्रत्यक्ष पेशवेकाळात गेल्याचा अनुभव मिळतो. भाषेतील विशिष्ट शब्दयोजनेमुळे कादंबरीत पेशवेकाळ अवतरतो. कादंबरीतील वैशिष्टयपूर्ण संवादामुळे भाषेचा गोडवा वाढला आहे. आणि या सर्वांच्या एकत्रित परिपोषामुळे कादंबरीची परिणामकारकता वाढलेली आहे.

### ७.१३ **पानिपत कादंबरीतील व्यवसायः**

पानिपत कादंबरीतील समाजात काही व्यवसाय पहायला मिळतात. पेशव्यांच्या राज्यात विविध व्यावसायिक होते. त्या काळात युद्ध नेहमी होत होते. लांब लांब मोहिमा निघत होत्या. युद्धात उपयोगी व्यावसायीक सोबत नेत होते. विविध व्यावसायिक सहकार्य करत होते.

'पानिपत' कादंबरीतील समाजात शेती हा मुख्य व्यवसाय होता. मराठयांच्या सैन्यातील बहुतांश सैनिक शेतकरी होते. अब्दालीच्या सैन्यातील सैनिक मात्र पूर्णवेळ लष्करी हाच व्यवसाय होता. मोहिमेसोबत अनेक व्यावसायीक जात होते. पाणी भरणारे पाणके, स्वयपांक करणारे स्वयंपाकी, आचारी, बाजारातील दुकानदार म्हणजे वाणी उदमी, हत्यारांना धार लावणारे शिकलगार, लोहार, वाजंत्री वाजविणारे, करमणूक करणारे-कलावंत, कलावंतीणी, तबलजी, भुते, भाट, नाचे, मुरळी, खूषमस्करे, तमासगीर, असे व्यावसायिक करमणूक करण्याचे काम करत होते. चपला बनविणे-शिवणे, किंवा चामडयाचे इतर काम चांभार करत होते. बेलदार-कामठी हे बांधकामे-खोदकाम करणारे होते. ज्योतिषी, शास्त्री, पंडित, पोपटवाले, माकडवाले काशीकापडवाले इत्यादी भविष्य सांगण्याचा व्यवसाय करत होते. या सर्व व्यावसायीकांना पैशाच्या, धान्याच्या स्वरूपात मोबदला मिळत होता. सावकारीचा व्यवसायही त्या काळात होता. सावकार कर्ज देत होते. पेशवाईवर फार मोठे कर्ज झाले होते.

सुतार लाकूड काम करत होते. परीट-कपडे धुण्याचे काम करत होता. वैदू हा आजारावर औषध देण्याचे काम करत होता तो माणसांना व प्राण्यांनाही औषध देत होता. मांग-भाई हे पालख्या, मेणे उचलण्याचे काम करत होते. मशालजी हे उजेडाची व्यवस्था करत होते, पलिते, मशाली टेंभे

लावण्याचे काम ते करत होते. माहुत हे हत्तीची देखभाल करत होते, वडार हे आगीत हत्यारं सलाखून देत होते, लोहार पोलादाच्या कांबी वाकवून चाकांवर बसवत होते, सुतारमंडळी गाडयांची मोडकी बावकाडं आणि जुवांची सांधणी करत होते. (पृ.११५)

### ८.१४ समारोपः

'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीत समाजाचे प्रतिबिंब पडलेले आहे. समाजातील प्रथा, परंपरा, पोषाख, दागदागिने, राज्यकारभार, आर्थिक स्थिती, धार्मिकता, श्रद्धा-अंधश्रद्धा, व्यवसाय, कुटुंबसंस्था, सण-समारंभ, भाषा इत्यादी गोष्टींचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

याशिवाय समाजात इतरही काही गोष्टी होत्या त्यांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. कादंबरीतील समाजात आनंद व्यक्त करण्याची विशिष्ट पद्धत होती. दीपोत्सव साजरा करणे, वादये वाजविणे, तोफांची सलामी देणे, नजराने देणे, बक्षिस देणे, जुल्लूस करणे, नाचणे, अलिंगन देणे इत्यादी गोष्टी आनंदात केल्या जात होत्या. (पृ.७०, १५९, १८७, २२५-२७, २३३)

'पानिपत' कादंबरीतील समाजात काही आजार होते. त्यावर वैदय इलाज करत होते. पोटशूळाचा आजार, सर्दी, उष्णतेची पीडा असे आजार होते. जखमी सैनिकांना झाडपाल्याचे औषध देत होते. जानकोजीच्या जखमांवर हळद लावतात. नानासाहेबांना अंगात कणकणी जाणवत होती. तेव्हा राज्यवैदय औषध देतात. (८६). स्वार-शिपाई औषधी पाला जडीबुटी घेतात. (१२१) नाना फडणीसांना उष्णतेची पीडा होते. (१८५) प्राणीही आजारी पडत होते. घोडे-बैलं यांना हगवणीचा रोग होतो. तेव्हा त्यांना हिरव्या वनस्पतीचा काढा देतात. (२११)

नानासाहेबांना क्षयाची व्याधी होते. त्यावर इलाज म्हणून नाना औषधे घेत होते. (४७३) नानासाहेबांना एकाएकी ढाळेची व्याधी होते. खोकल्याची उबळ थांबत नव्हती. (५१७)

'पानिपत' कादंबरीतील समाजात वेगवेगळे अन्नपदार्थ, फळ, पेय सेवन केले जात होते. फळांमधे अंजिर, सफरचंद ही फळे होती. अन्न पदार्थामधे झुणका, भाकरी, खर्डाभाकरी, खिचडी,खिर

कणीसखर्डा, गुलाबजामुन अंगुर मिठाई, भाकरी ठेचा, मिठाई, पुरणपोळया सांबाऱ्याचा भुरका, बारा भाज्या, कोशिंबिरी, बडा खाना असे अन्न ग्रहण करत होते.

'पानिपत' कादंबरीतील प्रवासाची साधणे, घोडे, हत्ती, बैलगाडया, पालख्या, उंट, नावा, होडया, तराफे, मेणा, अंबारी, छकडे, घोडागाडी, इत्यादी होते. पेशवे, त्यांच्या स्त्रिया पालखी, मेणे, अंबारीतून प्रवास करत होते. स्वार-सरदार-घोडयावरून प्रवास करत होते.

'पानिपत' कादंबरीतील समाजात व्यसनही होते. हुक्का ओढणे, तंबाखू खाणे, दारू पिणे, शराब अशी व्यसने होती.

अशा प्रकारे 'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीतील समाजजीवन होते. त्या समाजात सण समारंभांना महत्त्व होते. प्रथा-परंपरांचे पालन काटेकोरपणे केले जात होते. धार्मिकतेचा पगडा समाजावर खूप मोठया प्रमाणात आणि खोलवर झालेला होता. समाजात बुलुतेदारी ही व्यवसायाची पद्धत होती. स्त्रियांना मर्यादेत रहावे लागत होते. काही स्त्रियांना राजकारणाची जाण होती. स्त्रिया पतीला परमेश्वर मानत होत्या. स्त्रियांना दागिन्यांची हौस होती. समाजात श्रद्धा-अंधश्रद्धा होत्या. समााजाचा ज्योतिषी, भविष्य सांगणाऱ्यांवर विश्वास होता. आजार झाल्यावर वैदयाचे काढे, जडीबुटी, अशी औषधे घेतली जात होती. समाजात आपआपल्या सामाजिक स्तरानुसार भाषा बोलली जात होती. स्त्रियांप्रमाणेच पुरुषही दागिने घालत होते. राज्यकारभार हा विविध पदे निर्माण करून त्याद्वारे केला जात होता. राज्यकारभाराचे महत्त्वाचे खाते म्हणजे टपालखाते व हेरखाते. या मार्फत अत्यंत महत्त्वाची व खरी माहिती मिळत होती. समाजातील कुटुंबव्यवस्था चांगली होती. एकत्र कुटुंब पद्धती होती. राज्यकारभारात भ्रष्टाचार होत होता. मामलेदार राज्यात पूर्ण भरणा करत नव्हते. स्वतःचे वाडे बांधून राहत होते. समाजात प्रामाणिकपणाही मोठया प्रमाणावर होता. राजासाठी प्राणही देणारे सैनिक होते. मात्र काही गद्दार, पळपुटे, सैनिक सरदार होते. चांगली बातमी आणली किंवा पराक्रम केला असेल तर गळयातील हार, अंगठी, दागिना, सोन्याचे कडे, मानवस्त्रे, बिदागी, दिली जात होती. पेशव्यांची आर्थिक स्थिती खालावलेली होती. कर्जाचे डोंगर वाढत होते.

अशा प्रकारचे समाजदर्शन ‘पानिपत’ या कादंबरीतून होते.

### ७.१५ संदर्भ (पानिपत)


१. विभा शहा, ''मराठी ऐतिहासिक कादंबरी एक अभ्यास''. मेहमा पब्लिकेशन हाऊस पुणे, १९९८, पृ.क्र. ६४, ६५, ६६, ६७, ६८.

२. तत्रैव, पृ.क्र.१९, २०, २१.

३. तत्रैव, पृ.क्र. ४०, ४१.

४. तत्रैव, पृ.क्र. ८१.

५. शंकर सारडा, ''ग्रंथविशेष'' मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, १९९१, पृ.२२.

6. लोकप्रभा, ''चहा आणि चर्चा'', २४ डिसेंबर २०१०, पृ.क्र.१५.

प्रकरण आठवे

# संभाजी कादंबरीतील समाजजीवन

अनुक्रमणिका


८.१ प्रस्तावना

८.२ ‘संभाजी’ मधील स्त्री जीवन

८.३ ‘संभाजी’ मधील रूढी-परंपरा प्रथा

८.४ ‘संभाजी’ मधील धार्मिक स्थिती, श्रद्धा-अंधश्रद्धा

८.५ ‘संभाजी’ मधील राज्यकारभार

- ८.५.१ हिंदू राज्यकारभार
- ८.५.२ मुसलमानी राज्यकारभार
- ८.५.३ टपालखाते
- ८.५.४ हेरखाते

८.६ ‘संभाजी’ मधील आर्थिक स्थिती

८.७ ‘संभाजी’ मधील कुटुंबसंस्था

८.८ ‘संभाजी’ मधील सण-समारंभ उत्सव

८.९ ‘संभाजी’ मधील पोषाख व दागदागिने

८.१० ‘संभाजी’ मधील भाषा

८.११ समारोप

८.१२ संदर्भ

## ८.१ प्रस्तावना

संभाजी ही विश्वास पाटील यांची ८४७ पानांची ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरीत वर्णन केलेला काळ हा संभाजी १८,१९ वर्षांचे असल्यापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १६७६ ते ११ मार्च १६८९ पर्यंतचा १३ ते १५ वर्षांचा काळ या कादंबरीत चित्रित केलेला आहे. शिवाय या काळाच्या आधी घडून गेलेल्या घटनांचाही उल्लेख या कादंबरीत काही ठिकाणी येतो.

संभाजी ही ऐतिहासिक कादंबरी संभाजी राजांचा संपूर्ण जीवनपट सांगणारी आहे. अस्सल कागदपत्रांचा अभ्यास करून विश्वास पाटील यांनी ही कादंबरी लिहिलेली आहे. म्हणून या कादंबरीचे सत्यतेच्या बाबतीत मोल अधिक आहे. या कादंबरीत संभाजींचे गुण–विशेष,त्यांचा पराक्रम,बेडर वृत्ती,रणांगणातील शौर्य, निर्भय,कवी मनाचे,न्यायी,कणवाळू,धीरोदत्त–सेनानायक, स्त्रियांचा सन्मान करणारे परधर्माचा आदर करणारे ,मोठ्या मनाचे, शिस्तीचे, प्रेमळ,हळव्या मनाचे, सुस्वरूप,अशा सर्व गुणांचा अनुभव देणारी ही कादंबरी आहे.
या कादंबरीविषयी शंकर सारडा म्हणतात,'विश्वास पाटील यांनी संभाजी राजांची पुनर्प्रस्थापना च या महाकादंबरीद्वारे केली आहे. असे म्हणावे लागते. इतिहासाशी संपूर्ण इमान राखून, कागदपत्रातील पुरावे लक्षात घेऊन विश्वास पाटील यांनी शंभूराजांची ही संघर्षगाथा सिद्ध करतांना एक कादंबरीकार म्हणूनही आपले सामर्थ्य प्रकट केले आहे.'' (१)

या कादंबरीविषय लेखक विश्वास पाटील म्हणतात, ''सह्याद्रीच्या निबिड अरण्यांनी, दऱ्याखोऱ्यांनी खाड्यांनी आणि सागरकिनाऱ्यांनी उपलब्ध पण दुर्लक्षित सच्चा कागदपत्रांची सांगितलेली शिवपुत्राची अद्‌भुत चित्तथरारक पण वास्तव महागाथा म्हणजे संभाजी. '' (२)

बाळासाहेब शिवदे या कादंबरीविषयी म्हणतात, ''संभाजीबद्दल विपर्यस्त इतिहास आपल्या माथी मारला गेला. या शिवपुत्रात दोषांपेक्षा गुण अधिक होते. हे समाजापुढे येणे गरजेचे आहे. विश्वास पाटलांच्या लेखणीने संभाजीला योग्य न्याय मिळेल असे वाटते.'' (३)

शंकर सारडा, आपल्या भाषणात म्हणतात. ''ऐतिहासिक कादंबरी लेखनात अनेकदा वास्तव व कल्पीत याचा विचित्र सरमिसळ असते. परंतु विश्वास पाटील यांनी कोणत्याही कल्पिताचा आधार न घेता वास्तवाशी

इमान राखून लेखन केले आहे. मराठीतल्या सहासपट नाटककारांनी संभाजीची चुकीची व्यक्तिरेखा मांडली. त्यामुळेच विश्वास पाटील यांच्या कादंबरीचे मोल ऐतिहासिक आहे. '' (४)

## ८.२ स्त्रियांची स्थिती/स्त्री-जीवनः

संभाजी ही ऐतिहासिक कादंबरी १६ व्या शतकातील आहे. या कादंबरीत १६ व्या शतकातील समाजजीवन पहायला मिळते. शिवाजी संभाजी महाराजांच्या काळातील समाजीवन या कादंबरीत आहे.

संभाजी या ऐतिहासिक कादंबरीत सोळाव्या शतकातील स्त्रिजीवन चित्रित केलेले आहे. या कादंबरीत जिजाबाई, सोयराबाई, येसूबाई, पुतळाबाई, गोदू, हंसा , राणूबाई, दुर्गाबाई इत्यादी मराठी स्त्रिया तर उदेपूरी, बेगम, जिनत अशा मुसलमान स्त्रियांचे वर्णन आहे. यातील बहुतांश स्त्रिया राजघराण्यातील, श्रीमंत आजहेत. फक्त गोदू ही सर्वसामान्य घरातील स्त्री आहे. त्यामुळे संभाजी या कादंबरीतील स्त्री-जीवन हे राजघराण्यातील आहे. या कादंबरीत सर्वात जास्त वर्णन येसूबाईंच आहे.

**ब)** **गोदू :-** गोदू ही करा गावचे देशपांडेपण असणाऱ्या त्र्यंबकरावची सून व निवासरावची बायको होती. गोदूच माहेर महाडजवळच होत. तिचे काका अण्णाजी दत्ता हे अष्टप्रधान मंडळातील सुरनवीस होते. गोदूचे व्यवहार ज्ञान उत्तम होते. म्हणूनच तिला तिच्या घरात कट शिजत असल्याच लक्षांत ये. शिवशाहीतील मोहिमांविषयी तिल माहिती होती. शिवाजी राजांवर तिची जिवापाड भक्ती होती. तानाजीच्या वीरमरणानंतरच्या मिरवणूकीत गोदू आठ वर्षांची असतांना सहभागी होते ही आठवण तिच्या डोळयसमोर येते. सासऱ्याने शिवाजी राजांना मारण्याचा कट केला हे गोदू ऐकते घाबरते. शिवाजी राजांना वाचविण्याचा निश्यचय करते. घोडयावर बसून रात्रीच ती रायगडाकडे निघते.

अशी ही गोदू धाडसी स्पष्टवक्ती व्यवहारज्ञानी, चतुर, कामाची होती. तिच संभाजी राजांवर प्रेम होते. दोघांमध्ये एक नात निर्माण झाल होत. शिवाजी राजांवरील आपुलकीपोटी ती धाडस करून रात्री

रायगडावर जाऊन आपल्या सासऱ्याचा व नवऱ्याचा राजाविरोधातील कट सांगते. गोदू येसूबाई व दुर्गाबाईलाही लळा लावते. अशी ती प्रेमळ असते. आणि संभाजीजांवरील प्रेमासाठी ती दुसरं लग्न न करता तशीच राहते.

२) **हंसा :-**

हंसा ही अष्टप्रधान मंडळातील सुरनवीस अण्णाजी दत्ताची मुलगी होती. हंसा ही अण्णाजीची एकुलती एक पोर होती. ही पाखरासारखी बागडायची, मोराच्या पायांनी नाचायची. आण्णाजींनी तिचे लग्न गडबडीने आटोपले होते. मंगळागौरीसाठी ती माहेरी येते. राजवाडयात जाते व दुःखी होऊन परतते. दोन तीन दिवसात ती विहिरीत आत्महत्या करते. याचा अण्णाजींना धक्क बसतो. या प्रकरणामुळे लोक अनेक तोंडांनी बोलत होते. अनेकजण शंभूराजांकडे बोट दाखवत होत. त्यामुळे आण्णजींचा शंभूराजांवर फार राग होता. (पृ.१५)

अशी ही हंसा सुंदर, चैतन्यमयी होती, मात्र संभाजीराजांवरील एकतर्फी प्रेमातून ती निराशेने आत्महत्या करते.

३) **येसूबाई :-**

येसूबाई हया संभाजीराजांच्या पत्नी होत्या. संभाजी या कादंबरीमध्ये संभाजीच्या बरोबरीने येसूबाईचे वर्णन आलेले आहे. येसूबाईचे सर्व गुण वैशिष्टये या वर्णनात प्रसंगानुरूप आलेले आहेत. येसूबाई ही संभाजीच्या काळातील एक कुशल राज्यकर्ती स्त्री होती. बालपणी येसूबाई आणि संभाजी एकत्र शिक्षण घेतात. त्यामुळे येसू ही त्यांची आधी मैत्रिण आणि मग बायको होती.

येसूबाई त्यांच्यावर सोपवलेल्या मुलकी कारभाराची जबाबदारी जबाबदारीने पार पाडत होत्या. कचेरीत बसून दिवस-दिवस काम करत होत्या. जागरूक नजरेने खातावण्या, किर्दी तपासत होत्या. (२८४) चिटणीसांचा मृत्यूपूर्वी पाठवलेला लखोटा त्या स्वतः वाचतात. संभाजी दुःखी होतात. त्यांचा सांत्वन करतांना त्या म्हणतात, ‘‘स्वामी, दुःख आवरा चिटणीसांच्या लेकरांना खंडो बल्लाळला आणि

निळो बल्लाळला यापुढे पोरच्या पोरांसारखे वागवू. त्यांना सेवेची संधी देऊ. झाडासारखं वाढवू मम (३२५)

संभाजीवर संगमेश्वरवर शत्रूचा हल्ला झाला हे येसूबाईला कळल्यावर त्या राजे कुठे आहे? अस सारख विचारतात  त्या रायगडावर येतात. संभाजींची चिंता त्यांना होती. राजांना कौद केल्याच त्यांना कळल्यावर त्या कोसळतात. जनता रायगडावर गोळा होते.आईसाहेब आमचे राजे कुठे आहेत? असा आक्रोश करतात त्यांना शांत करतांना येसूबाई हात जोडून म्हणतात, 'ऐकाऽ अशी बाजारगर्दी करू नका. औरंग्याशी आपलं युध्द सुरू आहे. थोडं तरतंबुरतं चालायचंच युध्दात घाबरू नका. क्षणभर एखादा डाव उलटलाम्हणजे औरंगजेबाचा विजय झाला की काय? रायगडाहून लवकरच फौजा बाहेर पडतील. आम्ही सारे वैऱ्याच्या अंगावर धावून जाऊ. राजांना औरंगजेबाच्या मुठीतून नव्हे, तर यमाच्या दाढेतूनही घेऊन माघार येऊम (प्र.७४२) येसूबाईवर दुःखाचा डोंगर कोसळला होता तरी त्या सर्वांना सूचना देतात. स्वार राऊतांनी आपआपल्या जागी जा. आपले पहारे सोडून अजिबात बाजूला जाऊ नका. हुल्लड बाजी कराल तर वैऱ्याचा फायदा होईल. येसूबाई फौज बांधायला सुरवात करतात. पाच सहा हजार सैन्याची जमवाजमव करून येसूबाई गडाखाली येऊन सिध्द होतात. येसूबाई सरदारांना सल्ला देतात की, अनेक गडकिल्ल्यांवरच्या फौजा काढून खानाच्या मागे आंधळीपणाने धावून चालणार नाही. पानशहा दुसऱ्यावाटेने इकडे आला तर घात होईल. एकूण सात-आठ हजारांची फौज घेऊन येसूबाई स्वतः घोडयावर बसून राजांना सोडवायला निघतात. थोड पुढे गेल्यावर त्यांना हैबतराव भेटतात आणि संभाजींना मुकर्रब खानाने फार लांब नेले सांगतात. हे ऐकूण आतापर्यंत अजिबात न घाबरलेल्या येसूबाई हताश होतात. (७४७-७४८) संताजी धनाजी त्यांना धीर देऊन राजांना सोडवूच असं म्हणतात. पण येसूबाईला खानाच्या ताकदीची पूर्ण कल्पना होती. तिथे आपला गनिमी कावा चालणार नाही तो सपाट भाग आहे. आंधळेपणाने धाव घेणे योग्य नाही. राजेच योग्य तो निर्णय घेतील. रायाप्पा महाराणीच्या मुद्रेचा मसुदा घेऊन रवाना होतो. महाराणीला अती दुःख होत. पण त्या धीराने खंबिरपणे संताजी धणाजीला म्हणतात.

''धीरानं घ्या. आमचं कुंकू वाचवायच्या नादात हिंदवी स्वराज्याचा कपाळमोक्ष व्हायला नको.'' (पृ.७४९)

अशा येसूबाई असामान्य औदार्य, अतुलनीय समज, धैर्य, प्रसंगावधान, कर्तृत्ववान, सुशिक्षित, कर्तव्यतत्पर, समजदार, सारासार विचार करणाऱ्या, प्रसंगाला तोंड देणाऱ्य, सामंजस समजदार, निश्चयी, राजकारणाची जाण असणाऱ्या, योग्य निर्णय घेणाऱ्या, एखादया गोष्टीचा सर्व बाजूने विचार करणाऱ्या, नियमाच्या आणि वेळेच्या काटेकोर, प्रेमळ स्वभावाच्या, प्रसंगी स्पष्ट बोलणाऱ्या, सर्वसमावेशक, स्नेहमय चमकदार व्यक्तिमत्वाच्या, मोठया मनाच्या, संभाजींना धीर देणाऱ्या, चतुर, हुशार, चोख, राज्यकारभार करणाऱ्या, अखंड जागरूक असणाऱ्या चाणाक्ष बुद्धीच्या, खात्री करून निर्णय घेणाऱ्या, धार्मिक वृत्तीच्या, सकारात्मक विचार करणाऱ्या अशा गुणांचा संचय असणाऱ्या संयमी, शांत स्वभावाच्या, कुशल राज्यकर्ती येसूबाई त्या काळातील एक आदर्श स्त्री होत्या.

४) **रखमाबाई –** रखमाबाई हया मराठी सैन्याचे सेनापती हंबीररावांच्या पत्नी होत्या. रायगडावर शिवाजी महाराजंच्या मृत्यूनंतर गादीवरून गृहकलह होतो. हंबीरराव हे सोयराबाईचे भाऊ आणि राजारामाचे मामा होते. रखमाबाई त्यांना सर्व नातेवाईकांच्या मनातल्या विचार बोलतात.

''सोयरावन्सची पत्रं पोहोचली आहेत काहीही झालं तरी रक्ताचं नातंच जन्मभर उपयोगी पडतं! राजाराम बाळराजे आपले भाचे ! त्यांना गादी मिळावी आपल्या भाच्याच्या पाठीशी आंधारवडासारखं उभं रहा.''(प्र.२०३) अस रखमाबाई पुन्हा– पुन्हा सांगतात.

रखमाबाईंना आपले भाचे राजाराम छत्रपती व्हावे असे वाटत होते.

**५) पुतळाबाई –**

पुतळाबाई ह्या शिवाजीराजांच्या पत्नी होत्या. संभाजीच्या सावत्रमाता होत्या. होळीच्या सणाच्या निमित्ताने त्या पाचाडच्या वाडयातून रायगडावर येतात. त्यांनी खास रत्नकंठा घडवून आणला होता. तो होळीच्या निमित्ताने आपल्या लाडक्या शंभू बाळाला पेश करायचा होता. (पृ.११)

पुतळाबाई शिवाजीराजांच्या जाण्याने खंगून जातात. तुळशीच्या काष्ठासारखी त्यांची काया होते. पतीच्या अकाली निधनाने त्या अक्षरशः मोडून जातात. त्या सती जाण्याचा निर्णय घेतात. (प्र.२२६)

अशा पुतळाबाई शांत स्वभावाच्या, सोज्वळ वृत्तीच्या, निश्चयी, पती निधनाने कोसळून जाणाऱ्या राज्यावर संकट येऊ नये म्हणून त्या सती जाण्याचा निर्णय लांबवतात सत्य काय आहे ते संभाजींना सांगतात, पतीप्रेमापोटी सती जातात.

**६) सोयराबाई :**

सोयराबाई या शिवाजीच्या पत्नी होत्या व राजारामांच्या माता व संभाजींच्या सावत्र माता. अण्णाजी आणि सोयराबाईंच्या मार्गातील धोंड संभाजीराजे होते. कारण सोयराबाईंना आपल्या मुलाला राजारामांना छत्रपती बनवायचे होते, त्या मार्गात संभाजी धोंड होते. आणि अण्णाजींचा भ्रष्टाचार संभाजी उघडा करत होते. शिवाय त्यांच्या मुलीच्या हंसाच्या मृत्यूला संभाजी जबाबदार आहे असा त्यांचा समज होता. म्हणून अण्णाजी आणि सोयराबाईंची युती होते. त्या अण्णाजीकडे आपले मन खुले करतात.

‘‘अण्णाजीपंत, आमचे राजारामबाळ वयानं शंभूराजांपेक्षा मोठे असते, तर किती बरं होतं.मम (प्र.४३) संभाजी कर्नाटक मोहिमेवर जाणार म्हणून सोयराबाई तूर्त सुंठेविना खोकला गेला. आता काही महिने सुखाने घालवू अस म्हणतात. यावर अण्णाजी सोयराबाईंचे कान भरतात. संभाजींना मोहिमेत जाऊ देऊ नका. अस ते सांगतात.(प्र.४६)

याआधी सोयराबाईंच्या दृष्टीस शंभूराजे दिसले की, त्यांना आनंद होत होता! जिजाबाईंनंतर सोयराबाईच शंभू बाळावर माया करत होत्यां. मात्र राजाराम सहा–सात वर्षांचे झाल्यावर सोयराबाईला स्वार्थाने झपाटले होते. राजाराम छत्रपती बनावे यासाठी त्या धडपडत होत्या.म्हणूनच संभाजींना कर्नाटक

मोहिमेत जाऊ न देण्याचं आणि पराक्रम न करू देण्याच त्या ठरवतात. त्यासाठी त्या शिवाजी महाराजांकडे येतात. महाराजांना सांगतात. संभाजींच वर्तन आजकाल हाताबाहेर गेल आहे, मनस्तापाशिवाय तुमच्या हाती काही पडणार नाही. शंभूराजे आणि राजाराम काय महाराजांचीच लेकरं कधी कधी वाटतं. दोघांत उगाच संघर्ष नसावा. पूर्वी राजांच्या मनातील स्वराज्याचे दोन भाग करायचा चांगला विचार होता. यावर महाराज ठाम नकार देतात. तेव्हा सोयराबाई न राहावून म्हणतात. तुम्हाला शंभूराजे सोडून राजाराम हेही पुत्र आहेत. आम्हांवर हा घोर अन्याय आहे. राज्यकारभाराच आणी मोहिमांच बाळकडू फक्त संभाजीनाच का? मोहिमेवर न्यायच असेल तर संभाजीसोबत राजारामांनाही न्यावच लागेल. सोयराबाई ओक्साबोक्सी रडतात. त्या निक्षून सांगतात, एक तर राजारामांसाठी राज्य तोडून दया किंवा एकटया शंभूराजांना मोहिमेवर नेऊ नये यापैकी कोणताच निर्णय न मिळेल तर आम्ही अन्नपाणी सोडू. देवाचे लाडके होऊ. (प्र.४९) अशी धमकी देऊन त्या आपला हेतू साध्य करतात.

आपल्या मनातील अपराधीभाव बोलून सोयराबाई, आपल मन भावाकडे मोकळ करतात. त्यांना आपल्या स्वार्थ बुद्धीचा पश्चाताप होतो. २७ ऑक्टोंबर १६८१ ला त्या हिरकणी खाऊन आत्मघात करतात. आपल्या अविवेकी वागण्याचा त्यांना पश्चाताप झाला होता आणि राजारामांवरील येसू-शंभूराजांचे प्रेम पाहून तर त्यांना आपल्या वागण्याचा अधिकच पश्चाताप झाला असावा म्हणून त्यांनी आत्मघात केला असावा.

### ७) **राणूबाई :-**

राणूबाई हया संभाजी राजांच्या मोठया भगिणी होत्या. त्यांचा खरा जीव संभाजींवरच होता. त्या वाईकर जाधव होत्या. बाळपणी संभाजी दिड वर्षांचे होते तेव्हा आगाशीवरून पडता-पडता राणूबाईनी झेप घेऊन त्यांचा वाचवले होते. तेव्हा सईबाई माता राणूला पुढेही शंभूची अशीच काळजी घ्यायला सांगतात.

जेव्हा संभाजी दिलेरखानाला जाऊन मिळतात तेव्हा दुर्गाबाईसोबत राणूबाईला बघून त्यांना धक्का बसतो. ते राणूबाईला इकडे संसार सोडून का आलात? असा प्रश्न विचारतात यावर त्या काळजीने

म्हणतात, ''शंभूबाळ, आमची चिंता करू नका. मात्र तुमचीच काळजी वाहण्यासाठी आम्ही अट्टाहासाने दुर्गाबाईंसोबत इकडे आलो आहोत. जाऊ दे शंभू. तुम्हाला ना कधी आईची सावली लाभली. आजी जिजाऊ साहेबही नाहीत. आबासाहेबांनीही तुम्हांकडे पाठ मि रवली. घरचं एखाद दुसरं मायेचं नको का कोणी तुमच्याबरोबर?''(पृ.१२२)

राणूआक्का साश्रू नयनांनी दोघांचा निरोप घेतात. अशा हया राणूबाई भावावर जीवापाड प्रेम करणाऱ्या भावाला आधार देण्यासाठी स्वतःचा संसार सोडून शत्रूकडे जातात. दिलेरखानाच्या विळख्यातील संभाजींना त्या धीर देतात, समजावतात. त्यांचा राग शांत करतात. स्वराज्यालातुमची गरज आहे याची जाणीव त्या संभाजींना करून देतात. संभाजी जेव्हा दिलेरखानाच्या विळख्यातून बाहेर पडणार असतात तेव्हा ते राणूबाईला घेऊन मात्र त्या सारासार विचार करून संभाजीला म्हणतात, तुम्ही एकटेच जा. आमची काळजी करू नका. आमच्या नादात तुम्ही अडकून पडाल. आणि निस्वार्थीपणे, स्वतःच्या सुखाचा विचार न करता त्या दूगाृबाईजवळच शत्रूच्या गोटात स्वखुशीने राहतात. अशा त्या मोठया मनाच्या होत्या. दहा वर्षानंतर संभाजीला त्या कैदखान्यात भेटतात तेंव्हा त्यांना संभाजींच्या अवस्थेची करूणा येते. त्या संभाजींना म्हणतात आमच्या प्राणासाठी कोणतीही तडजोड करू नका. अशा राणूबाई, धीराच्या, निस्वार्थी, विवेकी होत्या.

८) **दुर्गाबाई** :–दुर्गाबाई हया संभाजीराजांच्या दुसऱ्या पत्नी होत्या.त्या अबोल व शांत वृत्तीच्या होत्या. एकदा शंभूराजे सुप्याच्या जाधवांकडे भोजनाला गेले, तेव्हा वाढण्यासाठी जाधवरावांची गोंडस दुर्गा येते. तिची अदब, मोहक चालणे, मंजूळ बोलणे संभाजींना आवडले. त्यांच्या सुपे बारामती भागातील भेटी वाढल्या. येसूबाईंना हे लक्षात येते आणि मोठया मनाने त्या दुर्गाबाईला मागणी घालून घरी आणतात. दुर्गाबाईला येसूबाई संभाजीला सांभाळायला तुम्हाला आणले अस सांगतात तेव्हा दुर्गाबाई, ''आक्कासाहेब, आम्ही का तुमच्या शब्दाबाहेर आहोत?'' (१०२,१०३)

संभाजींची अवस्था बघून दुर्गाबाईचे चित्त हरवते. त्या संभाजींच्या पायावर आपला आसवाने भरलेला चेहरा ठेवून हंबरडा फोडून कळवळून म्हणतात, ''युवराजमम, आमच्या काळजीपोटीच

तुमच्यासारख्या पराक्रमी पुरुषाची पावलं इथं अडखळून पडतात. त्यामुळेच तुमच्या पंखात बळ संचारत नाही. तुमचे काळीज तुटते. पण राजे, आम्ही इथे गंजून मरू. त्याने असा काय फरक पडणार आहे? पण आपल्या बचावामुळे शिवाजीराजांचे स्वराज्य टिकणार आहे. राजे आमच्या मायेमध्ये इतके गुंतून का पडता?'' (पृ.१५०-१५१)

दहा वर्षानंतर दुर्गाबाई संभाजींना कैदखान्यात भेटतात. संभाजींना त्या दहा वर्षांनी भेटणार असल्यामुळे त्यांचे काळीज खाऱ्यावर नव्हत. त्यांना रात्रभर झोप लागत नाही. रायगडचा राजकुमार आणि शिवाजी राजांचा पुत्र असलेल्या आपल्या कुंकवाच्या धन्याची भिकाऱ्यापेक्षाही विचित्र अवस्था बघून दुर्गाबाईंचा धीर सुटतो. त्या धाय मोकलून राजे , राजे असा अकांत करतात. त्यांना हुंदके आवरत नव्हते. संभाजी राजे दुर्गाबाईला म्हणतात, आम्ही तुम्हाला कोणतच सुख देऊ शकलो नाही. यावर दुर्गाबाई म्हणतात, राजे जे लाभलं, वाटयाला आलं तेही खूप होत. शिवाजी राजांची सून आणि शंभूराजांची पत्नी हया शब्दांचा लोकांकडून मिळणारा गोड आहेर स्वर्गसुखापेक्षा काय कमी प्रतीचा आहे.'' (पृ.७८२) संभाजी त्यांना म्हणतात, बादशहा च ऐकल तर आपली सुटका होईल. साधवा म्हणून उरलेल आयुष्य काढता येईल. यावर दुर्गाबाई कळवळून बोलतात. नका राजेऽ थट्टेतही असं बोलू नका. आमच्या मामंत्रीसाहेबांच्या शिवाजीराजांच्या ध्येयस्वनंपुढं साधवेपणाची कायतमा? नाही तरी राजेक गेल्या दहाबारा वर्षांत वैधव्यात राहायची सवय जडलीच आहे. या शरीराला उरलं आयुष्य कसही काढू. (७८२) अश्रू भरल्या डोळयांनी त्या राजांचा निरोप घेतात. कवी कलशांच्या पावलांचे दर्शन घेतात आणि मोठया कष्टाने निरोप घेतात.(७८३)

अशा दुर्गाबाई ठेंगण्या, सुंदर, अबोल होत्या, मोठयांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागणाऱ्या, स्वराज्यासाठी संसाराचा त्याग करणाऱ्या, संभाजींना धीर देणाऱ्या, संभाजींसाठी बादशहा च्या कैदेत राहून स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या अशा हया दुर्गाबाई होत्या.

९) **अंबिकाबाई –** शंभूराजांच्या अंबिकाबाई थोरल्या बहीण होत्या. त्यांना तारळयाच्या महाडिकांकडे दिल होत. अंबिकाबाईंवर युवराजांनी अपार माया होती.(पृ.९२)

संभाजीराजांच्या राज्याभिषेकावेळी अंबिकाबाई राजांना भेटतात. सकाळीच भेट झाल्यामुळे संभाजीराजांना आश्चर्य वाटत कारण अंबिकाबाईना सकाळी उठायची मुळीच सवय नव्हती. त्या संभाजींना कर्नाटक जिंजीकडच्या प्रांतातून सारा वसूल रायगडापर्यंत येतो का ? असा सवाल त्या राजांना करतात.

अंबिकाबाई संभाजींसमोर प्रश्नार्थक चेहऱ्याने उभ्या राहतात राजे त्यांना घाई करू नका. आम्हाला एकच मेहूणे नाही. यावर त्या म्हणतात, पण शंभूराजे, गणोजींना वतन हवे आहे, स्वतंत्र राजासारखे मोकाट वागायला आम्ही फक्त सेवक म्हणून सुभेदारी मागतोय आपली चाकरी करायला राजे, तुमच्या इतर मेहुण्यांशी हरजीराजांची तुलनाच करू नका. आपल्या दिवंगत मातोश्रींची, सईबाईची शपथ घेऊन सांगते, उदया राज्यावर तसाच प्रसंग उद्‌भवला तर आमचे घरघणी स्वतःची मुंडी देतील, परंतु आपल्या राजाशी दगाबाजी करणार नाहीत. (पृ.२३५,२३६)

संभाजी महाडिकांना कर्नाटकची सुभेदारी देतात. मात्र तेही स्वार्थी दगाबाज निघतात. अंबिकाबाईने दिलेले प्रामाणिकपणाचे वचन मोडले जाते. अशा अंबिकाबाई स्वार्थी, सत्तेची लालसा असणाऱ्या, आरामात जीवन कंठणाऱ्या होत्या.

१०) **उदेपुरी बेगम, जीनत उन्नीसा :** संभाजी कादंबरीत मराठा स्त्रियांप्रमाणे मुसलमान स्त्रियांचेही काही ठिकाणी वर्णन आहे. उदेपुरी बेगम ही औरंगजेबाची पत्नी होती. जीनत उन्नीसा ही त्याची लाडकी मुलगी होती. असदखान हा या दोघींना बादशहाला हवापालटासाठी बोहेर घेऊन जाण्याचा सल्ला देतो.

**उदेपुरी बेगम,**औरंगजेबाचे परेशान मनकशात रमवावे याचा विचार ती करत होती. तिला झकास विषय सापडतो. ती बादशहा ला विनंती करते. ‘‘मेरे आका, उभ्या जिंदगीमध्ये हया नाचीजने कधी जहाँपन्हाँकडे बिनती केली नाही. आता एकच अर्जी आहे. आमच्यासोबत एक दिवसासाठी वेरूळला यावंमम (४८८)

अहमदनगरच्या किल्ल्यात जनानी वापरासाठी खास बाग होती. जिनत उन्निसा तिथे मनमुराद आनंद लुटत होती. संभाजीराजांची मुलगी कमळजाचा शहजादीला लळा लागला होता. दोघी

एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी झाल्या होत्या. ती कमळजाला नियमाकडे दुर्लक्ष करून घोडसवारी शिकवते. उदेपुरी बेगम बादशहाला खूप घाबरत होती. ती एकदा बादशहाला आरशात बघितल का? विचारते बादशहा रागावतो. तेंव्हा ती, दया करा हजरत, मेरे आका माफ करो! अशी गलती दुबारा व्हायची नाही.(पृ.६४४) बादशहाच्या मर्जीप्रमाणे ती वागत होती.

शिवाय जीनत बादशहाला असाच सूचवते की, दुर्गा, राणू, कमळजाला यांच्याकडून संभाल. सुखाच्या चार गोष्टी समजवा. आपली रक्ताची माणस भेटली की, बडे-बडे पहाड पिघळतात, संभातर शायर आहे. औरंगजेब मोठया गर्वाने शहजादीकडे बघतो.

तोळामासा प्रकृतीने उदेपुरी बेगम रागावली होती. बादशहाच्या डोळयाला डोळा देत ती बोलते, बादशहा सलामत मनुष्याच्या जुलूम जबरदस्तीला काही मर्यादा आहेत की नाही. एकेकाळी दारासारख्या पाक आणि जिंदांदिल शहजादयाशी माझी शादी झाली होती. त्याचा कल करून त्याच्या तख्तासकट आपण मला छिनून घतलतं. तख्त बेचारं लकडीचं होतं. पण माझ्या जजबातची आपण कधी परवाह केली नाही. पण ते सारं गिळून पुरी जिंदगी शहेनशहांची मर्जी राखण्यासाठी मी जुलुमाची शेज सजवत राहिले. केली कधी तक्रार ? (पृ.७८४) यावर बादशहा बस इतनाही------------ अशी प्रतिक्रिया देतो. यामुळे बेगम अधिकच भडकते. आयुष्यात प्रथमच ती बादशहाशी अशा कडव्या भाषेत बोलत होती. ती न घाबरता म्हणते, 'राणू, दुर्गा हया फक्त संभाजीचा जनाना नव्हे. त्या शिवाजीच्या लेकी सुना आहेत. त्या शिवाजीने जिंदगीभर खूप दंगाफसाद आणि खून खराबाही केला. पण त्याने कोणा इस्लामी मॉबहनींच्या अंगाला स्पर्श केला नाही. याबद्दल आपण त्याची तारीफ केली होती. संभा बदफैली आहे. असं बडे शास्त्री पंडित म्हणतात. पण तशी तक्रार कोणा मुसलमानाने कधीच केली नाही. उलट इस्लामच्या मॉ बेहेनना संभाने बापाप्रमाणे इज्जत दिली. (७८५) या जनानी हल्ल्यामुळे पानशहा दबून जातो व तो शहाबुददीनला ताकीद देतो.'

अशी ही उदेपुरी बेगम अत्याचार सहन करणारी, स्वतःच्या नवऱ्याची हत्या करणाऱ्यासोबत संसार करणारी, त्याच्या धाकात ाहणारी, त्याने जे संगितल ते करणारी अशी सहनशील होती. मात्र

संभाजींच्या जनानखान्याच्या बाबतीत ती पानशहाशी बेडरपणे बोलते. त्याचप्रमाणे जिनतउन्निसा ही पातशहाची लाडकी लेक होती. ती हुशार, चाणाक्ष, शूर होती. ती पातशहाला सूचनाही करत होती. तिला राजकारणाचे ज्ञान होते. ती प्रेमळ स्वभावाची होती. कमळजावर तिचा फार जीव होता. पानशहा दोघींशी आपल्या मनातील दुःख बोलून दाखवत होता. आपलं मन मोकळ करत होता.

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीतील स्त्री-जीवन विविध प्रकारचे आहे. सर्वसामान्य स्त्री-जीवन असुरक्षित होते. मुस्लीमांच्या राज्यात स्त्रिया असुरक्षित होत्या. त्र्यंबकाव शिवाजींना म्हणतात, ''खुद्द युवराजांकडून अशी अगळीक घडणार असेल तर आम्ही जगायच कसं? तिकडं मोगलाईत रस्त्यावर दिसेल त्या देखण्या बाईला जननखान्यात खेचतात म्हणं.'' (पृ.११) यावरून मोगलाईत स्त्रिया सुरक्षित नव्हत्या. कोणीही स्त्रीवर अन्याय करू शकत होते.

शत्रूला आपल्या मनाप्रमाणे वागावण्यासाठी औरंगजेब तहव्वूरखानाला धमकी देतो. तुझ्या खुबसुरत बिवीला नंगी करून फौजी बाजारात तिची अब्रू लुटण्यासाठी तिच्यावर हशम सोडले जातील. या धमकीने तो पातशहाकडे शरणांगती पत्करतो. (३५१) स्त्रियांविषयी अजिबात आदर नव्हता. उलट शत्रूला नामोहरण करण्यासाठी वाममार्गाने तिचा छळ केल्या जात होता.

शहजादा अकबर आपल्या आजोबा म्हणजे शहाजहनविषयी सांगतो की ते स्त्री लंपट होते. त्यांनी आपल्या सरदारांच्या खुबसुरत औरती, एवढच कशाला त्या बुढ्ढयाने दरबारातल्या दासीही सोडल्या नाहीत . मुमुताजमहलच्या बहिणीला फर्जना बेगमलाही सोडल नाही. (पृ.३५४) यावरून राजा महाराजांना जी स्त्री आवडेल तिच्यावर ते अत्याचार करत होते.

औरंगजेबही याबाबतीत कमी नाही असं अकबर म्हणतो. कारण औरंगजेबाची लाडकी उदेपुरी बेगम ती खरी दाराचाचांची बेगम होती. दाराचाचाची हत्या केल्यानंतर महिन्या दीड महिन्यातच उदेपुरीशी शादी केली. दाराचाचाची आणखी एक बेगम होती. रानादिल. तिच्यासाठीही अब्बाजान पागल झाले होते. पण तिने डाळ शिजू दिली नाही. एक तुर्की दासी जक्शी ही रखेल म्हणून त्यांनी गुपचूप जनान्यात ठेवली होती. (पृ.३५५) अशी औरंगजेबाची वृत्ती होती.

जंजिऱ्यासमोरील राजपुरीत गावात सिद्धी सैनिक स्त्रियांवर अत्याचार करतात. लेकीबाळांची अब्रू लुटतात. अशा तक्रारी गावकरी संभाजी समोर मांडतात. (पृ.३८९) मोगलांच्या, मुसलमानांच्या राज्यात स्त्री असुरक्षित होती. मात्र मराठयांच्या शिवाजी, संभाजी राजांच्या काळात स्त्रियां सुरक्षित होत्या. स्त्रियांचा मान–सन्मान आदर केला जात. होता. मात्र राज्यातील काही व्यक्तींचे स्त्रियांविषयीचे विचार संकुचित होते. येसूबाई जेव्हा फडावर येऊन कारभार पहात होत्या हे अण्णाजी आणि त्यांचा भाऊ सोमाजीला आवडत नाही. सोमाजी म्हणतो, ''राजेशाही देव्हाऱ्यात बसून पूजा करायची सोडून त्या येसूबाई राणीसाहेब उठसूठ फडावर येऊन कशासाठी बसतात? स्वतः कागदपत्रं, कारभार, येणं जाणं कशाला उचापती करतात, कोणास ठाऊक.'' (२८६)

''संभाजी'' कादंबरीतील समाजजीवनातील स्त्री जीवन विविध प्रकाचे होते. समाजजीवनातील स्त्रियांचा स्वभाव विविध प्रकाचा होता. काही स्त्रिया स्वार्थी, काही त्यागी निःस्वार्थी, काही शूर अशा होत्या. गोदू ही शिवाजीराजांवरील संकट टाळण्यासाठी धाडसाने रायगडावर जाते व त्यांचे प्राण वाचवते. आपल्या संसाराची पर्वा न करता ती हे काम करते. हंसा ही एकतर्फी प्रेमात आत्मघात करून घेते. रखमाबाईंना आपल्या भाचा राजाराम राजा व्हावा अशी आशा होती. अंबिकाबाईंनाही आपल्या नवऱ्याला कर्नाटकची सुभेदारी मिळावी अशी आशा होती. राणूबाई मात्र स्वतःच्या संसाराचा त्याग करून दुर्गाबाई बरोबर शेवटपर्यंत राहतात. दुर्गबाईही स्वतःच्या सुखाचा विचार न करता स्वराज्यांसाठी आपल्या पतीसाठी शत्रूच्या कैदखान्यात आयुष्य काढण्यास तयार होतात. सोयराबाई सत्तेच्या हव्यसापायी कट कारस्थाने करतात आणि आपल्या माणसांना दुरावतात. पुतळाबाई हया सोज्वळ सात्विक होत्या. मराठयांच्या स्त्रियांप्रमाणेच उदेपुरी बेगम ही औरंगजेबाच्या धाकात होती. ती अबला होती. जिनतउन्निसा ही शहजादी हुशार, चतूर, राजकारण्याची जाण, बेडर होती. तानाशहाची बेगम सरोजमाबी मर्यादेत घुंगरात राहणारी होती. मात्र नवऱ्याचा छंदीफंदी स्वभाव तिला आवडत नव्हता. मादण्णाचा स्वार्थीपणा ती शहासमोर उघडा करते. म्हणजे तिला राजकारणाच ज्ञान होत. रूपकुवर ही नर्तकी होती. नाचगाणे हा तिचा व्यवसाय होता. ती तो टिकवत होती. कमळजा, ताराबाई हया वयाने

लहान होत्या. मात्र त्यांना समज मोठी होती. या कादंबरीतील महत्वची स्त्री म्हणजे येसूबाई त्या कर्तव्यतत्पर, सारासा विचार करणाऱ्या, कुशल कारभारी नात्यांना जपणारा अशा अनेक गुणांचा संचय असणाऱ्या होत्या. अशा विविध वृत्ती–प्रवृत्तींच्या स्त्रिया या कादंबरीतील समाजजीवनात पहायला मिळतात.

**८.३ प्रथा □परंपरा □रूढी– श्रद्धा अंधश्रद्धा : –**

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीतील समाजजीवनात १६ व्या शतकातील प्रथा□परंपरा□रूढी पहायला मिळतात.

वढू गावचे गोरखनाथ म्हणतात, "आपल्या रीतीरिवाजा प्रमाणं गावात चावडी अगर नदीजवळ कधी कोणा बेवारशी माणसाचं प्रेम आढळलं,तरी ते  सडलेल प्रेत उचलाव, त्याच्यावर अग्निसंस्कार करून मनुष्य देहाला मुक्ती दयावी,असं शास्त्रपुराणं सांगतात." (८२६) सर्व गावकरी शंभूराजांच्या शरीराचे तुकडे गोळा करतात. सरण रचतात. गोरखनाथबुवा बेलपत्रे, तुळशीपत्रे वाहतात. शंभूराजांच्या चितेला अग्नी देतात.

अशा प्रकारे शिवाजी राजांच्या काळात म्हणजे सोळाव्या शतकात बालविवाह,बहुपत्नीत्व,सती,हुंडा,पुनर्विवाह,घुंघट,अंतिमसंस्काराच्या, औक्षण,दानधर्म, गुलामाची नवस बोलण्याची, पानविडे देण्याची अशा प्रथा परंपरा पहायला मिळतात. समाज हया प्रथा काटेकोरपणे पाळतांना दिसतो.

**श्रध्दा – अंधश्रध्दा :**

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीत समाजजीवन सोळाव्या शतकातील आहे. त्या काळात समाजात काही श्रध्दा □अंधश्रध्दा होत्या.

शंभूराजे शृंगारपूरला असताना कलशाभिषेक करतात. हा का केला याच स्पष्टीकरण शंभूराजे बाळाजी आवजींना देतात, ''काय करणार बाळाजी काका? अहो, रपेट मारत असतानाच तगडा घोडा अचानक अडखळून मृत्यू पावतो कसा? आमच्या महालाच्या आगेमागे अनेकदा हळदीकुंकवात भिजवलेले ते लिंबू, सुया

टोचलेले बिब्बे, काळया मंतरलेल्या बाहुल्या अशा अशुभ वस्तूंचा नित्य सडा पडावा? खाजगीकडे, दरबारामध्ये, पागेत, कुठंकुठं शांती नाही. मेव्हणा गणोजी नाखूष, जगायची लाज वाटावी अशी दरबारी दृष्टांची चालवलेली आमची बदनामी, बदफैलीचे घाणेरडे आरोप, ऊठसूठ आम्हाला पाण्यात पाहणारे अष्टप्रधान आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जगासाठी डोंगरासारखा आधार वाटणारे पण आम्हांपासून रोज दुरावत जाणारे आमचे आबासाहेब ही सारी वखवख अुभवली आणि म्हटलं एकदाची शांती करून टाकावी." (८३) आपल्या आयुष्यातील संकट, कटकटी दूर होण्यासाठी शांतता मिळण्यासाठी शंभूराजे हा कलषाभिषेक करतात. मात्र शंभूराजांचे विरोधक संभाजीला लवकर राजा होण्यासाठी सत्ता मिळविण्यासाठी हा कलषाभिषेक केला असा विषारी प्रचार करतात.

शंभूराजे खूप प्रयत्न करूनही जंजिरा हाती लागत नाही तेव्हा राजे म्हणतात, "कोणत्या भुताटकीने झपाटलं आहे या जंजिऱ्यास तेच समजत नाही. अर्धा किल्ला पाण्यात ढासळला तरी ते सिद्दी शरण येत नाहीत. किल्लाही सोडत नाहीत." (४०८) तेथील रयतेलाही असे वाटत होते की, जंजिऱ्याचा किल्ला अजिंक्य आहे, त्यामुळे हबशी कधीच पराभूत होणार नाहीत. (४०९)

औरंगजेबाचे सौनिक प्रयत्न करूनही रामशेजचा किल्ला घेऊ शकत नाहीत. वजिर औरंगजेबाला सांगतो, "थोडी विचित्रच भुताटकी आहे म्हणे त्या किल्ल्यावर तेथे मराठयांकडे तोफा नाहीत,पण तरी किल्ल्यावरून तोफगोळे बरसतात आमच्या फौजेवर." (४४१)

औरंगजेबाचे सैनिक लांब त्या मोहिमेमुळे कंटाळलेले होते. पाच सात वर्षांपासून ते घरापासून बायकापोरांपासून दूर होते. फावल्या वेळात फौजी कवडी और कबरीचा खेळ खेळतात. छडीने धुळीत छोटी छोटी वर्तुळ काढतात. त्या वर्तुळांत कवडया फेकतात. एखादया शिपायाची कवडी ज्या वर्तुळात पडेल, त्याच नदीच्या काठावर त्याची कबर बांधली जाणार असा अंदाज शिपाई काढतात. एवढच नाही तर बादशहाची कबर कुठे बांधली जाणार याचाही अंदाज सैनिक बांधतात. (६४५)

'संभाजी ' ऐतिहासिक कादंबरीत सोळाव्या शतकातील समाजजीवनातील प्रथा □ परंपरा□श्रध्दा,अंधश्रध्दा पहायला मिळतात. त्या काळात राजा□महाराजांना मुजरा करण्याची प्रथा होती. बाल

विवाहाची, बहुपत्नीत्वाची, स्त्रियांच्या पुनर्विवाहाची, सतीची, बाळंतपणाला माहेरी जाण्याची, वारसदार नेमण्याची, अंतीमसंस्काराची धर्माप्रमाणे वेगवेगळी प्रथा, हुंडा देण्याची , मोहिमेवर जाताना व आल्यावर औक्षण करण्याची, गुलामाची प्रथा, मामेराची, दानधर्मा करण्याची, नजराने भेटवस्तू देण्याची प्रथा, मुहूर्त बघण्याची प्रथा, मुसलमान स्त्रियांत घुंघट घेण्याची प्रथा, देवाला नवस बोलण्याची प्रथा, पानविडे देण्याची प्रथा अशा विविध प्रथा परंपरा समाजजीवनात होत्या.

विविध प्रथा परंपरेप्रमाणे समाजात काही श्रध्दा, अंधश्रध्दा, समज विश्वास पहायला मिळतात. शिवाजीराजांची जिजाबाईच्या समाधीचा आशीर्वाद घेण्यावर श्रध्दा होती. मोहिमेला जाण्याआधी समाधीचे दर्शन ते घेत होते. शृंगारपूर हे शाक्तपंथीयांचे शक्तिपीठ होते. मंत्रतंत्राची विदया जानणारे 'शिवयोगी' यांच्यावर लोकांची तसेच शंभूराजांची व कलशांची ही श्रध्दा विश्वास होता. शिवाजीराजांही निश्चलगिरी गोसावींकडून आपला दुसरा तंत्राभिषेक करून घेतात. शंभूराजे आपल्या जीवनात शांती नांदावी म्हणून कलाभिषेक करतात. शंभूराजांचे विरोधक कवी कलशांना जादूटोणा करणारा मांत्रिक समाजात व त्यांच्या वाडयाबाहेर लिंब, बाहूल्या टाकतात. संभाजीराजे जेव्हा दिलेरखानाकडे जातात त्यावेळी त्यांचा लाडका घोडा मरतो. त्यांना हा अपशकुन वाटतो. पूर्वी गड किल्ले बांधताना नरबळी देण्याची पध्दत होती. शिवाजी राजे रणमस्तवाल खानाच्या तावडीतून जगदंबेच्या कृपेने वाचतात. ते म्हणतात मानवाच्या प्रयत्नांना देवाची साथ हवीच हवी. फाल्गुनी अमावस्येला सूर्यग्रहण होत त्यावेळी सूर्यग्रहण पाहणे म्हणजे अशुभ मानले जात होते. अकबर ज्योतिष्यांकडून दौड करायचा मुहूर्त विचारतो, महाराष्ट्रातील जनतेची शिवाजी संभाजी राजांवर श्रध्दा होती म्हणून त्यांचे टाक देवात ठेवून त्याची पूजा ते करत होते. जंजिरा किल्ला अद्‌भुत होता. त्या किल्ल्याला कसल्याशा भुताटकीने झपाटले होते अस लोकांना शिवाजीराजांना, शंभूराजांनाही वाटत होत. औरंगजेबाच्या सैनिकांनी खूप प्रयत्न करूनही राजशेज किल्ला घेता येत नाही. त्यांना या किल्ल्यावर भुताटकी आहे असे वाटते. हा किल्ला प्राप्त करण्यासाठी मांत्रिकाला बोलावले जाते, पण त्याचाही इलाज चालत नाही. पंचगंगेच्या नावेमध्ये पीरबाबा बनलेले संभाजी व्हाइसरॉयला तांब्याची अंगठी देतात. सगळयांना ही भाग्याची गोष्ट वाटते. यामुळे मोठमोठी संकटे टळतील असेही त्यांना वाटते. वेरूळच्या लेण्यांमधील निळसर पक्षी पुढच्या जन्मात कोणता जन्म मिळणार हे सांगतो

अशी उदेपुरेची श्रध्दा होती. राज्यात फार मोठा दुष्काळ पडतो म्हणून लोक अनुष्ठानास बसतात. महादेवाला मंदिरात कोंडतात, हनुमानाला साकडे घालतात. औरंगजेबाचे सैनिक कवडी आणि कबरीचा खेळ खेळून आपली कबर कुठे बांधली जाणार हे ठरवतात. शंभूराजांना जीवनात फार संघर्ष करावा लागतो. पण त्यांना अस वाटत आपल नशीब खोट म्हणून हातातोंडाशी आलेला घास दैव हिरावून नेत. सहयाद्रीच्या डोंगर पहाडांना प्राण्यांचे आकार येतात कारण तिथे एक वरात गडप झालेली होती. येसूबाईला संगमेश्वराचे वातावरण अशुभ वाटते. त्या शंभूराजांना येथून लवकर बाहेर पडा अस सांगतात. शंभूराजे पकडले जातात हे आपले भाग्य आहे अस औरंगजेबाला वाटत. बहादूर गडातील चाँदबिबीच्या महालात खोदकाम केले तर भुंगे निघतात व चावतात असा समज होता. बहादूर गडाच्या परिसरातील लोकांना खंडोबाच्या माळावर भुते, वेताळ, हडळी आहेत अस लोकांना वाटत. औरंगजेबाला बहादूरगडची जागा अशुभ वाटते म्हणून ती तो तातडीने सोडतो. शिवाजीराजे शंभूराजांच्या स्वप्नात येऊन म्हणतात, दैवाने, तकदीराने आम्हाला भरभरून दिल मात्र त्यातल्या चारदोन मुठी तुम्हाला दिल्या असल्या तर बर झाल असत.

## ८.४ धार्मिक स्थिती :

''संभाजी'' कादंबरीतील समाजजीवनात धार्मिकता बघायला मिळते. धर्माचे पालन समाज करत होता. आपआपल्या धर्मावर, देवदेवतांवर समाजाची श्रध्दा होती. तसेच श्रध्दे सोबत अंधश्रध्दाही समाजात होती.

संभाजीराजे रोज पूजाअर्चा करूनच कामकाजाला सुरवात करत होते. आपली सत्यात सिध्द करण्यासाठी गोदू आई भवानीची शपथ घेते. (१४) हंसाच्या प्रकरणात संभाजीला सोयराबाई साक्षीसाठी बोलावतात तेव्हा संभाजीराजे आपल्या सभोवतालच्या पवित्र, धार्मिक वातावरणाविषयी बोलतात,''मातोश्री,आमच्या हर महालाच्या आजूबाजूला इतकी मंदिर आहेत, तुळशी वृंदावन आहेत, इतकेच नव्हे तर प्रत्येक दरवाजाच्या चौकटीवर श्रीगणेशाच्या पाषाणमूर्ती हे सारं मांगल्यानं भारलेलं वातावरण, त्याचं पावित्र्य आम्ही कसं विसरू.'' (४४)

औरंगजेब फार धार्मिक वृत्तीचा होता, तो अल्लाची इस्लामची सेवाचाकरी करतो. उठसूट नमाज पढतो. मुल्ला□मौलवींच्या सभांमध्ये जातो. कुराणाच्या प्रति लिहून काढतो. टोप्या शिवून विकतो. या कष्टातून उभारलेली रक्कम मशिदींना दान करतो. अल्लाची कुठली ना कुठली सेवा करण्यात तो वेळ घालवतो. (३५५)

"संभाजी" कादंबरीतील समाजजीवनातील धार्मिक स्थिती होती. हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन अशा धर्माचा आणि त्यांच्या देवतांचा उल्लेख या कादंबरीत आहे.

आवजी हरींचे दैवत जेजूरीचा खंडोबा होता. भैरोबा, जगदीश्वर, मुंब्रादेवी, बिरुबा, भवानी अशा देव देवतांवर समाजातील लोकांची श्रध्दा होती. मुसलमानांचा अल्ला आणि ख्रिश्चनांचा येशू या आपल्या देवतांवर विश्वास होता.

संभाजी राजे, येसूबाई दैनंदिन स्नान पूजा करत होते. संभाजी रोज देवपूजा झाल्यावरच कामकाजाला सुरवात करत होते. औरंगजेबही धार्मिक वृत्तीचा होता. तो दिवसातून बऱ्याच वेळा नमाज पढत होता. हातात जपमाळ घेऊन तो सतत कुराणातील आयता म्हणत होता. धार्मिक काम करत होता. पोर्तूगिजांचा येशू वर विश्वास होता. मेणबत्त्या लावून ते चर्चमध्ये प्रार्थना करत होते.

शिवाजीराजे धार्मिक वृर्तीचे होते. त्यामुळे रायगडावरील महाल, वातावरण मांगल्याच होत. जिजाबाईंनी शिवाजी संभाजी आग्र्याहून सुखरूप यावेत म्हणून महादेवाला अभिषेक करतात. समाजात शाक्तपंथी म्हणजे जादू टोणा करणारे म्हणून त्यांचा दुःस्वासलोक करत होता. त्यात कवी कलशांचाही द्वेष लोक करत होते. मात्र ही शक्तीची पूजा होती. कर्णेश्वर, जगदीश्वर, महादेव, मारुती, बाणोबा, महालक्ष्मी, भवानी माता, सप्तश्रृंगी, श्रीविष्णू, शांतादूर्गा, महालक्ष्मी मंगेशी अशा देवतांची मंदिरे होती, तर निश्चलगिरी महाराजांची, जिजाबाई यांच्या समाध्या, पिरबाबाची मशिद, याकूबबाबा अश मुसलमान देवतांना ही संभाजी राजे पूजत होते.

हिंदू राजांचे म्हणजे शिवजी, संभाजी राजांचे धार्मिक धोरण सर्व समावेशक, दुसऱ्यांच्या धर्माचा आदर करणारे होते. धर्मातील मांगल्याविषयी संभाजी राजांना ओढ होती. ते राजा झाल्यावर अनेक निर्णय त्यांनी घेतले. धर्मक्षेत्रास वर्षासने,निधी देणे, धार्मिक कार्याला संरक्षण देणे, द्रव्य देणे, अशी कामे शंभूराजांनी केली. देहू ते पंढरपूर तुकोबांची पालखी शंभूराजांच्याच काळात सुरू झाली. धार्मिक निर्णय व अंमबजावणी त्वरित करत

होते. बळजबरीने झालेल्या धर्मांतरासाठी परत स्वधर्मात येण्यासाठी धर्मात तरतूद होती. मात्र हिंदू धर्मातील ब्राम्हणांच्या दक्षिणा इतक्या मोठया होत्या की, त्या धर्मांतर झालेल्या व्यक्तीला त्या देण अशक्य होते. धर्मांतर करण्याचे अवडंबर झाले होते म्हणून लोक कवी कलशांकडे जाऊन हिंदू धर्मात आम्हाला परत घ्या अशी विनंती करत होते.

(पोर्तुगीज) गोव्यातील पोर्तुगीज हिंदू धर्मावर अन्याय करत होते. हिंदूंच्या देवळात देव ठेवले नाही, पाण्यात पाव टाकून पाणी बाटवतात, देवांच्या मूर्ती पाण्यात फेकल्या, अशाप्रकारचे गैरकृत्य पोर्तुगीज करतात. बळजबरीने हिंदूंना ख्रिश्चन होण्यास भाग पाडतात. बळजबरीने धर्मांतर करतात. यावर संभाजीराजे करारात तहात धर्माचरण स्वमतानुसार करता यावे हे कलम टाकतात. गोव्यातील हिंदू जनता पोर्तुगीजांचे चर्च जाळून त्यांच्यावर सूड उक्षवण्यासाठी गोळा होतात. भाले, काठया घेऊन तयार होतात. तितक्यात शंभूराजे त्यांच्यावर कडाडतात, ''खामोश! अजिबात हुल्लड माजवू नका. आज गोव्यावर शिवाजीराजांच्या पुत्राचं आक्रमण चालून आल आहे. औरंगजेबाच्या शहजादयाचं नव्हे, याच किमान भान ठेवा. तुमच्या काळजातली वेदना आम्ही समजू शकतो. हिंदूंचा एक राजा म्हणून खुशाल सोयी सवलती आम्हांकडे मागा. त्या आम्ही पुरवूच. परंतु दुसऱ्याच्या द्वेषाच्या पायावर आपली मंदिरे टिकणार नाहीत, हे ध्यानात ठेवा.'' (५२५, ५२६) शंभूराजांनी लगेच हुकूम दिले की, गोव्यातील उद्‌ध्वस्त झालेल्या हिंदू मंदिरांसाठी खजिन्यातून मदत देण्याचे आपल्या एतद्‌देशीय प्रतिनिधींना धर्म रक्षणाच्या दृष्टीने काही योजना सांगितल्या, सूचनाही दिल्या असे शंभूराजांचे धार्मिक धोरण उदारतेचे होते.

औरंगजेब कट्टर मुसलमान होता. इतर धर्माचा त्याला अजिबात आदर नव्हता. त्याच्यासमोर कोणीही दुसऱ्या धर्माती देवदेवतांच नावही काढू शकत नव्हते. त्याने वेरुळच्या लेण्यांची नासधूस करण्याचा हुकूम दिला होता. काफरांचा डोंगर विद्रूप करा. न तुटेना तर जाळून बेचिराख करा असा आदेश तो देतो. (४९०) औरंगजेबाची व त्याच्या सरदारांची धार्मिकता पराकोटीची होती. दुसऱ्या धर्माची देवालये, देवस्थाने उद्‌ध्वस्त करणे, जबरदस्तीनी मुसलमान बनविणे अशी आंधळी धार्मिकता होती. अशीच आंधळी धार्मिकता पोर्तुगीजांचीही होती. मात्र संभाजीराजांनी सर्वच धर्माचा आदर राखला होता. कोणत्याही धर्माला त्रास होईल

असा व्यवहार मराठयांच्या राज्यात झाला नाही. सूड म्हणूनही संभाजीराजे कधीही दुसऱ्या धर्माचा द्वेष करत नाहीत. बळजबरीने मुसलमान झालेल्या हिंदूंना परत हिंदू धर्मात घेऊन उदारता दाखवतात.

अशी धर्माची स्थिती 'संभाजी' या कादंबरीत होती. समाजजीवनात पूजा अर्चा, धार्मिक विधींना महत्व होते. आपआपल्या देव देवतांवर समाजाचा विश्वास होता. शिवाजी शंभू राजे यांची हिंदू देवतांप्रमाणे पिरबाबांवर ही श्रध्दा होती. पातशहा मात्र कट्टर मुसलमान होता. तो अल्लाशिवाय कोणत्याच देवाला मानत नव्हता. हिंदू राजांचे धार्मिक धोरण उदार होते, आदराचे होते, तर पातशहाचे इतर धर्मियांबाबतचे धोरण विध्वंसाचे तुच्छतेचे होते. हिंदू आपल्या घरा दारांवर देव देवतांना स्थान देतात. मनोभावे त्यांची पूजा करतात. तर मुसलमानही न चुकता नमाज पढतात.

## ८.५ 'राज्यकारभार' / राज्यव्यवस्था

**८.५.१ हिंदू राज्यकारभार :** 'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीतील समाजजीवनात

शिवाजी □संभाजी राजांच्या काळातील राज्यव्यवस्था पहायला मिळते. शिवाजी राजांच्या काळातील राज्यव्यवस्थाच संभाजी राजेही आपल्या कारकीर्दीत कायम ठेवतात. त्या काळात राज्यकारभार सुव्यवस्थित राहण्यासाठी अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते. शिवाय यांच्या मदतीसाठी, राज्यातील विविध प्रदेशानुसार वेगवेगळे अधिकारी नेमून त्यांच्याद्वारे त्या प्रदेशाचा कारभार पाहण्यात येत होता. या सर्वांवर छत्रपती लक्ष ठेवत होते. पेशवे, सुरवनीस, सेनापती, न्यायाधीश, चिटणीस, डबीर, दिवाण, पंडित, अंमलदार, सचिव,सुभेदार, सेनानी, उपसेनानी, सरलष्कर, सरकारकून, नौदल अधिकारी, भंडारी व दर्यासारंग, दानाध्यक्ष,वाकनवीस, मुलकी अधिकारी, छंदोगामात्य, पाटील, देशपांडे इत्यादी अनेक पदे निर्माण करून त्यावर अधिकारी नेमून त्या त्या विभागाचा कारभार पाहिला जात होता. प्रत्येक किल्ल्यावरही पदाधिकारी नेमून त्यांच्या मार्फत कारभार

पाहिला जात होता. गडकरी, नाईक, सबनीस, कारखानीस अशा गडावरील स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत किल्ल्यांचा कडक बंदोबस्त ठेवला जात होता.

संभाजीराजांवर शिवाजीराजांनी मुलकी कारभार सोपवलेला होता. तो कारभार शंभूराजे प्रामाणिकपणे पार पाडत होते. शंभूराजांना कामकाजात प्रामाणिकपणा हवा होता. ते कठोरपणे, बारकाईने काम पहात होते. त्यांना अण्णाजीपंतांचा भ्रष्टाचार सहन होत नव्हता. ते सर्वांसमोर शिवाजीराजांना म्हणतात. '' आबासाहेब, आपणच आम्हां सर्वांना नेहमी सांगता, आमच्या कारभाऱ्यांनी आणि दरकदारांनी दुसऱ्या राजांच्या दिवाणांचे वा वकिलांचे कधीच मिंधं राहू नये. नाही तर त्याचा परिणाम आपल्या राज्यांतर्गत करारमदारावर होतो.राज्य नुकसान पावतं.'' (२४) शंभूराजे सोमाजीबाबाबंना स्पष्टपणे सांगतात, ''स्वराज्याचे छत्रपती भेटीदाखल येतील त्या सर्व वस्तू, नजराणे आपल्या सरकारी रत्नशाळेत जमा करतात. कारण इथला कण नि कण हा हिंदवी स्वराज्याच्या मालकीचा आहे. राजाच्या मालकीचा नव्हे, अशी त्यांची धारणा आहे. आपण कारभारी जे वेगळे नजराणे हट्टाने मागून घेता, ते कुठे जमा करता ते सांगा'' (२३) असा शंभूराजे काटेकोरपणे कारभार लहान वयातच करत होते.

शंभूराजांचा राज्याभिषेक होतो. त्यावेळी ते राज्यातील अनेक निर्णय घेतात. अष्टप्रधान मंडळातील अधिकाऱ्यांची नेमणूक करतात. एकनिष्ठा आणि सेवाभावी वृत्तीचे बाळाजीपंतांना चिटणीस पदाची मानवस्त्रे देतात. मोरोपंतांच्या चिरंजीवांना निळोपंतांना पेशवे पदाची वस्त्रे देतात. शिवाय त्यांच्याकडे कल्याण व भिवंडीच्या सुभ्याचीही जबाबदारी देतात. सेनापती पदाचा भार यापुढेही हंबीर मामांकडेच दिला जातो. प्रल्हाद निराजींना न्यायाधीशाची वस्त्रे मिळतात. डबीराची वस्त्रे जनार्दनपंतांना, तर दानाध्यक्षाची वस्त्रे मोरेश्वर पंडितरावांना दिली जातात, सुरनवीसाची वस्त्रे सोनदेव, तर वाकेनवीसाची वस्त्रे दत्ताजीपंतांना दिली जातात. अण्णाजी दत्तोला मोठया मनाने माफ करून शंभूराजे त्यांना स्वराज्याचे मुजुमदार म्हणून कारभार सोपवतात. आपल्या सोयराबाई आणि धाराऊ दोन्ही मातांचा सन्मान करतात. आपल्या सेवकाचा रायाप्पाचा सत्कार करतात. तिघा दर्यावर्दीचा मानवस्त्रे देऊन सन्मान करतात. आपल्या तिन्ही भगिनी आणि मेहुण्यांचा उंची वस्त्रे अलंकार देऊन गौरव करतात. शत्रूचा मुकाबला करण्यासाठी राजांना अष्ठप्रधानांसह बऱ्याचदा मोहिमेवर

जाव लागत. म्हणूनच मुलकी कारभाराची सूत्र येसूबाईंच्या हातात देतात. सुवर्णमुद्रा आणि त्यावरील ' स्त्री सखी राशी जयती' हा शब्दलेख हीच महाराणींची निशाणी बनून राहील. कवी कलशांना 'छंदोगामात्य' हा किताब देऊन त्यांचा अष्टप्रधानांमध्येही समावेश करतात. अशा प्रकारे शंभूराजे आपल्या राज्यातील खातेवाटप करतात. शूरवीरांचा सन्मान, गौरव करुन त्यांना प्रोत्साहन देतात. (पृ. २५४, २५५)

शिवाजीराजांप्रमाणे संभाजीराजांचीही राज्यकारभार करण्याची नैतिक पध्दत होती. बुऱ्हाणपुरच्या लुटीच्या वेळेला राजे सर्व सैनिकांना, '' कोणाही स्त्रीला पोरासोरांना हात लावू नका. एकूण मनुष्यहत्या टाळा. '' असा आदेश देतात. (२६६)

युध्दाला सुरवात झाल्यावर रसदेची मागणी वाढते. राजधानीकडे मागणीपत्र येतात. नाशिकपासून दक्षिणेत जिंजी □रामेश्वरपर्यंत फौजेला रसद पुरवावी लागते तेव्हा पहिले इकडे लक्ष दयावे अस येसूबाई सांगतात. त्यावेळी शंभूराजे लागलीच रसदेचा आढावा घेतात. विशेषतः कर्जतकडे कोथळागड, शहापूर जवळचा माहुलीचा बलाढय किल्ला, नाशकाकडे अहिवंतगड आणि साल्हेर आणि मुल्हेरचे किल्ले, अष्टागारातील सागरगड, तसेच सिंधुदुर्ग, राजापूर, जैतापूर येथे किती रसद आणि दारूगोळा आहे. याचा धांडोळा घेतला गेला. जिथे कमी पडत होता, तिकडे तातडीने रसद रवाना करायचे हुकूम झाले. येसूबाई पुण्याकडे दुष्काळ पडला म्हणून सरकारातून धान्याच्या गोणी आणि कोकणातून पिंजराच्या गाडया तिकडे रवाना करतात. दुष्काळाची समस्या राज्यापुढे होती. याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना मुलकी आणि लष्करी अंमलदारांना दिल्या जातात. महा आक्रमणाला कसे तोंड दयायचे याचा खल शंभूराजे सर्वांसोबत करतात. मसलतीत प्रत्येक बारीक सारीक मुदयावर सखोल चर्चा होते. (४२१, ४२२) दीर्घकाळ चाललेल्या मसलतीची पुन्हा एकदा उजळणी केली जाते. जमेल त्या सर्व आघाडयावर आक्रमण, न जमेल तिथे युक्तीच्या वाटेने तात्पुरती माघार हे सूत्र ठरवल्या जात. औरंगजेबाला युक्तीने बगल देण्याचे ठरते. गनीम थांबला तर चकवा देऊ. सहयाद्रीची ढाल करून लढू अशी युध्दनीती ठरवली जाते. (४२४)

शंभूराजानंतर येसूबाई धीराने राज्यकारभार सांभाळत होत्या. रोजचा राज्यकारभार, पत्रव्यवहार, देणीघेणी, किल्ल्या किल्ल्यांवरच्या गडकऱ्यांना व सरदारांना धीर देणे. जिथे शिबंदी कमी पडेल तिकडे ती वेळेत पाठवणे आणि रायगडावरील झुल्फिकाराचे आक्रमण थोपविणे ही सारी कामे त्यांना पहावी लागत होती. रात्रीचा दिवस करून त्या आल्या प्रसंगाला निर्धाराने तोंड देत होत्या. (८०३)

अशाप्रकारे मराठयांचा राज्यकारभार सुव्यवस्थित, नियोजनबद्‌ध होता. मराठयांचा प्रदेश  २४ मावळ आणि ३६ नेरांचा होता. शिवाय दक्षिणेकडील कर्नाटक □जिंजीचा प्रदेश मराठी राज्याच्या अधिपत्याखाली होता. एवढया मोठया प्रदेशाचा राज्य कारभार पाहण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केलेली होती. शिवाय किल्ल्यांवर वेगळी शासनयंत्रणा स्थापन केलेली होती. याशिवाय प्रांतानुसार, प्रदेशानुसार सुभेदार, पाटील, देशपांडे अशा पदाधिकाऱ्यांची नेमणूक केलेली होती. राज्याचा सर्व कारभार अष्टप्रधान मंडळाच्या सल्ल्याने संमतीने केला जात होता. वेगवेगळया खात्यांचे काम बघण्यासाठी पदाधिकारी नेमले होते. जसे सैन्याचा कारभार सेनापती, न्यायदान□न्यायाधीश असे संभाजीराजे जेव्हा मुलकी कारभार बघत होते, तेव्हा ते शिस्तीने, काटेकोरपणे बघत होते. जेव्हा संभाजी छत्रपती होतात तेव्हा ते शिवाजीराजांनी घातलेली राज्यकारभाराची घडी तशीच ठेवतात. दुष्काळामुळे शेतकऱ्यांना सारा माफी देतात.ओढयांना बांध घालण्याच्या नवीन योजनेला प्रोत्साहन देतात, बारमाही दोन हजारांचे अश्वदळ बांधतात. त्यांच्याकडची कर्नाटककडील जहागिरी व्यवस्थितपणे सांभाळतात. राज्यातील अण्णाजींसारखे पदाधिकारी गैरमार्गाने धन जमा करतात. हे शंभूराजांना सहन होत नाही. ते उघड त्यांना विरोध करतात. त्यामुळे ते शंभूराजांविरोधात कट करतात. जेव्हा शंभू राजे होतात तेव्हा या सर्वांना मोठया मनाने क्षमा करून त्यांना पुन्हा राज्यकारभारात घेतात. भविष्यातील औरंगजेबाच्या आक्रमणाची त्यांना कल्पना होती. त्यासाठी ते आधीपासूनच मोर्चेबांधणी करतात. औरंगजेबाच्या शक्तीची त्यांना कल्पना होती. त्यासाठी स्वराज्यांत सुरक्षिततेचे सर्व बंदोबस्त करतात. तडफेने सर्व कारभार सांभाळतात. अनंत कामे उरकतात. राज्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, गरीबांचे दुःख समजून घेऊन त्यांना मदत करतात. दुरदर्शी विचाराने कारभार करतात. धार्मिक कार्यालाही मदत करतात. शूरवीरांना बक्षिस, भेटवस्तू, नजराने देऊन प्रोत्साहन देतात. भ्रष्टाचाऱ्यांना शासन करतात. सागरी किनाऱ्यावरील व्यवस्थाही चोख ठेवतात.

रसद, दारूगाळयाची चोख व्यवस्था करतात. राज्यात पडलेल्या दुष्काळाचा धीराने मुकाबला करतात. युध्दनीती ठरवतात. जमेल तिथे आक्रमण आणि न जमेल तिथे माघार. औरंगजेबाला युक्तीने बगल देण्याचे ठरवले जाते. राज्यकारभार नैतिकतेने करतात. दुसऱ्या धर्माचा आदर करणारे राजे शंभू होते. इंग्रजांशी करार करतात त्यावेळी गुलाम प्रथेला बंदीचे कलम आवर्जून घालतात. राज्यातील अनेक जण वतनासाठी औरंगजेबाला जाऊन मिळत होती. पण शिवाजीराजांच्या धोरणाप्रमाणे ते कोणालाही वतन देत नाहीत. स्वराज्य एकसंघ ठेवतात. शंभूराजांच्या कैदेनंतर येसूबाई व इतर अधिकारी राज्य कारभार पाहतात. शिवाजी संभाजींच्या नैतिकतेविषयी शत्रूच्या बेगमला उदेपुरी बेगमलाही खात्री होती.

सोळाव्या शतकात राजेशाही पद्धतीने मराठी राज्याचा कारभार चालत होता. राजा या नात्याने शंभूराजांना सर्व राज्याची काळजी घ्यावी लागत होती. हिंदू राजा आपल्या प्रजेची लेकराप्रमाणे काळजी घेत होता. एक आदर्श राज्यव्यवस्था त्या काळात होती. त्यामुळेच एवढया मोठया राज्याचा कारभार सुरळीतपणे चालत होता. विविध पदाधिकारी आप आपली कामे चोखपणे पार पाडत होते. ‘ राज्यव्यवहार कोश ’ या ग्रंथात राज्यकारभाराचे नियम होते. त्याप्रमाणे कारभार चालत होता. शंभूराजे प्रजाहितदक्ष होते. पराक्रमी शूरवीर, बुद्धिमान होते. त्यांनी योग्यप्रकारे राज्यभार चालवला होता.

### ८.५.२ मुसलमानी राज्यकारभार

‘संभाजी ’ या ऐतिहासिक कादंबरीमध्ये दोन प्रकारचे राज्यकारभार पहायला मिळतात. एक हिंदूचा व दुसरा मुसलमानांचा म्हणजे औरंगजेबाचा. प्रत्येक राजाची राज्य करण्याची वेगळी पध्दत असते. राज्यकारभार करण्यासाठी त्याची स्वतःची स्वतंत्र व्यवस्था होती. औरंगजेब हा फार मोठा बलाढय राजा होता. त्याचा प्रदेश, दौलत, सैन्य सर्वकाही अफाट होत. तो एक दमदार राज्यकर्ता होता. त्याची राज्य करण्याची वेगळी पध्दत होती. त्याच्या सैन्यात कडक शिस्त होती. त्याचे २२ विशाल प्रांत होते.

औरंगजेब पातशहा दक्षिणेचा सुभेदार असलेल्या दिलेरखानाला दरडावतो. ‘‘उठसूठ संभाजीचा जुलूस काढू नका. त्याचा फायदा घ्या. आपल्या  लष्करात नेहमीच त्याला ढालीसारखा ठेवा. मराठ्ठयांच्या मुलखावर छापे घाला. गनिमांच जास्तीत जास्त नुकसान करा. ’’ (१३२)

औरंगजेब मुसलमान नसणाऱ्या सर्व जातीच्या लोकांवर जिझिया नावाचा अमानुष कर बसवतो. (१३८) औरंगजेब राज्यातील लोकांमध्ये जातिभेद करतो.

दिलेरखान हा औरंगजेबाचा दक्षिणेतील सुभेदार होता. तो सभ्यतेचा बुरखा परिधान करत असला तरी तो आतून हैवानच होता. त्याने अन्यायाची परिसीमा गाठली होती. गावे तर लुटलीच,पण स्त्रीपुरुषांना उघडे करून चौकाचौकांत चाबकाने फटकारले होते. दिलेरच्या दुष्ट सैनिकांनी हिंदू मुसलमान हया दोन्ही धर्मातल्या लेकीबाळींची काही पर्वा केली नाही. दिवसाढवळया अब्रू घेतली. बलात्कार करून अनेक स्त्रियांना ठार मारले. त्यांची प्रेते झाडांना टांगली. (१४९) अशा प्रकारची अनैतिकता, क्रूरता औरंगजेबाचे सैनिक करत होते.

औरंगजेब १६८१ ला पाच लाख फौज लाखभर सेवक दक्षिणेकडे आक्रमणासाठी येतात. पातशहा ६३ वर्षांचा होता. ३०□३५ वर्षे  राज्यकारभार करत होता. त्याची हुकूमत काबूल, बंगाल, आसाम, बुऱ्हाणपूर, खानदेश एवढया मोठया प्रदेशावर हुकूमत होती. कोणाचीही डोक वर काढायची हिंमत नव्हती. औरंगजेब दुनियेतल्या बडया पातशहा पैकी एक होता. (३३२ , ३३३) मोगलांनी राजपुतान्यातील शेकडो राजपूत राजांना आणि सरदारांना आपले मांडलिक बनवून कायमचे आपल्या पायाखाली दाबून ठेवले होते. जसवंतसिंगाच्या वंशजांविरूध्द औरंगजेब साम,दाम, दंड,भेद या सर्व नीती वापरून विजयी होतो. (३३४) औरंगजेबाच्या पाठीशी सुमारे दोनशे वर्षांची त्याच्या मोगली बापजादयांची पुण्याई होती. प्रचंड खजिना होता. अनेक शहरातून आणि प्रांतातून गोरगरिबांच्या नरडीवर पाय ठेवून ही संपत्ती गोळा केली होती. आशियातील आधुनिक शस्त्रास्त्रांचे कारखाने, बारूदखाने त्यांच्याकडे होते. औरंगजेबाचा प्रांत मराठयांच्या दुप्पट अगर तिप्पट होता. त्याचे असे बावीस प्रांत होते. (३३८, ३३९)

औरंगजेबाला देशाच,धर्माच कशाचही सोयरसुतक नव्हत. त्याने हिंदू रयतेवर जिझीया नावाचा अन्यायी कर बसवला होता. त्याने सामान्य रयतेला तर जिण नकोनकोस करून सोडल होत. तो पापी आणि धर्मवेडा होता. (३४७)

दिल्लीत राहून जगातील एक बलाढय दौलत सांभाळणारा औरंगजेब नेहमीच जागसूद रहायचा रोज रात्री आपल्या खास हरकाऱ्यांकडून जासुदांकडून बातमी घेतल्याशिवाय तो बिछायतीवर पडत नव्हता. गेल्या पंधरावीस वर्षात अनेक हेरांकडून, वाकेनविसांकडून आणि मराठा फितुरांकडून त्याने बातम्या गोळा केल्या होत्या. त्याच्या मदतीने हिंदवी स्वराज्याचा एक नकाशा बनवला होता. स्वराज्यातील सर्व छोटयामोठया नदया, गवंड, किल्ले पुरातन देवळे, घाटमाथे त्या नकाशात दर्शवले होते. त्याचे सेनानी नाव घ्यायचे आणि पतशहा नेमक्या स्थळावर बोट ठेवायचा. असा पातशहा योजनाबद्ध,सर्व तयारीने दक्षिणेत आला होता. तो चांगला लढवय्या होता. त्या प्रदेशात जायचे त्या प्रदेशाची खडानखडा माहिती त्याने करून घेतली होती. (३८७)

औरंगजेबाचा राज्यकारभार फार मोठा होता. त्याच्याकडे मोठा प्रदेश होता. औरंगजेब हा कडक शिस्तीचा होता. त्याची वृत्ती क्रूर होती. म्हणून त्याला सर्वजण भित होते. औरंगजेबाकडे अगणित संपत्ती होती. मराठयांप्रमाणेच राज्यकारभार करण्यासाठी विविध पदाधिकारी नेमून त्यांच्यामार्फत त्या त्या प्रदेशाचा कारभार पाहिला जात होता.

औरंगजेब शत्रूच होईल त्या प्रकारे नुकसान करत होता. मुसलमान नसणाऱ्यांवर अत्याचारी जिझिया कर लादतो. त्याचे सरदार, सुभेदारही क्रूर प्रवृत्तीचेच होते. अनैतिकता, क्रूरता ही त्यांच्या अंगवळीणीच पडलेली होती. अफजलखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा हिंदूंची मंदिरे, देव देवता उध्वस्त करत येतो. औरंगजेबानेही अनेक मंदिरे उध्वस्त केली होती. औरंगजेब विजयी होण्यासाठी साम, दाम,दंड, भेद,अनैतिकता या सर्व गोष्टींचा वापर करतो. औरंगजेबाने सत्ता संपत्ती गोरगरिबांच्या नरडीवर पाय ठेवून अत्याचाराने मिळवली. त्याने सत्ता आपल्या सख्ख्या भावांचा खून करून मिळवलेली होती. आई वडलांना कैदेत टाकतो. तो प्रजेला पाळीव कुत्र्याप्रमाणे मानतो. प्रजेच्या मानेवर हथियार ठेवून तो राज्य करतो. त्यांच्यावर प्रेम तो करत नाही. फक्त सत्ता गाजवतो. औरंगजेब बलाढय दौलत सांभाळणारा यशस्वी राज्यकर्ता होता. तो नेहमी जागसूद होता. ज्या

राज्यावर आक्रमण करायचो त्याआधी त्या भागाची खडानखडा माहिती करून घ्यायचा. शंभूराजांशी कसे लढायचे याची योजना बनवतो. औरंगजेब फितुर मराठा सरदारांना मन्सबी, खिलतीची वस्त्रे देतो. तो सरकाझीचा हुकूमही मानत नाही. त्याने दिलेला न्याय न मानता आपल्या मनाप्रमाणे न्याय करणाऱ्या काझी हैदरला सरकाझी बनवतो. प्लेगच्या साथीमुळे तो गांगरून जातो. मात्र मोहिमेवरचे लक्ष अजिबात कमी होऊ देत नाही. पातशहा बंदीवासातील राजाशी कसा व्यवहार करावा हे पण त्याला माहित नव्हत. राजाला शोभणारे वर्तन तो करत नव्हता. औरंगजेब दक्ष,जागरूक, यशस्वी राज्यकर्ता होता. मात्र त्याची जिंदगी क्रौर्याच्या रक्ताने माखलेली होती. तो शिक्षाही अत्यंत क्रूर,अमानुष देत होता. त्याच काळीजच पाशवी होत. तो कवी कलश आणि संभाजी राजांनाही क्रूरपणे मारतो आणि आपली दहशत निर्माण करतो.

तो कट्टर मुसलमान होता. तो सारखा  जपमाळ ओढत असे आणि कुराणातील आयता म्हणत होता. त्याच्या राज्यात नृत्यसंगीत,गाणेबजावणे हया गोष्टी हद्दपार झाल्या होत्या. त्याला फक्त सत्ता आणि धर्म दोनच गोष्टी माहिती होत्या. सत्ताप्राप्तीसाठी त्याने आपल्या भावांना क्रूरपणे ठार केले होते आणि मुलांवरही तो संशय घ्यायचा की, हे मुलं सत्तेसाठी आपल्याला मारतील असा मोगलांचा राज्यकर्त्यांचा एकच मंत्र होता. ‘ तख्त हाच खरा ताज असतो.’  आणि ते मिळविण्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी होती.

औरंगजेब हा यशस्वी राज्यकर्ता जरी होता, धार्मिक जरी होता, तरी तो फार क्रूर स्वार्थी, संशयी, सत्तेची लालसा असणारा आणि गोरगरिबांवर अत्याचार करणार, प्रजेला कुत्र्याप्रमाणे  समजणारा होता.

### ८.५.३ राज्यकारभार–टपालखाते

राज्यकारभारातील एक महत्त्वाचे खाते म्हणजे टपालखाते. त्या काळात या खात्याला फार महत्त्वाचे स्थान होते. संवादाचे, माहितीचे साधन फक्त खलिता या माध्यमातूनच होत होते. हिंदू आणि मुसलमान राज्यकारभारात या खात्याची स्वंतत्र यंत्रणा होती. अनेक लोक या खात्यात काम करत होते. राज्यातील प्रत्येक विभागातील कामकाज कसे सुरू आहे, तेथील समस्या, तेथील आर्थिक व्यवहार , हुकुम ,आदेश हे सर्व लेखी

टपालखात्यामार्फत चालत होत. त्यामुळे या खात्यामार्फत राज्यकारभार सुव्यवस्थित चालत होता. त्या काळातील टपालव्यवस्था अत्यंत चांगल्या पद्धतीची सुनियोजीत, तत्पर होती.

राजाला खलिते,पत्र यामार्फत राज्यातील हालहवाल समजत होते. राजाचे रोजचे एक महत्त्वाचे काम म्हणजे टपाल बघणे व त्याला उत्तर देणे हे होते. राजा टपालामार्फतच हुकूम, न्याय-निवाडयांचे आदेश, माफीनामे ,आर्थिक व्यवहारांचे आदेश टपालामार्फत लांब-लांबच्या प्रदेशात दिले जात होते. त्या काळातील ही एक सशक्त व्यवस्था होती. या खात्यांमधील व्यक्ती शक्यतो विश्वासू नेमले जात होते. अहोरात्र घोड्यावरून प्रवास करून टपाल पोहोचवले जात होते. बाराही महिने या खात्यातील व्यक्तींना सतर्कतेने काम करावे लागत होते. पत्राची सत्यता ही त्यावरील राजमुद्रा त्या विभागाच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी. यावरून निश्चित केली जात होती. काही खलिते अत्यंत गोपनियतेने पाठवले जात होती. त्याकाळातील ही एक सक्षम व्यवस्था होती असे म्हणायला हरकत नाही.

एका रात्री गुप्तहेर शिवाजीराजांचे पत्र शंभूराजांना देतो. त्या लखोटयावर शिवाजीराजांची मुद्रा होती.

''प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्वंदिता ।

शाहसूनो : शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।''

अशी मुद्रा होती. त्या लखोटयात शिवाजीराजांनी संभाजीना स्वराज्यात वापस या आम्ही वाट पाहत आहोत असा आशय विविध उदाहरणे देऊन लिहिलेला होता. (१४७)त्यातच एके रात्री कवी कलश आणि जोत्यांजी ह्या जिवलग दोस्तांचा एक गुप्त खलिता येतो. त्यात, "शंभुराजे, सावध ! दिल्लीकर पातशहाकडून तुमच्या जीवाला धोका असल्याची खबर मोगलांच्या मिरज आणि रहिमतपूरच्या ठाण्यावर पोचली आहे. केव्हाही कैद होऊ शकते. जाळे तोडा पाखरासारखी भरारी घ्या(१४८) ". दोन दिवसा नंतर शंभूराजांना मियाँखानचा एक गुप्त खलिता येतो. त्यात तो शंभूराजांना लवकरच गिरफ्तार करण्यात येईल. त्यासाठी पानशहाने पाच हजाराची फौज रवाना केली आहे. दिलेरखान कोणाचा कधीच दोस्त बनू शकत नाही. एक पलभी देर ना करो,शंभो जा भाग जा (१५०).

महाराष्ट्रावर राज्य करायचे तर ते फंदाफितुरीच्या छुप्या कटयारीनेच करावे लागणार हे पातशहाला कळून चुकले होते. म्हणून तो महाराष्ट्र पठारावरील सरंजामदारांना, वतनदारांना खलिते लिहित होता. त्यांना लुभावत होता. मानी मराठ्यांना आमच्याकडे या. तुमचा मानपान ठेवू. आमची मोगलांची सलतनत काय परकी आहे. काय? हा आलमगीर तरी तुम्हाला पराया का वाटावा? मनातल्या आदेशा झटकून टाका. बाबांनो या तुमची पूर्वापार वतन लिहून घ्या. एवढी तुमच्या शिवाजीची आमची आमची जाती दुश्मनी होती. ती सारी आम्ही विसरलो......तो  शिवाचा पोर संभाच का सरफिरा निघाला  तेच कळत नाही. हव तर त्यालाही बेचाऱ्याला घेऊन या. प्रेमाने जिंका वा तातडीनं पकडा. पण इकडे घेऊन या. नाही तरी मोगलांची सल्तनत काय नि तुमचं स्वराज्य काय, हमसब एक है. (६४७) असं पातश हा गोड लिहून मराठ्यांना आपल्या बाजूने वळवतो.

अशाप्रकारे सोळाव्या शतकातील राज्यकारभाराचे महत्त्वाचे खाते म्हणजे टपालखाते होते. टपालावरूनच राज्यातील हालहवाल समजत होते. रोजच्या कामकाजातील एक आवर्जून केलेले काम म्हणजे रोजचे खलिते वाचणे व त्याला लगेच उत्तर देणे हे होते. खलिते २४ तासांत केव्हाही येत होते. रात्रीबेरात्री ते वाचणे आणि उत्तर देणे कधी कधी आवश्यक होत. खलिते, पत्र लिहिण्यासाठी एक व्यक्ती नेमलेली होती. राजा मजकूर सांगत असे आणि तो लिहित असे. त्यानंतर त्यावर मुद्रा उमटली जात होती. त्या पत्राला अखबारशैलीत ठेवून रेशीमदोऱ्याने बांधून सांडणीस्वराजवळ दिले जात होते. तो स्वार पत्राच्या तातडीच्या गरजेनुसार प्रवास करत होता. तातडीचा खलिता असेल, तर तो न थांबता प्रवास करून तो योग्य व्यक्तिकडे सुपूर्त करत होता. या कामासाठशी तरबेज, विश्वास लोकांची नियुक्ती केली जात होती. पत्र हेच एकमेक संवादमाध्यम त्या काळात उपलब्ध होत. त्याकाळी समाजजीवनातील ख्यालीखुशाली, आनंदाच्या, दु:खाच्या वार्ता ह्या पत्राद्वारेच कळवण्याची सोय होती.राज्यकारभार करतांना ही व्यवस्था सक्षम,सशक्त ठेवावीच लागत होती. प्रत्येक प्रदेशातून दोन-चार दिवसांनी पत्राद्वारे हालहवाल कळवला जात होता.

### ८.५.४ हेरखाते (राज्यकारभार)

संभाजी कादंबरीतील समाजजीवनातील राज्यकारभारातील एक महत्त्वाचे खाते म्हणजे हेरखाते होते.या खात्यामार्फत शत्रूची माहिती, शत्रूच्या प्रदेशाची, हवामानाची माहिती, शत्रूच्या हालचाली, शत्रूची आर्थिक परिस्थिती, शत्रूचे सैन्य, त्याच्या मोहिमा इत्यादी बारीक सारीक गोष्टींची माहिती हेर काढून आपल्या राजाला देत होते. याआधारे राजाला शत्रूचा, त्याच्या शक्तीचा अंदाज येत होता. आणि त्याप्रमाणे तो आपली रणनीती बनवत होता. राजाचे, सरदारांचे, सभेुदारांचे आपआपले हेरखाते, हेर व्यवस्था होती. हेराचे काम फार जोखमीचे आणि कष्टाचे होते. या खात्यात विश्वासू, तडफदार, शूर, अभिनय येणाऱ्यांचा समावेश केला जात होता. हेराला माहिती काढण्यासाठी विविध सोंगे, वेषांतरे करावी लागत होती. काही वेळेला तर शत्रूकडे त्या हेरांना महिनोंन महिने राहून त्यांचा विश्वास संपादन करून गोटातील, आतली माहिती काढावी लागत होती. विविध वेषांतरे करू न शत्रूच्या प्रदेशातून गावोगाव फिरून हे हेर खुबीने माहिती मिळवत होते.

दुर्गाबाई आणि राणूबाई बहादूरगडच्या किल्ल्यात राजबंदी होत्या. त्यांना सोडवण्यासाठी बहुरूपी अेर्जोजीने पार पाडली होती. काशी कापडवाल्याचे रूप घेऊन अेर्जोजी दुर्गाबाईंला जाऊन भेटले होते. बहादूरगडावरून त्यांनी दुर्गाबाईंचे एक गुप्त पत्र आणले होते. ते शंभूराजांना देतात.(५६५) अस जोखमीच काम अर्जोजी यादव करतो.

पातशहा मुकर्रबखानाला पन्हाळ्याच्या मोहिमेवर मोठया विश्वासाने पाठवतो. तो पातशहाला म्हणतो, “मीही दख्खनच्या मातीतला कडवा फौजी आहे. त्या संभाचा बंदोबस्त करण्यासाठीमी पुरेशी काळजी घेईन. माझी भिरभिरती नजर काफरांच्या प्रत्येक हालचालींवर राहील. विजेच्या चपळाईने आणि बाणाच्या वेगाने धावणाऱ्या, डोंगररानावर आदळून उलटया वाहणाऱ्या वाऱ्यासारखी गेल्या पावली खबर घेऊन येणाऱ्या चलाख हेरांची नेमणूक मी त्या रानात करेन. (६५६). ” हेरांवरच मोहिमेचे यश अवलंबून होते. त्यांनी आणलेल्या बातम्यांवरून पुढील योजना आखत होते. मुकर्रबखान गणोजीला हाती धरून मराठ्यांच्या प्रदेशात घुसतो. तो सह्याद्रीच्या डोंगरातून चपळपणे धावणारे आणि सत्य बोलणारे अनेक हेर त्याने आपल्याभोवती गोळा केले होते. गणोजीच्या हेरांकडून येणाऱ्या बातम्या खऱ्या की खोटया हेही तो आपाल्या हेरांमार्फत ताडून पाहत होता. (६६६) मुकर्रबखान चलाखीने, सर्व तयारीने शंभूराजांच्या मागावर जात होता.

हेरखाते हे संभाजी च्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे खाते, अंग होते. रराज्याच्या भावी हालचाली, राज्यावरील संकटे, राज्याचे शत्रू, त्यांच्या योजना हे सर्व हेरांकडून समजत होते. महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरही हेरांच  जाळ मराठी राजे,सरदार ,सुभेदार सेनापती आणि राज्यकारभारातील अधिकारी मंडळीनी पसरवलेल होत. मराठ्यांप्रमाणे पातशहा व त्याच्याही सरदारांचे हेरखाते वेगवान होते. दिलेरखान, मुर्करबखान यांच्या उत्तम हेरांमुळे संभाजी राजे एकदा मोगलांना मिळतात आणि दुसऱ्यांदा कैद होतात. राज्यकारभारात हेर महत्त्वाची भूमिका बजावत होते.

## ८.६ आर्थिक स्थिती –

संभाजी या ऐतिहासिक कादंबरीत बहुतांश वर्णन शंभूराजे आणि औरंगजेब यांचे आणि यांच्या राज्यकारभाराचे आलेले आहे. त्यामुळे समाजातील सर्वसामान्यांची आर्थिक स्थिती चे वर्णन नसून राजांची राज्याची आर्थिक स्थिती कशी होती याची माहिती मिळते.शिवाजीराजे, शंभूराजे,पातशहा,सरदार,सभेदार,सेनापती व राज्यकारभारातील पदाधिकारी यांची वैयक्तिक आर्थिक स्थिती उत्तम होती. ते श्रीमंत होते. राजेशाही थाटाने राहणारे होते. पातशहाच्या सरकारची आर्थिक स्थिती उत्तम होती ते श्रीमंत होते. राजेशाही थाटाने राहणारे होते. पातशहाच्या सरकारची आर्थिक स्थिती खूपच चांगली होती. कुबेरासारखी संपत्ती होती. मराठयांच्या सरकारची आर्थिक स्थिती चांगली होती. हे राज्य कष्टकऱ्यांच, शेतकऱ्यांच,गरीबांच असल्यामुळे संपत्ती भरपूर नव्हती. मात्र राज्यकारभार त्यात चांगला चालत होता.

आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून समाजात लोक व्यवसाय, व्यापार काम करत होते. सुतार,लोहार,चांभार,भिस्ती,पाणके,कामाठी,वाढपी,नर्तकी,सोनार,व्यापारी इत्यादी या कादंबरीत पहायला मिळतात. राज्याचा राज्यकारभार पाहण्यासाठी, वाढवण्यासाठी चालवण्यासाठी अशा व्यावसायिकांची कामगारांची आवश्यकता राजाला होती.

पातशहाकडे भरपूर द्रव्य होते त्याचा कारभार फार मोठा होता. तो मोठ्या संख्येने दक्षिणेकडे निघतो त्यावेळी सरदार दरकदार आणि सेनाधिकाऱ्यांचे गज कमालीचे शृगांरलेले होते. त्यांच्या गळ्यात खाशांच्या प्रतवारीप्रमाणे सोन्याच्या, चांदीच्या तर कोणाच्या गळ्यात तांब्याच्या घंटा बांधल्या होत्या. खाशा हत्तींच्या पायात सोन्याचांदीचे तोडे बांधले होते. बेगंमासाठी चंदनाची मेघंडबरी होती. तिला सोन्या चांदीचे पत्रे मारले होते. पातशहाकडे कुबेरानेही लाजून मान खाली घालावी, इतका प्रचंड खजिना होता.

काबूल,कंदहार,आग्रा,मथुरा,काशी,बंगाल,ओरिसा,माळवा,गुजरात अशा अनेक शहरांतून आणि प्रांतांतून गोरगरिबांच्या नराडीवर पाय ठेवून गोळा केलेली प्रचंड संपत्ती त्याच्याजवळ होती. आशियातील सर्वात आधुनिक शशस्त्रास्त्रांचे कारखाने, बारूद खाळाने सोबत होते. (३३७,३८,३३९), पातशहा अंबारीतून उतरायला चांदीची शिडी वापरत होता. (३४०)

शंभूराजे एका बैठकीत आपल्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीविषयी बोलतात, यार हो! औरंगजेब आलमगीरच मानायला हवा! आज तो दक्षिणेत अनेक वर्षे झुंज देत असला तरी त्यांचा साम्राज्यविस्तार खूप मोठा आहे. तेथून त्याला कोटयावधी रुपयांचा सारा मिळतो. त्यामानान आपलं स्वराज्य खूप लहान, पातशहाच्या अठरा सुभ्यांपैकी एखादया अर्ध्या सुभ्याएवढं उत्पन्न कमी. थोरल्या महाराजांनी साठवून ठेवलेल्या खजिन्याची आम्ही उधळपटटी केली नाही. उलट तो खजिना गेली आठ ,नऊ वर्षे आम्ही पुरवून खाल्ला, म्हणून तर इतकी वर्षे आम्ही वैऱ्याच्या लष्करी महासागराशी सामना देऊ शकलो. दुर्दैवाने गेल्या तीन वर्षात दुष्काळानं राज्याचं कंबरडच मोडलं आहे. (६८९,६९०) मराठी राज्याची आर्थिक स्थिती खालावलेली होती. दुष्काळामुळे उत्पन्न घटले होते आणि पातशहाशी व इतरांची युद्धे सुरु होते.

**व्यवसाय –**

समाजजीवनात आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून लोक विविध व्यवसाय करतात. या व्यवसायातून ते पैसे मिळवतात व आपला उदरनिर्वाह करतात. त्या काळात युद्ध, मोहिमा फार निघत होत्या. त्या मोहिमांसोबत अनेक व्यावसायिक जात होते. बहादूरगडावर मोगलांना जाऊन शंभूराजे,दुर्गाबाई मिळाले होते. एक सोनार दागिने विकायला तेथे जातो. तो महाड–पोलादपूरकडचा होता. जुबान मिठास, संभाषणामध्ये चतुर म्हणूनच तो अनेक किमती दागिने दुर्गाबाईंना विकत घ्यायला भाग पाडे. तो जासूद होता पण सोनाराच रूप घेऊन शंभूराजांना मुलगी झाली ही खबर देतो.(१२६)

बहादूरगडावरून भूपाळगडाच्या मोहिमेसाठी सैन्य निघत. फौजेसोबत वाणी,भिस्ती उदीम असे व्यावसायिक व्यापारी जात होते.(१३४) फौजेसोबत बाजार भरवणारे बाजार भरवत आणि सैनिक आवश्यक त्या वस्तू खरेदी करत होते.

राजांच्या महालात सेवक असे लोक काम करत होते. स्वयंपाकघरात– मुदपाक खान्यात बरेच लोक काम करत होते.पाणके,शागीदे,वाढपी असे वाढण्याच्या कामासाठी वेगवेगळे लोक होते. (२५७)

बुऱ्हाणपूरवर, सुरतेवर मराठे हल्ला करणार या बातमीने परदेशी वखारवाले आणि व्यापारी घाबरतात. सुरत हे शहर मोठे व्यापारी बाजारपेठ होती. तेथील व्यापारी,अडते,सोनार घाबरून का करखानाला मोहरांच्या

थैल्या देऊन आम्हाला वाचवा अशी विनंती करतात. बरहाणपूर सुरत आणि हैद्राबादसारखे अनेक श्रीमंत व्यापारी होते. तेथे रेशीम,मलमल, सोनेचांदी आणि कलाबुतीमध्ये कोटयावधी रुपयांची उलाढाल होत होती. (२६२,२६५)

अरबी घोड्यांच्या एक बडा व्यापारी बऱ्हाणपूरच्या बाजूला येतो. दोन हजार जनावरे तो आणतो. मस्त,रूंदाड पाडीची तेलदार आणि देखणी जनावरे होती. शंभूराजे तो संपूर्ण तबेला खरेदी करतात. (२६९,२७०) परदेशी व्यापारीही त्याकाळी व्यापार करण्यासाठी येत होते.

औरंगजेब जेव्हा दक्षिणेकडे निघतो तेव्हा त्याच्याकडे फौजेसोबत आचारी, पाणके, भिस्ती, पोतदार, खिदमदगार असे लाखभर सेवक होते. म्हणजे हे कामगार अत्यावश्यक होते (३३२). फौज निघण्याआधी बिनीची पथके बाहेर पडायची. खांदयावर फावडी, कुदळ घेतलेले हजारो कामाठी आणि बिगारी रस्ता साफ करत करत पुढे जायचे. पातशहाच्या फौजेसोबत अडीचशे मोठे बाजार होते. नाना नगरीचे सौदागर, बेपारी, दलाल, बाजारबुनगे,नर्तकी, नोकर-चाकर, शागीर्दपेशे असे लाखभर कामगार व्यापारी,कलावंत पातशहाच्या फौजेसोबत जात होते. फौजेइतकेच महत्त्व या सेवकांना, कामगारांना, व्यापाऱ्यांना होते. (३३८).

राजाला एखादी कामगिरी करायची असेल तर कामगार व्यापाऱ्यांवर अवलंबून रहावे लागत होते. घोडयांसाठी मोतद्दार होते. शंभूराजांना जंजिरा घेण्यासाठी जहाजे बनवण्यासाठी सुतार,कामाठी, मजूर,भिस्ती काम करतात. शेकडो सुतार बांधणी ,तासणी, जोडणी सगळी कामे घाईने करतात. (३६६).

रूपकुंवर ही नर्तकी होती. गाणे बजावणे, मनोरंजन करणे तिचा पेशा होता. राजे-महाराजे यांच मनोरंजन ती नृत्य करून करत होती. त्या बदल्यात तिला दागिने,मोहरा दिल्या जात होत्या.(३९६)

विशालगडावरचा बुरूज बांधायला आजूबाजूच्या परिसरातील बेलदार व गवंडी सुरूवात करतात. त्यांना शिपाईही मदत करतात. अवघ्या दोन रात्रीत आणि दोन दिवसात हा बुरूज बांधतात. (६७०) बहादूरगडाच्या भिरस्त्याच्या पथकात चामड्याच्या पिशव्यातुन पाणी घेऊन जायचे, फौजेतील स्वारराऊतांना पाजायचे, हाच त्यांचा मुख्य उदयोग होता. (६५६)

शंभूराजांना सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न करतो म्हणून व्यापारी येसूबाईकडे येतात पुनवडीचे बडे व्यापारी कांताशेट बिहारीमल, बारामतीकर जिवाप्पा नाईक, तुकोबा सोनसाखळे आदी व्यापारी येतात त्यांच्या पेढया पुण्यात होत्या. गोवळकोंडा,विजापूर ते औरंगजेबाच्या बाजारांशी त्यांचा व्यापारउदीम सुरु होता. पातशहाच्या तीनशे बाजारांशी त्यांचा रोजचा संबंध होता. ते भरपूर द्रव्य घेऊन जातात. (८०४)

संभाजी या ऐतिहासिक कादंबरीत समाजजीवनातील राजे, महाराजे, राज्य,सुभेदार,वतनदार यांच्या आर्थिक स्थितीचा वर्णन आलेले आहे. मराठी स्वराज्याच्या सरकारची आर्थिक स्थिती चांगली होती. राज्यांचे आर्थिक राज्याचे आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणजे महसूल, सारा हे होते. शिवाय शत्रूच्या प्रदेशातून लूट आणणे, खंडण्या वसूल करणे. या माध्यमातून पैसा मिळवला जात होता. बंडखोरांची संपत्ती जप्त करून ती सरकारात जमा केली जात होती. बऱ्हाणपूरच्या लुटीमध्ये भरपूर रक्कम, संपत्ती मराठ्यांना मिळते. राज्यातील अंत्यसंस्कारासाठी, धार्मिक कार्यासाठी सरकार आर्थिक मदत करत होते. पातशहा हा फार मोठा राज्यकर्ता होता. त्याच्याकडे आर्थिक सुबत्ता होती. कुबेराला लाजवेल असा खजिना होता. त्याच राज्य फार मोठ असल्यामुळे त्याला उत्पन्नही मोठचं मिळत होत.

शंभूराजे, पातशहा हे राजे ऐश्वर्यात, श्रीमंतीत रहात होते. शंभूराजे अंगावर मौल्यवान दागदागिने परिधान करत होते. इतकच नाही तर शंभूराजांच्या घोड्यालाही मोत्यांनी, पाचूने,सोन्याने सजवले जात होते. पातशहाच्या हत्तीला,मेघडंबरीला सोन्याने सजवले होते. फौजेतील पदाच्या प्रतवारीनुसार सोने,चांदी,तांबे अशा घंटया हत्तीच्या गळ्यात बांधत होते. फतशहा अंबारीतून किमाँश अर्ध करोडचा होता. त्यात हिरे-रत्न लावलेले होते. पातशहाचा हत्ती सोंडेपासून शेपटीपर्यंत सुवर्णालंकारांनी मढवलेला होता.

राज्यकारभार करताना काही गोष्टीसाठी उचल दिली जात होती. शेतकऱ्यांना, सैनिकांना जास्तीची रक्कम दिली जात होती. सततच्या दुष्काळामुळे मराठी स्वराज्याची आर्थिक स्थिती खालावली होती. शंभूराजे शेतकऱ्यांचा सारा माफ करतात, पेरणीसाठी बी- बियाणे देतात, शेताच्या कामासाठी पैसे देतात.

राज्याच्या खजिन्यात हिरे,मोती,रत्ने, किमती वस्तू, नजराने, भेटवस्तु हिऱ्यामाणकांनी भरून वहात होते. हैद्राबादचे दिवाण मादण्णा सोन्याच्या पिकदावीत पिंक टाकत होता. असे राजे श्रीमंतीत राहत होते.

आर्थिक उत्पन्नासाठी सर्वसामान्य लोक व्यवसाय, काम करत होते. समाजात व्यापारीही होते.सुतार,चांभार,सोनार,कामाठी,वाढपी,भिस्ती,पणके,वाणी,उदीम,शाणीर्द,सेवक,अडते,आचारी,सौदागर,दलाल,मोतद्दार,बेलदार,गवंडी असे व्यवसाय होते. बुऱ्हाणपूर ही एक व्यापारी बाजारपेठ होती. तेथे रेशीम, मलमल, सोनेचांदी अशा वस्तूंची कोटयावधीची उलाढाल होत होती. राजाच्या मोहिमेसोबत सर्व व्यावसायिक, सेवक, कामगार,वाणी–उदीम जात होते. नर्तकी ही नाचून, गाऊन मनोरंजन करत होती. अशा प्रकारे विविध व्यवसाय काम करून समाजातील लोक आर्थिक उत्पन्न मिळवत होते.

## ८.७ संभाजी कादंबरीतील कुटुंबसंस्था–

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीतील समाजजीवनात एकत्र कुटुंबपध्दती होती. गोदूचे, शिवाजीराजांचे, शंभूराजांचे, औरंगजेबाचे, अंबिकाबाई, साकवाबाई, हंबीरराव, अशा कुटुंबांचा उल्लेख आहे. कुटुंबातील नातेसंबंधही या कादंबरीत पहायला मिळतात. काही व्यक्ती नात्यांपेक्षा सत्तेला, तर काही सत्तेपेक्षा नात्यांना, तर काही सत्तेपेक्षा  कर्तव्याला महत्त्व देणाऱ्या आहेत.

१) **गोदूचे कुटुंब** : गोदू तिच्या सासू सासरे आणि नवऱ्यासोबत राहत होती. तिचा सासरा त्रंबकराव बारा गावचे देशपांडपणे त्याच्याकडे होते. तिचा नवरा निवासराव वाडकर होता. गोदूचा सासरा शिवाजीराजां विरोधी कट करतो. हे गोदूला  समजत तेव्हा ती घोडयावरून रायगडाकडे जाते. तिची सासू सूनबाई घरातून गडप झाली अस सांगते. निवासराव म्हणतो तुमची सून पळाली. ती छिनाल रंडीच शिवाजीची भगत आहे. ते दोघे रायगडाकडे निघतात. तिथे पोहोचल्यावर तिच्याविरूध्द कांगावा करून तिला बदनाम करायच ठरवतात. शंभूराजांनी गरिबाची सून पळवली अशी बोंब मारतात. ती धाडसाने सासऱ्याच व नवऱ्याच कट कारस्थान सांगते. त्याची चौकशी होते. ते गुन्हेगार निघतात. त्यांना शिक्षा होते. मात्र गोदूचा संसार मोडतो. ती येसूबाईची दासी बनून राहते. तिचा जीव शंभूराजांवर जडतो. ती पाचाडला तिच्या आत्याकडे राहते असे हे गोदूचे कुटुंब स्वार्थी होते. मात्र गोदू ही प्रामाणिक आणि शिवाजीराजांवरील भक्तीसाठी आपला संसार, कुटुंब सोडते. (३३)

२)  **शिवाजी राजांचे कुटुंब :** राजांचे कुटुंब मोठे होते. राजांना आठ राण्या होत्या. सईबाई शंभूराजांच्या जन्मानंतर निधन पावतात.पुतळाबाई पाचाडच्या महालात राहतात आणि सोयराबाई राजांजवळ राहतात. जिजाबाईही त्यांच्या मृत्यूपर्यंत राजांजवळच राहत होत्या. राजांना शंभूराजे, राजाराम असे दोन पुत्र व अंबिकाबाई, राणूबाई, साकवारबाई अशा तीन मुली होत्या असा राजांचा परिवार मोठा होता. राजांनी शिर्क्यांची येसू सून केली आणि आपली मुलगी नानीबाई उर्फ राजकुंवर हिचाही वाङ्निश्चय येसूच्या भावाशी गणोजीशी करून देतात. (२७)

शिवाजीराजांचे आणि जिजाबाई यांचे माय लेकाचे नाते अतिशय प्रेमाचे विश्वासाचे होते. राजे आईचा सल्ला घेत होते. शिवाजी आणि सोयराबाई यांचे पती पत्नीचे नाते सुरवातीला प्रेमाचे विश्वासाचे होते. मात्र सोयराबाईंना राजाराम होतात. तेव्हा त्यांना सत्तेच्या स्वार्थाने घेरले जाते. राजारामांना गादी मिळावी यासाठी त्या पुत्राप्रमाणे प्रेम केलेल्या संभजी विरोधात कट कारस्थान करतात. शिवाजीराजांना शंभूराजांच्या विरोधात भडकवतात. शंभूराजांचा दुःस्वास करतात. त्या राजांना विवश करतात. म्हणूनच राजे शंभूराजांना कर्नाटक मोहिमेवर नेत नाहीत. राजारामांच्या लग्नाला बोलवत नाहीत. शंभूराजांना रायगडावर न ठेवता शृंगारपूरला पाठवतात. सोयराबाई राज्याच्या वाटण्या करा राजारामाला न्याय दया अस म्हणतात. राजे या गोष्टीला तयार होत नाहीत. त्या राजांना कोंडीत पकडून सांगतात की, एकतर राज्य तोडून दया किंवा शंभूराजांना मोहिमेवर नेऊ नका. निर्णय न मिळेल तर अन्नपाणी सोडू. (४९) राजे चिंतीत होतात. ते म्हणतात, ''एखादया व्यक्तीच्या सहवासात पती वा पत्नीच्या नात्याने उभा जन्म काढला, तरी त्याचे अंतःस्थ जाणता येतच अस नाही. महाराणींकडून आम्हांला मिळालेला अनुभवही खूप विलक्षण आणि विस्मयकारक आहे.'' (४९) राजे शेवटी सोयराबाईच्या मनासारखा निर्णय घेतात. राजे कर्नाटकच्या मोहिमेवरून आल्यावरही शंभूराजांना भेटत नाहीत व एक पत्र पाठवून आम्हाला आपुले तोंड दयावयाची तोशीश घेऊ नये अस कळवतात. यामुळे शंभूराजे आणि शिवाजीराजे यांच्यातील पिता पुत्राच्या नात्यात दुरावा निर्माण होतो. यामुळे शंभूराजे मोगलांना जाऊन मिळतात. मात्र तिथे गेल्यावरही त्यांच्या मनातील पित्याविषयीचे प्रेम, आदर तसूभरही कमी होत नाही आणि इकडे शिवाजीराजांच्या मनातीलही शंभूराजांविषयीचे प्रेम, ओढ कमी होत नाही. ते शंभूराजांना परत स्वराज्यात या

अस पत्र गुप्तहेरांमार्फत पाठवतात.शंभूराजे स्वराज्यात आल्यावर शिवाजीराजे शंभूराजांशी मनमोकळेपणाने बोलतात. मात्र रायगडावरील वातावरण घातक असल्यामुळे ते शंभूराजांना शृंगारपूरातच राहायला सांगतात. शिवाजी राजे आजारी होऊन मृत्यू पावतात. सोयराबाई ही बातमी शंभूराजांना न सांगता त्यांच्या विरूध्द कट करतात. मात्र शंभूराजांच्या पाठीशी अनेकजण उभे राहतात व शंभूराजे छत्रपती होतात. राजा झाल्यावर ते शिवाजीराजांच नाव, संपत्ती तसूभरही कमी होऊ देत नाहीत. राजांच स्वराज्य उत्तमपणे चालवतात व स्वराज्यासाठी आपल्या प्राणाची आहुती देतात.

पुतळाबाई शिवाजीराजांच्या निधनानंतर सती जातात. सोयराबाई शंभूराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर काही वर्षांनी आत्महत्या करतात. राजारामांचा विवाह ताराऊंशी होतो. येसूबाई आणि शंभूराजे त्या दोघांची काळजी घेतात. शंभूराजांचे मेहुणे, दाजी स्वार्थी आणि गद्दार निघतात. मात्र राणूबाई ही त्यांची बहिण भावासाठी मोगलांच्या कैदेत राहते. शिवाजीराजे व शंभूराजे यांचे नातेवाईक सत्ता आणि स्वार्थासाठी दगाबाजी करतात. म्हणूनच शिवाजीराजांनी आपल्या राज्यकारभारात नातेवाईकांपेक्षा इतर लोकांना सेवेची संधी दिली होती. शिवाजीराजे आणि संभाजीराजे यांना गृह कलहाला सामोरे जावे लागते. बाहेर पराक्रम करणारे हे वीर कुटुंब कलहात हतप्रभ होतात. सोयराबाईंच्या स्वार्थामुळे त्यांचे कुटुंब विस्कटते. शंभूराजे आणि येसूबाई रायगडावर न राहता शृंगारपूरात राहतात. शंभू आणि येसू यांची पती पत्नीचे नाते अतिशय समंजस, आधाराचे होते. येसूबाई संभाजीराजांना प्रत्येक गोष्टीत बरोबरीने साथ देत होत्या. इतकच नाही तर शंभूराजांना आवडणाऱ्या दूर्गाबाईला स्वतःची सवत करून त्या मोठया मनाने आणतात. शंभूराजांना योग्य अयोग्य काय याची जाणीव त्या करून देतात. शंभूराजांनाही त्यांच्यावर भरोसा होता म्हणून ते येसूबाईकडे स्वराज्याचा कारभार विश्वासाने सोपवतात. शंभूराजे आणि दुर्गाबाईमध्येही प्रेमाचे नाते होते. स्वराज्यासाठी त्या शंभूराजांना एकटयाला मोगलांच्या बंदीखान्यातून जायला सांगतात. स्वतःच्या मोहपाशात न अडकवता त्यांना स्वराज्य जास्त मोलाच वाटत होत. शंभूराजांना दुर्गाबाईला आपण सोडवू शकलो नाही याची खंत आयुष्यभर वाटत राहते. शंभूराजे आणि राजाराम यांचे नाते पवित्र होते. शंभूराजांनी राजारामांची काळजी आपल्या मुलाप्रमाणे घेतली होती. शंभूराजांना कितीही संताप आला तरी राजारामांना पाहताच तो नाहीसा होत होता. (२३७)

राजारामांनाही शंभूराजे फार आवडत होते. सोयराबाई राजाराम होण्याआधी शंभूराजांवर पुत्रवत प्रेम करत होत्या. शंभूराजांना कोणी रागवलेले त्यांना चालत नव्हते. त्या छोटया शंभूशी खूप खेळत होत्या. या सर्वांची जाणीव शंभूराजांनाही होती, मात्र सत्ता स्वार्थामुळे त्या बदलतात. शंभूराजांना दुःस्वास करतात. शिवाजीराजांवर सोयराबाईंनी विषप्रयोग केला अशी अफवा जेव्हा पसरते तेव्हा शंभूराजांना सोयराबाई अस करण अशक्य आहे याची खात्री असते. त्या गेल्यावर शंभूराजे खूप दानधर्म करतात.

शिवाजीराजे आणि येसूबाई यांचे सासरे सून हे नाते बाप लेकीप्रमाणे प्रेमळ होते. शिवाजीराजांना येसूबाईवर विश्वास होता. शंभूराजांना सांभाळण्याच सामर्थ्य येसूबाईमध्ये होत याची पूरेपूर खात्री त्यांना होती.

जिजाऊ आणि शंभूराजे यांचे आजी नातवाचे नाते लाडाचे, काळजीचे होते. शिवाजीराजे जेव्हा आग्राला जाण्यासाठी शंभूराजांना नेतात, तेव्हा जिजाऊ म्हणतात, ''शिवबा, कशासाठी घेऊन चाललात माझ्या शंभू बाळाला? उणेपुरे आठ पावसाळेही पाहिले नाहीत रे लेकराने '' (५६) यावर शिवाजीराजे म्हणतात आमचा नाइलाज आहे. आम्ही अफजलखानाच्या भेटीस म्हणजे मृत्यूच्या दाढेत गेलो तेव्हा आम्हाला निर्भयपणे हसत निरोप दिला. यावर जिजाऊ म्हणतात, ''राजे, आपण जेव्हा आजोबा व्हाल तेव्हा, तेव्हाच आपल्या बाळाच्या बाळाचं अप्रूप आणि प्रेम म्हणजे काय असतं, ते कळेल तुम्हांला ! '' (५६) अस हे शंभू आणि जिजाऊंच नात प्रेमाच होत.

शंभूराजांची राणूबाई ही बहीण त्यांच्या काळजीपोटी त्यांना आधार देण्यासाठी मोगलांच्या कैदेत जाते. शंभूराजांना एकटयाला स्वराज्यात शंभूराजांची अधिक गरज आहे याची जाणीव त्यांना होती. त्या निर्धाराने शंभूराजांना म्हणतात, ''आता वेळ दवडू नका चला आटपा, तयारी करा. आपल्याकडे किल्ले बांधताना नरबळी दिले जात होते. त्याचप्रमाणे माझ्या भाऊराय, तुझ्या हया बहिणीची आणि आपल्या गर्भारशी लाडक्या पत्नीची ही पर्वा तू करू नकोस. उदया नशिबानं तुम्हांला आम्हांला साथ दिली तर आपण पुन्हा सारे जरूर भेटू ! पण ते न घडले तरी बेहत्तर! आम्ही मेलो तरी चालेल. पण शिवाजी संभाजीच्या स्वराज्याचा बुरूज वाऱ्यावादळाची टक्कर देत असाच खडा रहायला हवा.''(१५२,१५३) शंभूराजांच्या अंबिकाबाई ही सर्वात धाकटी बहिण अंबिकाबाई शंभूराजांच्या राज्याभिषेकावेळी येतात व जिंजी कर्नाटकचा मुलूख आमच्या धन्याला हरजीराजे

महाडिकांना दया असा आग्रह धरतात. शंभूराजे महाडिकांचा पराक्रम पाहून त्यांना तो कारभार सोपवतात. मात्र शंभूराजांपेक्षा सात वर्षांनी मोठया असणाऱ्या अंबिकाबाई महाडिकांना कर्नाटक जिंजीचा सुभा मिळाला म्हणून रागावतात त्या आणि महादजी शंभूराजांकडे हटून बसतात. त्या म्हणतात, ''जो न्याय आपण महाडिकांना दिला, तोच आम्हालाही पाहिजे. मेव्हण्यामेव्हण्यामध्ये दुजाभाव कसा करता?'' (५५४) शंभूराजे त्यांना परोपरीने समजावतात मात्र त्यांना समजत नाही. महादजी अंबिकाबाईला म्हणतात, ''चांगल दिल्लीकर पातशहाच वतन होत. ते सोडून आम्हाला बंधूराजांच्या स्वराज्यात घेऊन आलात. असल्या स्वार्थी स्वकीयांपेक्षा तो परका मोगल किती बरा.'' (५५४) रागाने दोघे निघून जातात आणि पातशहाला वतनाच्या स्वार्थासाठी मिळतात. इतकच नाही तर नातेसंबंध विसरून शंभूराजांच्या धिंडाच्या वेळी महत्त्वाची भूमिका बजावतात. असे हे नाते स्वार्थाचे होते. राणूबाईंचे पतीही हरजीराजे स्वतःला कर्नाटकाचे राजे म्हणून राज्याभिषेक करतात. शंभू राजांविरोधी पातशहाला मदत करतात आणि त्याला मिळतात. असे नातेवाईक स्वार्थी आणि सत्तालालसू होते. असाच स्वार्थी आणि घातकी नातेवाईक म्हणजे गणोजी शिर्के वतन मिळविण्यासाठी आपल्या बहिणीशी भांडतो, शिव्या शाप देतो. मोगलांना जाऊन मिळतो आणि शेवटी शंभूराजांना कैद करून देतो. वतनासाठी नात्यांचा विसर पडणारे नातेसंबंध 'संभाजी' कादंबरीत पहायला मिळतात. शिवाजीराजांचे सर्व जावई मोगलांना वतनासाठी जाऊन मिळतात. स्वतः सोबत स्वराज्यातील इतरही सरदारांना मोगलांकडे नेतात. शंभूराजांच्या कैदेनंतर स्वराज्याचा छत्रपती कोणाला करावे असा प्रश्न पडतो. सर्वजण शाहूमहाराजांचे नाव पुढे करतात. मात्र येसूबाई सारासार विचार करून, सत्तेच्या मोहात न पडता स्वतःच्या शाहू ऐवजी राजारामांना छत्रपती बनवतात. त्यांना सुरक्षित ठिकाणी पाठवून स्वतः शत्रूच्या कैद्रेत जाण्यासाठी सज्ज होतात.

असे हे शिवाजीराजांचे मोठे कुटुंब होते. त्या मोठया कुटुंबाचे उपकुटुंबेही पहायला मिळतात. त्या कुटुंबातील काही नाती प्रामाणिक होती. तर काही स्वार्थी नात्यांपेक्षा सत्ता संपत्तीला महत्त्व देणारी कुटुंबे, त्यातील व्यक्ती आहेत. मात्र काही व्यक्ती नात्यांपेक्षा, स्वार्थापेक्षा कर्तव्याला अधिक महत्त्व देणाऱ्या होत्या. हंबीरराव हे सोयराबाईचे भाऊ आणि मराठी स्वराज्याचे सेनापती होते. राजारामांना छत्रपती करावे हा अट्टाहास

सोयराबाई आणि इतर मंडळींचा होता. मात्र मामा असूनही ते राजारामांऐवजी शंभूराजे या पदाला पात्र आहेत म्हणून शंभूराजांच्या पाठीशी ठामपणे उभे राहतात. स्वार्थ बाजूला ठेवून ते कर्तव्याला महत्त्व देतात.

३) **पातशहाचे कुटुंब** : औरंगजेब पातशहा आपल्या कुटुंब कबिल्यासमवेत दक्षिणेत मोहिमेला निघतो. औरंगजेबाला चार बेगमा होत्या. उदेपुरी, औरंगाबादी, नवाबबाई, दिलरासबानू आज्जम, मुअद्दीन, मुअज्जम, अकबर, चार मुल होती. झेबुन्निसा आणि जिनतउन्निस हया दोन मुली होत्या. तो बालबच्च्यांच्या हसऱ्या बडबडीत कधीच न गुंतणारा होता. मात्र शहजादा अकबरात तो मनाने गुंतला होता. पातशहा हा फार महत्वाकांक्षी होता. सत्ताप्राप्तीसाठी तो काहीही करू शकत होता. शहाजहानने आपल्या मुलाचा औरंगजेबाचा महात्वाकांक्षी स्वभाव ओळखून त्याला दक्षिणेची सुभेदारी देतो. मात्र शहाजहान आजारी झाल्यावर त्याच्या चार शहजादयांत वारसाहक्काचे युध्द जुंपते. औरंगजेब इतर भावांना क्रूरपणे मारून स्वतः पातशहा बनतो. त्याची जिनतउन्निसा ही लाडली शहजादी होती. याआधी थोरली झेबुन्निसा ही लाडकी होती. मात्र अकबराने पातशहाविरोधी बगावत केली आणि त्याला तिने छूपा पाठिंबा दिला असल्यामुळे तिला सरळ गिरफ्तार करून दिल्लीतल्या किल्ल्यावर कायमचे कोंडून टाकले होते. (३४१) त्याला आपल्या मुलांवर अजिबात विश्वास नव्हता. मुलांविषयी प्रेमही नव्हते. तो म्हणतो, " आज्जम काय आणि मुअज्जम काय, माझ्या पश्चात हिंदुस्थानच्या तख्तावर बसायची हया दोघांचीही लायकी नव्हती. पण केवळ बदनशीब! काय करायच? आमच्या तख्तपीशीवर बसून ताज पेहनायची ज्याची खरी काबिली होती, तोच  अमचा शहजादा बेवकूफ निघाला. बगावत करून जानी (शुजा, मुराद, दारा) दुश्मनाला जाऊन मिळाला." (३४२)

सत्तेसाठी तो आपल्या बुढया बापाला सबक शिकवतो भावांना स्मशानघटाचा रस्ता दाखवतो. दुश्मनांची खैरियत चाहणाऱ्या मूर्ख बहिणींना कायमचं बंदीखान्यात कोंडून टाकतो.(३४३)  सत्तेपुढे त्याला कुटुंब, नाते महत्त्वाचे वाटत नाहीत. शुजाला सहभागी झाल्याबद्दल आपल्या थोरल्या शहजादयाला महंमद सुलतानला आजन्म बंदीखान्यात लोटतो. आपल्या आई वडील भाऊ, बहिण मुल याच्याशी तो क्रूरपणे वागतो. आपली मुलेही आपल्याशी अशीच वागतील या भीतीने तो आपल्या प्रत्येक शहजादयावर आणि त्यांच्या बेगमांवर कायमची गुप्त पाळत ठेवतो. तो संशयी स्वभावामुळे आनंदी जीवन जगू शकत नव्हता. तो अर्ध्या रात्री

उदेपुरी बेगम जवळ आपले दुःख व्यक्त करत होता, ''बेगम साहिबा ही सल्तनत ही दौलत,शौकत हया गोष्टींचा काय आग लावायची? पलभराची नींद मिळायलाही हा पातशहा पारखा झाला आहे. '' (४८७)

पातशहाच्या सूना त्याच्यासमोर जाण्याच धाडस करत नव्हत्या. त्यांना काही हवे असेल तर त्या आपली मागणी उदेपुरी बेगमकडे मांडत होत्या. (५५८) सासरा सून हे पातशहाचे नाते धाकाचे होते. तो आपल्या बेगमांनाही धाकात ठेवत होता.

पातशहाने दक्षिणेची मोहिम यशस्वी करणाऱ्याला गादी मिळेल असे स्पष्टपणे सांगितले होते. त्यामुळे आज्जम आणि मुअज्जम या दोघांमध्येही सत्तेसाठी लालसा निर्माण झाली होती. दोघांमध्ये पराक्रम करून दाखवण्याची स्पर्धा लागली होती. दोघांनाही एकमेकांची मदत नको होती. (५९५)

पातशहाच्या आजारपणात त्याच्या उदेपुरी आणि औरंगाबादी बेगमा त्याच्या उशाशी बसून त्याची काळजी घेतात. (६३८) प्लेगच्या साथीमध्ये त्याची औरंगाबादी मेहल मरण पावते. तो खूप रडतो.

पातशहाची मनःस्थिती चांगली होती. तो आपल्या परिवारासोबत खान्याचा आनंद घेई. कोणत्याही बेगमपेक्षा पातशहा शहजादीच खूप ऐकत होता. तिचा सल्ला ऐकतो. दूर्गाबाईला, राणूबाईला भेटण्यासाठी शंभूराजांकडे पाठवतो. पातशहाशी काही ना काही समझोता घडावा म्हणून शहजादीने ही वाट दाखवली होती. पण आपल्या बापाच्या क्रौर्याचा तिला चांगला अंदाज होता. (७७६)

औरंगजेब रात्रीच्या खान्यावेळी न चुकता उदेपुरी आणि शहजादीला सोबत घ्यायचा. त्यांच्याशी हृद्गत व्यक्त करताना त्याला हलके वाटायचे. (७८४) उदेपुरी ही खरी दाराची बायको होती. त्याला मारून पातशहा तिच्याशी जुलमाने लग्न करतो. ती काही न बोलता त्याची सेवा करते. ती पहिल्यांदाच पातशहाशी रागाने दुर्गाबाई व राणूबाईवर अत्याचार करु नये अस सांगते. पातशहा तिच म्हणण ऐकतो.

असे हे पातशहाचे विखूरलेले कुटुंब होते. पातशहा हुकूमशहाप्रमाणे वागत होता. प्रेम, माया हे त्याला माहिती नव्हत. त्यामुळे त्याच्या कुटुंबात प्रेमाऐवजी दहशत, संशय होता. तो आपल्या जवळच्यांना क्रूरपणे मारतो, मुला मुलींना शिक्षा देतो. त्याला कोणा विषयीच जिव्हाळा माया नव्हती. फक्त जिनतउन्निसा आणि उदेपुरी बेगम यांच्याशी गप्पा करत होता. त्यामुळे पातशहाच कुटुंब हे एकसंघ नव्हत. त्याच्या कुटुंबातील

नातेसंबंधही जुलमाचे, दहशतीचे होते. बाप मुलाचे संबंध, नवरा बायकोचे, भावा भावांचे, सासरा सून सबंध असे पातशहाचे सर्व नातेसंबंध संशयाने स्वार्थाने बरबटलेले होते. प्रेम,माया, जिव्हाळा,ओढ, विश्वास हे काहीही तिथे जाणवत नाही. पातशहाच मुळात असा असल्यामुळे त्याच्या मुलांमध्येही नातेसंबंध निर्माण झाले नाहीत. याला अपवाद म्हणजे जिनत उन्निसा ही प्रेमळ होती. तिला कमळजा, दुर्गा, राणूबाई यांच्यविषयी मनात दयाभाव होता. ती कमळजाशी बहिणीप्रमाणे राहत होती. उदेपूरी बेगमच्याही मनात राणूबाई व दुर्गाबाई यांच्याविषयी अनुकंपा होती. मात्र पातशहा हा क्रूर, संशयी होता.

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीत एकत्रित कुटुंबपध्दती पहायला मिळते. कुटुंबात हेवेदावे, प्रेम,आपुलकी, जिव्हाळा, ओढ, विश्वास पहायला मिळतो. विविध नातेसंबंधामुळे कुटुंबसंस्था टिकून आहे. गोदूचे कुटुंब स्वार्थी, गद्दार होते. त्यामुळे ती त्या कुटुंबाचा त्याग करते. शिवाजीराजांचे कुटुंब मोठे नातेसंबंधांची घट्ट वीण असणारे होते. मात्र सत्ता आणि स्वार्थ यामुळे कुटुंबातील काही व्यक्ती स्वार्थीपणे वागून कौटुंबिक अशांतता निर्माण करतात. शिवाजीराजांच्या कुटुंबातील बाप मुलगा, भाऊ भाऊ, सासरा-सून, पती-पत्नी, दिर-भावजय, मामा-भाचे, बहीण-भाऊ, अशी काही नाही विश्वासाची अतूट प्रेमाची सामंजस्याची,निस्वार्थतेची होती. पातशहाच्या कुटुंबात प्रेम, माया, ममता, विश्वास हया गोष्टी नावालाही जाणवत नाही. सत्ता आणि संपत्ती हेच कुटुंबाच एकमेव ध्येय जाणवत. सत्तेसाठी सख्या नात्यांचा गळा घोटणारे नातेवाईक इथे पहायला मिळतात. उदेपूरी आणि जिनतउन्निसा हया कुटुंबाचा धागा पकडून ठेवतात. मात्र एकूणच पातशहाचे कुटुंब या व्याख्येत न बसणारे होते.

## ८.८ सण – समारंभ – उत्सव

संभाजी या ऐतिहासिक कादंबरीमध्ये जे समाजजीवन चित्रण आलेल आहे त्यात काही सण-समारंभाचा उल्लेख आहे. या काळातील समाजात कोणते सण जात साजरे केले जात होते याची माहिती मिळते.

**१) राज्याभिषेक :–** १६ जानेवारी १६८१ ला संभाजी महाराजांचा राज्याभिषेकाचा सोहळा होतो. मोठा दरबार भरतो. राज्यभिषेकाच्या या दरबारासाठी देशोदेशींचे अनेक दूत आणि स्वराज्यातील लाखभर माणसे गडावर

गोळा होतात. त्यात अनेक भटभिक्षुक, ब्राह्मण, जोगी, कलावंत अशी हजारोंच्या संख्येने मंडळी जमली होती. राजपरिवारातील अनेक पाहुणे मंडळी सहकुटुंब राजधानीत येऊन पोचली होती. जागोजाग कमानी उभारल्या होत्या. गंगासागराजवळचे द्वादशकोनी मनोरे , ठिकठिकाणचे बुरुज रंगीत पताकांनी मढविले गेले होते. (२५०) दरबाराची मांडणावळ पातशहाच्या दरबाराला वरताण अशी होती. सोहळ्यासाठी राजांनी मुठीमुठींनी मोहरा उधळल्या होत्या. दरबारातल्या भिंती रामायण महाभारतातील अनेक प्रसंगचित्रांनी सुशोभित केल्या होत्या. स्फटिकासारख्या सुंदर व्हेनिसी काचसामानाने बनवलेली झुंबरे दरबाराची शान वाढवत होती. मानकऱ्यांसाठीही मखमली लोडक्यांची व्यवस्था केली गेली होती. रायगडावरील सुवर्ण सिंहासन शंभूराजांची वाट पहात होते. मंगल वाद्ये वाजतात. पाठोपाठ नगारे मोठयाने झडतात आणि भालदार चोपदारांची ललकारी घमुते.

"आस्ते कदम महाराजऽऽ! सकलशास्त्र विचारशील, धर्मज्ञ, शास्त्रकोविद, क्षत्रियकुलावंतस श्री शंभूराजा आ रहे हैऽऽ।"

त्या पाठोपाठ शंभूराजांचे आगमन होते. दरबारात हर्षाच्या आरोळ्या उठतात. राजांच्या पाठोपाठ येसूबाई येतात. त्यांच्या पाठोपाठ राजारामांच्या पत्नी जानकीबाई, सोयराबाई येतात. शंभूराजांसोबत राजाराम येतात. शंभूराजे निर्धाराने सिंहासनावर आरुढ होतात. त्याक्षणी बुरुजा-बुरुजावरून तोफा धडाडू लागल्या. नंगारे झडतात. हलग्या कडाडतात शंभूराजांवर पुष्पवृष्टी होते. मंत्रपठण, जयघोष, विधी सारे काही एकाच वेळी यथासांग सुरू होते. आरंभीचे सोहळे उरकल्यावर नजराणे पेश झाले. परराज्यातील वकील आदराने झुकले. मानस्त्रे देण्याचा कार्यक्रम होतो. राजे आपल्या नातेवाईकांचा मानवस्त्रे देऊन गौरव करतात. होळीच्या माळावर अखंड दक्षिणावाटप आणि दानधर्म सुरू होता. हिंदुस्थानच्या कानाकोऱ्यांतून आलेले भटभिक्षुक तिथे गर्दी करत होते. राजांनीही दरबारात खूप दानधर्म केला होता. हिंदवी स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतीच्या राज्याभिषेकाचा मंगल सोहळा थाटात पार पडला होता. (२५०,२५१,२५२,२५३,२५५,२५६)

समाजजीवनात उत्सव साजरे केले जात होते. रायगडावरील रंगपंचमी म्हणजे खुद्द शिवाजीराजांच्या राज्यातली, राजाची असल्यामुळे त्या सणाचे मोठे स्वरूप होते. उत्साह, सजावट, रांगोळ्या, पताका अशा गोष्टींनी वातावरण मंगलमय झाल होत. राजांचा सण असल्यामुळे भव्यता-दिव्यता त्यात दिसून येते. स्त्रियांचा

मंगळागौर हा सण होता. राजारामांची मौजीचा व विवाह सोहळा मोठया थाटामाटात साजरा होतो. शंभूराजे हनुमान जयंती साजरी करतात. शंभूराजांचा राज्याभिषेक सोहळा तर भव्य दिव्य होता. मोठ्या थाटा-माटात उत्साहात तो पार पडतो. पोतुगीजांचाही विजयोत्सव पणजीत उत्साहाने साजरा केला जातो. शंभूराजांच्या कैदेनंतर राजारामांचा राज्याभिषेक छोटेखानी सोहळ्याने पार पाडल्या जातो. मुसलमान सैनिक शत्रूच्या मरणाचाही उत्सव साजरा करतात. शंभूराजांच्या मृत्यूनंतर सैनिक आनंदाने नाचतात.

## ८.९ पोषाख व दागदागिने

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीत सोळाव्या शतकातील समाजजीवन चित्रित केलेले आहे. त्या काळातील दागदागिने पहायला मिळतात. त्या काळात राजे-पदाधिकारी, राजस्त्रिया भरजरी पोषाख परिधान करत होते. पुरुषही दागिने परिधान करत होते. पोषाख व दागिन्यांवरुन त्या व्यक्तीच्या आर्थिक स्थितीचा सहज अंदाज येत होता. राजे-सरदार आपल्या हत्तीला व घोडयालाही सोने, चांदी, मोती, पोवळे, पाचू अशा रत्नांनी सजवत होते. या कांदबरीत राजे व सरदार यांचच वर्णन मोठया प्रमाणात असल्यामुळे त्यांच्याच पोषाख व दागिन्यांच वर्णन आहे. त्या काळात रोजच्या वापरात दागदागिने, भरजरी पोषाख घालण्याची पध्दत होती.

संभाजी कादंबरीमध्ये सोळाव्या शतकातील पोषाख व दागिने यांचा उल्लेख आलेला आहे. त्या काळी लहान मुली परकर-पोलके, घालत होत्या. लहानपणीच लग्न झाल्यामुळे त्यांना लुगडे नेसावे लागत होते. पतीनिधनानंतर पांढरी वस्त्री त्या घालत. स्त्रिया लुगडे, शालू, गळ्यात सुवर्णालंकार, नाकात नथ, पायात जोडवे, सोन्याचा कमरदाब, भर्जरी शाल, असा वेष व दागिने घालत होत्या. मुसलमान स्त्री लेव्हेंगा कुर्ता घालत होती. पुरुष हे अंगात अंगरखा, बाराबंदी, सदरा जाळीदार सदरा, शाही लिबास, कमरेला कमरदाब, जामा, मलमलचा सदरा, जरीचे सदरे, गळ्यात पाचूच्या, रत्नांच्या मोत्यांच्या माळा परिधान करत. कवड्याची माळ, कंठा, रत्नहार, चांदीचा करदोडा, बोटात हिऱ्याची अंगठी, तांब्याची अंगठी असे अलंकार. मुसलमान सैनिक अंगात हिरवे सदरे, मांडचोळणे घालत होते.

पुरुष डोक्यावर पगडी रेशमी जिरेटोप, किमाँश, लष्करी पगडी, पागोटे, बसका मंदिल, मुंडासे, फेटे असे परिधान करत होते. अंगावर उपरणे, शेला घेत होते. युद्धाचा पोषाख वेगळा केला जात होता. पालखीचे भाई, रायाप्पा हे डोक्याला मुंडासे–फेटे आणि अंगात घोंगडी काचोळी घालत होते. पोर्तुगीज वकील जाड डगला व पतलू न घालत, अरबी चटटयापटटयाच्या लुंग्या व अंगरखे घातल.

आपल्या पदाप्रमाणे पगडी आणि रत्नालंकार पदाधिकारी परिधान करत होते. स्त्रिया भरपूर दागदागिने परिधान करत होत्या. पोषाख व दागिने यावरुन आर्थिक स्थितीचा अंदाज सहज बांधता येत होता.

## ८.१० संभाजीतील भाषा

"संभाजी" ही ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरीचा काळ सोळाव्या शतकातील आहे. त्या काळातील भाषा या कादंबरीत काही ठिकाणी वापरलेली आहे. त्या काळातील समाजात वापरल्या जाणाऱ्या भाषा, त्यातील शब्द या कादंबरीच्या निवेदनात आलेले आहे. शिवाजी–संभाजी राजांची भाषा, स्त्रियांची भाषा,सैनिकांची भाषा, अष्टप्रधानांची भाषा, सर्वसामान्य शेतकऱ्यांची भाषा, स्वामीची भाषा, पातशहाची त्याच्या स्त्रियांची, सैनिकांची भाषा असे भाषेचे विविध स्तर या कादंबरीत आहेत. या भाषेमुळे संभाजी कादंबरीतील समाजजीवन डोळ्यापुढे उभे राहते. त्या काळातील समाजातील बोलल्या जाणाऱ्या भाषेतील शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी इत्यादी कादंबरीत सहज सामावलेले आहेत. (पत्रांची, खलित्यांची भाषा, हुकुमाची भाषा, दरबारातील भाषा.)

### १. वाक्प्रचार :–

विश्वास पाटील यांच्या कांदबऱ्यामध्ये वाक्प्रचारांचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. प्रसंगाला शोभणारे वाक्प्रचार वेगवेगळ्या व्यक्तींच्या भाषेला शोभणारे वाक्प्रचार 'संभाजी' कांदबरीच्या भाषेमध्ये आहेत. पानोपानी मुबलक प्रमाणात वाक्प्रचार पहायला मिळतात.

१) चेकाळून जाणे २) घशाला कोरड पडली ३) तिघेही गांगरले ४) बिंग फोडणे ५) भितीने पाय लटपटले ६) पाठ सोडायला तयार नाही ७) बावरून गेले ८) भंबेरी उडाली ९) काळेबेरे होते १०) खजील झाले ११) काळीज तीळतीळ तुटते १२) फैलावर घेतले १३) तपतप करणे १४) खरडपट्टी काढली १५) संयमाचा बांध फुटला १६) पोबारा केला १७) रोखून पाहणे १८) डागण्या देणे १९) वाचा बसणे २०) मनाचा हिरया करून २१) पितळ उघड पडले २२) धारेवर धरले २३) सिंहाचा वाटा होता २४) बाशिंग बांधणे २५) सुंठेविना खोकला गेला २६) सुटकेचा सुस्कारा सोडला २७) काटा काढणे २८) अवसान गळणे

**२) म्हणी :-**

संभाजी कांदबरीतील भाषेमध्ये वाक्प्रचारांप्रमाणे म्हणींचाही वापर चपखलपणे आणि प्रत्ययकारी केलेला आहे.

- आयत्या पिठावर रेघोटया ओढणे. (२४)
- पाण्यावर वल्ह चालवल म्हणून पाणी तुटत नाही. (४८)
- काहीतरी लपावायला जावे आणि अधिक उघडे पडावे. (५८)
- वळचणीच पाणी पुन्हा आढयावर चढण अशक्य. (७५)
- ढवळयाशेजारी पवळा बांधला की, वाण नाही पण गुण लागतोच. (८२)
- एका दगडात अनेक पाखर मारणे. (१००)
- नाकापेक्षा मोती जड होऊ देऊ नका. (१३२)
- आगीतून निघून फुफाटयात धूळ खात मरायच. (१३६)
- काठीही मोडायची नाही आणि सापालीही मरू दयायचे नाही. (१४४)
- दे माय धरणी ठाय. (१६५)

**३) शिव्या :-**

- संभाजी कांदबरीतील भाषेत शिव्याचाही वापर झालेला आहे. बोलणाऱ्या व्यक्तीकडून रागाच्या भरात आपसूक शिवी बाहेर पडते. शिव्या हा भाषेचा नैसर्गिक अविष्कार किंवा हुंकार किंवा प्रतिक्रिया आहे.

- ती छिनाल रंडीच शिवाजीची भगत आहे.(५)
- पाठच्या दरवाजाने भेटणाऱ्या हलकट, रांडूळ्या नामर्दाची संख्या जगात काय कमी असते ?(२९)
- अशा नीच कल्पनांच्या सापसुरळया सोडणारी घुबडांच्या औलादीची माणसं हया स्वराज्यात उच्च पदावर काम करतात.(८५)
- मोठयाने गर्जना करीत आवाज दिला, कुठे आहे तो बुढढा, हरामखोर दिलेरखान ? (१४०)
- दुर्गा कसले भिकारडे तकदीर म्हणायचे ग आमचे. (१५१)
- संभासारख्या बेवकूफ लौडा कोणी बघितला नसेल. (१५५)
- डोक फिरल्यासारख काय बोलता आहात हंबीरराव (२०७)
- गाढवा, राजे जर तिथं नाहीत, तर न्यायदानाला कोण बसलंय (२४५)
- ये मरगठ्ठे तो पुरे निकम्मे है और हमारे जासूद बेवकूफ. त्या शिवाजीपेक्षा त्याचा लौंडा संभा महाबदमाष निघाला. (२६४)
- पातशहा बुढ्ढा शहजादे नादन और पोते बेवफूक. आमचे सारे अमीरउमराव गधे. (४५८)

## ४) प्रतिमा :-

'संभाजी' या कादंबरीतील भाषेत काळजाला भिडणाऱ्या, अर्थ अधिक उलगडून सांगणाऱ्या, समर्पक, चपखल प्रतिमा आहेत. ग्रामीण बोली, हिंदी भाषेतील प्रतिमा योग्यप्रकारे भाषेत येतात.

- गोदू जशी काही वाऱ्याच्याच पाठीवर स्वार झाली होती. (४)
- तिने डोंबाऱ्याच्या पोरासारखी काठी धरून पुढच्या बाजूला उडी ठोकली. (५)

●महादजींचे बोल युवराजांचे काळीज चिरत गेले. (१२१)

●माशाचे जिवंत पिल्लू कोणीतरी तापल्या तव्यावर दुष्टपणाने टाकावे, तशीच मियॉखानची अखंड तडफड चाललेली होती. (१२७)

●तेवढयात उकळत्या तेलाचे थेंब पडावेत, तसे दिलेरचे शब्द युवराजांच्या कानावर आले. (१३८)

●राणूबाईच्या बोलाबरोबर दुर्गाबाईच्या चर्चेवर वसंत फुलला. (१३९)

●शेताच्या बांधात लपून बसलेल्या उंदरासारखा खान आत लपला होता. (१४०)

●पाषाणह्दयी दिलेरखानाशी दोस्ती ठेवणे यापुढे शक्यच नव्हते. (१४८)

●चरकामध्ये उसाचे कांडे पिळावे, तसे शंभूराजाचे मन अखंड आक्रंदत होते. (१४९)

●सातशे मराठयांचे थोटके हात आणि लंगडे पाय त्यांच्या डोळ्यासमोर वेताळांच्या दिवट्यांसारखे नाचत होते. (१५०)

**५) संवाद :-**

'संभाजी' कादंबरीमध्ये काही ग्रामीण हिंदी, तर काही दरबारी भाषेतील, खाजगी संवाद आहेत.

१. रायाप्पा गोदूविषयी शंभूराजांशी बोलतो त्यावेळचा संवाद,

'सरकार, लोक आपल्याबद्दल उगाच कुजकं बोलत्यात. ते ऐकायला बरं न्हाई वाटत. '

"कशाबद्दल बोलतोयस राया? "

"ती वाड्यात राणी सरकारांनी आणलेली देखणी बया. तिला तेवढी वाहीर काढा (३२) "

२. शेतकरी शंभूराजांकडे आपल गाऱ्हाण घेऊन येतात त्यावेळचा संवाद.

''मायबाप सरकार, वाचवा हो वाचवा. आम्ही कसं जगायचं ते सांगा हे जप्तीचे हुकूमनामे बघा. ''

''कोणी घाडलेत ते ?''

''पार रायगडावरून आलेत बघा.''

''कविराज, बघा बरं. काहीतरी घोटाळा दिसतो आहे. इथली प्रभावळीची सुभेदारी राजांनी आमच्याकडे दिली असताना आम्हांला डावलून हे हुकूमनामे रायगडावरून येण्याचं काय कारण?''

''आम्ही तरी काय करणार धनी? गेली सहा-सात सालं काही पिकलंच नाही बघा. ओढयाचं पाणी सारखं खलाटीत सुटतं. शेताला बांध राहत नाही आन काई पिकतबी नाही. कितीतरी लोकांनी वैतागून गळफास लावून घेतलेत बगा ... दया करा! मायबाप न्याय दया. ''

''कलशजी, हया सर्वांना माफीनाम्याचे लेखी हुकूम दया.'' (७७,७८)

**६) चित्रदर्शी भाषा :-**

विश्वास पाटील यांच्या कांदबऱ्यांतील भाषेचा महत्त्वाचा गुण म्हणजे चित्रदर्शीपणा संभाजी कांदबरीतील भाषेमध्ये प्रसंग डोळ्यापुढे हुबेहूब उभे करण्याचे सामर्थ्य आहे. 'संभाजी' कांदबरीतील राज्याभिषेकाचा, शंभूराजे दिलेरखानाला मिळण्याचा, परत येण्याचा, फडावरील कामकाजाचा, पातशहाची फौज दक्षिणेकडे मार्गक्रमण करण्याचा, पातशहाने दिलेल्या क्रूर शिक्षेचा, शंभूराजांच्या अटकेचा इत्यादी असे सर्व घटना प्रसंग चित्रपटात घडल्याप्रमामे डोळ्यासमोर उभे राहतात. त्या काळातील वातावरणानिर्मिती हुबेहूब केलेली आहे. या कादंबरीतील भाषेमुळे ते- ते प्रसंग डोळ्यापुढे उभे राहतात आणि कायमचे लक्षात राहतात. हे विश्वास पाटील यांच्या भाषेचे सामर्थ्य आहे.

१) शंभूराजे दिलेरखानाकडे जातात तेव्हाचा प्रसंग :-

''खंडोजी म्हातारा मुलखाचा चिकट होता. त्यांचा घोडा अगदी आपल्या घोडयाच्या शेपटाजवळ येऊन भिडतोय. हे शंभूराजांच्या लक्षात आलं, तसे ते गांगरून गेले. शंभूराजांनी सरळ समोरच्या काठाकडे धाव घेतली. अगदी त्यांच्या थेट नावासमोर खडी दरड होती. ती पार करण्यासाठी घोडा डावीकडे किंवा उजवीकडे तिरपा वळवूनच पुढे धाव घेणे आवश्यक होते. परंतु पाठशिवण टाळण्याच्या धुंदीतच युवराजांनी आपले जागेवर सरळ नावासमोर रेटले. परंतू या खडया काठाची अटकळ आल्याने ते मुके जनावर जागच्या

जागीच आपले खूर नाचवत खिंकाळत उभे राहिले. संतापलेल्या युवराजांनी जोरात टाच मारली आणि अतिशय वेगात लगाम खेचला. तशी घोडयाच्या नाकातून रक्ताची धार सुटली. मात्र पाठीवरच्या आपल्या धन्याची निकड त्या जनावरांच्या ध्यानी आली असावी. त्यामुळेच धुंदावलेला हैबती घोडा ती उभी चढण चढायचा वेडा प्रयत्न करत पुढे धावला. तो सारा प्रकारच आपल्या आवाक्या बाहेरचा आहे, हे घोडयाच्याही लक्षात आले. तरीही तो नेटाने पुढे झेपावण्याचा प्रयत्न करू लागला आणि त्या नादामध्ये धाडकन खाली कोसळला. जनावरासोबतच युवराजांच्या अंगाचीही दामटी व्हायची वेळ आली होती. मात्र घोडा कोसळण्यापूर्वीच युवराजांनी पलीकडच्या अंगाला उडी ठोकली आणि स्वतःला कसेबसे वाचवले. मात्र त्या अवघड कसरतीने हैबती घोडयाचे पेकाट मोडले होते. बरगडया फुटल्याने ते मुके जनावर जागच्या जागी शेवटचे आचक देत होते. घोडयाची छाती फुटल्याने भयंकर रक्तस्त्राव झाला होता. त्याच्या नाकपुडयांतून घुरघुर असा आवाज येत होता. त्याच्या खुरांची वेदनेने होणारी तडफड संभाजीराजांना पाहवेना. ते काठावरच्या मोगली पथकाला विसरून मागे धावले. त्यांनी घोडयाच्या जीनसामानावरच्या चामड्याच्या पिशवीचा बंद तोडला. त्यामध्ये साठवलेले पाणी ते मृत्यूपंथाला लागलेल्या घोडयाच्या तोंडात ओतू लागले. त्या जनावराचे बघता बघता अगं ताठ होत गेले आणि त्याने डोळे मिटले, ते कायमचेच.'' (११३,११४)

'संभाजी' या कादंबरीत समाजात वापरली जाणारी भाषा आहे. सोळाव्या शतकात वापरल्या जाणाऱ्या भाषेचा प्रत्यय 'संभाजी' कादंबरीतून येतो. या कादंबरीत हिंदू, मुसलमान राजांचा उल्लेख आहे. त्यामुळे मराठी, हिंदी, भाषा या कादंबरीत आहे. मराठी भाषेतही हिंदी भाषेतील शब्द रूळलेले आहेत. समाजात बोलली जाणारी ग्रामीण बोलीही या कादंबरीत आहे. भाषेच्या योग्य वापरामुळे त्या काळातील समाजजीवन प्रत्यक्ष उभे राहते. वाक्प्रचार, म्हणी, शिव्या, प्रतिमा, संवाद, चित्रदर्शी भाषा असे भाषेतील विशेष आहेत.

### ८.११ समारोप

संभाजी या ऐतिहासिक कांदबरीत सोळाव्या शतकातील समाजजीवन पहायला मिळत. त्या काळातील समाज कसा होता ? त्या काळातील रूढी-परंपरा, धार्मिक, आर्थिक, राजकीय स्थिती कशी होती? त्या काळातील पोषाख-दागदागिने, सण-समारंभ, स्त्रियांची स्थिती, कुटुंबसंस्था त्यातील नातेसंबंध त्या समाजातील भाषा कशी होती? या सर्वांचा अभ्यास या प्रकरणात केलेल्या आहे.

याशिवाय त्या काळातील समाजजीवनात जातियता पहायला मिळते. हिंदू आणि मुसलमान या दोनही धर्मात जातियता होती. शंभूराजें महारमांग, कोळीकोष्टी, धनगर कटकी अशा हलक्या लोकांत वावरत होते. त्यामुळे काही शास्त्री पंडित आणि घरंदाज मराठे नाराज झाले होते. (३०) शिवाजीराजांच्या अष्टप्रधानातील ब्राह्मण आणि प्रभू जातीमध्ये कमालीचे अंतःस्थ वैर होते. स्वराज्यात गडागडावर चांद्रसेनीय कायस्थ प्रभू जातीचेच लोक माजत चालले आहेत असा ब्राह्मण मंडळीचा आक्षेप होता. अष्टप्रधानांमध्ये एका बाजूला बाळाजी आवजी चिटणीस (प्रभू) आणि दुसरीकडे अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे अशी दुही मजली होती. (८१) मुसलमानामध्येही शियापंथी आणि सुन्नपंथी यांच्यातही जातीवाद होते. मुनासीब खान म्हणतो, "आज शियापंथी दख्खनी मुसलमानांसाठी दुनियेतला सर्वात बडा कापर औरंगजेब पातशहा आहे. (१५७) " उच्चनीचतेच्या, शहाण्णव-ब्याण्णव कुळीच्या भेदाने मराठा जात कायमची पांगळी झाली. (१७७) अशाप्रकारे दोन्ही समाजात जातियता होती.

न्यायव्यवस्था ही न्यायधिश आणि काझी यांच्याकडे सोपवलेली होते. मात्र गुन्हे गाराला शिक्षा राजाच देत होता. पातशहा हा काझीने दिलेला न्याय त्याच्या मर्जीप्रमाणे असेल तर मानत होता. अन्यथा आपल्या मर्जीतील काझी निवडत होता. शिवाजीराजे, शंभूराजे मात्र न्यायाधिशाचा निर्णय अंतीम मानत होते. आपली दहशत बसविण्यासाठी बंदीखाना, कैदखाना, फासी, कडेलोट, हात-पाय तोडणे, संपत्ती जप्त करणे, पदावरून काढून टाकणे अशा शिक्षा दिल्या जात तर काही जीभ कापणे, डोळे फोडणे, हत्तीच्या पायी देणे, अंगावरची कातडी काढणे, गळा चिरणे अशा क्रूर शिक्षा दिल्या जात होत्या.

'संभाजी' या कादंबरीतील स्त्री-जीवन धाडसी, शिक्षित, राज्यकारभारात सक्रिय सहभाग असणारे आणि काही प्रमाणात स्वार्थी होते. संभाजी कादंबरीमधील समाजजीवन रूढी परंपरा पाळणारे होते. बालविवाह,

बहुपत्नी, हुंडा, सती, पुनर्विवाह, गुलामाची, औक्षणाची प्रथा, दानधर्माची, मुहुर्त पाहण्याची, मुसलमान धर्मात स्त्रियांना घुंगट घेण्याची प्रथा अंतिमसंस्काराच्या प्रथा, नवस बोलण्याची इत्यादी बऱ्याच प्रथा समाजजीवनात होत्या. या प्रथा-परंपरांबरोबरच श्रध्दा अंधश्रध्दा समाजात होत्या. रंगपंचमी, लग्न, मौज, हनुमान जयंती, राज्याभिषेक, पोर्तुगीजांचा विजयोत्सव, आनंदोत्सव असे काही सण-उत्सव-समारंभ आहेत. संभाजी कादंबरीत राज्याची व राजे-महाराजे यांच्या आर्थिक स्थितीचे वर्णन आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती उत्तमच होती. मात्र लढाया आणि दुष्काळ, प्लेग यामुळे राज्याची आर्थिक स्थिती खालावते. समाजात धार्मिकता होती. देवदर्शन, पूजाअर्चा केल्या जात होत्या. राज्यकारभार विविध खात्यांमध्ये विभागला गेला होता. हेरखाते, डाकखाते हे दोन खाते राज्यकारभारात महत्त्वाची भूमिका बजावत होते. हिंदू राज्यकारभार नैतिकतेने चालत होता. तर मुसलमान राज्यकारभार काही वेळा जुलमाने, जबरदस्तीने, अनैतिकतेने चालवला जात होता. समाजात एकत्र कुटुंबपध्दती होती. कुटुंबात भरपूर माणसे राहत होती. नात्यांचे विविध पदर उलगडले आहेत. त्या काळी स्त्री-पुरुष दोघेही दैनंदिन जीवनात दागिन्यांचा वापर करत होते. आपआपल्या आर्थिक परिस्थितीनुसार दागिने व पोषाख परिधान करत होते. त्या काळच्या भाषेत हिंदी, उर्दू शब्द वापरले जात होते. सर्वसामन्य लोक ग्रामीण बोलीचा वापर करत होते. तर राजा पदाधिकारी दरबारी भाषेचा वापर कामकाजाच्यावेळी आणि वैयक्तिक जीवनातही करत होते.

असे संभाजी कादंबरीतील समाजजीवन होते. त्याकाळी उजेडासाठी मशाली, दिवटया, समया, दिवे, चिरागदाणे यांचा वापर केला जात होता. प्रवासासाठी पुरुष घोडयांचा, उंट, हत्ती, पालखी यांचा प्रसंगानुसार वापर करत होते. स्त्रिया या पालखी, मेणा यांचाच वापर करत होत्या. आनंद झाल्यावर मनासारखी खबर आणल्यावर युध्दाच्या विजयानंतर बक्षीस देण्याची पध्दत होती. राजे सरदार आनंदाची बातमी आणऱ्यांना स्वतःच्या गळ्यातला दागिना देत होते. स्वागत करण्याची पध्दत भव्य-दिव्य होती. असे एकूण समाजजीवन त्या काळातील होते.

## ८ .१२ संदर्भ (संभाजी)

१) शंकर सारडा,''विश्वास पाटील यांची महाकादंबरी संभाजी'' मेहता मराठी ग्रंथजगत, अंक जाने २००६. पृ.क्र.३३,३५.

२) विश्वास पाटील, ''संभाजी कादंबरीचा हस्तलिखित प्रदान सोहळा'' मेहता मराठी ग्रंथजगत, अंक जुलै–२००५, पृ.क्र.२८.

३) तत्रैव, पृ.क्र.३०.

४) तत्रैव, पृ.क्र.३१.

प्रकरण नववे

# उपसंहार व निष्कर्ष

## ९.१ उपसंहार

''विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास '' या शोधप्रबंधात विश्वास पाटील यांच्या ''पांगिरा, झाडाझडती, पानिपत, संभाजी'' या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास केलेला आहे. या कादंबऱ्यांतील समाजजीवनाचे स्वरूप कसे आहे याचा अभ्यास केलेला आहे.

विश्वास पाटील यांनी कादंबऱ्यांतील अनुभवविश्व स्वानुभवातून रेखाटलेले आहे. त्यांच्या वास्तववादी चित्रणातून समाजाचे चित्र उभे राहते. विश्वास पाटील यांचे अनुभवक्षेत्र सूक्ष्म व बहुकेंद्री आहे. त्यांच बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे तेथील अस्सल रंग–ढंग, समाज, भाषा, निसर्ग, परिसर या सर्वांचा त्यांनी स्वतः अनुभव घेतला. ते स्वतः एका शेतकऱ्याच्या घरात जन्माला आले आहेत. गरिबी, शेतकरी जीवन त्यांनी स्वतः अनुभवलेले आहे. यातूनच त्यांचा अनुभव समृध्द होत गेला. गरिबीचा अनुभव जसा त्यांनी घेतला, तसाच उच्चवर्गाचा अनुभवही त्यांनी घेतला आहे.दोन्ही स्तरांच्या अनुभवामुळे त्यांचे लेखन अधिक समृध्द झाले. दोन्ही स्तरांचे जीवनचित्रण ते अधिक सूक्ष्मपणे मांडतात. त्याचप्रमाणे ते स्वतः एक वरिष्ठ सरकारी अधिकारी आहेत. त्यामुळे सरकारी कार्यालय, तेथील वातावरण, कर्मचारी वर्ग, त्यांचे स्वभाव, काम करण्याची पध्दती, त्यांची वृत्ती, तेथील भ्रष्टाचार, राजकारण्यांशी असलेले संबंध, कायदे, कागदपत्रे, फाईल्स, त्यांची भाषा बोलण्याची पध्दती इत्यादींचा त्यांनी स्वतः अनुभव घेतलेला आहे. हे सर्व त्यांनी पाहिलेल आहे. त्यामुळे कादंबऱ्यांतील या सर्वांचे वर्णन सूक्ष्मपणे, तपशीलवार व वास्तवपणे चित्रित झालेले आहे.विश्वास पाटील स्वतः एल.एल.बी झालेले आहेत. त्यामुळे कायदे, न्यायव्यवस्था, न्यायालयीन कामकाज, वकील इत्यादींचाही त्यांनी अनुभव घेतला असल्यामुळे याविषयीचे चित्रण ही बारकाव्याने आलेले आहे.

विश्वास पाटील यांनी आतून आलेल्या विषयावर कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. कोणी सूचवले किंवा पुरस्कार मिळेल म्हणून त्यांनी कादंबरी लेखन केलेले नाही. त्यांना जे जाणवल, अस्वस्थ केल ते त्यांनी शब्दबध्द केले आहे. ग्रामीण जीवनचित्रणात हे जे वास्तव आहे तेच लिहिले. उगीचच ग्रामीण कादंबरी जीवनाच्या

साच्याप्रमाणे पाटील, त्याचे अत्याचार, स्त्रियांवर डोळा अशा वर्णनात न अडकता वास्तव जीवनदर्शन घडवले आहे. ग्रामीण जीवन, त्यात होणारे बदल, शेतकी कष्टाची कामे, राजकारणाचा प्रसार अशा प्रत्यक्ष जीवनात दिसणाऱ्या गोष्टी कादंबरीत आहेत. म्हणूनच त्यांचे ग्रामीण जीवन वेगळे वाटते. आश्वासक वाटते. खरी माणसे, त्यांचे जगण्याचे अस्सल अनुभव, त्या अनुभवातून आलेली समजदारी, जीवनाशी झगडयाची वृत्ती हे सगळे कादंबऱ्यांमध्ये दिसते.

मानवी मनाची स्पंदने, मनाच्या विविध अवस्था, मनाची चलबिचल, मनाचा हळवेपणा, मनाची वेदना, कणखरपणा अशा मनाच्या विविध अवस्था, मानवाच्या स्वभावातील चढ□उतार विश्वास पाटील यांनी प्रभावीपणे मांडलेले आहे. मनाचे विविध पदर उलगडून दाखवले आहेत. कादंबऱ्यांमधील पात्र जीवंत व स्वतंत्र अस्तिवाचे आहेत. त्यांना स्वतःचे व्यक्तिमत्व, स्वतःचे विचार आहेत. प्रत्येक पात्राचा वेगळा स्वतंत्र ठसा उमटतो. विविध वृत्ती–प्रवृत्तीची माणसे चित्रित केलेली आहेत. मानवी स्वभावाचे विविध अंगे व्यक्त केलेली आहेत. प्रत्येक पात्र सजिव, जीवंत वाटते. त्याचा संघर्ष, त्याची घालमेल, त्याची अगतिकता खरी वाटते. येसूबाई, आवडा ह्या स्त्रीपात्रांना सक्षम बनवून स्वतंत्र स्थान दिले आहे. मात्र इतर स्त्रियांचे चित्रण प्रसंगानुरूप आलेले आहे.

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमधील साधी, सरळ भाषा हे मोठे बलस्थान आहे. कादंबऱ्यांमधील भाषा काळजाला भिडणारी आहे. कादंबऱ्यांमध्ये प्रासादिक भाषेचा वापर केलेला आहे. त्या त्या समाजजीवनात समाज जी भाषा वापरतो ती विश्वास पाटील यांनी वापरलेली आहे. ऐतिहासिक कादंबरीत त्या काळातील भाषेचा, शब्दांचा वापर उत्तमपणे केलेला आहे. भाषेमुळे शिवकाळ आणि पेशवेकाळ डोळयापुढे उभा राहतो. 'पांगिरा', 'झाडाझडती', या कादंबऱ्यांमध्ये पात्रांच्या तोंडी संवादासाठी ग्रामीण बोलीचा वापर सहज केलेला आहे. नागर भाषेचाही वापर काही पात्रांच्या तोंडी निवेदनासाठी केलेला आहे. अलंकारिक भाषेचा वापर केला नाही हे भाषेचे वैशिष्टयच म्हणावे लागेल.

स्त्री□पुरुष संबंध, स्त्रियांचे वर्णन करतांना मर्यादेचे उल्लंघन झालेले नाही.

कादंबऱ्यांमध्ये पात्रे, प्रसंग, वर्णन यांच्यात कृत्रिमता नाही. ते खरे व सहज वाटतात. संवाद ही पात्रांच्या भाव□भावना उलगडून दाखवतात. चित्रदर्शी भाषा हया गुणामुळे प्रसंग वाचकांच्या डोळयापुढे हुबेहूब उभा राहतो. जणूकाही आपणच त्या पात्राबरोबर आहोत असा आभास वाचकाला होतो. प्रसंगाची,भाव□भावनेची परिणामकारकता साधण्यासाठी चपखल, वैविध्यपूर्ण रोजच्या जीवनातील प्रतिमांचा वापर केलेला आहे. वाक्प्रचारांचा वापरही सहजसुंदर आहे. उगीचच भरल्यासारखे ते वाटत नाहीत. म्हणींचाही वापर असाच भाषेच्या ओघात केलेला आहे. विश्वास पाटील यांची भाषा वास्तव, सक्षम, साधी सरळ, मनाला भिडणारी आहे.

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वाचकाला दुःखी, हळव्या करतात. त्यांच्या (पांगिरा, झाडाझडती, पानिपत,संभाजी,) कादंबऱ्यांचा शेवट शोकात्म होतो. आनंदी शेवट न होता वाचकांच्या मनात प्रश्न उभे राहतात. वाचक अस्वस्थ होतो. कादंबऱ्यांमधील वास्तव त्याला अशांत करते आणि हेच विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांच यश आहे. वाचक अंतर्मुख होतो.

त्यांची 'पांगिरा' ही कादंबरी सोडली, तर इतर कादंबऱ्यांची पृष्ठसंख्या मोठी आहे. पण वाचतांना या पृष्ठसंख्येची अडचण वाटत नाही. विणाकारण पाल्हाळीक वर्णन नाही. प्रसंगांवरील भाष्य, प्रसंगांची सत्यता (स्पष्टीकरण) पात्रांच्या तोंडून सांगण्यात आलेली आहे. कादंबऱ्यांमध्ये कमी जास्त प्रमाणात समाजातील क्रौर्य मांडलेले आहे. काही उपरोधिक संवाद, डावपेच वाचकाला थोडस हसवतात. मानवी जीवनाचा, एका समाज मनाचा वेध कादंबऱ्या घेतात. 'पानिपत', संभाजी, या कांदबऱ्यांमधून व्यक्तीला, तिच्या नशिबाला, तिच्या जीवनातील प्रसंगांना उलगडून दाखवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तर 'पांगिरा' आणि 'झाडाझडती' तून एक समाज,त्याच दुःख, त्याच्या आजूबाजूची परिस्थिती मांडलेली आहे. कादंबऱ्यांमध्ये केवळ वर्णन केले नाही, तर अस का झाल? याची पार्श्वभूमीही मांडलेली आहे. व्यापक वास्तव जीवनानुभव त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये मांडलेला आहे. म्हणून विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वेगळया, दर्जेदार, वास्तव ठरल्या आहेत.

१)	उपोद्घात हे स्वतंत्र प्रकरण पहिले केलेले आहे. यात अभ्यास विषय निवडी मागील भूमिका, संशोधनाचे विधान, त्या विधानातील प्रत्येक शब्दाचा अर्थ, व्याख्या मांडलेली आहे. अभ्यासाविषयाची व्याप्ती आणि मर्यादा मांडलेली आहे. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे मांडलेली आहे, त्यानंतर संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या अभ्यासपध्दतींची माहिती दिली आहे, त्यानंतर पूर्व संशोधनाचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे आणि नंतर अभ्यासविषयाची प्रकरणशः मांडणी केलेली आहे.

२)	दुसऱ्या प्रकरणात ''विश्वास पाटील यांचे चरित्र व वाङ्मयीन कामगिरी'' याचा आढावा घेतलेला आहे. विश्वास पाटील यांचा जन्म बालपण, शिक्षण कोठे, कसे, किती झाले याची माहिती मांडलेली आहे. विश्वास पाटील यांनी काय काय लेखन केलेले आहे. याचाही आढावा घेतलेला आहे. विश्वास पाटील यांच्यावर कसे वाङ्मयीन संस्कार झाले हेही मांडलेले आहे. विश्वास पाटील यांच्या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांची थोडक्यात मध्यवर्ती कल्पना मांडलेली आहे. त्यानंतर संदर्भ दिलेले आहे.

३)	तिसऱ्या प्रकरणात ''कादंबरीचे स्वरूप '' थोडक्यात मांडलेले आहे. कादंबरीचा उदय, कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे घटक अशा घटकांची थोडक्यात आळख करून घेतलेली आहे. शेवटी संदर्भ दिले आहेत.

४)	चौथ्या प्रकरणात 'सामाजिक अभ्यास' यावर सविस्तर प्रकाश टाकलेला आहे. सामाजिक अभ्यास म्हणजे काय? समाज म्हणजे काय, समाजव्यवस्था, समाज साहित्यिक-साहित्य यांचा कसा सहसंबंध असतो हे स्पष्ट केलेले आहे. कादंबरीतील सामाजिकता कशी असते, ती कशी व्यक्त होते हे अभ्यासले आहे. मराठी कादंबरीतील सामाजिकतेचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. शेवटी संदर्भ दिलेले आहेत.

५)	पाचव्या प्रकरणामध्ये 'पांगिरा' या ग्रामीण कादंबरीतील समाजजीवनाचा आढावा घेतलेला आहे. ग्रामीण कादंबरी म्हणजे काय? हे आधी समजावून घेतलेले आहे. खेडयांची वैशिष्टये कोणती ती थोडक्यात मांडली आहे. 'पांगिरा' तील रूढी-परंपरा, राजकारण-भ्रष्टाचार, स्त्री जीवन, सण-समारंभ, उत्सव, पोषाख व दागदागिने, आर्थिकस्थिती, धार्मिक स्थिती, भाषा, बदलते समाजजीवन, लोककला,

न्यायव्यवस्था, कुटुंबसंस्था, शैक्षणिक स्थिती अशा समाजातील काही बाबींचा अभ्यास केलेला आहे. समाजजीवनाची वरील बाबींची स्थिती मांडलेली आहे.

६) सहाव्या प्रकरणामध्ये 'झाडाझडती' या सामाजिक कादंबरीतील समाजजीवनाचा आढावा घेतलेला आहे. सामाजिक कादंबरी म्हणजे काय हे समजून घेतलेले आहे. त्यानंतर 'झाडाझडती' तील रूढी□परंपरा, राजकारण व भ्रष्टाचार, स्त्री जीवन, सण□समारंभ, उत्सव, पोषाख, दागदागिने, आर्थिक स्थिती, धार्मिक स्थिती, भाषा, न्यायव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, शैक्षणिक स्थिती, समस्या, व्यवसाय अशा बाबींचे विश्लेषण केले आहे.

७) सातव्या प्रकरणामध्ये ''पानिपत''या कादंबरीतील समाजजीवनाचा आढावा घेतलेला आहे. त्याआधी ऐतिहासिक कादंबरी म्हणजे काय? हे समजावून घेतले आहे आणि त्यानंतर समाज जीवनातील रूढी□परंपरा□प्रथा, धार्मिक स्थिती,स्त्री□जीवन, सण□समारंभ□उत्सव, राज्यकारभार आर्थिक स्थिती, कुटुंबसंस्था, श्रध्दा□अंधश्रध्दा, पोषाख व दागदागिने, भाषा, व्यवसाय अशा बाबींचा आढावा घेतलेला आहे.

८) आठव्या प्रकरणामध्ये ''संभाजी'' या ऐतिहासिक कादंबरीत शंभूराजांच्या काळातील समाजजीवनाचा आढावा घेतलेला आहे. स्त्री जीवन, रूढी□परंपरा□प्रथा, धार्मिक स्थिती, श्रध्दा□अंधश्रध्दा, राज्यकारभार, आर्थिकस्थिती, कुटुंबसंस्था, सण□समारंभ□उत्सव, पोषाख व दागदागिने, भाषा, अशा बाबींचे वर्णन केलेले आहे. सोळाव्या शतकातील समाजजीवन कसे होते याचा अंदाज यावरून बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

९) नवव्या प्रकरणामध्ये सर्व प्रकरणांचा आढावा आणि निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

१०) दहाव्या प्रकरणामध्ये संदर्भ सूची दिलेली आहे. साधन ग्रंथ, सहाय्यक ग्रंथ, नियतकालिके, प्रबंध, मुलाखत अशांची यादी दिलेली आहे.

## ९.२ निष्कर्ष

विश्वास पाटील यांच्या अभ्यासासाठी निवडलेल्या ‘पांगिरा, झाडाझडती,पानिपत, संभाजी’ हया कादंबऱ्यांचा विषय – आशय, समाज संपूर्णतः वेगळा आहे. त्यामुळे त्यांचा निष्कर्षही एकत्रित काढणे योग्य होणार नाही. म्हणून प्रत्येक कादंबरीच्या समाजजीवनाचे निष्कर्ष वेगवेगळे काढलेले आहेत.

९.२.१ ‘ पांगिरा ’ कादंबरीचा निष्कर्ष

९.२.२ ‘ झाडाझडती ’ कादंबरीचा निष्कर्ष

९.२.३ ‘पानिपत ’ कादंबरीचा निष्कर्ष

९.२.४ ‘ संभाजी ’ कादंबरीचा निष्कर्ष

९.२.५ सर्व कादंबऱ्यांचे एकत्रित निष्कर्ष

## ९.२.१ ‘पांगिरा’ कादंबरीचा निष्कर्ष

‘पांगिरा’ ही स्वातंत्रोत्तर काळातील कादंबरी आहे. या कादंबरीचा काळ स्वातंत्र्यानंतरचा काही वर्षांचा आहे. या कादंबरीमध्ये एका ग्रामीण बदलाची गोष्ट आहे. या कादंबरीमध्ये ग्रामीण समाजजीवनाचे दर्शन विस्तृतपणे, सूक्ष्मपणे आणि वास्तवपूर्ण घडते. या कादंबरी वाचनाने ग्रामीण समाज डोळयापुढे उभा राहतो. कादंबरीत वर्णन केलेल्या काळातील समाजवैशिष्टये, समाजस्थिती लक्षात येते. बदलत्या समाजजीवनाचा वेध घेतलेला आहे.

१) **रूढी–परंपरा–प्रथा** : ‘पांगिरा’ तील समाजजीवनात रूढी–परंपरा–प्रथा समाजात जास्त प्रमाणात आढळत नाहीत. मात्र काही परंपरा प्रसंगानुरूप समाज पाळताना दिसतो.

२) **राजकारण आणि भ्रष्टाचार** : ‘ पांगिरा ’ तील समाजात राजकारण आणि भ्रष्टाचार यांचे प्रमाण फार मोठे जाणवते. राजकारण गावात बीजाच्या रूपात येते आणि त्याचा विस्तार वटवृक्षाप्रमाणे मोठा व समाजात खोलवर होतो. घराघरात राजकारण पोहोचते. राजकारणाशी काडीचाही संबंध नसणारे पाट्टीचे राजकारणी होण्याचा प्रयत्न करतात आणि आपली असली–नसली संपत्ती गमावतात. सरकारी

कर्मचारी आणि राजकारणी स्वतः भ्रष्टाचार करतात. भ्रष्टाचाराला खतपाणी घालतात. राजकारणाची खालावलेली पातळी दिसते. समाजात फोफावणारे भ्रष्टाचाराचे स्वरूप मांडलेले आहे.

३) **स्त्री जीवन** : 'पांगिरा ' तील स्त्री जीवनाला समाजात, कुटुंबात दुय्यम स्थान आहे. स्त्री अशिक्षित कष्टाळू, दारिद्रयात राहणारी, प्रेमळ आहे. पुरुषांच्या बरोबरीने शेतात ती राबते आणि घरकामही ती करते. मर्यादेत राहणारी स्त्री आहे. स्वार्थी, भांडणारी, गरीबांचे शोषण करणारी, अविरत कष्ट करणारी, हौशी, मायाळू असे स्त्रीचे विविध स्वभावगुण ' पांगिरा ' तील स्त्री जीवनात पहायला मिळतात.समाजात दुय्यम स्थान आर्थिक परावलंबन, स्वतःच कर्तव्य पार पाडणारी, शेतकरी स्त्री जीवन चित्रण केलेले आहे. सामाजिक जीवनात तिच्या भाव□भावनेला महत्त्व नाही.

४) **सण–समारंभ–उत्सव** : ' पांगिरा ' त ग्रामीण शेतकरी गरीब समाजाचे चित्रण आलेले आहे. राजकारण, गरिबी, दुष्काळ या विषयावर कादंबरीत भर दिलेला आहे. एकूण समाजात गरिबी आहे. त्यामुळे सण समारंभ उत्सव फारसे नाहीत.मात्र परंपरेनुसार जत्रेचा उत्सव गावकरी मोठया उत्साहाने, श्रध्देने साजरा करतात. मात्र काळानुसार या उत्सवाचे स्वरूप बदलते, महत्त्व कमी होते. नावालाच एक परंपरा म्हणून जत्रा भरवली जाते.

५) **पोषाख – दागिने** : ' पांगिरा ' तील समाज गरीब शेतकरी समाज आहे. त्यामुळे पोषाख साधा, प्रसंगी फाटका असतो आणि दागिने एखादे □दोनच तेही कायम गहाण ठेवलेले असतात. गरिबीमुळे पोषाख व दागदागिने फार नाहीत. स्त्रिया लुगड चोळी तर पुरुष धोतर, सदरा, मुंडास असा पोषाख करतात. राजकारणी पांढरे महागडे, कांजीचे कपडे घालतात.

६) **आर्थिक स्थिती** : 'पांगिरा ' तील समाजाची आर्थिक स्थिती जेमतेम होती. समाजात आर्थिक स्थितीनुसार दोन विभाग पडलेले दिसतात. एक श्रीमंत आणि एक गरीब. श्रीमंत गरीबांना राबवून घेतात. गरिब शेतकरी कर्ज, दुष्काळ, शेतीचे अत्यल्प उत्पन्न यामुळे कायम गरिबीतच राहतो. मात्र धनिक अनेक उदयोग, भरपूर शेती, व्याजाचा व्यवसाय, राजकारण्यांची ओळख, सरकारी योजनांचा वापर, लबाडू वृत्ती यामुळे ते कायम धनिकच राहतात. आर्थिक विषमता समाजात होती.

७) **धार्मिक स्थिती :** 'पांगिरा ' तील समाज धार्मिक होता. जत्रेचे धार्मिक विधी नियमाने पाळतो. मात्र काही वर्षांनी काही धार्मिक विधी केवळ नावापूरते पाळले जातात.

८) **भाषा :** ' पांगिरा ' तील समाजजीवनातील भाषा ग्रामीण आहे. समाजात बोलली जाणारी भाषा आहे. राजकारणी लोकांची भाषा ही आहे. भाषेवर परिसराचा, भौगोलिकतेचा ठसा उमटलेला आहे. भाषेला लोकजीवनाचा गंध आहे. वास्तवदर्शी भाषा आहे. भाषा समाजाशी एकवटलेली आहे.

९) **ग्रामीण बदल :** ' पांगिरा ' त समाजात जे काही बदल होतात तेही पहायला मिळतात. जत्रेचे स्वरूप, राजकारणाचे स्वरूप, माणसांची वृत्ती, निसर्गाचे स्वरूप,तमाशा, जत्रा या सर्वातील बदल कसे घडतात हे लक्षात येत. बदलते समाजजीवन वास्तवतेने मांडलेले आहे. बदलते समाजजीवनाचा लक्षवेधी वेध घेतलेला आहे.

१०) **लोककला :** ' पांगिरा ' तील समाजजीवनात मनोरंजनाचे साधन एकमेव म्हणजे जत्रेतील तमाशा हे होते. वर्षातून एकदाच जत्रेनिमित्त गावात तमाशा येत होता व माणसे तो बघण्यासाठी गावोगावून येत होते. मात्र आधुनिकीकरणामुळे गावोगाव व्हिडीओ येतात व तमाशाचे महत्त्व कमी होत जाते. लोककलावंतांचे हाल होतात.

११) **न्यायव्यवस्था :** ' पांगिरा ' तील न्यायव्यवस्थेतील वकील हे गरीबांना लुबाडणारे, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे होते. धनिकांना कायदा माहिती होता म्हणून ते गरीबांचे अंगठे योग्य कागदपत्रावर घेत होते. पोलीसांच्या कोणत्याही कारवाईत अडकत नव्हते. वर्षानुवर्षे न्यायनिवाडे चालत होते. पैसे घेऊन वकील, पोलीस केस फिरवत होते.

१२) **कुटुंबपध्दती :** ' पांगिरा ' तील समाजजीवनात एकत्र कुटुंबपध्दती होती. सगळे नातेवाईक गुण्यागोविंदाने राहतात. मात्र काळानुरूप विभक्त कुटुंब होतांना दिसतात. विभक्त कुटुंबाचे तोटे लक्षात आल्यावर परत एकत्र येतात. कुटुंबातील विविध नातेसंबंधाची वीण 'पांगिरा' त पहायला मिळते. नात्यांमधील प्रेम, माया, राग, द्वेष, हक्क, अधिकार, दया, पश्चाताप, गर्व इत्यादी भाव भावनांचे पदर उलगडलेले आहेत.

**१३) शैक्षणिक स्थिती :** 'पांगिरा' तील समाजात अशिक्षितता होती. समाजात अगदी थोडे जण थोडच शिकलेले होते. हळूहळू समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजू लागले व ते आपल्या मुलांना शिकवत होते. स्त्री शिक्षणाला अजिबात महत्व नव्हते.

## ९.२.२ ' झाडाझडती ' कादंबरीचा निष्कर्ष

' झाडाझडती ' ही धरणग्रस्तांच्या जीवनावरील कादंबरी आहे. स्वातंत्र्यानंतर विविध योजना आल्या. त्यातील एक म्हणजे धरण. धरणाचा प्रकल्प उभारला जातो. मात्र अनेक कुटुंब देशोधडीला लागतात. धरणग्रस्तांना मिळणाऱ्या सोयी□सवलती केवळ कागदावर राहतात. खऱ्या धरणग्रस्तांना त्याचा लाभ होत नाही. या कादंबरीत साधारणतः दहा ते पंधरा वर्षांचा काळ आहे. एका समाजजीवनाची वाताहत दाखविणारी ही कादंबरी आहे. सामाजिक प्रश्नांची मांडणी केली आहे. ज्वलंत वास्तव चित्रण करणारी कादंबरी आहे.

**१) प्रथा–परंपरा–रूढी :** 'झाडाझडती' तील समाज प्रथा, परंपरा पाळतो. स्त्रिया प्रथा अधिक प्रमाणात पाळतांना दिसतात. हुंडा, बालविवाह, दत्तक अशा प्रथा समाजात होत्या. हुंडा या प्रथेमुळे मुलाच्या वडलाला तो जमवतांना नाकीनऊ येत होते. काही प्रथा समाजाला जाचक होत्या.

**२) राजकारण आणि भ्रष्टाचार :** 'झाडझडती' ती समाजजीवनात मोठया प्रमाणावर राजकारण आणि भ्रष्टाचार आहे. सरकारी कर्मचारी कामचूकार भ्रष्टाचारी आहेत. पण काही प्रामाणिक कर्मचारीही आहेत. त्यांना त्यांच्या प्रामाणिकपणाची शिक्षा बदली अशी राजकारणी देतात. राजकारण आणि शासन हे एकमेकांच्या हातात हात घालून आपला स्वार्थ साधतात आणि गरीबांवर, अशिक्षितांवर अन्याय करतात. राजकारण आणि भ्रष्टाचाराचे उग्र दर्शन घडते.

**३) स्त्री – जीवन :** 'झाडझडती' त ग्रामीण शेतकरी स्त्री जीवन आहे. स्त्री अशिक्षित आहे. अंधश्रध्दाळू आहे, कष्टाळू आहे, धीराची आहे, अबला आहे, घरासाठी संसारासाठी अहोरात्र झगडणारी आहे. गरिबीत संसार करणारी आहे, पुरुषाच्या बरोबरीने काम करणारी आहे. मात्र सुख तिच्यापासून कायम दूरच आहे. आर्थिक परावलंबी आहे, कर्तव्यतत्पर आहे, सामाजिक जीवनात तिच्या भाव□भावनांना महत्त्व नाही.

४)    **सण – समारंभ – उत्सव** : ‘ झाडझडती ’ तील समाज हा रोजच्या जगण्याशी झगडणारा आहे. त्यांच्यापुढे पोटाचा प्रश्न मोठा आहे. त्यामुळे सण–समारंभ–उत्सव साजरे करण्यासाठी ना वेळ आहे, ना पैसा. बारस आणि लग्न हे अत्यावश्यक समारंभ घरच्या घरी कमी खर्चात उरकले जातात.

५)    **आर्थिक स्थिती** : ‘ झाडझडती ’ तील समाजात आर्थिक स्थिती बाबतीतील दोन गट आहेत. एक श्रीमंतांचा आणि दुसरा गरीबांचा आर्थिक दरी या दोन समाजजीवनात आहे. श्रीमंतांमध्ये राजकारणी, मंत्री, सरपंच, कारखानदार, कंत्राटदार, दलाल, पाटील, सरकारी कर्मचारी अशांचा समावेश आहे. तर गरीबांमध्ये धरणग्रस्त शेतकरी, कामगार वर्ग यांचा समावेश आहे. श्रीमंतांची श्रीमंती आणि गरीबांची गरिबी कमी होत नाही. ती दिवसें दिवस वाढतच जाते. समाजात विषमता आहे.

६)    **धार्मिक स्थिती, श्रध्दा अंधश्रध्दा** :– ‘ झाडाझडती ’ तील समाज धार्मिक वृत्तीचा होता. जांभळी गावातील समाज काळूबाई, लाडूबा अशा देवतांना पूजत होता. सर्वच गावाची काळूबाईवर श्रध्दा होती. धरण होऊन हे लोक धरणग्रस्त बनतात. तेव्हा रोजच्या जगण्याच्या लढाईत देवाकडे बघायलाही वेळ मिळत नाही. संकटांमुळे समाज अंधश्रध्देकडे वळतांना दिसतो.

७)    **भाषा** : ‘ झाडाझडती ’ त समाजाची ग्रामीण बोली आहे. समाजात जी भाषा बोलली जाते ती आहे. शिवाय राजकारणाची, शासनाची, न्यायव्यवस्थेची अशी वेगळी भाषाही आहे. ‘झाडाझडती’ तील भाषा काळजाला भिडणारी, थेट संवाद साधणारी आहे. त्यात अलंकारीक भाषा नसून साधी सरळ आहे.

८)    **न्यायव्यवस्था** : ‘ झाडाझडती ’ तील न्यायव्यवस्था दिरंगाईची किचकट आहे. वकील सर्वसामान्य जनतेला फसवतात. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतात, त्यांना लुबाडतात,धनिकांच्या –राजकारण्यांच्या बाजूने कायदयातील पळवाटा हुडकून काढतात. पैसे दिल्यावर ते कोणतेही काम करतात. अशी ही व्यवस्था होती.

९)    **कुटुंबसंस्था** : ‘ झाडाझडती ’ तील समाजजीवनात एकत्र कुटुंबपध्दती आहे. कटुंबातील सदस्य एकमेकांशी प्रेमाने विश्वासाने राहतात. कोणत्याही संकटाला कुटुंब एकत्रितपणे तोंड देत. कुटुंबातील प्रत्येक सदस्य आप–आपल्या कुवतीप्रमाणे काम करून घराला आधार देतो. कुटुंबामध्ये एकी आहे. सुख–दुःखात एकमेकांची साथ करणारे सदस्य आहेत. ‘झाडाझडती’ तील कुटुंबसंस्था मजबूत आहे. सशक्त आहे.

१०) **शैक्षणिक स्थिती** : ‘ झाडाझडती ’ त ग्रामीण समाजचित्रण मोठया प्रमाणात आहे. त्या समाजात शैक्षणिक स्थिती उदासिनतेची आहे. शिक्षणाचा अभाव समाजात आहे. श्रीमंत, राजकारणी यांची मुले शिक्षण घेतात. ग्रामीण समाजातील मुल फार शिकलेली नाहीत. मात्र गुरुजी तळमळीने मुलांना शिकवतात. मुलांना शिकवा अस पालकांना कळवळून सांगतात. हळूहळू शिक्षणाच महत्त्व समाजाला कळत होत. ते आपल्या मुलांना शिकवत होते. मात्र असे लोक फार थोडे होते. समाजातील शैक्षणिक संस्था नावालाच काम करतात. शिक्षकांना शिकवण्यात व मुलांना शिकण्यात अजिबात स्वारस्य नव्हत. समाजाची आर्थिक स्थिती गरिबीची होती. त्यामुळे काम करणे हे महत्वाचे होते. शिक्षणाला आपोआपच दुय्यम स्थान दिले जात होते.

११) **समस्या** : ‘ झाडाझडती ’ तील समाजजीवनात अनेक समस्या आहेत. धरणाच्या योजनेमुळे समाजात ‘ धरणग्रस्त ’ नावाचा एक समाजच तयार होतो. या समाजाच्या अनंत समस्या आहेत. धरणग्रस्तांना ना चांगली जागा, ना चांगली जमीन, ना सोयी–सुविधा, ना शाळा, ना रस्ते, ना वीज, ना पाणी, ना दवाखाने, ना रक्कम अस काहीच मिळत नाही. अशा अनंत समस्यांना धरणग्रस्तांना तोंड दयाव लागते.

१२) **व्यवसाय** : ‘ झाडाझडती ’ तील समाजात बलुतेदारीचे व्यवसाय होते. जांभळी गावात बलुतेदारीचे व्यवसाय करून बलुतेदार गुण्यागोविंदाने नांदत होते. मात्र धरणग्रस्त झाल्यावर नव्या गावात त्यांना हे व्यवसाय करता येत नाहीत. परिणामी ते आर्थिक विवंचनेत सापडतात. आधुनिकीकरणामुळे परंपरागत व्यवसायाकडे लोक पाठ फिरवतात. नवीन व्यवसाय निर्माण होतात जसे कंत्राटदार, कारखानदार, दलाल, व्यापारी इ. बलुतेदारांना हक्काचे व्यवसाय सोडून कामगाराचे काम करावे लागते.

### ९.२.३ ‘ पानिपत ’ कादंबरीचा निष्कर्ष

‘ पानिपत ’ ही पानिपत युध्दावरील ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरीतील काळ पेशवाईचा आहे. साधारणतः १६५९ ते १६६१ असा काळ या कादंबरीत वर्णन केलेला आहे. त्या काळातील समाजजीवन या कादंबरीत पहायला मिळते.

१. **रूढी – परंपरा – प्रथा :** ‘ पानिपत ’ कादंबरीतील समाजात रूढी -परंपरा -प्रथांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होत. काटेकोरपणे सर्व प्रथांचे पालन समाज करत होता. भरपूर प्रथा-परंपरा समाजात रूढ होत्या. कधी त्या समाजाला जाचक होत होत्या, पण तरीही त्याचे पालन समाज करतच होता. बालविवाह, सती, अंत्यविधी, मुहूर्त बघण्याची, औक्षणाची, गुलामाची अशा प्रथा होत्या.

२. **धार्मिक स्थिती :** ‘ पानिपत ’ कादंबरीतील समाजजीवनात मोठया प्रमाणात धार्मिकता होती. समाजाची आपआपल्या देवतांवर अपार श्रध्दा होती. कोणत्याही परिस्थितीत धार्मिक विधी पार पाडले जात होते. धार्मिक विधींना, कर्मकांडाला समाजात सर्वोच्च स्थान होते.दैनंदिन जीवनात धार्मिक विधी नित्यनियमाने केले जात होते. समाजात धर्माचे अधिष्ठान होते. हिंदुंप्रमाणे मुसलमान धर्मियांनाही आपल्या धर्माचा अभिमान होता. धर्मासाठी ते काहीही करायला तयार होते. कट्टर धार्मिकता त्यांच्यात होती.

३. **स्त्री – जीवन :** उच्च वर्गीय स्त्री जीवन चित्रण आहे. ‘ पानिपत ’ मधील स्त्री जीवन ऐश्वर्याचे सुखा समाधानाचे आनंदाचे होते. स्त्रियांमध्ये धार्मिक विधी,कर्मकांड, व्रत-वैकल्ये करण्याचे प्रमाण फार होते. त्या फार श्रध्दाळू स्वभावाच्या होत्या. काही स्त्रियांना राजकारणातील कळत होते, तर काहींना त्यातले अजिबात कळत नव्हते. काही स्त्रिया राजकारणी स्वार्थी होत्या, तर काही भोळया. पतीला परमेश्वर मानणारी स्त्री होती. अशिक्षित होती. चूल आणि मूल अशा स्वरूपात तिचे जीवन व्यापलेले होते. समाज ही तिच्याकडे अशाच दृष्टीकोनातून पहात होता. समाजात दुय्यम स्थान,आर्थिक परावलंबीत्व होत, कर्तव्यतत्पर होती, रूढी परंपरांना बळी पडली होती, जुजबी शिक्षण मोकळेपणाने बोलण्याची चोरी होती.

४. **सण – समारंभ – उत्सव** : हिंदू आणि मुसलमान धर्मिय समाज आपआपले सण समारंभ उत्सव आनंदाने, श्रध्देने, परंपरागत पध्दतीने साजरे करत होते. राजे, सरदार यांचे सण समारंभ भव्यदिव्य होते.

५. **राज्यकारभार** : ‘ पानिपत ’ मधील राज्यकारभार हिंदू आणि मुसलमान अशा दोन राजवटींचा होता. दोनही राजवटी आपआपल्या राज्यकारभार विविध खात्यांमार्फत पाहत होते. नियमाने राज्यकारभार चालत होता. हेरखाते व टपालखाते ही दोन अत्यंत महत्त्वाची खाती होती. या खात्यांचा राज्यकारभार सुरळीत चालण्यास सिंहाचा वाटा होता.

६. **आर्थिक स्थिती** : ‘ पानिपत ’ कादंबरीत राज्याची आर्थिक स्थिती बरी नव्हती. पेशवाईवर कर्जाचे डोंगर होते. राज्यात वेळेवर भरणा केला जात नव्हता. त्यामुळे आर्थिक स्थिती खालावते. मराठयांप्रमाणे अब्दालीचीही आर्थिक स्थिती खालावते. मात्र राजे सरदार त्यांचा परिवार हा ऐश्वर्यात राहतो.

७. **कुटुंबसंस्था** : ‘ पानिपत ’ मधील समाजजीवनात एकत्र कुटुंबपध्दती होती. बरेच सख्खे चुलत नातेवाईक एकत्र राहत होते. नात्यांमधील विविध पदर पहायला मिळतात. कुटुंबामध्ये एकी होती, विश्वास होता, मोठयांविषयी आदर होता,एकमेकांवर प्रेम□माया होती, त्याचप्रमाणे काहींच्या मनात द्वेषही □मत्सरही होता.

८. **श्रध्दा – अंधश्रध्दा** : ‘पानिपत’ मधील समाजजीवनात अंधश्रध्दा होती. त्या काळात धार्मिक, श्रध्दाळू वृत्तीतून केलेल्या कृतीला अंधश्रध्दा मानले जात नव्हते. ती कृती धार्मिक म्हणूनच केली जात होती.

९. **पोषाख व दागदागिने** : ‘ पानिपत ’ मधील समाजात स्त्री पुरुष दोघेही भरजरी वस्त्रे आणि किमती दागिने परिधान करत होते. राजे, सरदार, त्यांच्या स्त्रिया दैनंदिन जीवनातही दागिने व भरजरी कपडे परिधान करत होते. आपआपल्या हुद्दयाप्रमाणे आर्थिक परिस्थितीप्रमाणे पोषाख व दागिने घातले जात होते.

१०. **भाषा** : : ‘ पानिपत ’ मधील भाषा पेशवाईतील भाषा आहे. त्या काळात समाजात आदरार्थी व शुध्द भाषा वापरली जात होती. ऐतिहासिक भाषेमुळे त्या काळचा समाज हुबेहूब डोळयासमोर उभा राहतो. काळाचा ठसा भाषेवर पडलेला आहे.

**११. व्यवसाय :** ' पानिपत ' मधील समाजात विविध व्यवसाय होते. युध्द मोहीमेसोबत व्यावसायीकही जात होते. सुतार, लोहार, वाणी, उदमी, सावकार, पाणके, कामाठी, आचारी, तबलजी, ज्योतिषी, गोंधळी, भुते इत्यादी व्यवसाय करणारे होते. व्यवसाय हे अर्थाजनाचे साधन होते. प्रामाणिकपणे आपआपला व्यवसाय करणारे लोक होते.

## ९.२.४ 'संभाजी' कादंबरीचा निष्कर्ष

'संभाजी' या ऐतिहासिक कादंबरीमध्ये शिवाजी राजांच्या काळातील समाजजीवन चित्रित झालेले आहे. साधारणतः १६७६ ते १६८९ असा १३ ते १५ वर्षांचा काळ या कादंबरीत आहे. त्या काळातील समाज चित्रण प्रसंगानुरूप कादंबरीत येते.

१. **स्त्री जीवन :** उच्च वर्गीय स्त्री जीवन चित्रण आहे. 'संभाजी' मधील स्त्री जीवन पुढारलेले आहे. शिक्षित पराक्रमी, राज्यकारभारात सक्रिय सहभाग घेणारे, स्वतःवर विश्वास असणारे होते. चूल आणि मूल यापुढे जाणारे स्त्रीजीवन होते. सर्वसामान्य समाजातील स्त्री जीवन असुरक्षित होते. हिंदू राज्यातील स्त्री सुरक्षित होती, तर मुसलमानांच्या राज्यातील स्त्री असुरक्षित होती. स्वराज्यासाठी ती स्वतःच्या सुखाचा त्याग करणारी होती. कधी सत्तेचा, स्वार्थाचा हव्यास तिला होता. चूल आणि मूल अशा दृष्टीने समाज तिच्याकडे बघत होता. आर्थिक स्वातंत्र्य होत. कर्तव्यतत्पर होती. रूढी परंपरांना बळी पडली होती. शिक्षित होती. बौध्दिक उंची होती. काही स्त्रिया स्वार्थी, दुष्ट होत्या.

२. **रूढी – परंपरा – प्रथा :** ' संभाजी ' त सोळाव्या शतकातील काही प्रथा परंपरा आहे. बालविवाह,बहुपत्नीत्व,सती,स्त्रियांचा पुनर्विवाह, अंत्यसंस्कार, हुंडा, गुलामाची, नजराने, मुहूर्त काढणे इत्यादी प्रथा होत्या. यातील काही प्रथा जाचक होत्या पण तरीही समाज त्याचे पालन करत होता. त्या प्रथांना विरोध करण्याचे धाडस करत नव्हता.

३. **धार्मिक स्थिती, श्रध्दा–अंधश्रध्दा :** ' संभाजी ' च्या समाजजीवनात धार्मिकता होती. समाज धर्माचे पालन करत होता. आपआपल्या देवदेवतांवर समाजाची अगाध श्रध्दा विश्वास होता.

धार्मिकते बरोबर समाजात अंधश्रध्दाही पसरलेली होती. समाजात पूजा अर्चा नित्यनेमाने केली जात होती. हिंदूंचे धार्मिक धोरण उदारतेचे होते, तर मुसलमानांचे धार्मिक धोरण संकुचित होते. समाजात बळजबरीने धर्मांतर केले जात होते. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन अशा धर्मांचे वर्णन आलेले आहे.

४. **राज्यकारभार :** ' संभाजी ' कादंबरीत राज्याचा कारभार पाहण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केलेली होती. शिवाय गडा किल्ल्यांवर स्वतंत्र कारभारी मंडळ नेमलेले होते. अनेक पदाधिकारी नेमून त्यांच्यामार्फत सुव्यवस्थित कारभार पाहिला जात होता. हेरखाते आणि डाकखाते ही राज्यकारभाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची खाती होती. राज्यकारभारातील काही पदाधिकारी भ्रष्टाचार करणारीही होती. गुन्हेगाराला, शत्रूला कडक शिक्षा दिली जात होती. हिंदू प्रमाणे मुसलमानांचाही राज्यकारभार सुव्यस्थित, कडक शिस्तीचा होता.

५. **आर्थिक स्थिती :** 'संभाजी' तील राज्याची (हिंदू) अर्थिक स्थिती चांगली होती. मात्र सलगच्या दुष्काळाने आणि होणाऱ्या आक्रमणामुळे ती डबघाईला आली होती. औरंगजेबाकडे आर्थिक सुबत्ता होती. त्याचे राज्य फार मोठे होते व अवकही मोठी होती. मात्र दक्षिणेच्या मोहिमे दरम्यान त्याचीही आर्थिक स्थिती खालावली होती. राजे , सरदार, सुभेदार हे वैयक्तिक आयुष्यात ऐश्वर्यात, श्रीमंतीत राहत होते. दुष्काळामुळे राज्यातील कष्टकरी शेतकऱ्यांचे हाल झाले होते. आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून लोक परंपरागत बलुतेदारीचे व्यवसाय करत होते.

६. **कुटुंबसंस्था :** ' संभाजी ' कादंबरीतील समाजजीवनात एकत्र कुटुंबपध्दती होती. कुटुंबात बरेच नातेसंबंधही होते. हिंदू समाजजीवनात नातेसंबंध जपले जात होते. तर मुसलमान समाजात नातेसंबंध जपले जात नव्हते. समाजजीवनातील काही कुटुंबे नात्यांपेक्षा सत्तेला, काही सत्तेपेक्षा नात्यांना, तर काही नात्यांपेक्षा कर्तव्याला महत्त्व देणारे होते.

७. **सण – समारंभ – उत्सव :** ' संभाजी ' च्या समाजजीवनात काही सण □समारंभांचा उल्लेख आलेला आहे. राजे सण □उत्सव □भव्य दिव्य प्रमाणात साजरे करत होते. समाजात आनंदाने उत्साहाने सण □उत्सव साजरे केले जात होते.

८. **पोषाख व दागदागिने :** ' संभाजी ' कादंबरीतील समाजातील राजे व अधिकारी व्यक्ती जरीचे, भरजरी, महागडे पोषाख व हिरे, मोती, पाचू यांनी तयार केलेले दागदागिने परिधान करत होते. हिंदू राजघराण्यातील स्त्रिया □सोन्या मोत्याचे, हिऱ्याचे दागिने परिधान करत होत्या. शिवाय भरजरी पैठणी, शालू, लुगडे परिधान करत होत्या. पुरुष अंगरखा, बाराबंदी, सदरा, तुमान, धोतर, डोक्यावर मंदिल, किमॉश, मुंडासे, पगडी, फेटा अशी विविध वस्त्रे घातली जात होती. शिवाय राजे सरदार आपआपल्या घोडयांना हत्तींनाही सोन्या मोत्यांच्या दागिन्यांनी सजवत होते.

९. **भाषा :** ' संभाजी '  तील भाषा ऐतिहासिक शिवाजीराजांच्या काळातील आहे. यातील भाषा लोकभाषेच्या जवळ जाणारी आहे. यातील मराठी भाषेत बरेच हिंदी उर्दू शब्द मिसळलेले होते. भाषा ही आदरार्थी होती. हिंदी भाषेचाही गोडवा जाणवतो. हिंदी भाषेत मोठमोठे उर्दूतील शब्द वापरले जात होते. 'संभाजी' तील भाषेमुळे शिवकाळ डोळयापुढे उभा राहतो. काळाचा ठसा भाषेवर पडलेला आहे.

### ९.२.६ सर्व कादंबऱ्यांचे एकत्रित निष्कर्ष

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वास्तवाकडे अधिक झुकणाऱ्या आहेत. हयांच्या कादंबऱ्यांतून जो अनुभव, जे व्यक्तिचित्रण, जे प्रसंग, मानवी स्वभावाचे जे दर्शन घडते ते वास्तव वाटते. ते अशक्य वाटत नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या लेखनावर परिणाम झालेला आहे. सभोवतालच्या घटनांची नोंद त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या 'पांगिरा, झाडाझडती, या कादंबऱ्यांत समाजदर्शन ठळकपणे जाणवते, तर 'पानिपत, संभाजी' या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील समाजजीवन मुख्य विषयाच्या अनुषंगाने घडलेले आहे. व्यक्तिचित्रण, कथानक, निवदेन, प्रसंग–चित्रण, संवाद या माध्यमातून कादंबऱ्यांमध्ये वास्तव समाजदर्शन घडलेले आहे.

'पांगिरा व झाडाझडती' या दोन कादंबऱ्यांत ग्रामीण समाजजीवनाचा खोलवर वेध घेतलेला आहे. ग्रामीण जीवन बारकाव्यानीशी चित्रित केलेले आहे. समाजातील विविधस्तर, कष्टकरी शेतकरी

वर्ग, सरकारी कर्मचारी, राजकारणी, बलुतेदार, ग्रामीण स्त्री, वातावरण इ. यथार्थपणे चित्रित केलेले आहे. समाजातील विविध समस्या, प्रश्न, उणिवा, चांगल्या वाईट गोष्टी, वैचारिकता, समाजात होणारे बदल, माणासाच्या मनाचा ठाव अशा वास्तववादी गोष्टी विश्वास पाटील यांनी कादंबऱ्यांतून मांडल्या. 'पानिपत' आणि 'संभाजी' या दोन ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये पेशवेकाळ आणि संभाजीच्या काळातील समाजजीवन पहायला मिळते. मात्र या दोनही कादंबऱ्यांमध्ये उच्च स्तरातील राजे–महाराजे, सरदार अशांचेच समाजजीवन चित्रित झालेले आहे. त्यामुळे एकूण संपूर्ण समाजजीवनाचा निष्कर्ष काढता येत नाही. या दोन कादंबऱ्यांमध्ये मुख्य विषयाच्या अनुषंगाने समाजजीवनाचे चित्रण आलेले आहे. 'पानिपत' मधील समाजजीवनात धार्मिकता मोठया प्रमाणावर पाळली जात होती. पेशवे काळातील समाज स्थल□काळाचे वर्णन, पोषाख□दागदागिने, भाषा, लढाया, व्यक्तिचित्रण यातून हुबेहूब प्रस्थापित झाला आहे. त्याचप्रमाणे 'संभाजी' कादंबरीतही शिवकाळ हुबेहूब प्रस्थापित झाला आहे. मराठयांप्रमाणे मुसलमानी समाजजीवनही योग्यपणे मांडलेले आहे.

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वास्तवदर्शी आहेत. कादंबऱ्यांमध्ये सामाजिक जीवन चित्रण खरेपणाने, सत्याची जाण ठेवून केलेले आहे. त्यामुळे वाचक कादंबऱ्यांशी एकरूप होतो. कादंबऱ्यांमध्ये विविध प्रकारच्या स्वभावांच्या व्यक्ती, त्यांची सुख–दुःखे, त्यांचे विविध नातेसंबंध, त्यांची भावनीक आंदोलने, त्यांचा परिस्थितीशी, नशिबाशी, स्वतःशी, यंत्रणेशी चाललेला झगडा, विविध कुटुंबे त्यांचे प्रश्न□समस्या, परस्परसंबंध, हे सर्वकाही स्वतंत्रपणे आणि वास्तवपूर्ण आहे. या सर्वांचा मिळून जो समाज बनलेला आहे. त्या समाजाचे वास्तव चित्रण विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमध्ये आहे.

मात्र प्रत्येक कादंबऱ्यांचा शेवट मनाला निराश करणारा आहे. मनात प्रश्नांची मालीका निर्माण करणारा आहे आणि हेच विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचे यश आहे.

- विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या वास्तववादाची कास धरणाऱ्या आहेत.
- विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या विश्वासार्ह आहेत.

- विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण समाजजीवन, राजकीय समाजजीवन, पेशवेकालीन व शिवकालीन समाजजीवन जसे आहे तसे प्रकट होते.
- विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमधून समाजजीवनावर प्रकाश पडलेला आहे. समाजजीवन त्याच्या गुण दोषांसकट उभे राहिलेले आहे.
- विश्वास पाटील यांचे अनुभव बहुकेंद्री आहे आणि ही अनुभवांची बहुकेंद्रीतता त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये उतरलेली आहे. स्वतःच्या वैविध्यपूर्ण अनुभवांचा कादंबऱ्यांमध्ये त्यांनी चपखलपणे वापर केलेला आहे.
- विश्वास पाटील यांची सखोल अभ्यासाची वृत्ती, विषयाच्या तळाशी जाऊन संशोधन करण्याची धडपड, सत्यशोधण्यासाठी घेतलेले अपार कष्ट हे सर्व त्यांच्या कादंबऱ्यांमधून दिसते आणि त्यांच्या कादंबऱ्या अधिक विश्वसनीय वाटतात.
- विश्वास पाटील यांनी आपल्या कादंबऱ्यांनी ग्रामीण, सामाजिक, ऐतिहासिक कादंबरीप्रवाहाला, कादंबरी प्रकाराला समृध्द केले.
- विश्वास पाटील यांचा ग्रामीण जीवनातील स्वानुभव कादंबऱ्यांमधून अस्सलतेने उतरलेला आहे.
- स्त्रियांची वर्णने संयमाने केलेली आहेत. स्त्रियांची दुःख, समस्या, वैचारिकता मांडलेली आहे.
- कादंबऱ्यांमध्ये प्रतिकात्मकता, सूचकता बऱ्याच ठिकाणी जाणवते. मात्र यामुळे पुढील घटनांचा अंदाज वाचकाला आधीच येतो.
- विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमधून विविध सामाजिक आर्थिक स्तरांच्या व्यक्ती, त्यांची भावनांची आंदोलने अचूक मांडलेली आहेत.
- सातारा □कोल्हापूर या परिसरातील भाषा, त्यातील अस्सल ग्रामीण शब्द, म्हणी वाक्प्रचार यांचा खजिना, प्रसंगाला अधोरेखीत करणारी प्रतिमासृष्टी, साधे सरळ संवाद, भाषेला असणारा लोकसाहित्याचा गोडवा आणि या सर्वांतून निर्माण होणारी साधी सरळ प्रासादिक भाषा.

- ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये वापरलेली ऐतिहासिक भाषा, ऐतिहासिक समाज आणि सत्य यामुळे त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या काल्पनिक न वाटता वास्तव वाटतात.
- त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये विषय वैविध्य आहे.
- विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांमधून समाजात होणारे परिवर्तन उदा. विचाऱ्यांचे, कृतीचे, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, राहणीमान, कृषीपरिवर्तन, आर्थिक-स्त्री जीवन- कौटुंबिक इ. परिवर्तनाचा वेध घेतलेला आहे.
- विश्वास पाटील यांना स्वत:ला गरीबांविषयी, शेतकऱ्यांविषयी, ग्रामीण समाजाविषयी धरणग्रस्तांविषयी, कलावंताविषयी, अन्यायझालेल्यांविषयी असलेली अनुकंपा, कळकळ, प्रेम, त्यांच्या कादंबऱ्यामधून वेळोवेळी प्रत्ययाला येते.

## ➢ पुढील संशोधनाची दिशा

विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास या शोधप्रबंधात विश्वास पाटील यांच्या पांगिरा, झाडाझडती,पानिपत. संभाजी ह्या कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या इतरही कादंबऱ्यांचा सामाजिक अभ्यास करता येऊ शकतो. शिवाय विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांतील भाषा हाही एक संशोधनाचा स्वतंत्र विषय होऊ शकतो. इतकी त्यांची भाषा सकस आहे.

कोणत्याही साहित्याचा सामाजिक अभ्यास करता येऊ शकतो.

## प्रकरण दहावे

# संदर्भ सूची

अनुक्रमणिका:-

१०.१ साधन ग्रंथ सूची

१०.२ सहाय्यक ग्रंथ सूची

१०.३ नियतकालिके

१०.४ कोश

१०.५ प्रबंध

१०.६ भाषण

१०.७ विश्वास पाटील यांची मुलाखत

### १०.१ साधन ग्रंथ सूची

**विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्या** (या सूचींची मांडणी प्रकाशन काळानुसार केलेली आहे.)

- "पानिपत" , राजहंस प्रकाशन पुणे,आ.२२, १९८८.
- "पांगिरा" ,ग्रंथाली प्रकाशन मुंबई, १९९०.
- "झाडाझडती", राजहंस प्रकाशन पुणे, आ.१२, १९९१.
- "संभाजी",मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,आ.४, २००५.

**विश्वास पाटील यांचे साहित्य :–**

- आंबी, शेटये प्रकाशन कोल्हापूर, १९८०.
- कलाला चौक, शेटये प्रकाशन कोल्हापूर, १९८२.
- क्रांतिसूर्य, सन्मित्र प्रकाशन कोल्हापूर, १९८४.
- चलो दिल्ली, राजहंस प्रकाशन पुणे, १९८६.
- महानायक, राजहंस प्रकाशन पुणे, १९९६.
- चंद्रमुखी, महेता पब्लिकेशन हाऊस पुणे, २००५.
- रणांगण, चंद्रलेखा निर्मित.
- नॉट गॉन विथ द विंड, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, २०१०.

## १०.२ सहाय्यक ग्रंथ सूची (आकार विल्हेनुसार)


१. अवसरीकर प्र.ना., "**सामाजिक कादंबरी स्वरूप आणि समीक्षा**", स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, २००१.

२. कऱ्हाडे स.दा., **"साहित्य विश्लेषण",** स्वरूप प्रकाशन औरंगाबाद,१९९९.

३.कुलकर्णी अनिरुद्ध, **"प्रदक्षिणा खंड १ व २** ", कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९७,१९९८.

४. कुलकर्णी श्री.मा., **"कादंबरीची रचना",** उन्मेष प्रकाशन नागपूर, १९५६.

५. कोतापल्ले नागनाथ, **"ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध"** स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००७.

६. कोत्तापल्ले नागनाथ, **"साहित्य आणि समाज",** प्रतिमा प्रकाशन पुणे, २००७.

७. कोत्तापल्ले नागनाथ, **"साहित्याचा अन्वयार्थ",** मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९९६.

८. खरे ग.ह., **"संशोधकाचा मित्र भाग-१",** भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९५१

९. खोले विलास , **"गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी",** लोकवाड्मयगृह मुंबई, २००७.

१०. चुनेकर सु.रा.आणि इतर, **"संशोधनः स्वरूप आणि पद्धती"** , शिक्षण प्रसारक संस्था संगमनेर, १९८३.

११. जाधव रा.ग. **"साहित्य आणि सामाजिक संदर्भ",** कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७५.

१२. जोशी वसंत स., **"भाषा व साहित्य संशोधन खंड १,२,३,** " म.सा.प.पुणे, १९३,१९८१,१९८९.

१३. जोशी वसंत स, **"संशोधन साधना",** प्राज्ञपाठशाला वाई, १९७६.

१४. ठाकूर रविंद्र, **"मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा",** दिलीपराज प्रकाशन पुणे, १९९३.

१५. ठाकूर रवींद्र, **“मराठी ग्रामीण कादंबरी”,**मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे १९९३.

१६. देशपांडे अ.ना., **“आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड–२”,** व्हिनस प्रकाशन पुणे, १९५८.

१७. देशपांडे कुसुमावती, **“मराठी कादंबरीचे पहिले शतक १८५० ते १९५०, ”** मुंबई मराठी साहित्य संघ , १९५४.

१८. नाडगोंडे गुरुनाथ, **“ग्रामीण समाजशास्त्र,** ” कॉन्टिनेन्टल पुणे, १९७६.

१९. निंबाळकर सुवर्णा, **“शोध झाडाझडतीचा,”** पद्मगंधा प्रकाशन पुणे , १९९५.

२०. पाटील तानाजी राऊ, **“मराठी कादंबरी : समीक्षा”** , डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००९.

२१. बापट व गोडबोले, **“मराठी कादंबरी तंत्र आणि विकास”,** व्हिनस प्रकाशन पुणे, १९७३.

२२. मालशे स.ग., **“शोधनिबंधाची लेखन पद्धती,”** लोकवाङ्मयगृह मुंबई, सुधारित चतुर्थ आवृत्ती, २००८.

२३. यादव आनंद, **“ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या”** , मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९७९.

२४. वडगबाळकर श्रृती, **“मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास”,** श्रीविद्या प्रकाशन पुणे, २००६.

२५. शहा वि.भा., **“मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास”,** मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, १९९८.

२६.संत दु.का., **“वाङ्मयीन विद्वत्ता, ” पुणे विद्यापीठ** ,१९७६.

२७. संत दु.का., **“संशोधन पद्धती : प्रक्रिया व अंतरंग”,** पुणे विद्यार्थी गृह, १९६६.

२८. सारडा शंकर **, “ग्रंथविशेष”,** मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे १९९१.

२९. सोमण अंजली, **“ साहित्य आणि सामाजिक संदर्भ”,** प्रतिमा प्रकाशन पुणे, २००५.

३०. हातकणंगलेकर म.द.,**वाडमयीन शैली आणि तंत्र**, अभिजात प्रकाशन कोल्हापूर , १९८९.

**इतर सहाय्यक ग्रंथसूची**

१)आसरडोहकर त्र्यंबक, **“काळी आई”.**

२)इनामदार ना.स., **“शिकस्त”** ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९२.

३)काळे किशोर शांताबाई, **“कोल्हाटयाच पोर”,** ग्रंथाली प्रकाशन मुंबई, १९९४.

४)देशमुख सदानंद, **“तहान”**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९८.

५)देशमुख सदानंद, **“बारोमास”,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००२.

६)बोरांडे रा.रं**.,“आमदार सौभाग्यवती”.**

७)बोरांडे रा.रं**,“पाचोळा”.**

८)मर्ढेकर बा.सी. **“पाणी”.**

९)माडगुळकर व्यंकटेश, **“बनगरवाडी,”** मौज प्रकाशन मुंबई , आ. १९,२००६.

१०)यादव आनंद**, “ गोतावळा”.**

११) रणजित देसाई, ‘‘**माझा गाव**’’**,** मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आ.चौथी, २०००.

१२)शेळके उद्धव, **“धग”**.

१३)सावंत शिवाजी,**“छावा”**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७९.

### **१०.३.१ नियतकालिके**

१) लोकमत दिवाळी अंक २००१

२) साप्ताहिक सकाळ १९९२

३) मराठी साहित्य पत्रिका, पुणे

३.१) अंक जाने.- मार्च १९९१

३.२) दिवाळी अंक १९९२

३.३)जाने-मार्च १९९२

**४)** ललित

मे १९८९

ऑक्टोबर १९८९

फेब्रु. १९९२

मार्च १९९३

ऑक्टोबर २००४

**५)**मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २००५

जाने. २००६

### **१०.४ कोश**

१)वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश.

२) भारतीय समाजविज्ञान कोश .

३) मराठी शब्दरत्नाकर कोश.

**१०.५ पुणे विद्यापीठातील प्रबंध .**

१) अवसरीकर प्र.ना., **"कादंबरीमालांनी प्रकाशित केलेल्या स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्यांचा एक अभ्यास"** ,१९७९.

२) कराड रमाकांत, **"परिवर्तन व मराठी ग्रामीण कादंबरी, "** २००६.

३) गमे भाऊसाहेब, **"विश्वास पाटील यांच्या कादंबरी वाङ्मयाचा सर्वांगीन अभ्यास"**_२००८.

४) देशमुख सुनीता, "**निवडक ग्रामीण कादंबऱ्यांतील कुटुंबचित्रण**" २००६.

५) नामगवळी गंगाधर, **"पानिपत विषयक कादंबरी वाङ्मय :ऐतिहासीकता आणि वाङ्मयीन गुणवत्ता**", २००२.

६) निफाडे भास्कर**, " साठोत्तरी मराठी कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास",**२००५.

७) निंबाळकर सुवर्णा, **"रणजित देसाई यांच्या कथेचा सामाजिक व वाङ्मयीन अभ्यास**", २००२.

**१०.६ भाषण**

विश्वास पाटील यांचे भाषण: सहावे समरसता साहित्य संमेलन दि. १२ ते १४ , २००३.

**१०.७ विश्वास पाटील यांची मुलाखत**

**प्र. १ ला . तुमच्या साहित्यावर शेतकरी चळवळीचा किंवा आंदोलनाचा परिणाम झाला का?**

उत्तर : हो नक्कीच झाला. लिहायला लागल्यापासून ८०-८१ च्या दरम्यान शेतकरी संघटनेचं शरद जोशींच्या नेतृत्वाखाली कापसाचे मोठ्या प्रमाणावर आंदोलन सुरू होतं. त्यांनी निपाणीलाही तंबाखूच आंदोलन सुरू केलं. त्यावेळी मी कोल्हापूरला सकाळमध्ये नोकरी करत होतो. विद्यार्थी दशेतच या आंदोलनाच रिपोर्टींग मी केलं होतं. निप्पाणीला रस्ता रोको झालेलं. याचा परिणाम झाला. नंतर स्वांतत्र्यपूर्व काळातील क्रांतिसिंह नाना पाटील यांच दुधाचं आंदोलन इस्लामपूरला झालं होतं. त्या आंदोलनाची गोष्ट ऐकली होती. तर अशा शेतकरी आंदोलनांचा परिणाम झाला.

**प्र.२ रा. साहित्यविषयक चळवळींचा परिणाम तुमच्या साहित्यावर झाला का? साहित्यविषयक चळवळीत सहभाग घेता का?**

**उत्तर :** चळवळीचा डायरेक्ट परिणाम झाला नाही. पण या चळवळी, त्यामागचे आंदोलन आणि धडपडी याबद्दल मला पहिल्यापासून आस्था होती. या चळवळीचा डायरेक्ट परिणाम झाला नाही. आंदोलनात भाग घेतला नाही. लिहितांना लिहित गेलो ते माणसांच साहित्य. निसर्ग ,परिसराचा वेध घेतला. माणसाच्या भविष्याचा, भूतकाळाचा वेध घेतला.

**प्र.३ रा. शासनसंस्था साहित्याकडे कशा प्रकारे पाहते? शासनाकडून काही मदत सहकार्य मिळते का?**

उत्तर : शासनापेक्षा राज्यकर्ता कोण आहे यावर अवलंबून असतं. नवलेखक अनुदान योजनेत मला अनुदान मिळालं. मदत होते. विद्यार्थीदशेत असताना माझी दोन पुस्तके या योजनेतून प्रसिद्ध झाली होती. यशवंतराव चव्हाण मदत करत होते.अस बोलल जातं. माझा अनुभव सुशिलकुमार शिंदेच्या बाबतीत चांगला आहे. म.द. हातकणंगलेकर सरांच्या मुलीने अपंगांची शाळा काढली त्याला भरीव मदत त्यांनी केली. तर हे व्यक्तीवर अवलंबून असतं.

**प्र.४ था. धर्मव्यवस्थेचे कोणते संस्कार तुमच्यावर झाले?**

उत्तर : असे वेगळे संस्कार झाले नाही. पण भक्ती वाड्मयाचा परिणाम झाला. पंढरीची वारी प्रत्येक मराठी माणसाच्या दारावरून जाते. त्याचा परिणाम होतोच. घरी सर्व धार्मिक सण साजरे केले जायचे. गावात वार्षिक जत्रा व्हायच्या. मुख्यत: श्रावण महिन्यात रामायण–महाभारत अशा पोथ्या वाचल्या जायच्या. त्या वाचण्याचा मान मला मिळत होता. त्यामुळेच रामायण महाभारताचा  परिचय मला झाला.

**प्र. ५ वा. बालपणी कोण कोणते संस्कार तुमच्यावर झाले? (वाचनाचे,लेखनाचे,भाषेचा इत्यादी)**

उत्तर : परिसराच देणं आहे. साने गुरुजींचे वाड्मय शाळेत असताना वाचले. ग.ल.ठोकळांच्या कविता वाचल्या र.वा. दिघेंच्या कांदबऱ्या वाचल्या. मुख्यत: आईच्या कंठातील ओव्या, जाणपदगीते, शेतकरी गीते, शाहीरांचे पोवाडे, तमाशातील गवळणी, वग, ऐकले. गावाला भेट देणारे लोक बारा बलुतेदार , अठरा पगड जाती, भटके लोक,काशी कापडवाले, गोपाळ,शाहीर अशी मंडळी या सर्वांचा कळत–नकळत भाषेचा संस्कारावर परिणाम होत गेला.

**प्र. ६ वा. तुमच्या  काळाने आणि त्या काळातील सामाजिकतेने तुमचे मनोविश्व नियंत्रित केले होते का?**

उत्तर:  नाही, नियंत्रित केले नाही.

**प्र.७ वा.  साहित्याचे समाजातील स्थान कसे आहे? समाज साहित्याकडे कसा पाहतो?**

उत्तर: समाजाने साहित्याकडे मोठ्या जाणिवेने पहायला पाहिजे. पण मला अस वाटतं साहित्यिकच कमी पडताहेत, लोकांचे प्रश्न मांडायला, लोकांच्या जाणीवांच्या जवळ जायला त्यामुळे  समाजाच आणि साहित्याच पूर्वीच दृढ नात राहिल नाही. खर म्हटल तर वाचकांची भूक वाढलेली आहे. पहिल्यापेक्षा समाज साहित्याकडे आस्थेने पाहतो. पण अत्रे,

खांडेकर,फडके काळात एक-एक लेखक आपल युग निर्माण करत होते तस आता होताना दिसत नाही.

**प्र. ८ वा. साहित्य हे समाजासाठी कार्य करते का? आणि कसे?**

उत्तर : करायला पाहिजे. साहित्य हा संस्काराचा भाग आहे. ह्या दोन गोष्टी एकत्रच असतात. डायरेक्ट कुठलच साहित्य काही नीती नियम शिकविण्याच्या फंदात पडत नाही. पण नकळत येणारे जे संस्कार असतात ते साहित्याचा ठेवा असतो. साने गुरुजींनी शामच्या आईत जे लिहिलेल आहे. त्याचा परिणाम काही पिढ्यांवर झाला आहे हा संस्काराचा परिणाम आहे.

**प्र. ९ वा. तुमच्या कादंबरी लेखनाचे तंत्र पूर्वीच्या कादंबऱ्यांच्या तुलनेत तुम्ही जाणीवपूर्वक बदलले का?**

उत्तर : हो मला जरा वेगळ्या पद्धतीने सांगावस वाटलं. कादंबरीला खलनायक पाहिजेच, नायक नायिका पाहिजेच, सुंदर नायिका पाहिजेच अस न करता वेगळ्या पद्धतीने प्रयत्न करूया म्हणून मी जााणीवपूर्वक प्रयत्न केले. यातून पांगिरा सारखी कादंबरी आली. काही लोकांना त्याचा पोच समजला नाही. त्यांना अस वाटलं यात मेजर कॅरेक्टर नाही काही नाही, खलनायक नाही. मी म्हणालो ही उभ्या गावाची कहाणी आहे. गावच नायक आहे. तर यात खलनायक आणायची गरजच काय? अशा वेगवेगळ्या पद्धतीने कादंबऱ्या मांडण्याचा मी प्रयत्न केला.

**प्र. १० वा. लेखकाचे समाजजीवन जेवढे समृद्ध तेवढे कादंबरीतील समाजजीवन समृद्ध असते. असे तुम्हांला वाटते का?**

उत्तर : अस काही नाही. तुम्ही काय टिपता हे महत्त्वाचं आहे. म्हणजे बऱ्याच वेळेला तुम्हांला प्रचंड माहिती असली तर तुम्ही चांगल लिहू शकता अस नाही. जस की खूप अभ्यास करणारा विद्यार्थी मॅट्रीकला नापास होतो आणि बेताचा अभ्यास करणारा पास होतो. तसच तुम्ही ते कागदावर टिपता किती, व्यक्तिचित्र मांडता किती हे महत्त्वाचे आहे.

**प्र.११ वा. समाजजीवन अनुभवातून वा कल्पनेच्या सहाय्याने ते रेखाटता येते का? तुम्ही कादंबऱ्यांत समाजजीवन अनुभवातून रेखाटले आहे का?**

उत्तर : हो अनुभवातून रेखाटले आहे.फक्त अनुभवाला कल्पनेची जोड असेल तर ते अधिक चांगल्या पद्धतीने पोहचू शकत. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभव मग ते आपले असो, मित्रांचे असो, समाजातल्या इतर स्तरांचे असो, त्यातल्या अनुभवाची पातळी महत्त्वाची आहे.

**प्र.१२ वा. लेखक स्वत:चे विचार, आवडी निवडी साहित्यात मांडत असतो का? साहित्यातील प्रमुख पात्रांमधून लेखक बोलत असतो का?**

उत्तर : नकळत पाझरत जात. डायरेक्टली बोलत नसतो. हे पाझरणं विविध व्यक्तिरेखांच्या अंगातून जाऊ शकतं.

**प्र.१३ वा. साहित्यावरुन लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा अंदाज बांधता येतो का? असा अंदाज बांधणे योग्य आहे का?**

उत्तर : योग्य नाही. कारण बऱ्याच वेळेला अनेक विकलांग लोकांच्या कल्पनेची झेप लष्करी गड्याच्या झेपेपेक्षा मोठी असते. बऱ्याच वेळेला एखादा लष्करी थाटाचा, बळकट शरीरयष्टीचा कलावंत असला तरी त्याची कला ,दृष्टी दुबळी असू शकते. त्यामुळे शरीरावर काही अवलंबून नसतं.

**प्र.१४ वा. स्त्री पात्र रेखाटतांना वेगळा अभ्यास केला होता का?**

**उत्तर** : नाही, वेगळा अभ्यास केला नाही. जी पात्र सापडत गेली ती मांडत गेलो. अनेक आजूबाजूचे अनुभव माझ्याकडे आहेत, पण ते मांडायला मला अजून वेळ मिळाला नाही.

**प्र. १५ वा. वाचकांची अभिरूची लक्षात घेऊन लेखन करता का?**

**उत्तर:** नाही, मला अस वाटतं लेखकाने किंवा कलावंताने आपला कलम, कुंचला असा चालवला पाहिजे की, आपण वेगळ्या आवडी निर्माण केल्या पहिजेत. लोकांना आवडतं म्हणून त्यांना पुरवायला आपण काही पापडाचे व्यापारी नाही की, त्यांना रुचकर वाटतील म्हणून अजून चांगले करू. याला काही अर्थ नाही.

**प्र. १६ वा. झाडाझडती, चंद्रमुखी या कादंबऱ्या ज्यांच्यावर लिहिल्या आहेत त्यांच्यापर्यंत त्या पोहोचल्या आहेत का? त्यांच्या प्रतिक्रिया काय होत्या?**

उत्तर : हो पोहोचल्या खूप पोहोचल्या. त्यांच्या प्रतिक्रिया म्हणजे सरकारी अधिकारी भूसंपादन करायला गेले तर ते म्हणतात तुम्ही झाडाझडती वाचली नाही का? संगीत बारीवरील चंद्रमुखी लिहिली ती अनेक मुलींनी वाचलेली आहे. आता बारीतल्या पोरीही सुधारलेल्या आहेत. त्यांच्याकडे आयफोन आहे. त्यांना वाचनाची आवडही आहे. माझी चंद्रमुखी अनेक जणींनी वाचली त्यांना ती आपली वाटली, स्वत:ची कहाणी वाटली म्हणूनच त्यांनी मला कौतुकाने कळवल की, आमच्याकडे चंद्रमुखी आहे. ती आम्ही जपून ठेवली आहे. ती त्यांच्यापर्यंत पोहोचली आहे.

**प्र.१७ वा. तुम्ही प्रकाशन संस्था कशी निवडता?**

**उत्तर :** प्रकाशन संस्था निवडीमागे काही जणांशी नाते जुळलेले असते. विचार जुळलेले असतात. म्हणून आपण पुढे जातो.

**प्र. १८ वा. तुम्ही कादंबरी हाच वाङ्मयप्रकार का निवडला?**

उत्तर : कादंबरीतून मला व्यक्त करता येतं. मी कुठली ही छोटी गोष्ट सांगायला जातो ती लिहितांना मोठी होत जाते. असा माझा अनुभव आहे. आता माझी नवीन पाषाणझुंज ही कादंबरी १००,१५० पानांची होईल अस मला वाटलं होत, पण ती आता ३०० ते ३५० पानांची होईल.

**प्र. १९ वा. बालपणी ग्रामीण भाषेचा वापर घरात करत होता की, केवळ ऐकत होतात? अस्सल ग्रामीण बोली लयाला चालली आहे का?**

उत्तर : घरात ग्रामीण भाषेचा वापर करत होतो. ग्रामीण भाषा जीवनाचा अविभाज्य भाग होता. आईवडील ज्या भाषेत बोलतात त्याच भाषेत मुलही बोलतं. ग्रामीण भाषेचा माझ्यावर संस्कार आहे. अस्सल ग्रामीण बोली लयाला चालली हे स्थित्यंतर आहे. हे घडत राहणार आहे. पण त्यातील काही गोष्टी हटल्या म्हणजे क्रियापद, उच्चार नाहीशा झाल्या तरी त्या भाषेतील रसरशित शब्द आहेत ते टिकायला हवेत अस मला वाटतं. उदाहरण दयायच तर खेड्यातले माझे नातेवाईक आत्त्या मुंबईला आल्यावर लिफ्टला वीजेचा पाळणा म्हणायचे हा फार सुंदर शब्द आहे.

**प्र. २० वा. तुमच्या लिहिण्याचे प्रयोजन काय? कोणासाठी लिहिता?**

उत्तर : मनात दाटून आलेल्या भावनांचा निचरा करण्यासाठी लिहितो आणि हे लेखन करताना आवडत म्हणून लिहितो.

**प्र. २१ वा. कादंबऱ्यातील समाजजीवन रेखाटताना त्या त्या समाजजीवनाचा वेगळा असा अभ्यास केला होता का?**

उत्तर : वेगळा अभ्यास नाही पण नकळत अभ्यास घडत जातो. काही वेळेला विशेष अभ्यास पण करावा लागतो. उदा. पेशवाईवर पानिपत सारखी कादंबरी लिहायची तर पाहिले पेशवाई समजून घेतली पाहिजे. शत्रू,मुसलमानी कारकीर्द समजून घेतली पाहिजे. त्यावेळचा भूगोल समजून घेतला पाहिजे. तर ती परिक्रमा पूर्ण करायची म्हणजे बाकीच्या गोष्टींचा अभ्यास करावा लागतो.

**प्र. २२ वा. एकाच कादंबरी प्रकाशत न अडकता विविध कादंबरी प्रकार इतक्या ताकदीने कसे उभे केले?**

**उत्तर :** त्या त्या वेळी त्या त्या विषयाशी मी एकरूप होतो. ज्यावेळी एका नवीन विषयात प्रवेश करतो; त्यावेळी एका नव्या गावातच जाऊन मुक्काम ठोकण्यासारखाच माझा प्रवास होतो. त्यावेळी मनात दाटून जो विषय येतो त्याची साधारणत: दिशा बघायची आणि मग त्या विषयाच्या गावाच्या मुक्कामातच जाऊन पडायचं म्हणजे एखादया नव्या गावात जाऊन राहिल्याशिवाय तसा परिसराचा परिचय होत नाही. तसच आहे.

**प्र. २३ वा. बालपणी अर्थिक परिस्थिती कशी होती? वडलांचा व्यवसाय काय होता?**

उत्तर : परंपरागत व्यवसाय शेती हा होता. बालपणी आर्थिक ओढाताणीची परिस्थिती होती. पूर्वी आमच्या घरात खूप मोठी समृद्धी होती. आमचा जो वाडा आहे तो १८२० च्या दरम्यान बांधला गेला. तो वाडा आमच्या घराण्यातल्या आऊबाई नावाच्या स्त्रीने, कर्तुत्वान स्त्री ने बांधलेला आहे. माझे वडील मला नेहमी तिच्या आठवणी सांगायचे. तिच्यामुळेच, तिने पुढाकार घेतल्यामुळे दुष्काळात होरपळलेल गाव वाचल होत. पूर्वी म्हणजे दोन-तीन पिढ्यांमागे सावकारी होती, पण नंतर अडचणी आल्या, प्रॉब्लेम आले त्यामुळे बालपणी मला फार हालाखीच्या परिस्थितीला तोंड दयावे लागले.

**प्र. २४ वा. चंद्रमुखी,दौलत,सुचेता ह्या व्यक्तिरेखा वास्तवातील व्यक्तिरेखेवर बेतलेल्या आहेत का?**

**उत्तर:** हो अनेक व्यक्तींवर बेतलेल्या आहेत. अशा अनेक चंद्रमुखी आहेत अनेक दौलत आहेत. मात्र परटीक्यूलर आहे अस नाही.

**प्र. २५ वा. तुमच्यावर काही टीका-आक्षेप झाले का? त्याला कसे उत्तर देता?**

उत्तर : टीका आक्षेप अस नाही. मला जी प्रचंड लोकप्रियता मिळाली त्यामुळे अनेकांना मत्सर निर्माण झाला. पण हाही जीवनाचा एक भाग आहे. म्हणून मी तिकडे फारस लक्ष देत नाही. विशेषत: माझ्यासारखा नवा लेखक लिहित होता त्यावेळेला पहिल्या दोन तीन वर्षातच वि.वा.

शिरवाडकर, वसंत कानेटकर अशा मोठया लेखकांनी मला उचलून धरलं. माझी पुस्तक खूप महत्त्वाची आहेत अस मानलं. याच जे एस्टॅब्लिश लेखक होते किंवा त्यांची तळी उचलणारे अनुयायी होते त्यांना ह्या गोष्टीचा विषाद वाटला. काय ह्या नव्या माणसाच तोंड भरून कौतुक करायला पाहिजे? त्यामुळे असूयेचे प्रकार झाले, मत्सराचे प्रकार झाले. पण तो जीवनाचा भाग आहे.

**प्र. २६ वा. कादंबरी लिहितांना नेमकं काय  लिहायच याची निवड कशी करता?**

उत्तर: निवड आपोआप होत जाते. जस मुलं वाळूचा किल्ला बांधतात बांधता बांधता तो अनेकदा पडतो. भिंती बांधाव्या लागतात. पुन्हा पुन्हा प्रयत्न करावा लागतो हे तसच आहे. ऐतिहासिक कादंबरी असेल तर थीमलाईन बॅकलाईन जवळ जवळ तयार असतो. पण सामाजिक कादंबरीमध्ये खूपच कष्ट घ्यावे लागतात. काही वेळेला सुरवात एका बिंदूवर करतो. शेवट एक मानलेला असतो पण शेवट दुसरीकडेच जातो. असंही होतं अलिकडच्या काळात मला याचा जास्त अनुभव आलेला आहे.